
"इब्लिस"
सूरज गाताडे

# इब्लिस

(कादंबरी)

सूरज काशिनाथ गाताडे

ई साहित्य प्रतिष्ठान

# इब्लिस

सूरज काशिनाथ गाताडे

स्क्रिनरायटर्स असोसिएशन मेम्बरशीप नंबर - २१८३१

रा. पेठवडगांव, ता. हातकणंगले, जिल्हा - कोल्हापूर, महाराष्ट्र - ४१६११२

ई-मेल आयडी - surajgatade26@gmail.com

मोबाईल व व्हॉट्सॲप - 9890137797

फेसबुक - http://www.facebook.com/suraj.gatade.140

इन्स्टाग्राम - http://www.instagram.com/surajgatade26

**या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.**

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
**e**sahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य पुस्तके मिळण्यासाठी आपले नाव व गाव कळवा)

प्रकाशन: २८ ऑक्टोबर २०२३

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

**हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.**



प्रस्तावना : -

नमस्कार, मी सूरज काशिनाथ गाताडे. 'इब्लिस' हे माझे चौदावे प्रकाशित पुस्तक वाचकांच्या हाती देताना मला आनंद होत आहे. मी कायम हा प्रयत्न करत आलो आहे की आपली प्रत्येक नवीन कादंबरी ही आधीच्या कादंबरीहून वेगळी आणि अधिक परिणामकारक असावी. त्यामुळे माझा बराच काळ हा स्वतःचेच लेखन रिजेक्ट करण्यात जातो. जेव्हा मला आपले हे लेखन खास आहे असे स्वतःअला वाटते तेव्हाच मी ते सादर करतो.

'इब्लिस' मधील रवी हे जे मुख्य पात्र आहे, त्या पात्राला जोडून आधी कमांडर् ही कथा लिहीत होतो, परंतु ती मनासारखी बनत नव्हती म्हणून तशीच पडून राहिली. त्याही आधी बहुदा सूत्रधार म्हणून एक कथा लिहीत होतो. तीही तशीच पडून आहे. इब्लिस ही या दोन कथांच्या मधील कथा. सूत्रधार प्रिक्वेल, तर कमांडर् हा इब्लिसचा सिक्वेल अशा पद्धतीने कथासूत्र डोक्यात आहे. पण माहीत नाही आता या दोन कथा लिहिल्या जातील की नाही.

असो, या दरम्यानच इब्लिस नंतर (वास्तविक इब्लिस अर्धवट पडलेली तेव्हा...) गर्भगृह ही कथा लिहायला सुरू केली होती, माहीत नाही कधी पूर्ण होईल. पूर्ण करण्याचा प्रयत्न करतोय, परंतु मनासारखं लिखाण होत नाही आणि मग ते पुन्हा बाजूला सारलं जातंय, परंतु पुढील वर्षाच्या आत नक्की गर्भगृह देखील पूर्ण होईल अशी आशा आहे. गर्भगृह ही 'अंतःपुर'चा प्रिक्वेल असेल. त्यामुळे साहजिकच राजकारणाशी निगडित असेल. परंतु यावेळी ही कथा Geo-Political असणार नाही, तर अंतर्गत राजकारणावर बेतलेली असेल. शक्तीसेन हा आपला नायक हा पॉलिटिकल इशूजसोबत डील करण्यासाठीच निर्माण केला आहे, किंबहुना त्याच्या पहिल्या कथेनंतर माझंच असं ठरलं, की राजकारणावर बोलण्यासाठी या पात्राचा उपयोग करता येईल त्यामुळे शक्तीसेन जेव्हा कधी येईल, काही न काही राजकीय विषय घेऊनच येईल मग ते अंतर्गत असतील वा वैश्विक असतील.

असो, मिस्टर वाघ व अगदी डॉक यांचे देखील काही प्लॉट्स रेडी आहेत, पण कधी ते लिहिले जातील माहीत नाही. वाचक सतत विचारत असतात, परंतु माझ्याकडून तितकं लिखाण होत नाही याबद्दल क्षमस्व. अनेकांना माझ्या चौदा पुस्तकांचे कौतुक वाटते. पण माझ्या मनात तर अजून किती क्लथानकं घोळत आहेत ती मोजताही येणार नाहीत.

इब्लिस आधी 'सूत्रधार' व 'कमांडर्' अपूर्ण राहिल्या व हीच तयार झाली. इब्लिसमध्ये इब्लिसची जी थोडक्यात पार्श्वभूमी सांगितली आहे, वास्तविक तीच 'सूत्रधार'ची मूळ कथा आहे.  आता भीती ही आहे की इब्लिस ही कथा इतक्या

मोठ्या स्तरावर गेल्यावर याची प्रिक्वेल सूत्रधार व सिक्वेल कमांडर् या लिहिल्या गेल्याच, तर वाचकांना तितक्या योग्यतेचा वाटतील का?

असो, इब्लिस का लिहिली, तर काही गोष्टी बोलण्याची आवश्यकता वाटली म्हणून! त्या आपल्याला सादर कथेत वाचावयास मिळतीलच.

आता इब्लिसचा अर्थ काय, तर - "सैतानांचा नेता!"

इब्लिस आपल्याला जवळजवळ सर्व धर्मांमध्ये, त्यांच्या धर्मग्रंथात, सर्व संस्कृतींमध्ये आढळतो.

कुराणमध्ये तो इब्लिस याच नांवाने येतो, हा पूर्वी स्वर्गात हाय रँकिंग एंजल (करूब) होता, ज्याचे नांव 'अज़ाज़िल' (अर्खेएंजल) असे होते. (याचवर्षी प्रकाशित 'केस फाईल - 00' मध्ये मुख्य पात्रांपैकी एकाचे जे 'अर्कंज' हे आडनांव आले आहे, ते इथूनच) परंतु ईश्वराचा महान निर्मिती समोर म्हणजे एडम समोर झुकण्यास मनाई केल्याने कुराणानुसार, ईश्वराच्या एडम समोर सर्वांनी झुकण्याच्या आज्ञेचा अनादर केल्याने इब्लिसला स्वर्गातून फेकण्यात आले होते, कारण त्याने आदमाला नकार दिला होता.

तर ख्रिश्चेनिटीमध्ये देखील तो 'अदुव अल्लाह' म्हणजे 'ईश्वराचा शत्रू' म्हणून येतो. ग्रीक शब्द 'डायाबोलोस' शब्दावरून त्याची उत्पत्ती आहे म्हणतात. बाकी इब्लिस बद्दल अजून माहिती येईल, जेव्हा मी वरील नमूद दोन कथा लिहीन. आशा आहे लिहीन...

अगदी प्राचीन काळापासून देशा-देशांत, मानव-मानवांत, संस्कृती-संस्कृतींत आचार, विचारांची, प्रथा, परंपरा, देव, लोककथा, लोकसाहित्य, लोकसंगीत,

वैवाहिक व अगदी शारीरिक देवाणघेवाण झालेली आपल्याला दिसून येते. त्यामुळे कुठलाच मानव कुठल्या इतर मानवांशी अलग राहिलेला नाही. आणि तरी आपल्याला हे मान्यच नसेल, तर निदान आपण दृश्य-आकृती वरून तरी एकसारखे दिसतो याचा नेटका अर्थ आपण एक आहोत इतका सरळ नाही का?

आणखी एक सांगायचे कथेत राहून गेले, ते इथे नमूद करावेसे वाटते, आपली 'इब्लिस' कथा पुढे जाऊन हिटलरशी मिळते, तो कथेचा एक अभिन्न अंग आहे असे म्हणू शकतो. त्याला उद्देशून देखील 'इब्लिस' हा अर्थ सार्थ आहे असे नंतर माझेच मला लक्षात आले.

परंतु इथे सांगावयची गोष्ट ही आहे, की हिटलर व त्याच्या मंत्रिमंडळाने आत्महत्या करण्याचा निर्णय घेतला, तेव्हा हा जर्मनीवरच बॉम्ब टाकण्याच्या विचारात होता आणि तसे आदेशही त्याने दिले होते. 'नीरो डिक्री' (जर्मन: Nerobefehl) अशी त्याने एक ऑर्डर काढली होती. नांवावरूनच अर्थ सादर आहे, नीरो, पाचवा रोमन सम्राट, याने ख्रिश्चनांवर भयानक क्रूर अन्याय केले आणि रोमला आगीने भस्मसात करत असताना तो सारंगी वाजवत होतो. त्याच्या नावावरून या आदेशाचे नांव होते. 19 मार्च 1945 रोजी एडॉल्फ हिटलरने ही ऑर्डर जारी केली होती, ज्यामध्ये मित्र राष्ट्रांच्या सैन्याने जर्मनीमध्ये खोलवर प्रवेश केल्यामुळे जर्मन साधने व पायाभूत सुविधांचा त्यांच्याकडून वापर रोखण्यासाठी त्यांचा नाश करण्याचे आदेश दिले होते.हिटलरचा प्लॅन जर्मनीवर बॉम्ब टाकणे हा होता, जर तो हरला तर. आपण जाणार तर मागे जर्मनी राहून उपयोग काय असा त्याचा विचार होता.

परंतु ही घटना कथेत अंतर्भूत व उद्धृत करणे माझ्या लक्षातून गेल्याने राहून गेले. असो, म्हणून ही गोष्ट इथं देत आहे, आपण हे ध्यानी घेतलं पाहिजे, की हिटलरचं असं करणं हेच अधोरेखित करतं, की 'हुकूमशहांना त्या लोकांचीही काळजीच काय पण अगदी सोयरसुतकही नसते, ज्यांच्यासाठी ते लढताहेत असा ते बनाव करत असतात. हुकूमशहा हा कधीच कोणाचा नसतो, तो ज्यांचा आहे असे तो सांगतो, त्यांचाही तो नसतो. तो फक्त स्वतःचा असतो. स्वतःलाच ईश्वर मानणाऱ्या या हुकूमशहांना स्वतःपुढे कुणाची किंमत नसते!'

इब्लिस मधून आणखी एक गोष्ट ठळक अधोरेखित केली आहे, ती ही, की हिंसा करत असताना आपण आपलंच घरदार, आपली माणसं सगळं, सगळं त्यात जाळून टाकतो, हिंसेचा अग्नी आपलं परकं बघत नाही. त्यामुळे कोणत्याही उद्देशाने का असेना, परंतु हिंसा ही वाईटच! स्त्री-आदराबद्दल देखील आपली कथा काही ठिकाणी बोलते. स्त्री किती सामर्थ्यशाली आहे याचेही चित्रण करते. या अशा या काही गोष्टी प्रामुख्याने सांगण्याचा प्रयत्न आहे.

असो, तर सदर 'इब्लिस' कथा वाचकांना नक्की आवडेल अशी आशा करतो व थांबतो. आभार!!!धन्यवाद!!!!!!

वैश्विक बंधुतेला समर्पित...

अहिंसा परमो धर्मस्तथाहिंसा परं तपः ।
अहिंसा परमं सत्यं यतो धर्मः प्रवर्तते ॥23॥

अर्थ – अहिंसा परम धर्म आहे, अहिंसा परम तप आहे। अहिंसा ही परम सत्य आहे, ज्याने धर्माची (सत्य व न्याय) प्रवृत्ती पुढे वाढते॥

**- (महाभारत, अनुशासन पर्व, अध्याय 115 – दानधर्मपर्व)**

# इब्लिस

# १. वज्राघात...

तीही एक तशी शांत रात्र होती. तोपर्यंत; जोपर्यंत त्याची गाडी त्या थ्री स्टार हॉटेलला लागली नव्हती. गाडीतून उतरून तो पायऱ्या चढून आत गेला. लिफ्ट करवी तो आपल्याला हव्या त्या फ्लोअरवर पोहोचला होता. कॉरिडॉर मधून चालून तो त्याला हव्या असलेल्या एका रूम समोर उभा राहिला. रूम नंबर त्यानं थोडावेळ थांबून कन्फर्म केला आणि दार ठोठावले. आतून अलगद दार उघडले गेले. दार उघडणाराच्या चेहऱ्यावर मात्र त्रासिक भाव होते.

कोण? काय? ही विचारण्याची संधी त्याच्याकडून दार उघडणाऱ्याला दिली गेली नव्हती. एक 'कोल्ट कमांडर्' त्याच्या हाती लखाकली. त्यातून नाईन एमएम 'पॅराबेलम' गोळी सुटली आणि दार उघडणाऱ्याच्या आतड्या छेदत ती पाठीतून बाहेर पडली. रक्ता-मांसाचे सूक्ष्म तुकडे हवेत विखुरले आणि व्हाईट सिल्क मार्बलच्या टाईल्सना लाल करत फ्लोअरवर पसरले. आत पडलेल्या कलेवराला न जुमानता त्याची नजर आत भिरभिरली. दुसरं कोणी नाही याची खात्री करून तो मागे फिरला. त्याचं काम झालं होतं...

जाताना आणि येतानाही त्याला अनेकांनी पाहिलं होतं. तो तिथं असून नसल्यासारखा होता सगळ्यांना. सर्वच त्याला न पाहिल्यागत करत होते. त्याची दहशतच होती तशी. ज्या अर्थी हा इथं येऊन गेला आणि मधल्या काळात गोळीचा आवाज निनादला, कोणाची तरी शामत नक्कीच येऊन गेली होती हे लोकांनी ओळखलं. त्याच्या यादीत पुढलं आपलं नांव कोरलं जाऊ नये म्हणून त्याची उपस्थिती सर्वांकडूनच नाकारण्यात आली होती. आतून भ्यायलेले हॉटेल मधील

सगळेच जीव मुठीत धरून त्याच्या जाण्याची मूकपणे वाट बघत होते. येणारे, जाणारे, आपली हातातली कामे करणारे सगळयांच्याच भयभीत तिरकस नजरा जाणाऱ्या त्याच्या आकृतीकडे लागून राहिल्या होत्या.

त्याला लॉबीतून हॉटेल बाहेर जाताना बघून हॉटेल मॅनेजरने कोणाला तरी फोन करून काम फत्ते झाल्याची वर्दी दिली होती...

प्रस्तुत शहर तसं शांत. म्हणजे इथं गुन्हे घडत नाहीत असे नाही. पण चुटपुट. अलीकडच्या काळात म्हणजे 'तो' इथं प्रकटल्या पासून खूप भयानक काही इथं घडलंय असं आजपर्यंत काही ऐकिवात नाही. पण म्हणून काय ते तसं जरूर आहे का...?

कोणे एकेकाळी इथे ऑर्गनायझ्ड् क्राईमची कन्सेप्ट मूळ धरून होती. यातीलच एक प्यादा म्हणा किंवा राजा म्हणा; तो होता हा 'कमांडर्!'

अंडरवर्ल्ड मध्ये तो 'कमांडर्' या नांवाने प्रसिद्ध होता. हाती आली, की त्याच्याच शरीराचा एक भाग होणाऱ्या 'कोल्ट कमांडर्' या त्याच्या आवडत्या 'पिस्टल'मुळे आणि त्याहूनही त्याची मृत्यूवरही 'कमांड' आहे अशा समजातून त्याला अंडरवर्ल्ड कडून हे नांव दिलं गेलं होतं. एकदा का त्यानं कोणाचा जीव घ्यायचे ठरवले, की ती व्यक्ती थेट मृत्यूच्या दाढेत! त्याला विकल्प नाही.

त्याचा चेहरा मात्र कोणी न पाहिलेला. गुन्हेगारी विश्वातील ज्यांनी ज्यांनी तो चेहरा पाहिला होता, त्यांतील कोणीच आज जिवंत नव्हते.

कोण होता तो...? तो होता...

'इब्लिस!'

पिवळट पांढरे दात विचकारा, काळी आऊटलाईन असलेला, डोक्यावर दोन अनुकुचीदार रक्तवर्णी शिंगे असणारा, नाकापासून हनुवटीपर्यंत तोंड झाकोळून टाकणारा 'डीमन' मास्क तो सतत परिधान करून असायचा; असतो...

त्याच्या या मास्क वरून त्याला सर्वमान्य प्रचलित नांव 'इब्लिस' असंही पडलं होतं. हे नांव उच्चारणही बरेचजण टाळत असतं. हिंमत असणारेच त्याला या नांवाने उद्धृत करत असत. 'कमांडर्' पेक्षा हेच नांव त्याला अधिक प्रिय!

'कमांडर्'हूनही स्वतःला तो हेच म्हणवून घेणं अधिक पसंत करायचा. या इब्लिसचा अर्थ प्रचलित मराठीतील 'उपद्व्यापी' असा नाही. अरबी भाषेनुरूप 'तो, जो हमेशा दुःखात असतो' असा 'इब्लिस!' यालाही दुःख कुठे चुकलं होतं?! दुःख जणू याची सावली होतं. अरबीत आणखी एक अर्थ आहे; तो म्हणजे 'सैतानांचा नेता!' पारसी/तुर्की/ग्रीक भाषा संस्कृतींमध्येही याचा अर्थ 'सैतान' असाच दिलाय.

तो स्वतःला तसाच पाहत होता. सैतानासारखा! बाकी त्याचं खरं नांव काय हे त्यासही माहीत नाही. त्यामुळंच इतर कोणाला माहीत असण्याचं कारण नाही.

हा 'सैतान' मात्र वेगळा होता. हा वाईट प्रवृत्तींना प्रोत्साहन देणारा नव्हे, तर त्यांचं समूळ उच्चाटन करणारा 'सैतान' होता. सैतान प्रकृतीच्या लोकांसाठी तो सैतान होता. मोठ्या मोठ्या अपराध्यांना ज्याच्या असण्याच्या कल्पनेचीही भीती वाटावी असा हा 'इब्लिस!'

रात्रीच्या काळोखात इब्लिस खिशात हात घालून फुटपाथच्या कडेला स्ट्रीट लाईट्सच्या मंद पिवळट प्रकाशात चालत होता.

एलईडी लाईट्सनी चकाकणारा तो मास्क या लाईट्समुळे आणखीणच भयावह दिसत होता...

थंड हवा सुटलेली. इब्लिस मास्कच्या तोंडून वाफा निघत होत्या. मास्क असून त्या भोवतालच्या वातावरणात विखुरत होत्या. कोणालाही जागीच हृदय विकाराचा झटका देण्यास इतकंच दृश्य पुरेसं होतं.

पार पडलेल्या कामगिरीचा मोबदला अजून मिळालेला नव्हता. म्हणून मग तो कोणाची तरी वाट पाहत तेथे उभा झाला. बहुदा त्याच्या हँडलरची...

हँडलर? इब्लिसला कोण हँडल करू शकतो? कोणाच्या तिर्थरूपात ती क्षमताच नाही, की इब्लिसवर कोणी सत्ता गाजवेल. पूर्वी कोणी कोणी प्रयत्न केला होता. आज ते हयात नाहीत! मग...?

बराच वेळ वाट पाहून इब्लिस मग फुटपाथच्या किनाऱ्याला लागून चालू लागला. थोडं अंतर कापल्यावर एक चारचाकी त्याच्या मागून पास झाली. जाताजाता न्यूजपेपरमध्ये गुंडाळलेलं एक पुडकं त्याच्या दिशेने भिरकावलं गेलं होतं. पुडकं भिरकावून गाडी पाहताक्षणी नाहीशी देखील झाली होती.

ती गुंडाळी इब्लिसनं उचलली. उचलता उचलताच त्याचा हात त्यानं त्याच्या डेनिम जॅकेटमध्ये घालून मोबाईल बाहेर काढला होता. न पाहताच त्यानं डायल केलं होतं. पुडकं खिशात सारत तो फोन मध्ये क्रुद्ध बोलला,

"पुढच्यावेळी मी मागितले, तर पैसे हातात पाहिजेत. जर पुन्हा असे फेकले, तर कमांडर् एक गोळी फेकेल! मग बघणार नाही, तू कोण आहेस!"

आपली तिडीक शब्दांत रूपांतरित करून त्यानं फोन कट केला. खिशात सारला. तोही सरकला. कार्यपुर्ती झाल्यावर त्याला पहिले ज्या गोष्टीची गरज असते ती मिळवण्यासाठी...

असं नाही, की त्याला पिणं आवडतं. नाही! तो पितो, कारण तो जे करतोय ते स्वयं त्यालाही रुचणारं नव्हतं. नाईलाजास्तव तो असलं काम करत होता... आणि तेच कडू सत्य पचवण्यासाठी त्याला मद्याचे कडू घोट घशाखाली पोटात रिचवावे लागत होते. द्वै बाजूनी विचार करणाऱ्या मेंदूने चांगलं-वाईट यातला भेद, संघर्ष करणं थांबवावं म्हणून. एखादा नवीन खून पाडल्यानंतर तर त्याचं विवेकी मस्तिष्क त्याला अधिकच त्रासत असे म्हणूनच तो मद्यघुटीकेचा आधार घेत असे... तो अय्याशखोर आहे म्हणून नाही! तर सत्य-असत्यातील द्वंद्व काहीकाळ तरी त्याच्यासाठी संपावं म्हणून...

एखाद्याला मारण्याच्या प्रोसेसमध्ये जी मानसिक तणावाची स्तिथी निर्माण होते, तिचा निचरा करण्यासाठी तोंडावर तो इब्लिस मास्क असलेला तो, एका बार वजा रेस्टॉरंटच्या टेरिसवर एकलाच बसला होता, पैसे मोजत. मघाशी मार्गी लावलेल्या कामाची ही बिदागी असावी.

"आज पैसे सोबत घेऊन जातोयस? काय भानगड काय?" एक स्त्री आवाज विचारता झाला.

ही 'हेली', इब्लिस सोबत काम करणारी! पण स्वतःच्या मर्जीची मालकीण! इब्लिसच्या प्रत्येक कामाची असाईन्मेंट घेणं, त्याच्या पैशांचा व्यवहार सांभाळण्याचं काम हीचं. इब्लिसला कमांडर् म्हणायची सुरवात हिनेच केलेली. म्हणायला गेलं, तर ही इब्लिससाठी काम करत होती, पण इब्लिसला मात्र ती त्याच्या खजिन्यावर वेटोळं खालून बसलेली नागीण वाटत असे. कारण लोकांच्या खूनाची आणि याच्या पसिन्याची कमाई ही त्यालाच मनाप्रमाणे वापरू देत नसे.

आणि आज तर तो त्या जोखीम घेऊन कमावलेल्या धनाचा 'चांगला'च उपयोग परिमार्जन करण्याच्या विचारात होता. आणि त्याच्या या मानसावर पाणी पसरवणारा तो मधूर पण त्याच्यासाठी सैतानी आवाज त्याच्या कानी पडला होता.

"पैसे मला ट्रान्स्फर न करता तू एसपीला ते स्वतःकडे पाठवण्याला सांगितलंस. याचं काही विशेष कारण?" हेली त्याच्या समोर बसत विचारत होती.

त्याच्यासाठी भरलेला स्कॉचचा ग्लास तिनं गटकवला. त्याला खिजवण्यासाठीच होतं ते. पण तिची मात्रा कामी आली नाही.

"स्ट्रेंज! आपला पेग कोणी दुसरा रिचवतोय हे पाहून पण आज कमांडर् शांत?! नक्कीच काही विशेष दिसतंय!" ती मस्करीत बोलली.

"ते तुझ्यासाठीच होतं. ओरडून तुझ्या घशाला कोरड पडत येणार हे मला माहीतच होतं. आणि आता जरा शांत बस! नुसतं पचर पचर! च्यायला तुम्ही

बायका कामं कुठंलीही करा, पण तोंडं काही बंद राहत नाहीत तुमची!" तो थंड स्वरात वैताग व्यक्त करता झाला,

"हा पैसा माझा आहे. मी कमावतो. तू माझी नोकरी करतेस लक्षात ठेव!" तो तिला खिजवत बोलला. हे बोलत असताना त्याच्या मनी कोणतीच परकीयत्वाची दुर्भावना मात्र नव्हती, की स्त्रियांना कमी लेखण्याच्या त्याचा कोणता हेतू होता. तो आपली सहकर्मी असलेल्या आपल्या मैत्रिणीशी सहज बोलला होता.

"मी आजपर्यंत समजत होते, की मी तुझी पार्टनर आहे..." ती जराही वाईट वाटू न देता म्हणाली. तिचा कमांडर तिचीच काय पण कोणत्याही स्त्रीची कधी अवहेलना करायचा नाही हे ती पुरती ओळखून होती. ती त्याच्या जवळची होती, म्हणून तो तिची टर उडवत होता इतकंच. आणि हे ती जाणून होती.

यावर काही प्रतिक्रिया न देता इब्लिसनं तिचा शेअर तिच्या पुढ्यात आपटला आणि तिला काही सूचना न देता तो तेथून निघाला सुद्धा. जाताना तो बिल पे करायला विसरला नव्हता. त्याच्या या संदिग्ध वागण्याने आश्चर्य न वाटू देता त्याच्याकडं बघणाऱ्या तिनं मग स्वतःसाठी ऑर्डर दिली. इब्लिसनं तिचं एडवांस बिल पण दिलेलं तिच्या लक्षात आल्याने तिला चिंता उरली नव्हती.

पुढल्या दिवशी, संध्याकाळी... त्याची फोर व्हीलर मग एका ऑर्फनेजला येऊन थांबली. 'सूर्योदय अनाथालय'; हे तेच अनाथाश्रम, जिथे तो लहानाचा मोठा झाला होता. पण स्वतः अनाथ असल्यानं त्याला लहानपणी इथे आसरा मिळाला होता.

पौगडांवस्थेत असताना त्याला काही कारणास्तव जेलमध्ये जावं लागलं होतं. त्याची चूक काय होती? तर काही नाही! जेलमध्ये जाणं ही त्याची चॉईस होती. त्याचा तो इतिहास...

पण आता त्यानं पुन्हा या अनाथाश्रमासोबत ऋणानुबंध जोडले होते. इथली त्याच्या सारखीच अनाथ निरागस मुलं त्याला स्वतःचा भाग वाटायचे. त्यांच्या आयुष्यात फक्त सुखच सुख असावं म्हणून त्याचा हट्टहास आणि खटपट चालू असायची. इथल्या एकही बालकाला दुःखी पाहणं त्याच्यासाठी काळजाला घरे पाडणारं होतं. इतकं असून तो मात्र इथे राहत नसे. आपल्यामुळं यांना त्रास नको हा उद्देश! पण यांच्या सुरक्षेची काळजी मात्र त्यानं पुरेपूर घेतलेली होती.

गाडीतून उतरण्याआधी त्यानं आपला मास्क काढून कम्पार्टमेंटमध्ये टाकला.

आपल्या कर्माचे फलित सूर्योदयला भोगायला लागू नये व इथले त्याचे निष्पाप बंधू-भगिनी आपल्या या हिणकस रुपापासून अलिप्त राहावीत यासाठी हा 'इब्लिस मास्क'.

त्याचं हे दुसरं रूप त्याला या निष्पाप मुलांसमोर आणायचं नव्हतं. सदर क्रूर जगाची ओळख त्याला आपल्या या निष्प्रभ मुलांपासून अजून तरी दूर ठेवायची होती. भविष्यात निष्ठुर जगाचा सामना करण्यासाठी जेव्हा ही मुलं बाहेर पडतील, तेव्हा जगाचा खरा चेहरा त्यांच्या समोर येणार होताच. परंतु तूर्तास आत्ता तरी नको म्हणून त्याची ही दक्षता. उतरतानाच त्यानं मागील डीक्की अनलॉक केली.

त्यानं बाहेर पाय टाकताच अनाथाश्रमाच्या सजावटीत मग्न असलेली मुलं त्याच्याभोवती गोळा झाली. रवी मोठ्या आनंदाने त्या सर्वांना भेटला. मुलांनीही 'रवी दादा... रवी दादा...' म्हणून त्याच्यावर उड्या टाकल्या.

'रवी...!' हो त्याच नांवाने हे सगळे त्याला ओळखत होते. इथल्या अनाथाश्रमात त्याला बालपणी याच नांवाने रजिस्टर्ड् करून घेतला होता.

याचा इतिहास देखील मोठा अजब आणि रोचक आहे. 'इब्लिस' हा 'रवी' म्हणून जन्मापासून किशोरवस्थेपर्यंत सूर्योदय अनाथालयात रहात असे. अगदी जन्मताच आई गेल्यानं आणि वडिलांचा ठावठिकाणा नसल्यानं तो हॉस्पिटलकरवीच दत्तक म्हणून या अनाथालयात जतीन यांच्या पदरी आला होता. रवी हे नांव त्याला तिथंच जतीन यांच्याकडून मिळालेलं.

किशोरवयात पंधरा-सोळा वर्षांचा असताना त्याच्या शाळेतील जिवलग मित्राकडून अनावधानानं कुणाचा खून झाला होता. रवीचं आपलं असं कोणी नव्हतं. या मित्राचे आई-वडील होते. मित्र तुरुंगात गेला, तर त्यांचं काय होणार? शिवाय या एका दुर्घटनेनं आपल्या मित्राचं आयुष्य नासायला नको म्हणून त्याचा गुन्हा आपल्या शिरी घेऊन तो जेलमध्ये गेला होता. आपल्या मित्राचं आयुष्य सुधारावं म्हणून.

पण जेव्हा तो चौदा वर्षांची जन्मठेप भोगून परत आला, तेव्हा त्याला वेगळंच चित्र दिसलं. ज्या मित्राच्या आयुष्याची वाताहत होऊ नये म्हणून त्यानं त्याच्या जागी जेल जाणं निवडलं होतं, तोच आता या शहरातला मोठा गुन्हेविश्वाचा राजा झालेला तो पाहत होता. रवीला सगळं मातीमोल झाल्यासारखं

क्षणात वाटलं. याला याच्या वाटणीची शिक्षा भोगू दिली असती, तर हा असा उन्मत्त झाला नसता असं वाटून त्याच्या दुर्धांत गुन्हेगार होण्याला रवीनं स्वतःला दोषी धरलं.

आणि त्याच्या मित्रानं पेरलेली आणि संगोपन करत वाढवत नेलेली ही अधर्माचरणव दुर्वर्तनाची विखारी वल्ली उखडून फेकण्याचं आपलं आद्य कर्तव्य मानून ही करवीरची माती त्यानं कधीच पाप मुक्त केली होती.

वेळप्रसंगी त्यानं आपल्या त्याच जिवलग मित्राचा देखील खात्मा केला होता, जो हे शहर, हा समाज दूषित होण्याला कारणीभूत ठरला होता. तरी देखील त्याला 'इब्लिस' म्हणून रहावं लागायचं. इब्लिसचं समाजातलं भय नष्ट होऊ नये आणि लोक पुन्हा नकोत्या घोरकर्मात पडू नयेत म्हणून. आता 'इब्लिस' हेच त्याचं खरं रूप बनून गेलं होतं त्याच्यासाठी...

कधीकाळी यानं एका रात्रीत गुन्हेगारी प्रवृत्तीची विषवल्ली नष्ट केली होती. पण दोन वर्षांनी अचानक आता ती नव्यानं फुलू पाहत होती... यास्तव त्यानं आपली सक्रियता स्थावर ठेवली होती. काही दिवसांपासून नवीन पालवी फुटू पाहणारी ही गुन्हेरूपी विषारी वेल वृक्ष होण्यापूर्वीच उखडून टाकावी या विचारानं निःस्पृह भावनेनं जीवावर उदार होऊन तो हे कार्य करतच राहिला होता. आणि अशाप्रकारे तेव्हापासून रवीला इब्लिस नांवाच्या राहूनं ग्रासलं होतं...

शिडीवर चढून आर्टिफिशियल फुलमाळा लावत असलेल्या अनाथाश्रमातील वॉलेंटीयरला त्यानं हाक दिली,

"संतू!"

संतू रवीचा आवाज ऐकून झर्रकरन् खाली उतरला. एरव्ही तो वरून फक्त त्याच्याकडं पाहत होता. त्याची शिडी धरणारी मुले, तीही शिडी सोडून रवीभोवती गोळा झाली होती. बाकी गाडीचा आवाज ऐकून त्याची मान आणि तिला फॉलोव्ह करत नजरही रवीवर यद्यपी स्थिर झालीच होती.

संतू लगबगीने रवी समोर येऊन उभारला. रवीपेक्षा वयाने थोडा लहान असल्यानं तो रवीकडे बॉस म्हणूनच पाहतोय असं रवी जेव्हा तिथं येईल तेव्हा तेव्हा त्याच्या हरकती वरून स्पष्ट होत असे.

"यांच्या गिफ्ट्स यांना वाट!" संतूला सूचना करत तो त्या घोळक्यातून वाट काढत आत निघून गेला. जाता जाता त्यानं गाडीची किल्ली संतूकडे फेकली. संतूने ती अलगद झेलली आणि डीक्कीकडे गेला. गाडी व्यवस्थित पार्क करण्याचं काम देखील आपसूकच त्यांच्याकडे आलं होतं.

"अजिबात भांडायचं नाही. मजा करा!" म्हणत रवी अनाथाश्रमात प्रवेशकर्ता झाला.

रवी ऑफिसमध्ये प्रवेशणार तोच त्याच्या कानी आवाज पडले. म्हणून त्यानं आत जाणे उचित समजले नाही. आतील चर्चा संपेपर्यंत त्यानं बाहेर एक खुर्चीवर बसण्याचं ठरवलं. त्याचे कान मात्र आतील शब्दांचे वेध घेण्यात निमग्न होते...

ऑफिस केबिनमध्ये साठ-पासष्ठ वर्षांचे मालक, सर्वेसर्वा, एडमिनिस्ट्रेटर जतीन सारस्वत समोर कोणी बसले होते. त्याच मनुष्याचा आवाज बाहेर ऐकू जात होता. उर्जित अग्रवाल नावाचा हा इसम त्याच्या सुमुखावर अगदीच आतल्या गाठीचे भाव घेऊन बसला होता. त्याचा चेहराच इतका लोभी होता, की त्याला आपले मनीचे कितीही कसोशी केली तरी लपवता येत नव्हते. तो बोलत होता,

"साहेब, आपल्या संस्थेला बत्तीस वर्षं पूर्ण होत आली. हीच वेळ आहे, जागा विकून टाका. मोक्याची आहे. कोणीही हसत हसत मोठी रक्कम देईल. बघा; विचार करा. चांगला भाव येतोय तेवढ्यात व्यवहार केलेला बरा असतो!"

त्याच्या या बोलण्यावर जतीनना हसू आलं. दुनिया पाहिलेला माणूस. समोरच्याच्या मनातलं काळंबेरं कसं न ओळखणार?!

"असं बोलताय, जणू व्यवहार आपणच ठरवून आलायत! आलायत का?" सस्मित अग्रवालवर नजर रोखून जतीन त्याला सूचक बोलले.

त्या वृद्धाची ती भेदक नजर अनपेक्षित आपल्यावर पडल्यानं उर्जित जरा कचरला आणि मग स्वतःला सावरून बळेच हसून तो म्हणाला,

"काहीच काय? व्यवहार तुमच्या मर्जीशिवाय कसा ठरेल? एक खरीद्दार आहे तसा. स्वतःहून चालून आलाय. म्हणून म्हंटलं, विचारावं. बाकी मनात काही येऊ-ठेवू नका." तो म्हणाला.

"जाणतो. पण महोदय, ही जागा मला विकायचीच असती, तर बत्तीस वर्षांपूर्वी मी इथे हे अनाथालय उभंच केलं असतं का? आपण उगाच आपला वेळ घालवताय. तूर्तास तरी ही जागा विकण्याचा मानस नाही. विचार तर त्याहून नाही.

मला वाटतं, तुम्ही हा तिसरा खरेदीदार घेऊन आला आहात. पुढेही माझे उत्तर बदलणार नाही. तरी आता स्वतःला त्रास देणे थांबवावे. आशा करतो पुढल्या वेळेस याल, तेव्हा कारण दुसरे काही असेल." मान उंचावून जतीन त्यास हसत मुखाने म्हणाले,

"कधी या आमच्या मुलांबरोबर वेळ घालवायला. खऱ्या सुखाचा अर्थ कळून जाईल." उर्जितला स्वार्थी दुनियेतून बाहेर निघून निरभ्र सत्यानंदाचा साक्षात्कार होण्याची संधी देत प्रसन्न हसत जतीन बोलायचे थांबले.

आपल्याला रीतसर उडवून लावले आहे हे उर्जितच्या ध्यानात आलं होतं. परंतु जतीन यांनीच त्याला किती मोठी 'ऑफर' दिली होती हे त्याच्या गावीही नव्हते. तो अजूनही त्याच्याच आपमतलबी जगात लिप्त होता. त्याला तेच रुचणारं होतं...

"नक्कीच." खोटे हसून तो उठून उभारला,

"तरी कधी विचार बद्दललाच, तर कळवा. माझा कॉन्टॅक्ट तुमच्याकडे आहेच. नीट विचार करा असे मी आपणास सुचवेन. येतो!" म्हणत हात जोडून तो निघून गेला.

रवी दारावर तिरकस नजर टाकून होता. हा कोण आहे, जो हे अनाथालय विकण्याचा प्रस्ताव घेऊन आलाय हे त्याला पहायचं होतं. पण उर्जितच्या ते ध्यानी आलंच तर त्याला ते सहज वाटावं म्हणून रवीने कोणताही अविर्भाव आणला

नव्हता. उर्जित त्याच्यापासून सरता झाला, तोच रवी उठून उभारला. काहीवेळ उर्जितच्या आकृतीला न्याहाळत मग पायांना गती देत तो केबिनमध्ये गेला.

"येऊ का सर?" तो चौकटीला थांबूनच उच्चारला.

"तुला कोण आडवणार बाबा?" चष्मा काढून डेस्कवर टाकत जतीन म्हणाले.

मनसोक्त हट्टहास करत हसून रवी त्यांच्या समोर जाऊन बसला.

"बरं वाटतं तुला असं हसताना बघून." जतीन एखाद्या बापाच्या मायेने बोलते झाले,

"एरव्ही तुझ्या आयुष्यात हसण्याचे मौके नेमकेच आणि तेही क्षणिक."

"हे घरच तर आहे सर, जिथे मी खरा असतो. चिंतामुक्त असतो. इथं माझी माणसं जी आहेत." तो निर्मळ बोलला.

मग काल रात्री गाडीच्या खिडकीतून त्याच्यावर भिरकावलेला पुडका त्यानं टेबलवर जतीन समोर ठेवला.

आता जतीन गंभीर झाले,

"तुला माहीत आहे, मी हे घेणार नाही. तरी तू कायम हे आणून माझ्या पुढ्यात का ठेवतोस?" ते जरा रागे बोलले.

"मी करत असलेल्या कामामुळे... नाही?!" रवी निराशेने बोलला.

"तुला माहीत आहे!" जतीन न राहून मग पुढे बोलले,

"तुला अनेकदा सांगितलं आहे, हे काम सोड. जगात खूप चांगली कामं आहेत करायला."

"हे पण तर चांगलंच काम आहे. ज्यांना कायद्याने शिक्षा होत नाही. त्यांना मी शिक्षा करतो. त्यासाठीच पैसे घेतो यात चुकीचं काय आहे?"

"तू न्यायाधीश आहेस? की ते, जे तुला हे काम सोपवतात? मला माहित नाही असं समजू नको. सुप्रीटेंडेडनंच तुला हाताशी धरलं आहे."

"त्याची काय बिशाद! तो मला फक्त माहिती पुरवतो. निर्णय माझा असतो!" रवी ठाम म्हणाला.

"आणि उद्या त्याची बदली झाली तर? नंतर आलेला एसपी तुला साथ देईल?" जतीन यांनी वैध प्रश्न केला,

"आणि त्यावेळी तुला पैसे कोण पुरवेल? की मग पैशांसाठी सुपाऱ्या घेणं चालू करशील?" जतीन तावले होते.

"मला यावर बोलायचं नाही." रवी शांत म्हणाला.

"बोलायचं नाही की उत्तरं नाहीत." जतीन यांचा आणखी एक वैध प्रश्न.

"आहेत! पण ती तुम्हाला पटायची नाहीत! असो, आपली मतं कधी एकमेकांना रुचायची नाहीत. आणि आपली तात्विक भांडणं कधी मिटायची नाहीत." आपला बाप आपल्याला समजून घेत नाही या हताशेने तो बोलला, तरी तो पुढे कृतज्ञता व्यक्त करता झाला,

"पण तुम्ही मुलांना कधी माझ्या भेटवस्तू घेण्यास मनाई केली नाही यातच मी धन्य आहे."

"तो तुझ्या व त्या मुलांमधला व्यवहार आहे. मी त्यात पडणारा कोण? पण मला खात्री आहे त्यांना जाण आली, तर तेही नाकारतील!" मुलाला योग्य मार्गावर आणण्यासाठी बाप जसा एखादी भीती घालतो, त्यानुसार जतीन त्यास बोलले.

"भेटी नाकारोत. पण मला नाकारत नाहीत तोपर्यंत सगळं ठीक आहे. तुम्ही नाकारत नाही, तेही नाकारणार नाहीत याची खात्री यातच." नम डोळ्यांनी रवी हरवल्यागत हसत बोलला.

जतीन यांनाही वाईट वाटलं. त्यांना माहीत होतं, की त्यांचा हा मुलगा किती विचित्र गोष्टींतून तावून सुलाखून निघाला आहे. दत्तक होता, पण पुत्र होता. त्याच्या आयुष्याचे सारे चढ-उतार यांनी बापाच्या नजरेने पाहिलेले.

एक क्रूर मारेकरी म्हणून जगत असताना पण याने आपली माणुसकी मारलेली नव्हती आणि याच एका गोष्टीमुळे त्यांनी रवीशी नातं तोडलेलं नव्हतं. रवी हे नांव त्यांनीच याला दिलेलं. स्वतःचं आयुष्य हा अनाथ मुलगा मोठा झाल्यावर प्रकाशमान करेल अशी त्यांना आशा होती. म्हणून तर त्यांनी या 'सूर्योदय' अनाथाश्रमाच्या या पहिल्या अपत्यास 'रवी' हे नाव दिलं होतं.

पण या 'रवी'नेच अपरिमित अंधारमय जीवन आजतागायत जगलेलं आहे हेही त्यांनी पाहिलंय. आणि म्हणूनच विसाव्यासाठी याला एकतरी जागा असावी म्हणूनच यांनी त्याला दूर लोटलेलं नव्हतं. त्याची खूनी बाजू न पटून त्याला इथं येण्यास अटकाव केला नव्हता.

याचा मृत्यू कसा होईल याची त्यांना चिंता वाटे, पण जर साधारण मरण आलेच, तर देह ठेवण्यासाठी त्याला एक हक्काची चौकट असावी म्हणूनच ते त्याच्याशी नातं जोडून होते. त्यांची तत्त्वं-सिद्धांत वेगळे होते तरी!

हीच हक्काची चौकट सर्व मुलांसाठी तशीच रहावी म्हणूनच जतीन तिचा सौदाही करत नव्हते.

"तुला इथं यायला मनाई नाही, पण लक्षात ठेव नंतर पिऊन इथं यायचं नाही. उतरेपर्यंत खोलीतून बाहेर पडू नको. रात्रभर स्वतःला कोंडून घेतलास तर उत्तमच. जेवण खोलीत येईल. जा!" जतीन यांनी त्यास दरडावले.

बंडल टेबलवर आदळत रवी उभारला.

"एसपीची बदली झाली, तर मी त्याच्या मागून जाणार नाही याची खात्री बाळगा." ते पैसे तेथेच टेबलवर सोडून रवी बाहेर झाला.

जतीन यांनी निराशेने स्मित करून मान डोलवत तो बंडल उचलला आणि एका लोकरमध्ये ठेवून दिला, जिथे रवीने दिलेले असेच अनेको पुडके असेच निरुपयोगी पडले होते! याचा वापर कधी होणार नव्हता. रवी ऐकणार नाही, हे जाणून त्याचं मन राखण्यासाठी हे असेच धूळ खात पडून राहणार होते. यात काळानुसार आणखी काही भर होणार होती कदाचित... याचा उपाय मात्र होणार नव्हता. कधीच!!!

त्या रात्री रवीच्या गैरहजेरीतच सर्वांचं भोजन झालं. सूर्योदय अनाथालयाच्या वर्धापनदिनाचा जल्लोष होता. मुलं त्याला सोबत घेण्याचा खूप

आग्रह करत होते, पण जतीन यांनी कोणास त्याच्या खोलीकडेही फिरकण्यास मज्जाव केला होता. त्यांची आज्ञा मोडण्याची कोणाच्यात हिंमत नव्हती. म्हणून रवीच्या खोलीचं दार ठोठावण्याचीच काय पण तिकडे फिरवण्याचीही कुणाची छाती झाली नव्हती.

संतूने मात्र जेवणाच्या वेळी एक पान खोलीचं दार किलकिलं करून आत सारलं होतं. बिछान्यावर पडलेल्या रवीला चाहूल लागल्याने त्यानं मान वर तिरकी करून दाराकडे नजर फेकली होती. जेवणाचं ताट आत आलं, तरी तो उठला नव्हता. भुकेची वासना त्याला उरली नव्हती. आपल्या माणसांत आल्याने तो तृप्त झाला होता.

संतूचा हात बाहेर गेल्यावर दार पुन्हा लागताच रवीची नजर सुद्धा त्या सुग्रास अन्नावरून हल्ली होती. तो पुन्हा कसल्याशा तंद्रीत गेला होता.

◆◆◆

हेली कोल्ट कमांडर् साफ करत बसली होती. अकाऊंट मेंटेन करण्यासोबत इब्लिसच्या साऱ्या हत्यारांची देखरेख ठेवणं हे तिचं काम होतं. ती ते इमाने इतबारे करत होती.

परंतु ती त्यांच्या कामाच्या ठिकाणी नव्हती. ती तिच्या घरी होती. इब्लिस नसताना ती त्यांच्या 'ऑपरेशन ब्लॉक'वर एकटीच थांबत नसे. इब्लिसचा का सिक्रेट बेस होता.

कोल्ट कमांडर् स्वच्छ करत असतानाच तिचा मोबाईल ब्लिंक झाला. एक असाईन्मेंट डिटेल येऊन पडली होती. तिनं त्वरित ती वाचली आणि ती इब्लिसला फोरवर्ड केली.

रात्रभर त्याला झोप नव्हती. सकाळी सकाळीच तो अनाथाश्रमाच्या टेसेसवर जाऊन उभारला होता.

"काय उतरली का नाही?" मागून आवाज आला.

कोण असणार हे पाहण्याची व अंदाज लावण्याची गरज नव्हती. जतीन आहेत हे त्याला आवाजवरूनच स्पष्ट होतं.

"सर, का लाजवताय?" त्याच्या बाजूला येऊन उभ्या जतीनला तो अपराधी म्हणाला.

"मग माणसाने लाज येईल अशी कामं करावीतच का?" जतीन गोड स्मित करत म्हणाले,

"घे, लिंबू सरबत. याने काही मदत होते का बघ." ते पुढे म्हणाले.

रवीने त्यांच्या नजरेला नजर न मिळवताच ग्लास घेऊन ओठाला लावला.

"तुझ्या सोमरसाची गोडी नसेल याला, पण चालवून घे!" जतीन त्यातूनही रवीला खजील करण्याच्या इराद्याने तिरकस बोलले.

सरबताने फक्त त्याचे ओठ भिजले होते. त्यानं हात तिथेच थांबवला. इतक्यात त्याचा मोबाईल ब्लिंक झाला होता. त्याचा हात त्या आवाजाने थांबला

असे भासवत होता रवी, पण त्याचा हात जतीन यांच्या टोमण्याने थांबला होता, हे जतीन यांनी ताडले होते. याचं त्यांना बहुदा हसू आलं असतं, पण त्याला आलेला मेसेज कोणत्या कामाचा आहे हे त्यांना उमगले असल्यानं ते धीरगंभीर झाले होते.

रवी मेसेज पाहत असतानाच त्यांनी तेथून काढता पाय घेण्याचं ठरवलं. त्यांचं पाऊल दाराकडे पडलंही होतं, हे जाणून रवीने मोबाईल खिशात सारून त्यांचा हात धरला,

"सर, आपण कधीच मला पहिल्यासारखं स्वीकारणार नाहीत का? आपण मला नांवानिशी हाकही मारत नाही हे न लक्षात येण्याइतका मी..." रवी निराश स्वरात खाली खोल पाहत तुटक बोलला.

जतीनही त्याच्याकडं न पाहताच खिन्न स्मित करत म्हणाले,

"तू जेव्हा मला सर सोडून पुन्हा बाबा म्हणायला लागशील, तेव्हा आपण याच्यावर बोलू." त्यांची मान हे बोलत असताना खाली गेली होती.

यावर रवीकडे काही प्रतित्युर नव्हते. तो आवंढा गिळत गप्प राहिला.

"तू मला सर का म्हणायला लागलास, याची कल्पना मला आहे. तू जे करतोयस ते कायद्याला धरून नाही आणि म्हणून मी त्याला अव्हेरतो हे तू जाणून आहेस आणि या अपराधबोधापोटी तू मला 'सर' म्हणतोस. नाही?! तू जोपर्यंत हे काम सोडत नाहीस तोपर्यंत मला बाबा म्हणणार नाहीस. आणि मी हे जाणून आहे, की तू हे काम सोडणार नाहीस! तूर्तास जे आहे ते असेच राहील..." जतीन भाव आवेग आवरत बोलले.

"तुमच्यापेक्षा हे काम मला महत्वाचं आहे असं नाही, पण हे पण गरजेचं आहे..." कापऱ्या आवाजात खोल कुठेतरी पाहत रवी तर्क करत म्हणाला.

जतीन यांनी आपला हात सोडवून घेतला,

"तुला इकडं यायला मनाई नाही, पण एक लक्षात ठेव, तुझ्या मागून कोणतं संकट या मुलांवर येऊ नये एवढं बघ!" जणू निर्वानीचंच बोलून जतीन खाली निघून गेले.

जतीन यांच्या वाणीने रवी काही काळ भावूक झाला, परंतु आत्ता याक्षणी भावूक होऊन चालणारे नव्हते. रवीचे पाणावलेले डोळे आता क्षणात रक्तवर्णी बनले. तो आता इब्लिसच्या अवतारात परतला होता... इब्लिसनं डोकं वर काढलं होतं...

●●●

रात्रीच्या अंधःकाराची मदत घेत इब्लिसची कार रस्त्यानं धावत होती. तो हँड्सफ्रीवर हेलीशी बोलत होता,

"ॲडव्हान्स?" त्याचा प्रश्न.

"जमा झालाय." तिचं पलिकडून उत्तर.

"को-ओरडीनेट्स?" त्यानं विचारलं.

"पाठवलेत." तिनं सांगितलं.

हेलीच उत्तर ऐकून मग इब्लिसनं त्याच्या मोबाईल स्क्रिनशी चाळा केला. गुगल मॅप गाडीच्या नेव्हगेशनवर दिसू लागला.

"तू कुठे आहेस?" त्यानं तिला विचारलं.

"माझ्या घरी." ती बोलली.

"जॉब डन झाल्यावर पीकअप करू तुला?" इब्लिसनं सहज विचारलं.

"नाही. माझ्या घराकडे फिरकायचं नाही. तुला अनेकदा बजावलं आहे!" हेली जरब भरत बोलली.

"जणू तिथं सोनं पेरलंय. हं? माझा कॅप्चर केलेला पैसा तिथं गाडून तर ठेवला नाहीस ना?" इब्लिस तिची मस्करी करत पण स्ट्रेट इमोशनने बोलला. जणू तिला खरं वाटावं.

"शट अप!" ती तिकडून खेकसली.

इकडे इब्लिस कुत्सित हसला. नावाप्रमाणेच सैतानी वृत्ती दाखवणं त्याच्या स्वभावाचा भाग झाला होता. मास्कचे दात आधीच विचकलेले होते. त्याला वेगळे विचकण्याची आवश्यकता नव्हती. यद्यपी त्यानं ते विचकलेच असते.

"मला कधी तरी तुझ्या घराचा शोध घ्यावाच लागेल." तो तिची टर खेचत म्हणाला.

"तू माझ्या घरापर्यंत पोहोचलास, तर तुझी एक कमांडर् माझ्याकडे आहे हे विसरू नको. तिची एक गोळी तुला या जगातून मिस करेल!" संतापाने फणफणलेल्या हेलीनं तिकडून धमकी दिली.

तिची ही धमकी खेळीमेळीची नव्हती. तिचा रोष खरा होता. उद्वेग खरा होता. ती हे उगाच किंवा चेष्टेने बोलली नव्हती. त्यानं तिचं घर शोधण्याची खरंच गुस्ताखी केली असती, तर ती हे नक्कीच करणार होती. एक कमांडर् स्वतःकडे ठेवण्याचं तिचं कारण कदाचित हेच!

इब्लिसही हे जाणून होता. तरी तिच्या सुरक्षेसाठी त्यानं त्याची लाडकी कमांडर् तिला सुपूर्द केली होती.

इब्लिस पण तिची मस्करीच करत होता. बाकी दोघांच्या खाजगी आयुष्यात डोकवायचं नाही हा प्रोफेशनल इथिक (व्यावसायिक अधिनियम) त्यानंच आखला होता. तो तोच कसा मोडणार?

आज जरा तो खेळकर मोडमध्ये होता, त्याला कारण कालची त्याची 'सूर्योदय अनाथालया'ची भेट. रात्रभर जरी त्याला त्या मुलांच्यात बसता-खेळता आलं नव्हतं, तरी त्या मुलांनी त्याचा वजावटा आजच्या दिवसभरात काढला होता. आपल्या लाडक्या दादाला दिवसभर खेळण्यात गुतवलं होतं त्यांनी. कधी कधीच येणारा हा दादा, या दरम्यानच्या कित्येक गोष्टी प्रत्येकाला त्याला सांगायच्या होत्या. कोणाला आपल्या भावडांच्या तक्रारी करायच्या होत्या, कोणाला त्याच्या बरोबर खेळायचं होतं, तर कोणाला त्याच्या सोबत जेवण घ्यायचं होतं. म्हणून तो गच्चीवरून खाली येताच त्याला सर्व मुलांनी घेरलं होतं. ज्याच्यावर कोणी सत्ता गाजवू शकतं नाही अशा 'इब्लिस'वर इथली पोरं पण सत्ता

बजावत होती. त्याला चक्क हाताला धरून आग्रह करण्यात येत होता. आणि तो ते मान्यही करत होता.

"आज दिवसभर तू कुठंही जायचं नाहीस!" असा एका छोटीने अधिकार वाणीने हुकूम फर्मावला होता.

रवीलाही हा निष्पाप-निरागस पाश तोडायचा नव्हता. त्यांच्यासोबत खेळण्यातच तो अख्खा दिवस गेला होता. रवी अगदी तृप्त झाला होता. एक क्रूरकर्मा होण्यापूर्वी 'तो' आपल्यावर हावी होऊ नये म्हणून त्याला या निरागसतेची आवश्यकता होती. दिवसभरात मनभरून त्यानं हृदयाच्या कप्प्यात ते निष्पाप क्षण साठवून घेतले आणि कामाचं निमित्त काढून तो त्या मोहातून बाहेर पडून आता त्याच्या मिशनवर जात होता...

इब्लिस गाडीत बसून होता. रेस्टॉरंटमध्ये असलेल्या त्याच्या भक्ष्याची (टार्गेटची) तो बाहेर येण्याची वाट पाहत होता.

त्याचं टार्गेट त्याला दिसलं, तसा तो गाडीतून उतरला. त्या व्यक्तीला थोडं पुढे जाण्याची मुभा देऊन इब्लिस त्याला संशय येऊ नये असा त्याच्या मागून चालण्याचा प्रयत्न करू लागला.

एक रिक्षा त्या व्यक्तीच्या दिशेने आली. बहुदा त्यानं ती हायर करून ठेवलेली असावी.

काही क्षण त्या रिक्षापाशी थांबून त्यानं रिक्षाचे ओढून धरलेले दार सोडून दिले. इलाईस्टिक असल्यानं ते चाटकन लागले गेले. पण अचानक ती व्यक्ती रिक्षा

सोडून तेथून चालती झाली. रिक्षात बसण्याचा विचार तिनं सोडला होता. आता ती व्यक्ती रस्त्यानं चालू लागली.

'इब्लिस' त्याच्या मागावर आहे अशी त्याला शंका आली होती का?

इब्लिस त्याच्या मागून चालतच होता. त्यालाही कुणकुण लागली होती, की बहुदा त्याचा डाव फसेल. परंतु हरेल तो इब्लिस कसला?! त्याला आपलं काम फत्ते करायचंच आहे. आज काहीही करून तो ही असाईन्मेंट वाजवणार होता.

हेलीला हँड्सफ्री वरून काही इन्स्ट्रक्शन्स देत त्यानं त्याचा पाठलाग चालूच ठेवला होता...

समोरचा जवळपास सहा फुटी पुरुषी देह सावधानतेने चालत होता. रहदारी होती, त्यात आपण हल्ल्यापासून वाचू अशी त्याची भाबडी आशा असावी. म्हणून तो होता होईल तेवढा संथ चालत होता. असे नाही, की तो प्रतिकार करू शकत नव्हता, पण त्याला सध्यातरी कोणत्याही प्रकारची भिडंत नको होती. आपण लोकांच्या वेगळ्या प्रकारे नजरेत यावं अशी त्याची इच्छा नव्हती. म्हणून तो दक्षता बाळगून होता.

माहीत नाही किती वेळ ते तसे चालत होते... लोकभ्रमण विरळ विरळ होत अगदीच तुरळक झाले.

पुढे तर जी काही चार लोकं दिसत होती, ती पण दिसणं बंद झालं. एक सुमसान रस्ता... तो पुरुष सावकाश चालत होता व त्याच्या मागुती इब्लिस...

इब्लिसचा हात त्याच्या कमांडरला गेला. पुढे त्याला हरकत दिसली, म्हणून त्यानं कमांडर् वरील हात घट्ट केला नाही. तो माणूस मग एका संकऱ्या

गल्लीकडे वळला. इब्लिस त्याच्या मागे गेला. गल्लीकडे तोंड करताच त्याच्या ध्यानी आलं, पुढं तर रस्ताच नव्हता. तो माणूस समोर कित्येक फूट वर गेलेल्या भिंतीला तोंड करून निश्चल उभा होता. त्यानं ती रिक्षा न पकडण्या मागचा हेतू इब्लिसच्या आता ध्यानी आला. त्याचं शेवटचं लोकेशन कोणाला समजू नये म्हणून त्याची ही दक्षता होती. आता इथं त्याला कोणी पाहू शकणार नव्हतं. गल्लीच्या दोन्ही बाजूनी देखील उंच भिंती वर गेल्या होत्या. पण तिन्ही भिंतींना एकही खिडकी नव्हती. मोक्याची जागा त्या माणसाने निवडली होती. तो इब्लिसकडे पाठ करून उभा होता.

इब्लिस समजून चुकला होता ही शिकार सोपी नाही. तरी त्याला ही असाईन्मेंट सोडायची नव्हती. त्याच्या तत्त्वात न बसणारं ठरलं असतं ते. आपल्या कमांडर् वरील हात बाजूला न करता तो पुढे सरकत होता. त्या माणसाची अजूनही काही हरकत होत नव्हती. आणि म्हणूनच अधिक सावधानता बाळगणे आवश्यक होते. कुठून काय होईल काही सांगता येत नव्हतं. इब्लिस कोल्ट कमांडर् बाहेर खेचत होता.

तो माणूस पाठमोरा असतानाच त्याला संपवणं इब्लिसला सोपं होतं, पण हे त्याच्या इथिक्सच्या विरोधात गेलं असतं. तो कधी पाठीवर गोळी चालवत नसे. शिवाय त्याला समोरच्याच्या मनाचा ठाव घ्यायचा होता, काय चालू होतं त्याच्या डोक्यात? कोण आहे हा ज्याने इब्लिसच्या मन्सूब्यांना अगदी बिनचूक ताडलं होतं...?

तो अजून पाठमोराच उभा होता. इब्लिस आगेकूच करत होता. हात कोल्ट कमांडरला...

इब्लिस त्याच्या अगदी जवळ पोहोचला. त्याची चाहूल आता त्या माणसाला जवळची झाली होती. कोणत्या दिशेने इब्लिसच्या शरीराला धडकणारा वारा येतोय हे सुद्धा त्याला सेन्स होत होतं. इतकंच काय तर इब्लिसच्या श्वासांची जाणीव सुद्धा त्याला होत होती. क्षणाचाही विलंब न लावता मग तो विद्युत गतीने इब्लिसवर झडपला. प्राणाच्या अंतिम क्षणी एखादं श्वापद वा खुद्द मनुष्यच जसा धडपडतो तशी त्याची ही लंगडी कृती नव्हती. त्याची ही योजनाबद्ध हालचाल होती. त्याच्या त्या वागण्यामागे तो कसलेला लढवैया आहे हे स्पष्ट होतं.

त्यानं इब्लिसची बाहेर आलेली कमांडर् इब्लिसच्या हातून आपल्याकडे घेत कधीच डीस्मेंटल करून जमिनीवर विखुरली होती व मुष्टियोध्यांसमान ते एकमेकांवर स्वतःचा जोर आता आजमावत होते. दोघांच्यात चांगलीच धुमश्चक्री झाली. इब्लिसला बऱ्याच दिवसांनी कोणी तगडा, त्याच्या तोडीस तोड इसम गाठ पडला होता.

इब्लिसही काही कच्चा नव्हता, तो त्या माणसाशी लढत आपल्या कमांडरचे पार्ट्स गोळा करत होता... त्यांना रिअसेंम्बल करत होता... त्या व्यक्तीला इब्लिसला त्याची पिस्टल पूर्ववत करू द्यायची नव्हती, कारण ते जर त्यानं साध्य केलं, तर त्याचा परिणाम उघड होता. त्या व्यक्तीचा मृत्यू...

इब्लिसला रोखण्यात त्या माणसाचा पूर्ण जोर लागत होता... त्यालाही समजत नव्हते, की अशी व्यक्ती इथे असेलच कशी? जी त्याला टक्कर देऊ शकते... यातून तो वाचला, तर नक्कीच या पुढे तो बंदूक वा तत्सम काही स्वरक्षणासाठी बाळगणार होता. पोलिसांच्या बाजूने थोडी रिस्क वाढली असती त्याची, पण निदान जिवावर बेतण्याच्या वेळा कमी होतील...

इब्लिस त्याचा प्रतिकार करत, त्याच्यावर वार-प्रतिवार करत आपल्या पिस्टलचा एकेक भाग योग्य जागी बसवत होता. एका पॉईंटला त्याला फक्त त्यात बुलेट लोड करणं बाकी राहीलं होतं. तेवढ्यात समोरच्या व्यक्तीने हुशारी केली होती. खाली पडलेली मॅग्झिनच त्या माणसाने स्वतःच्या ताब्यात घेतली होती.

जास्त एमोज् ठेवण्याची इब्लिसला कधी गरजच पडली नव्हती. म्हणून त्याच्याकडं ज्यादाचे कार्टेजेस् नव्हते. जे होते, ते त्या मॅग्झिनमध्ये. तो मॅग्झिनही कधी फुल्ली लोडेड ठेवत नसे. मॅग्झिनची लाईफ चांगली रहावी म्हणून तो नऊ राऊंड्सची कपॅसिटी असून मोजून सातच राऊंड्सच त्यात लोड करून ठेवत असे. तेवढे राउंड्स देखील त्याला कधी एकाच वेळी उपयोगी आणावे लागले नाहीत आजवर...

मात्र आज परिस्थिती वेगळी होती, इथून पुढे बॅकअप ठेवायचं त्यानं ठरवलं. पण पुढचं पुढे. समोर वाढलेली बिकट परिस्थिती चिघळत होती. या व्यक्तीशी जास्त संघर्ष करण्यात अर्थ नव्हता. बराचवेळ त्यानं यात घालवला होता. त्या माणसाला संपवून आता इब्लिसला लगोलग त्याचे हाईड आऊट गाठावे लागणार होते. आपल्याला कोणी पाहिल म्हणून तो घाबरतो असं नाही, तर ठरवलेल्या वेळेपेक्षा अधिक वेळ लागतोय याची त्यालाच खिज येत होती. आजवर कोणती असाईन्मेंट पूर्ण करायला त्यानं इतका वेळ घेतला नव्हता. समोरील व्यक्ती कितीही तगडी असली, तरी तिला संपवणं इब्लिससाठी काही सेकंदाचा खेळ होता.

आत्ता... काही मिनिटं गुदरून गेली होती.

इब्लिसनं त्याच्याकडून मॅग्झिन घेण्याचा प्रयत्न केला. पण त्याला ते शक्य होत नव्हतं. पहिल्यांदा कोणी एवढा चिवट व खवट माणूस इब्लिसच्या वाट्याला आला होता. इब्लिसची त्यानं दमछाक करून सोडली होती. इतकंच नाही, तर इब्लिस जसा त्याच्याकडून एम्युनेशन् मॅग्झिन घेऊ पाहत होता, तसाच तोही इब्लिसकडून कमांडर् घेऊ पाहत होता. कमांडर् त्याच्या हाती लागली, तर 'इब्लिस' 'फरिश्ता' व्हायला वेळ लागणार नव्हता.

त्यामुळं ना फक्त इब्लिसला मॅग्झिन मिळवायची होती, तर कमांडर् देखील त्याला त्या माणसाच्या हाती जाण्यापासून वाचवायची होती.

दोघांचीही अशी दोहों पद्धतीने कसरत चालू होती. अखेर इब्लिस पूर्ण मॅग्झिन नाही, परंतु एक गोळी मिळवण्यात यशस्वी झाला. ती आता खुल्या चेम्बरमध्ये वरून हलकेच टाकली, तरी इब्लिसला पुरेसं होतं. तो त्या माणसाला मारण्यास सज्ज होणार होता. पण तो माणूस कुठे ऐकणार होता? इब्लिसच्या हातावर त्यानं खालून लाथडलं. चेम्बरमध्ये पडणार असलेली ती गोळी हवेत उंच भिरकावली गेली.

इब्लिसला ही देखील एक संधीच दिसली. त्यानं मोठ्या शिताफीने ती '9 एम एम पॅराबेलम' कॅलिबर चेम्बरमध्ये झेलली. स्लाईड स्टॉप त्यानं रिमूव्ह केलं. गोळी लोड झाली होती. क्षणाचाही विलंब न लावता त्यानं फायर केलं. कलिंगडाच्या चिंधड्या व्हाव्यात तसे त्या माणसाचे डोके चहुबाजूंनी भिरकावले गेले. बऱ्याच काळाचा त्याचा हा संघर्ष आता संपला होता. आपली मॅग्झिन त्या निश्चल देहाच्या हातून काढून घेऊन त्यानं ती तिच्या पुर्वस्थानी लावली व कोल्ट कमांडरचं सेफ्टी लॉक ऑन केलं. ती पूर्ववत होलस्टरला ठेवून दिली.

त्या माणसाचा तपास करायला तो विसरला नव्हता. हाती ग्लव्ह्ज् असल्यानं त्याच्या हातांचे ठसे त्या व्यक्तीवर राहण्याचे काही कारण नव्हते. तपासात इब्लिसला तसे काहीच हाती सापडले नाही. तो इसम पूर्णतः क्लीन होता. तरी इब्लिसचे समाधान होत नव्हते.

हाती त्या माणसाचा मोबाईल लागला होता. थम्ब् लॉक होतं. मोबाईलमध्ये काहीतरी सापडेल म्हणून इब्लिसनं पहायचं ठरवलं. लॉक उघडणं अवघड नव्हतं. ज्याच्या अंगठ्याचा ठसा तो फोन अनलोक करण्यासाठी हवा होता, तो समोर होता आणि त्यानं विरोध करायचा प्रश्न नव्हता.

इब्लिसनं त्या माणसाचा अंगठा मोबाईला लावला. मोबाईल उघडला गेला. आधी त्यानं फोन कॉन्टॅक्ट्स चेक केले. एकही नंबर त्याच्या ओळखीचा नव्हता. त्याबद्दल नंतर पाहू असा विचार करून त्यानं मग कोणत्याही व्यक्तीची सामान्य कृती असते त्याप्रमाणे गॅलरी उघडली. खाली खाली स्क्रॉल करताना त्याला जोराचा धक्का बसला!!!

कॉन्टॅक्ट्समध्ये एकही व्यक्ती ओळखीची नसताना गॅलरीमध्ये मात्र त्याला त्याच्या अनाथाश्रमाचे फोटो दिसले. त्याच्या काळजाचा ठोका चुकला. तो तो फोटो इंलार्ज करून पाहू लागला. सूर्योदय अनाथालयाच्या वर्धापनदिनाचे ती बाहेरील क्षणचित्रे होती. आणि तीही कालची! ते त्याचंच अनाथालय असल्याचं त्याला पक्कं झालं.

इब्लिसला कळणेच बंद झाले, की हा माणूस त्यांच्या अनाथाश्रमाचे फोटो का बाळगून होता?

त्यानं पुढील फोटो पाहिले. अनाथालयातील मुलं वर्धापन दिन साजरा करताना त्यात दिसत होते. याही उपर, जतीन यांचा स्वतंत्र असा एक फोटो काढण्यात आला होता...

हे काय प्रकरण आहे? म्हणजे हा माणूस काल रात्रीच्या वर्धापनदिन कार्यक्रमात 'सुर्योदय अनाथालया'त होता?! त्याचवेळी; जेव्हा इब्लिस देखील 'रवी' म्हणून तेथे एका खोलीत बंद होता... त्याक्षणी तो बाहेर असता, तर या माणसाच्या हावभाव व हलचालीवरून 'रवी'ला त्याच्यावर नक्कीच संदेह आला असता आणि त्या आधारे या व्यक्तीकडून 'इब्लिस'ला माहिती वदवून घेता आली असती... पण त्याच्या दारू पिण्याच्या सवयीने त्याचा घात केला होता... त्यामुळंच तर खोलीत बंद राहण्याची त्याला शिक्षा मिळाली होती... म्हणून तर हा तिथंपर्यंत पोहोचूनही आज रात्रीपर्यंत जिवंत राहू शकला होता. जर एसपीकडून या माणसाची असाईन्मेंटच मिळाली नसती तर... काय झालं असतं...??? नाही!!! इब्लिसला विचार देखील करवत नव्हता. इब्लिसला मरणप्राय धक्का बसला होता, त्याचा विचारच गोठल्याने त्याला विचार देखील करवत नव्हता. आयुष्यात प्रथमत: त्याने धसका घेतला होता...

आयुष्यात पहिल्यांदा इब्लिस घाबरला होता. एका खून्याच्या मोबाईलमधून त्याच्या जगातील एकमेव आप्त असलेल्यांचे फोटो त्याला सापडले होते आणि तेही त्याच अनाथाश्रमात काढलेले आणि तेही तो त्यावेळी तिथं असताना...!!!

'ही वॉज् टेरिफाईड्... रिफाईड् टू डेथ!!!'

त्याला स्वतःचा राग येत होता. पण राग व्यक्त करण्याची ही वेळ नव्हती...

आपल्या गाडीकडे मागे जाताना इब्लिस काही विचारात होता. इतकी कडवी झुंज आजवर त्याला कोणी दिली नव्हती. असा खतरनाक माणूस अनाथाश्रमावर आणि जतीन यांच्यावर नजर ठेवून का होता???

विचारांच्या गर्देतच तो त्या रेस्टॉरंट बाहेर पोहोचला, जिथे त्यानं त्याची गाडी सोडली होती. रात्र अर्धी झाली होती म्हणून त्याचा रक्ताने माखलेला पोशाख कोणाच्या नजरेत भरला नाही. पहायला रस्त्यावर होतेच कोण? आणि भरला असताच, तर त्याचे कोणी काय वाकडे करू शकले असते?! तो आपल्या गाडीत बसला.

गाडी चालू होताच त्यानं हेलीला फोन लावला.

इकडे हेली देखील झोपली नव्हती. इब्लिस जितका कामाप्रती आस्थेवाईक होता, तितकीच ती असल्यानं झोप ती कसली तिच्या डोळ्यांत नव्हती. ती तिच्या घरीच लिव्हिंगरूममध्ये बसून इब्लिसच्या कारवायांवर लक्ष ठेवून होती. त्यासाठी अख्खा सेटअप तिनं तिच्या टी-पॉयवरच मांडला होता.

"बोल. काम झालं? काही गडबड तर नाही?" तिनंच इकडून प्रश्न केला,

"काम नीट पार पडलं असतं, तर तुझा कॉल आला नसता..." ती जरा चिंतीत बोलली.

इब्लिस वेडाहून मोकळ्या रस्त्यावर गाडी पळवत होता. अतिशय गंभीर भावमुद्रेत त्यानं तिला विचारलं,

"या व्यक्तीला मारण्याची असाईन्मेंट आली, तेव्हा त्यासोबत त्याची हिस्ट्री आली असेल?"

"हो." पलिकडून ती होकारली.

"ब्रिफ कर!" त्यानं हुकूम सोडला.

"जोनाथन नांव आहे याचं. एक खून त्याच्या नांवे आहे. पुराव्या अभावी सुटला. यापूर्वी देखील त्याने भारतभर कॉन्ट्रॅक्ट बसेसवर बरेच खून केल्याची इंटेल आहे. पण पुरावे नाहीत. म्हणून त्याची असाईन्मेंट देण्यात आली." तिनं संक्षिप्त माहिती पुरवली.

"माहिती वेरीफाय केलीस?" इब्लिस प्रश्नावला.

आपल्याकडून कोणी निष्पाप मारला जाऊ नये म्हणून तो एसपीकडून प्रथम माहिती घेत असे व तिची हेलीकडून उलट तपासूनही पाहत असे.

"हो. का काय झालंय?" ती थोडी चिंतेत बोलली.

"नाही काही नाही. पण यापुढे जरा जास्त कॉन्शियस रहा माहिती वेरीफाय करताना. आजची असाईन्मेंट असणारा माणूस कोणी साधारण गुन्हेगार नक्कीच नव्हता. डिग डीप..." सूचना करताना तो डेड सिरीयस होता.

"हो. पण तुला काही..." ती इब्लिसच्या काळजी हेतू जास्तीच शंकावली.

"मी सेफ आहे. काळजी नको. पोलीस सोर्स न वापरता जरा वेगळ्या पद्धतीने माहिती काढ." तिचं वाक्य कापत इब्लिसनं ठराविक सूचना केली होती.

त्यानं कॉल कट केला. त्याचा पाय एक्सिलेटरवर आपोआप दाब वाढवता झाला. गाडी बंदुकीतून गोळी सुटावी तशी ती सुमसान रस्त्यावर जास्ती वेगाने भरधाव पळू लागली...

# २. मागोवा...

"अनादर् मॅन डाऊन!" पलिकडून कोणीतरी संदेश पुरवला.

अखिलीसच्या चेहऱ्यावरचा शांत भाव मात्र ढळला नव्हता.

त्याला कुतूहल मात्र नक्की होतं, की त्याच्या माणसांना इतक्या सहज कोण संपवू शकतं?

आता तर त्यानं त्याचा 'वन ऑफ दि बेस्ट' नाही, तर 'बेस्टेस्ट ऑफ ऑल' असा माणूस पाठवला होता. त्यालाही मारण्यात आलं होतं.

ते जनावर कोण असेल, जे आपल्या शिकाऱ्यांची शिकार करत सुटलंय हे त्यास उमगत नव्हतं आणि त्यासंदर्भातच त्याचा उवापोह त्याच्या मेंदूत चालू होता. हातात कसलंसं मॉकटेल तसंच राहीलं होतं. भल्यामोठ्या खिडकीतून आत येणारा सूर्यप्रकाश अंगावर झेलत तो उभा होता. मागे वळून तो काऊचवर स्थिरावला. विचारचक्र चालूच होतं.

'कुड इट बी...; इब्लिस...?'

हा विचार डोक्यात धडकला आणि त्याचे डोळे ताडकन विस्तारले. असे असेल... तर... तर... मोठी चिंतेची बाब होती.

त्याला आता हे उमगलं होतं, की त्याचं ध्येय साध्य करण्यापूर्वी त्याच्या त्या ध्येयाच्या आड येणारा हा जो कोणी अडंगा आहे, त्याला सर्वप्रथम दूर करावा लागेल. तत्पूर्वी त्याला शोधावं लागेल. पण कसं? हा मोठा प्रश्न त्याच्या समोर होता...

बाजूला छोट्या टेबलवर पडलेला फ्लिप फोन त्यानं उघडला. त्याच्या डोळ्यांत कसल्याशा निश्चयाची झाक प्रकटली होती. त्यानं फोन लावून तो कानाला टेकवला,

"हे, रिकार्डो!"

◆◆◆

इब्लिस त्याच्या बेसवर पोहोचला होता. बेस म्हणजे काही खूप लॅविश अशी जागा नव्हती. कोणताही कबाडखाना घेतला, तर तो त्याच्या या बेसच्या आसपास जाईल. ती जागाही अगदी आशा ठिकाणी की सहसा कोणी तिथे येण्याचा विचार करणार नाही.

इब्लिस स्वतःवर प्रेम करणारा नव्हता. स्वतःवर तो खर्च काय करणार? त्याचा पोशाख, त्याचं राहणं सर्वच साधं... समाजात राहताना काही नियम आहेत त्यानुसार चालणे भाग म्हणून त्याचा इतका तरी प्रपंच.

हेली त्याच्या आधीच या गुप्त अड्ड्यावर येऊन पोहोचली होती.

"काही हाती लागले?" बसण्याचीही उसंत न घेता इब्लिसनं विचारलं.

"नाही!" तिनंही त्याच अधीरतेने उत्तर दिलं.

तिला काही वेगळं असं मिळालंच नव्हतं तर ती सांगणार तरी काय होती...

"पण तू इतका का ऑब्सेसिव्ह होतोयस? तो माणूस मेला ना? मग झालं तर!" ती अगदीच सहजतेने बोलली.

"नाही. तो माणूस काहीतरी वेगळा होता. काही करून त्याची माहिती काढली पाहिजे. तो साधारण गुन्हेगार असता, तर त्याला संपवणं इतकं अवघड गेलं नसतं!" तो शंका व्यक्त करत बोलला,

"तू एसपी कडून मिळालेली माहिती रिचेक केलीस?" त्यानं खात्रीसाठी परत विचारलं.

"हो. त्याच्यावरील कोर्टात झालेल्या सुनवाईची प्रत देखील मला मिळाली आहे. त्यामुळं एसपीने खोटी माहिती देऊन आपल्याकडून दुसऱ्याच कोणाचा खून करवण्याची किंवा आपल्या माध्यमातून कुणाची तरी वैयक्तिक खुन्नस काढण्याची शक्यता नाही!" तिनं स्पष्ट केलं.

"त्या माणसाची दुसरी कोणतीच विशेष माहिती मिळाली नाही?" इब्लिसचं समाधान होत नव्हतं.

यावर हेली खिजल्यागत झाली. तिनं गोळा केलेल्या माहितीचं बाड इब्लिसच्या हातावर आदळलं.

तिनं बनवलेला म्हणा किंवा कलेक्ट केलेला म्हणा पण तो रिपोर्ट न्याहाळत इब्लिस त्याचा मजकूर पुटपुटत होता.

"सगळं तर नॉर्मलच दिसतंय..." तो पुटपुटला. त्यानं हेलीवर नजर फिरकवली,

"तू त्याला लढताना पहायला हवं होतंस. ही वॉज एन इलिट!" एखादा सामान्य खुनी लढाई करण्यात इतका निपुण कसा हेच समजत नाहीए." तो त्याच्या चिंतेतून अजून बाहेर आला नव्हता.

"यात एवढा विचार करण्यासारखं काय आहे?" ती उठून इब्लिससाठी एक स्कॉचचा ग्लास भरून त्याच्यापाशी येऊन उभारली,

"त्यानं ट्रेनिंग वगैरे घेतलं असेल..." ड्रिंक त्याला ऑफर करत तिनं तर्क बोलून दाखवला.

त्यानं नकारात मान हलवली. हेलीला हे नवीन होतं. इब्लिसनं ड्रिंकसाठी कधीच नाही म्हंटलं नव्हतं. तेव्हा तर नाहीच, जेव्हा तो असाईन्मेंट वाजवून आलेला असायचा. त्यामुळं आधी तिला वाटलं, की तो तिचा तर्क धुडकावून लावतोय म्हणून तिनं ग्लास अजून पुढे केला होता. पण तो घेऊन इब्लिसनं टेबलवर ठेवला होता.

"त्या माणसामुळे तू इतका डिस्टर्ब झालयंस, की भरलेला ग्लास नाही म्हणतोयस?" तिनं उपरोधिक टोमणा मारत आश्चर्य व्यक्त केलं.

"तसं नाही. मी घ्यायची सोडलीय. इथून पुढं एक थेंब पोटात जाणार नाही!" तो स्क्रॅपच्या खुर्चीवर बसत निश्चयी बोलला.

"गुड फॉर यु!" म्हणत हेलीनं इब्लिसला तिनं दिलेला ग्लास उचला आणि त्यातील मद्याची चव जिभेवर रेंगाळत ती त्याच्या शेजारील स्क्रॅपच्याच खुर्चीवर बसली.

त्यानं पिणं बंद करण्यामागील कारण तिनं त्याला विचारलं नाही. ती विचारणार नव्हती, कारण त्यांनीच एकमताने ठरवलेली त्यांचं व्यावसायिक तत्त्वं; 'एकमेकांच्या खाजगी आयुष्यात डोकवायचं नाही!'

गंमत ही होती, की दोघं एकमेकांसोबत एकत्र, एकमेकांवर विश्वास ठेवून काम करत होते, तरी एकाच्या खाजगी आयुष्याबद्दल वा इतिहासाबद्दल दुसऱ्याला

माहीत नव्हतं. आणि त्याची तशी त्यांना कधी गरज पण वाटली नव्हती. पुढे वाटणार होती का नव्हती... कोण जाणे...?

"माझ्यासाठी एसपी सोबत मिटिंग अरेंज कर!" मोठ्या विचारांती तो बोलला.

"काय?" तिच्यासाठी हा मोठा हादरा होता,

"तू कधी कोणा ऑफिशियलच्या समोर आला नाहीस. आणि आता असं अचानक?" स्कॉच तिच्या गळयात जराकमी अडकलीच होती,

"अरे मलाही इंनॉनेम्सली तू सगळं डार्कवेब थ्रूच ऑपरेट करायला सांगतोस, मी संकटात सापडू नये म्हणून, आणि आता तूच समोर जायचं म्हणतोयस?" ती आवक् होती.

"मला जोपर्यंत त्या माणसाबद्दल समजत नाही तोपर्यंत मला शांत बसवणार नाही." तो अस्वस्थतेनं म्हणाला.

इब्लिसची अकाऊंट्स आणि त्याचा हा बिझनेस एडमिनिस्ट्रेट करण्याव्यतिरिक्त ती स्वतःही एक जबाबदारी स्वतःवर उचलून होती, ती म्हणजे इब्लिसला काही झालं, तरी प्रोटेक्ट करणं. काही करून त्याच्या डोक्यातून हा विचार काढून टाकण्यासाठी ती त्याला आश्वासित बोलली,

"हे बघ, तू आधी घाई करू नको. मी बघेन. काढेन माहिती. अगदीच काही मिळालंच नाही, तर बघू." मग ती विषय बदलत त्याला म्हणाली,

"बरं. बाहेरील पण खूप असाईन्मेंट्स येत आहेत. तू ओपन आहेस? घ्यायच्या का त्या?"

इब्लिसचं काय उत्तर असणार हे ती जाणून होती, शहरातील गुन्हेगार सपवणं हे त्याचं एकमेव ध्येय होतं. त्यामुळं एकमेकांचे उकटे काढू पाहणाऱ्या गुन्हेगारांचे अवैध असाईन्मेंट्स तो कधीच स्वीकारणार नव्हता. आणि हे त्यानं सुरवातीलाच तिला स्पष्ट करून झालेलं होतं. परंतु तिला विषय बदलायचा होता, म्हणूनच तिनं हा विषय छेडला होता. त्यानं डोकं व मान झटली.

"नाही!" तो म्हणाला,

"तुला माहीत आहे आपण गुन्हेगारीला प्रवृत्त करत नाही, प्राधान्य देत नाही! आपण फक्त गुन्हेप्रवृत्तीच्या दुराचाऱ्यांना संपवतोय!"

हेही तो तेव्हाच करायचा, जेव्हा एसपीकडून त्याला सूचना यायची. हो! यासाठी तो पैसे घेत असे. तो धनाचा लोभी आहे म्हणून नाही, तर अनाथाश्रमाच्या संगोपणाला त्याचा खारीसा हातभार लागावा म्हणून. जतीन ते पैसे कधी वापरणार नाहीत हे जाणत असून तरी तो हातभार लावायचे आपले कर्तव्य विसरणार नव्हता. इथली घाण साफ करावी लागणारच होती. पूर्वीही त्यानं ती केली होतीच. आता नवीन आलेला एसपीही सोबत होता. मुफ्त काम करून घेण्याचे त्याच्या तत्त्वात नसल्याने तोही कामाचा मोबदला म्हणून त्याचे थोडे पैसे देऊ करत होता इतकंच. इब्लिस ते घेत होता, तेही सूर्योदयप्रती कर्तव्यपूर्तीहेतूच.

इब्लिसच्या या ध्येय आखणी मागे त्याच्या भूतकाळातील काही बीजे कारणीभूत असणार हे हेली जाणून होती, पण नक्की ते काय हे मात्र तिनं कधी विचारलं नव्हतं. ती विचारणारही नव्हती. तिला फक्त कामाशी मतलब होता आणि त्यातून मिळणाऱ्या पैशांशी!

इब्लिस आपला निर्णय आणखीदा ठणकावून तो उठून गेला. इथून पुढे कोणत्याही गोष्टीबद्दल अधिक दक्षता बाळगायची त्यानं ठरवलं. असाईन्मेंट् वाजवताना तर आधी!

मात्र त्या आधी...

झालेली शारीरिक-मानसिक झीज भरून काढण्यासाठी त्याला निद्रादेवीला कवटाळणं गरजेचं होतं.

●●●

तो बिछान्यावर नुसताच पडून होता. आशा परिस्थितीत झोप लागणं दुरापास्तच.

इब्लिस हाती त्या माणसाचा मोबाईल घेऊन बसला होता. त्यानं हेलीला या माणसाची माहिती काढायला सांगितली होती. हा मोबाईल त्यानं तिला दिला असता, तर तिचं काम अधिक सोपं झालं असतं. पण तिला इब्लिसबद्दल, त्याच्या भूत-वर्तमानाबाबत देखील काही गोष्टी कळल्या असत्या म्हणून त्यानं तिला तो मोबाईल दिला नव्हता.

हेलीवर विश्वास नव्हता म्हणून नाही, परंतु तिच्या मार्फत कोणी त्याच्या अनाथाश्रमापर्यंत पोहोचायला त्याला नको होतं.

हेली मदतीशिवाय सांगितलेलं काम मार्गी लावेल याची त्याला जाण होती. त्याला तसा विश्वास होता.

एव्हाना त्या माणसाच्या मरणाची बातमी त्याच्या हँडलर पर्यंत पोहोचली असण्याची शक्यता होती आणि म्हणूनच त्या मोबाईलवरून अलीकडे, सर्वाधिक बोलणे झालेल्या नंबरवर फोन करून मूळ हँडलरपर्यंत पोहोचण्याची शक्यता तशी कमी आहे असा विचार त्याच्या मनात तग धरून होता.

धाडसी इब्लिसनं तरी प्रयत्न केलाही असता. कदाचित हँडलरशी संपर्क झालाही असता, पण पुन्हा त्याचे त्या अनाथाश्रम व त्याचे सर्वेसर्वा जतीन यांच्याशी असलेले संबंध तो जो कोणी माणूस आहे त्याच्या दर्शनी आले असते. हेच इब्लिसला नको होतं.

म्हणून तो मोबाईल न्याहाळत बसला होता. एव्हढी मोठी इन्फॉर्मेशन सोर्स हाती असूनही ती तो वापरू शकत नव्हता.

मोबाईलवर नजर गढलेली असतानाच तो मोबाईल अचानकच फॉरमॅट होत गेला. इब्लिस चकित होऊन उठून बसला. त्यानं मोबाईल चेक केला. सगळं इरेज झालं होतं... हा मोबाईल आता फक्त डब्बा होऊन राहिला होता इब्लिससाठी. इब्लिस इतका चिडला या घटनेनं, की त्यानं तो मोबाईल आपटून फोडून टाकला.

◆◆◆

एक छातीपर्यंत दाढी वाढलेला क्रूरकर्मा रात्रीच्या अंधारात लपून होता. सिंह आपल्या सावजाला हेरण्यासाठी दबा धरून बसतो तसा त्याचा अविर्भाव होता.

ज्या भिंतीला तो टेकला होता, तिथेच त्याची नजर समोरील जमिनीवर खिळून होती. एक मोठी आकृती जवळच येत असल्याचे त्याला दिसत होते.

त्याचे डोळे मग आकृती येत असलेल्या दिशेने वळले. त्याला हवी असलेली वेळ साधण्याच्या बेतात तो होता.

अजाणती असणाऱ्या त्या माणसाची आकृती पुढे येतच राहिली. दृष्टिक्षेपात येताच मागून त्या दाढीवाल्या माणसाने त्या समोर आलेल्या माणसाची गचांडी धरली. तो ओरडू नये म्हणून त्याचं तोंडही दाबण्यात आलं. बलदंड असणाऱ्या त्या क्रूरकर्म्याच्या जखड हातून सुटणं त्या दुसऱ्या माणसाला तसं अशक्य होतं. श्वास गुदमरून तो माणूस बेशुद्ध झाला. त्याचं कलेवर खाली गळू लागलं. तो धाडकन कोसळला. एवढ्यावर तो क्रूरकर्मा गप्प बसणार नव्हता. त्या माणसाला फक्त म्लान करून याचं समाधान होणार नव्हतं. याने मुष्टीने त्या ग्लानीत असलेल्या माणसाला अनेक घणाघात घालायला सुरवात केली. सर्वप्रथम त्या माणसाचं नाक चेंदलं गेलं. कानातून भळाभळा रक्त रिसत होतं. ओरडण्याची सूद मात्र त्याला नव्हती. बेशुद्धीच्या तो अशा स्तरावर होता, की त्याला वेदनेची कसलीच जाणीव-नेनीव उरली नव्हती. आता त्याचं मस्तक भेदलं जाऊन त्याचा जवळजवळ चिखल झाला होता. त्या रक्तामांसाच्या चिखलाचे शिंतोडे या क्रूरकर्म्याच्या चेहऱ्यावर उडत होते. त्याचं समाधान होत नव्हतं. कसला राग तो काढत होता हे त्याचं त्यालाच माहीत. समोरचं त्याचं भक्ष्य कवाच जीव सोडून उडालं आहे हे त्याच्या ध्यानी तरी आलेलं की नाही समजायला जागा नव्हती. तो मुठीने नारळ फोडवा तसे घावावर घाव त्या माणसाच्या डोक्यावर घालतच होता.

मग... तो माणूस मेला म्हणून नाही, तर त्याच्या हाताला थंड वाटत होतं म्हणून तो थांबला. त्या मस्तकाचे तुकडे होऊन त्याचा हात जमिनीवर आपटत असल्याचं त्याला भान नव्हतं. त्या भुईवर याचा हात टक्करत असल्यानं याचा हात रक्तबंबाळ झाला होता. त्यामुळं त्याच्या हाताला रात्रीचा वारा झोंबून गेल्याने थंडगार अनुभव होत होता. जखमेला माती लागल्याने जखमेचा थंडावा अधिकच सलत होता. त्या शीत कळीपायीच तो भानावर आला होता.

बलदंड शरीराचा तो इसम मग उभा राहिला. बोटांच्या पेरांतून रक्त ठिंबकत होतं. आणि ते त्या मृत व्यक्तीच्या पसरलेल्या रक्तात मिश्रित होत होतं... त्याची तुच्छ नजर त्या मेलेल्या देहावर टिकून होती. त्या मृतदेहाला 'माणसाचा' म्हणता येईल की नाही इतका तो विद्रुप झाला होता.

याची हिडीस नजर त्या देहाला टक लावून पाहत असतानाच त्याचा मोबाईल वाजला. त्यानं तो उचलून कानाला लावला...

पलिकडून त्याला काय पुरवलं गेलं त्यालाच माहीत, कारण त्या माहितीने शांत झालेलं त्याचं शरीर पुन्हा दग्धाग्नित चेतल्यासारखं झालं. रागाच्या भरात त्यानं खाली असलेल्या मृतदेहावर एकच लाथ घातली. निस्तेज, निःच्छेष्ट शरीरात उरलेल्या सर्व बरगड्या त्याच्या एका लथ्था प्रहारात कडाडकन मोडल्या गेल्या. हृदयासह इतर सर्व मृदू अवयवही पिळवटून एकाच ठिकाणी एकत्र झाले असतील यात शंका नव्हती. त्या मृतदेहाच्या सर्वांगांतून रक्ताचे पाट वाहून ती गल्ली भिजली जाऊ लागली...

◆◆◆

राक्षसी दात विचकणारा मुखवटा परिधान केलेला 'इब्लिस' एका डान्सबार वजा रेस्टॉरंटला बसला होता.

समोर चालू गाणं आणि त्यावर नृत्य करणाऱ्या एका मनमोहक मुलीची शिफ्ट संपण्याची तो वाट पहात होता. स्वतःशीच ठरवल्याप्रमाणे तो मद्य न घेताच बसून होता.

इब्लिसची उपस्थिती असल्यानं तिथले सर्वच थिजले होते. कशाचाच मनसोक्त आनंद कुणाला लुटता येत नव्हता. त्याचा भयंकर मास्क तिथल्या गडद लाईट्स व धुरामध्ये अजूनच भयावह दिसत होता. त्यात त्याचा एकटक डोळा समोर लागला होता.

त्या मुलीलाही इब्लिस आपलीच दरस करतोय हे  ध्यानी आलं होतं. तरी तिनं आपल्या कर्मात खंड पडू दिला नव्हता.

काही तासांनी अगदी बारा-साडेबाराला का काहीतरी त्या मुलीची शिफ्ट संपली आणि ती आत निघून गेली. तिला गेलेली पाहून मग इब्लिसनं आपली जागा सोडली.

त्यानं थेट तिचं चेंजिग रूम गाठली. तो मागून आल्याचं तिच्या ध्यानी आलं होतं. तिथं आणखी काही मुली होत्या, म्हणून तिनं आपल्या एका जवळच्या मैत्रिणीला खूण करून तिच्याकरवी इब्लिसला दारातच हटकलं.

तो मग काही विरोध न करता किंवा कसलीच वाच्यता न करता मागुती फिरला. ती मुलगी त्याला जाताना पाहत होती, पण तिचा एप्रोच खूपच साधारण होता. जणू काही झालेच नाहीशा अविर्भावात ती आपलं आवरू लागली.

●●●

इब्लिस फुटपाथला लागून असलेल्या त्याच्या गाडीत बसून होता. विचार हरवलेला तो भानावर आला, ते त्याच्या गाडीच्या दरवाज्याच्या आवाजाने. निरव शांततेत तो घुमला होता. पण चिंतेचं काम नव्हतं, कारण त्याची गाडी त्या क्लबपासून बरीच दूर उभी होती.

इब्लिसची नजर बाजूच्या पॅसेंजर सीटकडे वळली. मघासची गाणारी-नाचणारी मुलगी अत्यंत साध्या कपड्यांत ती त्याच्या बाजूला बसली होती. मघासची 'ती' हीच हे सांगून कुणाला पटलं नसतं इतका तिच्या अपिअरेन्समध्ये बदल घडून आला होता. किंबहुना तिनं तो आणला होता. हा तिचा 'कॅमोफ्लाज' असावा...

"अचानक आमची आठवण कशी झाली?" अनेक वर्षांची आठवण असल्यासारखी ती आता मधाळ बोलत होती,

"इतक्या दिवसांत फोन पण नाही आणि अचानक आज साहेब समोर!"

"म्हणून मघाशी हटकलं का मला?" त्यानं खोट्या रागाने विचारलं.

"आपली ओळख आहे हे कोणाला समजलं तर काय होईल हे तुला चांगलंच माहीत आहे. तूच हा नियम घातलास आणि आता तूच असा अतताई वागलास?" इब्लिसचं बोलणं लागल्याने ती नाराजीचं म्हणाली.

तिच्या वागण्याचा अर्थ इब्लिसला आत्ता समजला.

"बरं बोल काय काम?" तिनं विषयाला हात घातला.

श्रीशा; इब्लिसची मोठी आणि एकमेव इंफॉर्मर. हेली त्याच्याकडं कामाला येण्याअगोदर इब्लिस त्याची कामं मार्गी लावण्यासाठी हिच्याकडूनच त्याच्या सावजांची माहिती मिळवायचा. त्यावेळी तो वैयक्तिक अपराध निखंदन करायचा. एसपीचा ही त्यावेळी त्याच्याशी सबंध नव्हता. तेव्हापासूनची यांची जिव्हाळयाची ओळख.

श्रीशाही उच्चविद्याविभूषित होती. बहिष्कृत वस्तीतली असल्यानं तिला नोकरी मात्र काही चांगली मिळत नव्हती. उदरभरण हे क्रमप्राप्त असल्यानं पोटासाठी आईचा व्यवसायच तिला आपणावा लागला होता. आईच्या जागीच ती बार डान्सर म्हणून कामाला लागली होती.

एक अफूचा अवैध धंदा करणारा व्यापारी तिच्या सौंदर्याला भुलला होता. त्यांनं तिच्याकडं नको त्या गोष्टीची मागणी केली. ती त्यास तयार नव्हती. त्यानं लग्नाचा प्रस्ताव ठेवला तिच्यासमोर. तो शुद्ध हेतुतून नव्हता. हे माहीत असल्यानं साहजिक तिनं लग्नासही नकार दिला.

त्यानं मग तिच्या आईकडंच जाऊन  लग्नासाठी श्रीशाचा हात मागितला. श्रीशाची इच्छा नसताना हे शक्य नसल्याचं आईनं त्याला निक्षून सांगून टाकलं. त्याचा संताप झाला. त्यानं त्या रागातून श्रीशाची आईच मारून टाकली.

श्रीशाकडं त्याचा मोर्चा वळला. बारवर त्यानं तिला गाठलं. तेव्हा श्रीशानं त्या अफू व्यापाऱ्याचाच घात केला. तिची आई तिच्या अपरोक्ष मेली होती. मारणारा हाच होता हे त्यानंच तिला भीती घालण्यासाठी तिच्याकडं कबूल केलं होतं. तिच्यावर अतिप्रसंग करून तिलाही संपवण्याच्या त्याचा इरादा होता. यानं

आपल्या आईला मारलं याचाच जास्त राग तिला येऊन गेला होता. सुडाग्नी पेटला तिच्या उरात!

या असल्या धंद्यात स्वरक्षणाची पदोपदी आवश्यकता पडते हे तिनं आईच्या अनुभवावरून लहानपणापासून बघितलं होतं. आईच्या आग्रहानंच तिनं आत्मरक्षणाचे धडे घेतले होते. त्या कलेचा तिनं इथं अर्थपूर्ण वापर केला होता. तिनं त्याला अत्यल्प काळातच जीवे मारला होता.

चवताळून मारण्यास सरसावलेल्या त्या व्यापाऱ्याच्या अंगरक्षकांना सुद्धा तिनं स्वर्गाची सैर करवली होती.

त्यावेळी इब्लिस देखील ही करवीरची भूमी गुन्हेरहित करत होता. श्रीशावर गुदरलेल्या या अशुभ घटनेनं श्रीशाला इब्लिसचा मार्ग पटला होता. तिच्या डोळ्यांना आता सगळीकडं अन्यायाचं राज्य दिसत होतं. ते नष्ट करणारा इब्लिस तिला देवमाणूस वाटला होता.

श्रीशा इब्लिसला येऊन भेटली होती. त्याच्या कार्यात मदत करण्याची इच्छा तिनं त्यास बोलून दाखवली होती. श्रीशासोबतची दुर्घटना त्याच्या पासून लपली नव्हती. तिनं किती धीरानं स्वतःसाठी न्याय प्राप्त केला होता हे तो जाणून होता. तिची न्यायाप्रती तळमळ व आत्मियता पाहून इब्लिसनंही तिला सोबत घेतली होती.

तिच्या शिक्षणाची त्याला मदत होत होतीच. तिचा अधिकाधिक उपयोग व्हावा म्हणूनही तो तिला नव्या नव्या काही टेक्निकल गोष्टी शिकण्यास देखील प्रवृत्त करत होता.

श्रीशाच्या जीवाला काही धोका होऊ नये अशीही तो काळजी घेत असायचा...

परंतु, एक दिवस एक कार्य मार्गी लावताना मात्र श्रीशा पोलिसांच्या हाती लागली होती. इब्लिस (रवी) खुद्द वकिली शिकला होता, त्याच्या मार्गदर्शनाने श्रीशा त्यातून सुखरूप सुटली होती, परंतु आपण आता पोलिसांच्या नजरेत भरल्यानं आपल्यामुळं इब्लिस अडचणीत येऊ नये म्हणून श्रीशानं इब्लिससोबत काम करायचं कायमचं बंद करून टाकलं होतं. आणि ती आपल्या पूर्वीच्या व्यवसायात परतली होती...

इब्लिसकडं येणं जसा तिचा वैयक्तिक निर्णय होता. तसं इब्लिसपासून दूर जाणं हा देखील तिचा वैयक्तिक निर्णय असल्यानं इब्लिसनं तिला अडवलं नव्हतं.

स्त्री स्वतंत्र आहे आणि ती तिचे सर्व निर्णय घेण्यास व ते तारून नेण्यास सक्षम आहे हे तो जाणून होता. आणि श्रीशा तर एक सर्वोत्तम स्त्री होती. त्यामुळं ती त्याच्याकडं आली तेव्हाही त्यानं तिला दूर लोटलं नव्हतं; आणि जातानाही अडवलं नव्हतं. येणं जाणं तिच्या मर्जीनं झालं होतं. इब्लिसचा कसलाच हस्तक्षेप नव्हता तिच्या निर्णयात. ना तिच्या जीवनात. ती जातीए... त्यानं जाऊ दिलं होतं...

नाही म्हणायला जेव्हा निकडीची गरज पडेल तेव्हा माहिती मिळवण्यापूर्ती तिची अदृश्य भेट घेत असे, पण हेली आल्यापासून त्याचं दोन-चार वर्षांत श्रीशांशी भेटणं झालंच नव्हतं. हेली कायमस्वरूपी त्याच्याकडं काम करू लागल्यानं याचा श्रीशाशी संबंध संपला होता.

आज काहीतरी नक्कीच तसं निकडीचं आहे हे श्रीशाच्या ध्यानी आलं होतं. त्याशिवाय इब्लिस तिच्याकडं येणार नव्हता.

तिच्या प्रश्नावर जराही विलंब न लावता इब्लिसनं स्वतःच्या मोबाईल मधलाच त्यानं मारलेल्या माणसाचा फोटो तिला दाखवला. त्याची असाईन्मेंट मिळाल्यानं त्याचा फोटो इब्लिसकडं होताच. त्यामुळं त्याच्या मोबाइलचा डेटा इरेज झाल्यानं इब्लिसला तसा फरक पडला नव्हता. किमान फोटो त्याच्या हाताशी होता जोनाथनचा.

"याला ओळखतेस?" त्यानं थेट प्रश्न केला.

"नाही. कोण हा?" तिनं उत्तर प्रश्न केला.

"सोड!" म्हणत इब्लिसनं त्या माणसाचा मोबाईल खाली ठेवला,

"निघालीस तरी चालेल." तो तिला टाळत बोलला. त्याची नजर पुढे वळली होती.

"मी खोटं बोलत नाहीए." ती तिची बाजू मांडत त्याला कन्विन्स करत म्हणाली.

त्याला मात्र ते पटत नाही असं तिला वाटलं, पण तिचं नाही म्हणणं इब्लिसला पुरेसं होतं. तो त्या माणसामुळे असा वागत होता, पण तिनं त्याचा चुकीचा अर्थ घेतला होता. तिला वाटत होतं, की इब्लिसचा आता तिच्यावर विश्वासच उरला नाहीए.

तोही मग खेकसला,

"तुला माहीत आहे मी इथं का आलोय. शहरात काही घडलं, तर ते तुमच्या सारख्या बायकांपासून लपून राहत नाही! आणि तरी..." तो बोलण्याचं थांबला. आपण चुकलो हे त्याच्या ध्यानी आलं होतं. परंतु हे तिला कमीपणा देण्यासाठी नाही, तर त्याच्या उद्विग्नतेतून आलं होतं... पण तरी ते चूकच होतं...

"आमच्या सारख्या म्हणजे? काय म्हणायचं काय आहे तुला?" टचकन तिच्या डोळ्यांत पाणी दाटलं.

तो नजर चोरत राहिला.

"इकडे माझ्या डोळ्यांत बघून बोल!" ती जरा चिडून बोलली.

"माफ कर. मला तसं म्हणायचं नव्हतं..." तो तिला समजावत म्हणाला.

"तरी म्हणालासच ना..." तिला खरंच खूप लागलं होतं.

"हे बघ, माझ्या म्हणण्याचा अर्थ तसा नव्हता. सध्या माझं डोकं जरा हललंय. सॉरी. माझं म्हणणं एवढंच होतं, की गुन्हेगारी प्रवृतीचे लोक संशय येऊ नये म्हणून अधिकाधिक लोकांच्या नजरेत राहण्याचा प्रयत्न करतात. म्हणून ते डान्सबारमध्ये, प्रोस्टिट्यूट्सकडे जातात. यामुळं त्यांना शहरातील घडामोडी पण समजतात त्या अर्थी हा इथे आला असेल असं वाटलं म्हणून म्हणालो फक्त." तिनं आपल्या बोलण्याचा अनर्थ केलाय असं लक्षात घेऊन त्यानं आपली बाजू स्पष्ट केली.

वास्तविक इब्लिस कोणत्या स्त्रीचा असा अपमान करणार नाही हे श्रीशालाही ठाऊक होतं. इब्लिस बिचारा जतीन आणि सूर्योदय अनाथाश्रमातल्या त्याच्या भावंडांच्या काळजीत आपली मानसिक स्थिती हरवून चालला होता. याच्यातून असली अभद्र भाषा त्याच्या तोंडून आली होती... तो कसल्याशा दडपणाखाली आहे हे श्रीशापासून लपलं नव्हतं. तिनं राग गिळला,

"मी विचारणार नाही, की तू याला का शोधतोयस. पण मी तुला हवी ती मदत करेन." ती त्याला माफ करत बोलली.

"याला शोधायचं नाहीच आहे. हा कधीच मेलाय. फक्त याची माहिती हवी आहे." तो म्हणाला.

झटक्यात आपला राग विसरून ती खुदकन हसली. म्हणाली,

"तूच मारलं असशील!"

त्याचं गांभीर्य ढळलं नव्हतं. त्याची नकळत मान हलली.

"पण एकदा मारल्यानंतर तू त्या माणसाची उखाळी-पाखाळी काढत नाहीस. मग तरी..." ती पुन्हा हसली,

"सॉरी. मी विचारू नये. तू सांगू नयेस. नियम!" तिनं समजूतदार मान डोलावली. म्हणाली,

"बघते काही समजते का?" आणि उतरून निघून गेली.

नियमाप्रमाणे तो तिला सोडणार नव्हता. नाही तर तिच्या राहत्या ठिकाणचे गुपित खुले झाले असते.

एकत्र काम करायचं कधीच सोडून दिलेलं असूनही ते अजूनही त्यांचे 'प्रोफेशनल इथिक्स' पाळून होते.

◆◆◆

अखिलीस आणखी दोघांसकट बसला होता. त्या दोघांतील एक अर्थात तो क्रूरकर्मा होता. त्याचं नांव... खरं नांव कोणालाच ठाऊक नाही. पण त्याला गुन्हेविश्वात 'गोलाएथ' म्हणत. 'गोलाएथ'; एक धिप्पाड राक्षस. आणि याला घेऊन आलेला 'रिकार्डो'. तिघांची काही महत्वपूर्ण खलबतं चालू होती...

"रिकार्डो, लवकर आलास? आणि हा कोण आहे?" त्या राक्षसाकडे नजरेनेच निर्देशत अखिलीस रिकार्डोला विचारता झाला.

रिकार्डोनं बोलण्यास तोंड उघडलं, तोच त्या राक्षसानं हात करून त्याला टोकलं. रिकार्डो थांबला. त्याचं तोंड उघडं ते उघडंच राहिलं. तो अजस्त्र राक्षसच आवाजाचा गडगडाट करत बोलू लागला...

"मी गोलाएथ! जोनाथनचा मोठा भाऊ!"

"आय सी! तू इथंच होतास तर!" अखिलीसनं गोलाएथला एक भुवई उडवून प्रश्न केला. तो गोलाएथप्रती असं अनादराने वागून आपलं उच्च स्थान अधोरेखित करत होता.

"नाही बॉस! तो काल रात्रीच आला आहे गोव्याहून. त्याचं वैयक्तिक एक काम होतं." यावेळी रिकार्डो उत्तरला. अखिलीसच्या उद्धट वागण्या-बोलण्याने गोलाएथ चिडू नये म्हणून रिकार्डोची ही दक्षता होती.

"एकानं त्याची असाईनमेंट वाजवून ठरलेली रक्कम अदा केली नाही, म्हणून त्याचाच समाचार घ्यायला आलो होतो!" आपल्या जखमी हाताकडे पाहत गोलाएथ बोलला. हाताला बांधलेली पट्टी बोटांच्या पेरांच्या ठिकाणी रक्ताने लाल झाली होती. तो असं करून, जणू तो अखिलीसला सूचित करत होता, की त्याच्याशी धोका करण्याचा परिणाम काय असतो! आणि तो पुढे विचारता झाला,

कोण आहे तो, ज्यानं माझ्या भावाला मारलंय?" ढगांचा गडगडाट व्हावा तशा आवाजात गोलाएथ मोठ्याने गरजला.

अखिलीसला 'इब्लिस'ची शंका होती. तोच असला, तर त्याचा बिमोड करणारा माणूस खतरनाक, निष्ठूर व निर्दयी हवा या विचाराने रिकार्डोला

अखिलीसनं खास बजावलं होतं. इब्लिस बाबतची शंका मात्र त्यानं यांना बोलून दाखवली नव्हती. यांना काय जमतंय हे त्याला पहायचं होतं.

इब्लिस असेल किंवा कोणी और, तो आपल्यापर्यंत पोहोचण्यापूर्वी संपलेला अखिलीसला हवा होता. यांचे यांनीच आडकाठी ठरणाऱ्याला शोधून संपवणं त्याला लाभदायक वाटत होतं. सुंठे वाचून खोकला जाईल...

"माहीत नाही. त्यालाच शोधून संपवायचं आहे!" अखिलीस शांत धीरगंभीरपणे त्याला म्हणाला,

"आणि माझ्यासमोर हळू आवाजात बोलायचं!" असं त्यानं गोलाएथला ठणकावलं.

हा कोण मला सांगणार म्हणून गोलाएथच्या मुठी वळल्याही होत्या. जखम झाल्याने उजवा हात पट्ट्यांनी बांधलेला दिसत होता. त्यानं इतक्या जोराने मूठी आवळल्या होत्या, की जखम पुन्हा ओली होऊन त्यातून रक्त रिसत होतं. तो रागाने उठणार तोच रिकार्डोनं त्याच्या मुठीवर थोपटत त्याला शांत केलं. एखादं वासरू शांत व्हावं तसा क्षणात तो निवळला. कसलेल्या मुठी ढिल्या झाल्या.

"तूच त्याला कामावर पाठवलं होतंस?" गोलाएथनं अखिलीसला मग्रुरीत विचारलं आवाजात अजूनही मवाळपणा आला नव्हता. उलट धार वाढली होती.

त्याच्या अविर्भावाचं अखिलीसला केविलवाणं हसू आलं.

"हो. पण कोणाच्या तरी हातून तो मेला. त्याच माणसाला शोधून मारायचं आहे." अखिलीस त्याला म्हणाला.

"माझ्या भावावर एवढा लळा तर नसणार तुझा." गोलाएथ तीक्ष्ण नजरेनं अखिलीसला पाहत म्हणाला. त्याच्या पाहण्यात अखिलीस विषयी तूच्छता होती.

"माझं एक महत्त्वाचं काम आहे. तो अज्ञात इसम मेला नाही, तर कदाचित हे काम पूर्ण होणार नाही. तुझ्या भावाच्या आधी मी पाठवलेली दोन माणसं सुद्धा मारलीत त्यानं." अखिलीस आलेल्या ड्रिंक्सकडे हात करत म्हणाला.

गोलाएथनं हात वर करून अखिलीसच्या व्हॅलेटने ऑफर केलेलं ड्रिंक नाकारलं. त्याच्यामुळं रिकार्डोला देखील मनात असून ते घेता आलं नाही. मन मारून तोही नाहीच म्हणाला.

अखिलीसनं मात्र ट्रे त्याच्या समोर झाल्यावर आपला ग्लास उचलला. व्हॅलेट निघून गेल्यावर त्यांच्या चर्चा पुन्हा चालू झाल्या...

"मागाल ती रक्कम मिळेल. पण तो माणूस जो कोणी आहे, तो मेला पाहिजे. रिकार्डोनं तुला निवडलंय म्हणून मला तुझ्यावर विश्वास आहे. आशा आहे तुझ्या भावासारखा तू निकम्मा निघणार नाहीस!" तारीफ करता करताही अखिलीस टोचून बोलला. कुत्सित हास्य त्याच्या मुखावर होतं.

आपल्या भावाबद्दल या माणसाला काडीचाही आदर नाही आणि तेही तो मेलेला असताना, याचा गोलाएथला भयंकर राग आला होता. अखिलीसच्या अशा हसण्याचीही त्याला चीड येऊन गेली.

"एक वाकडा शब्द! आणि तुझे दात तुझ्या घशात जातील!" तो ओरडला.

"गोलाएथ!" त्याला शांत करण्यासाठी रिकार्डो ओरडला.

त्याच्या एका हाकेने त्या क्रूरकर्म्याला वेसण बसली. त्यानं नाक फेंदारत रिकार्डोकडे पाहिलं. रिकार्डोनं शांत मुद्रेने त्याला बाहेर निघण्याचा निर्देश केला.

गोलाएथ पाय आदळत बाहेर निघून गेला. जाण्यापूर्वी एक जळजळीत कटाक्ष तो अखिलीसकडे टाकण्यास विसरला नव्हता. त्यावेळीही अखिलीसच्या

मुखावर गुर्मीचं स्मित होतं. त्या हसण्यानं डोक्यात अधिकच तिडीक जाऊन मग गोलाएथ बाहेर पडला होता.

"बॉस, माफ करा. मी समजावेन त्याला." रिकार्डो अखिलीसची मनधरणी करत म्हणाला.

"रिकार्डो;" अखिलीसनं त्याच्याकडं थंड नजर फिरवली,

"तुला हा योग्य वाटतो म्हणून मी याला संधी देतोय. शिवाय तुझा मुद्दा पटलाय, की त्या जोनाथनचा हा भाऊ असल्यानं त्या पर्सनल इन्वॉल्व्हमेंटमुळं, आकसापोटी हा हे काम परफेक्ट पार पाडू शकतो. बाकी हा काही मंदपणा करणार नाही याची काळजी घे."

अखिलीसचं असं पाहणं रिकार्डोच्या अंगावर भीतीने शिरशिरी आणून गेलं,

"बॉस. ट्रस्ट मी. हा दिसायला आडदांड असला, तरी खूप हुशार आहे. तुमचा जॉब हाच वाजवू शकतो. जोनाथन काय चीझ होता हे तुम्ही अनेकदा पाहिलंय. हा त्याचाच मोठा भाऊ आहे." आपलं म्हणणं स्पष्ट अधोरेखित करण्यासाठी निकार्डोनं 'मोठा' या शब्दावर जोर दिला होता.

"हो. पण त्याचं काय झालं, हे तुही पाहिलंयस आणि मीही. सो नीट लक्ष ठेव. हा जर जॉब पूर्ण करू शकला नाही, तर तुझी गचांडी आधी मारली जाईल!" एव्हढंच स्पष्ट करून अखिलीसनं त्याला भुवया उडवून जाण्यास आदेश दिला.

जवळजवळ कुर्निसात करूनच भयभीत रिकार्डो बाहेर पडला. अखिलीसनंही एका घोटात राहिलेला ग्लास घशात रिता केला होता.

◆◆◆

इकडे जोनाथनच्या बॅकग्राऊंडबद्दल हेलीची आपल्या परीनं शोधाशोध चालूच होती. त्यासाठी ती तिचा मोठा सोर्स असलेल्या दानिशला भेटणार होती. ही ऊठाठेव कशाला हे तिला समजायला जागा नव्हती. पण तिच्या बॉसची, इब्लिसची तशी इच्छा होती, ती मोडवून कशी चालेल? म्हणून ती मन मारून का होईना, प्रयत्नरत होती.

दानिश तिच्या विश्वासातला होता. त्याच्याकडून आलेली माहिती तिच्यासाठी ऑथेन्टीक असणार होती.

इब्लिस त्याच्या नेहमीच्या ठिकाणावर नसल्याने तिनं तिथं राहणं साहजिकच नव्हतं. आणि आपल्या घराचं ठिकाण तिला कोणाला कळू द्यायचं नव्हतं म्हणून ती त्याला बाहेरच कुठे भेटली होती.

फुटपाथच्या ब्लॉक्स मधून मधोमध एक भलंमोठं झाड बाहेर डोकावलं होतं. वास्तविक ते झाड आधी पासूनच तिथं होतं, माणसाच्या महत्वाकांक्षेच्या ब्लॉक्समध्ये नंतर ते जखडलं गेलं होतं.

त्या झाडाच्या छायेतच ती उभी होती. जरा घाबरलेलीच होती. त्या जागृतावस्थेपायीच तिचा हात तिच्या पर्समध्ये असलेल्या कोल्ट कमांडरवर स्थिर होता. दानिशची चारचाकी आल्यावर तिचा श्वास मोकळा झाला होता.

तशी ही तिची दानिशला भेटण्याची नेहमीची जागा. नेहमीची म्हणजे जेव्हा तिला अतिरिक्त माहितीची गरज भासते तेव्हाचीच फक्त.

"बोला मॅडम, काय हुकूम?" गाडीतून उतरून तिच्या अगदी टपावर टप्पा उडी खाऊन बसत दानिशनं विचारलं.

त्याच्या उपरोधिक म्हणा वा मस्करीच्या म्हणा पण त्या सुराला साद न देता तिनं आपल्या मोबाईल मधील जोनाथनचा फोटो त्यास दाखवला.

"बॉयफ्रेंड?" अबोल हेलीला चिडवण्यासाठी त्यानं शाब्दिक चिमटा घेतला.

"शट अप!" ती रागाने ओरडली.

"आता नुसता फोटो दाखवल्यावर आम्हाला काय कळायचं?" तो आणखी चिडवण्यासाठी मस्करी करत बोलला.

"कमांडरला याची माहिती हवी आहे!" ती मुद्द्यावर आली.

"कमांडर्? म्हणजे त्यो इब्लिस का कोण त्यो?" त्यानं विचारलं.

"हा." तिनं मोजका दुजोरा दिला.

यावर दानिश वेड्यासारखा खळखळून हसायला लागला. टपावरून त्याचा तोच कधी घसरला आणि तो इकडं तिकडं स्वतःला लोटत राहिला हे त्यालाच समजलं नाही.

हेली मात्र चिडली. तिची मुद्रा अधिकच क्रुद्ध झाली. स्वतःला आवरत तो तिच्यासमोर येऊन उभारला. त्याचं टाळ्या वाजवत मावळतं हसू चालूच होतं.

"ज्यो मास्क घालून स्वतःची ओळख लपवतो त्याला याची ओळख काढून का हवीये बाई?" हसतच त्यानं विचारलं. दानिशचं पिसाट हसू बंद करण्याची हेलीकडे एक ट्रिक होती, ती तिनं आजमावली. एक जोरदार गुद्दड तिनं त्याच्या पोटात ठेवून दिला. तो कळवळला...

"अरे हो... हो..." तो पोट धरून मधे वाकत उद्गारला.

मग पोटात उभारलेली सगळी कळ एकदाच काय ती सोसल्यावर तो ताठ झाला,

"बरं बोल." तोही आढेवेढे न घेता गंभीर होत मुद्यावर आला. हेलीच्या गुश्श्याचा स्वाद त्यानं चाखला होता. अद्दल आली होती.

"का? कशासाठी? मला माहित नाही? पण याच्यामुळं कमांडर् मोठा इन्सिक्योर झालाय. म्हणून त्याला याची माहिती हवीय. तू काही करू शकतोयस का तेव्हढं सांग." ती जाब विचारला तसं बोलली.

"तो राक्षस इतका अस्वस्थ झालाय याचा अर्थ कारण तसंच असणार." जरा विचार करून,

"बघू. मला फोरवर्ड कर." तो तिला अतीव गंभीर होत म्हणाला.

"ओके. चल येते." ती म्हणाली आणि तिनं त्याला तेथेच सोडून घरचा रस्ता पकडला.

जाता-जाताच तिनं जोनाथनचा फोटो दानिशला सेंड केला होता. हे दानिशच्या ध्यानी आलं ते त्याचा मोबाईल व्हायब्रेट झाल्यावर. त्या रात्रीच्या अंधारी निरव शांततेत त्याच्या मोबाईलची हलकी मेसेज टोन पण मोठ्याने वाजली होती.

त्यानं मग तिच्या पाठमोऱ्या आकृतीवरून नजर हटवून खिशातून मोबाईल काढून पाहिला.

आलेली इमेज डाऊनलोड करून त्याची नजर जोनाथनच्या फोटोवर खिळली...

# ३. उद्भासन...

निबीड रात्र... गोलाएथनं केलेल्या खूनाचा पंचनामा करण्यासाठी त्या गांवचं पोलीस डिव्हिजन तिथं गोळा झालं होतं. सोबतच्या फॉरेन्सिक टीमला त्या रक्तामांसाच्या चिखलाला कसं गोळा करावं तेच समजत नव्हतं. फोटोग्राफर्स तेवढे आपलं काम इमानेइतबारे करत होते.

पर्टीक्युलर त्या ज्यूरिसडिक्शनचा इंचार्ज असलेला एसआय सुनील भाकरे तिथं जरी उपस्थित असला, तरी त्यानं एसपी राजन जाधवला तिथं बोलवून घेतलेलं होतं. अगदी आग्रहाने त्यानं एसपीला येण्यास बाध्य केलेलं होतं.

एसपीनेही प्रकरण गंभीर आहे हे ध्यानात घेऊन इथं येण्याची तसदी घेतलेली होती.

परंतु त्याला ही कल्पना नव्हती, हे प्रकरण इतकं चिघळलेलं असेलसं. समोर पडलेलं ते कलेवर रबराच्या पुरुषी आकृतीसारखं दिसत होतं. यात हाडे होती का नव्हती अशी त्या मृतदेहाची अवस्था झाली होती. रक्त सपशेल वाळून जमिनीत मुरलं होतं. ज्या रक्ताला मुरता आलं नाही ते खळळ होऊन त्याच्या पापुंद्र्याचा थर पेव्हमेंट ब्लॉक्सवर गोठून जमा झालं होतं.

कोणी इतकं निर्घृण खून कसा काय करू शकतं हेच एसपी राजन सह सर्वांनाच पडलेला प्रश्न होता.

एसपी त्या मृतदेहाकडे पाहत होता. इतक्या पाशवी राक्षसी पद्धतीने कोणी कोणास कसे मारू शकते हाच विचार त्याच्या मनी आला.

आणि अचानक ढगाळ वातावरण फिटून स्वच्छ सूर्यप्रकाश पृथ्वीवर पोहोचावा तसं त्याच्या मस्तकात उजेड पडला. कपाळावरचं प्रश्नाचं जाळ दूर झालं आणि त्यानं बाजूला होत फोन लावला.

त्याबाजूने फोन उचलला गेला नाही. पर्याय म्हणून त्यानं मग मेसेज टाकून ठेवला.

◆◆◆

रिकार्डो सिगरेट शिलगावत एका बार वजा रेस्टॉरंटच्या बाल्कनी रेलिंगला टेकून होता. छोट्या बार-रेस्टॉरंटच्या टेरिस टेबलवर त्यांनी पिण्यापूरता तळ ठोकला होता. बरीच रात सरली होती. दोघेच होते. त्यांच्यामुळं तिथला मालक आणि सर्व करणारा एक वेटर यांना अजून सुट्टी मिळाली नव्हती.

बोलता बोलता तो गोलाएथकडे वळला होता. गोलाएथ कुठेतरी शून्यात हरवून त्याच्यासाठी ओतलेल्या ग्लासात आपली नजर हरवून बसला होता...

"त्याला शोधणार कसा आहेस?" रिकार्डोनं प्रश्न केला होता.

त्या प्रश्नावर काहीच न बोलता गोलाएथ शांत बसून होता.

"जिथं अखिलीसला खीळ बसली आहे तिथं आपण काय करणार?" कश मारून स्वतःतच हरवून बोलत रिकार्डो धुराचे गोळे नाका-तोंडातून हवेत पसरवत होता.

गोलाएथ न बोलता बसून होता.

थंड वाढत चालली होती. त्यात रात्रीची वेळ! त्यामुळं धुमसत असलेल्या गोलाएथच्या नाकपुड्यांतूनही गरम वाफा बाहेर फेकल्या जात होत्या.

"पण त्याला जबान दिली आहे त्यामुळं काहीतरी करावंच लागेल! नाही तर तो आपल्याला जिवंत ठेवणार नाही..." रिकार्डो मनातील भीती व्यक्त करत अनायासेच बोलता झाला.

गोलाएथ समोर आपण असं काही बोललो हे त्याच्या गावीही आलं नव्हतं पटकन. चुकून गोलाएथला कुणाचीतरी भीती घालण्याची हिमाक़त केली होती त्यानं...

गोलाएथ अंगापिंडाने खरंच 'गोलाएथ' सारखाच होता. त्यामुळंच तो या नांवाने प्रसिद्ध झाला होता. एखादा हत्ती देखील त्याच्या वज्रमुठीच्या एका प्रहारात गलितगात्र होऊन जीव सोडेल असा त्याचा पुष्ट देह होता. नवल नव्हतं, की त्यानं त्या अंधाऱ्या गल्लीत त्या अजाणत्या व्यक्तीची तशी अवस्था फक्त हाताचे घाव घालून केली होती.

याचा अर्थ तो बुद्धीने कमी होता असे नाही. तो 'आडदांड' होता; 'बिनडोक' नाही! तसा असता, तर तो त्याच्या पहिल्याच खूनात पकडला गेला असता. इतकी वर्षे या अंधाऱ्या जगात तो तग धरूच शकला नसता!

बाराव्या वर्षी या गड्याने त्याच्या गल्लीतल्या एका दारुड्याचा खून केला होता. का? तर फक्त तो दारू पिऊन त्याच्या बापाला त्याच्याच घराबाहेर उभा राहून शिव्या देत होता म्हणून.

त्याचा बाप पण काही मोठ्या सन्मानाचा हक्कदार नव्हता. तोही व्यसनी पाकिटमारच.

पण या तिऱ्हाईताने येऊन आपल्या बापाचा भर गल्लीत उद्धार करावा? आपल्या बापाची लायकी काढावी? त्याला अश्लाघ्य, अर्वाच्य शिव्या द्याव्यात?

याची सनकली आणि त्याच्या बापाची बाटली घेऊनच तो बंद दार उघडून घराबाहेर पडला.

दारूच्या बाटलीचा एकच घाव त्यानं त्या दारुड्याचा मस्तकी दिला होता. आधीच अति दारू पिल्याने अर्धमेला झालेला तो, गोलाएथच्या दुसऱ्या मुष्टिघावातच पूर्णमेला झाला होता...!!!

एवढं करून गोलाएथ थांबला नव्हता. फुटलेल्या बाटलीच्या तुकड्याने त्यानं बघणाऱ्या गल्लीसमोर त्या माणसाचा  गळा चिरला होता. ते करताना त्याच्या चेहऱ्यावर कसलेच पश्चातापाचे भाव नव्हते, तर त्याची मुद्रा राक्षसी हास्याने प्रफुल्लित झाली होती.

तेव्हापासून आजपर्यंत त्यानं त्याचा देह दुसऱ्यांच्या रक्तावर सिंचला होता...

तोच गोलाएथ आज विचारात बसून होता. त्याचा भाऊ एका अज्ञात इसमाकडून मारला गेला होता. तो कोण हे त्याला शोधून काढायचं होतं... त्याला संपवायचं होतं... त्याच विचारात तो गढून गेला होता...

आजवर त्यानं किती सुपाऱ्या वाजवल्या होत्या याची त्यालाच गणती नव्हती. पुढे आई-बाप मेल्यावर त्यानं त्याच्यासोबत राहणाऱ्या त्याच्या भावाला पण त्याच्या याच बिनभांडवली धंद्यात उतरवला होता.

जोनाथन हा पण बापाच्या दारूमुळे समाजात अवहेलना सहन करतच मोठा झालेला, त्यात भाऊ खूनी असल्याचं लांछन होतंच. यावरून त्यानं किती

टोचणी त्याच्या आजूबाजूच्या लोकांकडून खाल्ली होती हे त्यालाच माहीत. तोच समाजावरील राग समाजावर काढण्याची त्याला संधी मिळत होती व त्याला त्या कामाचे पैसेही मिळणार होते. आपल्या रागाचा निचरा करण्यासाठी आपल्याला कोणी पैसे देऊ करतंय या भानगडीची आयडियाच त्याच्यासाठी भन्नाट होती. तोही मग आपल्या भावाच्या या 'अशुभ' पण त्यांच्यासाठी 'शुभ' असणाऱ्या कार्यात जडला होता.

गोलाएथनं जोनाथन त्याचा लहानभाऊ असून त्याला  पोटच्या पोरमायेनं धंद्यातील खाणाखुणा, खाचाखोचा शिकवल्या होत्या. आजवर त्यानं कमावलेल्या अनुभवामृताचं सार त्यानं आपल्या भावाला पाजलं होतं. आणि तो पूर्ण तयार झालाय असं लक्षात येताच आपल्या पंखाखाली दाबून न ठेवता त्याला मुक्त संचार करण्यास सोडून दिलं होतं.

जोनाथन स्वतःच स्वतःच्या जीवावर सुपाऱ्या घेऊन त्या अगदी धिटाईने अस्खलित वाजवत आला होता. अखेर शेरास सव्वाशेर भेटतोच तसा हा कोणी उपटसुंभ मध्येच निपजला होता, ज्याने गोलाएथचा अगदी जीव की प्राण असणाऱ्या जोनाथनला किटकासम मारून टाकला होता...

रिकार्डोची बडबड ही चालूच होती. काय करावे, कसे करावे याचे काही सल्ले तो गोलाएथच्या पचनी घालण्याचा प्रयत्न करत होता. हुशारी दर्शवण्यासाठी म्हणून नाही, तर त्याला पोटच्या पोरासमान असणाऱ्या गोलाएथला आपली अदनी मदत म्हणून त्याचं सल्ले देणं चालू होतं...

पण त्याची बडबड एका पॉईंटला गोलाएथला असह्य झाली. इतकी; की त्यानं भरलेला ग्लास उचला आणि जीव खाऊन डोक्यात हाणला!

'साहेब बिल...' म्हणून पुढे आलेला वेटर डोकं फुटून थरथरत जमिनीवर पडला होता!!!

हा वार त्याच्यासाठी होता हे रिकार्डोनं ओळखलं होतं. त्याचं तोंड उघडंच पडलं होतं. डोळे खोबणीहून मोठे झाले होते. ओठांत दाबलेली सिगारेट गळून त्याच्याच पायावर पडली होती. तिचा चटका बसतोय याचंही भान त्याला उरलं नव्हतं.

"आता तोच मला हुडकत यील!" गोलाएथ संतापाने निर्धारी ओरडला.

त्याचा तो आवेश बघून रेस्टॉरंट मालक सुद्धा घाबरून पुढे झाला नव्हता. नाही तर आपली अवस्था पण आपल्या कामगारासारखी झाली असती हे तो मनात पक्कं जाणून होता.

फुकट खायची-पायची सवय नसणाऱ्या गोलाएथनं तेवढ्यातही त्याच्या बिलाचे पैसे वरच्या खिशात्नं काढून फेकले होते. ते टेबलवर पडलंय, की वेटरच्या रक्तात पडून भिजलंय हे पाहायला तो थांबला नव्हता. त्या वेटरच्या शिरी आपलं हस्तीपद देऊन तो त्या टेरिस-रेस्टॉरंटच्या पायऱ्या उतरून गेला होता. कवडी फुटल्याचा आवाज स्पष्ट झाला होता.

त्या रेस्टॉरंटच्या मालकाची हबकलेली नजर त्याच्या वेटरवर खिळली होती, ज्याने गोलाएथचा भारदस्त पाय मस्तकी पडताच दम तोडला होता. खऱ्या अर्थाने त्याचा 'कपाळमोक्ष' झाला होता. आता या मृत वेटरची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी त्याच्यावर होती व याच विचाराने तो घामाने डबडबला

होता. आपण जिवंत सुटलो याचा आनंद होताच; पण तो आत कुठेतरी दबल्यासारखा होता, जो त्यालाच सापडत नव्हता. मग तो वर दर्शवणार कसा...

रिकार्डोची परिस्थिती काही वेगळी नव्हती. गोलाएथ गेल्याने आता मात्र त्याला सिगरेटचा चटका जाणवला आणि त्यानं पाय झटकून मागे खेचून घेतला. सिगरेट टॉपल होऊन वेटरच्या रक्तात पडली व विझून गेली. रिकार्डोही रेलिंगवरून खाली पडता पडता राहिला होता...

◆◆◆

दिवसभरात आलेले मेल्स आणि मेसेजेस डोळ्यांखालून घालवण्याचं काम हेली करत होती. बाजूला जेवणाचं ताट होतंच. मद्याची बाटली घेण्यास आज ती विसरली होती. डोक्यात इब्लिसचे असे अचानक विचित्र वागायला लागल्याबद्दल विचार घोळून ती चिंतीत होती.

ग्लाससाठी हात बाजूला जाताच तिच्या ध्यानी आलं, की जेवण घशाखाली ढकलण्यासाठी कसलंच द्रव तिच्या शेजारी नाही. तिनं उठून फ्रीजमधून तिचा ब्रँड बाहेर काढला. ग्लास घेण्याची तसदी तिनं घेतली नाही. मद्याची बाटली तशीच ओठांना लावत ती तिच्या लॅपटॉपपाशी येऊन बसली.

तिचा मोबाईल वाजला म्हणून तिनं तो पाहिला. मेसेज तसा महत्त्वाचा नव्हता. पण लागलीच मग आधीचे मेसेजेही पाहून घ्यावेत म्हणून ती स्क्रोल करू लागली. एसपीच्या मेसेजवर तिची नजर पडली.

त्या मेसेजने तिचा जळफळाट झाला. त्या अनामिक गल्लीत मरून पडलेल्या त्या अनोळखी माणसाच्या मृत्यूला त्यानं इब्लिसला जबाबदार धरलं होतं!

'माझ्या ऑर्डर शिवाय कोणाला मारण्याची हिंमत केलीच कशी?'

असा सरळ सरळ जाब विचारणारा तो धमकी भरा मेसेज होता. 'ऑर्डर देणारा हा कोण?' अशी एक तिडीक तिच्या डोक्यात गेलीच होती.

'इब्लिस संधान साधून आहे म्हणून हा काय लय शहाणा झाला काय? याची धाव माहीत नाही का मला? स्वतःला स्वच्छ ठेवायचा स्वार्थी विचार याने केला नसता, तर इब्लिसला हाताला धरलं नसतं याने... पण डाग नको होते ना कोणते...' अशी बरीच दूषणे तिनं एसपीला मनातल्या मनात देऊन टाकली.

'इब्लिसनं मनावर घेतलं होतं एसपी सोबत काम करायचं, नाही तर याला भीक घालतं कोण?' असंही ती मनाशी पुटपुटली होती.

एसपीसाठी तिला आदर होताच, त्याहून इब्लिसबद्दल ती अधिक आस्थेवाईक प्रामाणिक होती. तो प्रामाणिकपणाच संतापाच्या भरात तिच्याकडून असं काही वदवून घेत होता.

इब्लिस दिलेल्या वचनाप्रमाणे वागत असून पण ते अव्हेरून एका खुनाचा सरळ सरळ आरोप इब्लिसवर करण्याची हिंमत हा एसपी करतोच कसा याचीही तिला चीड आली होती.

ओठाला लागलेली बाटली टी-पॉयवर आदळत तिनं पुढील मेसेज वाचला...

'या घटनेबद्दल मला सगळा रिपोर्ट हवाय! मला पटलं तर ठीक, नाहीतर इब्लिसला अटक करण्याशिवाय मला पर्याय नाही!'

अशी स्पष्ट धमकी एसपी राजनने दिली होती.

जमिनीवरच बसलेली ती स्वतःला मागील सोफ्यावर झोकून देत विचारात पडली. तिची नजर वर छताला भिडली होती.

इब्लिसला याबद्दल ती विचारणार नव्हती. इब्लिस असंच जाऊन कोणालाही मारणार नाही हे ती जाणून होती. आणि जरी तसे काही करायचे असतेच, तरी त्यानं किमान हिला कळवले असते.

कॉन्ट्रॅक्ट किलिंगची असाईन्मेंट्स घेण्यास नकार देणारा इब्लिस असं कोणालाही जाऊन मारण्याचं कृत्य करेलच कसा? एसपी आल्यानंतर त्याच्या सुचनेशिवाय इब्लिसनं कुणाला उडवलं नव्हतं. इतका पुरावा तिला पुरेसा होता इब्लिसचं निर्दोषत्व सिद्ध करायला. त्यामुळं तिच्या डोक्यात इब्लिसनं कुणाला असं मारण्याचा विचारही येणं शक्य नव्हतं.

सो, इब्लिसनं एसपी म्हणतोय त्या व्यक्तीला मारणं शक्य नव्हतं याची तिला खात्री होती.

परंतु तिला या एसपीचा अतोनात राग आला होता, कोणाचा तर खून पडला म्हणून काय त्यानं थेट इब्लिसवरच संशय घ्यावा? म्हणजे जगात इब्लिस हा एकटाच सैतान आहे का? अनेक लोक सभ्यतेची पांघरूणं घेऊन सैतानी कृत्यं करतातच की... असेल त्यांतलाच कोणी त्या माणसाला मारणारा... किंवा मग तोही कोणी निव्वळ सैतानच असेल! जरुरी नाही, की तो 'हा' 'इब्लिस'च असावा...!

मग एसपीने याच्यावर संशय का घ्यावा? एसपी इथं आल्यापासून आजवर कधी इब्लिसनं कोणाचा रेकॉर्ड एसपीकडून आल्याशिवाय कोणाला मारलंय? नाही ना! मग त्यानं थेट इब्लिसवर संशय का घ्यावा...???

आणि अचानक तिला लक्षात आलं, की इब्लिस त्याच्या लास्ट असाईन्मेंट पासून काँन्शियस झालाय. त्याचं काही तरी बिनसलंय हे नक्की. मग कदाचित त्यानं खरंच तर...

झटकन एखादी वीज सनकावी, तडकावी तशी ती ताठ झाली आणि तिनं फोन उचलला...

इब्लिस आपला विचारात गाडी चालवत होता. त्याच्या फोनची रिंग वाजली. त्यानं हँड्सफ्री ऑन केला,

"बोल!" तो म्हणाला.

"कुठेयस?" तिनं विचारलं.

"बेसवर जातोय." त्यानं माफक उत्तर दिलं.

"तू अलीकडे मला माहित न होऊ देता कोणाला मारलंयस?" धक्कावलेल्या तिचा अनपेक्षित प्रश्न. समोर सर्व गोष्टी जिथल्या तिथं पडल्या होत्या तिच्या.

"नाही! पण का?" तो गोंधळला नाही मात्र त्याला उत्सुकता लागली, की तिनं असं अचानक का विचारावं...

"एक खून झालाय. एसपीला तुझ्यावर संशय आहे!" ती शांत व कोरडे बोलली.

क्षणाचाही विलंब न लावता मग चेहऱ्यावरचे कसलेच भाव न बदलता तो हेलीला एवढेच म्हणाला,

"अरेंज मी अ मिट!" आणि त्यानं गाडी जोरात पळवण्यास सुरवात केली...

●●●

सकाळ सकाळीच मग 'इब्लिस मास्क' घातलेल्या इब्लिसची गाडी पोलीस हेडकॉर्डर्सला लागली. एका चित्रपटातील नायकासारखा त्याचा आधी पाय बाहेर आला आणि तो संथपणे गाडीतून उतरला. त्याच्या तोंडावर असलेला तो भयाण मास्क पाहून तिथले सगळे ऑफिसर्स अचानकच त्याच्या बाजूने गोळा झाले. हा राक्षस इथे कसा याचा विचार कोणाच्या मनात येण्याही आधी सर्वांच्या गन्स त्याच्यावर ताणल्या गेल्या होत्या. तो तसाच मग हात हवेत उंचावून किंतु समोरच्यांचा शरणागत म्हणून नाही, तर त्यांना अभय देतोय अशा अविर्भावात उभारला. मास्क मधील त्याचे ओठ यांची कीव करण्यासाठी नक्कीच रुंदावले होते. पण तो भांडणासाठी आला नव्हता. त्यानं तो पर्याय ठेवलाच नव्हता स्वतःसाठी. मग त्यांतील एकाची लगबग झाली त्यानं वर धाव घेतली.

एव्हना खाली काही गडबड आहे ही बाब एसपीच्या ध्यानी आल्याशिवाय राहिली नव्हती. तो देखील निम्म्या रस्त्यात आलाच होता. आत गेलेल्या ऑफिसरची आणि एसपीची मधेच गाठ पडली होती.

"सर, इब्लिस!" एवढंच तो धापा टाकणारा व थोडा घाबरलेला ऑफिसर म्हणाला.

त्याचं ते त्रोटक शब्द ऐकले न ऐकले असा एसपी त्याला तिथंच सोडून न थांबता बाहेर धावला होता.

एसपी आला. त्याला इब्लिसपर्यंत पोहोचण्यासाठी वाटेतील इतर ऑफिसर्सनी बाजूला होत जागा करून दिली. त्यांच्या सर्व्हिस पिस्टल्स तशाच इब्लिसवर सावध रोखलेल्या होत्या. त्या मात्र खाली झाल्या नव्हत्या.

एसपी शांतपणे इब्लिस समोर येऊन उभा राहिला.

"बोलायचंय!" इब्लिस हात उंचावूनच एसपीला त्याच्या मास्कमध्ये असलेल्या व्हॉईस मॉड्युलरच्या सहाय्याने मशीन सदृश्य आवाजात शांतपणे बोलला.

एसपी इब्लिसचे मास्क मधून डोळे दिसत नसताना मास्कच्याच डोळयांत डोळे गाडून इब्लिसच्या सत्याचा डोह तपासू पाहत होता. ते त्याला काही शक्य झालं नाही, परंतु इब्लिसच्या आवाज बदलणाऱ्या मशीन मधून निघालेल्या कृत्रिम आवाजातच इतकी सत्यता होती, की तेवढी एसपीला पुरेशी वाटली. मग इब्लिस मास्कच्या डोळयांत डोळे रोखतच त्यानं आपल्या ऑफिसर्सना गन्स खाली घेण्याचा इशारा केला.

गन्स खाली येताच इब्लिस देखील आपले हात खाली घेऊ लागला, परंतु शंकीत एसपीने त्याला तसे करण्यास दरडावून मनाई केली. त्यानं मग आपल्या सिक्योरिटी कॉन्स्टेबलला इशारा केला. तो एसपीचा मूक हुकूम मानून मेटल डिटेक्टर घेऊन पुढे झाला. आपले काम त्याला नीट माहीत होते, इतकी वर्षे तो तेच तर करत आलेला. त्याला इतर सूचनेची आवश्यकता भासली नाही. त्यानं हात वर करून उभ्या इब्लिसला मेटल डिटेक्टरने सर्च केलं. साहजिक त्याला इब्लिसची आवडती 'कमांडर्' हाती लागली. इब्लिसनं ती स्वतःहून काढून कॉन्स्टेबलला दिली.

हे होत असताना इब्लिस "हं!" करून मोठ्याने अट्टहास करत हुंकारला होता.

त्याचं सिक्योरिटीला जरा भयच वाटलं होतं, पण काम करणं तर आवश्यक होतं, कमांडर् काढून घेतल्यावर त्यानं सेफ्टी म्हणून इब्लिसला पुन्हा मेटल डिटेक्टरने चेक केलं. यावेळीही मेटल डिटेक्टर वाजलं. इब्लिसच्या गळी एक नऊ मिलिमीटर पॅराबेलम लटकत होती. बंदूकच हाती मिळाल्यावर हिच्याकडे दुर्लक्ष केलं गेलं.

एसपीसोबत सर्वच जरा ढिलावले. इसपीने सर्व ऑफिसर्सना आपापल्या कामाला लागण्यास आदेश फर्मावला आणि गर्दी कमी झाल्यावर इब्लिसला वर चालण्याचा निर्देश केला. एसपीच्या हालचाली या वक्ती तरीही सावध होत्या.

एसपी इब्लिसला लीड करत आपल्या केबिनकडे घेऊन आला. दरम्यान हेडकॉर्टर्स मधील सर्वांच्या भयचकित नजरा आपले काम सोडून इब्लिस सोबत

फिरत होत्या. केबिनपाशी थांबत मग एसपीने दोन चहा आत पाठवून देण्यास एका कॉन्स्टेबलला सांगितले आणि त्याच्या मागे थांबलेल्या इब्लिसला केबिनमध्ये चालण्यास आदेश वजा निर्देश केला.

केबिनमध्ये दोघे स्थिरावले. केबिन तसे रुक्षच. एखाद्या पोलीस हेडकॉर्टर्सच्या सुप्रीटेंडेडचं जसं केबिन असावं, तसंच ते कोल्हापूर सुप्रीटेंडेडच एक केबिन होतं...

एसपी आपल्या चेअरवर न बसता त्यानं इब्लिस आणि त्याच्यातील अंतर मिटवण्यासाठी सोफ्याची निवड केली.

"तर, कमांडर् उर्फ इब्लिस! इकडं कसं येणं केलं?" समोर बसण्याचा इशारा करत आपणही बसत एसपीने इब्लिस सोबतचे मौन सोडले.

"हेली म्हणाली, तुम्ही मला शोधताय! म्हंटलं तुम्हाला तसदी नको. स्वतःच आलो!" बसून स्थिर झाल्यावर इब्लिस मशीन आवाजात बोलला.

"आह हेली... माझी मदतनीस! जी आपल्यातील निगोसिएशनसाठी मी तुझ्याकडं पाठवली होती; आता ती तुझी निष्ठावान नोकर अधिक झालीये!" एसपी कुजकट बोलला.

"खंत वाटते?" कुत्सित हसत इब्लिस तंडला.

"खंत काय वाटायची. लोकांचे खरे चेहरे समोर आल्यावर उलट मला आनंद होतो. कोण आपला कोण परका कोळतो त्यानं!" एसपी मागे रेलत बोलला.

"मुद्द्यावर याल?" इब्लिस जरा खेकसला.

इतक्यात दारावर टकटक झाली.

"कम!" एसपी इब्लिसकडे पाहतच ओरडला.

पार्श्वभागाने दार ढकलत चहाची ऑर्डर केलेला कॉन्स्टेबल भेदरतच आत आला. कितीही त्यानं स्वतःला रोखले तरी इब्लिसकडे त्याची घाबरी, चोरटी नजर सारखी धावत होती. त्यामुळं हातातील स्ट्रे आणि त्यातील कप्स खळखळ असे लयबद्ध नाचत होते.

आलेला चहा समोर ठेवण्यास आला. एवढे क्षुल्लक काम झाल्यावर एखाद्या मोठ्या ओझ्या खालून सुटावे अशा घाईने मग कॉन्स्टेबल बाहेर झाला. त्याच्या या वागण्याचा एसपीला राग आणि कीव वाटून गेली, कारण त्याच्यामते असं वागून त्यानं इब्लिस समोर अख्ख्या पोलीस डिपार्टमेंची लाज काढली होती. इब्लिसला मात्र हसू आलं होतं.

"मुद्यावर तर तू यायचंय. मला भेटायचं विशेष कारण?" एसपी इब्लिसला विचारता झाला.

"ते नंतर! कोणता खून झाला ते आधी सांगा! आणि तुम्हाला मीच गुन्हेगार का वाटतो ते समजले तर उत्तम होईल?" इब्लिस आपलं वर्चस्व त्या खोलीत स्थापन करून एसपीवर दडपण टाकण्यासाठी कोचाच्या किनारी झाला. त्याचा आवाज घोगरा झाल्यानं मास्कचा मशीनी आवाज जास्तच भयाण झाला होता.

"कारण इतका निर्घृण खून तुझ्याशिवाय दुसरा कोणी करू शकत नाही!" एसपीने आपला लंडगा मुद्दा रेटला. हे करत असताना तो स्वतःला निर्भीड दर्शवण्याचा यत्न करत होता.

"फक्त एवढंच?" इब्लिसनं भुवयांवर आठ्या आणल्या. मास्क हल्ल्याने त्याची जाणीव एसपीला पण झाली असावी.

"आणखी काय असायला हवं?" एसपी जरा दुःखावल्यागत बोलला.

इब्लिसनं त्याच्या इंटेलिजन्सला चॅलेंज केल्याची त्याला भावना झाली होती.

"एक ऑफिशियल असून तुमचा पुराव्यावर विश्वास दिसत नाही राजन साहेब!" इब्लिस एसपीबद्दल आवाजात कीव आणत ठसकून बोलला.

यावर दुखवल्याचे दृष्टिगोचर भाव एसपी जाधवच्या चेहऱ्यावर झळकले. पण तो काही बोलणार त्याच आधी इब्लिसनं पुस्ती जोडली,

"मी नेहमी माझ्या आवडत्या कोल्ट कमांडरने मुडदे पाडतो. तुम्ही म्हणता त्या व्यक्तीला आघाताने मारलंय हे तुमच्या लक्षात यायला हवं होतं जाधव!" इब्लिस कीव करत म्हणाला.

"तू माहिती काढली आहेस तर!" एसपी जाधव ठसक्याने बोलले.

"माझ्यावर तुम्ही आरोप करत असताना न काढून कसं चालणार होतं?" इब्लिस राजनची कीव करत हसला.

"हेलीनंच मदत केली असणार?" राजन बेरकी नजर करत विचारत होता.

"शी इज अ लॉयल इम्प्लॉयी!" इब्लिस हसतच म्हणाला.

"हा... तिची लॉयल्टी आमच्याच नशिबी आली नाही! मला नाकारून तुझ्याशी हातमिळवणी केली तिनं!" राजन खंतावला.

"ते तुम्ही तुमच्या इम्प्लॉयीशी कसे वागता यावर त्यांचे तुमच्याप्रती वागणे अवलंबून असते साहेब! पण हेली माझी नोकर नाही! माझी सहकर्मी आहे. तुम्ही तिचा इल्लीगल कामासाठी उपयोग केलात. मीही त्याचसाठी तिची मदत घेतो. पण आपण दोघेही तिच्याशी वागतो कसे हे ती जाणून आहे. शेवटी सेल्फरिस्पेक्ट तिलाही आहेच, नाही का?" इब्लिस धीरगंभीर बोलला.

"मला वाढीचार नकोय. तुला इथली घाण साफ करायची होती. माझं तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी तेच ध्येय होतं. म्हणून इथं बदली होऊन आल्यावर तुझ्यावर कारवाई न करता मी हेलीला तुझ्याशी हात मिळवणी करायला पाठवलं. पण त्याचे चांगलेच पांग फेडत आहात तुम्ही दोघं. माझ्या हुकुमाशिवाय तू कोणताही खून करणार नाहीस हे आपल्यात कबूल झालेलं. तरी तुम्ही माझ्या विरुद्ध जाऊन स्वतः निर्णय घेऊ लागलात!" हळूहळू एसपीचा पारा व त्या अनुषंगाने आता आवाजही चढत होता.

"तुम्ही परत आरोप करताय! मी पुन्हा सांगतो, आम्ही असं काही केलेलं नाही!" एसपी जेवढा धुमसत होता, इब्लिस तेवढाच शांत बोलत होता.

एसपी आरोप करतोय तो खून त्यानं केलाच नव्हता, तर त्याला चिडण्याची, आदळआपट करण्याची काही गरज नव्हती आणि त्याला तशी ती वाटतही नव्हती,

"मी कमांडर् शिवाय खून करत नाही! लक्षात घ्या!" इब्लिस आपली बाजू अधिक अधोरेखित करत बोलला.

"त्यानं काही सिद्ध होत नाही!" एसपी संतापत तावता,

"का? कमांडर् शिवाय तुझे हात चालत नाहीत खून करायला?" इब्लिसवर ठळक आरोप करत एसपी खेकसला.

याच्याशी बोलून काही फायदा नाही. आपल्याला याच्याशी जे बोलणं करायचं होतं ते देखील अशा वातावणात साध्य नाही म्हणून मग इब्लिस उठू लागला.

"तू पोलीस हेडकॉर्टर्समध्ये आहेस! तुला वाटतं तू जाऊ शकशील?" आता मात्र शांत होत एसपी त्याचं अधिकारक्षेत्र स्पष्ट करत होता.

इब्लिसनं मागून गन बाहेर काढली, जी त्याच्या कमांडरचीच डिझाईन होती. उभारलेल्या इब्लिसनं मग स्वतःला तसेच सोफ्यावर झोकून दिलं आणि

त्यानं गळ्यातली बुलेट चेंबरमध्ये भरली. पिस्टल लोड केली. स्लाईड क्लिक होताच इब्लिस गुर्मीत बोलला,

"मला कोणी अडवू शकत नाही एसपी! मी एकटा तुझ्या संपूर्ण हेडकॉर्टरला माझ्या या शिंगावर घेऊ शकतो!" इब्लिस हे बोलताना आपल्या मास्कच्या रक्तवर्णी शिंगावर पिस्टल नाचवत होता,

"आणि ते तुझ्या सगळ्या डिपार्टमेंटला पण माहीत आहे!" तो आपला मुद्दा स्पष्ट करत पुढे म्हणाला.

एसपीची नजर इब्लिसच्या हातातील पिस्टलवर रोखून होती. ते लक्षात घेऊन इब्लिस हसला,

"काय? आश्चर्य वाटतंय? ही माझ्याकडे कशी?" तो पुन्हा हसला,

"पॉलीफेनिलीन सल्फाईड् पासून बनलीये. हं! तुमचे मेटल डिटेक्टर याला डिटेक्ट करू शकत नाहीत! आणि मला हात लावून चेक करण्याची तुमच्या कुणाच्यात हिंमत नाही. माझी ओरिजिनल कमांडर् सापडल्यावर तुम्ही तशी तसदी पण घेणार नाही हे मला ठाऊक होतं. एट लिस्ट एक फायर यातून मी करूच शकतो."

मग इब्लिसनं एक दीर्घ श्वास घेतला आणि आपली पिस्टल असलेला हात गुडघ्यावर ठेवून तो आणखी पुढे सरला. दोन्ही हात त्याचे गुडघ्यांवर जमिनीकडे

झुकले होते. उजव्या हातात गन खाली पॉईंट करून होती. बोट देखील ट्रिगरपासून त्यानं अजूनही बाजूलाच ठेवले होते. याने तो हे दर्शवत होता, की तो अजूनही चर्चा करण्यात स्वारस्य ठेऊन होता. त्याला कोणत्याही प्रकारचा राडा नको होता आणि ना तो आत्मसमर्पण करायला आलेला होता!

"मला वाटतं, आता आपण नीट बोलू शकतो! काय?" इब्लिस धमकी वजा बोलला, पण फक्त एसपीचा तोरा कमी व्हावा एवढ्याच हेतूने.

"तर काय काम होतं तुमचं माझ्याकडे?" एसपी विषय बदलत बोलला. परंतु घाबरून नाही.

"माझा इनोसन्स मला आधी पृव्ह करू दे, मग बघू!" इब्लिस अजून शीत गुश्श्यात होता.

"त्याची गरज नाही. तू ही प्लास्टिक गन आणलीस तीही कमांडर्! यावरून मला पृव्ह झालं, तू कमांडर् शिवाय खून करणार नाहीस! तुझ्या कामाचं बोल!" गरम झालेलं वातावरण निवळण्यासाठी एसपी निर्मळ हसला.

"सो, विल यु स्पीक?" तो शांतपणे स्मित करत गप्प बसलेल्या इब्लिसला पुन्हा म्हणाला.

"तुम्ही दिलेली लास्ट असाईन्मेंट! त्याची माहिती हवीय! खरी!" मास्कमध्ये दडलेल्या चेहऱ्यावरची शिकन देखील न हलवता 'खरी' या शब्दावर जोर देत इब्लिस बोलला होता.

एसपी त्यावर हसला. म्हणाला,

"मी आजवर खरीच माहिती दिली आहे! तुम्ही त्याचा बॅकग्राऊंड का शोधताय ते सांगा!"

"एज पर् आवर् डिल, मी ते सांगण्यास बांधील नाही! मला त्याची अतिरिक्त माहिती मिळणार आहे, की नाही ते स्पष्ट करा!" इब्लिस कठोर बोलला.

यावर एसपी जाधवची मान हलली,

"हेलीकडे पोहोचती होईल. पण तुम्ही कायदा हातात घेणार नाही, मला कळवल्याशिवाय तर नाहीच नाही याचं वचन हवंय मला!"

"यावेळी ते जरा कठीण आहे! इंटेलची वाट पाहतोय!" म्हणत इब्लिसनं एसपीच्या परवानगीची वाट न पाहता केबिन सोडलं.

एसपीचं उत्तर ऐकायला देखील तो थांबला नव्हता, कारण त्यानं विनंती अशी केलीच नव्हती! तो एसपीला हुकूम सोडून बाहेर पडला होता!

इब्लिसच्या आदेशावर एसपीचं काही बोलण्यास उघडं राहिलेलं तोंड उघडंच राहिलं होतं. ते मिटवून मग तो आपल्याशीच हसला.

इब्लिस बाहेर पडत असताना सर्वच कर्मचारी हे आश्चर्य आणि भयाने आपापली कामं थांबवून हत्तीच्या डौलाने मदमस्त जाणाऱ्या व कोणालाही न जुमाणणाऱ्या बेफिकीर इब्लिसला पाहत होते.

प्रवेशद्वाराशी थांबून जे आता बाहेर जाण्याचं दार होतं, तिथं इब्लिसनं आपली कमांडर् ज्या सिक्योरिटी कॉन्स्टेबलने काढून घेतलेली त्याच्याकडून कलेक्ट केली आणि काही झालेच नाही आशा थाटात तो आपल्या कार मधून निघून गेला सुद्धा.

तो जाताच सर्वांचा श्वास मोकळा होऊन जीव भांड्यात पडला होता आणि सगळे हरकतीत येऊन भानावर येत आपापल्या कामाला लागले.

एकजण मग पळतच मागे गेला. हा तोच होता, ज्याने इब्लिस आल्याची वर्दी एसपीला दिली होती.

एसपी एव्हाना बाहेर आला होता. एसपीकडे जाऊ पाहणारा तो मग इसपीपाशीच थबकला होता.

"सर, तुम्ही याला सोडून दिलंत?" तो कळवळीने म्हणाला.

"ही इज क्लीन फॉर नाऊ!" एसपी गेलेल्या गाडीच्या ठिकाणी, तिथं आता काही नसून मोकळ्या जागेकडे पाहत म्हणाला.

"पण याने कमी गुन्हे केले नाहीत सर! हंड्रेड परसेंट किल रेट आहे याचा!" तो कर्तव्यनिष्ठ ऑफिसर कळकळला.

"पुरावे? आहेत आपल्याकडे?" एसपीने त्याला तीन शब्दांतच तोडला.

तो नाराज झाला. शहरातील किंबहुना देशातील सर्वांत मोठा गुन्हेगार स्वतःहून चालत आपल्या हेडकॉर्टर्सला आलेला आणि आपण काही करू शकलो नाही याची त्याला लाज वाटून गेली.

"बॉडी काऊंट करायला घ्या! शहरात मुडदे पडणार आहेत!" एसपी शांत धीरगंभीर उद्गारला.

"सर...?" तो ऑफिसरही असमंजस उद्गारता झाला.

"हा इथं आला, तो आपल्यासाठी इशारा होता! आता मोठं वादळ येणार आहे! आणि त्यात बरेचजण उखडून पडणार आहेत!"

"आणि हे जाणून, तरीही तुम्ही त्याला जाऊ दिलंत सर...?"

"नाराज होऊ नको शार्दूल! तो सिव्हीलीयन्सना त्रास देणार नाही याची मला खात्री आहे! म्हणूनच त्याला जे करायचंय ते करू देतोय! शहर स्वच्छ

ठेवायचं आपलं अत्याधिक काम आपल्याला काही करायला न लागता यामुळं साध्य होईल. शेवटी हा एकटाच राहील. याला आपण साफ करू!" आणि कुटील हसून त्यानं त्या कर्तव्यमूर्ती ऑफिसरकडे पाहिलं,

"काय?!" हसून एसपी शार्दूलला समजावत पुसलं.

"म्हणजे कायदा आणि सुव्यवस्थेला..." शार्दूल प्रतिवाद करताना त्याला एसपीकडून मध्येच अडवलं गेलं.

"आपण धक्का लावत नाही!" एसपी कुत्सित हसला. पुढे म्हणाला,

"आपण इब्लिससह यांना आत्ता आत घेतलं, तर मानवतेच्या व समतेच्या मुल्यांच्या आधारे गुन्हेगारांनाही हक्क बहाल करून कायद्याच्या तरतूदींनुसार गुन्हेगारांप्रती देखील कायद्याने दाखवलेल्या करुणेची सूट मिळवून हे बाकीचे गुन्हेगार निसटून जातील. इब्लिसच्या मार्फत आधी त्यांचा समाचार घेऊ. आणि मग आहोतच, आपण आणि हा इब्लिस!" राजनने आपली भूमिका स्पष्ट केली आणि आत हेडकॉर्टर्समध्ये निवांत निघून गेला.

शार्दूल मात्र एसपी राजन जाधवच्या या योजनेनं अधिकच चिंतेच्या गर्तेत बुडाला. कारण हे कायद्याच्या आचारसंहिता व नीतीशास्त्राला धरून नव्हते. त्यामुळं इब्लिसपेक्षा तर त्याला आता एसपी राजन जाधवचीच अधिक भीती वाटून गेली. राजनच्या कुटील हसण्यानं तो तणावत गेला होता...

◆◆◆

आजही हेली त्याच झाडाच्या साक्षीनं रात्री बारा-साडेबाराच्या सुमारास उभी होती. साहजिक ती दानिशच्याच प्रतीक्षेत तिष्ठत होती. आपल्याला इथं असं कोणी बघेल ही विवंचना, काळजी तिच्या तोंडावर स्पष्ट होती. सतत न राहवून मनगटी घड्याळात तिचं लक्ष जात होतं आणि अनावधानानेच वैतागी हताशोद्गार तिच्या तोंडून निघत होते.

'अजून किती वेळ लावणार आहे हा?' असा विचार तिच्या डोक्यात चमकून गेला.

काही वेळ असाच निघून गेल्यावर मात्र दानिशची गाडी दुरून पांढरा धूर ओकत येताना दृष्टिगोचर झाली. तशी तिची अस्वस्थता थोडी दूर झाली, पण तिची जागा आता रागाने घेतली. गाडी जोराने येऊन तिच्या समोर थांबली असता आपला राग दानिशवर पाखडावा व असंख्य अपशब्दांचा त्याच्यावर भडिमार करावा म्हणून गाडीची काच खाली येताच हेलीनं तोंड उघडले, परंतु तिच्या तोंडून काही शब्द बाहेर पडणार त्यापूर्वीच...

"तुझ्या कमांडरला सांग, त्या लोकांपासून दूर रहायला! नाही तर फुकाफूकी जीव घालवून बसेल!" असं दानिश अत्यंत गंभीर खोल स्वरात म्हणाला.

"म्हणजे? ते आहेत कोण? आणि..." तिचं बोलणं पूर्ण होण्यापूर्वीच दानिशच्या गाडीची काच वर गेली होती.

तो न बोलता गाडी अतीव वेगाने घुमवत निघून गेला. हेली मात्र तिथं असंदिग्ध अशी गोंधळल्यासारखी उभी राहिली. आपली वाट धरण्याची देखील तिला काही क्षण सूद राहिली नाही. तिचं मन, तिचे विचार आता इब्लिसच्या काळजीने अधिकच व्यापून गेले.

ज्याला उत्तरं शोधायला पाठवलं होतं, तोच येऊन तिला त्याहून मोठं कोडं घालून गेला होता...

दानिश जे बोलला, त्यावरून त्याला इब्लिसला हवी असणारी माहिती मिळाली आहे हे हेलीला समजलं होतं, परंतु तो तिला ती माहिती देणार नव्हता हे देखील तिला उमगलं होतं. ज्याला कोडं सोडवायला पाचारण केलं होतं, तो ते कोडं अगदीच गडद करून गेला होता...

प्रश्न तसाच उरला होता, किंबहुना काही भयावह प्रश्नांची अधिक भर पडली होती...

विचारात आणि काळजी मनात दाटून घेऊन ती हलली. तिचे पाय तिला खेचून घेत होते. पण ती अनावधानाने का होईना, कुठे जाणार हे ठरलेलं होतं. रात्रीची वेळ होती. तिला घरी जाणं भाग होतं. घरात आणखी एक जबाबदारी जी तिच्यावर होती...

# ४. आत्मीय...

अंधार गर्भात दडलेली एक चारचाकी तिच्या मागून मार्गरत होत होती हे तिच्या ध्यानी नव्हतं.

दानिशची भरधाव गाडी देखील काहीशे मीटर अंतरावर त्याला थांबवावी लागली होती. आणखी एक चारचाकी वेगाने येऊन त्याला आडवी झाली होती.

हा प्रसंग आणि त्या समोरच्या गाडीतील थंड भेदक नजर त्याच्यावर रोखली गेली होती, त्यानं तो पुरता गोंधळला होता. तशी जीवघेणी नजर दानिशवर रोखून गाडीतील व्यक्ती सिगार शिलगावू लागली आणि त्या माणसाची गाडी एकाच भपकाऱ्यानं धुरानं भरली.

इकडे दानिशच्या चेहऱ्यावर मात्र मरणप्राय भीती दाटून गेली होती. बाहेर रात्रीचा थंड गारवा सुटला असला, तरी त्याचं मुखमंडल घर्मबिंदूनी झाकोळून गेलं होतं. तो बसल्याजागी थिजल्यासारखा झाला. मृत्यू त्याला समोर दिसत होता. गम्य अशा गडद अंधार, धूरातून काळदूतच ग्रास घेण्यास समोर येऊन ठेपला आहे हे त्याला जाणवून गेलं आणि यामुळंच दानिश जागीच अर्धमेला अजड झाला होता...

बाहेर चहूबाजुंनी त्या माणसाच्या पिल्लावळींनी दानिशच्या दिशेनं आक्रमण केलं...

●●●

काही अगणित क्षणांच्या अवकाशाने दानिशचे अर्धशुद्ध डोळे उघडले ते कोणत्या तरी अंधार खोलीत.

खोलीतील वस्तुस्थिती व परिस्थितीचा अंदाज येईल इतकाच काय तो प्रकाश कुठून तरी खोलीत डोकावत होता. काही क्षण आपल्याला कोणीतरी जखडून ठेवलं आहे असा त्याला भास झाला. बहुदा त्याला पकडतेवेळी कोणत्या तरी बेशुद्ध करणाऱ्या पदार्थाचा प्रयोग त्याच्यावर केला असावा व त्याच्या अंमलातून त्याचा मेंदू त्याच्याशी भ्रमाचा खेळ करत असावा.

कदाचित आपल्याला बांधून ठेवलं आहे का? असं त्याला वाटलं म्हणून त्यानं हलून पाहिलं, तर आपल्याला एका कोचावर नुसतंच बसवण्यात आलं आहे हे त्याच्या ध्यानी आलं. समोर काही हालचाल भासली म्हणून दानिशनं वर पाहिलं, तर आडवी गाडी घातलेली ती व्यक्ती सिगार ओढत समोरून येत थांबलेली त्याला दिसली. आता जवळून पाहिल्यावर मग त्याला हा चेहरा ओळखीचा वाटला. बेशुद्धावस्थेत असलेले त्याचे डोळे आता चांगलेच विस्तारले. अमली पदार्थाच्या अमलाखाली असून या माणसाला नक्की कुठं पाहिलं आहे ते त्याला लख्ख आठवलं...

●●●

जोनाथनची माहिती काढण्यासाठीच्या कामावर हेलीनं त्याला लावलं होतं. तो त्याच कामी गुंतला होता. सदर व्यक्तीची इत्मंभूत माहिती त्याला कुठं

मिळेल याची त्याला पूर्ण कल्पना होती आणि त्याचनुसार तो एका बारला येऊन स्थिरावला होता. आपलं इथं येणं अगदी साहजिक वाटावं असं तो वागत होता.

त्याचं आवडीचं कॉकटेल मागवून ते आल्यावर तोंडात घोळवत तो तिथल्या गोंगाटात बसून राहिला. ज्याच्याकडून माहिती मिळवायची होती, तो बार टेंडर अजून आला नव्हता. अशी जोखमीची कामं विश्वासाच्या माणसांवर विसंबूनच पार पडायची असतात हे तो जाणून होता.

तास-दोन तासाने शिफ्ट बदलली. दानिशचा भरवशाचा बार टेंडर काऊंटरवर आला. दानिशला पाहून तो समजून चुकला, की आता काही तरी आफत येणार. दानिश कधी साधं काम घेऊन येत नाही. पण त्याला अंदाज होता त्याहीपेक्षा आत्ताचं काम हे अगणित पटीने जोखमीचं होतं हे मात्र त्याला ताडता आलं नव्हतं.

दोघं थेट न बोलता त्यांची त्यांचीच इशाऱ्याची, सांकेतिक भाषा चालू झाली होती. दोघे एकमेकांना ओळखतात हे इतर कोणी ओळखू नये म्हणून ही त्यांची दक्षता!

पहिल्या नंतर खूप वेळाने आता आणखी एक ड्रिंक मागवल्यावर ते त्याच्यासमोर ठेवताच दानिश त्याच्या मोबाईलवरचे फोटो स्वाईप करू लागला.

जीवावरची कामं करताना जास्ती घेऊ नये हा त्याचा नियम. उगाच बसलोय असं कुणास वाटू नये अगर कसला संशय येऊ नये म्हणून त्यानं थोडी घेतली होती.

जोनाथनचा फोटो आल्यावर त्याच्यावर डबल टॅप करून थोडावेळ थांबून त्यानं पुढचा फोटो स्लाईड केला. या कृतीचा अर्थ बार टेंडर समजला होता. ज्या

फोटोवर डबल टॅप झालं व फोटो तोंडावर झूम झाला, त्याची माहिती दानिश विचारत आहे हे त्याला कळलं.

दुसऱ्याक्षणी दानिशनं आपला मोबाईल खिशात टाकून दिला आणि समोर ठेवलं गेलेलं ड्रिंक तोंडाला लावलं. कॉकटेलचा शौकीन असणारा आणि इतर वेळी इच्छा झाल्यास ते पाण्यासारखे घटघट पिऊन बेधुंद होणारा दानिश यावेळी महत्त्वाच्या कामगिरीवर असल्यानं मोजून मापून आणि मुखत्वे कोणाला संशय येऊ नये म्हणूनच ड्रिंक घेऊन होता.

ग्लास तोंडाला असतानाच बार टेंडरने बिलाचं चिटोर दानिश समोर सारलं.

"जास्ती झालीये. मला वाटतं, आता तुम्ही थांबावं!" तो दानिशला म्हणाला.

दानिश त्याच्या नजरेत नजर गाडून होता. बार टेंडर आपल्याला धोक्याची सूचना देत आहे हे तो समजला. म्हणूनच बार टेंडरच्या हाताची हालचाल होताच दानिशने त्या बिलाकडे झटकन पाहिलं.

त्यावर फक्त पैशांचा आकडा नाही, तर एक चिन्ह देखील अंकित होतं.

'एक सर्कल व त्यात पायाची उंचावलेली टाच व त्या टाचेत घुसलेलं बाणांचं टोक.'

असं हे चिन्ह पाहिलं आणि त्याची त्याला या प्रकरणामागे कोण आहे याची पुरती ओळख पटली.

'अखिलीस!' तो सनायासेच दहशतीत बुदबुदला.

ते एका बिझनेस एम्पायरचं असलेलं चिन्ह पाहून दानिशच्या चेहऱ्याचा रंगच उडाला.

'अखिलीस हिल' म्हणजे अखिलीसची टाच! ग्रीक दंतकथेनुसार त्यातील अभेद्य अखिलीसची टाच हा त्याचा सर्वांत कमजोर अवयव. त्याच्या असामर्थ्याचं हे बोधचिन्ह, प्रतीक रूपाने वापरून 'या' अखिलीसनं आपलं सामर्थ्यशाली साम्राज्य उभा केलं होतं. यातूनच त्याचा प्रचंड आत्मविश्वास दिसून येत होता. त्याच्या या आत्मविश्वासालाच सगळे धास्तावलेले असायचे.

हा फक्त व्हाइट कॉलर बिझनेस एम्पपायर नव्हता. वर्ल्ड् क्राईममध्ये खोलवर पाळंमूळं रुतलेलं ते क्रिमिनल एम्पायर सुद्धा होतं. हे माहिती असल्यानं ते चिन्ह पाहताच दानिशची भीतीने गाळण उडाली.

आपण चुकीच्या फाटक्यात पाय घालतोय ते तोही समजून चुकला. एका घोटात मग सगळा ग्लास रिता करून तो बिल पे करून सुट्ट्याची परवा व अपेक्षाही न करता तिथून उठला.

त्याला सत्य पचवायला त्या ड्रिंकची आवश्यकताच होती. नाहीतर जिवापेक्षा त्याला ते ड्रिंक प्रिय कधीच नव्हतं.

बार टेंडरकडे तो ज्या कामासाठी आला होता, ते झालेलं असून त्या कामाचा मोबदला देण्याचंही मनी न येता तो लगोलग तिथून बाहेर पडला.

बार टेंडरनेही टीपची आशा ठेवली नव्हती. या माहितीसाठी टीप घेणं म्हणजे आपल्याच ताबूतची आपणच खीळ ठोकणं होतं हे तो समजून होता.

जाताना 'तो' माणूस दानिशला सामोरा झाला होता. हडबडीत दानिश त्याच्यावर आदळला होता. त्या माणसाने दानिशला घट्ट पकडलं होतं. आणि तो त्याच्या डोळ्यांत तीव्र खोल रोखून पाहत होता, जणू त्याचा आत्मा तो घुसळून

काढतोय वा शोषून घेतोय. मग सावरत, स्वतःला त्या माणसाकडून सोडवून घेत दानिशने तो बार सोडला.

दानिशने मोबदला न दिल्याचं बार टेंडरला देखील काही वाटलं नाही. कारण या कामाचे पैसे घेणं म्हणजे त्याच्यासाठी फासच होता.

बिलाचं ते कपटं नष्ट करण्यासाठी उचलत असतानाच 'तो' माणूस त्या बिलावर हात ठेवता झाला. एक पाशवी स्मित त्याच्या ओठांवर रेखलं गेलं. त्याचं हे हसू बार टेंडरला धडकी भरवून गेलं.

त्या व्यक्तीने ते बिल पाहिलं. बिलावरील ते चिन्ह पाहून त्याचं राक्षसी हसू अगदीच रुंदावलं. चिटोरावरची नजर पापणीही न लावता खालून वर बार टेंडरवर फिरली. आणि बार टेंडर मेल्यासारखा झाला. परंतु त्याला काही न बोलता तो माणूस बाहेरच्या दिशेने गेला. तरी बार टेंडरची भीती मालवली नव्हती. पुढे आपलं काय होणार हे तो उमजून होता...

●●●

बारमध्ये समोर आलेला आणि नंतर गाडी आडवी घातलेला 'तो' माणूस दानिश समोर उभा होता. तीच धगधगती नजर घेऊन आणि ओठांवर तेच कुत्सित बेरकी स्मित घेऊन पापणीही न लावता तो दानिशकडे पाहतच आपले काळे लेदर ग्लव्ह्ज हाती चढवत होता.

दानिश सुद्धा आपली जगण्याची आशा क्षणाक्षणाला सोडत चालला होता. त्याच्या छातीचा भाता झाला होता. त्याला मारायचं असतं, तर तिथेच

रस्त्यावर मारलं असतं ही साधी गोष्ट भीतीमुळे त्याच्या लक्षात आली नव्हती. पुढे जी कृती चालली होती, ती त्याला भीती दाखवण्यासाठी होती फक्त. का... नव्हती?!

'त्या' भारदस्त माणसापाशी आणखीन एक माणूस जो त्याचा हस्तक होता, तो एक पॉलिश्ड् लाकडी बॉक्स घेऊन त्या माणसाच्या शेजारी येऊन अदबीने नमून उभारला.

हस्तकाकडं वळून त्या शांत डोक्याच्या माणसानं त्या लाकडी पेटीची लॉक्स उघडली. त्या भयाण खोलीत एवढी शांतता होती, की त्या दोन लॉक्सचा धडकी भरवेल असा मोठा आवाज झाला. कोचवरचा घामात भिजलेला दानिश तर दचक्याने उडालाच होता. घामाने निथळणारा चेहरा पुसण्याचे भानही त्याला राहिले नव्हते. ते घर्मबिंदू भुवया व पापण्यांतून वाट काढत त्याच्या डोळ्यांत खुपत होत्या. त्याची नजर घाम भरल्याने धूसर होत चालली. पण घाबरून घट्ट झालेल्या दानिशच्या डोळ्यांची उघडझाक होत नव्हती.

पेटी आतून लाल वेलवेटच्या आच्छादनानं सुशोभित केली होती आणि मधोमध बनवलेल्या खाचित एक '1911' तिच्या भरलेल्या मॅग्झिन सोबत ठेवली होती. गोल्डन कार्व्हिंग असलेली ती कोल्ट '1911' सेमी ऑटोमॅटिक पिस्टल अत्यंत सूंदर दिसत होती. आणि आता हीच सुंदरी दानिशला घायाळ करून त्याचा जीव घेणार होती! त्यासाठी ती सज्ज होत होती.

"तुला जी माहिती हवी होती, ती तुला मिळाली; आता मला जी माहिती हवी, ती मला द्यावीस अशी विनंती करतो." 1911 हाती घेत त्यात मॅग्झिन लोड करीत तो माणूस शांत पण जड आवाजात बोलत होता,

"वाटलं; तुझा काही उपयोग होईल म्हणून तुला घेऊन आलो. निरुपयोगी वस्तू साठवण्याचा माझा छंद नाही!"

भीतीने गाळण उडालेला दानिश दगडासारखा जड झाला होता. त्याला काही बोलायचं असतं, तरी तो बोलू शकला नसता. पण त्याचा निर्धार हा होता, की उसूल तोडायचा नाही. मेलो तरी बेहत्तर! सो; तो काही तसा बोलणार नव्हताच.

"नेव्हर् माईंड! विल फाईंड आऊट समहाऊ!" असं शांतपणे म्हणत त्यानं ट्रिगर दाबला.

समोर दानिश चिरशांत निद्रेत निजता झाला. गोळी त्याच्या मस्तकाची शकलं करून गेली होती!

"बार टेंडरला मार्गी लावा! भेदी वेळीच ठेचावा!" पिस्टल पेटीत ठेवून त्यानं ती बंद केली आणि आपले ग्लव्ह्ज काढत त्या पेटीवर एकवर एक ठेवत ती धरून उभ्या हस्तकाला 'तो' माणूस बोलला होता!

हस्तकाची भीतीने मान होकारार्थी हलली फक्त.

"आणि एक! किंगपीनला याबद्दल काही कळू देऊ नका. चिडतील ते." त्यानं त्याची भेदक नजर हस्तकावर तीव्र केली.

हस्तक भीतच मानेनं 'नाही... नाही...' म्हणत मागं सरकत गेला...

◆◆◆

खूप अंतराचा पायी प्रवास करून हेली आपल्या घराजवळ पोहोचली होती. कोणाला आपल्या घराचा पत्ता कळू नये म्हणून तिनं रिक्षा, कॅब वगैरे करणं

टाळलं होतं. चालताना देखील ती दक्षता पाळून होती, की कोणी आपला पाठलाग करू नये.

एक गाडी मात्र तिच्यापासून अंतर राखून हळू हळू चालण्याची कसरत करत तिचा माग काढत होती. एखादं वळण आलं, किंवा मग एखादा गल्लीबोळ आला, की ती गाडी तिथे गायब व्हायची आणि हेली चालत असलेल्या रस्त्याला मिळणाऱ्या रस्त्याचा अंदाज घेऊन पुन्हा त्या रस्त्याला लागत होती. हेलीला तिचा पाठलाग होतोय हे समजू नये म्हणून त्या गाडीतील चालक देखील पुरेपूर काळजी घेत होता हे साधारण होतं.

तरीही ही एकच गाडी आपल्या पुढे मागे करत आहे हे न समजण्याइतकी हेली निष्काळजी वा निर्बुद्ध नव्हती. पण दानिशने दिलेल्या धोक्याच्या इशाऱ्याने ती त्या काळजीच्या गर्तेत गुंगून गेली होती. ती त्या अवस्थेतही घरापर्यंत पोहोचली, कारण रस्ता तिच्या पायांच्या सवयीचा होता म्हणूनच.

ती गेट उघडून आत गेली. तिच्या घरापाशी जवळपास अशी कोणतीच स्ट्रीट लाईट वगैरे नव्हती. चंद्राचाच काय तो प्रकाश व्हरांड्यात लावलेल्या झाडाझुडपांतून डोकावत होता.

ती मेन डोअरला पोहोचणार इतक्यात एक इसम झाडांतून बाहेर आला. ती प्राणांतिक दचकलीच! दानिशच्या चेतावणीचा विचार भुंग्याप्रमाणे डोक्यात घोंगावत असल्यानं आणि असं अचानक कोणी समोर आल्याने ती दचकली होती, पण घाबरली नक्कीच नव्हती.

बाहेर जी तिचा पाठलाग करत होती ती, आधीच हळू असणारी गाडी घराजवळ जरा अधिकच हळू झाली... परंतु स्थिरावली नक्कीच नाही.

दचकलेल्या हेलीनं चपळाईने आपल्या पर्स मधून 'कोल्ट कमांडर' बाहेर उपसली होती आणि ती समोरच्या व्यक्तीवर ताणली देखील होती. शेवटी हेलीच ती; कितीही विचलित झाली, तरी आपला स्थायी निधडा स्वभाव थोडीच विसरणार होती?!

"ओळखलं? की विसरून गेलीस?" ती व्यक्ती बचवाच्या पवित्र्यात आलेल्या हेलीला म्हणाली.

आणि डोक्यावर असलेली हुडी त्या व्यक्तीने बाजूला केली. बाहेर हलकेच अशी घोंगावणारी गाडी मग वेग वाढवत तेथून पसार झाली.

हेली समोर ओळखीचा चेहरा पाहून स्थिरावली. तिचा बंदूक रोखलेला हात थोडा खाली झाला.

"न ओळखायला काय झालंय?" ती जरा ठसक्यातच बोलली,

"तुझं टोपडं काढायला जरा उशीर केला असतास, तर इथंच मरून पडला असतास!"

"गन माझ्याकडेही आहे." एक हात हुडीच्या खिशात असलेला तो उजव्या हाती गन घेऊनच उभा होता, अगदी पहिल्यापासून. पण त्याच्या बंदुकीची नळी ही जमिनीच्या दिशेने होती. ना की हेलीनं त्याच्यावर रोखल्यासारखी तिच्यावर रोखलेली.

"हो; पण तुला आदेशाची गरज आहे. मला नाही; शार्दूल!" हेली धाडसी स्वरात नजर बारीक करून बोलली.

"ही बंधनंच आम्हाला माणूस बनून राहण्यास मदत करतात!" आपली दुखरी नस हेली दाबू पाहत आहे असं काहीसं त्याला वाटलं असावं. म्हणून त्यानं

बचाव केला, तो लंगडा बचाव नक्कीच नव्हता. वर्दी अंगावर चढवताना घेतलेली वचनं व नियम त्याला आदरवत होते.

मात्र नियम कायद्यांचं पालन करणाऱ्या शार्दूलला सर्वच एक दुबळा व्यक्ती म्हणून पाहत होते आणि म्हणूनच तिचं हे बोलणं त्याला लागून गेलं होतं.

पण त्याची हेटाळणी करणारी लोकं हे समजू शकत नव्हती, की शार्दूल हाच सर्वांत अधिक कणखर व्यक्ती आहे, कारण कितीही बिकट परिस्थिती समोर आली, तरी आपला तोल तो ढळू देत नाही. आपली ध्येयं साध्य करायला तो कधीच सत्य-तत्त्वांना मुरड घालत नाही. कर्तव्य-वचनाला अबाधित ठेवण्यासाठी जे योग्य तेच तो करतो. ही मजबुती कदाचित फोर्स मधील कोणाच्यात नव्हती. आणि तेच लोकं शार्दूलला कमी लेखत होती. बहुदा त्यांना शार्दूलची असूया वाटत असावी, की आपण इतके तकलादू आहोत, की आपण लगेच दूषित होतो, पण हा मात्र चिखलातील कमळाप्रमाणे सर्व गुणदोषांपासून अछुता राहतो. आणि म्हणूनच कदाचित ते त्याला पाण्यात पाहत असावेत...

हेलीनं देखील पोलिसांसोबत काही काळ घालवला होता. आणि ती देखील आपल्यालाकडे त्याच खालच्या नजरेने पाहते असं वाटून शार्दूल दुखावला गेला होता. अशातही त्याच्या स्वभावानुसार त्यानं ती भावना त्याच्या कामाच्या आड न येऊ देता तो न ढळता तिच्या समोर स्थितप्रज्ञाप्रमाणे उभा होता.

"हो बरोबर आहे! कारण आम्ही तुझ्यासारख्या आस्था बदलत नाही!" तो तोंडावर निश्चल भाव ठेवूनच जरा कठोर बोलला.

हेलीनं पोलिसांना सोडून इब्लिसशी हात मिळवणी केली होती आणि ती आपल्याला योग्यायोग्य शिकवते आहे हा डिस्गस्ट त्याच्या उच्चारात स्पष्ट होता.

"आपण एकच काम करतोय. आपले मार्ग भिन्न असले, तरी! गुन्हेगारी संपवण्यासाठी मला इब्लिसचा मार्ग योग्य वाटला. तुला कायद्याचा योग्य वाटतो. पण आपण काम एकच करतोय!" हेली त्याला शांत स्वरात म्हणाली.

"डोन्ट कंपेअर् युअर् कमांडर् विथ दि रिस्पेक्टेड् लॉ!" तो तिरस्काराने ओरडला,

"यु मे थिंक हिम एज ए अल्टरनेटिव्ह टू द लॉ, बट ही इज नॉट इव्हन क्लोज टू दि रायटीयसनेस! ही इज नॉट दि जस्टीस!" त्याच्या स्वरात अधिकच तिरस्कार भरला.

"मान्य! पण घाण साफ करायला घाणीत हात बरबटावेच लागतात!" हेली आपल्या मतावर तटस्थ होती.

"स्टॉप! आपलं कधीच पटायचं नाही. शिवाय मी इथं तुला जाब विचारायला, तुझी मतं बदलायला अगर युक्तिवाद करायला आलो नाही! काही उत्तरं हवी आहेत! ती मिळालीत, की जाईन!" त्यानं सर्विस पिस्टलचा हॅमर पूर्ववत करत पिस्टल डीकॉक केली.

"बोल!" आपली देखील कमांडर पर्समध्ये टाकत तिनं माहिती देण्यास संमती दर्शवली.

"तुझ्या कमांडरचं आणि एसपीचं काय चालू आहे?" शार्दूल कडून पहिला प्रश्न.

"नथिंग. दे आर जस्ट क्लिनिंग द सिटी." हेलीकडून पहिल्या प्रश्नाचं उत्तर.

"आय डाऊट! दे आर जस्ट क्रिएटिंग मेस!" तो ठाम म्हणाला.

"आणि तू म्हणतोयस तुला युक्तिवाद करायचा नाही!" ती उपहासाने हसली.

"गुन्हेगारीशीच लढायचं होतं, तर फोर्स का सोडलीस?" तिचा उपहास उडवून लावत शार्दूलने प्रश्न केला.

"कारण इब्लिस हा एसपीपेक्षा ट्रस्टवर्दी आहे!" तिनं तिची भूमिका स्पष्ट केली.

"तू स्वतःच स्वतःला कॉन्ट्राडिक्ट करतीएस!" तो हसून म्हणाला.

हेली काही बोलण्यास तोंड उघडणार इतक्यात तोच पुढे बोलला,

"आणि तरी तुला विश्वास आहे, की एसपी सर हे शहर गुन्हेमुक्त करतील?!" त्यानं प्रश्न केला व पुढे बोलला,

"जो माणूस कायद्याचा रक्षक असून कायदे मोडतो. शहरातील किंबहुना देशातील सर्वांत मोठा गुन्हेगार असणाऱ्या इब्लिसशी हातमिळवणी करतो, त्याच्याकडून काय अपेक्षा करतेस?" त्यानं हेलीचं मनमस्तिष्क टतोलण्याचा प्रयत्न करण्यास विचारणा केली.

"इल्बिसशी तर मीही हातमिळवणी केली आहे. तर मग तुझ्या नजरेत मीही वाईटच असेन. नाही?! असो, एसपीच्या हेतूबद्दल मला कधीच शंका नाही, पण तो कधीही, कोणाचाही गळा कापू शकतो आपलं काम काढून घेतल्यावर. हेही तितकंच खरं आहे. आणि म्हणून मला तो विश्वासपात्र वाटत नाही. इतकंच! आणि मला वाटतं हे तुही जाणून आहेस. आणि म्हणूनच माझ्यासमोर उभा आहेस उत्तरं जाणून घ्यायला!" तिनं आपला दृष्टिकोन स्पष्ट केला व त्याला म्हणाली,

"मला वाटतं आपल्या सर्वांच्या हेतूबद्दल आणि आचरणाबद्दल चर्चा पुरे. तुझं काम बोल आणि निघ!" ती स्पष्टच बोलली.

"फाईन! इब्लिसचं असं हेडकॉर्टर्सला येण्याचं कारण?" दुसरा प्रश्न.

"जोनाथन नांवाच्या एका कॉन्ट्रॅक्ट किलरची त्याला माहिती हवी आहे..." हेलीनं केलेलं निरसन.

"आता तो जोनाथनची माहिती का काढतोय? त्याचा खून त्यानंच केला ना?" तिसरा प्रश्न.

"हो. तेही एसपीच्या सांगण्यावरूनच. पण तो जोनाथनचा इतिहास का जाणून घेऊ इच्छितो हे मलाही माहीत नाही. जशी तुमची तत्त्वं आहेत, तशी आमचीही आहेत. आम्ही एकमेकांच्या खाजगी आयुष्यात दखल देत नाही!" तिनं तिसऱ्या प्रश्नाचंही निखालस उत्तर दिलं.

"म्हणजे इब्लिस कसा दिसतो हेही तुला माहीत नसेल?" त्यानं डोळे बारीक केले.

हेली खोटं बोलतीये अशी त्याला शंका होती.

"नाही!" ती खरं बोलली.

"तरी तू त्याच्यावर विश्वास ठेवतेस!" त्याचे डोळे अविश्वासाने अजूनच बारीक झाले.

"हो! माणूस विश्वासाचा आहे, की नाही हे समजून घ्यायला चेहरा पाहण्याची आवश्यकता नाही. त्याच्या वर्तनावरून ते समजतं." तिनं त्याचा अविश्वास मोडीत काढला.

"म्हणजे त्याच्या वैयक्तिक आयुष्याबद्दलही तुला काही माहीत नसेल?" त्यानं वेगळ्या प्रकारे विचारलं.

"नक्कीच नाही! ना त्याला माझ्याबद्दल माहीत आहे!" तिनं अधोरेखित केलं.

"जोनाथन नंतर त्यानं कुणाला मारलंय?" त्याचा चौथा प्रश्न.

"तुझा रोख समजतोय. पण एसपी प्रमाणे तुला पण भ्रम झालाय. इब्लिस आणि एसपीत झालेल्या मौखिक करारानुसार इब्लिस एसपीने सांगितल्याशिवाय कोणालाही मारत नाही. तो करार माझ्या माध्यमातूनच झाला आहे आणि आता इब्लिस सोबत काम करत असताना त्याची क्रिमिनल्स संदर्भातील कोणतीच कृती माझ्या दृष्टीआड रहात नाही म्हणून मी हे साक्षीने सांगू शकते!" शार्दूलच्या मुख्य चौथ्या प्रश्नाला हेलीचं चौथं उत्तर.

"आणि त्या आधी?" डोळे बेरकी करत शार्दूलनं पृच्छा केली.

"असेल. पण आत्ता तो स्वतःहून काही पावलं उचलत नाही!" ती आवाज करडा करत म्हणाली.

"इथून पुढे? त्याची हमी देऊ शकतेस?" शार्दूलनं कठोरपणे विचारलं.

ती गप्पच राहिली.

"नाही ना उत्तर? ज्या अर्थी तो मेलेल्या जोनाथनची माहिती काढतोय, त्यार्थी  हे त्याच्यासाठी पर्सनल आहे हे यावरूनच स्पष्ट होतंय. तो कसल्यातरी विचारात आहे. त्यासाठी त्याचे लगाम तो तोडून टाकण्याची तयारी करतोय!" शार्दूलनं शंका बोलून दाखवली,

"आणि असं झालं, तर त्याला कोणीही आळा घालू शकणार नाही हे तुही जाणतेस!" त्यानं शंका पूर्ण केली.

"मी खरं सांगते, मला काही माहीत नाही! इथं तू एकटाच कायद्याचं पालन करत कायद्याचं रक्षण करणारा माणूस आहेस. तुला ठाऊक आहे याचसाठी मी तुझा रिस्पेक्ट करते. तुझ्याशी मी खोटं नाही बोलणार!" ती कंविन्सिंग्ली कळकळीने बोलली.

मग तो थांबला नाही. तिला लांघून तो गेटकडे निघाला. ती त्याच्याकडं वळली.

"खूप दिवसांनी बोललो. बरं वाटलं." ती त्याला म्हणाली,

"आशा आहे आपल्यातली मैत्री आणि आदर कायम राहील." तिनं मनीषा व्यक्त केली.

"ते तुझ्या वागण्यावर अवलंबून आहे!" तो म्हणाला आणि हुडी डोक्यावर टाकून त्यानं तिचा व्हरांडा मोकळा केला.

"मला माहित आहे तुम्ही सगळे माझा तिरस्कार करता, पण माझीही काही बाजू आहे. जी मी स्पष्ट करू शकत नाही! सॉरी शार्दूल. मी माझे मित्रच काय, पण माझी डिग्निटी देखील पणाला लावायला तयार आहे, पण गुन्हेगारांना सूट नाही! त्यासाठीच मी इब्लिस सोबत आहे. मग भले कोणी मला चुकीचं समजो!" ती स्वतःशीच पुटपुटली आणि लॉक खोलून आत निघून गेली.

# ५. धांडोळा...

अखिलीसची मांदियाळी बसली होती. आणि त्याच्या सोबत होता, तो ज्याने दानिशला मृत्यूच्या वाटेवर मार्गस्थ केलं होतं.

एक इसम त्यांच्या समोर कोर्टात उभा रहावा तसा उभा होता, जणू त्याची सुनावणी केली जाणार होती. त्यानं घोळ केला होता हे त्याच्या विचलित व घाबरलेल्या चेहऱ्यावर स्पष्ट होतं आणि आपल्या हुकुमांना आपली ही चूक रास येणार नाही हे तो ओळखून होता. म्हणून तो जास्तच भ्यायला होता.

"काम झालं?" दानिशच्या किलरने त्या इसमास विचारलं.

"न... नाही बॉस..." हेलीच्या मागावर असलेला तो जडवलेल्या जिभेने बोलला.

"कारण समजू शकेल?" अखिलीस मधेच बोलला.

"माफ करा किंगपीन, तिथं क्राईम ब्रँचचा सिनियर इन्स्पेक्टर उपटला." तो इसम अखिलीसला बिचकत उत्तरला.

"त्या मुलीबद्दल काही माहिती?" दानिशच्या खुनीने तीक्ष्ण प्रश्न केला.

"काढता नाही आली. पण बॉस, मी घर हेरून ठेवलंय." टरकलेला तो आशेच्या नजरेने व उमेदीच्या आवाजाने बोलून गेला. किंबहुना आपल्याला एक संधी मिळेल ही आशा होती त्याला, ती पूर्णही झाली.

"लास्ट चान्स! पुन्हा अयशस्वी झालास, तर समजून जा! यु मे गो!" भिवया उडवत थंड नजर रोवून दानिशचा खुनी त्या इसमास बोलला.

काम पूर्ण न करू शकलेल्या त्याला याने मारलाच असता, पण अखिलीसला वचकून असलेला हा तो बाजूला असताना असं वागू शकत नव्हता म्हणून त्याने ही दर्यादिली दाखवली होती.

तसा एका मोठ्या ओझ्याखालून सूटल्यासारखा पुढे हात बांधलेला हेलीचा स्टॉकर अदबीने पण लगबगीने झुकत बाहेर सरला.

तो ज्या चौकटीतून बाहेर गेला त्याच चौकटीतून अखिलीसचे दोन हस्तक त्या बार टेंडरला आत घेऊन आले.

"याला इथं का आणलंय? मी याला मारून टाकायला सांगितलं होतं ना?" आवाजात हुकमी जरब आणत तो खुनी इसम खेकसला.

"याची शेवटची इच्छा होती बॉसला भेटायची म्हणून..." एक हस्तक, ज्याला दानिशच्या खुनीने ते काम सोपवलं होतं तो कचरत बोलता झाला.

"ही आपल्या एम्पायरला लागलेली वाळवी आहे. इतरांमध्ये पसरून इमारत खिळखिळी करण्याआधी संपवलेली बरी! घेऊन जा!" त्या खूनी इसमाने आपला तर्क मांडला.

"मुसा, बोलू दे त्याला!" अखिलीस दानिशला मारलेल्या माणसाला टोकत बोलला.

आणि त्याची नजर त्या बार टेंडरवर पडली. त्या नजरेने बार टेंडरला मेल्याहून मेल्यासारखं झाला.

"हं!" कपाळावर आठ्या घेऊन हुंकारत त्यानं त्या बार टेंडरला बोलण्याची संधी दिली.

आपल्या जगण्याची एक आशा समोर दिसून तो हस्तकांच्या हातून सुटून अक्षरशः गुडघ्यांवर आला. प्राणांची भीक मागत गयावया करू लागला...

"बॉस मला माफ करा. मी... काही नाही केलं... मी तर त्याला तुमच्या पासून दूर राहण्याचाच सल्ला दिला होता..." तो काकुळतीला येऊन म्हणाला.

"तो कोणासाठी काम करत होता?" अखिलीसचा प्रश्न.

"तो कोणा एकाचा खबरी नव्हता. जो पैसे देईल त्याच्यासाठी तो माहिती काढायचा. त्यामुळं तो कोणासाठी आला होता याचा मला अंदाज नाही..." भ्यायलेल्या बार टेंडरनं प्रामाणिक उत्तर दिलं.

"आणि तू त्याचा खबरी?" मुसा कडाडला.

बार टेंडरची घाबरी नजर मानेसहित मुसाकडे वळली. तो काकुळतीला येऊन बोलू लागला,

"मी त्याला माहिती पुरवायचो. पण आपल्या बारमध्ये येणाऱ्या लोकांच्या. शपथेवर सांगतो, आपल्या एम्पायरबद्दल कधी कोणाकडं माहिती लीक केली नाही. बॉस माझ्यावर विश्वास ठेवा... प्लिज..." तो रडवेला झाला होता.

आणि आशावादी नजर अखिलीसवर टाकून बार टेंडर आशाळभूत पाहू लागला. या क्रुरांचा अधिपती असलेला अखिलीसच काय तो त्याची शेवटची आशा होता.

अखिलीस काहीच प्रतिक्रिया न देता व चेहऱ्यावर कोणतेच भाव न आणता डोळे अर्धवट करून त्याच्याकडं थंड नजरेने पाहत राहिला. यामुळं बार टेंडर अधिकच धास्तावला व तो अखिलीस समोर जीवनदानासाठी लोळण घेऊ लागला.

"मला विश्वास आहे. तुला मुआफी मिळेल." अखिलीस आपली शांतता भंग करत त्याला थंड नजरेनं बोलला. थोडं थांबला.

बार टेंडर सुखावणार, इतक्यात ती संधी त्याच्याकडून काढून घेत अखिलीस त्याची अट ठेवता झाला.

"पण; एक काम केलंस तर!" अखिलीस बार टेंडरला बोलला.

"आपण सांगाल तसे करू...!" तो अजूनही याचनेच्या पवित्रातच होता.

"पण बॉस..." मुसा कुणकुणला.

मुसा काही बोलणार तोच अखिलीसनं त्याला हात उंचावून गप्प केलं.

◆◆◆

जोनाथनची कुठूनच काही खबर लागत नव्हती. म्हणून मग इब्लिसनं शेवटचा पर्याय आजमावण्याचा कयास बांधला.

तो रवी म्हणून आपल्या 'सूर्योदय अनाथालया'त गेला. सहसा तो वारंवार तिथं जाणं टाळायचा. कारण त्याच्याबद्दल व त्याचा इथं असलेला संबंध कोणाला कळू नये हा उद्देश. परंतु आता निकडीचं होतं. जोनाथनबद्दल जतीन यांच्याकडे काही सुगावा लागतो का हे त्याला पहायचं होतं. म्हणूनच तो आला होता.

एवढ्या तणावात असताना देखील तो आपल्या भावंडांसाठी भेटवस्तू नेण्यास विसरला नव्हता. सर्व टेंशन्सपासून मुक्त ती चिल्लीपिल्ली रवीला बिलगल्यानंतर आपल्या भेटी घेऊन ती पाहण्यात रममाण झाली आणि रवीला

मोकळीक मिळाली. दुरून आपल्या कार्यालय कक्षेच्या चौकटीत उभारून हे प्रेमळ दृश्य पाहत व मुखावर एक तेजल स्मितरेष घेऊन उभ्या जतीनकडे तो जाता झाला.

त्यानं जतीन यांचे चरणस्पर्श केले.

"प्रत्येकवेळी हे असं काही आणण्याची आवश्यकता नाही." त्याच्या पाठीवर थोपटत जतीन म्हणाले.

"यांना सर्व सुखं मिळावीत म्हणूनच तर धडपड आहे माझी!" उभारत रवीने आपली बाजू मांडली.

"अपेक्षाभंगाचं दुःख त्यांना समजलं पाहिजे आत्ताच. नाही तर आयुष्य कठीण होऊन जाईल यांचं. जास्त लाडावू नको त्यांना." त्याला ऑफिसमध्ये घेत जतीननी त्याला सल्ला दिला.

ऑफिसमध्ये, त्यांनी त्याला बसण्यास हात केला.

रवी डेस्कजवळील खुर्चीत बसला. जतीन यांनी आपली जागा घेतली. चेहऱ्यावर तोच शांत भाव आणि तजेलपणा.

"बोल!" ते म्हणाले.

"जरा माहिती हवी होती." रवी आपली चिंता, काळजी लपवण्याचा प्रयत्न करत बोलला.

त्यानं त्याच्या मोबाईल मधील जोनाथनचा फोटो जतीन यांना दाखवला.

"सर, तुम्ही याला ओळखता...?" बारीक संकोचत त्यानं विचारलं.

"पाहिलंय. वर्धापनदिनाच्या दिवशी होता कार्यक्रमात." जतीन सहज बोलले.

"काय करत होता?" रवी जरा उत्तेजित अधीर झाला.

"जेवण वाढायचं काम त्याच्याकडं होतं." जतीननी सांगितलं.

"आपण अनाथाश्रमाच्या वर्धापनदिनासाठी कोणती केटरिंग सर्व्हिस बोलावली होती?" रवी अधिकच उतावीळ झाला.

"का रे?" जतीन यांच्या तीक्ष्ण नेत्रांनी रवीच्या वागण्यातील वेगळेपणा हेरला होता.

आपल्यातील बदल जतीन यांना कळला आहे हे रवी उमजून चुकला. आपल्याला सत्य सांगायची त्यांनी गळ घातली, तर आपण त्याला नक्कीच बळी पडू. त्यांच्या वचनाने आपल्याकडे बोलण्याशिवाय पर्याय उरणार नाही हे हेरून...

"असंच. जरा काम होतं." म्हणत गडबडलेला रवी जाण्यास उठून उभारला.

"काय चिंता आहे?" जतीन यांनी वडिलांच्या मायेनं विचारलं.

"समस्या? नाही. काही नाही." रवी हडबडला.

अख्खं अंडरवर्ल्ड ज्याला भिऊन असायचं तो जतीन यांच्या समोर मात्र वचकून असायचा. कोणत्याही बापासमोर कितीही मोठा व कर्तबगार मुलगा असला, तरी वचकून असतोच. आता रवी रुपात असलेला इब्लिसही त्याला पर्याय नव्हता. जतीन समोर त्याची तीच अवस्था व्हायची जशी कोणत्याही मुलाची आपल्या पित्यासमोर होते.

"तू सतत इथं येत नाहीस. पण आता काही दिवसांतच येऊन गेलेला तू परत आलास, तीही काळजी चेहऱ्यावर घेऊन. तुला काय वाटतं? मला समजणार नाही?" ओठांवर स्मित आणि डोळ्यांत चमक असलेले जतीन रवीला आश्वासक बोलले,

"सांग; काय झालंय? कसली चिंता सतावतीये तुला?" जतीन याचे सतेज स्मित व डोळ्यांतील चमक लोपली नव्हती. शब्दांत बापाची माया होती.

रवी मख्खा सारखा पाहत काही क्षण उभारला. त्याला काढता पाय घायचा होता, पण जतीन यांच्या आज्ञेशिवाय त्याला ते शक्य नव्हतं. आणि आता तर आज्ञा त्याला जे लपवायचं होतं, तेच सांगण्याची होती.

"बस." जतीन त्याला म्हणाले.

आज्ञा मोडवत नव्हती. त्याला बसावं लागलं.

त्यांनी रवीकडे आपला डावा तळवा केला. त्याला काही समजेना. मानेनेच मग जतीन यांनी रवीला त्याचा हात पुढे करण्याचा संकेत केला. संदिग्ध रवीने आपला हात त्यांच्या हाती दिला. त्यांनी तो सरळ करत काही न बोलता आपल्या गळ्यातील एक लॉकेट काढून रवीच्या तळहाती दिलं.

"हे... काय...?" न समजून रवीनं अस्फुट विचारलं.

"मला माहित आहे, आता माझ्याकडं जास्त वेळ शिल्लक नाही. म्हणून माझी धरोहर तुझ्याकडं सोपवतोय. तू माझा मोठा मुलगा आहेस. त्या नियमानं या सगळ्याची जबाबदारी आता तुझी आहे. माझ्या अपरोक्ष सगळ्यांचा सांभाळ कर. त्यांना अभय देऊन रक्षित कर!" स्थितप्रज्ञ जतीन निश्चल भावानं बोलले,

"छत्रपती शाहू महाराजांच्या समतेच्या विचारांचं द्योतक असलेल्या या करवीर भूमीवर उभारलेलं हे आपलं अनाथाश्रम समानता व बंधुता या विचारांचं मंदिर आहे. ते अबाधित ठेव!" बोलत असताना त्यांच्या मुखावर शांत प्रखर तेज होतं.

"असं अचानक आपण हे काय..." टचकन डोळ्यांत पाणी रवीच्याही नकळत उभारलं होतं. त्याच्या तोंडून आवाज फुटत नव्हता. तरी तो बळ एकवटून बोलला होता.

"तुझं जे चाललं आहे, ते का हे मी ओळखून आहे. मला सुरक्षित करण्यासाठी तुझा खटाटोप चालू आहे. नाही?" जतीन यांनी विचारलं.

"सर..?!" तो चिरक्या आवाजाने उद्गारला.

"आताही तू बाबा म्हणाला नाहीस... असो...!" आता जतीनही भावूक झाले होते,

"तुला जे काही जाणून घ्यायचं आहे ते मी जिवंत असेपर्यंत तरी तुला कळू देणार नाही. कारण तू कोणत्याही गुन्ह्यापासून दूर रहावेस हा माझा माझ्या अखेरपर्यंत प्रयत्न असणार आहे!" ते पुढं म्हणाले,

"मी तुला तुझ्या भावंडांचं रक्षण करायला, त्यांना सांभाळायला सांगितलं आहे; फक्त एवढी आशा आहे, की ते तू 'योग्य' मार्गाने करशील!" जतीन यांनी वचन मागितलं.

तसे रवीनं आपले हात मागं घेतले. गुन्हेगारी संपवण्याचं आपलं कार्य रवी सोडू शकत नव्हता. ते तो सोडणार नव्हता. जतीन काय ते समजले आणि त्याचा निर्णय समजून बिचारे आहत झाले.

"तुझ्या लेखी माझी काही किंमत नाही हे तू स्पष्ट केलंस." ते नाराजीने म्हणाले.

"नाही!" तो ओरडला,

"तसं नाही. मला तुम्हाला गमवायचं नाही. मला तुम्हाला गमवायचं नाही!" शेवटचं पुनरुधृत केलेलं वाक्य विचारात गढल्यासारखा तो स्वतःशीच पुनः पुटपुटला होता.

तो चांगलाच दुखावला, धक्कावला होता!

"रवी!" जतीन यांनी त्याला भानावर आणण्यासाठी जोराची हाक मारली.

"मी... मी येतो." म्हणत तो दरवाज्याकडे धावला. बिचाऱ्या त्याला हेही ध्यानात आलं नव्हतं, की कित्येक वर्षांनी जतीन यांनी त्यांनीच त्याला दिलेल्या नांवाने त्याला हाक मारली होती. त्याची ही इच्छा त्यांनी अखेर पूर्ण केली होती.

जतीन घाईने मोठ्या काळजीने उठून उभारले.

"जे तुझ्या हाती आहे, त्याची काळजी घे. कायम आपल्या गळयात घालून ठेव. गळयातून काढू नको!" त्यांनी सूचना केली.

तो थांबला. जतीन यांच्याकडे आला.

"हे... काय आहे...?" त्यानं गोंधळून व त्याहून अधिक चिंतेनं विचारलं.

"वेळ आली, की कळेल तुला." ते इतकंच म्हणाले.

ते आपल्याला काही सांगणार नाहीत हे उमगून मग तो तातडीनं बाहेर पडला. जाताना तो आपल्याशीच मनोमन ग्वाही देत होता,

'आपल्यावर प्रेम नाही किंवा मी आपल्याला वडील मानत नाही म्हणून मी आपल्याशी दुरी ठेवून आहे असं नाही; मला स्वतःचाच तिरस्कार आहे. माझ्या पापांची सावली आपल्यावर पडू नये हा माझा प्रयत्न आहे. हेच कारण आहे मी आपल्यापासून लांब राहण्याचं... माफ करा... माफ करा मला बाबा...!'

परंतु त्यानं अनाथालय सोडलं नव्हतं. त्याचं काम अजून होतं इथे. खूप शोधशोध करून त्यानं संतूला गाठलं. संतू मुद्पाकखान्यात खपत होता. त्याला मदत करायला अनाथाश्रमातीलच काही मोठी मुलं होती. रवीला पाहून, तो त्याच्याशी बोलू पाहतोय हे संतूने रवीच्या डोळयांतूनच ओळखलं. मुलांना सूचना करून तो बाहेर आला. त्याच्या खांद्यावर हात ठेवून रवीने त्याला स्वयंपाघरापासून जरा दूर नेलं.

"काय दादा? काही काम होतं?" त्यानं विचारलं.

"होय. मला सांग, आपल्या संस्थेचा वाढदिवस झाला, तेव्हा जेवणाची व्यवस्था कोणाकडे होती?" रवीने विचारलं.

"तसा मीच होतो. पण त्या दिवशी पोरांना काम नको म्हणून मदतीला बाहेरून माणसं बोलावली होती." संतू उत्तरला.

"माणसं कुणाची होती." रवीने नवीन विचारलं.

"आपल्या जग्गूची." संतू सहज सांगून गेला.

"थँक्स!" म्हणत रवी तेथून पळाला.

त्याला अखेर काही लीड मिळाली असं त्याला वाटलं. जाताना खूप वेळ हातात धरून ठेवलेलं लॉकेट त्यानं गळयात अडकवलं. संतू मात्र गोंधळलेले भाव घेऊन तिथंच थांबला. रवीला अचानक नक्की काय झालं हे त्याला समजलंच नाही.

दुरून जतीन हे सारं पाहत होते. हताशेनं त्यांची नजर खाली गेली. आपण अनाथाश्रमाची, इथल्या मुलांची, जबाबदारी त्याच्यावर सोपवली म्हंटल्यावर तरी रवी त्याचे उद्योग सोडील अशी त्यांना आशा होती, परंतु तो थांबण्याचं नांव दिसत

नव्हतं. ते हताश मुद्रेनंच पुन्हा आपल्या कार्यायलात प्रवेश केला. तो जे करतोय ते आपल्या व आपल्या मुलांच्या, त्याच्या भावंडांच्या सुरक्षेसाठीच करतोय हे तेही जाणून होते, पण... तरी त्याने हे करू नये असा त्यांचा मानस होता, कारण यात त्याचे हात गुन्ह्याने अधिक बरबटणार होते आणि तेच त्यांना नको होतं...

◆◆◆

ते एक साधारणसं केटरिंगचं कार्यालय होतं. छोटंसं असलं, तरी कामाचा आवाका मोठा होता हे तिथल्या कर्मचाऱ्यांच्या लगबगीवरून सहज लक्षात येत होतं. रवीची गाडी कार्यायलाबाहेर येऊन लागली.

'जगन्नाथ केटरिंग सर्व्हिस'चा स्टँडी बोर्ड त्या गाडीमागे झाकोळला गेला. गाडीतून उतरून रवी काही पावलांतच कार्यालयात प्रवेशकर्ता झाला.

रवीला समोर पाहून 'जगन्नाथ' उर्फ 'जग्गू' चांगलाच उत्साहित झाला. आपली सगळी कामं सोडून तो रवीच्या दिमतीला येऊन उभारला.

"रवीदा? तू?" तो आनंदाने किंचाळलाच.

"चल जरा काम आहे." काही उत्साह न दाखवता रवी त्याला बोलला.

त्याच्या आशा हताश भावाने जग्गूचा आनंद मात्र मावळला नव्हता. रवीला भेटून, तेही इतक्या दिवसांनी, तो खरंच खुश होता.

"चल केबिनमध्ये जाऊ." चमकत्या उत्साही डोळ्यांनी जग्गू त्याला म्हणाला.

"बाहेर गाडीत ये!" रवी एवढंच बोलून निघून गेला.

काही क्षणांती जग्गू रवी शेजारी येऊन बसला.

"दार लावून घे." रवी त्याकडे न बघता त्याला बोलला.

त्याच्या चेहऱ्यावर कमालीचा कठोरपणा होता.

"दादा, काही टेन्शन आहे का?" जग्गू चिंतेने बोलला.

जणू रवी त्याच्या हेच विचारण्याची वाट पहात होता, त्यानं आपला मोबाईल त्याच्या मांडीवर टाकला. त्यावर जोनाथनचा फोटो होता. जग्गू गोंधळला. त्यानं मोबाईल उचलून घेतला.

"याला ओळखतोस?" रवी पुढे पाहतच त्याला विचारता झाला.

कपाळावर आठ्या पाडतच जग्गूने मग तो फोटो पाहिला.

"हा..." तो फोटो निरखून पाहत उद्गारला.

तक्षणी रवीची मान गर्र्कन जग्गूकडे वळली. त्याची भेदक नजर जग्गूवर रोखली गेली होती. काही क्षण जग्गू घाबरलाच.

"दादा, काय झालंय?" त्यानं घाबरं विचारलं.

"मला याच्याबद्दल सगळं खरं सांग!" त्याच्या प्रश्नाला महत्त्व न देता चिडलेल्या रवीने आपला प्रश्न टाकला.

"आपल्या आश्रमाचा कार्यक्रम होता, तेव्हा भूक लागली म्हणून आला होता. मी जेवण देऊ केलं, पण म्हणाला भीक नको! खुद्दारीची रोटी तोडतो. काम देत असाल, तरच हे अन्न घेईन. म्हणून त्याला वाढायचं काम दिलं होतं मीच..." भ्यायलेला जग्गू सत्य विदित करत बोलला.

रवी यावर काही न बोलता बसून राहिला. विचारांच्या गर्तेत तो गोते खात होता. जोनाथनबद्दल कसलीच माहिती त्याला मिळत नव्हती. जी काही नवी दारं तो उघडत जात होता; ती त्याच वेगाने बंद होत जात होती.

तिथल्या तिथं तो गोलगोल फिरत होता. जोनाथनने या अनाथाश्रमात येण्याचं कारण आणि त्यानं जतीन यांचे लपून काढलेले फोटो यामागे नक्की कारण काय हे आता कोठून आणि कोणाकडून जाणून घ्यायचं याबाबद्दल त्याला कसलाच सुगावा नव्हता.

कोणी जतीन यांना मारायचं त्याला कॉन्ट्रॅक्ट दिलं होतं का? हो, तर कोणी? आणि का? त्याला कसलाच माग लागत नव्हता. जतीन यांच्या सारख्या पापभिरू माणसानं कोणाचं काय बिघडवलं असेल? आणि त्यांच्या हातून कळत नकळत काही प्रमाद झाला जरी असला, तरी त्यांचं रक्षण करणं आपलं कर्तव्य आहे असंच त्याच्या मेंदूत घुमत होतं. पण खरंच त्यांच्याकडून काही चुकीचं घडलं असेल, तर त्यांचं रक्षण करून आपण आपल्या तत्त्वांना तर मुरड घालत नाही ना? त्याहून त्यांना मारण्याचे काम आपल्यावरच येऊन पडणार नाही ना? पण त्यांच्याकडून नक्की काय घडलं आहे हे तरी जाणून घेणं त्याला आधी गरजेचं आहे...

'नाही! माझा बाप कधी चुकीचं वागणार नाही!' त्याचा मेंदू त्याला ठणकावून सांगत होता.

'मग कोणी त्यांना मारण्याच्या मागे का लागलं आहे? की आपणच ओव्हरथींक करतोय? कुणी सांगावं जोनाथनला फक्त सरांची माहिती काढायला सांगितली असेल? तसं जरी असलं तरी, ते तरी का? काही तरी समजायला हवं... काही तरी समजायला हवंच! पण कसं... कसं... कसं...???'

"एक लक्षात ठेव, संस्थेच्या बाबतीत कधी गाफील राहू नको! तो माणूस किती आटीव बॉडीचा होता हे बघून पण त्यानं सांगितलेली त्याला खायला मिळत नसल्याची गोष्ट पटली तुला? पुन्हा कोणाला तिथं कामाला ठेवायचं असेल, तर त्या माणसाची नीट ओळख पटवून घ्यायची. माहिती काढल्याशिवाय कोणाला सोबत घेऊ नको!" रवीने जग्गूला ठळक ताकीद दिली.

"काही झालंय का दादा?" मघाशी खुश असलेल्या जग्गूच्या चेहऱ्यावर चिंतेच्या छटा पसरल्या.

"तुझ्या कामाला जा!" इतकंच काय ते रवी त्याला बोलला.

रवी काही काळजीत आहे, पण ते तो आपल्याला कळू देणार नाही हे माहीत असलेला जग्गू मग काही न बोलता गाडीतून उतरला. बाय करावं म्हणून त्याच्याकडं मागे वळलेल्या जग्गूला निरोपही न देता रवी गाडी घेऊन वेगाने निघून गेला.

रवी सहसा असा कोणाशी वागत नव्हता. संस्थेशी जुडलेल्या व्यक्तीशी तर नक्कीच कधी तो तुटक वागत नसायचा. पण इथं आता प्रकरण वेगळं होतं. काय सांगणार होता तो जग्गूला? त्यालाच काही स्पष्ट नव्हतं. बरं याला वा संतूला किंवा कोणालाही जतीन यांच्या काळजीपोटी त्यांच्यावर लक्ष ठेवण्यास सांगावं, तर जतीन यांना ते खपणार नाही. ते चिडतील असे वाटून तो त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी कोणावर सोपवू पण शकत नव्हता. आणि म्हणूनच सगळं ओझं त्याच्या एकट्यावर येऊन पडलं होतं. चांगलीच गोची झाली होती त्याची.

तिथं त्या जोनाथनबद्दल माहिती मिळवणं देखील कठीण होऊन बसलं होतं. कुठून काही मार्ग सापडत नव्हता, की जेणेकरून समजावं, की त्याला कोणी

व का हायर केलं होतं... एका कॉन्ट्रॅक्ट किलरची माहिती काढणं इतकं अवघड कसं? आणि तेही 'इब्लिस'ला? सैतानांचा सैतान तो; आणि त्याला एक यकश्चित माणसाचा माग काढणं मुश्किलीचं होऊन बसलं होतं...

# ६. अक्षम्य...

हेलीचा पाठलाग करणारा पुरुष तिच्या घराबाहेर रात्र होण्याचीच वाट पहात होता. यावेळी कोणती चूक होऊ नये म्हणून त्यानं सोबत एक मित्र घेतला होता. संध्याकाळ पासून तो निशेच्या प्रतीक्षेत होता.

आज हेली देखील घरीच होती. तिचा कमांडर् असा तिरसटासारखा वागायला लागल्यापासून तिला काही कामच उरलं नव्हतं. नाही म्हणायला एसपीकडून काही असाईन्मेंट्स आल्या होत्या. पण त्यांतील पहिलीच कमांडरने धुडकावून टाकल्याने पुढील असाईन्मेंट्सना तिनं स्वतःहून 'नाही' सांगितलं होतं.

रात्र होण्याची जशी तो इसम वाट पहात होता, तशी तो हेलीनं घर सोडण्याच्या प्रतीक्षेत देखील होताच. नाही तर रात्र होऊनही तसा काही उपयोग नव्हता.

त्याला हेलीला मारायचं नव्हतं; तूर्तास तरी! त्याला आधी तिची माहिती काढायची होती. आणि तो हे ती बाहेर पडल्याशिवाय करू शकत नव्हता.

रात्र झाली, आता तो जास्त वाट पाहू शकत नव्हता. त्याच्यासाठी प्रत्येक क्षण महत्त्वाचा होता. तशात बरेच मौलिक क्षण त्यानं प्रतीक्षेत वाया घालवले होते. आता जर त्यानं जास्त वेळ वाया घालवला, तर त्याच्याकडं अजिबात वेळ उरणार नव्हता! तो चुकला, तर त्याचे हुकूमतदार त्याला पुन्हा संधी देणार नव्हते. तो काळदाढेत पिसला जाणार होता.

या विचारांनीच त्याची पिस्टल त्याच्या हाती आली. ती लोड करून तो हेलीच्या घराकडे जाण्याचे पाहू लागला. हेली बाहेर पडणार नसेल, तर तिला संपवू

आणि तिच्या घरची तपासणी करू असा त्याचा निर्धार झाला होता. आपला जीव वाचवायला दुसऱ्याचा जीव दावणीला लावायला तो कधीही तयार होता.

तोच त्याला दरवाज्याची हालचाल दिसली. तो पटकन मागे झाला. त्याच्या मागून पुढे होणाऱ्या त्याच्या सोबत्याला त्यानं छातीवर हात ठेवून मागे सारले.

हेली घरातून बाहेर पडली होती. तिला थोडं पुढे जाऊ देऊन त्यानं मग आपल्या साथीदारास तिचा पाठलाग करण्यास सांगितले. तो साथीदार आपल्या कामास मार्गस्थ झाला. आपले काम तो पुरेपूर जाणून होता. हेलीचा आपण पाठलाग करतोय हे तिला कळू न देण्याची त्याची काळजी नक्कीच चालली होती.

इकडे हा इसम आता कसलीच भीड न पाळता हेलीच्या दाराशी पोहोचला. दार हेलीनं त्याच्या समोरच लॉक केलं होतं. ते उघडण्याचे कष्ट त्याला घ्यावे लागणार होते. ते उघडण्यासाठीची व्यवस्था त्याच्याकडं नव्हती. पण ते उघडण्याची एक पद्धत क्लुप्ती त्याच्याकडं साहजिक होती. त्यानं सर्वप्रथम हाती काळे लेदर ग्लव्ह्ज चढवले.

आणि स्वतःची '9 एमएम ब्राऊनिंग हाय पॉवर्' पिस्टल डिस्मेंटल केली. त्याला पिस्टलच्या 'स्लाईड लॉकिंग लिव्हर'ची गरज होती.

गोळी घालून तो लॉक उघडू शकत होता, परंतु त्याला कोणाचं लक्ष वेधून घ्यायचं नव्हतं. हेलीचं घर भले एकटं असं बरंच दूर होतं, तरी बंदुकीचा आवाज लांबच्या लोकांना आकर्षित करू शकणार होता, म्हणून त्यानं तो पर्याय टाळला होता.

शिवाय आपण येऊन गेलोय हे हेलीला समजू नये यासाठीही त्याला सावधगिरी बाळगायची होती, त्यासाठीच त्याचा हा उद्योग चालू होता.

'स्लाईड लॉकिंग लिव्हर' हातात ठेवून बाकी पिस्टल पार्ट्स त्यानं पॅन्टच्या खिशात टाकले. नंतर तो मुख्य दरवाज्याच्या नॉबला लागून असलेलं 'रोझ् कव्हर' (दरवाजा व नॉब दरम्यानची चकती यास रोझेट वा 'ट्रिम' देखील म्हणतात, ते) फिरवू लागला. थोडा जोर लावून फिरवल्यानंतर ते लूज झालं. दरवाजा व नॉबमध्ये एक छोटा पॅसेज तयार झाला. आतमध्ये एक पिन दिसत होती. ती त्यानं पिस्टलच्या स्लाईड लॉकिंग लिव्हरने जोरात दाबून धरली व नॉब फिरवलं. काही वेळच्या प्रयत्नानंतर दरवाजाचं लॉक खुलं झालं. 'खट्ट्' असा बारीक आवाज करून दार आत उघडलं होतं.

तसंच आत प्रवेश न करता आधी त्यानं आपली 'हाय पॉव्हर' रिअसेंम्बल केली व ती लोड करून सेफ्टीसाठी हाती घेऊनच तो सावधपणे आत गेला. लाईट लावणं म्हणजे पुन्हा तेच कोणाचं तरी लक्ष वेधून घेणं, म्हणून आपल्यासोबत आणलेली टॅक्टीकल गन्स फ्लॅश लाईट काढून तो घरभर शोध घेऊ लागला. त्याची सुरवात त्यानं माळीतून केली.

डायनिंगवर त्याला हेलीचा लॅपटॉप दिसला. तो त्यानं चालू करून पाहिला. यात काही अतिशय उपयुक्त माहिती मिळेल हा त्याचा कयास होता. त्याची मुद्रा काहीशी चिंतामुक्त झाली. परंतु खुश होण्याच्या मार्गात त्याला अजूनही अडथळा होता.

लॅपटॉपला हेलीनं पासवर्ड घालून ठेवला होता. हा लॅपटॉप तो इथून घेऊन जाऊ शकत नव्हता. आणि इथं पासवर्ड क्रॅक करायला त्याच्याकडं बुटेबल पेन

ड्राइव्ह (युएसबी) वा विंडोज सॉफ्टवेअरची सीडी नव्हती. तरी त्याला मलूल होण्याचं कारण नव्हतं. विना साधन पासवर्ड कसा मोडीत काढायचा याचं त्याला पुरतं ज्ञान होतं. पासवर्ड काढून टाकला वा अगर बदलला, तर त्याच्या इथल्या पूर्व अस्तित्वाची जाणीव पुढे हेलीला लॅपटॉपवर काम  करताना कळली असती. तेही त्याला नको होतं. असं असून चिंतेचं अजूनही कारण नव्हतं. पासवर्ड खोलण्याची तीच पद्धत वापरून तो आतील डेटा पाहू, तपासू शकणार होता, तेही पासवर्ड क्रॅक न करता व तो न बदलता. तो तूरंत आपल्या कामाला लागला...

हेलीचा अत्यंत महत्त्वाचा डेटा त्याच्या बोटांच्या व अगदी काही मिनिटांच्या अंतरावर होता.

यासाठी त्याला रिपेअरिंग विंडो उघडणं आवश्यक होतं. लॅपटॉप स्क्रिनवर ती प्राप्त करण्यासाठी त्याला लॅपटॉप हा इम्प्रॉपर शट डाऊन करणं आलं. त्यानं सुरू असलेला लॅपटॉप रिस्टार्ट केला. विंडोजचा लोगो आल्यावर त्यानं पॉवर बटन ऑफ केलं. लॅपटॉप प्रॉपर शट डाऊन होऊ दिला. लॅपटॉप पूर्णतः बंद झाल्यावर त्यानं तो पुन्हा स्टार्ट केला. पुन्हा विंडोज लोगो आल्यावर लॅपटॉप शट डाऊन केला. पुन्हा चालू केला. ही प्रक्रिया त्यानं तीन-चार वेळा केली. तोपर्यंत, जोपर्यंत विंडोजच्या लोगो खाली त्याला 'रिपेअरिंग विंडो मोड' असं लिहिलेलं दिसलं नाही. लॅपटॉपला सिस्टीममध्ये अथवा फाईल्समध्ये काही इशू आहे असं वाटून तो आपल्या स्क्रिनवर रिपेअरिंग विंडो मोड दर्शवू लागल्यावर हा इसम थांबला.

काही काळ त्यानं लॅपटॉपला प्रोसेस होण्यास दिला. जसं रिपेअरिंग विंडो मोडची टॅब शो होऊ लागली, त्या इसमाने 'ॲडव्हान्स ऑप्शन' सिलेक्ट केला. पुढील डायलॉग बॉक्स आल्यावर त्यानं त्यात 'ट्रबलशूट'चं पेज ओपन केलं. तिथं

मग त्यानं 'सिस्टीम इमेज रिकव्हरी' या ऑप्शनची निवड केली. पुढे क्रमाने काही डायलॉग बॉक्स उघडत गेले त्यानुसार अनुक्रमे तो कॅन्सल, नेक्स्ट, एडव्हान्स ऑप्शन्सवर क्लिक करत गेला. आणि शेवटच्या डायलॉग बॉक्सवर त्यानं 'ओके' वर क्लिक केले.

दॅट्स इट!

त्याचं काम झालं होतं. आता तो बिनघोर लॅपटॉप मधील सर्व माहिती एक्सेस करू शकत होता. एक एक फोल्डर त्यानं नजरेखालून घातला. त्याची बुद्धी तल्लख होती. तो एकपाठी होता. झरझर डोळे त्याचे त्या इन्फॉर्मेशनच्या लठ्ठ्यातून फिरत होते. सर्व माहिती त्याच्या मेंदूत साठत चालली होती. त्याचे संक्षिप्त तपशील लागलीच त्याच्या मेंदूच्या कप्प्यात बनले जात होते. तो पापणीही न लावता तो माहितीचा महासागर डोळ्यांत सामावत होता. जसजसं ं सर्च करत गेला, त्याच्या चेहऱ्यावर एक वेगळीच उत्साहाची झाक उजळू लागली.

असुरी हास्य त्याच्या मुद्रेवर पसरत चाललं होतं. ते वाचत असताना त्याच्या केसांतून घामाच्या धारा लागून कनपट्टीपासून खाली रेघवत होत्या. त्या अंधारात फक्त लॅपटॉपचा प्रकाश अंगा-तोंडावर घेत तो त्यातील माहितीच्या दर्येत डुंबत होता. त्या मिणत्या उजेडात त्याचा असुरी हसणारा चेहरा अधिकच विभत्स दिसत होता.

काही थोडा वेळ खर्ची घालून त्यानं हेलीचा सारा लॅपटॉप पिंजून काढला होता. मुसा शक्तीवर विसंबत असला, तरी तो जातीचाच हुशार होता. विशेषतः या इसमाला हेलीच्या पाठी सोडण्यामागे त्याची हीच हुशारी काम करून गेली होती.

जी माहिती हवी, ती त्याला मिळाली होती. सो, त्यानं लॅपटॉप खोलवर धुंडाळण्याची अधिक तसदी घेतली नाही. लॅपटॉप त्यानं पूर्ववत बंद केला. तनावाने खस्ता झालेला त्याचा तोंडवळा आता खरा पूर्णपणे चिंतामुक्त झाला.

हेली येण्यापूर्वी त्याला मित्र सूचित करणार होता. हेलीचा कॅप्चर करून तिच्याकडून माहिती काढण्याचा यत्न करणं काय कठीण होतं? ती सांगेल की नाही या प्रश्न दुसरा, पण हे करणं कठीण होतं का? हे प्रयत्न करा करू शकत होतेच. पण ही गोष्ट इब्लिसला समजली, तर इब्लिस आपलं काय करेल याची भीती सर्वच बाळगून होते.

हेली इब्लिससाठी काम करते हे याला माहीत होतं असं नाही. पण इब्लिस कोणासाठीही उभा राहत होता, आणि तो हेलीसाठी उभा राहिला तर... ती भीतीच नको होती आणि म्हणून त्याने हेलीचं घर पालथं घालण्याचा मार्ग निवडला होता, तिला पडकून तिच्याकडून माहिती वदवून घेण्यापेक्षा...

आणखी काही सुगावा लागतोय का म्हणून तो निष्काळजीपणे घरभर फिरू लागला. त्यानं एक-एक खोली डोकावून पाहिली. काही नवीन माहिती मिळावी अशी तिथं कसलीच खूण व परिस्थिती नव्हती. सगळं साधं. नॉर्मल.

एक अखेरची खोली राहिली होती. त्यानं दरवाजा उघडून ढकलला.

आत नजर पडताच तो जरा दचकला. समोर एक मुलगी होती. घरी कोणी नसेल असं आतापर्यंत त्याला वाटलं होतं. त्यानंच तो निर्ढावला होता, तर आता निळेशार डोळे त्याच्यावर रोखले होते.

पण इथं ही मुलगी? तिचे वटारलेले डोळे त्या इसमावर गढलेले होते. या नजरांनीच तो चमकला होता. दचकला होता.

पण काही क्षणातच त्याच्या ज्ञानी आलं, की ती मुलगी हलण्याच्या परिस्थितीत नाही. ती बेडवर पडून आहे. हालचाल करण्याचे त्राण तिच्यात नाहीत. ती जणू जिवंत प्रेत होतं, ज्याचे फक्त डोळे प्राणाने भरले होते.

अत्यंत कमालीची सूंदर अशी ती यौवना पाहून याची वासना चाळवली. आता त्याला मृत्यूची तशी भीती राहिली नव्हती. त्याला हवी ती माहिती उपलब्ध झाली होती. ती मालकांना सुपूर्द केल्यावर हेलीला मारण्याचे आदेश दिले जाणार होते.

हिचा इथं ग्रास घेतल्यास त्याला काही धोका उद्भवणार नव्हता.

परंतु त्याला या गोष्टीचं ध्यान नव्हतं, की त्यानं हे कांड केलेलं त्याच्या बॉसना समजलं आणि ते जर त्यांना नाही रुचलं, तरी त्याचा जीव धोक्यात येणारच होता, मग जरी त्यानं त्याला योजून दिलेलं कार्य पूर्ण केलं असलं तरी!

'मागे कसलीच खूण सोडू नये!' या त्याच्या तत्त्वाला त्याच्या वासनेने झाकोळून टाकलं होतं...

समोर ती असहाय सुंदरी पाहून तो बाकीचं सारं विसरला होता. त्याच्या वासनेने त्याच्या भीतीवर मात केली होती.

समोर इतकी सूंदर युवती आणि तेही प्रतिकार करण्याच्या पलीकडे जिची अवस्था आहे; अशी संधी तो सोडू शकत नव्हता. सोडू इच्छित नव्हता.

त्याचं उत्तेजित झालेलं शरीर हरकतीत आलं. तो आशाळभूत राक्षसी नजरेने तिच्याकडं, तिच्या बेडकडे सरकू लागला, तशी तिची नजर देखील त्याच्यासोबत फिरू लागली. काय होणार हे ती जणू जाणून होती, तरी ती काही वाटण्याच्या पलीकडे होती. यामुळंच तिच्या डोळ्यांत भीती ती कसली नव्हती.

जणू जे घडणार होतं त्याचा तिला काही फरक पडणार नव्हता. प्रतिकार करायचाच म्हंटला, तरी तिच्यात त्राण होते कुठे? तिनं हे दुःख, या यातना या आधी जणू भोगल्या होत्या आणि आता त्याला त्याचं काही वाटणार नव्हतं. ती भीती, राग, द्वेष, किळस, खिन्नता, अशा सर्व दुर्भावनांच्या अगदी पैलतीरी गेली होती.

तो मात्र तिच्याकडं सरकतच होता. त्याच्या आकृतीच्या हालचाली सोबत पापणीही न लवणारी तिची निर्विकार नजर फिरत होती...

◆◆◆

हेली एका मेडिकल स्टोरपाशी थांबली. बरीच रात्र झाली होती, त्या आवारात बाकी काही खुलं नव्हतं. एवढ्या एका मेडिकल मधूनच जो उजेड बाहेर पडत होता, तेवढ्या पुरता रस्ता अंधुक उजळला होता.

कसलीशी औषधं तिनं विकत घेतली आणि ती मागे वळली. आपल्या घराकडे परत न चालता खरं ती दुसऱ्या वाटेला लागली.

रस्ता रात्र असल्यानं सुनसान होताच. पाठलाग करणाऱ्याला देखील त्यानं काही अवरोध नव्हता. हेलीच्या लक्षात येऊ नये इतकीच काय ती त्याला काळजी घ्यायची होती, जी तो घेत होता.

मागून भरधाव वेगाने एक गाडी जवळ येत असल्याचा आवाज होत होता. परंतु बाजूने ती निघून जाईल या विचाराने त्यानं आपली एकाग्रता भंग केली नव्हती.

रस्त्यावरून जाणाऱ्या अनेक गाड्या असतात. त्यामुळे पुढे चालणाऱ्या हेलीलाही त्या गाडीची काळजी करायचं कारण दिसत नव्हतं.

काही अंतर चालल्यानंतर तीच गाडी मागून अगदीच समोर आली व पाठलाग करणाऱ्या इसमाच्या आडवी लागली. त्या इसमाला थांबावं लागलं. तो दचकलाच. अगदी तंद्री लावून आपण एखादं काम करत असावं आणि कुणीतरी मागून खांद्यावर हात टाकावा, त्यावेळी जशी अवस्था होते तशी त्याची झाली होती.

असं झाल्यास सद्यस्थिती ध्यानात येऊन काही क्षणात आपण रिलॅक्स तर होतो, पण त्याला ती संधी नव्हती. समोरच्या गाडीतून एक व्यक्ती उतरली. त्या व्यक्तीने डोक्यावरची हुडी बाजूला केली होती.

तो शार्दूल होता!

त्याला समोर दत्त झालेला पाहून हेलीचा पाठलाग करणारा इसम थोडा घाबरला. बहुदा असं काही करण्याचं त्याचं हे पहिलंच काम असावं.

"बायकांचा असा पाठलाग करू नये. गुन्हा आहे तो, हे माहीत नाही तुला?" शार्दूल त्याला म्हणाला.

पाठलाग करण्यात नवशिक्या असलेला तो माणूस गुन्हेगार मात्र कसलेला होता हे त्याच्या जलद हालचालीने समजून गेले. त्याचा हात मागे त्याच्या पिस्टलकडे गेला होता. तो कितीही जलद असला, तरी शार्दूल इतका तो वेगशील नव्हता.

शार्दूलला त्याची भावी कृती ज्ञानी येऊन त्यानं त्याच्याही अगोदर आपली सर्व्हिस पिस्टल त्या इसमावर रोखली.

"हलू नको. हात वर!" शार्दूलचा त्या इसमाला हुकूम.

हेलीला आतापर्यंत मागील कारभार उमजला होता. ती मागे वळून सर्व प्रकार पाहत होती.

"शार्दूल तू?" ती आश्चयाने उद्गारली.

असं वाटत होतं, जसं तिला शार्दूल इथं प्रकट झाल्याचा अधिक अचंबा वाटत होता. ना की तिचा पाठलाग होतोय याचा. जसं की ती ते आधीपासूनच ओळखून होती... बहुदा म्हणूनच तिने घरचा रस्ता धरला नव्हता...

"हो. मला तेव्हाच शंका आली, जेव्हा आपण तुझ्या घराबाहेर बोलत असताना समोर एक गाडी येऊन थांबली आणि काहीच वेळात निघून गेली. मला अंदाज आला होता, कोणीतरी तुझ्या पाठी आहे. म्हणून तुला ट्रॅक करत होतो!" शार्दूल तिला बोलला.

"माझ्या इच्छेविरुद्ध?" ती रागाने म्हणाली.

"तुझ्या सुरक्षेसाठी!" तोही आवाजात हुकूमत आणत अधिकार वाणीने दरडावत बोलला व म्हणाला,

"माफ कर यायला उशीर झाला. एका कामात अडकलो होतो. पण दिसतंय वेळेतच पोहोचलो. तुझा खबरी दानिश; गायब झाल्याचं समजलंय. मग तर तू संकटात असल्याचा माझा संशय पक्का झाला. लगोलग आलो." त्यानं स्पष्ट केलं.

बोलत असताना त्यांचं सारं लक्ष पाठलाग करणाऱ्या त्या माणसावर केंद्रीत होतं.

"सॉरी शार्दूल!" हेली बोलली.

तशी शार्दूलची मान हेलीकडे प्रश्नार्थक वळली. हेली गडबडीने तिच्या पर्स मधून काही काढत होती. एक स्प्रे तिच्या हाती आला होता.

तिनं तो शार्दूलच्या तोंडावर मारला. तो स्प्रे डोळयांत पडताच अत्याधिक वेदना होत शार्दूल गडबडला.

इकडे त्या इसमाला हालचाल करण्यास संधी मिळाली. त्यानं हेलीच्या हातातील स्प्रे तिच्या हातावर लाथ मारून पाडला व आपला कोट बाजूला सारून त्यानं मागील पिस्टल खेचली.

हेली देखील काही कच्ची बच्ची नव्हती. जिथे खुद्द 'इब्लिस' तिला वचकून असतो, तिथं कोणा इतरांची काय बिशाद?!

तक्षणी हेली त्याच्याकडं झेपावली व त्याच्या हातची पिस्टल हिसकावून घेत त्याच्या मांडीत तिनं गोळी झाडली. तो कऱ्हत गुडघ्यांवर आला. हेलीनं मग रस्त्यावरच पडलेला तिचा स्प्रे कॅन ताब्यात घेतला. आणि तो त्या इसमाच्या डोळयांत शिंपडला. तो 'खास स्प्रे' डोळयांत घेतल्याने शार्दूल पेक्षा वेगळी त्याची अवस्था झाली नाही. त्याच्या डोळयांत अतीव तीव्र अशी जळजळ उभी राहिली.

शार्दूल डोळयांत आग पडल्याने रस्त्यावर बसून चुरचुरणारे डोळे दाबून धरून तळमळत होता. गोळीच्या आवाजाने तो धक्कावला.

'कदाचित ही गोळी हेलीला तर...'

त्याच्या मनात विचार कुंधला. उभारण्याचा प्रयत्न करून तो हवेतच चाचपडू लागला.

हेलीला मात्र त्याची चिंता नव्हती. काही वेळातच तो नॉर्मलला येईल याची तिला खात्री होती. त्याला तसाच सोडून तिनं तिच्या पाठलागावर असलेल्या

इसमाला शार्दूलच्या गाडीत बॅक सीटवर टाकलं. दरवाजा बंद करून ती ड्रायव्हिंग सीटवर विराजली. आतून ती शार्दूलला उद्देशून ओरडली,

"माफ कर. अर्ध्या एक तासात नॉर्मल होशील. सॉरी!"

ती मग तशीच गाडी भरधाव वेगाने घेऊन तेथून निघून गेली.

शार्दूल आपले डोळे उघडण्याच्या प्रयत्नांत चाचपडत होता. त्याही परिस्थितीत तो गाडीच्या मागे जाण्यास धडपडू लागला. गाडीचा आवाज लांब गेल्याचं ध्यानी आल्यावर त्याचे पाय थांबले, पण त्याची जलदीची हालचाल काही स्थिरावली नव्हती. त्याचा हात त्याच्या खिशात गेला. मोबाईल बाहेर आला.

आशा परिस्थिती मोबाईल पाहून कोणाला कॉल करणं त्याला शक्य नव्हतं. व्हॉईस असिस्टंटचा त्यानं याक्षणी उपयोग केला.

"कॉल कंट्रोल रूम!" त्यानं व्हॉईस असिस्टंटला आदेश दिला.

पलिकडून फोन उचला जाताच शार्दूल अधीरतेने बोलला,

"हॅलो, शार्दूल बोलतोय. मी इथं ताराराणी चौकात आहे. एक गाडी आणि जरा दूध घेऊन या!"

◆◆◆

तो डांबरी रस्ता कोणीच नसल्यानं अगदी निर्जीव दिसत होता. एकच पोलीस गाडी त्या रस्त्याला सजीव करत धावत होती.

ती शार्दूलची सरकारी गाडी हेली चालवत होती. वेळोवेळी ती मागे तडफत पडलेल्या त्या इसमाकडे पाहत त्याच्या अवस्थेची शहानिशा करत होती. तो

मरणार नक्कीच नव्हता आणि हेलीवर प्रहार करण्याची देखील त्याची स्थिती खासच नव्हती. तरी ती लक्ष ठेवून होती. न जाणो कोणत्या वेळी काय घडेल? म्हणून दक्ष राहणं गरजेचं होतं. असं असताना देखील तिचं गाडी चालवण्यातील एकाग्र चित्त स्थिर होतं... डोळ्यांत राग होता, पण तरीही ती तेवढीच शांत देखील होती!

◆◆◆

शार्दूल दुधाने आपले डोळे धुवत होता...

त्याच्या मदतीसाठी एक गाडी घेऊन कॉन्स्टेबल काही मिनिटांतच हजर झाला होता. येताना सोबत त्यानं शार्दूलच्या सुचनेने दुधाची पिशवी आणली होती.

दूध हे पेपर स्प्रेसाठी उत्तम मात्रा आहे हे शार्दूलला माहीत होतं. अर्ध्या एक तासात त्याचे डोळे बरे होतील असं हेलीनं त्याला बोललेलं अस्वस्थ असूनही त्याच्या डोक्यात कोरलं गेलं होतं. एवढे त्याचे कान व बुद्धी तीक्ष्ण होती. तिनं नक्कीच पेपर स्प्रे डोळ्यांत स्प्रे केला असणार हे तो ओळखून गेला. शिवाय ती आपल्याला अपाय होईल इतकी मोठी इजा करणार नाही याचीही त्याला खात्री होतीच.

डोळे धुतल्यानंतर व काही वेळ मोकळ्या हवेत फुटपाथवरच बसल्यावर त्याला थोडं बरं वाटलं. आलेला कॉन्स्टेबल काळजीने बाजूला मदतीच्या पवित्र्यात सज्ज होताच. परंतु खुद्दार असणारा व स्वतःची कामं स्वतः करण्यावर

विश्वास ठेवणारा शार्दूल कधी कुणाची मदत घेत नसल्याने कॉन्स्टेबलला तिथं उभारण्याशिवाय दुसरं काही काम नव्हतं.

डोळे उघडण्याच्या स्थितीत शार्दूल आल्यावर त्यानं दुधाने चिकट झालेलं तोंड गाडीतून दुसरी बाटली काढून पाण्याने धुतले. दुधाने धुतल्यावर त्याची जळजळ जरा कमी झाली. तरी विश्रांती घेईल तो शार्दूल कसला. पाण्याने थंडावाही आला होता. ओलीतं तोंड पुसण्याची उसंत न घेता त्यानं कॉन्स्टेबलकडून गाडीची चावी घेतली.

"तुम्ही दुसरी गाडी मागवून घ्या. मला अर्जंट काम आहे." त्याला सूचना करून तो तातडीनं गाडीत बसला,

"तुम्हाला असं सोडून जातोय त्यासाठी माफ करा." तो कॉन्टेबलला म्हणाला.

हेलीनं गाडी कोणत्या दिशेने पिटाळली हे डोळे बंद असून आवाजाच्या आधारे त्यानं पक्के ताडले होते. त्या बाजूने त्यानं गाडी पळवली.

तरी त्याच्या पुढे प्रश्न होताच, की तिला शोधायचं कसं...? यासाठीही त्याच्याकडं काही पर्याय असणार... अन्यथा त्याच्याकडं तिच्या मागे जायचा दुसरा काही मार्ग नव्हता... याचा अर्थ तो गप्प बसला असता असा नाही, परंतु तिला शोधायला त्याला थोडा वेळ अधिकचा खर्ची घालावा लागला असता इतकंच!

# ७. रणचंडी...

हेलीनं शार्दूलची गाडी त्यांच्या सिक्रेट बेसला थांबवली. इब्लिसची ती गुप्त एकांतवासाची जागा बाहेरून सुद्धा भयाण होती, इब्लिसच्या नांवाला शोभेल अशी. त्यातून त्या निशेच्या घुप्प निमिषात ती अधिकच भयप्रद जाणवत होती.

इथपर्यंत रस्ता गाडीतील इसम पाहू शकणार नव्हता. पेपर स्प्रेने त्याचे डोळे जे अधू केले होते. त्या स्प्रेचा परिमाण अजूनही त्याच्यावर होता.

हेली खाली उतरून त्याला बाहेर काढून ओढतच आत घेऊन गेली. मांडीच्या जखमेने पंगू झालेल्या त्याला नीट चालताही येत नव्हतं. तो अडखत होता. हेलीच्या हातून सुटण्यासाठी त्याचे हात प्रयत्नरत होते. हेलीची पकडच इतकी घट्ट होती, की त्याला ते सहज शक्य नव्हतं.

आत येताच तिनं त्याला एका खुर्चीवर लोटलं. तो लडखडत हेलपांडे खात त्या खुर्चीत जाऊन पडला. त्याला त्या खुर्चीशी बांधण्यात तिनं निमिषाचाही विलंब लावला नाही.

तो जोर लावून सुटण्याचा प्रयत्न करू लागला. हेलीनं त्याला करकचून बांधलं होतं.

त्याला पायही हलवता येणार नाही अशी व्यवस्था तिनं केली होती. खुर्चीच्या दोन्ही पायांना तिनं त्याचे पाय बांधले होते. मांडीच्या मांसपेशी ताणल्यामुळं त्याच्या पायात वसलेली गोळी त्याला आत अधिकच बोचत होती. रक्त रिसत होतं. त्याची काळी ट्राउजर गोळी लागल्या जागी भडक लाल झाली

होती. आतील मांस त्या छिद्रातून स्रवत होतं. गळणारं रुधिर त्याच्या पायांशी तळं करत होतं.

याच्या दूषित व भ्रष्ट  रक्तानं अपावन झालेली आपली जागा इब्लिसला नक्कीच आवडणार नव्हती. तरी तो यावेळी याकडं दुर्लक्ष करेल हे हेलीला ठाऊक होतं. त्याला हवी ती माहिती मिळण्याची हा इसम आशा होता. त्यामुळं हेलीची ही कृती इब्लिस माफ करणार होता हे ती स्वतःशीच ठरवून होती.

तिनं आणखी एकदा त्याच्या डोळ्यांत पेपर स्प्रे मारला. त्याच्या डोळ्यांची आग आता कुठं कमी आली होती, तर आता पुन्हा त्यात अधिकची भर पडली होती. यापेक्षा मरण बरं असं वाटून गेलं त्याला. पण ते इतक्यात त्याला मिळणार नव्हतं. आपण ज्याची इच्छा करतो, ते तक्षणी प्राप्त होईल वा होईल की नाही हे ठरलेलं थोडीच असतं? तडफडण्याशिवाय त्याच्याकडं काही उपाय नव्हता. तेही त्याला धड करता येत नव्हतं हेलीनं त्याला बांधून ठेवलं असल्यामुळं...

◆◆◆

बार टेंडर आपला जीव शाबूत ठेवण्यासाठी अखिलीसच्या हुकुमाची तामिल करत होता.

तो याचककर्त्याच्या मुद्रेत बाहेर जतीन यांच्यासमोर रात्रीचा उभा होता. अंगात जुनी-पुराणी, फाटकी-तुटकी कपडे. संतू जतीन यांच्या मागे होताच.

"साहेब, कामाची गरज आहे... मला काही काम मिळेल?" बार टेंडर आव आणत बोलला.

त्याचा अभिनय इतका वठला नव्हता, खरं जिवाच्या भीतीने तो घाबरलाच इतका होता, की त्याला त्याच्या चेहऱ्यावरचे ते भयभीत भाव त्याच्या याचनेची खात्री देत होते.

"कुठला बाबा तू?" जतीन यांनी त्याची चौकशी केली.

"इथलाच. कामाची गरज आहे. तुम्ही अनाथांना मदत करता हे माहीत आहे. माझ्या सारख्या गरीबाची मदत कराल म्हणून आलो." तो कचरत बोलला.

"तशी कामगारांची गरज नाही. पण तुला गरजच आहे म्हणतोयस, तर ये कामाला. बरं रहायचं कसं?" जतीन त्याच्यावर करुणा दाखवत विचारून गेले.

"जागा नाही. फुटपाथवर झोपायचो." त्याचे उत्तर.

"मग रहा इथंच. हा संतू. तुला खोली दाखवेल." जतीन म्हणाले.

"उपकार झाले." बार टेंडरने हात जोडले.

जतीन यांनी त्याचा खांदा आपुलकीने दाबला व ते आपल्या खोलीकडे निघून गेले.

संतू त्याला खोली दाखवण्यास सरसावला. त्यावर...

"मी सामान घेऊन येऊ?" बार टेंडरनं विचारलं.

संतूची मान हलली.

"आलो थोड्या वेळात." बार टेंडर बोलला.

"हो. मी आहे इथंच." संतू त्याला म्हणाला.

बार टेंडर कसंनुसं हसला.

"आलोच." म्हणून तो तिथून निघाला.

गुन्हेगारी विश्वातील लोक या पापभिरू, अजातशत्रू माणसाच्या मागे का लागलेत हे इब्लिसला कळायला मार्ग नव्हता. तो जितका प्रयत्न करत होता, हाती आलेला घास हिरावला जात होता.

हे लोक आपला हेतू साध्य होईपर्यंत पुनःपुन्हा प्रयत्न करणार या तर्कावर आता इब्लिस अनाथाश्रमाबाहेरच आपली नजर गाडून होता.

जतीन यांच्या नजरेत आपण भरू नये याची तो काळजी ठेवून होता. एरवीही अनेकदा म्हणजे कोणत्याही धोक्याची चाहूल नसताना दक्षता म्हणून रवीने इथं सुरक्षेसाठी काही लोकं नेमली होती. जतीन यांना ते तेव्हा पटलं नव्हतं. आताही आपण आणि तेही इब्लिस म्हणून इथं पाळत ठेवून आहे हे समजल्यावर जतीन खरंच रागावतील, शिवाय जी कोणी व्यक्ती इथे कारस्थान करायला येईल ती आपल्या अस्तित्वाने सावध होईल वा भीतीने काही संशयास्पद वर्तणूक करणार नाही म्हणून तो लपूनच होता.

जेवढे दिवस लागतील तेवढे दिवस तो इथं असा थांबण्यास तयार होता, तरी त्याला खूप दिवस वाट पहावी लागलीच नाही.

समोर जतीन यांच्या सोबत वार्ता करून चालू पडलेला माणूस शंका यावी असाच वाटत होता. 'सूर्योदय अनाथालय' दृष्टीआड होताच त्यानं आपला मोबाईल बाहेर काढला होता. फटीचर असल्याचा आव आणणारा तो मोबाईल बाळगून होता.

इब्लिसनं त्याला गाठण्याचं ठरवलं होतं.

त्या बार टेंडरचं त्याच्या दुरभ्रमणध्वनीवर बोलणं चाललं होतं,

"हा... मी एन्ट्री मिळवली आहे. रात्रीच शोध घेईन..." तो निष्प्राण आवाजात बोलला.

कसलंच भान नसणारा तो मोबाईल खिशात सारून आपल्या घराचा रस्ता धरून होता. स्वतःला गरीब दाखवण्याच्या नादात त्याला आपली दुचाकी सोबत ठेवणं झालं नव्हतं.

आपल्या भविष्याची विवंचना त्याचं मुखमंडल व्यापून होती. हरवून, खेचल्यासारखा तो आपल्या घराच्या दिशेने चालत होता.

विचारांच्या तंद्रीत चालत असतानाच तो समोर कशाला तरी धडकला. हे त्याच्या ध्यानी येऊन त्याची मान वर झाली. विजेचा धक्का बसावा तसा तो चपापला. काही पावले लडखडतच मागे झाला.

समोर साक्षात 'इब्लिस' उभा होता. अनुकुचीदार लांब दात विचकणाऱ्या मुखवट्याचे रक्तवर्णी चमकणारी शिंगे त्या मुखवट्याच्या क्रुद्ध चेहऱ्यावरील रागीट भाव अधिक खोल गडद करीत होती.

आजपर्यंत याने इब्लिस बद्दल फक्त ऐकलं होतं. आज तो साक्षात समोर उभा होता.

"इब्लिस! सैतान! सैतान!" भ्रमिष्टागत म्हणतच तो मागे मागे सरकत गेला.

साक्षात मृत्यू पाहून त्याच्या डोळयांसमोर अंधारी आली होती. मेंदूत असंख्य मुंग्या रेंगू लागल्या होत्या.

डोळे उघडे ठेवण्याचा तो आटोकाट कसोशीने यत्न करत होता. त्याला ते मजत नव्हतं. समोरचा इब्लिस क्षणात अंर्तर्धान पावला होता. आपण जे पाहिलं, ज्याला पाहिलं ते खरंच खरं होतं? की आपण जे पाप करू जात होतो, त्यातून

उत्पन्न झालेल्या अपराधबोधाने व भीतीने ते दृश्य आपणास दाखवलं होतं हे क्षणभर त्याला समजलंच नाही.

त्या मिट्ट काळोखात त्याच्या डोक्यात झिणझिण्या येत होत्या. डोळयांसमोर मुंग्या नाचत होत्या.

आणि अचानक; तो मागे कशास तरी अडकला. आपल्या डोक्यावर कसलासा गडद प्रकाश नाचत असल्याचं त्याला जाणवलं आणि तो घाबरून घट्ट झाला. क्षणार्धात त्यास दरदरून घाम फुटला. जागचं हलण्याचं सुद्धा त्राण नसलेला तो कसातरी बळ एकवटून हलकेच मागे वळला, तर तो प्रत्यक्ष 'इब्लिस'लाच धडकला होता.

इब्लिसच्या मास्कवरील निऑन लाईट त्याला आपल्या डोक्यावर जाणवली होती.

उभ्या उभ्याच आपले प्राण आपला देह सोडून जात आहेत असा काहीसा भास त्याला झाला. तो जडावला. काही बोलण्याचं, जीवाची भीक मागण्यासाठी याचना करण्याचं भान त्याच्यात राहीलं नव्हतं. उभ्या जागी तो थरथर कापत होता. त्याच्या जीवाची घालमेल चालू होती.

"त्या अनाथाश्रमात काय करतोयस?" खोल गहिरा मशीनी खरखरणारा आवाज इब्लिसच्या मास्क मधून बाहेर पडला.

"मी... मला..." तो बार टेंडर इतकंच काय ते पुटपुटू शकला.

तसं तर तेवढं बोलण्याचीही त्याची स्थिती नव्हती. पण प्रश्न विचारणारा इब्लिस होता. त्याला उत्तर न करणं परवडणारं नाही असं त्याच्या मेंदूनं त्याला संकेत दिले असावेत. म्हणून काहीतरी तो बोलला.

मृत्यू पश्चातही काही काळ मेंदू काम करत असतो त्याप्रमाणेच अर्धमेला झालेल्या बार टेंडरचं भ्रमिष्ट झालेलं मस्तिष्क अजूनही बऱ्यापैकी कार्य-व्यवहार करत होतं हे या वरून त्याचं त्यालाच बहुदा स्पष्ट झालं.

परंतु जास्त काळ नाही! एक तीव्र कळ त्याच्या छातीत उत्पन्न झाली. छातीवर हात घेण्याची उसंत देखील त्यास मिळाली नाही. तो मागे कोलमडला. डोकं दानकन् काँक्रीटवर आदळलं गेलं. एक दोन पळातच त्याच्या कानातून व डोक्यातून रक्ताची धार लागली. पडताक्षणीच तो अविचल स्थिरावला होता. त्याची हालचाल तेव्हाच बंद झाली होती.

इब्लिसला पाहून त्याची भीतीने इतकी गाळण उडाली होती, की जागीच त्याचा प्राणपक्षी उडाला होता.

मृत्यूने उपकार करत त्याला इब्लिसच्या क्रूर दाढेतून अलगत बाहेर खेचलं होतं. तो स्वतंत्र झाला होता. मृत्यूदेवता ही त्याच्यासाठी भक्षक नाही, तर रक्षण बनून मदतीला धावून आली होती.

इब्लिसच्या हातून मात्र आणखी एक खिळा निसटला होता… सत्यापर्यंत पोहोचणाऱ्या नव्या शिडीचाही पायंडा निखळला होता…

●●●

हेली वेदनेने विव्हळणाऱ्या त्या इसमासमोर निष्ठूर उभी होती. हा जरी तिचा पाठलाग करत असला तरी तिला याच्याकडून जाणून घेण्यासारखं काही नाही हे तिला माहीत होतं.

हा तिच्या कमांडरच्या कामाचा माणूस होता. इब्लिसला हवी असणारी उत्तरं कदाचित हा घेऊन असेल...?

याच्यापाशी नुसतंच उभं राहून वेळ घालवण्याऐवजी तिनं आपल्या घरी जाण्याचा मनाशी निश्चय केला. तो कुठून तिचा पाठलाग करतोय हे ती जाणून होती. आपल्या घराची आणि त्याहून घरातील त्या मुलीची हुरहूर आता तिच्या मुखावर विस्तारली.

इतका वेळ त्या इसमाला ताब्यात घेण्याचं आपलं कर्तव्य समोर दिसत असल्यानं ती हा विचार मागे सारून होती. आता ती फिकिरीने खाडकन भानावर आली.

म्हणून मग त्याला बेशुद्धीचं इंजेक्शन देऊन तिनं आपला गुप्त अड्डा लॉक करून आपल्या घरी जाण्याचं ठरवलं. त्यास म्लान करून गॅरेजकडे चालत ती इब्लिसला कॉल लावत होती. जाताना ती साहजिक तिच्या कमांडरला सूचित करण्यास विसरली नव्हती...

इब्लिस एखाद्या तुच्छ प्राण्याकडे पहावं असा हृदय विकाराचा झटका आल्याने रस्त्यावर आचके देणाऱ्या त्या बार टेंडरकडे पाहत उभा होता. त्याची मान उंच होती, पण त्याची क्षुद्र हीनशी नजर त्या तळमळणाऱ्या बार टेंडरवर स्थिर होती.

त्या अमीट शांततेत त्याचा मोबाईल व्हायब्रेट झाला. ती शांतता इतकी गडद होती, की त्या व्हायब्रेशनचा आवाज देखील दूरवर घुमला.

आपली हीनकस नजर त्याच्यावर ठेवूनच त्यानं खिशातील मोबाईल पाहिला. 'हेली' नांव दिसलं. त्यानं कॉल पटकन उचलला.

दुसऱ्या कोणाचा त्याला फोन येणं तसं दुरापास्तच. आणि आला असता, तरी याकाळी त्यानं तो उचलला नसता. अशावेळी हेली कॉल करते म्हंटल्यावर तसंच काही महत्त्वाचं काम असणार हे त्यानं ताडलं व कॉल रिसिव्ह करून मोबाईल कानाला लावला. तो काही बोलला नाही. त्यानं फोन उचलला यातच त्यानं हेलीला बोलण्याची संमती दिली हे साध्य होतं. ते ओळखून हेली पलिकडून बोलली,

"बेसवर ये! तुझ्या प्रश्नांची उत्तरं देणारा इथं तयार आहे. मी असणार नाही. अर्जंटली घरी जावं लागत आहे."

शार्दूलची गाडी घेऊन जाणं तिला रास्त वाटलं नाही. ती गाडी सोबत वागवल्याने नसतं पोलिसांचं संकट मागे लागेल म्हणून तिनं ती गाडी तिथंच सोडली. कमांडर आल्यावर त्या गाडीचं काय करायचं ते तो बघेल, अगर नंतर कधीतरी आपणच शार्दूलला ती सुपूर्द करू हा तिचा विचार.

तरी घरी चालत जावं लागेल याची तिला चिंता नव्हती. तिथं इब्लिसच्या काही गाड्या उपस्थित होत्या. शार्दूलही कदाचित पोलिस बॅक-अप घेऊन शोधाशोध करत असावा अशावेळी मोठाली चारचाकी पिटाळून नजरेत येण्याऐवजी तिनं इब्लिसची टू-व्हीलर सोबत घेण्यास प्राधान्य दिलं. दुचाकी कुठूनही आडमार्गी नेता येते. पोलिसांपासून लपून, वाचून घरी पोहोचणं या मार्गे

तिच्यासाठी सोप्प होतं. पोलिस मागे लागलेच, तर कोणत्याही व कसल्याही खाचखळगे वा निमुळत्या गल्ली-बोळातून ती बाहेर पडू शकणार होती.

की-बोर्डला अडकवलेली चावी घेऊन तिथंच हँगरला टांगलेलं इब्लिसचं जर्किन चढवून ती गाडीशी झाली. बाहेरची कडक थंडी बोचू नये म्हणून तिची ती दक्षता होती.

ती इब्लिसच्या स्पोर्ट्स बाईकवर स्थिरावली. चावी फिरवली. फर्स्ट गिअर टाकला. मूठ वाढवली व क्लच सोडून ती वेगाने गॅरेजच्या दाराशी झाली. इब्लिसनं गॅरेजचा दरवाजा ऑटोमॅटेड केला होता. कोणत्याही तातडीच्या वेळी कसंही बाहेर पडायला लागतं अशावेळी गॅरेजचं दार उघडणं व झाकणं यात इब्लिसला जराही वेळ दवडायचा नव्हता.

हेली दाराशी आली, तोच सेन्सर्सना तिचं अस्तित्व जाणवून गॅरेजचं आटोमॅटिक दार टिल्ट होत उघडलं व ती गेल्यावर पूर्ववत झाकलं गेलं. लॉक झालं.

◆◆◆

शार्दूल डोळयांची चुरचुर सहन करत गाडी पळवत होता. सायरन त्यानं मुद्दामहून बंद ठेवला होता. रस्त्यानं सरळ रेषेत जाणारी त्याची गाडी दिशाहीन नक्कीच नव्हती.

काही अंतर असंच गेल्यावर त्याला हायवे सोडावा लागला. कच्च्या रस्त्याला त्याची गाडी लागली. त्यामुळं अनेक वळणे ओघानेच आली.

त्याचे गरुडचक्षू समोर माऊंट केलेल्या त्याच्या मोबाईलवर होते. मॅप जो रस्ता दाखवेल त्या दिशेने त्याचे हात स्टेअरिंग आपोआप वळवत होते.

त्याचं 'चोरीला गेलेलं वाहन' शोधण्यासाठी त्यानं त्या वाहनाच्या बिल्ट-इन जीपीएस फिचरचा वापर केला होता.

◆◆◆

हेली अखेर तिच्या घरी पोहोचली. वाटेत तिला काळजी वाटत होती अशी कोणतीच बाधा आली नाही. स्पोर्ट्स बाईक पार्क करून ती घाईने दाराशी झाली. दाराचे नॉब पूर्वीसारखे होते. बाहेर तरी संशय उत्पन्न करणारं काही नव्हतं.

मुसाच्या हस्तकानं आपलं काम पूर्ण केल्यावर ते होतं तसं बसवलं असणार. ही काळजी घेण्याची त्याला आता खरं गरज नव्हती, कारण जी चूक त्यानं करायला नको होती, ती त्यानं करून ठेवली होती. आपला कोणताच छाप तिथे सुटू नये म्हणून त्यानं काळजी बाळगायचं ठरवलं नक्की होतं, परंतु वासनेपुढं त्याचं काही चाललं नव्हतं.

समोर निश्चल पडलेली, प्रतिकार न करू शकणारी निखालस सूंदर मुलगी... अशी संधी त्याला पुन्हा मिळणार नव्हती. त्याच्या वासनेपुढे तो नमला होता. तीच वासना आता त्याच्या मृत्यूला कारणीभूत होणार होती. कारण त्यानं आपल्या वासनेच्या खूणाच मागे सोडल्या होत्या...

हेलीनं किल्ली नॉबमध्ये घातली. तिला लॉक उघडलं जाणवलं. दार फक्त ओढून घेतलं असल्याचं तिच्या लक्षात आलं. पण तिला हे पक्कं ध्यानात होतं, की तिनं दार लॉक केलं होतं.

ती सावध झाली. पर्स मधली 'कमांडर्' तिच्या हाती आली. सावधीगिरी बाळगत शस्त्रशज्ज ती आत शिरली. हॉलमध्ये तिला कोणी आढळलं नाही. तिनं चाहूल घेण्याचा प्रयत्न केला. घरी कोणी नाही याची खात्री झाल्यावर मग तिनं सरळ त्या खोलीकडे धाव घेतली, जिथे ती मुलगी होती.

खोलीत प्रेवेशल्या प्रवेशल्या तिच्यावर मोठा आघात झाला. ती जागीच स्तब्ध झाली. डोळयांतून अश्रूधारा पापण्यांतून वाट मोकळी करत रिसले. पक्षाघात झाल्यासारखी ती जागीच खिळली.

समोर ती मुलगी निपचित पडली होती. तिचे डोळेच काय ते सजीव होते, परंतु तेही आता निस्तेज निर्जीव पडले होते. नग्न पडलेल्या तिच्या शरीरावर जागोजागी ओरबाडल्याच्या खुणा अजूनही ताज्या होत्या. अवघड जागेतून खूप रक्त गेल्याचं तिच्या रक्ताने माखलेल्या अस्तव्यस्त शय्येवरून ओळखू येत होतं. तिचं शरीरही तसंच अस्तव्यस्त होतं हे वेगळे सांगणे न लगे...

आजपर्यंत जीला इतकं जपलं होतं, दुष्ट समाजापासून जपून ठेवलं होतं; तिचा अखेर अंत झाला होता... तेही; अशाप्रकारे... हेलीला इतक्या वर्षात बसलेला हा सर्वांत मोठा धक्का!

तो निर्जीव झालेला देह मग तसाच टाकून रागाने फणफणारी ती त्वेषाने बाहेर पडली.

आपल्या सर्विलीयन्सला लागून तिनं या काळया कृत्याचा कर्ता शोधून काढला. पोलीस डेटाबेसचा एक्सेस तिच्याकडं होताच. तिनं त्या इसमास पोलिसांच्या त्या माहितीच्या ढिगाऱ्यात शोधलं.

या आधीची त्याची बरीच कृष्णकृत्यं तिच्या नजरेस आली, त्याच्या त्या काळया कामांशी आत्ता तिला काही देणंघेणं नव्हतं. सध्या मुसा नांवाच्या एका व्यक्तीसाठी तो माणूस काम करत असल्याचं तिला दिसून आलं. मुसाचा बार तिला ठाऊक होता. दानिश सतत तिथं जात असल्यानं ती त्या जागेपासून अनभिज्ञ नव्हती. बदला घेण्याचं तिनं नक्की केलं. त्या इसमाचा फोटो आपल्या मोबाईलला घेऊन तिनं घर त्यागलं.

◆◆◆

हेलीनं शार्दूलची गाडी सोडली ती जागा आता फार दूर नव्हती. गाडी बराचवेळ एकाच ठिकाणी स्थिर असल्याचं शार्दूल पाहत होता. तिथंच हेली आणि तिनं नेलेला माणूस असणार असा शार्दूलचा विचार पक्का झाला.

न जाणे तिथं कशाला तोंड द्यावं लागेल? शिवाय त्या ठिकाणी जो कोणी असेल हेली, इब्लिस, किंवा आणखी कोणी, त्यांना गाडीच्या आवाजाने शार्दूल सावध करू इच्छित नव्हता. म्हणून त्यानं आपली गाडी नेव्हीगेशन दाखवत होते त्या रस्त्यापासून जरा वेगळया दिशेला नेली. पण जास्त दूर नाही. मग गाडी तिथंच सोडून त्यानं पायीच नेव्हीगेशनच्या मार्गावर चालण्याचं ठरवलं. हा त्याचा मूर्खपणा अलबत नव्हता. कारण त्याची स्वतःची कार त्या जागी उपस्थित होती. जीवावर

बेतेल असं काही घडणार असेल तर तो त्या गाडीचा वापर नक्कीच करू शकत होता.

एका हातात मोबाईल आणि एका हातात सर्व्हिस पिस्टल घेऊन काही वेळच्या अंतराने तो इब्लिसच्या सिक्रेट बेसवर पोहोचला. त्यानं लक्षपूर्वक त्या विराण जागेची टेहळणी केली. तिथं कोणी नसल्याची त्याची खात्री झाली.

तो मुख्य दरवाज्यापाशी आला. तो त्याला बंद मिळाला. आत शिरण्यासाठी कोणती जागा आहे का हे चौफेर फिरून पाहण्याची त्याची धडपड सुरू असतानाच त्याला कारचा आवाज आला. एका भिंतीआड तो होता. तेथून त्यानं वाकून पाहिलं आणि त्याला त्या गाडीतून उतरणारा इब्लिस दिसला!

तो झटकन बाजूला झाला. क्षणभर त्याच्या हृदयाचा ठोका चुकला. इब्लिसला तो घाबरत होता म्हणून नाही, तर तो असा अचानकच दृष्टिगोचर झाल्याने त्याची ही स्वाभाविक प्रतिक्रिया होती. मग दीर्घ श्वास घेऊन तो पुढे होऊन पाहू लागला. इब्लिस दार उघडून आत शिरलेला त्यानं बघितला.

इथंच तो इब्लिसला सामोरा गेला असताही, परंतु हेली आणि इब्लिस यांचा नेमका हेतू जाणून घेण्यासाठी त्याचा आधी प्रयत्न असणार होता.

लगोलग तो त्या दाराशी आला. इब्लिस आत असल्यानं दार लॉक नसणार हे त्याला वाटलं म्हणून त्यानं दार उघडून बघू म्हणून ढकलून बघितलं, तर त्याला ते खूलंच मिळालं. मग तो सावकाश कसलाच आवाज न करता आत शिरला. त्याची पिस्टल त्याच्या हाती होतीच. इब्लिसला त्याला मारायचं नव्हतं, तो स्वतःच्या सुरक्षेसाठी म्हणून ती पिस्टल सज्ज ठेवून होता. तो सभोवार निरीक्षण करणारी नजर टाकत सावध, सावकाश आत आत शिरत होता.

आणि एका खोलीच्या मध्यभागी त्याला दुरून इब्लिस 'त्या' इसमासमोर उभा दिसला. शार्दूलची हालचाल गतिशील झाली. तो पटकन त्या खोलीच्या चौकटीला लागून असलेल्या भिंतीला पाठ लावून पिस्टल तयार ठेऊन उभा राहिला.

सत्य त्यालाही जाणून घ्यायचं होतं, कारण हेलीच्या असं आततायी वागण्यामागे त्याला तिचं काही ठोस कारण जाणवत होतं. तसं नसतं, तर तिनं प्रसंगी शार्दूलवर हल्ला करून त्या इसमाला असं पळवून आणलं नसतं. हा माणूस नक्कीच काही तरी महत्त्वाची माहिती बाळगून होता. ती इब्लिस आणि हेलीला हवी होती. नाही तर इब्लिस सुद्धा असा शांत गायीवत सौम्य असा राहिला नसता. त्यानं कधीच याचा सोक्षमोक्ष लावून त्याला निकालात काढला असता असं शार्दूलचं मत होतं. ज्या अर्थी तो संयम बाळगून होता, त्या अर्थी प्रकरण कमालीचं गंभीर होतं. असं त्याला वाटत होतं.

हेलीची ती बंधक व्यक्ती जे काही सत्य आहे, ते इब्लिसला घाबरून तरी ओकेल या ठरावाने शार्दूलही वाट पाहत होता. शिवाय हेली अशी अचानक याला असाच ठेवून तडकाफडकी कुठं निघून गेली हा विचारही त्याला सतावत होता. ती येण्याची वाटही त्याला पहायची होतीच. ती वापस आली, की या व्यक्तीकडून त्यांनी उकळलेली इन्फॉर्मेशन आणि इब्लिस सोबत होणारं तिचं ऑर्गॅनिक डिस्कशन त्याच्या इब्लिस विरोधातील पुढील तपासात कारीगर ठरणार होतं. यासाठीच इब्लिसला याक्षणी ताब्यात घेता येत असताना तो स्वतःवर ताबा ठेवून होता...

बाकी हे जरूर होतं, की इब्लिस त्याचा जीव घेण्यास सरसावला वा त्या व्यक्तीवर जीवघेणा हल्ला झाला, तर शार्दूल त्याला वाचवायला पुढे होणार होता, तो गुन्हेगार असला तरीही! कारण गुन्हेगाराला शिक्षा करण्याचं काम हे न्यायालयाचं! कायदा हाती घेण्याची मुभा कोणाला नाही! यावर त्याचा ठाम विश्वास व निर्धार होता!

स्वतःची मन:स्थिती ठाम करून त्यानं आतील खोलीत डोकावून लक्षपूर्वक पाहिलं, तर हेलीचा पाठलागकर्ता त्याला जखमी आढळून आला. आणि इब्लिस खुर्ची ओढून त्याच्या समोर बसून राहिला होता. त्याच्या हाती त्याची सुप्रसिद्ध 'कमांडर्' अवतरली होती!

आता हा त्याला मारतोय की काय... असा विचार शार्दूलच्या मनी चमकला. गुन्हेगार असला, तरी त्याचा जीव वाचवणं हे आपलं कर्तव्य जाणून मग मागचा सगळा विचार त्यागून शार्दूल इब्लिसला समोर झाला.

◆◆◆

मुसाचा डिस्को बार रात्रीचा गजबजलेला असायचा. ही वेळ देखील त्याला अपवाद नव्हती. हेली 'कोल्ट कमांडर्' हाती घेऊन आत शिरली. विकस्टलेले केस घेऊन भ्रमिष्टासारखी नाचणाऱ्या लोकांमधून वाट काढत हेली मध्यभागी थांबली. एक गोळी तिनं वरच्या दिशेने दागली. म्युझिकच्या आवाजापेक्षा गोळीचा आवाज नक्कीच मोठा होता. मजा करायला आलेले

डोक्यावर पाय घेऊन एकमेकांना ढकलत, तुडवत बाहेर पळत सुटले. क्षणार्धात तो बार रिकामा झाला.

हेली कोण हे कोणाला माहीत नव्हतं, पण ती उच्छाद मांडायला आली आहे हे तिथल्या कर्मचाऱ्यांनी ताडलं. तिला घेरलं गेलं. एकाने हिंमत करून तो चक्क तिच्यावर चालून गेला. हेली जागची हलली देखील नाही. तिच्या कमांडर् मधून एक गोळी बाहेर सुटली. नऊ मिलिमीटर पॅराबेलम गोळीच्या शक्तीमुळे ज्या वेगाने तो पुढे आला होता, त्याच वेगाने तो मागे कोसळला.

बाकीचे हादरले. तरी हेलीला धडा शिकवण्याचं काम त्यांना करावं लागणार होतं. नाही तर त्यांचा हुजूर त्यांना जीवे सोडणार नव्हता हे त्यांना चांगलंच माहीत होतं. त्यामुळं त्यांना लंगडी हिंमत करणं गरजेचंच होतं.

सर्वांनी मनाचं बळ एकवटून तिच्यावर हल्ला केला. तिनं कमांडर् ठेवून दिली. या यकश्चित लोकांना मारण्यासाठी तिला इब्लिसच्या बंदुकीतून महागड्या गोळ्या वाया घालवायच्या नव्हत्या.

तिनं आपल्या हातांचे जोर वापरूनच सर्वांना क्षणात ढेर केलं.

हेली आपल्याला आवरणार नाही हे दुरून पाहणाऱ्या मग एकाने कुठून तरी बंदूक उत्पन्न केली. ती हाती येताच त्याच्यात एक वेगळंच बळ संचारलं. समोर मृत्यू दिसत असताना तोंडात अमृताचे थेंब पडावे तसे त्याला झाले. त्याच्यात हिंमत आली होती, तरी दुरून नेम चुकू नये म्हणून तो हेलीकडे सरकू लागला. त्याच्या चेहऱ्यावर वेड्याची झाक होती. मृत्यूला जिंकण्याची त्याची इच्छा दिसत होती. त्यात आपण यशस्वी होऊ ही त्याला खात्री झाली होती.

हेली विरुद्ध ते शक्य नव्हतं हे त्याच्या गावी नव्हतं. ती वीज तळपावी तशी जगाची हलली. तिनं एकाच लथ्था प्रहाराने त्याच्या हातून त्याची पिस्टल गहाळ केली होती. बारच्या अंधारी वातावरणात ती कुठे घसटत जाऊन पडली ते त्यालाही समजले नाही.

गन पडली त्या दिशेला वळलेली त्याची मान डोळयांनी आपली गन शोधत असतानाच हेलीनं हाताला धरून त्याला खेचलं व आपली मुष्टी त्याच्या श्वसननलिकेवर जोराने मारली. हथोड्याचा जोरकस प्रहार व्हावा तद्वत त्याची घशाची नळी फुटली. तोंडातून रक्ताची चिळकांडी उडाली. तो खाली कोसळत असताना हेलीला समोर आणखी एकजण तिच्यावर हल्ला करण्यास हजर दिसला. तिचे रक्त उभारलेले ते भयंकर डोळे त्या माणसावर रोखले होते. ती नजर पाहूनच तो भ्याला.

"मुसा! मुसाला बोलावं!" ती घोगरी गुरगुरली.

तो आपला जीव गमावण्यासाठी तिथं थांबला नाही. तिच्या हुकुमाची तामिल करण्यासाठी तो पळाला होता.

हेली सर्वांगात श्वास भरत मागील राखाडी लेदरचं कापड असलेल्या सोफ्यावर जाऊन बसली.

काही वेळाने शांत हसतमुख घेऊन तो तिच्या समोर येऊन उभारला. तिनं ओळखलं, पुढे आलाय तो 'मुसा'च आहे. त्याच्या मागे हेलीचा अवतार पाहून पळ काढलेला माणूस होताच. सोबत मुसाच्याच शरीरयष्टीचा एकजण.

मुसाची नजर चौखूर पाहत होती. आपल्या बारमध्ये दिसेल तिकडं आपलीच माणसं मरून पडलेली तो पाहत असून त्याच्या चेहऱ्यावर हास्य होतं.

घामाघूम झालेल्या, मुसच्या माणसांच्या रक्ताने भिजलेल्या, छातीचा भाता झालेल्या हेलीनं त्याची चाहूल लागताच त्याच्याकडं करारी भेदक पाहिलं.

◆◆◆

इव्हाना इब्लिस त्याच्या खुफिया अड्ड्यावर केव्हाचा पोहोचला होता. तो त्या व्यक्तीसमोर खुर्ची टाकून बसला होता. बेशुद्धीत असणारा तो सध्या त्याच्यासाठी निरुपयोगी होता. अन्यथा इब्लिसनं त्याला कधीच काळाच्या हवाली केला असता. पण एकतर याच्याकडून काही गोष्टी समजल्या, तर त्या जाणून घ्यायच्या होत्या. शिवाय एसपी राजन सोबत केलेली 'त्याच्या सुचनेविना कोणालाही न मारण्याची' ट्रीटी त्याची अडवणूक करत होती. त्याच्या शुद्धीवर येण्याची प्रतिक्षा करण्याशिवाय त्याला पर्याय नव्हता. सो; तो बसून होता.

बाहेर शार्दूलही इब्लिस इतका शांत कसा? नक्की त्याच्या डोक्यात काय चालू आहे हे जाणून घेण्याच्या प्रयत्नात नुसता त्याच्यावर लक्ष ठेवून होता. त्याच्या हातच्या सरकारी शस्त्रावरील त्याची पकड ढिल्ली झाली नव्हती. तो इब्लिसच्या अड्ड्यावर होता; कोणत्याही क्षणी स्वरक्षणासाठी त्याला त्याच्या पिस्टलचा वापर करावा लागेल असं त्यानं गृहीतच धरलं होतं. हेलीनं त्याच्या डोळ्यांची जी दुर्दशा केली होती, त्यात त्याचे डोळे चांगलेलंच दुखावले गेले होते. त्याची तमा न बाळगता तो सत्याचा कर्तव्यदक्ष शिपाई उभा होता.

इब्लिसवर त्याचा तिळा एव्हढाही विश्वास नव्हता. त्याला जेरबंद करण्याची ही नामी संधीही त्याच्या समोर होती. स्वतःला ठाम करून तो

इब्लिसच्या तोंडी झाला होता. हा त्या बंध माणसाला संपवू नये असा त्याचा कयास होता. त्यानं इब्लिसवर आपली पिस्टल रोखली होती.

इब्लिस मागे काही हालचाल झाली हे समजताच उठून त्या दिशेने वळला. त्याला शार्दूल त्याच्यावर बंदूक रोखून उभा दिसला.

"त्याला स्वाधीन कर आणि सरंडर हो." शार्दूल त्याला हुकुमी बोलला.

इब्लिसच्या डोक्यात मात्र काही वेगळंच चमकलं होतं. त्यानं विजेच्या वेगाने आपली गन काढून त्याच्यावर फायर केलं. शार्दूलला दुसऱ्याच क्षणी उभा राहणं देखील कठीण झालं. तो धडपडत खाली पडला.

इब्लिस त्याच्याकडं चालत गेला. त्यानं शार्दूलला घसटत आणून खोलीतच दूर लोटून दिलं.

पुन्हा पूर्व जागी येऊन इब्लिस त्या माणसाच्या ग्लानीतून भानावर येण्याची वाट पाहत राहिला.

◆◆◆

हेली आणि मुसा एकमेकांच्या विरुद्ध होते. हेली बसल्या जागेवरून आपली मृत नजर त्याच्यावर रोखून होती. मुसा निर्ढावल्यागत तिच्या समोर छाती ताणून उभा होता. हसत होता. हेलीनं त्याची माणसं मारली तरी तिच्या या कामगिरीवर तो बेहद्द खुश होता. अशी जंगजू स्त्री त्यानं आधी कधी पाहिली नव्हती.

हिला आपल्या हातांनी संपवायला मजा येणार हे त्यानं स्वतःला मनीच सांगितलं. आपले हातचे लेदर ग्लव्ह्ज त्यानं हेलीकडे पाहत टाईट केले. खूप

समाधानाचं व त्याचसोबत स्वतःबद्दल अभिमानाचं अहंकारी हास्य त्याच्या मुखावर पसरलं होतं. तो ग्लव्ह्ज आवळून पायाला गती देत पुढं सरसावलाच होता, की त्याच्या मोबाईलने त्याचे मनसुबे पस्त केले. उत्तर देण्यासाठी तो थांबला. हेलीवर सख्त नजर रोखून त्यानं कॉल रिसिव्ह केला. पलिकडून साक्षात अखिलीसची त्याला काही आज्ञा झाली. त्यांच्या मीटिंगच्या ठिकाणी त्याला बोलावण्यात आलं होतं.

त्यानं आपला विचार बदलला. हेलीला तिथंच सोडून तो मुख्य दरवाज्याकडे वळला. तोच हेलीच्या घरी धाड टाकलेला इसम त्याच्याकडं पळत आला.

"हा! रक्षित! आलास? झालं काम?" मुसा हेलीला कडव्या नजरेने बघत बोलला.

रक्षित, ज्याचं नांव रक्षित होतं, त्यानं हेलीच्या बहिणीचं स्वत्व, स्वातंत्र्य आणि अखेरीस जीव हिरावून घेतला होता.

हेलीचे डोळे चमकले. रक्षितची चोरटी घाबरलेली नजर हेलीवर होती.

"हं... होय..." तो बुदबुदला.

हीचा परत निकाल करू असा विचार करून मुसा दाराकडे पाऊल टाकत असताना रक्षित नांवाचा इसम त्याच्या मागून जाऊ लागला. त्यावर हेली कडाडली.

"मुसा! त्याला माझ्या हवाली कर! त्यानंतरच तू इथून जाऊ शकतोस." ती वेड्यागत घोगऱ्या आवाजात गुरगुरली.

मुसा हसला. त्यानं मागे त्या इसमाकडे पाहिलं,

"तू ओळखतोस या बाईला?" मुसाने हेलीच्या घरी घरफोडी करणाऱ्या रक्षितला विचारलं.

"हिचीच माहिती काढायचं काम होतं." घाबरलेला तो बोलला. पण आपण भ्यायलोय हे त्यानं मुसाला भासवू नाही दिलं.

"अच्छा!" मुसा उद्गारला व त्यानं हेलीकडे पाहिलं,

"तर शिकार स्वतःच चालून आलं आहे तर! बोल मुली, तू त्या जोनाथनची माहिती काढण्याच्या मागे का लागली होतीस?" मुसानं तिला प्रश्न केला.

तो जणू तिच्या कानात शिरलाच नाही. मग मेंदूत तो प्रोसेस होणं दूरच.

"त्याला इकडं दे!" तिनं मुसालाच कडाडून आदेश दिला.

तिची आज्ञा मुसाला अधिकच गुदगुल्या करून गेली. तो रुंद हसला. इतक्यात मुसाचा फोन आणखीदा वाजला. तो फोन कुणाचा असेल ते त्यानं ताडलं.

रक्षित पण विचारात पडला. आपली करणी मुसाला कळली व त्यानं या मुसाचा विचार बदलला आणि आपल्याला यानं हेलीच्या हवाली केलं, तर आपली धडगत नाही. हेलीनं मांडलेलं मृत्यूकांड त्यानं लपून याचिदेही पाहिलं होतं. त्यानंच त्याचा जीव अगदी कंठाशी आला होता.

किंवा मुसाच स्वतः खवळला, तर तोही आपला जीव घेऊ शकतो. याने नाही घेतला, तर किंगपीन अखिलीस आहेच! या विचाराने तो पुढे सरसावला व मुसाच्या कानी लागला,

"बॉस, निघायला हवं. नाहीतर किंगपीन आपल्यावर चिडतील. ही वेडी झालेली दिसते. हिच्याकडून काही कळेल असं वाटत नाही. तसंही आपल्याला

हवी ती माहिती मी मिळवली आहे. आपण निघालेलं बरं..." रक्षित स्वतःचा जीव संरक्षित करण्यासाठी सुचवलं.

मुसालाही ते पटल्याचं त्याच्या तोंडावरून दिसलं. पण हातातील काम संपवल्याशिवाय असंच निघून जाणं त्याच्या स्वभावाला माणवणारं नव्हतं. ब्लेझरमध्ये दडवलेली पिस्टल त्यानं बाहेर काढली. हेलीला आपला नेम करण्यास तो सज्ज होत असतानाच त्याचा मोबाईल पुन्हा घणाणला.

अखिलीसचा हा कॉल टाळून चालणार नव्हता. नाहीतर त्याच्या रागाला सामोरं जावं लागलं असतं. आणि ते दुःख हेलीला मारण्याच्या सुखापेक्षा त्याच्यासाठी जरूर मोठं ठरलं असतं. हेलीला मारण्याची आपली इच्छा मुसाला मारावी लागली. एक वैतागी तिरसट भाव त्याच्या चेहऱ्यावर चमकला. त्यानं पिस्टल ब्लेझरमध्ये आहे तशीच सारली.

"बॉस..." मुसानं जलदीनं बाहेर पडावं जेणेकरू रक्षितलाही निघता येईल म्हणून त्यानं मुसाला चावी दिली.

मुसानं हात उंचावून त्याला गप्प राहण्याची ताकीद केली. रक्षित चांगलाच दडपला. मुसानं आपल्या एका भरवशाच्या चाकराला आदेश केला,

"हिची काळजी घ्या!" आणि त्यानं बार सोडला.

रक्षित देखील भर्रकन त्याच्या मागून गेला. मृत्यूच्या जबड्यातून सुटल्याचा त्यानं अनुभव केला.

त्यांना गाठण्यासाठी हेली आपली जागा सोडण्यास त्वरेने सज्ज पाहून स्वतःला प्रतिमुसा समजणारा आणि मुसाच्या अपरोक्ष त्याचा कारभार सांभाळणारा शहानवाज हेलीला उभा सामोरा झाला. अगदी मुसाच्या अविर्भावात!

तो हेलीकडे झेपावला. हेलीनं ती पाय लावून बसलेला टेबल त्याच्या दिशेनं पायानेच भिरकावला. टेबल सरकत त्याच्याकडं जात असताना त्यानं त्यावरून उडी घेतली आणि तो हेली समोर हजर झाला. दोघांमध्ये चुरशीची लढत झाली. अखेर हेलीनं त्याची मान झटक्यात मोडली. मुसाची नक्कल करायला गेलेला तो हेली समोर काही मिनिटेच तग धरू शकला होता.

त्याला जहाँन्नुमला धाडून आता हेली त्या दुसऱ्या व्यक्तीकडे झाली. तो भीतीनं जडत्व प्राप्त झाल्यानं जागीच थिजून उभा होता. हेलीनं त्याची कॉलर पकडली.

"मुसा सोबतच्या माणसाला घेऊन कुठं गेला आहे?" तिनं सिंहीण गर्जना केली.

"म... माहीत नाही..." बोबडी वळलेला तो इतकंच बोलू शकला.

हेलीनं त्यालाही यमाच्या सोबतीला धाडलं होतं.

आणि तो; ज्याने हेलीच्या बहिणीवर अत्याचार करून हेलीचा रोष ओढवून घेतला होता, त्याला जिवंत ठेवून काही उपयोग नाही असं वाटून हेलीनं त्याचाही जीव संपवण्याचं मनी निश्चितच केलं.

मुसा या बारचा मालक. हेलीच्या घरी धाड टाकलेल्या माणसाची त्याच्याकडून माहिती मिळेल वा तो स्वतः कदाचित इथं सापडेल म्हणून ती इथं आली होती, सावज टप्प्यात होतं देखील, परंतु चकवा देऊन तिच्या मगरमिठ्ठीतून अगदी तिच्या समोरून निघून गेलं होतं.

तिचं इप्सित इथं साध्य झालं नव्हतं. तरी तिच्याकडं अधिक एक पर्याय होता, तिच्या अपराध्यापर्यंत पोहोचण्याचा...

◆◆◆

मुख्य दार जोराने आदळल्याच आवाज झाला. हेलीच असणार म्हणून इब्लिसनं मागं पाहण्याची तसदी घेतली नव्हती.

हेलीच आली होती. ती रागाच्या भरात त्या इसमाला ठेवलेलं तिथं पोहोचली. इब्लिस तिथंच बसून होता. त्याची एकटक नजर त्या इसमावर लागली होती. त्याच्या जागे होण्याची तो वाट पहात होता.

हेलीनं येताच त्या माणसाच्या मांडीत आणखी एक गोळी सारली. वेदनेनं त्याची हरपलेली शुद्ध परत आली. तो मोठ्याने ओरडला. इब्लिस देखील उठून उभारला. त्यालाही कळलं नाही की अचानक हिने असं वागण्याचं कारणच काय?

त्याच खोलीत कोपऱ्यात पडून असणारा शार्दूलही दचकला व बंदुकीच्या त्या मोठ्या आवाजाने ग्लानीतून तो बाहेर आला.

इब्लिसनं त्याला मारलं नव्हतं. शार्दूल हा कायद्याचं पालन करणारा एकमेव असा अधिकारी होता, त्याला इब्लिस कधीच मारणार नव्हता. फक्त तो बाधा ठरू नये म्हणून इब्लिसनं  आपल्या ट्रॅन्क्वीलायझर गनने एक डार्ट शार्दूलवर फायर केलं होतं, ज्यात बेशुद्धीचं औषध होतं. कदाचित मात्रा कमी असावी म्हणून तो इतक्यात भानावर आला होता. भिरभिरणारे डोके व डोळे स्थिर होत असताना तो तसाच तळमळत पडून होता.

"कोणीतरी माझ्या बहिणीला ठार मारलं! तेही तिच्यावर अतिप्रसंग करून! तो जो कोणी आहे, तो याचाच साथीदार आहे." ती त्वेषाने ओरडली.

"तुला बहीण होती?" इब्लिससाठी ही माहिती नवीन होती.

नियमानुसार आपली वैयक्तिक आयुष्यं एकमेकांपासून दूर ठेवल्यानं त्याला हेलीबद्दल ही खबर नव्हती.

"हो! तुला काय वाटतं? मी तुला माझ्या घरापासून लांब का ठेवलं होतं? कारण तिच्याबद्दल कुणाला कळू नये म्हणून! एकदा तिच्यावर असाच एकाने बलात्कार केला होता. मी तेव्हा पोलिसांत होते. माझे अधिकार जास्त नव्हते आणि तिथल्या भ्रष्ट अधिकाऱ्यांमुळे कायद्याने त्याला शिक्षा करणं मला शक्य नव्हतं.

"एसपी नवीन आल्यावर त्यानं मला तुझ्याकडे तडजोडीसाठी पाठवलं. तेव्हाच ठरवलं, की तुझ्या मार्फत बहिणीच्या गुन्हेगाराला संपवायचं. मी ते यशस्वी केलंही. आपण भेटल्यानंतरची पहिली असाईमेंट त्याचीच होती. त्यासाठी मला एसपीच्या डाटाबेस सोबत छेडछाड करावी लागली. ती मी केली. बहिणीला तुझ्यामार्फत न्याय मिळवून दिला. मला माहित होतं, मी तुला सत्य सांगितलं असतं, तरी तुला मला मदत केलीच असतीस, पण हे आत्ता इतक्या वेळच्या सोबतीने उमगलं आहे. त्यावेळी तुझ्याबद्दल मला इतकी विश्वासार्हता नव्हती. शिवाय मला बहीण आहे हेच मुळात लपवून ठेवायचं असल्यानं मी ते घडवून आणलं.

"त्यानंतर मी आणि ती शांत आयुष्य जगत होतो. तिला या हीन जगापासून दूर ठेवलं होतं... लपवून. तिच्यावर झालेल्या अत्याचाराने ती जिवंत प्रेत झाली होती. कसल्याच सद्भावनांपासून ती परे होती. आनंद, सुख कसलं ते ती अनुभवू शकत नव्हती. तिला या अवस्थेतून बाहेर काढणं एवढं एकच लक्ष माझं उरलं होतं. त्यासाठीच पैसे हवे होते आणि म्हणूनच मी तुझी साथ देत राहिले.

"पण... पण... या घाणेरड्या जगातील आणखी एका पिपासूने पुन्हा माझ्या बहिणीच्या अब्रूवर घाला घातला. तिला जीवानिशी मारलं. आता बस! आता तुझ्या खांद्यावर बंदूक ठेवून चालवणं बस! हा काटा काढून आता मी स्वतः माझ्या बहिणीचा बदला घेणार!" ती रणरागिणी आग ओकत होती!

बोलून होताच तिनं तिच्या पिस्टलचं बट त्या माणसाच्या हनुवटीवर ठेवून दिलं. रक्ताची चिळकांडी त्याच्या तोंडून उडाली.

"बोल हरामखोरा! माझ्या घरी घुसलेला तुझा साथीदार कुठं मिळेल! बोल!" तिनं आणखी एक त्याला ठेवून दिली.

"मुसा... मुसा..." तो असमंजस पुटपुटला.

"मुसाच त्याला घेऊन गेला आहे. कुठं गेले असतील ते?" हेलीनं दात ओठ खात विचारलं.

"अखि... अखिलीसकडं..." अर्धवट शुद्धीत आलेला तो कसंतरी बोलला.

ते नांव ऐकताच हेली बाहेर पडणार, इतक्यात इतका वेळ बुद्धी स्थीर होईस्तोवर पडून राहिलेला शार्दूल चक्कर येत असताना तशाही परिस्थितीत सावरत उठला. हेली काय करायला जाणार आहे तो समजला होता व तो हे खासच होऊ देऊ इच्छित नव्हता. तो तिच्या पुढे झाला.

"हेली, शांत होत. आपण मार्ग काढू. मी मदत करेन!" तो तिला समजावण्याच्या पवित्र्यात बोलला.

ती ऐकून घेण्याच्या मनःस्थितीत नव्हती. तिनं शार्दूलवर पिस्टल ताणली.

"शार्दूल; मधे येऊ नको. नाही तर मी तुझाही मुलाहिजा बाळगणारी नाही! जाऊ दे मला!" आणि ती त्याच्यावर व साक्षात इब्लिसवर देखील गन ताणत निघून

गेली. आपल्या हातून गुन्हा होऊ नये म्हणून इब्लिस देखील आपल्याला रोखण्याचा प्रयत्न करेल हे ती उमगून होती. ती गेल्यावर लगेच शार्दूल इब्लिसकडे वळला,

"काय तुला हेच हवंय, की सगळयांनी गुन्हेगारीचा मार्गच स्वीकारावा?" त्यानं रागात इब्लिसला प्रश्न केला.

"लोकांना ही वाट स्वीकारायला लागू नये म्हणून तर मी हे अपराध हाती घेतलेत!" इब्लिस मशीनी आवाजात बोलला.

"असं असेल, तर याला माझ्या हवाली कर! आणि सरंडर हो!" शार्दूल त्याला बोलला.

"ते तू विसरूनच जा. सध्या एवढंच ध्यानात घे, की मीच हेलीला थांबवू शकतो!" इब्लिस त्याची तमा न बागळता बोलला.

शार्दूल विचारात पडला. पण त्यानं जास्त वेळ घेतला नाही. हेलीला अपराधांपासून प्रवृत्त करणं त्याच्यासाठी अग्रस्थानी होतं. त्यानं इब्लिसला तिथून जाण्याची परवानगी बेमनानेच दिली.

इब्लिस गेल्यावर शार्दूलनं त्या इसमाकडं नजर टाकली. त्या माणसानं कधीच मान टाकली होती. हे जग सोडलं होतं. शरीरातील अतिरिक्त रक्त रात्रभर बराचवेळ वाहून गेल्याने तो जगला नव्हता. शार्दूल हताश होऊन जागीच खीळ बसल्यागत उभा राहिला, त्या जड देहाकडे पाहत...

◆◆◆

हेली वेड लागल्या सारखी स्पोर्ट्स बाईक पळवत होती. वाट सुन्न होती, शिवाय जरी रस्ता ट्राफिकने भरलेला असता, तरी ती त्यातूनही गोळीसारखी निसटली असती हे निश्चित.

भरधाव जाणाऱ्या हेलीला एका चौकात मात्र अचानक थांबावं लागलं. इब्लिसनं आडवी गाडी घालून मधेच ती थांबवली जी होती...

हेली टू-व्हीलर वरून न उतरताच इब्लिसला ओरडली,

"माझ्या जागी तू असतास, तर काय केलं असतंस? प्रामाणिक उत्तर दे!" ती गरजली.

इब्लिसची मान खाली गेली. या प्रश्नानंतर तो हेलीला कसं अडवू शकणार होता? त्याला तो अधिकारच नव्हता. जतीन, ज्यांना तो आपल्या वडिलांच्या जागी मानतो, त्यांचा जीव धोक्यात आहे हे समजल्यावर नुसत्या कल्पनेनं तो इतका बिथरला होता, तर इथं तर हेलीची बहीण बेअब्रू करून जीवे मारली गेली होती! तीही आधी...!

त्यानं आपली कन्व्हर्टिबल मागं घेतली. हेली इब्लिसची परवानगी ओळखून दुचाकी पळवत निघून गेली. इब्लिस तिथंच तसाच त्याच्या गाडीत खिन्न बसून राहिला... असहाय्य...

# ८. प्रतिशोध...

हेलीच्या घरी कांड केलेला रक्षित अखिलीस समोर उभा होता. त्याला मिळालेल्या दुसऱ्या संधीचं त्यानं त्याच्या नजरेत सोनं केलं होतं. याचं त्याला वाटणारं बक्षीस सुद्धा तो आधीच लुटून आला होता. त्या कौन्सिलमध्ये गोलाएथ अग्रणी होता. अखिलीस व गोलाएथ मधला मध्यस्थ असल्यानं रिकार्डोही साहजिक हजर होता.

"मला वाटलं गोलाएथ थंड बक्षात पडला की काय?" अखिलीस गोलाएथला चथवण्यासाठी डिवचत कुचकट बोलला.

गोलाएथची अकड पहिल्या भेटीतच त्याच्या डोक्यात गेली होती. म्हणून गोलाएथला चिडवण्याची एक संधी अखिलीस सोडत नव्हता.

"तोंड सांभाळून बोलायचं! ही लोकं तुला भिऊन असतील! मला काही कारण नाही तुला घाबरायचं! मी कोणाला बांधील नाही!" गोलाएथ अखिलीसवर बोट रोखून त्याला ओरडला. त्याची मूठ चांगलीच आवळली होती. त्याच्या हाती कोणती वस्तू असती, तर ती भग्न झाली असती!

त्याच्या या वागण्याला मुसा खवळला. पण जिथं अखिलीस हसत बसला होता, तिथं आपण काही पाऊल उचलावं हे त्याला रास्त वाटलं नाही. गोलाएथनं अखिलीसचा केलेला अपमान गिळून तो निमूट बसून राहिला. इथलं वातावरण चिघळू नये यासाठी मग विषय बदलावा म्हणून त्यानं हेलीच्या घरी धाड टाकलेल्या त्या माणसाकडे पाहिलं,

"बोल, रक्षित. काम झालं?" मुसाने त्याला दरडावत विचारलं.

"होय बॉस! आपल्या मारल्या गेलेल्या सगळ्या माणसांचा इन्फॉ-डेटा तिच्या लॅपटॉपला सापडलाय." रक्षित फुशारकीने सांगता झाला.

"तिचं कामाचं स्वरूप? ती ही माहिती का गोळा करत होती?" अखिलीसनं स्वतःवर कसलाच परिणाम पडू न देता शांत विचारलं.

"तिला ही माहिती सुप्रीटेंडेंटकडून पास होत होती. विशेष म्हणजे ती मुलगी इब्लिससाठी काम करते. बहुदा एसपी आणि इब्लिस मिळालेले असावेत असा माझा अंदाज सांगतोय... शहरात कोणी मोठा क्रिमिनल आला, की एसपी राजन जाधव त्याची सुपारी हेली करवी इब्लिसला देत असल्याचं हेलीकडच्या डेटा वरून लक्षात येतंय. एसपी त्यासाठी इब्लिसला पैसेही देतोय." रक्षित त्यानं रक्षित केलेली माहिती देऊन रिकामा झाला.

"इब्लिस...?" मुसाला चांगलीच धडकी भरली.

"मला अंदाज होताच. अखेर कन्फर्म झालं!" अखिलीसला कसलंच आश्चर्य वाटलं नव्हतं. तो अगदी सहज बोलून गेला.

"म्हणजे जोनाथनला सुद्धा...?" रिकार्डो त्राण गेल्यासारखं अस्फुट उच्चारला.

रिकार्डोलाही खरं तर जोनाथनच्या खुनामागं इब्लिसचीच शंका येत होती. इब्लिसचं नांव तोंडात सुद्धा नको या भीतीनं तो गप्प राहिला होता आजवर. आता तर खातरजमाच झाली. तो भ्याला. प्राणांतिक भ्याला...!!!

"होय!" आपल्या कामगिरीने आपल्या जीवाला आता आपल्या हुजूरांकडून काही धोका नाही हे पक्कं धरून तो बेफिकीर बोलला.

इब्लिसचं नांव ऐकताच शांत असणारा मुसा देखील गडबडला. शब्दशः बोलायचंच; तर घाबरला!

"हा कोणाय इब्लिस? की त्याला इतकं घाबरावं?" गोलाएथनं इथं नवीन असल्यानं न जाणून प्रश्न केला.

"मग घाबरायला लाग! तुला काय वाटतं, त्याचं नांव इब्लिस का पडलं असावं? सैतानांचा नेता! सैतांनाचा पण सैतान आहे तो! एका रात्रीत त्यानं हे शहर गुन्हेगारी मुक्त केलं होतं! इथं एक क्रिमिनल ऑर्गनाझेशन काम करत होती, तिला रात्रीत त्यानं उखडून टाकलं! असं म्हणतात, की त्या रात्री पंचगंगेचे पाट रक्ताचे झाले होते." अखिलीस गोलाएथला भीती घालत बोलला.

पण तो बोलत मात्र प्रामाणिकपणे होता.

"मलाही अंडरवर्ल्ड मध्ये 'गोलाएथ' म्हणून ओळखतात हे ध्यानात असू दे!" डिवचला गेलेला गोलाएथ काळ्या ढगांपर कडाडला.

अखिलीस हसतच होता.

"असशील तू त्याच्यापेक्षा मोठा, पण तो तुझ्यासाठी 'डेव्हिड' ठरला नाही म्हणजे मिळवलं!" अखिलीस गोलाएथची चेष्टा करत म्हणाला.

"बास! आता बघूच कोण कोणाचा घात करतं. हे सगळं जोनाथनच्या शेवटच्या असाईमेंट पासून सुरू झालं होतं. तिथूनच याचा शेवट होईल. तू जोनाथनला दिलेलं काम काय होतं?" गोलाएथनं बोलण्यास अखिलीसला आज्ञाच केली.

हा गोलाएथचा प्रमाद गोलाएथचं काही नुकसान करणार नाही, परंतु कदाचित आपल्याला बुडवेल म्हणून घाबरलेला रिकार्डो मधेच बोलला,

"मी... मी माहिती पुरवेन त्याला. ये... येऊ का आम्ही...?" भ्यायलेला तो उभारला.

गोलाएथ रिकार्डोच्या या वर्तनावर चिडला. 'अखिलीसला आपली भीती दाखवायला नको होती यानं! हा आपल्यालाही अधिकच कमी लेखेल!' असं त्याला मेंदू ओरडला. पण त्याला त्याचं काम होण्याशी मतलब होतं. त्यामुळं तो काही बोलला नाही. आणि उठून जाऊ लागला...

अखिलीसनं मात्र हसण्याचं काम केलं. तो ओरडला,

"प्रयत्न करणार असशील, तर कर. पण ताकीद देतो; इब्लिस समोर सगळेच पालापाचोळा आहेत. तू हे काम करू शकशील असं वाटत नाही! आमचा आणखी एक माणूस मारला गेलाय. इब्लिसला नुसतं बघूनच हार्ट अटॅक आला त्याला!" अखिलीस गोलाएथला उकसवत बोलला आणि...

"बॉडी आणा!" अखिलीस मोठ्याने ओरडला.

जणूकाही त्याच्या आज्ञेची वाटच पहात असलेले त्याचे दोन आज्ञाधारक बार टेंडरची डेडबॉडी घसटत घेऊन आले आणि कार्पेटवर त्यांनी त्याला भिरकावून दिलं.

त्या प्रसंगानं त्या खोलीत गोलाएथ आणि रिकार्डोच काय ते चकित होते.

"किंगपीन, आम्ही यांच्या पाळतीवरच होतो. यानं प्लॅन होता तसं त्या अनाथाश्रमात व्यवस्थित एन्ट्री मिळवली होती, पण इब्लिस समोर आला आणि नुसतं त्याला बघून याचा जीव जागीच गेला. याचा मोबाईल इब्लिसच्या हाती लागला आहे. हा मेलेला बघून इब्लिसनं तो उचलून घेतला होता." बार टेंडरला आणलेल्यांपैकी एकाने मंद आवाजात माहिती दिली.

पूर्वी त्याने तशी ती सांगितलीच होती, पण मोबाईल इब्लिसकडे गेल्याची ही बातमी मात्र त्याच्याकडून समोरासमोरच देण्यात आली होती...

हे ऐकून मुसा पण विचारात पडला काही क्षण.

आता इब्लिस किमान मुसापर्यंत तरी कोणत्याही क्षणी पोहोचणार होता हे अखिलीसही समजून चुकला. कारण बार टेंडर काम करत असलेला बार मुसाच तर चालवायचा... मुसा त्याचा हुकुमी इक्का होता, काही झालं, तरी तो इब्लिसला आपल्यापर्यंत पोहोचू देणार नाही याची अखिलीसला खात्री होती, परंतु काय मुसा इब्लिस समोर तग धरू शकणार होता...? हा मोठा प्रश्न होता अखिलीस समोर... नसेल कदाचित, पण इब्लिस आपल्याला टक्कर नक्कीच देऊ शकणार नाही, हा त्याला आत्मविश्वास होता आणि त्यामुळे तो यत्किंचितही चळला नव्हता.

इब्लिसचं नुसतं नांव ऐकल्यावर मुसाच्या स्वभावातील थंडपणाच गोठला होता. तरी बार टेंडरची ही हकीकत त्याच्यासाठी काही नवी नव्हती. त्याच्या मृतदेहाला पाहून त्याच्यावर तसा काही परिणाम झाला नव्हता.

रक्षित सुद्धा त्याच्यावर सोपवलेली कामगिरी पार पाडायला गेला असल्यानं त्याच्यासाठी बार टेंडरची इब्लिसशी भेट व त्याचा मृत्यू ही बातमी नवीन होती. त्याचीही आता धांदल उडाली. आपण किती मोठी चूक करून बसलो आहे ते त्याला या बार टेंडरची अवस्था पाहून उमजलं.

"याचा मोबाईल इब्लिसनं पाहिला होता?" मुसाचा प्रश्न होता हा.

"आमच्यासमोर तर नाही बॉस!" दुसरा हस्तक उत्तरला.

"मग डेटा इरेज करून टाका!" मुसा गडबडीत बोलला.

"ते काम झालं आहे बॉस... इब्लिसनं मोबाईल उचलतात आम्ही आपल्या टेक्निकल टीमला कळवून सर्व मोबाईल वाईप आऊट केला. डोन्ट थिंक, की त्या इब्लिसला काही हाती लागेल."

"गुड!" मुसाच्या मुखावर पुन्हा पूर्ववत निर्भीड स्मित उकेरलं गेलं. आत्मपौढी व अहंकार दर्शवणारं...

इब्लिसचं नांव ऐकून सर्वच हादरले होते, तर अखिलीस ओठांवर स्मित आणि डोळ्यांत करारीपणा घेऊन गोलाएथकडं पाहत होता. गोलाएथची विखारी नजर मनोमन अखिलीसला जाळीत होती,

'याला मी शतप्रतिशत संपवणार! नाही! पण आधी इब्लिस! इब्लिस!' असं गोलाएथनं स्वतःशी ठरवलं.

"डोन्ट पोक युअर् नोज इन माय मेस! कोणालाही त्या असाईन्मेंटवर लावायचं नाही! ही माझी तुला ताकीद आहे! इब्लिस फक्त माझी शिकार आहे!" असं ठणकावून त्या चर्चासत्राला मग गोलाएथ  पाठ दाखवून निघून गेला.

रिकार्डोला गोलाएथच्या मागून जाणं भाग होतं. त्याही गडबडीत तो अखिलीस समोर झुकायला विसरला नव्हता. लवूनच तो घाबऱ्या भावाने लगोलग बाहेर पडला.

अखिलीसच्या ओठांवर मात्र आत्मपौढी मिरवणारं मुत्सद्दी स्मित झळकलं. इब्लिसची स्तुती करून वा त्याची भीती घालून त्यानं इब्लिस व गोलाएथ मधील वादात आणखीन एक ठिणगी टाकली होती. मुळातच इब्लिसनं जोनाथनला मारल्याने गोलाएथ त्याच्यावर खवळून होताच, पण इब्लिसची प्रसंसा

ऐकून आणि तो आपल्यापेक्षा सरस आहे असं समजलं जातंय हे पाहून चवताळला होता.

इब्लिस आपल्या मार्गातून दूर होईल याची योजना करण्यासाठी अखिलीसनं गोलाएथच्या आत्मप्रौढतेवर आघात करेल असा हा सायकॉलॉजिकल खेळ त्याच्यासोबत खेळला होता, जो वर्मी लागला होता. इब्लिस आता गोलाएथच्या हातून हमखास यमाशी गळाभेट घेणार होता.

त्याचक्षणी अखिलीसच्या घराबाहेर एक रणरागिणी तिला अडवायला येणाऱ्या अखिलीसच्या पैशांशी प्रामाणिक गुंडांना यमसदनी पोहोचवत होती. दूर उभारून हे दृश्य गोलाएथ पाहत होता.

रणचंडी युद्धक्षेत्रात थयथयाट करत असेलसं ते कोणासही दृश्य वाटावं असा तिचा तो आवेश होता...

रिकार्डो गोलाएथ सोबत असूनही हेलीचा तो यमावतार पाहून गर्भगळीत झाला होता.

एक एक अडथळा पार करत ती घरात घुसत होती. अखेर ती अखिलीस, मुसा आणि तिच्या घरात घुसखोरी केलेल्या व तिच्या जगण्याचं कारण क्षणात होत्याचं नव्हतं करणाऱ्या रक्षित दर्शनी उभी होती.

तिचा तो रक्ताने अभिषेक केलेल्या कालीचा अवतार पाहून अखिलीस किंवा मुसावर काही परिणाम झाला नाही. रक्षित जागीच गोठला होता. त्याला त्याचं पाप आठवलं होतं. पापानं सोबत आणलेलं भविष्य लख्खं दिसत होतं. त्याचे पाय लटपटत होते.

"मला तो हवाय!" एखादं भूत बोलावं तशी ती बोलली!

"फक्त तोच नाही! तुम्ही सगळे मरणार आहात!" ती पुढे म्हणाली.

भानावर नव्हती ती. बोलताना तिची अंगुली सर्वांवर फिरली. डोळ्यांसमोर आलेले केस देखील तिनं बाजूला सारले नव्हते. त्यातूनच ती आपली पिशाच्चदृष्टी सर्वांवर फिरवत गेली.

अखिलीस स्मित करत हसला.

"कारण?" त्यानं विचारलं.

"यानं माझ्या बहिणीचा जीव घेतलाय! तिची अब्रू लुटलीय!" ती रागाच्या भरात मृत बोलली.

"हे खरं आहे?" अखिलीसनं ओरडून विचारलं. तो क्षणात अपरिमित चिडला होता. त्याचं हसू लोपलं होतं.

अखिलीसच्या त्या अचानक बदललेल्या भयंकर अविर्भावाने जड झालेला रक्षित काही बोलू शकला नाही. एकीकडं हेली, दुसरीकडं मुसा, तिसरीकडं चिडलेला अखिलीस. तो आधीच मेल्यात जमा होता.

"काय हे खरं आहे?" अखिलीस पुनः कडाडला.

"सॉरी किंगपीन!" तो याचनेच्या रडवेल्या स्वरात बोलला. अखिलीसच्या पायाशी पडला.

अखिलीसनं त्याला पायानं झिडकारून दूर लोटलं. चिडून तो मुसाकडं वळला.

"मुसा, तू बेजबाबदार वागतोस त्याची लागण अशी होते! मी सुरवातीलाच बजावलं होतं, मला सगळं सामंजस्यानं घडवायचं आहे! तरी तू दानिशला मारलंस

आणि आता तुझ्या या बच्च्यानं आपल्या व्यवहाराशी संबंध नसणाऱ्या मुलीचा जीव घेतला! काय आहे हे? हं?" अखिलीस खवळला होता.

मुसा बाहेर कितीही शक्ती प्रदर्शन करत असला, तरी अखिलीस समोर बोलण्याची त्याची छाती नव्हती. नजर चोरत खाली पाहून त्यानं माफी मागितली,

"सॉरी बॉस! मी याच्यावर फक्त माहिती काढायचं काम सोपवलं होतं. जे काही झालं त्याला सर्वस्वी हा जबाबदार आहे. आपण याच्याशी हवं ते करावं." मुसा अपराधी बोलला. आणि त्यांनं आपला पल्ला झाडाला.

अखिलीसनं स्वतःला शांत करत हेलीकडं पाहिलं. तिला म्हणाला,

"मी याला तुझ्या स्वाधीन करतो. हवं ते कर याच्या बरोबर! पण माझं एक प्रपोजल आहे. इब्लिसला सोड. आमच्यात सामील हो. तुझ्या सारख्या स्किलफुल मुलीची मला कदर आहे!"

हेली यावर काही बोलली नाही. तिनं कमांडरची एक गोळी रक्षितच्या डोक्यात घातली. हे हेलीचं अखिलीसला उत्तर होतं. एक भलं मोठं 'नाही!'

तिची नजर आणि कोल्ट कमांडर् तशीच वर झाली. ती अखिलीसचा जीव घेणार हे समजून मुसा हरकतीत आला. जागचा उभारलेला मुसा हेलीची दुसरी गोळी खाऊन त्याच मऊ राजेशाही खुर्चीवर मरून पडला. हेलीची बंदूक आता अखिलीसचा प्राण घेण्यासाठी वळली...

तोच मागून तिच्या डोक्यात एक जोराचा फटका बसला. ती कोसळली. अखिलीस त्याला वाचवणाऱ्याला पाहत होता.

"थॅंक्यु म्हणण्याची गरज नाही!" गोलाएथ हेलीला पायाखाली चिरडत म्हणाला. त्याच्या चेहऱ्यावर कसलेलंच भाव नव्हते.

हेली तडफटत होती. हळूहळू तिचे प्राण तिचं शरीर सोडत असताना अखिलीस पाहत होता.

◆◆◆

गाडीतून जाताना टरकलेला रिकार्डो भविष्याच्या विवंचनेत बुडाला होता. अखिलीसकडून बाहेर पडताना अखिलीस गोलाएथला काय म्हणाला होता ते तो स्वतःशीच आठवत होता...

◆◆◆

"त्या इब्लिसचा अंत पण असाच होणार आहे! माझ्या पायाखाली चिरडून!" गोलाएथ हेलीचं मुडकं बुटाच्या जाडजूड सोल खाली चिरडत बोलला.

"हिला मारून स्वतःला शहाणा समजू नकोस. मागून वार केलास म्हणून. नाही तर ही तुला नक्कीच आवरली नसती! विचार कर; जर इब्लिसची सबॉर्डीनेट अशी असेल, इतका उच्छाद मांडू शकत असेल, तर 'तो' काय चीज असेल!" अखिलीस गोलाएथच्या उपकारांची जाण न बागळता त्याला हिणवत बोलला.

◆◆◆

अखिलीसचे ते ऐकलेले शब्द आठवून गांगरलेला रिकार्डो गोलाएथला म्हणाला,

"तू पुन्हा विचार कर... इब्लिसच्या नादी न लागलेलं बरं! तशात तू त्याच्या साथीदाराला मारलंयस!" तो अत्याधिक भ्याला होता.

"त्यानं माझ्या भावाला मारलंय! मी त्याला सोडणार नाही!" गोलाएथ तीव्र कटाक्ष रिकार्डोकडं फेकून कडाडला.

"तुझी मर्जी. मग मी तुला हेच सुचवेन, की तू थेट इब्लिसवर घाला घाल!" रिकार्डोनं सुचवलं.

"तेच करायचंय! पण त्याला शोधणार कुठं? तुला आठवतंय मी तुला म्हणालो होतो, जोनाथनचा खूनीच मला शोधत येईल?" गोलाएथनं अनपेक्षित विचारलं.

गोंधलेल्या रिकार्डोची मान 'हो' मधे हलली. गोलाएथ पुढे बोलला,

"मी त्याचीच पार्श्वभूमी तयार करतोय! तू जी माहिती सांगितलीस त्यावरून हे स्पष्ट होतंय, की तिथला म्हातारा त्या इब्लिससाठी नक्कीच महत्त्वाचा असणार! त्यालाच जर संपवलं, तर तो इब्लिसच स्वतः मला शोधत येईल." तो कुचकट हसला.

गोलाएथनं थंड नजरेनं रिकार्डोकडं पाहिलं. रिकार्डो मनोमन घाबरून गेला होता.

◆◆◆

तो एक प्रशस्त बंगला होता. पूर्ण पांढऱ्या रंगात अच्छादलेला. बाहेरून अगदी शांत. बाहेरून पाहणाऱ्याला असं वाटावं, की या निवांत ठिकाणी संपूर्ण आयुष्य व्यतीत करावं.

तिथं आपली गाडी घेऊन पोहोचलेला शार्दूल मात्र उद्विग होता. गाडी थांबताच तो उतरून आत पळाला. आपली पिस्टल त्यानं होलस्टरची काढून हाती घेतली होती. पळत असतानाच सहजतेने ती लोडही झाली होती.

आत शिरला तसा तो जागीच दबकला. त्याच्या पायांची गती बंद झाली होती, पण शरीराला अजून वेग असल्यानं तो थोडा घसरतच पुढे गेला. त्याचे पाय कसल्याशा द्रवावर पडल्यानं त्याच्या गतीला अजूनच वेग मिळाला होता. स्वतःला सावरून स्थिर करताच त्यानं खाली पाहिलं आणि त्याचे डोळे असमंजस विस्फारले. पांढरे मार्बल पूर्णतः रक्ताने लालेलाल झालं होतं. इतकं की श्वेताचा कसला लवलेष उरला नव्हता.

अजून त्यानं इतस्ततः पाहिलं. मृत्यू झालेल्या लोकांचे खच्चच्या खच्च पडले होते. तो काळजीत पडला.

एवढ्या मोठ्या घरात शोध घेण्याची तसदी त्याला घ्यावी लागणार नव्हती. पडलेले मृतदेह त्याचे मार्गदर्शन बनणार होते.

पायांना जितका वेग देता येईल तितका देत शार्दूल त्या रक्ताच्या डोहात आपला तोल सावरत त्या मृतदेहांचा पाठलाग करत एका खोलीशी आला.

पुढंचं दृश्य पाहून त्याची चिंता रागात परिवर्तित झाली. त्यानं आपली पिस्टल त्या खोलीत मध्यभागी खिशात हात सारून निवांत उभ्या व्यक्तीवर रोखली. त्याच्या पायांत हेलीचा निश्चल देह पडला होता!

"नो इन्स्पेक्टर! यु हॅव नो राईट टू डू दॅट!" ती व्यक्ती निर्विकार बोलली.

"का नाही मिस्टर अखिलीस?" शार्दूल ओरडला.

हेलीला रोखण्यासाठी इब्लिस गेला असला, तरी शार्दूलचा त्याच्यावर तिळा एवढा सुद्धा विश्वास नव्हता. त्या अविश्वासानुरूप तो हेलीच्या मागून अखिलीसच्या घरी धडकला होता. आपण इथं आलो ते फार बरं झालं असं त्याला प्रकर्षानं दिसलं होतं. हेलीची ती गत पाहून त्याच्या उद्विग्नतेला पारावार उरला नाही. आपण आलोच नसतो, तर हेली... त्याला पुढे विचार करवत नव्हता.

"कारण तुम्ही समजता तसं काही नाही. आणि मला अटक करायची असेल तर आधी वॉरंट आणा!" अखिलीस त्याला शांतपणे बोलला.

"सी.आर.पी.सी. सेक्शन फोर्टी वनच्या अंडर, विना वॉरंट देखील मी तुम्हाला अटक करू शकतो." शार्दूल त्याला कायदा पढवत बोलला.

"ऑन व्हॉट बेसिस इन्स्पेक्टर? देअर आज नो सर्कमस्टॅन्शियल एव्हीडेन्स अगेंस्ट मी! माझीच माणसं मेली आहेत. ती मारली आहेत या मुलीने. माझा कसलाच गुन्हा नाही!" अखिलीस शांतच होता.

"आणि हिला कोणी मारलं?" शार्दूलच्या गुश्श्यात वाढ झाली होती.

"शी इज लाईव्ह! यु कॅन चेक!" डावी भिवयी उडवत अखिलीस बोलला.

शार्दूल सावधगिरी बाळगत अखिलीसवर डोळे आणि पिस्टल रोखून पुढे झाला.

त्यानं हेलीच्या मानेची नस चेक केली...

◆◆◆

"मूव्ह! स्टेप असाईड!" अखिलीस शांतपणे बोलला.

गोलाएथ हेलीचं सुंदर, परंतु तिनं मारलेल्या मुसा आणि अखिलीसच्या प्रामाणिक माणसांच्या रक्तानं अभद्र झालेलं मुख ठेचत असताना अखिलीसनं त्याला आज्ञा दिली होती.

गोलाएथचा थांबण्याचा इरादा काही दिसत नव्हता. त्याला जणू अखिलीसचं बोलणं कानात शिरलं नव्हतं. इब्लिसनं त्याचा भाऊ मारल्याचा राग त्याच्या डोक्यावर चढला होता. त्याच्या पायाखाली त्याच इब्लिसची साथीदार पडली होती. तिला तो असंच सोडू इच्छित नव्हता. त्याच आवेशात पागल होऊन तो हेलीला आपल्या पायाखाली मसलत होता.

"आय सेड स्टेप असाईड!" अखिलीसनं मोठा आवाज चढवला.

गोलाएथ जरी वेडावला असला, तरी रिकार्डो पूर्णतः शुद्धीत होता. समोर जे हत्यासत्र घडलं ते पाहून तो हादरला होताच. असं नव्हतं, की त्यानं कधी कोणाला मरताना व कधी कोणी कोणाला मारताना पाहिलं नव्हतं, पण हे जरा... जरा काही अतीच अती होतं. त्याच्या बुद्धीवर झापडं पडावी असं हे दृश्य नक्की नव्हतं. खाडकन जागं व्हावं तितका तो शुद्धीवर होता. हे सगळं हत्याकांड त्याची बुद्धी तल्लख करून गेलं होतं.

मुख्यतः भीती माणसाला इतकं सावध करते, की माणूस होऊ घातलेल्या संकटाप्रती अधिक सजग व जागरूक राहतो. आपल्याला धोका, इजा होऊ नये म्हणून तो जास्तीची दक्षता घेऊ लागतो, तसं काहीसं रिकार्डोचं झालं होतं.

मुसा; अखिलीसला अत्यंत जवळचा माणूस. इतका की, इतर कोणाचे नाही, पण त्यानं नेहमी त्याच्या सर्व चुका पोटात घेतल्या होत्या. तो डोळ्यांदेखत मारला गेला होता. त्यामुळं आता त्याची मनःस्थिती काय असेल हे रिकार्डो अखिलीसकडे पाहून तपासत होता.

अशातच अखिलीस गोलाएथला ऑर्डर देत मोठ्याने ओरडला होता. कदाचित हिला अखिलीस स्वतःच्या हाताने मारू इच्छित असेल, आणि हा गोलाएथ काही त्याचे ऐकत नाहीए. तो आपला तिला चिरडण्यात मन लावून बसला आहे... असं रिकार्डोस वाटून गेलं. त्याने तो अधिकच भ्याला.

अखिलीसच्या मुठी त्वेषाने वळणताना रिकार्डो पाहत होता. याचा राग पराकोटीला गेला, तर आपलं काही खरं नाही. हा गोलाएथ तर जाईलच, पण आपलं पण 'राम नाम सत्य होईल!' त्याच्या केसमध्ये 'फ्रॉम डस्ट यु केम अँड टू डस्ट यु शाल रिटर्न्...'

त्यानंच मग पुढं होत गोलाएथला मागं खेचलं. हेलीला चिरडणारा गोलाएथचा पाय कालीनवर पडताच तो भानावर आला. त्यानं चिडून रिकार्डोकडं पाहिलं.

भयभीत रिकार्डोनं नजरेतूनच त्याची माफी मागितली आणि त्यानं डोळ्यांच्याच खुणेनं त्याचं लक्ष तसंच अखिलीसकडे वळवलं.

गोलाएथनं अखिलीसकडं त्याची जळजळती नजर टाकली.

"लिव्ह हर्!" अखिलीसनं त्याला नवी ऑर्डर दिली.

"शी जस्ट किल्ड् युअर मेन अँड यु आर शोव्हिंग हर मर्सी?" गोलाएथला प्रश्न पडला होता.

हा अखिलीस काय माणूस आहे? हा नेमका कसा माणूस आहे हे तर त्याला अजून योग्यरीत्या उमजून आलं नव्हतं. तशात तो प्रत्येकदा कोड्यात पाडणारंच नवं वागत होता.

या प्रश्नानंच त्याला काबूत ठेवलं होतं. नाही तर गोलाएथनं अखिलीसलाच आतापर्यंत जमीनदोस्त करून आपल्या हस्तप्रहारांनी अथवा टाचेच्या जडत्वाचा अनुभव देत यमाच्या रेड्याची सैर करवली असती.

"मला फक्त इब्लिसचा मृत्यू हवा आहे! आणि तेही त्याचसाठी, कारण माझ्या इप्सित कार्यात तो माझ्यासाठी मोठा अडथळा ठरत आहे. या कामात दुसरं कोणी मेलेलं मला खपणार नाही! मी एक बिझनेसमन आहे. खूनी, माफिया अगर गँगस्टर नाही!

"माझी माणसं हिच्याशी चुकीचं वागलीत त्याची शिक्षा हिनं त्यांना दिली. त्यामध्ये तिला जे अडथळा ठरले, ते मृत्यूभक्षी पडले. तिनं फक्त तिचा बदला घेतलाय, जो तिचा अधिकार होता. मला हिच्यावर राग नाही! नाऊ लेट हर् गो!" अखिलीस थंडपणे स्पष्टता देत होता.

हा माणूस तर समजण्याच्या परे आहे हे गोलाएथला अजूनच ठळक झालं. हीनं याची इतकी माणसं मारून याचं उत्तर हे आहे? हा असं कसं या सगळ्याकडे पाहू शकतो...?!

अखिलीसबद्दल जेवढं गोलाइथला कोडं होतं, त्याहूनही हेलीबद्दल त्याचा राग ओसरला नव्हता. ती इब्लिसच्या, आजवरच्या त्याच्या सर्वांत मोठ्या शत्रूची सोबतीण होती.

'कदाचित, नव्हे खात्रीशीर ही देखील कोणत्या ना कोणत्या मार्गे आपल्या भावाच्या मरणात सामील आहे. रक्षित म्हणाला होता, ही इब्लिससाठी एसपीकडून असाईन्मेंट्स घ्यायची. हिनं जोनाथनची असाईन्मेंट घेतली नसती, तर आज माझा भाऊ जिवंत असता...!' तो मनातल्या मनात तिचा मृत्यू पक्का करत बडबडला.

ही अशी समोर आयती पडलेली असताना आपण तिला मारू शकत नाही यानं तो भयानक चिडला. त्या झुंझलाहटमध्ये त्यानं बाजूला पडलेल्या अखिलीसच्या एका बॉडीगार्डच्या डेडबॉडीला आवेशाने लाथ मारली.

त्या वाराने मेलेल्या त्या बॉडीगार्डची हाडे काडकाड मोडली. तोंडातून रक्ताची भळकन मोठी चिळकांडी बाहेर पडली. ती अगदी अखिलीसच्या पायापाशी जाऊन पडली. त्याचा बूट त्या तुच्छ रक्तानं घाण झाला. आता त्या बॉडीगार्डला गुंडाळून नेण्यासाठी एखाद्या साडेसहा-सात फुटी तिरडीची व आठ-नऊ फुटी मृत्यूवस्त्राची आवश्यकता राहिली नव्हती. एखादा सुटकेस पुरेल इतकं त्याचं शरीर हाडं खिळखिळी झाल्यानं ढिल्लं झालं होतं. त्याचं मुटकुळं अगदी कशातही मावलं असतं.

गोलाएथच्या या शक्तिप्रदर्शनाचा अखिलीसवर काही परिणाम झाला नव्हता. तो तसाच निश्चल, निर्विकार होता.

"असले खेळ माझ्यासमोर करायचे नाहीत! रिकार्डो घेऊन जा याला!" अखिलीसनं त्याची थंड नजर रिकार्डोवर फिरवली.

रिकार्डो त्या थंड नजरेनंच चरकून गेला. रिकार्डो तसा भित्रा प्राणी नव्हता. असता, तर या घोर धंद्यात तो पडलाच कशाला असता?

पण त्याचा पालाच अशा लोकांशी पडला होता, की त्याला पदोपदी घाबरण्याशिवाय सवालच उरत नव्हता.

आपण इथून याक्षणी नाही हटलो, तर आपलं काही खैर नाही हे ताडून त्यानं गोलाएथला बाहेरच्या मार्गाला ओढलं. गोलाएथ आपली धगधगती नजर अखिलीसच्या शीतल नजरेला भिडवतच बाहेर पडला...

◆◆◆

"मिस्टर शार्दूल; मी ऐकलंय, की तुम्ही कायद्यानं चालणारे ऑफिसर आहात. मला खात्री आहे, क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या सेक्शन फोर्टी वनचा तुम्ही चूकीचा वापर नक्कीच करणार नाही." कुटील स्मित अधरांवर वागवत अखिलीस शार्दूलला बोलला,

"आणि मी तुम्हाला हेही निदर्शनास आणून देतो, की तुम्ही सेक्शन वन हन्ड्रेड फिफ्टी फाईव्ह देखील इथं लागू करू शकत नाही. कारण मी कोणत्याही गुन्ह्याची योजना इथं आखत नाहीये!" त्याचं कुटील हास्य अधिकच फैलावलं.

शार्दूलला रागाने चरफडण्याशिवाय पर्याय उरला नाही. अखिलीसचं म्हणणं योग्यच होतं. शार्दूल समोर तो निर्विकार उभा होता. त्यानं कोणता गुन्हा केला आहे अथवा तो कोणता तरी गुन्हा करण्याचं प्लॉटिंग करतोय असं कुठंच दर्शनी नव्हतं.

वॉरंट जरी अखिलीस विरुद्ध प्राप्त करायचा म्हंटलं तरी त्यासाठी ठोस पुरावे हजर करणं जरुरी होतं. त्या खेरीज मॅजिस्ट्रेट अखिलीसच्या अटकेचे आदेश देणार नाहीत हे शार्दूलच्या ध्यानी येऊन तो अधिकच चिडला.

"एज यु कॅन सी, शी इज लाईव्ह. हिनं माझ्या माणसांना मारलं आहे. त्यांच्या प्रतिकारात ती जखमी झाली आहे. माझा यात कसलाच कसूर नाही. तुला अरेस्ट करायचं असेल, तर हिला कर! टेक हर् अँड लिव्ह ऑफिसर!" अखिलीसनं करड्या आवाजात ठसक्याने शार्दूलला अक्षरशः आज्ञाच दिली.

शार्दूलनं हेलीच्या मानेची शीर तपासली होती. मंदपणे तिचं तडकणं चालू होतं. अखिलीसला आता यावेळी आपण काही करू शकत नाही हे ध्यानात घेऊन शार्दूलनं डोळे मिटले. उफाळून आलेला राग त्यानं पाण्याच्या घोटासारखा पिऊन टाकला.

स्वतःला शांत करून त्यानं डोळे उघडले. हेलीला आपल्या बाहूंत उचलून तो जितक्या वेगाने पळता येईल तितक्या वेगाने पळत निघून गेला.

अखिलीसचा शांत भाव क्षणांत कुठल्या कुठं उडाला. त्यानं इतका वेळ शांत चेहऱ्याच्या मुखवट्यामागे लपवलेला आपला राग बाहेर परावर्तित केला. जातीचाच शांत असलेला अखिलीस आता मात्र दात ओठ खात होता. याहून राग व्यक्त करण्याचा त्याला दुसरा मार्ग सुचला नव्हता.

हे सगळं प्रकरण त्याला शांतपणे हाताळायचं होतं, अगदी कोणताही गाजावाजा न होऊ देता! पण तसं होत नव्हतं. आधी साक्षात इब्लिस, आणि आता तर पोलीस देखील यात इन्वॉल्व्ह झाली होती. आत्ता? अंहं! पहिल्यापासूनच पोलीस इन्वॉल्व्ह होती!

एसपीनेच इब्लिसला समाहित करून घेतलेलं होतं. हा तर कहर होता!

त्याला एवढाच दिलासा होता, की त्याचा खरा मनसुबा अजून बाहेर पडला नव्हता...

त्याची चूक एक होती, त्यानं क्रिमिनल्सना त्याचं काम पूर्ण करण्यास नेमलं होतं. म्हणून ते एसपीच्या माध्यमातून इब्लिसचं भक्ष्य ठरत होते.

पण बार टेंडरचं काय? तो तर सामान्य होता... तरी इब्लिस त्याच्या मागावर का जावा? की त्याचंही काही क्रिमिनल रेकॉर्ड असेल?

ठीक आहे असेल; पण आपण त्याला ज्या कामावर पाठवलं त्याचवेळी इब्लिस त्याच्या समोर यावा? हा योगायोग नाही.

आपली माणसं सुद्धा आततायी वागली नसती, जरा जपून; लपून त्यांनी कामं केली असती, तर हे सगळं झालंच नसतं. जी गोष्ट आपल्याला हवी आहे, ती कधीच आपल्या हाती पडली असती. त्यांच्या चुकांची शिक्षा त्यांना मिळालीच, परंतु अखिलीसही त्यांच्या चुकांची शिक्षा सोसत होता. एकीकडं इब्लिसकडून, तर एकीकडं त्याच्यासाठी काम करणाऱ्या त्याचंच प्रतिस्वरूप असलेल्या हेलीकडून. यामुळंच त्याचा पारा शिगेला उडत होता.

पण आता चूक करायची नाही. हेली या बेकारांना संपवताना आपणही मधे पडलो नाही, कारण आपण स्वतःच्या हातून त्यांना शिक्षा करू इच्छित नव्हतो. पण त्यांना शिक्षा होणं अनिवार्य होतं, या मूर्खांच्या आततायीपणामुळंच त्याचं काम सोपं होण्याऐवजी वाढलं होतं. हेलीला म्हणून तर आपण हवं ते करू दिलं. त्यांचा जीव घेऊ दिला. आडवे पडलो नाही...

अखिलीसच्या विचारांचे घोडे दौडत होते. त्याची क्रोधानं धगधगती झालेली नजर मुसावर खिळली होती. जणू तो आपल्या नजरेनेच मुसाचा मृतदेह जाळून टाकू पाहत होता...

# ९. रणनीती...

शार्दूल सुसाट गाडी पळवत होता. त्यानं सायरन चालू ठेवला होता. इमर्जन्सीच होती, हेलीला वाचवण्याची...

शार्दूलच्या गाडीत तिनं दम तोडला, तर स्वतःला तो कधी माफ करू शकणार नव्हता. गाडी हाकण्यापेक्षा हेलीच्या अवस्थेकडं लक्ष देण्यातच तो गर्क होता. आपल्या हातून कोणाचा अपघात होऊ नये, वाट मोकळी मिळावी या हेतुस्तव त्यानं सायरन चालू केला होता. तशी मध्यरात्र असल्याने रस्ता मोकळाच होता, तरी तो कर्तव्यदक्ष काळजी वाहून होता. दक्षता घेत होता.

वळणावर फक्त त्याला लक्ष देणं आवश्यक होतं. एरव्ही सरळसोट रस्ता येईल तिथं तो रस्त्यावर कमी आणि मागच्या सीटवर निपचित पडलेल्या हेलीवर डोळे गाडून असायचा. कमालीचा अशांत झाला होता तो. अशी उद्विग्नता त्यानं कदाचित पूर्वी कधीच अनुभवली नव्हती.

हॉस्पिटल पर्यंत त्याची अशीच अस्वस्थता होती. अखेर त्याची गाडी सीपीआरला (छत्रपती प्रमिलाताई राजे, दसरा चौक, कोल्हापूर)ला आली.

गाडी थांबताच त्यानं रक्ताळलेल्या हेलीला बाहेर घेतलं. एक जखमी स्त्री पाहून बाहेरील डॉक्टर्स, कंपाऊंडर्स त्याच्या मदतीला धावले.

कंपाऊंडर्सनी तत्परतेनं आणलेल्या स्ट्रेचरवर तिला झोपवण्यात आलं. त्याच तत्परतेनं तिला हॉस्पिटलमध्यं पळवलं गेलं. शार्दूल त्यांच्या मागून होताच...

हॉस्पिटलमध्ये, हेलीला ऑपरेशन थिएटरमध्ये नेलं गेलं. डॉक्टरच्या गतिशील पावलांना पावलं जुळवत जाणाऱ्या शार्दूलला डॉक्टरनी विचारलं,

"हिची अशी अवस्था कशी झाली?" डॉक्टरनी केस जाणून घेण्याच्या प्रयत्नात प्रश्न केला.

"काही गुंडांनी हल्ला केला." शार्दूलनं तपशील न देता त्रोटक माहिती पुरवली.

"मग पोलीस केस होईल. आपण तशी तक्रार करावी. तिकडे हवालदार बसले असतील." डॉक्टरनी बोटाने दिशा दाखवली.

"प्रोसिजर होईल डॉक्टर. मी सिनियर इन्स्पेक्टर शार्दूल ठाकूर. लोकल क्राईम ब्रँचचा चार्ज माझ्याकडे आहे." चिंतीत शार्दूल ओ.टी.कडं लक्ष ठेवून सांगत होता.

"आय सी. तुम्ही काळजी करू नका सर. त्यांची विशेष काळजी घेतली जाईल." डॉक्टर त्याला आश्वस्त करत म्हणाला,

"यु डोन्ट वरी." बोलून दिलासा देत डॉक्टर घाईनं ओ.टी.मध्ये शिरला.

शार्दूल तिथंच तळमळत उभा राहिला. कितीही उद्विग्नता असली, तरी आपण करू काहीच शकत नाही या विचाराने तो आणखीच अस्वस्थ झाला. प्रोसिजर तरी पूर्ण करावी म्हणून मग तो तक्रार करण्याच्या काऊंटरकडं वळला.

तिथं बसलेला कॉन्स्टेबल शार्दूलला ओळखत होता. शार्दूलला पाहून त्यानं आपली खुर्ची सोडली. त्याला मान देत एक सल्युट ठोकला.

"जय हिंद सर!" कॉन्स्टेबल उद्गारला.

"जय हिंद!" शार्दूलनं त्याला औपचारिकता म्हणून उत्तर दिलं. सहसा त्याला सध्यातरी या औपचारिकतेत काही स्वारस्य नव्हतं.

◆◆◆

गोलाएथची गाडी कसबा बावड्यात पोलीस हेडकॉर्टर्सच्या परिसरात लागून होती. गोलाएथच्या बाजूला बसलेला रिकार्डो चिंतेने गार झाला होता.

न जाणो आता याच्या डोक्यात काय वाजतंय? हा पोलीस हेडकॉर्टर्सला का आलाय...? काळजी त्याला जाळत होती. हिंमत होत नसताना त्यानं गोलाएथला विचारण्याचं धाडस केलं,

"गोलाएथ; आपण इथं... म्हणजे पोलीस हेडकॉर्टर्सला...? तू तर सूर्योदय अनाथाश्रमात जायचं ठरवलेलंस..." कसं तरीच बिचकत रिकार्डोनं वाक्य पूर्ण केलं होतं.

"रिकार्डो, माझा उद्देश फक्त इब्लिसला मारणं नाही! इब्लिस माध्यम होता. माझ्या भावाला जोनाथनला मारण्याची मूळ कल्पना या एसपीची होती. त्याला जिवंत सोडून कसं चालेल?" गोलाएथ दातांवर दात घासत बोलला.

गोलाएथचा मनसुबा ऐकून रिकार्डो चाटच पडला. पोलिसावर आणि तेही खुद्द सुप्रीटेंडेंट?! त्याच्यावर घाला घालायचा?

ऑर्गनाईज्ड् क्राईमचा नियम होता, कितीही आणि कसलेही गुन्हे करा, परंतु सरकारी अफसरांच्या वाटेला जाऊ नका! आणि तोच नियम गोलाएथ आता मोडू पाहत होता.

हा नियम मोडला, तर काय होऊ शकतं हे अनेकदा माफियाज आणि गँगस्टर्सनी अनुभवलं होतं. पोलीस खाती वाघासारखी या लोकांची शिकार करत सुटतात. अशावेळी पाठिंबा दिलेले राजकारणी सुद्धा मदतीला पडत नाहीत.

जनसमूह पोलीस खात्याच्या पाठीशी खंबीर उभारत असल्यानं राजकारणी अलगद आपला हात मागून काढून घेतात. अशावेळी बेमौत मरण्याशिवाय क्रिमिनल्सना जागा उरत नाही.

असं झालं तर कोणाचीच धडगत नाही. गोलाएथ बरोबर राहून आपण आपली पण कबर खोदणार! असं गोलाएथच्या वागण्यानं रिकार्डोला पावलागणिक पक्कं होऊ लागलं.

पण तो करू काही शकत नव्हता. त्यानं गोलाएथ आणि जोनाथनची हमेशा साथ देण्याचं वचन त्यांच्या वडिलांना दिलं होतं.

तसं क्रिमिनल बॅकग्राऊंड असलेल्या रिकार्डोची आणि गोलाएथच्या वडिलांची काही जवळीक नव्हती. दोघे एकाच दारूच्या गुत्त्यावर प्यायला बसायचे. इतकाच काय तो त्यांचा एकमेक परिचय.

एकदा गुत्त्यावरच गोलाएथच्या वडिलांना पिता पिता हृदय विकाराचा झटका आला होता.

माणुसकी म्हणून रिकार्डो त्यांना दवाखान्यात नेत असताना रस्त्यातच गोलाएथच्या वडिलांनी त्याच्याकडून वचन घेतलं होतं.

मरणासन्न व्यक्तीने मागितलेलं वचन आपण डावलू शकत नाही या उदार विचारानं आणि ते वचन मोडलं, तर आपण गोलाएथच्या वडिलांच्या मृत्यूवचनाचा अपमान केल्याचा अपराध आपल्याकडून घडेल या भावनेनं तो त्यावेळी पासून आपले वैयक्तिक धंदे गुंडाळून या कॉन्ट्रॅक्ट क्रिमिनल्सचा मॅनेजर बनून होता. ज्याने बऱ्यापैकी मोकळा वेळ मिळून गोलाएथ व जोनाथन या दोघांच्या वाढीकडं व्यवस्थित लक्ष देता येईल.

जोनाथन बाबतीत तर तो हे वचन पाळू शकला नव्हता, पण आता मौत आली तरी बेहत्तर, पण मेलो तरी ते या गोलाएथ बरोबरच. या निश्चियानं तो गोलाएथशी संधान साधून त्याच्यासोबत राहून होता.

"जा. जाऊन एसपी हेडकॉर्टर्सला आहे का बघ. नसेल कर कुठं मिळू शकतो ते काढ." गोलाएथनं रिकार्डोला काम सोपवलं.

रिकार्डो अंडरवर्ल्डमध्ये मॅनेजर म्हणून काम करत असल्यानं तो पोलिसांच्या नजरेपासून लपून होता. त्याचं नांव तर सरकारी फाईलींत ठळक होतं. त्याला पाहिला मात्र कुणीच नव्हता. गोलाएथचं रेकॉर्ड फोटो सहित चांगलंच स्ट्रॉंग असणार होतं. म्हणून स्वतः न उतरता त्यानं रिकार्डोला कामाला लावलं होतं.

रिकार्डो घाबतच गाडीतून उतरला.

"घाबरू नको! निवांत रहा. कोणाच्या लक्षात येता कामा नये!" गोलाएथनं रिकार्डोला ताकीद दिली.

त्याच्या चेहऱ्यावर पसरलेलं भीतीचं जाळ हेरून तो कोणत्या तरी वाईट कृत्यात गुंतला असण्याची शक्यता पोलीस पडताळू शकतात हे गोलाएथ हेरून होता. पोलिसांच्या कार्यपद्धतीची व तल्लख बुद्धीमत्तेची त्याला पुरती जाण होती. यासाठीच रिकार्डोला त्याची ही ताकीद होती. हे शिक्षण पण रिकार्डोनंच त्याला दिलं होतं. घाबरलेल्या रिकार्डोला त्यानंच दिलेल्या शिक्षणाची तो नव्याने आठवण करून देत होता.

रिकार्डोची नकळत फक्त मान हलली आणि खिडकीतून गोलाएथला पाहणारी तीच मान हेडकॉर्टर्सकडं फिरली. पुढे जाण्याची त्याची हिंमत होत नव्हती.

"मूव्ह!" गोलाएथ गुरगुरला.

पोलीस बरे, खरं गोलाएथचा राग नको. म्हणून मग रिकार्डोची पावलं चालू लागली.

रहदारीचा चौक पार करून तो हेडकॉर्टर्सच्या मेन गेटला आला.

एक कॉन्स्टेबल त्याला तिथंच दिसला. आत जाण्याचा त्रास वाचला, तसंही त्या असंख्य सिहांच्या काळगुहेत जाण्याची त्याला भीती होतीच. अनेकपेक्षा एक परवडला. या विचारानं रिकार्डोनं हिंमत एकवटली.

"एसपी साहेब..." रिकार्डो घाबरत हलकेच पुटपुटला.

"आ? काय?" कॉन्स्टेबल खेकसला.

"एसपी साहेब आहेत का?" तो परत जरा मोठ्यानं बुदबुदला.

तरी आताही तो कसासाच बोलला होता, पण कॉन्स्टेबलनं यावेळी लक्ष देऊन ऐकल्यानं त्याला रिकार्डोचं म्हणणं लक्षात आलं.

"नाही. साहेब बाहेर गेलेत." त्यानं रिकार्डोला उत्तर दिलं.

"कुठं ते कळू शकेल का?" रिकार्डोचा प्रश्न.

"साहेब काय सांगून जात्यात व्हय?" कॉन्स्टेबलचा उलट प्रश्न.

"बरं." रिकार्डो मागे वळला.

"काम काय हुतं पन?" कॉन्स्टेबलनं मागं लागून विचारलं.

या प्रश्नाचं उत्तर गोलाएथनं पंढवल नव्हतं. हा अनपेक्षित असा प्रश्न होता. रिकार्डोला स्वबुद्धीवर विसंबावं लागणार होतं.

रिकार्डोही हजरजबाबी होता. तो कॉन्स्टेबलकडं वळला,

"लक्ष्मीपूरी पोलीस ठाण्यात माझी सोण्याची चेन हरवल्याची तक्रार केली आहे. चार दिवस झालं काही मागमूस नाही. म्हणून एसपी साहेबांकडं गाऱ्हाणं मांडायचं म्हणून आलो होतो." रिकार्डोनं बंडल मारून दिली.

त्याला खात्री होती. आपली ही किरकोळ तक्रार हा काही एसपीपावेतो पोहोचवणार नाही. त्यामुळं एसपीनं याची शहानिशा करण्याचा मुद्दाच उद्भवत नाही.

"आवं मग दम धरा जरा. मिळंल. पोलीस आपलं काम करत्यात नव्हं? घावंल तुमची चीन." जरा वयस्कर असलेला तो कॉन्स्टेबल दिलासा देत म्हणाला.

बळेच डोळयांत पाणी उभा करत रिकार्डो मागं वळला. त्याला तिथं थांबण्याचं प्रयोजन नव्हतं. एसपी कुठं गेला आहे हे जर यांना माहीत नसेल, तर तो परत कधी येईल याची त्यांना जाण असण्याचं काहीच कारण नव्हतं.

तो पायांना गती देत चौक पार करून समोरच्या रस्त्यावरील वळणावर अदृश्य झाला. तो दिसेनासा होईपर्यंत त्याच्याकडं कॉन्स्टेबल बघत राहण्याचं त्यास काही प्रयोजन नव्हतं. तोही आपल्या कामाला निघाला होता.

रिकार्डो गाडीपाशी पोहोचला. दार उघडून आत बसला व धापा टाकणारा तो बोलला,

"गोलाएथ! एसपी नाही. कुठं गेलाय कुणाला माहीत नाही!"

गोलाएथनं रिकार्डो येतोय हे पाहूनच गाडी चालू करून ठेवली होती. त्यानं फक्त ती रेज केली. वेगवान होत ती हेडकॉर्टर्सच्याच चौकातून कोल्हापूरच्या दिशेला पळाली.

"आता?" असा रिकार्डोचा गोलाएथला असमंजस प्रश्न होता.

"ठरावात बदल होणार नाही. आधी एसपीच मरेल!" गोलाएथनं त्याचं प्लॅनिंग अधोरेखित केलं.

"पण का? तसंही तो हाती लागणं मुश्किल आहे. त्याहून तो अनाथाश्रमाचा मालक सोपी शिकार आहे!" रिकार्डो गोलाएथचं मन वळवू पाहत होता.

"जोनाथनच्या खुनाची योजना ज्या ऑर्डरनं झाली, त्याच ऑर्डरनं, त्याच क्रमानं ही माणसं मारली जातील!" कार चालवणाऱ्या गोलाएथनं रिकार्डोकडे पाहिलं. पुढे म्हणाला,

"जोनाथनच्या मृत्यूची ऑर्डर काढली ती या एसपीनं, ती पोहोचली ती त्या मुलीच्या हाती आणि तिनं ती पोहोचवली त्या इब्लिसपर्यंत! म्हणूनच माझा जोना मारला गेलाय! हेली आणि इब्लिस दरम्यान येतो, तो म्हातारा. तिथं त्याचा नंबर! इब्लिसला मारण्याआधी आपली माणसं गमावल्याचं दुःख काय असतं हे त्यानं अनुभवायला हवं आहे मला! म्हणून हाच क्रम असेल त्या प्रत्येकाच्या मृत्यूचा सुद्धा!" गोलाएथनं त्याच्या योजनेची क्रमवारी रिकार्डोला विदित केली.

"आणि अखिलीस...? त्याचं नाही ऐकलं तर..." रिकार्डोनं अर्धवट उद्गार काढले.

"त्यालाही संपवणार आहे! त्यानं जोनाला मुळात इथं बोलावलं नसतं, तर जोना असा कुत्र्यासारखा मेला नसता. त्यामुळं त्याचं मरण पक्कंच आहे. सो, त्याला भिणं थांबावं!" गोलाएथ त्याला दिलासा देत बोलला.

"मग यात माझाही नंबर आहे का? अखिलीसची असाईन्मेंट मीच घेतली जोनाथनसाठी..." रिकार्डो बिचकत, पण आपलं निर्घृण भविष्य जाणून घेण्याची तीव्र इच्छा असल्यानं विचारता झाला.

आपली भाग्यरेखा आपली जीवनरेखा कुठं तोडणार आहे, हे समजलं, तर आपल्या मनाची त्याकरिता तयारी होईल यास्तव त्यानं भ्यायलेलं असून विचारणा केली होती.

यावर उत्तर न देता गोलाएथ नुसता हसला होता. त्याचं ते हसणं रिकार्डोला भीषण वाटून गेलं होतं.

रिकार्डोला त्याचा मृत्यू जवळ... अगदी जवळ, उंबऱ्यावर थांबलेला दिसत होता. त्यानं मनोमन आपलं भावी भाग्य, (की दुर्भाग्य?) स्वीकारत डोळे मिटले. त्याचा मृत्यू तर होणार हे त्याला हमखास अलबत ठाऊक होतं, त्याच्या मनात प्रश्न इतकेच होते, की नक्की कधी? आणि गोलाएथकडून, की आणखी कोणाकडून...?

◆◆◆

मुसाच्या बार बाहेर बऱ्याच पोलीस गाड्या लागल्या होत्या. इतकं मोठं हत्याकांड घडल्यानंतर ते पोलिसांपासून लपून राहिलं तर ते नवलच होतं.

बारमध्ये एसपी एका कोपऱ्यात उभा होता. फोरेन्सिक डिपार्टमेंटवाले आणि पंचनामा करणारे आपापली जबाबदारी नेटानं पार पाडत होते. त्यांना काही सूचना करण्याची तशी आवश्यकता नव्हती. तरी त्यांनी जागा सोडली नव्हती. त्या एरियाचा इंचार्ज लक्ष घालून होता. प्रकरण मोठं असल्यानं त्याची उपलब्धता असावी यासाठी एसपी औपचारिकता म्हणूनच इथं उपस्थित होता.

तरी त्याचं लक्ष नव्हतं असं नाही. तो काळजीपूर्वक सर्व हालचाली पाहत होता. काही सुगावा मिळतोय का यासाठी त्याची नजर बारभर फिरत होती.

अशातच त्याचा मोबाईल व्हायब्रेट झाला. अगदीच महत्वाचा नसेल, तर तो कॉल घेणारच नव्हता. निवांत झाल्यावर रिव्हर्ट करायला तो कोणाचा होता हे तरी पहावं, शिवाय कुणी सांगावं फोन तितका महत्वाचा सुद्धा असावा म्हणून त्यानं खिशातून मोबाईल काढून पाहिलं. शार्दूलचं नांव झळकत होतं.

काही तितकंच महत्त्वाचं असणार हे त्यानं ओळखलं.

शार्दूल कालपासून बेपत्ता होता. तो असा जातो तेव्हा सगळ्यांनाच अडचणीत आणणारं काहीतरी घेऊन तो परतलेला असतो हे एसपीनं आत्तापर्यंत ओळखलं होतं. आताही शार्दूल काही गंभीर प्रकरण मागे लावून असणार हे त्यानं ताडलं. फोन उचलणं किती गरजेचं आहे हे समजून त्यानं शार्दूलचा कॉल रिसिव्ह केला.

"शार्दूल कुठं गायब आहेस? तुला किती वेळा सांगितलंय? असं रिपोर्ट न करता कशात हात घालत जाऊ नकोस! तुला मी सूट देतो त्याचा गैरफायदा घेतोयस तू! आता तुझं हे असं वागणं तुला कायद्याचं उल्लंघन वाटत नाही का रे? हं? इथून पुढं असं वागलास, तर मला कडक कारवाई करावी लागेल तुझ्यावर!" शार्दूलचं बोलणं न ऐकताच एसपी राजन त्याला झापत होता.

सुप्रीटेंडेंट राजन जाधव हा कितीही कुटील व कारस्थानी वाटत असला, तरी त्याला त्याच्या कर्मचाऱ्यांबद्दल नितांत आपुली, प्रेम आणि काळजी होती हे नाकारता येणारं नव्हतं.

त्यानं शहरातील अपराध व ते करणारे अपराधी यांना मिटवण्यासाठी इब्लिसला हाताशी धरलं होतं यातच सारं आलं होतं. या अपराध्यांच्या हातून त्याला त्याचा कोणता साथीदार मारला जायला नको होता.

इब्लिसला सोबत घेऊन इब्लिसनं क्रिमिनल्सचेच का असेना, परंतु अंदाधुंद खून करण्याच्या कृतीला देखील त्यानं आळा घातला होता हेही डावलता येत नव्हतं.

शहरात कायदा सुव्यवस्था स्थापन करण्याची त्याची स्वतःची वेगळी अशी ही पद्धत होती.

शार्दूलबद्दल तर त्याला विशेष चिंता सतावत होती. हा पोर आपला जीव वाचवायला देखील आपल्या सत्य तत्त्वांना आणि वर्दी अंगावर चढवताना घेतलेल्या शपथेला मुरड घालणार नाही हे त्याला माहित होतं. त्यामुळं शार्दूलची त्याला काळजी अधिक होती. त्या काळजीनंच तो फोनवरच शार्दूलला झापत होता.

"सर, आपण भेटूयात का? त्यानंतर आपलं सगळं बोलणं, ओरडा खायला मी तयार आहे." शार्दूल पलिकडून चिंतेत बोलला.

शार्दूलच्या आवाजातच तो टेन्शनमध्ये असल्याचं झळकत होतं. ते एसपी राजननं हेरलं.

"कुठं आहेस?" त्यानं आपला पवित्रा प्रश्नार्थक केला.

"सीपीआर." पलिकडून शार्दूलनं नेमकं पण मोजकंच उत्तर दिलं.

भेटल्या खेरीज तो अधिकतम काही सांगू, बोलू इच्छित नव्हता.

"ठीक आहे. थांब पोहोचतो." एसपी राजन बोलला व त्यानं फोन कट करून घाईतच मोबाईल खिशात टाकला.

दरवाजाकडं चालत त्यानं त्याच्या एका ऑफिसरला प्रभारी नेमत बार सोडला. जाता जाता त्यानं ऑफिसरला आदेश दिला होता,

"नीट लक्ष ठेव. रिपोर्ट्स आले, की डोळ्यांखालून घाल. आणि माझ्याकडं पाठवून दे. मी नसलो, तर डेस्कवर ठेवायला आवर्जून सांग." सूचना करतच तो गडबडीत दाराशी आला होता.

"येस सर." तो ऑफिसर तत्पर उद्गारला.

तसं बघायला गेलं, तर एरिया इंचार्ज तिथं व्यवस्थित लक्ष घालून हजर होताच. तरी आपल्या 'बी हाफ' कोणाला तरी इथली जबाबदारी सोपवावी या कार्यप्रवणभावानं त्यानं ही जबाबदारी त्याच्या अगदी आज्ञाधारक अधिकाऱ्यावर टाकली होती. आता त्याला इथली मागची चिंता नव्हती.

# १०. प्रारंभ...

"आता...?"

रिकार्डोचा गोलाएथला विचारलेला प्रश्न अजूनही तसाच टांगता होता. गोलाएथ कडून अजून उत्तर दिलं गेलं नव्हतं.

प्रश्नार्थक लंब चेहरा घेऊन रिकार्डो गोलाएथच्या सामने बसून होता. गोलाएथ कसल्याशा विचारात गुंतला होता. त्याच्या चेहऱ्यावरचे हावभाव सतत बदलत होते. नक्की कोणत्या मुद्रेवर ठाम रहावं हे त्याच्या चेहऱ्याला स्पष्ट होत नव्हतं.

त्याच्या डोक्यात नक्की काय चाललंय याचा विचार रिकार्डोला सतावत होता. खरं तोही निश्चित अशा निष्कर्षाप्रत पोहोचत नव्हता.

गोलाएथ मोठा तिरसट माणूस! हा कधी काय करेल याचा नेम नाही म्हणून रिकार्डो त्याच्या सोबत असला, की चिंतेच्या खाईत बुडालेला असायचा.

समोर त्याचं आवडतं खाद्य पडलं होतं. प्रिय मद्याच्या चांगल्या दोन बाटल्या, तेही फुल्ल खंबे उभे होते. पण त्याचं मन चळलं होतं. त्याच्या लागी मिष्टान्न असणारं हे जेवण व पेय तसंच पडलं होतं. ते आज तरी त्याचं मन रमवू शकणार नव्हतं.

त्याचे डोळे व बुद्धी गोलाएथचं परीक्षण करत होते. इतकी वर्षे आपण याला ओळखतो, तरी याच्या अंतरंगात व अंतरात्म्यात डोकावता आलेलं नाही. हा इतका बिलंदर, की तसं करूच देत नाही याचं त्याला आश्चर्य होतं.

गोलाएथही न काही खाता-पिता बसला होता. विचारांत गढला होता.

आणि अचानक तो उठला. त्याला काय झालं कोणास ठाऊक. शांत मोकळया, स्थिरचित्त असलेल्या आभाळात अनायासे कृष्णांबर छटावं आणि प्रचंड प्रखर वीज कडाडून तळपावी असं झालं होतं.

त्यानं बाटली उचलली. बुचही न खोललेली. दारूनं काठोकाठ भरलेली ती घेऊन तो चालू लागला. रिकार्डो काही न समजल्यानं जागीच बसून होता. असमंजस पाहत असणारा तो अकृतीशील निष्क्रिय झाला होता. गोलाएथ हमखास काही वेडंवाकडं काम करणार होता. त्याचं असं अचानक उठणं हे त्याचीच ही नांदी होती.

साप स्पर्शून जावा तसा रिकार्डो स्तब्ध होता. त्याच्या तोंडाचा 'आ' वासला होता.

गोलाएथ चालत जात होता. चिनी लोकांना देखील अनोळखी असलेलं अस्सल 'भारतीय' चायनीज मिळत असलेल्या गाड्याचा जो मालक होता त्याच्याकडं गोलाएथचा रोख होता.

खळ्ळ!!!

गोलाएथनं हातातली बाटली त्या चायजीन गाडेवाल्याच्या डोक्यात फोडली होती. त्यातील दारू पाऊस पडावा तसं चौफेर उधळली गेली.

दुसऱ्याच क्षणी भल्या मोठ्या कढईत न्यूडल्स हलवणारा तो गाडेवाला हातातील उलथण्यासोबत जमिनीवर उलथला होता.

रिकार्डो फोडणीतील जिऱ्याचा दाणा तडकन उडावा तत्वद् बसल्या बाकावरून उठून उभा राहिला. उठताना त्याचा गुडघा लागून टेबलवरचं त्याचं आवडतं जेवण आणि लाडकी इंग्रजी दारू सांडली गेली होती.

चायनीज गाडेवाला पुरता मेला नव्हता. डोक्यातून रक्त वाहत होतं खरं, परंतु त्याचे प्राण अजून त्याच्या शरीराच्या पिंजऱ्यात तडफडत होते. एक दारूनं भरलेल्या बाटलीचा जोरदार फटका, तेही डोक्यात आणि तेही गोलाएथच्या भारदस्त हातांनी. इतक्या जोराचा वार झेलून तो तडफडत होता. काय माहीत कसला पाश त्याला जखडून होता. गरीब घरातील डोंगर जबाबदारीचं ओझंच त्याचं जोखड बनलेलं असणार. त्यातच त्याचा जीव अडकून राहिला असणार. त्याचा जीवाला त्याचं शरीर म्हणूनच सोडवत नसावं...

याच्या ऐवजी कोणी असता, तर बाटली डोक्यात फुटताच स्वर्गवासी झाला असता. पण याचाही तो प्रवास काही दूरचा नव्हता. गोलाएथ तिथं हजर होताच त्याला पुढच्या प्रवासावर पाठवण्यासाठी.

त्यानं आपल्या जबरदस्त अवजड लेदर बुटाच्या टणक सोल खाली त्या चायनीज गाडेवाल्याला चिरडायला चालू केलं.

शरीररूपी पिंजऱ्यातील प्राणपक्षी तो पिंजरा तोडून मुक्त व्हायला धडपडत होता.

गोलाएथनं त्याच्यावर उपकार करायचं ठरवलं. तो त्याच्याशी बसला. हातातील फुटलेल्या बाटलीच्या अर्धगोल तुकड्यानं गोलाएथनं सपासप वार केले त्याच्यावर. रक्तामांसाचे उष्ण कण थंड हवेत सूक्ष्म फवाऱ्याप्रमाणे उडत विरून जात होते. शरीरातून रक्ताची धार लागली होतीच.

चायनीज गाडेवाल्यानं कधीच आपला दम तोडला होता. गोलाएथचं मन मात्र भरलं नव्हतं. तो मनसोक्त बाटलीनं गोल अनुकुचीदार काचेच्या ओबडधोबड वलयानं वार करतच राहिला. लहान मूल घट्ट चिखलात फुटलेली बाटली सतत

रोवत एखादी नक्षी कोरत असल्यागत गोलाएथ त्या मृत शरीरात सतत बाटली रुतवत होता. पण हे बाळ, हे मूल विक्षिप्त होतं. भयाण होतं!!!

तो जणू भान हरपून त्याचा रक्ता-मांसाचा खेळ खेळत होता. त्याचे हात रुधिरानं लाल झाले होते. रिकार्डोही भीतीनं गोठला होता. पण त्याला भानावर येणं गरजेचं होतं. अधिक वेळ इथं थांबलो, तर काहीही होऊ शकतं...

तो स्वतःला ग्लानीतून बळेच बाहेर काढून गोलाएथकडं धावला. गोलाएथचा आपला अघोरीपणा तसाच सुरू होता. रिकार्डोनं दोन्ही हातांनी गोलाएथचा दंड धरून त्याचा वार करण्यासाठी वर झालेला हात हवेत रोखण्याचा प्रयत्न केला. वजनदार गोलाएथचा हात जागी थांबवणं त्याला शक्य झालं नाही. गोलाएथच्या खाली झालेल्या हाताच्या वेगानं व जोरानं तोही झपाट्यानं पुढं आला व बाटली चायजीज गाडेवाल्याच्या आधीच चाळण झालेल्या छातीत रुतली. रक्ताची चिळकांडी उडाली. रिकार्डोचे हात सुद्धा रक्ताळले गेले. गरम रक्त हाताला लागलेलं असून रिकार्डोला तक्षणी त्याचं भान झालं नाही. त्याचं सारं ध्यान गोलाएथला सावरण्यात होतं. त्यानं पूर्ण शक्तीनिशी गोलाएथला वर खेचलं. गोलाएथ उभा राहिला. रिकार्डोला त्यानं बाजूला भिरकावलं. बाजूला होतानाही पायानं गोलाएथनं गाडी-मालकाचा मृतदेह ठोकरला. बाटलीकडं नजर टाकली. रक्ताने भरली होती ती. काचेला चिकटून राहिलेला दारूचा थर खाली ओघळत त्या रक्ताशी समरस होत चालला होता. रक्त व मद्य यांच्या वेगवेगळ्या वासांचा दर्प एक होऊन एकवेगळाच उग्र वास निर्मित होत होता. गोलाएथच्या आसपास तो आवरणासारखा आच्छादला गेला होता.

या घृणीत उग्र दर्पानं गोलाएथ मधील क्रूर दानव चाळवला गेला. त्यानं फुटलेली ती बाटली तोंडाला लावली. त्यातून ओघळणारं 'रुधिर मदसार' ओठांतून घशात सोडलं.

त्यानं स्वतःच आत्ता या जागी शोध लावलेलं कॉकटेल त्याला वेगळीच नशा देऊन गेलं. क्षणार्धात तो तृप्त झाल्यासारखा वाटला. त्याच्या उद्विग्नतेच्या अग्नीवर शांततेची छाया पसरली.

'रक्तमद्य' पितानाचा गोलाएथ बघून रिकार्डोला भीती तर वाटलीच होती. त्याहून त्याला त्याची किळस अधिक वाटून गेली होती.

गोलाएथनं फुटलेली बाटली रस्त्यावर आपटून त्याच्या ठिकऱ्या केल्या. आता हा शांत झालाय हे रिकार्डोच्या लक्षात आलं. त्यानं भीती बळेच मनाच्या मागील कप्प्यात सारली व पुढे झाला.

"गोलाएथ... हे... याला का मारलंस...? मला वाटलेलं तू जसा क्रम ठरवला होतास ते सोडून कोणाला विनाकारण मारणार नाहीस..." रिकार्डो चिंतेत होता.

थोडी भीती अजूनही होती. ती पूर्णपणे दाबणं त्याला जमलं नव्हतं.

"तो क्रम पक्का आहे, पण त्या आधी, त्या मधी, त्यानंतर मी कुणाला मारणारच नाही असं म्हणालो नव्हतो!" गोलाएथ ओठांवरून जीभ फिरवत बोलला.

अजूनही तो 'शोणित मदीरा रसा'चा स्वाद घेण्याच्या आशेत होता.

"याची सुपारी पण नव्हती. मग...?" रिकार्डोनं गोलाएथकडं पाहत भयचकित प्रश्नार्थक विचारलं.

गोलाएथची नजर दूर कुठं तरी लागली होती, जसं तो भविष्याचा वेध घेत होता. त्यानं वर्तमानात जी कृती केली होती, ती भविष्याला आकार देण्यासाठीच होती. आपली योजना कार्य करेल का हे जणू तो भविष्यात पाहून पडताळत होता...

"एसपीला शोधण्यात मला वेळ घालवायचा नाही! इब्लिससाठी जी योजना, तीच एसपीसाठी! शहरात मुडद्यांचा खच पडल्यावर आपल्याला त्याला शोधावं लागणार नाही! काय?" गोलाएथ क्रूर हसत बोलला.

त्याची असुरी मुद्रा रिकार्डोकडं वळली. गोलाएथचा तो अभद्र चेहरा बघून रिकार्डोच्या काळजाचा ठोका चुकला. एक दोन खून करून गोलाएथ गप्प बसणार नव्हता. तेवढ्यानं थेट जिल्ह्याचा पोलीस अधीक्षक त्यात लक्ष घालणार नव्हता हे उघड होतं. यासाठी गोलाएथला प्रेतांचा सडा पाडावा लागणार होता आणि ते तो करणार होता! या विचारानं देखील रिकार्डोचं भय लाव्हारसाप्रमाणं उफाळून आलं. स्वतःला सावरत तो इतकंच बोलू शकला,

"चल, इथनं निघू..." तो पोलिस येतील या काळजीने गोलाएथला म्हणाला.

गोलाएथला तिथून निघण्याचा सल्ला देण्यामागील रिकार्डोचा हेतू समजला होता. तो भित्रा नक्कीच नव्हता. तरी तो तेथून हलला. आत्ताच पोलिसांच्या हत्थे तो लागला असता, तर एसपी त्याच्या सामोरं उभा राहिला नसता. स्थानिक पोलिसांनीच सदर प्रकरण हाताळलं असतं. एसपीपर्यंत हे कृत्य जाण्याचं मोठं कारण नव्हतं. हे तो जाणून होता. आजतागायत मागं पुरावे न सोडता प्रत्येक सुपारी बेलाशक खणखणीत वाजवत आलेला, आपल्या कामात निष्णात असा गोलाएथ आता हरएक खुणामागं आपला सुगावा सोडणार होता. कोल्हापूर

पोलीस सुप्रीटेंडेंट राजन जाधव समोर यावा यासाठीच शहरात असंख्य मुडदे पाडायची ही त्याची निखालस निर्दोष योजना होती! निर्दोष यासाठी कारण ती हमखास यशस्वी होणार होती!!!

●●●

रिकार्डो तूर्त त्याचा जीव वाचला एवढंच समाधान मानून होता. वारंवार तो मानत असलेल्या ईश्वराचे आभार मानत होता, त्याला धन्यवाद देत होता, की,

'गोलाएथच्या अगदी निकट असून गोलाएथला चायनीजचा गाडा चालवणाऱ्या माणसाला मारायची बुद्धी झाली होती. मला मारायची नाही...'

हात जोडून ते वरखाली करत असतानाच त्याचं लक्ष हाताला लागलेल्या गाडेवाल्याच्या रक्ताकडं गेलं. जे वाळून हातांच्या सुरकुत्या व रेषांमध्ये जमा झाला होतं. ते पाहून तो चरकलाच. आजवर त्यानं फक्त असाईन्मेंट्स घेतली होती, स्वतः कधी खून केला नव्हता. त्याच्या आधी हाती रक्त लागण्याचा त्याला पूर्व अनुभव नव्हता. म्हणून त्याची अत्यंत तंतरली होती. त्यानं झटकरून आपले हात त्याच्या जर्किनच्या खिशात सारले व तो सुन्न असा गाडी चालवणाऱ्या गोलाएथच्या बगलेला बसून राहिला, पुढील काचेतून बाहेर पाहत...

◆◆◆

एसपी राजन जाधव हेलीच्या स्पेशल वॉर्डमध्ये तिच्या बेशुद्ध शरीराकडं पाहत होता. हॉस्पिटल बेडवर पडलेल्या तिचं पोट श्वासोच्छवासानं वर खाली होत होतं. मलूल पडलेल्या चेहऱ्याची हेली ही जिवंत आहे याची ते साक्ष देत होतं. त्याच्या मागे सी.पी.आर.चा डीन उभा होता. त्याच्या मागं हेलीची केस सांभाळणारा डॉक्टर व त्याचे मदतनीस. सर्व आपल्या हुद्दा क्रमवारे उभे होते. शार्दूल एसपीच्या अपोजिट हेलीच्या शेजारी उभारला होता. हेलीला जिवंत ठेवू शकतील अशी सर्व मेडिकल इक्विपमेंट्स लावली गेली होती. तिच्या तोंडाला ऑक्सिजन मास्क होता. तिच्यावर सेकंदा सेकंदाच्या अंतरावर जमा होणारी बाष्प हेलीचा जीवित असण्याची साक्ष पुष्ट करत होतं. आणखीन एक खूण म्हणजे तिचं इ.सी.जी. मशीन. त्यावरील हेलीची प्राणरेषा मंद, परंतु सतत वर खाली होत स्क्रिनच्या या टोकाहून त्या टोकाला पळत होती. सगळे नीरव शांततेत. सर्व सुखसोयींनी युक्त परिपूर्ण अशी ती स्पेशल वॉर्ड स्मशान शांततेत सामावलेली होती.

हेली ही सर्वांच्याच आस्थेचा विषय होती. ज्याच्यासाठी काम करेल त्याच्यासाठी सौ प्रतिशत प्रामाणिक. धाडसी. कर्तबगार.

आता जरी हेली इब्लिससाठी काम करत असली, तरी ती अप्रत्यक्षरित्या एसपी राजन जाधवसाठीच तर काम करत होती...

त्यानं सांगितलेलं काम पडत्या फळाची आज्ञा मानून तिनं पूर्वीही पोलीस फोर्समध्ये असताना पार पडलं होतं आणि इब्लिसकडं गेल्यावर इब्लिसकडूनही वठवून घेतलं होतं. हा... ती एसपीपेक्षा आता इब्लिसप्रती अधिक प्रामाणिक होती खरी, तरी पोलीस फोर्समध्ये असताना व आजपर्यंतही तिनं जी साथ दिली होती,

त्याबद्दल तिला एसपी राजन विसरू शकणार नव्हता. तो तिच्या विषयी कृतज्ञता बाळगून होता.

त्याचा मार्ग वेगळा असला, तरी त्याचा गुन्हेगारांना समूळ नष्ट करण्याचा हेतू वाईट नव्हता. इब्लिसला त्यानं म्हणून तर हाताशी धरलं होतं. आणि त्यात मोठा दुवा ठरली होती ती ही, 'हेली'!

आज तोच दुवा तुटतोय का काय असं झालं होतं. असहाय्यपणे एसपी राजन निपचित पडलेल्या हेलीकडं पाहत होता. त्याची टोपी तिच्या सन्मानार्थ कधीची त्याच्याही नकळत डोक्यावरून उरतून काखेत आली होती.

"काळजी करण्याचं कारण नाही. त्या ठीक आहेत. आऊट ऑफ डेंजर आहेत." डॉक्टर सद्य परिस्थिती विदित करत होता,

"डोक्यात कुणी मोठा आघात केला होता. तोंडावरही मार लागला आहे. मेबी कुणीतरी पायानं तोंड चिरडण्याचा प्रयत्न केला होता. मोठ्या धीराच्या असणार या. म्हणूनच वाचल्या." डॉक्टरनं त्याचं परीक्षण सांगितलं.

एसपी राजनला हे ऐकतानाच कसंनुसं झालं. त्याचे डोळे घट्ट मिटले गेले.

शार्दूल अपराध्यासारखा खाली मान घालून उभा होता. त्याचेही डोळे बंद होते. हात पुढं बांधलेले होते.

"शार्दूल चल!" एसपी त्या शांततेत भंग पाडत बोलला.

त्याच्या मागून शार्दूलनं हेलीचा तो स्पेशल वॉर्ड सोडला. बाहेर तैनात सिक्युरिटी ऑफिसर्सना हेलीची सुरक्षा करण्याची सक्तीची ताकीद देऊन एसपीनं पुन्हा शार्दूलला मागून येण्यास खुणावलं. दोघे वॉर्ड पासून दूर चालते झाले...

●●●

काही क्षणात ते सी.पी.आर. हॉस्पिटलच्या एन्ट्रन्स वरील बाल्कनी वजा टेरेसवर होते.

एसपी राजन कठड्यावर टेकून बसला होता. शार्दूल अदबीनं त्याच्यासमोर उभा होता.

"मला शब्द अन् शब्द सांग. काय झालंय ते?" एसपी शांतपणे बोलला.

"सर, इब्लिस हेडकॉर्टर्सला येऊन गेल्यापासून मी त्याच्या मागावर होतो. मला माहीत होतं, ते तुम्हाला आवडणार नाही. म्हणून आपल्याला सूचना दिली नव्हती. इब्लिस संदर्भात हेलीला भेटलो, पण इब्लिसबद्दल हेली काही सांगत नव्हती. म्हणून तिच्या खबरीचा शोध घेतला. दानिश नांवाचा तिचा खबरी अचानक गायब झाल्याचं दिसून आलं. हेलीच्या घरी गेलो होतो, तेव्हा तिचा कोणीतरी पाठलाग करतंय असं आधीच जाणवलं होतंच. तशात तिचा खबरी असा अचानक गायब होणं संकटाची चाहूल देत होतं. हेलीला ट्रेस करत तिच्यापाशी पोहोचलो, तर एकजण तिचा पुन्हा पाठलाग करत होता.

"मी आडकाठी केली. हेली सावध झाली. तिनं उलट माझ्यावरच पेपर स्प्रे मारून तिचा पाठलाग करत असलेल्या माणसाला तिच्यासोबत घेऊन गेली. मी तिचा माग काढला, तर ती इब्लिसच्याच बेसवर त्या माणसाला घेऊन गेली होती.

"ती निघून गेल्यावर इब्लिस तिथं आलाही होता. त्यानं माझ्यावर बेशुद्धीचं डाट फायर करून मला बेशुद्ध केलं.

"मी शुद्धीत आलो तेव्हा हेली परतली होती. खूप चिडली होती. रक्तात न्हाली होती ती. आपल्या बहिणीबद्दल ती इब्लिसला सांगत होती. पाठलाग करणारा जो होता, त्याच्या एका साथीदारानं हेलीच्या घरी घुसून तिच्या बहिणीवर अत्याचार केले. तिला मारून टाकलं असं हेलीचं म्हणणं होतं.

"तिनं इब्लिसच्या ठिकाणावर बांधून ठेवलेल्या माणसाकडून तिच्या बहिणीला मारणारा माणूस कुठं मिळेल हे जाऊन घेतलं आणि ती निघून गेली.

"तिच्या मागून मी तिथं पोहोचलो, तर ती मरणासन्न अवस्थेत पडली होती. तिच्या समोर कोण होता माहितीये सर? अखिलीस! अखिलीस ग्रुप्सचा मालक!" शेवटचं वाक्य बॉम्ब टाकल्याच्या अविर्भावात तो जोर देऊन बोलला होता.

शार्दूलचे अखेरचे शब्द खरंच स्फोटक साबीत झाले. एसपी राजनच्या कपाळावर अनायासे आठ्या उमटल्या. त्याची खाली असलेली, धक्कावलेली नजर हळूहळू शार्दूलकडं वळली. शार्दूल निश्चित भावानं मान हलवून एसपीनं योग्यच ऐकलंय याची पुष्टी देत होता.

एसपीच्या भाळावरच्या आटीव रेषांचं जाळं अधिक गडद झालं. एरव्ही एसपीवर अविश्वास असल्यानं शार्दूलनं त्याचे इब्लिस विषयीचे प्लॅन्स सांगितले नसतेच. पण आता प्रश्न हेलीचा होता. तरी त्याला एसपीला सूचित करणं जरुरीचं बनलं होतं व म्हणूनच तो सांगत होता. शार्दूल इब्लिस विरुद्ध त्याच्या इन्वेस्टीगेशनबद्दल एसपीला न सांगून कायदा मोडत होता असं नव्हतं. त्याचा विचार हा होता, की त्यानं इब्लिस विरुद्ध पुरावे लोकांसमोर आणले, की एसपीला त्याच्यावर कार्यवाही करणं क्रमप्राप्त होणार होतं.

"काय?" आश्चर्यानं काळा ठिक्कर पडलेला एसपी राजन अनायासे अविश्वासी उद्गारला.

शार्दूलची इब्लिसपासून सुरू झालेली गोष्ट अखिलीसपाशी येऊन थांबली होती! एका दुर्धर व्यक्तीपासून सुरू होऊन दुसऱ्या दुर्धर व्यक्तीवर येऊन गोष्ट थांबली होती, आणि तरी पूर्णविराम लागलेला नव्हता. तर अजून खूप काही दुर्धर होणं बाकी आहे असं एसपीला जाणवलं. शार्दूलनं बोलता बोलता मोठाच पट एसपी समोर मांडला होता. एसपीला सगळंच अनपेक्षित व अविश्वसनीय होतं. त्याच्या कपाळावरच्या आठ्या गडद झाल्या. चेहरा अधिकच काळवंडला.

"होय. माझ्याकडं त्याच्या अगेंस्ट काही पुरावा नव्हता. म्हणून त्याला सोडावं लागलं. त्यानं उलट हेली विरुद्धच तक्रार केली, की तिनं त्याची माणसं मारली." शार्दूल बोलला.

"तक्रार म्हणजे...?" एसपी गोंधळला.

"डोन्ट वरी सर, लिखित नाहीये. पण मला खेद आहे. हेली बरी झाल्यावर तिच्यावर कारवाई करावी लागणार. राहिली गोष्ट त्या अखिलीसची, त्याच्यासाठीही पुरावे मिळवेनच मी!" शार्दूल ठाम होता.

"त्याला हातही घालू नको. तो ऑलमोस्ट सर्व पोलिटिकल पार्टीजना फंड पुरवतो.  त्याचं काय करायचं ते मी बघतो." एसपीनं निकाल केला.

"म्हणजे इब्लिस! हो ना?" शार्दूल चक्क आपल्या वरिष्ठाला जाब विचारत होता.

"त्याच्याशी तुला कर्तव्य नाही! आणि त्या इब्लिसपासून पण दूरच रहा. नाही तर मला तुला सस्पेंड करावं लागेल!" एसपी शार्दूलला कठोर होत समज देत होता.

"सर..." शार्दूलला त्याच्याच कानांवर विश्वास बसला नाही. अविश्वासाने तो उद्गारला,

"कायदे पालनात मी कोणतीही चूक केली नाही. करणार नाही! असं असताना आपण असं कसं करू शकता?" तो जाब विचारत होता.

"वरिष्ठांचा आदेश न मानणं हे देखील कायद्याचं उल्लंघनच आहे!" एसपी संयत आवाजात ओरडत खेकसला आणि शार्दूलला समजावत पुढे बोलू लागला,

"इब्लिसचा निकाल मी लावणार आहे हे मी तुला आधीच स्पष्ट केलं आहे. पण ती वेळ आत्ता नाही! गेल्या काही दिवसांपासून अनेक मोठमोठे कॉन्ट्रॅक्ट क्रिमिनल्स एकवर एक कोल्हापूरात येत आहेत. तुला हे माहीत आहेच. ते कोणाचा जीव घ्यायलाही मागं पुढं न बघणारे आहेत. त्यांची क्रिमिनल रेकर्ड्स म्हणजे नुसता नरक. एकतर कोल्हापूर सारख्या शहरात अशा कुख्यात गुन्हेगारांचं असं येणं या मागील कारण समजत नाहीये. त्यांना रोखण्यासाठी इब्लिसची गरज आहे! एकदा का त्याची गरज संपली, की त्यानंतर तोही संपेल!"

"पण मला त्याला कायद्याच्या माध्यमातून शिक्षा करवायची आहे! रादर् हे जे येणारे क्रिमिनल्स आहेत, त्या सगळ्यांनाच कायद्यानंच शिक्षा व्हायला हवी!" शार्दूल नियम अधोरेखित होता.

"झालं बोलून? शार्दूल; कधीकधी कायद्याचं रक्षण करण्यासाठी त्यालाही मुरड घालावी लागते. वेळ जाईल तसं तुझ्या लक्षात येतील या गोष्टी!" एसपी त्याच्या कच्चेपणाची आठवण करून देत शार्दूलला बोलला.

शार्दूल भलेही नवीन असेल, पण तो कच्चा हमखास नव्हता. सर्वांत पक्का तर तो एकटाच होता. एकट्याचं बळ नेहमी तोकडं पडतं. सत्याच्या मार्गावर चालणाऱ्या एकट्या शार्दूलची तीच अवस्था झाली होती. त्याला वरिष्ठ असणाऱ्या एसपी राजन जाधवचं बोलणं ऐकून घेऊन खाली मान घालून राहण्याशिवाय पर्याय उरला नाही.

"बाय द वे, हेलीनं ज्यांना मारलं त्यात ओळखीचं असं कोणी होतं? म्हणजे ज्याचं नांव, फोटो वगैरे आपल्या डेटाबेसमध्ये आहे असं?" एसपीचा सवाल.

"ओळखीचे गुन्हेगार असं कोणी नाही, पण शनशाईन बारचा मालक मुसा तिथं मरून पडला होता. हेलीच्या म्हणण्यानुसार तिच्या मागं लागलेला माणूस आणि तिच्या बहिणीवर बलात्कार करणारा माणूस दोघं या मुसाचे होते!" शार्दूलनं पुष्टी जोडली.

तसा एसपी राजन जाधव कमालीचा अस्वस्थ झाला. याचा अर्थ तो भ्यायला नक्कीच नव्हता, अजून खूप काम करायचं बाकी आहे हे त्याची ध्यानी आलेलं इतकंच.

ते चेहऱ्यावर दर्शवू न देता तो शार्दूलला बोलला,

"मुळात तू इब्लिसच्या मागावर गेला नसतास, तर हेलीची ही अवस्था झाली नसती." एसपी आवाजाचा हेल सौम्य करत शार्दूलला दोष देत बोलला.

शार्दूलची मान अविश्वासानं तडख वर झाली.

"सर, मी त्याच्या मागं होतो, म्हणून हेलीचा पाठलाग होतोय हे समजलं तरी. ते तिच्या मागं लागले ते इब्लिसमुळं. माझ्यामुळं नाही! मी होतो म्हणूनच ती दोन वेळा वाचली. आणि आपण मलाच कसं दोषी ठरवता आहात?" तो आपली बाजू स्पष्ट करत कळकळीने बोलला. त्याचा आवाज किंचित रडवेला झाला होता. त्याचा सूर तक्रारीचा होता.

"ते काही असो!" एसपी ओरडला. वास्तविक त्याला शार्दूलला दोषभावना देऊन या प्रकरणापासून परावृत्त करायचं होतं.

पण त्याच्या या वक्तव्याने शार्दूल अधिकच उत्तेजित झालेला पाहून मग स्वतःला शांत करत एसपीनं एक दीर्घ श्वास घेतला. मान झटकून राग गिळला. शार्दूलला अपराधी ठरवणं हे आपलं गैरवाजवी कृत्य आहे, ही त्याच्या बोलण्यातील चूक त्याला समजली होती. पण आपली चूक कबूल करून माफी मागायची त्याची तयारी दिसत नव्हती. तसं केलं, तर आपल्या कनिष्ठासमोर त्याला कमीपणा आला असता ना... म्हणजे ही त्याची आपली समज.

त्याचा विचार होता, की शार्दूलला गिल्ट देऊन त्याला त्याच्या उचापत्या करण्यापासून परावृत्त करावं. पण शार्दूल देखील युक्तिवाद करण्यात हुशार होता. तशाच प्रतिप्रश्नानं त्यानं एसपी राजनला निरुत्तर केलं होतं.

"तूर्तास इब्लिसचा नाद सोड!" एसपीनं शार्दूलला सल्ला दिला.

कठड्यावर टेकून बसलेला एसपी राजन उभारला. त्यानं शार्दूलकडं आपलं मुख केलं.

"इब्लिस कोणी साधा माणूस नाही! विरुढक! विरुढक आहे तो!" एसपी उद्गारला.

शार्दूलला काहीच कळत नाही, की एसपी नेमकं काय बोलला. त्याला समजण्यासाठी एसपीनं स्पष्टीकरण दिलं,

"विरुढक हा धर्मपाल देव आहे. दक्षिणेचा संरक्षक. प्रेतांचा नेता. त्यांच्यावर लक्ष आणि वचक ठेवून असणारा त्यांचा राजा!

"त्याच्या न्यायाची व्याख्या आहे, की जे अपराधी, दुष्ट व कुकर्मी आहेत, त्यांना शासन करणं, त्यांचा सूड घेणं. हाच त्याचा कार्य सिद्धांत आहे.

"इब्लिस गुन्हेगारांच्या बाबतीत तेच करतो. अपराध्यांना वाटत असतं, की तेच सर्व शक्तिमान आहेत. इब्लिस त्यांना त्यांची जागा दाखवून देतो. तो जे करतोय त्याला तू रेट्रिब्युशन म्हणू शकतोस. अपराध्याला त्याच्या गुन्ह्याची देवानं दिलेली शिक्षा!

"लोक त्याला घाबरतात म्हणून त्याला 'इब्लिस' म्हणजे 'सैतानांचा राजा' असं संबोधतात, पण त्याचा मूळ हेतू हा न्यायाचं राज्य स्थापित करण्याचा आहे!" एसपीनं इब्लिसला अजून मोकाट का सोडलं आहे ते एसपी शार्दूलला पटवून देत होता.

"त्याला मोठं करून सर तुम्ही त्याच्या दुष्कृत्यांना पाठिंबा देताय? तुम्ही त्याच्या चुकीच्या कामाचं समर्थन करत आहात!" शार्दूल चिडला होता.

शार्दूल आपली अक्कल काढतोय अस वाटून राजनचा स्वाभिमान दुखावला. तो उखडून बोलला,

"कोल्हापूरचा क्राईम रेट निअरली झिरो आहे. का? याचा विचार केला आहेस? इब्लिसमुळं. अंतरात्मा मेलेली लोकंच गुन्हा करतात. त्यामुळं जिवंत प्रेतंच ती. या प्रेतांवर राज्य करतो तो इब्लिस! राज्य करण्याचं त्याचं साधन हे भय

आहे. त्याच्या भयापोटीच इथले लोक साधी काडी चोरण्याचा विचार देखील करत नाहीत. मोठे गुन्हे दूरच!" त्याच्याकडून इब्लिस अजून मोकाट का आहे हे राजन याद्वारे शार्दूलला स्पष्ट करत होता.

शार्दूल आपली असहमती दर्शवण्यास, त्याची चिडचिड त्याच्या शब्दांतून व्यक्त करू लागला,

"सर, हे त्याचं काम नाही! तो कायदा हाती घेतो. मोडतो. त्याचं समर्थन नाही होऊ शकत. खरी आवश्यकता त्याला शासन करण्याची आहे!" शार्दूलनं त्याचं मत जे खरंच सत्य होतं ते राजन देखत सिद्ध केलं.

"हो बरोबर आहे! मी नाकारत नाही. पण आपण कायद्याचे रक्षक असल्यानं स्वतः कायदा मोडू शकत नाही, म्हणून तर त्याची गरज आहे हेही नाकारता येत नाही! सध्यातरी..." एसपी राजन हताशपणे त्याचं मत स्पष्ट करत बोलला.

"नाही सर! हे बेकायदेशीर आहे! अशी सूट याला दिली, तर याच्या नंतरही अनेक इब्लिस जन्माला येतील. त्याचं काय सर? ही न्याय्यदंडाची प्रतिव्यवस्था जी तयार होईल ती साखळी आवरता येणार नाही. ती नष्ट करण्यात आपली सर्व शक्ती खर्ची होत राहील. प्रत्येकजण आपल्या आपल्या म्हणण्यानुसार कायदा हातात घेऊन न्याय करत सुटला, तर समाजाचं काय होईल?" शार्दूल आवेगात मोठी चिंता व्यक्त करत होता.

"शार्दूल, तू ओव्हरथींक करतोयस!" एसपी त्याला आवरण्याच्या प्रयत्नात शार्दूलला म्हणाला.

"नाही सर, मी प्रॅक्टिकली बोलतोय. आणि समजा तुमची बदली झाली, तर हाच इब्लिस पुन्हा त्याच्या डोक्यानं न्याय करत सुटेल. त्यावेळी काय कराल तुम्ही?" शार्दूल आवेगात बोलत होता.

याला आता खरंच आवरलं पाहिजे नाही, तर याचा तोल ढळेल असं जाणवून एसपी राजननं त्याला आश्वस्त करण्याच्या हेतूनं शार्दूलच्या खांद्यावर हात ठेवला.

"त्याचं हे कार्य, त्याचा हा धर्म वर्तमान कायदा, न्याय व्यवस्थेला सुसंगत नाही हे मीही मान्य करतोय..." राजन म्हणाला.

"म्हणूनच तो अधर्मी आहे." चिडलेला शार्दूल दात खात मधेच बोलला.

"तेच कारण आहे मी त्याला संपवणार आहे. त्याआधी कोल्हापूरात एकामागून एक येणाऱ्या जघण्य अपराध्यांंच्या येण्याचं कारण समजलं पाहिजे आणि त्यांना अवरोध केला पाहिजे. कारण समजत नाही तोपर्यंत हे अपराधी येण्याचे थांबणार तर नाहीतच आणि यासाठीच मला इब्लिसची गरज आहे त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी!

"पहिला व्यक्ती आल्याचं समजताच मी इब्लिसशी याच कारणानं हातमिळवणी केली होती. एकदा का या क्रिमिनल्सच्या येण्याला आपण अवरोध निर्माण केला, की इब्लिसची गरज संपेल! आणि मग... त्याचा निर्णय आपण करू!" एसपीनं त्याचा निर्धार बोलून दाखवला.

अमान्य शार्दूलला आपल्या आडे येण्यापासून थोपवावं म्हणून तो कंविन्स व्हावा यास्तव एसपी राजन आगे शार्दूलला आश्वस्त व्हावा याकारणे बोलतच राहिला,

"मी तुला विश्वास देतो शार्दूल. माझी बदली जेव्हा कधी होईल, तेव्हा इब्लिसचाही बंदोबस्त होईल. त्याचा सोक्षमोक्ष लावल्याशिवाय मी कोल्हापूर सोडणार नाही! निश्चिंत रहा. आता इब्लिसच्या मागं लागू नकोस!" एसपी शार्दूलला आश्वासन देत बोलला.

त्याच्या बोलण्यात शार्दूलच्या बाबतीतही चिंता झळकत होती.

शार्दूलचं मात्र अजूनही समाधान झालं नव्हतं. इब्लिसचं प्रकरण भविष्यात मिटेलही; पण एसपी त्यासाठी जो मार्ग निवडेल, तो कोणता असेल याची त्याला कल्पना होती. आणि तेच त्याच्या बुद्धीला पटत नव्हतं. त्याला भीती तर या गोष्टीची वाटून गेली, की सुप्रीटेंडेंट राजन जाधव हा जी कलुषित मनीषा बाळगून आहे, ती इब्लिसला समजली, तर एसपीनंच त्याचं आता जे वर्णन केलं त्यानुसार इब्लिस एसपीचा न्याय करणार नाही ना...? त्याच्या डोक्यात विचार घुमत होता...

इब्लिस कायदा तोडत असला,  तरी तो कायद्याप्रती आदर बाळगून आहे हे शार्दूलनं जोखलं होतं. नाही तर इब्लिसनं मौका असतानाही शार्दूलचा जीव न घेता त्याला जीवनदान दिलं नसतं. याकारणाने इब्लिसला फक्त कायदाच आळा घालू शकतो यावर शार्दूल खात्रीशीर होता. दुसरा कोणी इब्लिस समोर तग धरू शकणार नव्हता!

# ११. संगन्मत...

उदयीक झाली होती. पक्षी त्यांच्या नियमाप्रमाणं किलबिलाट करत होते. मानवी जगप्रवाहात काय घडतंय याच्याशी या मूक जनावरांना कायचे स्वैर सुतक?

सूर्य त्याच्या नीतीनुसार ठराविक वेळेवर उगवला होता. निर्जीव आगीचा गोळा तो, त्याला काय पडलीय मानवाच्या जीवनात कोणती उथलपुथल होते आहे याची? सारी मानवजातच काय ही पृथ्वी जरी नष्ट झाली, तरी तो प्रकाश फेकतच राहणार. त्यात बदल होणार नाही. सूर्यावर या साऱ्याचा काही परिमाणही होणार नाही...

इब्लिसवर मात्र परिमाण झाला होता. पिता समान जतीन यांच्या जीवाची काळजी तर होतीच... बार टेंडरचा मोबाईल  सुद्धा इरेज झाला होता. हाती लागलेली आणखीन एक लीड नष्ट झाली होती.

आणि आता तर हेलीची पण त्याला काळजी वाटू लागली होती. काल आपण तिला जाऊ दिलं. एकटीला जाऊ दिलं.

'किमान आपण सोबत जायला हवं होतं. हेलीनं ते मान्य केलं नसतं हे माहीत असल्यानं तिच्या मागून नाही गेलो... जायला हवं होतं. तिची लढाई तिची तिला लढू दिली असती, किमान सोबत तरी राहिलो असतो. कोणी दगा करायला पुढं झालं, तर त्याला नेस्तनाबूत केलं असतं.

'काल ती आपल्याला गळ घालून निघून गेली. गेली ती गेली. परतली नाहीच. तिनं तिचं काम चोख वठवलं असेल ना? शंभर टक्के असणारच! हेली आहे ती! हेली शत्रूंसाठी साक्षात हेल; नरक! पण मग ती अजून परतली कशी नाही?

कुठं अडकली? की काही दगाफटका झाला असेल? शॅ! काही कळायला मार्ग नाही. तिचा फोन लागत नाही. काही तासांपूर्वी लागत होता, ती उचलत नव्हती. आता तर ऑपरेटर मोबाईल बंदच सांगत आहे. काय झालं असेल? कुठं शोधावं तिला... काय करावं...?'

असंख्य प्रश्नांचे भुंगे डोक्यात घेऊन तो त्याच्या गुप्त ठिकाणी, (जी आता गुप्त राहिली नव्हती) स्क्रॅपनं बनलेल्या आसनावर बसून होता. त्याचं तोंड वर छताला लागलं होतं. डोळे मिटून तो पहुडला होता. चिंतन सागरात आकंठ बुडाला होता.

त्याच्या बाजूलाच हेलीचा पाठलाग करणाऱ्या व्यक्तीला हेलीनं बांधून ठेवलेली खुर्ची रिकामी पडून होती. त्याचा मेलेला देह आता तिथं नव्हता. त्याच्या शरीरातून स्रवलेलं व वाळून खळळ झालेलं रक्त आपलं केवळ अस्तित्व तिथं राखून होतं. अस्वच्छता अप्रिय असणाऱ्या इब्लिसनं ही अशुद्धी तशीच पडू दिलेली होती. हेलीपेक्षा त्याला हे महत्त्वाचं नव्हतं. मृतदेह तेवढा तिथून हलला होता. साधं रक्त साफ न केलेल्या इब्लिसनं या मृतदेहाची विल्हेवाट लावली नसणार हे सिद्ध होतं. याहून बरीच महत्त्वाची कामं शिल्लकीला पडलेली असताना या तुच्छ कामात तो स्वतःला खर्ची घालू इच्छित नव्हता. तरी तो निष्प्राण देह तेथून गायब झाला होता. त्याकडंही लक्ष द्यायला त्याला फुरसत नव्हती. स्वारस्य तर त्याहून नव्हतं. मेलाच होता तो, आता काय कपाळ त्याच्याकडून हवी असलेली माहिती मिळणार होती त्याला? मग त्या निरुपयोगी प्राणहीन शरीराला घेऊन करायचं काय होतं? ते गेलं कुठं याची चौकशी करण्याची तसदी तरी का घ्या? जरी

ही मॅन केव्ह इब्लिसची आहे असं साऱ्या तमाम आलम दुनियेला समजलं असतं, तरी या ठिकाणी पाऊल टाकण्याची छाती कोण करणार होतं?

इथं कोणी येईल याची चिंता इब्लिसला नव्हती. ज्याला स्वतःच्या प्राणांची प्रियता नाही असाच कोणी इथं पाय ठेवणार होता.

इतक्या वर्षांत ते धाडस एकाच व्यक्तीनं केलं होतं. शार्दूल!

येस! शार्दूलनचं इथला तो हेलीनं जीव हिरावलेला प्राणी इथून हलवला असणार. शार्दूल व्यतिरिक्त कालपासून इथं कोणाचं येणं नाही. केवळ जाणं; डेडबॉडी सोबत शार्दूल व त्याही आधी... हेलीचं...

हेली... कुठं असेल ती? कशी असेल...? हेली!!!

विचारात बसला असतानाच एसपीचा त्याला फोन आला. तंद्रीतून बाहेर येत त्यानं एसपीचा कॉल घेतला.

'हेलीला तर काही...' एसपीचा फोन बघून त्याच्या मनात भीती उत्पन्न झाली होती. या काही दिवसांत इब्लिस दुसऱ्यांदा असा भ्यायला होता त्याच्या अख्ख्या आयुष्यात... एसीपी बोलल्यानंतर ती जर खरी ठरली, तर तो स्वतःला कधी क्षमा करणार नव्हता. साक्षात इब्लिस धास्तावला होता.

या परिस्थितीत सुद्धा तो आपली ओळख लपवायचं विसरला नव्हता. आपला खरा आवाज एसपी ऐकू नये म्हणून त्यानं त्याचा इब्लिस मास्क तोंडासमोर धरला. त्यातील व्हॉईस मॉड्युलर त्यानं ऑन केला,

"बोल!" तो एसपीला म्हणाला.

"सीपीआरला ये!" एसपी मोजकंच बोलला.

त्यानं फोन ठेवून दिला होता.

'सी.पी.आर.? का? काय झालं असेल? का बोलावलं असेल? कोण असेल तिथं?'

इब्लिस परत विचारात गढला. काही क्षणातच विचारांची जळमटं बाजूला सारून तो उठला. तो सैतानी मुखवटा व्यवस्थित तोंडावर परिधान केला त्यानं व तेथून निघाला तडख तो.

◆◆◆

संतू आपल्या नियमित कामात गढला होता. आश्रमातील मुलं स्वावलंबी होती. त्यांत लहान असणाऱ्यांनाही स्वतःचं आवरण्यासाठी कोणाच्या मदतीची गरज पडत नसे. अगदीच लहान असतील त्यांची जबाबदारी मोठ्या भावंडांवर होती. संतूला त्यांचं असं काही करावं लागतं नव्हतं. तो अधिकतम जतीन यांच्याच तैनातीत असायचा. जतीन यांना हे आवडायचं नाही. ते नेहमी संतूला म्हणायचेही की,

'मी माझ्या मुलांना आपली कामं आपल्या आपण करा म्हणून शिकवतो तिथं मीच जर तुझी मदत घेतली, तर त्यांना आदर्श काय राहणार?'

संतू ऐकायचा नाही. 'त्यांना समजतं!' असं त्याचं उत्तर असायचं.

रवी येऊन गेल्यापासून आणि त्याच्या चेहऱ्यावर काळजीची छटा बघून तर तो जतीन यांच्या अधिकच नजीक राहण्याचा बहाणा पाहत होता. जतीन यांची काळजी घेण्याची रवी ताकीद देऊन गेला होता. त्यात त्यानं काल पाहिलेला तो

भयाण प्रसंग... यानं जतीन यांच्याबद्दल तो जास्तच जबाबदारीनं वागू लागला होता...

जतीन पहाटे चार-पाचला उठून आपलं आवरत असत. इतकं वय असून आश्रमाची साफसफाई करण्यापासून त्यांचा दिवस सुरू होत. इथं ते संतूला नाही, तर संतूच त्यांच्या कामात मदत करत असे. तोवर आश्रमातील मुलांची उठण्याची वेळ होई. मोठी मुलं जबाबदारीनं व त्याहून आस्थेनं आपल्या लहान भावंडांची त्यांना उठावण्यापासून सर्व मदत करत.

जतीन त्यांची योगासनं वगैरे घेत व मग सगळे आपापलं आवरायला निघून जात. मग सर्व मुलांचा अभ्यास वगैरे. ते होताच नाश्त्याची वेळ होई. दरम्यान जतीन आपली कार्यालयाची कामं हातावेगळी करत.

नाश्त्यापूर्वी जतीन यांना सकाळची औषधं घेण्याची वेळ व्हायची. त्यांचं हे काम जतीन स्वतःच करायचे. रवी येऊन गेल्यापासून व जतीन यांची काळजी घेण्याची विशेष ताकीद करून गेल्यापासून संतू जातीनं हळरवेळची औषध देऊ लागला होता.

जतीननी त्याला नाराज नाही केलं. 'संतूला करायचंय ना? तर करू देऊ.' म्हणून एकदा सांगून त्यानं न ऐकल्यावर जतीन यांनी त्याला मनचं करू देण्याच्या निश्चयाने हसून त्याबाबतीत ते गप्प राहिले.

संतूनं दिलेली एक एक गोळी घेऊन मग त्यांनी त्याला विचारलं,

"कालचा तो मुलगा आला नाही का परत?"

जतीन यांच्या प्रश्नानं संतू बिचकला. त्याच्या हावभावात झालेला बदल जतीन यांनी टिपला.

"काय रे काय झालं?" त्यांनी विचारलं.

"नाही बाबा..." तो कसंनुसं बोलला.

"आणि काही सांगायचं आहे?" तो काही लपवत असल्याचं जाणवून त्यांनी विचारलं.

संतू आज सकाळपासून शांत, गप्प असल्याचं त्यांना प्रथमच जाणवलं.

"बोल संतू, काय झालंय?" त्यांनी आग्रह केला.

"बाबा," संतू दबकत सांगू लागला,

"तो सामान घेऊन येतो म्हणून गेला ते बराच वेळ आलाच नाही. म्हणून मग तो ज्या दिशेला गेला तिकडं जरा पुढं जाऊन पाहू म्हणून मी गेलो, तर काही लोक त्याला उचलून घेऊन जाताना दिसले..." संतूनं एका दमात बोलून टाकलं.

"तुला नेमका काही संशय?" जतीन धीरानं बोलले.

"त्याच्यासारखा गरीब दिसणारा माणूस त्याला काही गुंडांनी उचलून नेणं... मला संशयास्पद वाटलं. मला तर शंका आहे, की ते नेत असताना तो मेलेला होता... ते बघितल्यावर रात्रभर झोपलो नाही. पहारा देत राहिलो, वाटलं आपल्या इथं पण कोणी येऊ नये... काही होऊ नये..." संतू जे लपवू पाहत होता ते त्याला जतीन यांच्या प्रेमळ दडपणाखाली त्यांना सांगावं लागलं.

"जाऊ दे. काळजी करू नको. जा तुझं काम कर. जा." जतीन संतूच्या खांद्यावर प्रेमळपणे मारत त्याला भानावर आणत गंभीर मुद्रेनं म्हणाले.

संतूने पाण्याचा तांब्या जतीन यांच्याकडून ट्रेवर घेतला व निघून गेला. त्याला काळजी करू नको सांगणारे जतीन स्वतः मात्र गंभीर झाले...

◆◆◆

इब्लिस हेलीच्या बाजूला खडा होता. तिला तसं बघवत नव्हतं त्याला. तो काही करूही शकत नव्हता. मुखवट्याच्या आत दडलेल्या त्याच्या डोळ्यांत आसवं उभी राहिली होती. थोडा वेळ तिच्याकडं तसंच पाहून त्यानं आधीच तिथं उपस्थित एसपीची काठी त्याच्याकडून घेतली. हेलीच्या उशाला असलेल्या बेडच्या लोखंडी बारला एसपीच्या काठीनं इब्लिसनं जोरजोरात ठोकून वाजवलं.

ग्लानीतील हेली त्या कर्कश् आवाजानं विचलित झाली. डोळे उघडण्याचा ती कसोशीनं प्रयत्न करू लागली.

"उठा बाईसाहेब! पडून राहू नका. काही कामं आहेत तुझ्यासाठी." हेलीला असं पाहून जणू काही फरकच न पडल्यागत तो बोलला.

हे त्याचं वागणं मुद्दाम होतं. तिचा कमांडर् ज्याला आख्खी दुनिया इब्लिस म्हणते, त्याला आपल्या काळजीत मोडलेला हेली पाहू शकणार नव्हती. तिला त्याचं वाईट वाटेल हे इब्लिस पुरतं ओळखून होता. आपल्याला हिच्या या अवस्थेचं काही वाटत नाही हे तो ग्लानीत असलेल्या तिला दर्शवत होता. आपला हुकूम ऐकून सुद्धा ती पडून राहणार नाही असं त्याला वाटत होतं.

हेली भलेही मूर्च्छित होती, तरी तिच्या मानसला इब्लिस निष्काळजीचं नाटक करतोय हे नक्की समजत असणार. इब्लिसची तिच्याबाबतची काळजी ती आधीपासूनच जाणून होती.

"इब्लिस!" एसपीनं त्याला हाक मारली.

बेफिकीरपणे इब्लिसनं त्याच्याकडं बघितलं. एसपीनं त्याला बाहेर चालण्यास खुणावलं. इब्लिस दरवाजापाशी असल्यानं तोच अगोदर बाहेर पडला.

●●●

इब्लिस हॉस्पिटलच्या एग्झिटकडं चालत होता. तो आला तेव्हाच काळ थांबवा तसं हॉस्पिटलमध्ये सगळे पूर्वीच मूर्तीवत स्तब्ध झाले होते. तो हेलीच्या स्पेशल वॉर्डमध्ये दिसेनासा झाल्यावर त्याला पाहिलेले सगळे थोडे ढिलावले होते. इब्लिस बाहेर आल्यावर तेच पुन्हा सख्त झाले होते.

जंगलातून भव्य हत्ती जावा व त्याच्या पायाखाली येऊन आपण चिरडू जाऊ नये म्हणून इतर प्राण्यांनी जीव मुठीत धरून त्याच्या वाटून दूर दबकून रहावं तशी काहीशी ही इथं परिस्थिती होती. त्याची चाल डौलदार अशा गजराजाची असली, तरी ती मदमस्त, उन्मत्त, मस्तवाल अशी नव्हती, तर अतिशय संयत संयमी, धीरगंभीर होती.

इब्लिसला भिऊन काहीजण तर भिंतीला सटून उभे होते. ही भिंत फाकली जावी व आपल्याला तिनं आत सामावून घ्यावं असं त्यांना वाटत असावं.

एव्ही दिवसाढवळ्या तो इब्लिस म्हणून बाहेर पडत नसे. आज निकडच होती म्हणून त्यानं आपलं दर्शन दिवसाच्या उजेडात आपले खेळ करणाऱ्या मनुष्यप्राण्यांना घडवलं होतं. नाहीतर त्याच्या कार्याची साक्ष ही रात्रच असायची. ती रात्र गुन्हेगारांना काळरात्र ठरायची!

असो, आपल्या गाडीकडं इब्लिस जात असतानाच शार्दूल इब्लिस समक्ष दत्त म्हणून हजर झाला. एसपी राजनही शांत निवांत बाहेर आला. खिशात हात घालून केअरलेस उभारला.

आपली नाईन एम.एम. सर्व्हिस पिस्टल शार्दूलनं इब्लिसवर रोखली.

"डोन्ट मूव्ह! रेज युअर् हँड्स इन दि एयर्!" तीक्ष्ण शार्दूलची इब्लिसला धारदार आज्ञा!

तिथं श्वास रोखून उभ्या सर्वांनाच हा आश्चर्याचा धक्का होता. पोलीस! तेही सोबत खुद्द सुप्रीटेंडेंट इब्लिसला पकडायला इथं सज्ज होते हा सर्वांनाच हादरा होता.

इब्लिसला पाहून ते सर्वच जिवाच्या आकांतानं आधीच भ्यायले होते. तशात हा एसपी त्याच्या समक्ष (वस्तुतः प्रत्यक्षात मागे) असा उभा, त्याला अटक करण्यास सज्ज! इब्लिस आता काय करेल? त्याच्या क्रोधानं हा सरकारी दवाखाना मृत्यू भक्षी पडेल की काय? ही भीती सर्वांना चाटून गेली. यमदेवता प्रत्येकाच्या कानात त्यांना नेण्याअगोदर मृत्यूमंत्र पुटपुटतोय असा काहींना भास झाला असावा. इतकी तिथं भयानक गोठवण पसरली होती...

त्यांना जे भय होतं, तसं काही झालं नाही. इब्लिसनं आज्ञाधारक वासरास्तव आपले हात हवेत उंचावले. तो हळूहळू मागं वळू लागला.

"वळू नको! गाडीत बस!" एसपीनं त्याला गन पॉईंटवर ठेवूनच ऑर्डर दिली.

इब्लिसनं स्वतःच्या गाडीकडं पाऊल टाकताच एसपीनं त्याला टोकलं,

"तुझ्या नाही! आमच्या!" त्यानं आदेश दिला.

इब्लिस तसाच पोलीस कारकडं वळला. आत बसला. त्याच्या डोक्यात काही चालू होतं का? कोणाला थांग लागत नव्हता... ज्याचा चेहराच पाहू शकत नाही, त्याच्या मनाचा डोह कसा चाचपडणार?

इब्लिस कारमध्ये बसताच शार्दूलनं त्या कारच्या ड्राईव्हिंग सीटचा मोर्चा घेतला. त्याची पिस्टल इब्लिसच्या छातीत रोवली होती.

"तुझ्या गाडीची किल्ली!" शार्दूल इब्लिसला म्हणाला.

इब्लिस काही कृती न करता मुर्दाडासारखा बसून राहिला. शार्दूलनं स्वतःच त्याचे खिसे चाचपले. किल्ली पँटच्या उजव्या खिशात सापडली. त्यानं पोलीस कारची खिडकी उघडून ती किल्ली एसपीकडं फेकली. एसपीनं ती झेलली.

अजिबात वेळ न दवडता शार्दूलनं पोलीस कार तेथून काढली. इब्लिसला पोलीस घेऊन जाताच वारं शिरलेल्या सर्वांच्या जीवांत जीव आला.

लोकांना जीवदान देणाऱ्या या जागेला इब्लिसच्या अस्तित्वानं जडवत निर्जीव मरूभूमी करून टाकलं होतं.

काहींचा तर 'राम राम राम राम...' असा अगदी जपच चालू होता. कोणी 'भीमरूपी'चा नाद धरून होतं... तर कोणी अल्लाह व जीजसला याद करत होतं...

'इब्लिस'ला पळवून लावण्याचा तो एकमात्र उपाय त्यांना दिसला असावा. पण हा 'इब्लिस' देवाच्या स्मरणानं दूर पळणारा थोडीच होता...?!

असो; इब्लिस गेला तेव्हा कुठं त्या काहीक्षण स्मशान झालेल्या जागेत पुन्हा जान आली. एसपीच्या शांत चेहरावर एक दिलासा होताच. त्यानंही मग इब्लिसची कार ताब्यात घेतली व ती घेऊन तो निघून गेला.

एसपी इब्लिसची कन्व्हर्टिबल गाडी पळवत होता. उन्हाचा तडाखा होता, त्यानं कारचं हूड झाकून घेतलं होतं. काही विचार डोक्यात घोळवत तो इब्लिसची गाडी पळवत होता. त्याच्या विचारांची लिंक तोडत त्याचा फोन वाजला. त्यानं मोबाईल काढून पाहिला.

कंट्रोल रूमवरून फोन होता. त्याला तो अवॉईड करता आला नाही. कॉल रिसिव्ह करून स्पीकर करत त्यानं मोबाईल डॅशबोर्डवर टाकला,

"जय हिंद सर, शाहूपुरी पोलीस स्टेशनहून सब-इन्स्पेक्टर प्रदीप घोळवे बोलतोय." तिकडून आवाज आला.

कंट्रोलरूमने दोन्ही कॉल्स कनेक्ट केले होते.

"जय हिंद. बोला." पलीकडे ठीक आवाज जाण्यासाठी एसपी राजन थोडं ओरडून बोलला.

"सर, दोन चार दिवसांपूर्वी विक्रमनगरमध्ये जसा विचित्र निर्घृण खून झाला होता, तसाच काहीसा इथं खून झाल्याचं दिसून आलंय..." तिकडून गांभीर्य स्पष्ट केलं गेलं.

"ठीक आहे. डिटेल्स मला सेंड करा. हेडकॉर्टर्सला देखील देऊन ठेवा!" एसपी राजननं आदेश दिले.

"ओके सर. जय हिंद सर." म्हणत तिकडून इन्स्पेक्टर प्रदीपनं फोन ठेवला.

काही वेळातच एसपी राजनची मेसेज टोन वाजली. एसपी राजननं आलेले डॉक्स वरवर पहावं म्हणून डोळ्यांखालून घातले.

चायनीज गाडेवाल्याच्या शरीराची अक्षरशः चाळण त्याला आलेल्या फोटोंत पहायला मिळाली. एसपी राजननं एकवार डोळे मिटून घेतले. उद्विग्न झालेलं मन शांत केलं. मोबाईल होता तसा खिशात सारला. त्याचा पाय कारची स्पीड वाढवत गेला.

एका वापरात नसलेल्या निर्जन बॉक्साईटच्या खाणीत इब्लिसला घेऊन आलेली पोलीस कार उभी होती.

"माझा एन्काऊंटर करण्याचा मनसुबा दिसतोय तर..." इब्लिस मशीनी आवाजात उपहासात्मक गंभीर असलेल्या शार्दूलला बोलला.

"मी संवैधानिक मार्गांनी चालतो!" गुश्श्यात असलेला शार्दूल म्हणाला.

"तुझ्या एसपीबद्दल तसं म्हणता येत नाही याचं दुर्दैव आहे." इब्लिसनं शार्दूलला खिजवत रिमार्क दिला.

"स्टॉप प्रिटेंडिंग लाईक यु आर् अबाऊ द लॉ!" शार्दूल जीव खाऊन ओरडला.

"आय एम प्रीटी अवेअर्, दॅट आय एम नॉट!" इब्लिस तितक्याच शांततेनं पण आवाजात कमालीची गंभीरता आणत बोलला.

शार्दूलला इब्लिसचा विनम्रपणा अधिकच चीड आणून गेला. तरी चरफडत राहण्यापलीकडं त्याला काही करता आलं नाही.

इब्लिस! ज्याला जेरबंद करायचं स्वप्न तो गेले कित्येक दिवस पाहत होता, तो साक्षात बाजूला बसलेला असताना त्याला त्याच्यावर कारवाई करता येत नव्हती. तो वाट पाहत होता एसपीच्या येण्याची...

इब्लिसची गाडी आली. ती पोलीस गाडीला समांतर लागली. एसपी राजन उतरून पोलीस गाडीकडं आला. त्याला बघून शार्दूल गाडीतून उतरला. त्याची जागा एसपीनं घेतली. दार लागलं गेलं. गाडी साऊंड प्रुफ होताच...

"सॉरी, आपल्यात संगन्मत आहे हे लोकांना कळू नये म्हणून हे करावं लागलं." एसपी राजन इब्लिसना बोलला.

"ते तेव्हाच कळलं, जेव्हा तुझ्या ऑफिसरनं सेफ्टी लॉक रिमूव्ह न करता माझ्यावर बंदूक टेकवली. म्हणून तर गप्प राहिलो. बाय द वे तुझा हा बच्चा यासाठी तयार कसा झाला?" इब्लिसचा तो खूंखार दिसणारा मुखवटा एसपीकडं वळला.

"त्याला समजावलंय काय समजवायचं ते. तू त्याच्याकडं ध्यान देऊ नको!" एसपी त्याला म्हणाला.

इब्लिस मास्कच्या आत उपरोधिक हसला होता.

"असाईन्मेंट आहे?" इब्लिसनं विचारलं.

"हो. पर्सनल आहे. तू नाकारणार नाहीस अशी खात्री धरतो." एसपी राजन बोलला.

"हेलीबाबत असेल, तर नक्कीच! डिटेल्स!" इब्लिसनं खात्री दिली.

"अखिलीस! त्याच्या घरी शार्दूलला हेली जखमी सापडली." एसपीनं थेट सांगितलं.

"म्हणजे अखिलीसचा गेम करायचाय तर!" इब्लिस कमालीचा थंड बोलला.

"अंहं. एव्हीडेन्स नाहीत. त्याचं कोणतं क्रिमिनल रेकर्ड नाही. तो स्वच्छ बिझनेसमन आहे. त्याच्या बाबतीत जेवढी माहिती गोळा केली त्यानुसार माणूस क्लीन दिसतोय. निदान कागदावर तरी. त्याला असाच उडवता येणार नाही. एखादा निर्दोष हातून मरायला नको! म्हणून तर शार्दूलनं पण त्याला असंच सोडून दिलं. एव्हीडेन्स शिवाय त्याला मारणं शक्य नाही. अखेर कायद्याचा मी पण आदर करतोच. म्हणून तर कायद्याच्या रक्षणासाठी मी कोणत्याही थराला जाऊ शकतो!

"शिवाय तो जवळजवळ सगळ्याच पॉलिटिकल पार्टीजना फंड्स पुरवतो. सो, एव्हीडेन्स मिळवून त्याचा खात्मा केला, तर कोणत्याही पॉलिटिकल पॉव्हरला हस्तक्षेप करता येणार नाही." एसपीनं योजना सांगितली.

"मग काय आता एव्हीडेन्स मी गोळा करायचे आहेत?" इब्लिस टोमणा मारत बोलला.

"ते मी करतो. तू तयारीत रहा. हेलीसाठी हे करावंच लागेल." एसपीनं इब्लिसला स्पष्ट केलं.

"फाईन. मी आधी सांगितलेल्या माझ्या कामाचं काय झालं?" इब्लिसनं विचारलं.

"अजून काही इंटेल्स नाही. तो रशियात्नं आलाय असं कळलं. होता भारतीयच, पण आपण हे इल्लीगली करत असल्यानं रशियाकडून इन्फॉर्मेशन घेता येत नाही. त्यामुळं त्याची इथली मूळं खणता येत नाहीत.

"पण तरी माझा अंदाज आहे, की या काही दिवसांत मी जेवढी असाईन्मेंट्स तुला दिली, ते सगळे क्रिमिनल्स एकच काम पूर्ण करायला आले होते. एक तुझ्याकडून मेला म्हणून दुसरा, दूसरा मेला म्हणून तिसरा... असा त्यांचा भरणा शहरात झालेला दिसतोय. हा... पण ते कोणतं काम मार्गी लावायला आले होते हे समजायला मार्ग नाही..." एपीनं त्याची अडत बोलून दाखवली.

"कशावरून?" इब्लिसनं त्याला अधिक सांगण्यास प्रवृत्त केलं.

"एकाच्या मृत्यूनंतर दुसऱ्याचं कोल्हापूर शहरात दाखल होणं तेच स्पष्ट करतं. शिवाय जे जे आलेत, ते एकाच एअरलाईन्सनं!" एसपीनं इथंवरचा तपास एक दमात सांगितला.

बाहेरील व्यक्तीला अशी माहिती देणं तसं चूकच. पण ही साधारण माहिती इब्लिसला सांगितल्यावर नुकसान काहीच नव्हतं. काही झाली, तर इब्लिसकडून पुढील तपासात मदतच होईल म्हणूनच एसपी उचकटत होता.

गाडीत दोघांच्या गुजगोष्टी चालू असताना बाहेर उभ्या शार्दूलला करण्यासाठी काही नव्हतं. त्यांचं संधान बघून त्याला मस्तकसुळ उठत होता आणि तो पायाच्या नखापासून डोक्यात भिणभिणत जात होता. पायानं खडे उधळत तो निर्दोष जमिनीवर आपला राग काढत बसला (तत्वतः उभारला) होता.

"पण हे सत्र संपायचं  नांव घेत नाही. आणखी एक जण घुसलाय. तुझ्यावर ज्या खूनाचा आळ घेतला तो हाच खूनी असावा. लक्ष्मीपुरीत आणखी एक मर्डर झालेला आहे. तसाच निर्घृण! आणि तो कोण आहे? कसा आला? ते समजत नाही." एसपी वैतागी कुणकुणला.

"प्रोबॅब्ली तो एअरलाईन्सनं आलाच नसेल, तर? किंवा तो आधीच कधी तरी इथं आला असेल आणि त्याचं रेकॉर्ड तुमच्याकडे नसल्याने तो तुम्हाला माहित नसेल, किंवा तो भारतालाच कुठला तरी असेल, तर...?" इब्लिसनं नवीन काही शक्यता एसपीच्या डोक्यात भरल्या.

एसपी राजनच्या डोक्यात प्रकाश पडला. त्याचे डोळे जाणिवेनं विस्फारले. इब्लिस पुढे बोलू लागला,

"अखिलीस माणूस ठीक असेल नसेल, पण या सगळ्या घटना विस्कळीत आणि एकमेकांपेक्षा वेगळ्या दिसत असल्या, तरी त्या एकच आहेत आणि त्या

अखिलीसपर्यंत जाऊन मिळतात हे स्पष्ट आहे. आता फक्त तो कशाच्या मागं आहे एवढं शोधावं लागणार आहे..."

"जे घडतंय ते अखिलीसशी संबंधित आहे असं वाटण्याचं खास कारण?" एसपीचीही तीच शंका असून देखील तो इब्लिसचा तर्क जाणून घेण्याचा इच्छेने इब्लिसला चाचपडत होता.

"ज्या जोनाथनची मला माहिती हवी आहे. त्याची इन्फॉर्मेशन काढायला मी हेलीला पण सांगितलं होतं. त्यानंतरच तिच्या मागं काही लोक लागले. त्यांतील एक तिनं माझ्या बेसवर बांधून ठेवला, पण दुसऱ्या एकानं तिच्या घरी घरफोडी करून तिच्या बहिणीवर अत्याचार केले. तिला मारून टाकलं. यामुळंच ती वेडीपीशी झाली. ती माणसं मुसाची होती..." इब्लिस बोलत असतानाच त्याला एसपी राजन जाधवनं वारं अंगात शिरल्यागत त्याला टोकलं.

"काय? मुसा?" एसपी मध्येच उद्गारला,

"हो का?" इब्लिसला त्याची ही प्रतिक्रिया अपेक्षित नव्हती.

"मुसाच्या बारमध्ये एक हत्याकांड झालंय." एसपीनं इब्लिसला त्याच्यासाठी नवी असलेली माहिती दिली.

"हेलीच असेल त्या मागं! कारण मुसा हेलीच्या घरी घुसलेल्या माणसाला त्याच्या बारमधून घेऊन गेल्यावर ते कुठं गेलेत हे तिनं बंधक करून ठेवलेल्या माणसाकडून जाणून घेण्यासाठी ती बेसवर परत आली होती. त्यानंच तिला अखिलीसकडे पाठवलं." इब्लिसनं अधिक माहिती एसपीला पुरवली.

"मुसाला पण हेलीनंच ठार केलंय. आणि त्यावेळी तो अखिलीसच्याच घरी होता...!" एसपीच्या डोक्यात सर्व पॉईंट्स जुळू लागले होते.

वास्तविक या गोष्टी  त्याच्या आधीच लक्षात आल्या होत्या. इब्लिस तोंडून मुसाचं नांव ऐकून चमकल्याचं त्यानं बळेच नाटक केलं होतं. त्याला इब्लिसचा तर्क काय सांगतोय हे चाचपडायचं होतं.

आणि... ते दोघे एकाच पानावर होते. हे सुस्पष्ट झाले होते...

"दस, माय अजम्शन्स हॅज बिन प्रुव्ह्ड्! एव्हरीथिंग इज इंटरकनेक्टेड्!" इब्लिस बोलला.

असं असून  अखिलीसला ते हात लावू शकत नव्हते. त्याच्या परोक्ष काही पुरावे जे नव्हते...

"याचा अर्थ आपण एकत्र काम करतो हे अखिलीसला माहीत झालं असेल... तू हेलीला थांबवलं का नाहीस?!" एसपी इब्लिसवर खेकसला.

ती अगदीच मोठ्या संकटात अडकली होती. हे पक्कं होताच एसपी अतीव संतापला. ती लढवय्याच, म्हणूनच तिथून सुखरूप म्हणता येणार नाही, पण जिवंत तरी बाहेर पडली होती.

"ती तिची लढाई होती. मी तिला ती लढू दिली!" इब्लिस निर्विकार बोलला.

"यात ती मेली असती तर?" एसपी चिडून ओरडला .

"प्रत्येकाचा प्रवास वेगवेगळा असतो. आपण त्यात हस्तक्षेप करू शकत नाही!" इब्लिस निर्विकारच.

"पण यामुळं ती आता एक क्रिमिनल झाली आहे! ती बरी होताच मला तिला अटक करावी लागेल." एसपीनं तडकून फैसला सुनावला.

"तुझ्यात जरा जरी लाज असेल, तर तू असं काही करणार नाहीस! हेलीला जे निकष लावतोस ते स्वतःला लावू शकशील?" इब्लिस बोलला व त्यानं दरवाजा उघडला.

इब्लिसनं एसपीची लाज काढताच त्यानं इब्लिसकडून डोळे चोरले होते. पण दरवाजाचा आवाज होताच एसपी राजननं इब्लिसकडे पाहिलं.

"कुठं?" त्यानं विचारलं.

"अखिलीसची खबर घ्यायला!" इब्लिस बोलला.

एसपी राजन जाधवची कोणतीच प्रतिक्रिया घ्यायला तो थांबला नाही.

आपल्या गाडीकडं चालताना शार्दूलला त्याच्यापासून समांतर अंतरावर पाठमोरा थांबला. इब्लिस विषयी तिरस्कार तोंडावर असलेला शार्दूलही त्याच्याकडं वळला. जळजळीत नजरेनं तो इब्लिसला पाहू लागला.

दिवसाच्या झगमगाटात सुद्धा भयावह दिसणारा इब्लिसचा मुखवटा त्याच्याकडं फिरला. इब्लिस काही क्षण शार्दूलला पाहत उभारला. तितका वेळ शार्दूल पण चिडक्या भावनेनं इब्लिसकडं पाहत राहिला होता.

इब्लिस जे टोचून बोलला होता ते एसपीला आहत करून गेलं होतं. अखेर तो मन घट्ट करून इब्लिसला उत्तर द्यायला उतरला.

"हेली जे वागली, ते तिच्या स्वार्थापोटी. मी जे करतोय, ते समाज निरोगी व्हावा म्हणून आमच्यात फरक आहे!" एसपी स्वतःची भूमिका स्पष्ट करू पाहत होता.

इब्लिस कीव करणारं हसला. अर्थात, 'इब्लिस' मास्कमुळे एसपीला ते दिसणार नव्हतं. इब्लिसची मान मागं वळली. त्याची नजर एसपीवर पडली. शार्दूलही त्याच्याकडे डोळे लावून राहिला.

"उद्देश काही असो, कायद्याच्या नजरेत गुन्हा तो गुन्हाच!" इब्लिस एसपीचं स्पष्टीकरण खोडून काढत म्हणाला,

"प्रत्येकालाच आपला हेतू उदात्त आणि दुसऱ्याचा अप्पलपोटी वाटतो. पण ही स्वतःचीच जाणीवपूर्वक केलेली फसवणूक असते. स्वतःला स्वतःची बाजू पटावी आणि सद्सद्विवेक बुद्धीला ती योग्य वाटावी म्हणून." आणि त्यानं शार्दूलकडं डोळे वळवले,

"काय बरोबर ना?" त्यानं शार्दूलला विचारलं.

शार्दूल काही बोलला नाही. त्याचं उत्तर 'होय' हेच होतं, पण ते उद्धृत करून एसपीला तो उघडा पाडू इच्छित नव्हता. त्यांच्यातील वैमनस्य हे त्यांच्यातील होतं. इब्लिस सारख्या अपराध्यासमोर तो आपल्या वरिष्ठाला चुकीचं ठरवू पाहत नव्हता. तो चुकीचा असला तरी!

त्याचं मौनातील उत्तर इब्लिस तरीही समजला होता. तो पुनः हसला,

"हेलीसाठी तू जे केलंस, त्यासाठी खरंच धन्यवाद!" इब्लिस शार्दूलचे मनापासून आभार मानले.

आणि तो आपली गाडी पिटाळीत त्यानं दोघांना तिथंच सोडलं...

# १२. गोलमेज...

रात्र होईतो इब्लिस आपल्या रवीच्या रुपात राहिला होता. त्यानं आपल्या गुप्त (जे शार्दूलला समजल्यानं आता गुप्त राहिलं नव्हतं) ठिकाणा वरील आपले कपडे आणि खासकर आपला इब्लिसचा मास्क सुटकेसमध्ये पॅक करून त्यानं बेस त्यागलं.

त्याची गाडी  अखेरीस लागली ते त्याच्या सूर्योदय अनाथाश्रमला. अनाथनांच्या अंधारमय खडतर आयुष्यात सूर्याचं नवचैतन्य निर्माण करून त्यांचं आयुष्य सुजलाम् सुफलाम् करणाऱ्या या मंगलमय वास्तूशी तो पुनः आला होता...

घर! इब्लिस... नाही... रवी... रवीचं घर!!!

इथंच तो खरा असतो! रवी असतो!! माणूस असतो!!!

आजही तो आला तेव्हा त्याच्याभोवती ही गर्दी झाली. त्याच्या भावडांनी प्रेमानं त्याला घेरलं होतं. आजही तो इतक्या तणावात असून आपल्या प्रिय भावंडांसाठी काही ना काही भेटवस्तू आणायला विसरला नव्हता.

अलिकडं त्याचं इथं येणं वाढलं होतं, तरी प्रत्येक वेळी त्याचे हे लहान-थोर आप्त त्याला त्याच आपुलकीनं आणि उत्साहानं भेटत असतं. आता तर त्यांचा हा उत्साह असंख्य पटीनं वाढला होता. त्यांना रवीच्या हाती त्याची बॅग जी दिसत होती.

तो रहायला आला आहे हे त्यांनी ओळखलं होतं. किती दिवस का असेना, आता तो जेवढे दिवस इथं असेल तेवढ्या दिवसांत कायमचा सहवास त्यांना लाभणार होता. आश्रमातील सर्व मुलंच काय, पण संतू देखील आनंदला होता.

आणलेल्या भेटींचं वाटप संतूकडं सोपवून रवीनं भावंडांची रजा घेतली. बॅग सुद्धा खोलीत ठेवायला त्यानं सांगितलं होतं संतूला.

रवीला जतीन यांना भेटायचं होतं. ते कुठं असतील याचा अंदाज असल्यानं त्यानं कोणाला काही न विचारता जतीन यांचं कार्यालय गाठलं.

जतीन काम करतच बसले होते. नाही म्हणायला त्यांना रवीच्या गाडीचा आवाज आणि पोरांचा गलका ऐकू आला होता, तरी ते हातचं काम सोडून बाहेर आले नव्हते. रवी येईलच भेटायला हे त्यांना ठाऊक होतं.

रवीनं जतीन यांची परवानगी घेण्यासाठी उघडंच असलेलं दार वाजवलं. जतीन यांनी त्याच्याकडं न पाहताच त्याला आत येण्यास मानेनं खुणावलं. तो आत येऊन उभा राहिला.

"बैस!" काम पाहतच ते म्हणाले.

"नाही असू द्या. मला आपल्याला इतकंच सांगायचं होतं सर, की मी आजपासून आपल्यासोबतच राहीन." रवी गंभीर स्वरात म्हणाला.

हे ऐकताच जतीन यांची मान वर झाली. त्यांच्या भुवया उंचावल्या गेल्या.

"तुझे गैरव्यवहार बंद करतोयस वाटतं." जतीन त्याला म्हणाले.

"माहीत नाही. पण आपल्या सोबत राहण्याची इच्छा आहे." रवी बोलला.

जतीन हसले. चष्मा काढून टेबलवर ठेवत निवांत होत मागं टेकले.

"बस." सुस्मित ते रवीला म्हणाले.

रवी विसावतो तोच एकजण पाणी घेऊन आला. त्यानं दोन ग्लास डेस्कवर ठेवले. तो हे करत असताना रवी त्याच्याकडं निरखून पाहत होता. सुरवातीला स्वाभाविक नजर त्याच्यावर गेली होती त्याची. पण त्याला हा चेहरा माहितीचा

वाटला म्हणून मग त्याच्या कपाळावर आठवणींचं जाळं विणलं गेलं; ते काही काळच. जतीन यांच्या संबोधनानं तो भानावर आला. एव्हाना तो पाणी देणारा केबिन सोडून गेला होता.

"मला कोणी मारून टाकेल म्हणून?" जतीननी रवी जो विषय टाळत होता त्यालाच हात घालत विचारलं.

रवी थक्क झाला. त्याची खाली लागून राहिलेली नजर ताडकन जतीन यांच्यावर गेली. तो स्तब्ध पुतळा होऊन त्यांच्याकडे पाहत राहिला.

"तसं काही झालंच, तर ते माझ्या प्रारब्धाचं फळ असेल, तुझ्या कर्माचं नाही. स्वतःला दोष देऊ नको. त्यासाठी अपराधीपणाचं ओझं वागवू नको. अपराधबोध जागृत झाला असेल, तर तो तुझ्या घोर कर्माबाबत असावा." जतीन सल्ला देत बोलले.

त्यांच्या बोलण्याचा रोख रवीला कळला नाही. रवीला एवढं स्पष्ट झालं, की जतीन यांचा जीव त्याच्यामुळं धोक्यात आहे असं जे तो समजत होता, ते कारण नव्हतं. या मागं काही वेगळं कारण आहे. जे जतीन त्याला सांगत नाही आहेत. का? तेही त्याला समजत नव्हतं.

"सर, प्लिज आपण स्पष्ट बोलाल?" जतीन यांच्या पुढं मुर्दाड होऊन बोलण्यास न धजवणारा रवी हिंमत करून विचारत होता.

"वेळ आल्यावर तुला कळेल. मी आधीच बोललो आहे तुला. तू गेलास तरी चालेल. माझ्या रक्षणासाठी तू इथं राहण्याची गरज नाही. तुझे उद्योग सोडून एक सामान्य माणूस म्हणून इथं राहणार असशील, तर माझ्याकडून तुझं नेहमीच

स्वागत असेल. माझी काळजी रवीनं करावी, इब्लिसनं नाही! आता निघ!" जतीन बोलले.

आणि काही झालं नाही अशा अविर्भावात आपल्या कामात आणखीदा गढले.

रवी मग तिथं थांबला नाही. तो निघाला. संतू बाहेर उभा होता. रवी त्याच्याशी थांबला.

"पाणी द्यायला आलेला हा नवा गडी कोण?" रवीने संतूला विचारलं.

"नवा कामगार आहे. काम मागायला आला, बाबांनी ठेऊन घेतलं." संतू बोलला.

"आणि तू ठेऊ दिलंस?" रवीचा आवाज चिडखोर कठोर झाला.

"तुम्हाला माहित आहे त्यांचा स्वभाव दादा." संतू असहाय बोलला.

"बरं असू दे. पण लक्ष ठेव त्याच्यावर." रवीची ताकीद.

"ते तर आहेच." संतू धीर गंभीर झाला,

"तुम्ही पण काळजी घ्या." त्यानं कळकळीनं सांगितलं.

"काही झालंय का?" रवीचा प्रश्न.

"हो. काल पण असाच एकजण आला होता आसरा मागायला. काही वेळानं त्याचं प्रेत काही लोक उचलून घेऊन गेले. मला तो आलेला माणूस संशयित वाटला होता. आणि आता हा..." संतू हळू आवाजात बोलला.

जतीन यांच्यापर्यंत आवाज गेला, तर हे सर्व रवीला सांगितल्याबद्दल ते रागावतील हा त्याचा विचार.

"आणि अगदी अलीकडंच असे नवीन नवीन लोक संस्थेत काही न काही कारण काढून येणं. संशयाचंच आहे. बाबांपुढं आमचं काही चालत नाही. सगळ्यांना आश्रमाची दारं सताड उघडी ठेवली आहेत. ते पुढच्याची चांगली वाईट भावना समजून न घेता सगळ्यांना सामावून घेतात. काळजी वाटते ओ..." संतू कळकळीनं भावना व्यक्त करत होता.

"मी समजू शकतो. ते माझंही काही ऐकत नाहीत. त्यांची काळजी म्हणूनच मी रहायच्या विचारानं आलो होतो. त्यांनी रीतसर मला जायला सांगितलं." रवी नाराजी व्यक्त करत होता.

"मग तुम्ही आता..." संतू बैचेन बोलला.

"जावं लागेल. सरांची आज्ञा मोडवत नाही. त्यांच्या आणि संस्थेच्या सुरक्षेचा मी बंदोबस्त करेन. तू फक्त सरांना कोणी अपाय करणार नाही याकडं लक्ष देऊन रहा. प्लिज जरा बॅग आण माझी." रवी त्याला बोलला.

संतू जात असतानाच रवीनं त्याला नांव घेऊन थांबवलं,

"सगळे कुठं आहेत?" रवीनं विचारलं.

"मेसला आहेत जेवणाची वेळ झाली आहे ना." संतूनं उत्तर दिलं.

"गुड. कुणाला कळायच्या आत बॅग आण." रवीनं सांगितलं.

आपल्या येण्याचा त्यांना झालेला आनंद त्यानं पाहिला होता. लगेच निघून जाताना ते दुःखी झालेले तो पाहू इच्छित नव्हता.

"हो." म्हणून संतू रवीसाठी राखीव ठेवलेल्या खोलीकडं पळाला.

●●●

रवी आपल्या गाडीत वाट बघत बसला होता. त्याची बॅग संतू धावत घेऊन आला. खिडकीतूनच घाईनं त्यानं ती आत सारली. रवीनं त्याचे आभार मानले व गाडी पळवत निघून गेला.

●●●

दिवस रात्रीकडं कलू लागला होता. गाडी पिटाळत असतानाच रवीनं आपला 'इब्लिस' मास्क आपल्या मुखावर परिधान केला. त्याचा क्रूर चेहरा बाहेर दृश्य होऊ लागला.

तो लालभडक मुखवटा, ज्याचे पांढरट पिवळे अनुकुचीदार सुळे दात बाहेर डोकावत त्या मुखवट्याच्या क्रूरतेत अधिकची भर घालत होते. बाहेर आलेले ते बटबटीत मोठी बुबुळे असलेले ते डोळे आणि वर रक्तीम लाल चमकणारी शिंगे. इब्लिसचं हे सैतानी मुख पाहूनच अनेकजण धडकी भरून मरत.

मास्क चेहऱ्यावर सेट झाल्यावर त्यानं एकवार नजर रिअर व्ह्यू मिररवर नजर टाकली. तो चेहरा पाहून कोणीही तक्षणी मरेल असा तो चेहरा. कधी कधी आपण स्वतःला आरशात पाहिलं, तर आपल्याला आपणच क्षणभर ओळखत नाही. परंतु इब्लिसच्या बाबतीत ती गल्लत नव्हती.

रवीचा तो कधीच 'इब्लिस' झाला होता.

आता तो इब्लिस म्हणूनच स्वतःला ओळखत होता. त्याच्यासाठी आता तोच त्याचा खरा चेहरा होता...

मास्कच्या आतील त्याचे डोळे एकवार मिटले व ते जेव्हा उडघडले, तेव्हा इब्लिस त्याच्या अंतर्मनावर आरूढ झाला होता...

●●●

इब्लिसचा पुढचा मुक्काम होता, तो अखिलीसच्या घरी. अखिलीसनं नव्या गार्ड्सचा एव्हाना भरणा केला होता. अखिलीसचं संपूर्ण घर फिनाईलनं साफसुथरं स्वच्छ केलं होतं. रक्ताचा पुसटसा डाग शिल्लक राहणार नाही याची काळजी घेतली गेली होती. अखिलीसला अस्वच्छता आणि गलिच्छपणा अजिबात आवडत नसे. त्यामुळं हेलीनं त्याच्याच लोकांच्या रक्ता-मांसानं भडक व अपवित्र केलेल्या बंगल्याला सफाई कामगारांनी पुनःश्च संगमरवरी राजेशाही थाट उपलब्ध करून दिला होता.

इब्लिसला दाराशीच अडवण्यात आलं. नव्यानं भरती झालेल्या या गार्ड्सची दोन दिवसांच्या खाल्ल्या मिठाला जगायची मनीषा होती. हे करण्यामध्ये ते स्वतःला किती मोठ्या धोक्यात टाकत आहेत त्यांची त्यांना कल्पना नव्हती असं नाही, पण आपली उपयुक्तता आपल्या मालकासदृश्य त्यांना सिद्ध करावयाची होती.

त्यांपैकी ज्या नव्या दमाच्या गार्डचा हात इब्लिसला रोखण्यासाठी त्याच्या छातीवर लागला होता, दुसऱ्याच घडीत त्याचा तो हात काडकन मोडला होता इब्लिसनं, तेही नुसत्या आपल्या बोटांच्या व मनगटाच्या हलक्याशा हेलानं. त्या गार्डच्या जीवावर आलेलं हातावर भागलं होतं.

हात मोडलेला तो गार्ड इतक्या जोरात कळवळला, की मग इतर गार्ड्सना आपली वफादारी सिद्ध करावयची खुमखुमी झाली नाही. सर्वचजण दोन-पाच पावलं मागं सरले.

इब्लिसला त्याचा मार्ग मोकळा झाला. तो आत आत शिरत राहिला. वाटेतून दूर होणारे गार्ड्सच त्याच्या वाटेतून बाजूला होत अजाणतेपणी त्याला मार्ग दाखवत होते.

तो एका उघड्या दारापाशी येऊन उभा राहिला. समोर त्याला पाठमोरा अखिलीस मद्य घेत काचेच्या खिडकीतून बाहेर पाहताना उभा दिसत होता.

दारावर घडलेला प्रकार त्यानं बहुदा बघितला असावा. असं असून अखिलीसला धडकी नव्हती. तो अगदी शांत होता, त्याच्या स्वभावानुसार...

तो हसतमुख मागं वळला. आपल्या समोर साक्षात काळ उभा तो पाहत होता. तरी त्याचं हसू मावळलं नव्हतं. इब्लिसला पाहून उलट ते अजून रुंदावलं.

"कम, कम. मिस्टर इब्लिस!" तो सुहास्य मुद्रेनं म्हणाला. मद्याचा ग्लास त्याच्या अधरांना होताच.

किंगपीनच इब्लिसला बोलवतोय म्हंटल्यावर इब्लिसच्या वाटेत उभे दोन हट्टेकट्टे गार्ड्स मग बाजूला सरले. इब्लिस पुढं येताच अगदी जीवावर उदार होऊन ते दोघंच त्याला आडवे झाले होते.

इब्लिस भारदस्त पावलं टाकत आत आला.

"ऑर् शुड आय से, हेडीस! दि गॉड ऑफ अंडरवर्ल्ड. गॉड ऑफ दि डेड्स. हू हॅज दि कम्प्लिट कंट्रोल ऑफ दि अंडरवर्ल्ड अँड इट्स सबजेक्ट्स." अखिलीस इब्लिसला पाहून इम्प्रेस होऊन बोलत होता.

त्यानं पहिल्याप्रथम इब्लिसला याची देही याची डोळा पाहिला होता. आजवर फक्त त्याच्या चर्चा, दंतकथा ऐकल्या, तो इब्लिस साक्षात त्याच्या दालनात खडा होता.

जो गुन्हेगार माणूस म्हणून आतून, मनातून, अंतःकरणातून मेला आहे; केवळ अशांनाच मृत्यू देऊन इब्लिस त्यांचा निकाल लावतो हे माहीत असल्यानं अखिलीसनं इब्लिसला 'हेडीस' ही नवीन पदवी दिली होती. हेडीस; 'मृतांचा देव!'

इब्लिसनं त्याच्या बोलल्यावर कोणतीच टिप्पणी केली नाही. त्याला स्वतःच्या प्रशंसेत काडीमात्र सारस्य नव्हतं. तरी तो हे जाणून होता, की अखिलीस त्याची करत असलेली स्तुती ही खरंच त्याच्या अंतःकरणातून येत होती.

इब्लिस; त्याचं कार्य एकच होतं, पण प्रत्येकजण त्याला त्यांच्या त्यांच्या बुद्धी व आकलन क्षमतेनुसार वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहत होता, आंकत होता. कोणासाठी तो सैतान होता, कोणासाठी राक्षस, कोणासाठी पापी तर, कोणासाठी मृत्यूदेव, तर कोणासाठी दोषी, गुन्हेगार, तर कोणासाठी न्याय देवता...

आणि त्या त्या आकलनानुसार प्रत्येकजण त्याला वेगवेगळी नांवे देत होता...

एसपी शहरात बदली होऊन येण्यापूर्वी इब्लिस स्वतः ठरवायचा कोणाला मारायचं ते. अट्टल गुन्हेगार सोडून त्यानं कधी कोणा सामान्यजनाला इजा पोहोचवली नव्हती. त्यामुळं सामान्यांना इब्लिसला घाबरण्याचं तसं काही काम नव्हतं. तरी सर्व त्याला भिऊन असायचे त्याचं कारण, आत्मकुंठा. प्रत्येकानं काही न काही चुका, छोटे मोठे गुन्हे, काही न काही केलेलं असतंच. तोच प्रत्येकाचा आत्मक्लेश इब्लिस प्रती भीतीतून व्यक्त होत असायचा...

इब्लिस एक क्रूर व्यक्ती असून तो माथेफिरू बनून कधीही कत्तली करत सुटेल हा त्याच्या विषयीचा गैरसमज मात्र त्यानं कितीही प्रयत्न करून मिटणारा नव्हता. त्यामुळं तो तसा प्रयत्नही करत नव्हता.

इब्लिस किती संयत आहे, हे त्यानं एसपी राजन जाधवशी हात मिळवून आपल्याला हवं त्या व्यक्तीला मृत्यूचा ग्रास बनवायचं थांबवून सादर केलं होतं. परंतु ते सामान्य जनतेला कधी समजू शकणार नव्हतं. इब्लिसला याच्याशी काही देणंघेणं नव्हतंही.

त्याचं मूळ ध्येयच होतं शहरातील अपराधी समूळ नष्ट करण्याचं. तो त्यातच लुब्ध होता. आपल्या मित्राला शिक्षेपासून वाचवण्याच्या एका चुकीने आपण कोल्हापूरात अंडरवर्ल्डचं साम्राज्य सुरू होण्यासाठी खुलं केलं याची अपराध भावना इब्लिसला खात होती. आपलं कर्तव्य समजून त्यानं ते साम्राज्य उध्वस्त केलंही होतं. तरी त्याची आत्मवंचना मावळली नव्हती. आणि त्यासाठीच त्यानं हा प्रपंच, हा उपद्व्याप आरंभला होता. अखिलीस हे सगळं ऐकून होता. अखिलीसला त्यामुळंच इब्लिसबद्दल एक आदराची भावना नक्की होती. भीती; ती केवळ नव्हती.

"बसा." अखिलीस इब्लिसला सोफ्याकडं हस्तनिर्देश करत बोलला.

इब्लिस सोफ्यावर निवांत झाला. अखिलीस त्याच्याकडं चालत आला.

"अ मॅन हु हाईड हीज फेस बिहाईंड दि मास्क, लाईक व्हाईज हेडीज हॅज ए क्राऊन ऑफ डार्कनेस विच हेल्प्स हिम टू बिकम अनविसिबल." अखिलीस इब्लिसवर स्तुतीसुमने उधळतच होता.

समोरील गोल पॉलिश्ड् ओक टेबलवर अखिलीसनं आपली रेड वाईनची बाटली ठेवली व तो अखिलीस समोर मरून कलरच्या सोफ्यावर स्थिरावला.

"ज्या कोणी तुला सुरवातीला इब्लिस म्हंटलं असेल त्यानं कदाचित तुला पुरतं ओळखलेलं दिसत नाही. तू इब्लिसपेक्षा अधिक हेडीसच आहेस!" अखिलीस आपलं मत स्पष्ट करत म्हणाला.

अखिलीस मद्य घुटीका घेतच होता, की अचानक आठवल्यासारखं त्यानं ग्लास ओठांपासून दूर घेतला.

"घेणार?" त्यानं इब्लिसला विचारलं.

"मी घेत नाही." इब्लिसनं प्रथमतः मौन तोडत बोलला. मशीनी आवाजात कोणताच भाव दृश्य नव्हता.

"बेस्ट वाईन आहे!" अखिलीस आग्रह करत होता. घरी आलेल्या मृत्यू देवतेला दैवेद्य चढवून त्याचं त्याला अगदी मनापासून आगत्य करायचं होतं.

"नाही." इब्लिस ठाम दरडावला. अखिलीसचा नैवैद्य त्याने धुडकावून लावला.

जोनाथनच्या प्रकरणानंतर त्यानं स्वतःला वचनबद्ध जे केलं होतं.

"त्या मास्कमधून पिता येत नसेल!" अखिलीसनं उहासात्मक टिपणी केली.

इब्लिस काहीच बोलला नाही. त्यानं फक्त त्याच्या मास्कच्या जॉ-लाईनवरील एक काहीसं अदृश्य बटन दाबलं. मास्कचा खालील जबडा खाली व वरचा जबडा वर फाकला गेला. इब्लिसचे ओठ दिसू लागले. त्यानं तात्काळ परत कळ दाबून मास्कचे जबडे पूर्ववत केले.

"हा... सो यु कॅन ड्रिंक इन दॅट वियर्ड थिंग. मग काय, काही मिसळलं असेल अशी भीती वाटते?" अखिलीस हसला.

"माझा घात करेल एवढा कोणाच्यात हिंमत नाही, दम त्याहून नाही! मी इथं पार्टी करायला आलो नाही! मी वॉर्न करायला आलो आहे. आजपर्यंत तुझं रेकॉर्ड स्वच्छ आहे. पण सध्या काही उचापत्या समोर आल्या आहेत तुझ्या. वेळीच थांबव. अन्यथा... तुला माहीत असेलच!" इब्लिस ताकीद करत होता.

"आय अशोर यु, मिस्टर इब्लिस. काही चालू नाहीये!" त्याच्या समोर बसत अखिलीस बोलला.

'इब्लिस' मुखवट्याच्या उंचवटे-सखोलांमुळं त्या सैतानी मुखवट्याच्या सावल्यांनी भीषणता गुणावली होती.

"हेलीच्या बहिणीवर तुझ्या माणसानं अत्याचार केला. तिला संपवलं. हेलीनं त्याला मारलं ते इथं! जखमी हेली इथंच तुझ्या घरी सापडली. तुझा या साऱ्यात हात नाही?!" इब्लिसचा उत्तर ठाऊक असून सवाल.

अखिलीस नुसता हसला. म्हणाला,

"म्हणजे जे मी ऐकलंय ते खरं आहे. पोलीस आणि तुमचे लागेबांधे आहेत तर. वेअर इज आवर् सोसायटी इज हेडिंग मिस्टर इब्लिस? पुलीस अँड क्रिमिनल्स आर मेकिंग एन अलायन्स... इजंट इट डेंजरस फॉर नॉर्मल सिटीझन्स?" अखिलीस इब्लिसला चिडवत होता.

"फालतू बडबड नको. माझ्या प्रश्नांची उत्तरं दे." इब्लिस कडाडला.

अखिलीसचा अविर्भाव बदलला.

"तुझ्या हेलीच्या बहिणीच्या मृत्यूला कारणीभूत माणूस माझा नव्हता. तो मुसाचा होता. मुसा माझ्यासाठी काम करायचा. त्याच्या हाताखाली त्यानं कोणाला नेमलं आहे,त्यासाठी मी जबाबदार नाही. शिवाय दोघांनाही तुझ्या हेलीनं मारलंय. सो द मॅटर इज क्लोज्ड्!" मग्रूर अखिलीस शांततेत म्हणाला.

"आणि तिची अशी अवस्था कोणी केली?" इब्लिसचा आणखी प्रश्न.

"गोलाएथ! गोलाएथ नांव त्याचं." बोलून अखिलीसनं त्याच्या उचत्तम गडद लालसर वाईनचा घोट घशाखाली सोडला.

"तो तुझ्यासाठी काम करतो?" इब्लिसचा नवीन प्रश्न.

"नाही!" गोलाएथचं स्वाभाविक थंड उत्तर.

तो खोटं बोलत नव्हता. गोलाएथ त्याच्यासाठी काम करत नव्हता हे सत्य होतं. त्याला जोनाथनचा, आपल्या भावाच्या खूनाचा बदला घ्यायचा होता. हे करत असताना तो आपल्या मर्जीचा मालक होता. अखिलीस त्याचा वापर फक्त इब्लिसला मार्गातून दूर करण्यासाठी म्हणून करून घेत होता. हे बाकी तो इब्लिसला सांगणार नव्हता.

कसाई बकऱ्याला थोडीच सांगेल, की तो त्याची मान कापणार आहे म्हणून. हा... इथे इब्लिसला तो जसं बकरा समजत होता, तसा तो बकरा नसून खुद्द एक निष्णात शिकारी आहे व तो असा फसणार नाही ही गोष्ट वेगळी होती...

"मग तो इथं काय करत होता? त्यानं हेलीवर हल्ला करायचं कारण?" इब्लिसनं पुढचा प्रश्न फेकला.

"मुसासाठी काम करत असेल तो. त्याच्या पाठूनच तो आला होता. हेलीनं मुसाला मारल्यानं त्याचं पित्त खवळलं असेल. म्हणून मारलं असेल त्यानं तिला..."

अखिलीस उगाचचा तर्क करत निवांत बोलला. आता मात्र तो खरं वाटावा असं खोटं बोलला होता.

"हे सगळं तुझ्या डोळ्यांसमोर झालं, तरी तू शक्यतांमध्ये उत्तर देतोयस!" इब्लिस चिडून ओरडला.

"मिस्टर इब्लिस मी तुमचा रिस्पेक्ट करतो म्हणून तुम्हाला उत्तर देतोय. नाही तर तो माझा स्वभाव नाही. आपण प्लिज शांत घ्यावं." त्यानं आपण किती नम्र आहे हे दर्शवण्यासाठी तोंड देखली विनंती केली व बोलला,

"हे बघा, तुमच्या मैत्रिणीला मरण्यापासून मीच वाचवलं आहे. कोण तो... हा, त्या गोलाएथला मी इथून हकललं नसतं, तर त्यानं त्याच्या टाचेखाली तिला चिरडून मारली असती. सो बी एट लिस्ट अ लिटल थँकफुल टुवर्ड्स मी."

इब्लिसनं मनाशी थोडा विचार केला. त्याला अजून काही प्रश्न होते. खरी उत्तरं याच्याकडून मिळण्याची आशा नाहीच, तरी तो जेवढं बोलतोय ते कितपत खरं आहे याबाबत पुढं इब्लिस शहानिशा केल्याशिवाय राहणार नव्हता. रादर् त्याला खरं खोटं कधी न कधी समजणारच होतं. अखिलीस कितपत खरं बोलतोय, की पूर्णतः तो खोट्यानं बरबटलेला आहे हे समजल्यास त्याला मारायचं, की बक्षायचं हे पक्कं करणं सोपं जाईल या निर्वाळयानं इब्लिस स्वतःला काबूत ठेवून होता; फक्त प्रश्न करत होता...

"मुसा हा क्रिमिनल असून तू त्याच्याशी सबंध ठेवून होतास. का?" इब्लिसनं थंड विचारलं.

"माझा इथला बार तो सांभाळत होता. आणि चांगल्याप्रकारे सांभाळत होता. माझ्याकडं कामाला येण्याअगोदर तो काय करत होता किंवा कामाच्या

वेळेनंतर तो काय करायचा याच्याशी मला कर्तव्य नव्हतं. ते पाहणं माझं काम नव्हतं मिस्टर इब्लिस!" अखिलीस इब्लिसला उन्मत्त बोलला,

"आता तसाही तो मेलाय. मेलेल्या माणसाबद्दल वाईट बोलू नये मिस्टर हेडीस!" त्यानं बऱ्याच वेळानं मद्य घशात सोडलं.

"माझं इथं येण्याचं अजून एक कारण आहे. तेही तू जाणत असशील अशी खात्री धरतो. बोल!" इब्लिस त्याला प्रश्न न करता उत्तराच्या अपेक्षेने बोलला.

अखिलीसनं इब्लिसच्या या वक्तव्यावर नुसतं हसण्याचं काम केलं. नाकातून उच्छवास सोडत त्यानं रुंद स्मित केलं. ओठाला ग्लास असल्यानं ग्लासावर त्याच्या कांपुड्यांचा उष्मा जमा झाला, मद्य त्याच्या उच्छवासने तरंगत हिंदकळलं होतं. तो आपला उपहास करतोय असं वाटून इब्लिस आतल्या आत चिडला.

"उत्तर दिलास तरी मरणार आहेस आणि नाही दिलास तरी! बेटर वे. उत्तर देऊन मर! त्यानं तुला जगायला काही वेळ अधिक मिळेल!" इब्लिस त्याला ताकीद देत होता.

अखिलीस ओठांना ग्लास लावून ओठ रुंद करत हसला. त्यानं पिण्यासाठी मिटलेले डोळे इब्लिसवर रोखले. आपण इब्लिसला उत्तर केलं नाही, तर हा आत्ताच आपल्याला मारण्याचा प्रयत्न करेल हे त्याने ताडलं. असं असून त्याच्या डोळयांत कमालीची नम्रता आणि निर्मळ भाव होता. तरी ती नजर तीक्ष्ण व भेदक करारी अशी होती.

"ओके देन. माझ्याकडं तू काही पर्याय शिल्लक ठेवला नाहीस. ठीक आहे सांगतो. बिकाऊज आय लाईक यु. अँड आय डोन्ट वॉन्ट यु टू गेट मॅड एट मी. तसंही तू हे जाणून घेण्यास जंग जंग पछाडलं आहेस हे मला माहित आहे.

"तुझं नेटवर्क कमजोर नाहीए इब्लिस, तुला कोठून माहिती मिळणारच नव्हती. कारण संपूर्ण भारतात ती फक्त माझ्याकडं आहे. आणि त्यांच्याकडं, ज्यांच्यावर मी कामगिरी सोपवली होती. आणि त्यांना तर तूच मारलंस." अखिलीस निर्मळ हसत बोलला.

"बोल, कुख्यात क्रिमिनल्सना तू एकामागं एक इथं बोलावण्याचं कारण?" इब्लिसचा आता थेट सवाल.

"तू आहेस!" अखिलीसनंही थेट उत्तर दिलं व बोलत राहिला,

"हवी ती वस्तू अलगद मिळवण्याची हातोटी क्रिमिनल्स शिवाय कोणाकडे असते? पण तू मी बोलावलेला क्रिमिनल मारला नसतास, तर दुसरा बोलवावा लागला नसता. सेम गोज टू अदर्." अखिलीसनं डावीकडं मानेला हेल देत भिवयी उडवत ओठ दाबले. तो इब्लिसची कीव करत पुढं बोलला,

"वाटलं नव्हतं, इब्लिस सारखा व्यक्ती कुणाच्या अधिपत्याखाली काम करेल. नवीन एसपीच्या हातचं तुम्ही बाहुल झालेलं पाहुल दुःख वाटलं. तेही काही पैशांसाठी!" अखिलीस इब्लिसच्या आत्मसम्मानावर आघात करू पाहत होता.

गोलाएथ सोबत खेळलेला तोच त्याचा सायकॉलॉजिकल खेळ तो इब्लिस सोबत खेळू पाहत होता. इब्लिस मनानं व डोक्यानं तितका कमजोर नव्हता, की तो यात वाहवत जाईल. तो स्थिर होता, बाहेरून व आतूनही.

"त्यांना बोलावण्याचं कारण कळेल?" इब्लिस अखिलीसच्या क्षुल्लक खेळात न अडकता बोलला होता. तो त्याला विनंती करत नव्हता, तर ती आज्ञाच होती.

इब्लिसनं आपली 'कोल्ट कमांडर्ॢ' होलस्टरची काढून हातात घेतली.

अजूनही अखिलीस घाबरला नव्हता. उलट त्याच्या चेहऱ्यावर पुनः हसू रुंदावलं.

"आह्, द फेमस कमांडर्!" तो इब्लिसच्या कोल्ट कमांडरकडं पाहत उत्साही उद्गारला.

एका लहान मुलानं एखाद्या प्रख्यात खेळण्याला प्रथम समक्ष पाहिल्यावर जसा त्याला आनंद होतो, त्याच्या डोळयांत चमक भरते, तशी अखिलीसच्या डोळयांत चमक आपसूक आली होती.

त्याचा हात वाईनचा ग्लास आपसूक टेबलवर ठेवता झाला. अजून जवळून कोल्ट कमांडरचा क्लोज लूक मिळावा म्हणून तो पुढे झाला.

इब्लिसनं ती कमांडर् त्याच्या माथ्याला लावून त्याच्या कमांडरचं अजूनच जवळच दर्शन अखिलीसला घडवलं. अखिलीस अजूनही उत्तेजित हसतच होता. त्याची कुतूहलाची बुबुळं एकाच दिशेला येत कमांडरच्या नळीवर स्थिर झाली.

इब्लिसनं सेफ्टी लॉक ऑफ केलं व अंगठ्यानं हॅमर खेचला.

अखिलीसचे डोळे इब्लिसवर फिरले.

"तू एका निरपराध्याला नक्कीच मारणार नाहीस!" अखिलीस कमालीच्या शांततेनं म्हणाला.

"दुर्धांत गुन्हेगारांना इथं बोलावण्याचं तुझं कारण कळलं, आणि जेन्युअन असलं, तरच तू अपराधी आहेस अगर नाहीस हे स्पष्ट होईल. नाऊ टॉक!" इब्लिस रागानं बोलला.

"फाईन. जस्ट टेक दॅट असाईड!" बोटानं इब्लिसची कमांडर्ा त्यानं बाजूला सारली. ठसवत तो म्हणाला,

"आई'ल टेल यु दि एन्सर्स. बट नॉट बिकॉज ऑफ आय एम स्केअर्ड, बट बिकॉस आय रिस्पेक्ट यु!" तो हेही खोटंच बोललं होता. इब्लिस बद्दल त्याला जराही आदर नव्हता. तो पुढे सांगू लागला,

"आराऊंड फोर हंड्रेड अँड अ फिफ्टी मिलियन डॉलर्स माझे जर्मनीत अडकून आहेत. एव्हरी सिंगल पेनी इज फ्रॉम व्हाईट बिझनेस! आय जस्ट वॉन्ट टू रिकव्हर इट." अखिलीस म्हणाला.

"याचा इथे काय संबंध?" इब्लिसनं सवाल केला.

"आहे. निकटचा आहे. लेट्स स्टार्ट फ्रॉम दि बिगिनींग. माझी जर्मनीत एक आटोमोबाईल कंपनी आहे. एक्सपेन्सिव्ह कार्सची एक मोठी शिपमेंट तिकडून भारतात येणार होती. पण अनावधानानं माझ्या कंपनीकडून जर्मनीनं नव्यानं बनवलेल्या कस्टमस गाईडलाईन्स पाळल्या गेल्या नाहीत आणि ती शिपमेंट डॉकयार्ड मध्येच अडवली गेली. तो माल सोडवता यावा म्हणून मी माझा मित्र असलेल्या तिथल्या फेडरल चान्सलरला भेटलो.

"त्याच्याकडून समजलं, की जर्मन गव्हर्नमेंट दुसऱ्या महायुद्धातील काही सिक्रेट डॉक्युमेंट्स पब्लिक्ली डिस्क्लोज करणार होते. ती डॉक्युमेंट्स ओपन केल्यावर त्यांच्या लक्षात आलं, की हिटलरनं जे काही सायंटिस्ट्स तऱ्हेतऱ्हेचे

एक्सपरिमेंट्स करण्यासाठी पदरी ठेवले होते, त्यांतला एक अत्यंत घातक एक्सपेरिमेंट, ज्याबाबद्दल आजपर्यंत कोणाला माहीत नव्हतं, तो गायब आहे.

"इट वॉज एन एथनिक बायोवेपन. ते होतं याचीच जर्मनीला काही कल्पना नव्हती. ते कुठं आहे हे माहीत असणं दूरच. त्या डॉक्युमेंट्स वरून एवढंच त्यांना समजलं होतं, की ते वेपन ठराविक जीन्सना टार्गेट करून एक संपूर्ण लिनीएज नष्ट करण्याची ताकद ठेवून आहे. तुम्हाला माहीत असेल हिटलर कुणाला संपवण्याच्या मागे होता." अखिलीस हसला व पुढं सांगू लागला,

"या बायोवेपन बद्दल कोणाला समजलं आणि ते कोणाच्या हाती लागलं, तर त्याचा चुकीचा उपयोग होऊ शकतो म्हणून जर्नमीला ते हस्तगत करायचं आहे."

इब्लिसनं अखिलीसला मध्येच टोकलं,

"आणि ते जर जर्मनीच्या हाती लागलं, तर त्याचा गैरवापर जर्मनी करणार नाही कशावरून?" इब्लिसचा जरब आवाजातील स्वाभाविक प्रश्न होता.

"ज्या प्रकारचं ते बायोवेपन आहे, जर्मनीला देखील त्याचा धोका आहेच. त्यामुळं ते त्याचा कधी युज करतील अशी मला तरी आशा नाही." अखिलीसनं इब्लिसची शंका खोडून काढण्यास स्वतःचा विचार स्पष्ट केला.

"ओके. पण तू कुख्यात गुन्हेगार इथे का बोलावत आहेस याचं अजून मला उत्तर मिळत नाहीए!" इब्लिस मुद्दा सोडायला तयार नव्हता.

"त्यावरच येत होतो. हिटलरच्या गोटातून ते बायोवेपन कोणी चोरलं याची नोंद होती, पण ती व्यक्ती कुठं गेली याची हिटलरसह कोणालाच कल्पना नव्हती. अर्थात आत्ता जर्मन्सना ते माहीत आहे, की हे बायोवेपेन घेऊन ती व्यक्ती भारतात

आली होती. पण इंटरनॅशनल कॉम्प्लिकेशन्स आडवे येत आहेत त्यामुळे त्यांना काही करता येत नाहीये. कारण नाही तर त्या बायोवेपेन बद्दल संबंधित देशाला म्हणजे भारतालाच काय पण जगभर कळेल.

"माझ्या अडकलेल्या मालासंबंधी मी जर्मनीच्या फेडरल चान्सलरला भेटलो, तेव्हा या सगळया आतील गोष्टी तो मित्र असल्यानं मला त्याच्याकडून समजल्या. जर्मनीत फेडरल चान्सलरच्या आदेशानुसार केबिनेट फॉर्म होतं. चान्सलरच ठरवतो, गव्हर्नमेंटमध्ये कोण असेल. असं असल्यानंच कस्टम्स त्याचं ऐकेल या विचारानं ही माझी त्याच्याशी भेट होती.

"माझी कल्पना फेल गेली. त्यानं सरळ हात वर केले. जर्मन गव्हर्नमेंट हिटलरच्या बायोवेपनला घेऊन खूप तणावात असल्यानं आशा छोट्या गोष्टीत लक्ष द्यायला गव्हर्नमेंटला वेळ नाही म्हणून त्यानं मला सांगितलं. त्यांच्यासाठी ती लहान गोष्ट असेल, पण चारशे पन्नास मिलियन डॉलर्स ही माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट होती. मला कल्पना सुचली, की जर मी त्यांना मदत करू शकलो, तर माझं अडकलेलं आटोमोबील शिपमेंट मला सोडवता येईल.

"मी त्याच्याकडून हे प्रकरण जाणून घेतले. त्यानं बायोवेपन चोरणाऱ्या ज्या सायंटिस्ट्सचं नांव माझ्याकडं मेंशन केलं. ते होते, कोल्हापूरचे नंदमोहन सारस्वत."

अखिलीसने उघड केलेलं नांव ऐकून इब्लिस नाही म्हणायला विचलित झाला. त्याच्या मास्कमुळं अखिलीसला त्याची कल्पना येणं तसं शक्य नव्हतं. तो अविरत पुढे बोलत होता,

"माझ्या लक्षात आलं, भारतातले एक मोठे स्वातंत्र्यसेनानी होते ते. स्वातंत्र्यानंतरही संपूर्ण आयुष्य त्यांनी समाजसेवेसाठी वाहून घेतलं होतं. संपूर्ण

देशभर प्रसिद्ध आहेत अजूनही ते. तुम्हालाही माहीत असेल. काही काळ त्यांनी जर्मनीत काढला होता हेही सर्वश्रुत होतं. इतकी माहिती असल्यानं त्यांना शोधणं अवघड नव्हतंच. मी फेडरल चान्सलरकडून वचन घेतलं, की जर मी ते बायोवेपन परत मिळवण्यास जर्मन्सना मदत केली, तर ते माझी शिपमेंट सोडून देतील. चान्सलर त्या अटीवर तयार झाला. त्यानं वचन दिलं, मी त्यांना ही मदत करू शकलो, तर माझी शिपमेंट मिळवून देण्यास तोही मला मदत करेल. नंदमोहन सारस्वत यांची अजून माहिती काढली तर समजलं, आज त्यांचा मुलगा एक सूर्योदय म्हणून अनाथआश्रम चालवतोय. जतीन! नंदमोहन सारस्वत यांचे मुलगा व अनाथाश्रमाचे मालक..."

◆◆◆

डोनेशन देण्याचा बहाणा करून साक्षात स्वयं अखिलीस जतीन यांना सर्वप्रथम येऊन भेटला होता.

"सारस्वत साहेब, इतकं मोठं अनाथाश्रम चालवायचं म्हंटलं, की पैसा हा लागतोच." अखिलीस जतीन यांच्या कार्यकक्षात त्याच्या देखत बसून बोलत होता.

"हो ते आहेच. आपण देणगीरुपी मदत करणार आहात यासाठी मी आपला आभारी आहे." जतीन कृतज्ञ बोलले.

त्यांचं आभारप्रदर्शन बघून अखिलीसचे भाव अचानक लोभी झाले.

"पण या जगात फुकट काहीच मिळत नाही." तो जतीन यांना दडपणात आणण्यासाठी  बेरकी हसत म्हणाला.

जतीन यांनी काळंबेरं ताडलं. ते सावध झाले.

"काही अपेक्षा आहे का आपली?" त्यांनी जागृतीनं विचारलं.

"आपले वडिलांनी हिटलराची एक वस्तू चोरून आणली होती. तीच हवी आहे." अखिलीस थेट मुद्द्याचं बोलला,

"आपल्याला कायमस्वरूपी पैशांची व्यवस्था केली जाईल. हे अनाथाश्रम सांभाळायला कसलीच ददात पडणार नाही तुम्हाला. कधीच!" अखिलीसनं प्रस्ताव मांडला.

जतीन निर्मळ हसले. असत्य बोलण्याची त्यांना सवय नव्हती. त्यांनी कोणत्याच गोष्टीला नाकारलं नाही, शिवाय अखिलीसच्या प्रस्तावाच्या,

"सध्या मला आणि माझ्या या सूर्योदयला आपल्या पैशांची आवश्यकता नाही. आपण आलात तरी चालेल!" जतीन निर्मळ हसले.

त्यांचं ते हसू निर्भेळ असूनही त्यांनी दिलेल्या नकारने अखिलीसला चिडवणारं वाटून गेलं, तो आतल्या आत प्रचंड चिडला होता.

अखिलीस जतीन यांनी त्याचा प्रस्ताव धुडकवल्यानं चिडला होता, पण त्याला कोणतीच जोरजबरदस्ती करायची नव्हती. अशी कोणतीच कृती करायची नव्हती, ज्याने भविष्यात ती वस्तू हाती लागण्याची शक्यता खोडली जाईल, अगर तपासयंत्रणेचं त्याच्याकडं लक्ष वेधलं जाईल. आणि तो जे शोधत आहे, हिटलरचे बायोवेपन, त्यासंदर्भात भारत सरकारला कसलीच कुणकुण लागू नये असाही

त्याचा प्रामुख्याने कयास होता. त्यामुळं मग प्रकरण समजूनतीनं घ्यायचं ठरवून व आता आपल्यामार्गाने प्रकरण हाताळायंच निर्धारून तो बाहेर पडला.

◆◆◆

अखिलीस बोलत होता,

"त्यांच्याशी सामंज्यस्यानं बोलणी केली, पण ते बधले नाहीत. म्हणून मग त्यांच्याकडून बायोवेपन मिळवण्यासाठीच मी गुन्हेगारांना इथं बोलावलं. अनाथाश्रमाच्या मालकाला मारण्याचा आमचा कोणताही हेतू नव्हता. फक्त ते बायोवेपन कुठं आहे ती माहिती मिळवून ते हाती घ्यायचं होतं इतकंच. पण पिक्चरमध्ये तुमची एन्ट्री झाली, आणि मृत्यूसत्र घडत गेलं." अखिलीसनं घटनाक्रम सांगितला.

शेवटी त्यानं सगळ्याचा ठिपका इब्लिसवर ठळक केला. सगळ्याचा दोष त्यानं इब्लिसच्या माथी मढला होता.

"जर्मन गव्हर्नमेंटनी यासंदर्भात त्यांच्या सिक्रेट सर्व्हिसची मदत घेतली नाही?" इल्बिसला शंका उत्पन्न झाली होती. त्याचा हा स्वाभाविक प्रश्न केला.

"सिक्रेट सर्व्हिस इन्वॉल्व्ह आहे. नाही असं नाही, पण ते या प्रकरणाकडे फक्त लक्ष ठेवून आहेत. त्यांना उघड यात हस्तक्षेप करायचा नव्हता. कारण त्या बायोवेपनबद्दल कोणत्याही राष्ट्राला समजू नये अशी त्यांची इच्छा होती. म्हणून तर चान्सलरनं माझं प्रपोसल मान्य केलं. अट्टल गुन्हेगारच जतीन यांच्याकडून ते बायोवेपन मिळवू शकतील असा जर्मन्सचा विचार झाला. काही अप्रिय घटना

घडल्याच, तर त्याचं खापर त्या गुन्हेगारांवर फुटेल, जर्मन गव्हर्नमेंट त्यात कुठं अडकणार नाही. भारताशी त्यांचे संबंधही खराब होणार नाहीत असा हा प्लॅन मग तयार झाला." अखिलीसनं इति केली.

"तुला खरंच खात्री आहे, की जर्मन गव्हर्नमेंट त्या बायोवेपनचा गैरवापर करणार नाही? ते अखिल मानवजातीला धोका होणार नाहीत आणि त्यात संपूर्ण समाजाचं काही नुकसान होणार नाही?" इब्लिसनं त्याची काळजी बोलावून दाखवली.

"इंडीड!" अखिलीस खात्री देत बोलला.

"ओके देन. जर्मन गव्हर्नमेंट मला तसं लिहून देणार असेल, तर मी ते बायोवेपन मिळवून तुझ्यामार्फत त्यांच्या हवाली केलं असं समज." इब्लिसनं त्याचं प्रपोसल अखिलीस समोर ठेवलं.

अखिलीस इब्लिसची कुचेष्टा करत हसला.

"सॉरी टू से, यु मे बी बिग बट नॉट बिगर् दॅन एन एंटायर नेशन्स गव्हर्नमेंट! दि जर्मन्स!" तो इब्लिसला म्हणाला,

"आय डोन्ट थिंक दे'ल एक्सेप्ट युअर प्रपोसल. माझी डील सुध्दा फेडरल चान्सलरशी झालीये. ते पण तो माझा मित्र आहे म्हणून. थेट जर्मन गव्हर्नमेंटशी नाही."

"देन फर्गेट इट! अँड आय वॉर्न यु त्या अनाथाश्रमापासून आणि जतीन सारस्वत यांच्यापासून दूर रहा. तिथली एक वीट निखळली, तर तुझं आख्खं साम्राज्य जमीनदोस्त करेन मी!" इब्लिस धमकावून उठला.

"एवढी बांधीलकी? काही पर्सनल रिलेशन आहे का जतीनशी?" बेरकी हसत अखिलीस विचारता झाला. त्याची धूर्त नजर इब्लिसनुसार वळली.

"माझी बांधिलकी संपूर्ण समाजाशी आहे! आणि माझ्या समाजाच्या व्याख्येत अख्खं विश्व येतं! आणखी एक; हेलीला इजा पोहोचवण्यात तुझा हात आहे एवढं जरी समजलं, तरी तुझी तिरडी बांधायला घेईन मी!" इब्लिस थोडं विचारी थांबला,

"तू कॅथलिक आहेस नाही का? मग तुझी कॉफीन तयार असेल! मला फक्त तिचं स्टेटमेंट हवं आहे. ती शुद्धीत आली आणि तिनं तुझं नांव घेतलं, तर तू संपलास असं समज! पुन्हा सांगतोय, तुझे धंदे थांबव!" इब्लिसनं आपली पिस्टल डि-कॉक केली व सेफ्टी ऑन करून मागं होलस्टरला खोवत तो निघून गेला.

अखिलीसच्या चेहऱ्यावर मात्र निव्वळ हसू होतं. ज्या इब्लिसच्या दंतकथा ऐकून होता, त्या अलबत किती खऱ्या असतील हे त्याचं मन टटोलत होतं...

# **१३. पारध...**

इब्लिस त्याची कार पिटाळत होता. हे प्रकरण शांत होईपर्यंत आता ना त्याच्या गाडीला शांतता नशीबी येणार होती, ना त्याच्या जीवाला...

आता तर त्याची उद्विग्नता अधिकच वाढली होती. हे जे चाललं आहे ते का? व कशासाठी? याची उकल त्याला झाली होती.

अखिलीस खरं बोलतोय किंवा नाही हा मुद्दा इब्लिससाठी गौण होता. त्याच्या वाणीतून बाहेर पडलेला एक न एक शब्द खरा अगर खोटा हे इब्लिसला आज ना उद्या कळणारच होतं. त्याचं अखिलीसच्या घरी जाणं ही त्याची एक चाल होती.

अखिलीसला त्याच्या 'अखेरच्या गंतव्यावर' पोहोचवण्यासाठी त्याला पुराव्यांची आवश्यकता होती.

अखिलीस इब्लिसच्या दडपणाखाली येऊन काही चूक करून बसेल व आपसूक इब्लिसला त्याला उडवण्याची संधी मिळेल यास्तव ही इब्लिसची पूर्वतयारी होती. आता सवाल इतकाच होता, की अखिलीस हडबडीत येऊन काही चूक करून बसेल...? अखिलीसला पाहता ही शक्यता कमीच होती.

इब्लिस म्हणून काय शांत बसणार होता? नाही! त्रिवार नाही... गाडी पळवतच त्याची पुढची कृती चालू होती...

त्यानं आपला मोबाईल घेतला. कोणाला तरी फोन लावण्याच्या तयारीत असतानाच त्याचा मोबाईल वाजला. आलेला कॉल अनाथालय मधून होता, आत्ताच्या घडीला टाळण्यासारखा नव्हता. आपला इब्लिसचा आवाज पलिकडं

ऐकला जाऊ नये म्हणून इब्लिसनं कळ दाबून मास्कचा फक्त खालील जबडा खाली सरकवला.

"बोल!" 'रवी' मोबाईलमध्ये बोलला.

"दादा, नवीन भरती झालेल्या माणसाची माहिती तपासली, खरी निघाली. माणूस जेन्युअन आहे." संतूनं माहिती पुरवली.

"रिलीफ! तरी तू रिलॅक्स राहू नको. आश्रमात कोण येतं, कोण जातं सगळ्यांची माहिती ठेव. जितकं सरांच्या जवळ राहता येईल तितकं रहा." रवी उद्विग्न सूचना करत होता. सत्य त्याला समजल्याने तो आता खऱ्या अर्थाने अधिक चिंतीत झाला होता.

"हो दादा, काळजी करू नका. मी आहे. बाबांपासून अजिबात दूर सरणार नाही! मग ते माझ्यावर चिडले तरी चालतील. त्यांच्या खोलीत प्रवेश दिला नाही, तर बाहेर बसून राहीन! पण त्यांच्या रक्षणात खंड पडू देणार नाही!" संतू पलिकडून कळकळत बोलला.

"डोन्ट मेक इट ऑब्वियस! सरांना शंका येईलच, पण तरी तुझ्याकडून जाणवू देऊ नको, की तू त्यांच्या काळजीस्तव त्यांच्या मागेमागे करतोयस!" रवीनं जास्तीची सूचना केली.

"होय दादा." संतूनं आश्वासन दिलं.

"ठीक आहे ठेवतो. स्वतःची पण काळजी घे." रवीने फोन कट केला.

आपला मास्क पूर्ववत करून त्यानं एक नंबर डायल केला. त्याचा, ज्याला फोन लावण्यास त्यानं मोबाईल बाहेर काढला होता.

तिकडून फोन उचलला गेला. अपेक्षित आवाज त्याला ऐकू आला नाही. पलिकडून जी माहिती त्याला पुरवली गेली, ती त्याच्यासाठी धक्कादायक सिद्ध झाली. फोन कट करण्याची तसदीही न घेता त्यानं मोबाईल बाजूच्या सीटवर फेकला. स्टेअरिंगला झटक्यात वळवून तो दुसऱ्या लेनला लागला. एखादा नाग सळसळावा तशी त्याची काळी कन्व्हर्टीबल वळली होती.

◆◆◆

इबिल्स पाहत होता... पाहत होता सुप्रीटेंडेंट ऑफ पोलीसचं निष्प्राण कलेवर. राजन जाधव याचं निश्चल शरीर. सी.पी.आर.च्या त्या कृत्रिम थंडगार शवगृहामध्ये तो उभा होता, तितक्याच थंड डोळ्यांनी एकटक एसपी राजनचा गार देह पाहत. देह कसला, मांसाचा लगदा होता तो. शरीर जतन करून ठेवणाऱ्यांनी मानवी शरीराचा जमेल तसा त्याला आकारात दिला होता. इतका निर्घृण खून आणि तेही खुद्द जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकाचा! ही गोष्टच पचनी पडणारी नव्हती!

"मला इत्मंभूत माहिती पाहिजे!" इब्लिसचा कठोर झालेला मशीनी आवाज बोलला.

त्याच्या मागं राजनच्या सन्मानार्थ दुःख व्यक्त करण्यासाठी पोलीस टोपी काखेत मारून शार्दूल जड अंतःकरणानं व दुःखी मनानं उभा होता. त्याची पाणावलेली नजर पण एसपीच्या त्या प्राणहीन देहाला पाहत होती. इब्लिसच्या

आवाजानं तो सचेत झाला. त्याच्या डोळ्यांतील पाणी पळात सुखले. ठाम निर्णय घेतलेल्या त्याची मन झटकन इब्लिसकडं वळली.

"तुला मी हवी ती मदत करायला तयार आहे! पण जर तू कायद्यानं वागणार असशील तर!" शार्दूल त्याला म्हणाला.

"मला कायद्याचा मान राखायचा नसता, तर इथली असामाजिक व्यवस्था नष्ट केल्यानंतर मी शांत झालो नसतो. मला स्वमनानं कायदा मोडायचा असता, तर मी एसपीचं प्रपोसल मान्यच केलं नसतं!" इब्लिस एसपीवर डोळे गाडून म्हणाला.

"म्हणजे तू इथून पुढेही खून खराबा करणार आहेस?" शार्दूलनं विचारलं.

"ते अंदाधुंद करायचं असतं, तर अखिलीस आणि त्याचे साथीदार अजून जिवंत नसते!" भारदस्त आवाजात इब्लिसनं आपली भूमिका ठळक केली.

"तुलाही त्याच्यावरच संशय आहे तर!" शार्दूलनं त्याला विचारलं.

"हो. पण अखिलीसचा निर्णय करण्यासाठी पुरावा हवा!" इब्लिसनं स्पष्ट केलं.

"निर्णय? पुरावा हशील झाल्यावर तू त्याला मारून टाकणार?" शार्दूल शंकीत झाला.

"हे समोरचं पाहता काय करायला हवं असं तुझं म्हणणं आहे?" इब्लिस चिडून कठोर बोलला.

"कोर्ट शिक्षा देईल त्याला." शार्दूल त्याच्या कायद्याशी असलेल्या निष्ठेशी ठाम प्रामाणिक होता.

"माझी काही गरज नाही तर? मग मला काय म्हणून मदत करणार होतास तू?" इब्लिसनं स्वाभाविक कुचेष्ट प्रश्न केला.

"अखिलीसची ताकद पाहता तू एकटाच त्याला आणि त्यानं इथं आणलेल्या क्रिमिनल्सना तोंड देऊ शकतोस असं राजन सरांचं मत होतं..." शार्दूल बोलून गेला.

"सडलेल्या व्यवस्थेनं तुला देखील नासवलं तर!" इब्लिसनं शार्दूलवर जहरी टिप्पणी केली.

"तुला हवं तर तसं समजू शकतोस, कोण माझ्याविषयी काय विचार करतो याच्याशी मला कर्तव्य नाही. मला फक्त आणखी कोणा ऑफिसरचा जीव जाऊ द्यायचा नाही म्हणून तुझी मदत हवी आहे." शार्दूलनं त्याची बाजू स्पष्ट केली आणि त्यानं एसपी राजनच्या मृत्यूची अथ पासून इति सांगण्यास सुरूवात केली...

◆◆◆

सुप्रीटेंडेंट राजन जाधव शहरात घडणाऱ्या मृत्यूकांडानं काळजीत पडला होता. चायनीज सेंटरच्या मालकाचा निर्घृण खून झाल्यापासून शहरात विविध ठिकाणी आणखी दोन खून तसेच दानवी पद्धतीनं घडले होते. इब्लिसवर शंका घ्यायला जागा नव्हती. त्यानं आधीच आपलं निर्दोषत्व फक्त तोंडीच नाही, तर कृतीतून सुद्धा सिद्ध केलं होतं. आणि त्यानंतरच हे तीनही खून पडले होते. इब्लिसचं नांव आपसूक बाद होत होतं. असे खून करण्याचं त्याच्याकडं काही कारणही नव्हतंच. त्यानं आपमनानं खून पाडले असते, असं धरलं तरी ते गुन्हेगारांचे. मेलेले हे सामान्यजन होते. इब्लिसनं त्यांना इहलोकीचा जन्म संपवून परलोकी धाडणं शक्य नव्हतं हे एसपीला लक्षात आलं होतं. मग कोण? कोण??

मधेच हे घडत असताना तिकडं जगभरातील कुख्यात मारेकरी एकामागोमाग शहरात येणं. एकाचा बंदोबस्त इब्लिस करवी करतो न करतो तोच दुसरा दत्त म्हणून हजर... त्यात अखिलीसचा सहभाग दिसून आलेला. ज्याचे सबंध थेट देशातील बड्या राजकारण्यांशी आहेत. त्याला असाच उचलता येत नाही, चौकशी करता येत नाही, त्यामुळं जे घडतंय त्याचा छडा लावणं कठीण झालेलं. विचारांनी त्याचं डोकं भणभणत होतं. आपल्या डेस्कवर डोकं टेकवून तो विसावला होता. पंचनामा, पुरावे यांच्या फाईल्सनी त्याचं डेस्क भरलं होतं. त्यातच डोकं टेकवायला त्यानं जागा केली होती. विचारानं शिणलेला, थकव्याचा अंमल आलेला एसपी कसोशी करूनही आपली झोप टाळू शकला नव्हता. झोप लागली होती, अगदी गाढ.

शार्दूलनं येऊन त्याची झोपमोड केली. माहितीही तशीच होती अन्यथा त्यानं असा प्रमाद केला नसता. एसपी किती वेळ विना झोप अविरत काम करतोय हे त्यानं पाहिलं होतं.

हाका मारून तो उठत नाही यास्तव त्यानं एसपी राजनला हलवून उठवलं. एसपी मागं रेलला. डोळे चोळीत त्यानं शार्दूलला असं उठवण्याचं कारण विचारलं. शार्दूलनं जे सांगितलं, त्यानं एसपी राजनची झोप एकहाती उडाली.

हे पाशवी खून करणारा त्यांच्या गळाला लागला होता!

"सर, चायनीज गाडेवाल्याच्या एरियातल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये जी गाडी दिसली होती, आपण वर्तवलेल्या अंदाजाप्रमाणं पुढच्या दोन खूनांच्या ठिकाणी पण तीच गाडी पाहण्यात आली आहे." शार्दूलनं माहिती पुरवली.

"गुड. मला खात्री होती. तरी सबळ पुरावा असावा म्हणून ती गाडी इतर खूनांच्या जागी सुद्धा उपस्थित होती का हे पाहणं गरजेचं होतं. बरं, गाडी स्ट्रेस झाली." एसपीनं विचारलं.

"होय. रिकार्डो मकवाना नांवाच्या व्यक्तीची आहे ती." शार्दूल उत्तरला.

"रिकार्डो...?" एसपी विचारात हादऱ्यानं उद्गारला.

"होय सर, आणखी एक गोष्ट, या रिकार्डोचं रेकॉर्ड चेक करताना त्याचा फोटो बघितला, तर हे लक्षात आलं, की हा माणूस आपल्या हेडकॉर्टर्सला येवून गेला आहे. आपल्यासाठीच तो विचारणा करत होता..." शार्दूलनं अधिकची माहिती पुरवली.

"स्ट्रेंज! तो मला का शोधत असेल?" एसपी राजन विचारात पडला.

"चेन हरवल्याचा बहाणा करून तुम्ही आहात का बघायला आला होता असं घोसाळकर म्हणत होते." शार्दूल बोलला.

"घोसाळकर?" एसपी राजनचा उद्गार.

"हो. त्यांनाच तो भेटला होता. हेडकॉर्टर्स बाहेर." शार्दूलनं माहिती दिली.

"रिकार्डो..." राजन घोकला.

"काही आठवतंय का सर? यांच्याबद्दल काही माहिती आहे का तुम्हाला?" शार्दूलनं एसपी राजनला दुसऱ्यांदा रिकार्डोचं नांव घेतल्यानं शंकीत विचारलं.

"आपल्या रेकर्डला तो नाही, पण ऐकलंय त्याच्याबद्दल. एक माहिती मी इब्लिसपासून लपवली आहे. ती ही, की जोनाथनला ज्याने इथं आणलं तोच हा रिकार्डो. आणि आता हे जे खून होतायत त्यात देखील त्याचं नांव..." एसपी राजन अर्धवट बोलला. बाकीचं वाक्य त्यानं मनात पूर्ण केलं.

"म्हणजे सर तुमचा जीव धोक्यात आहे... त्याशिवाय का तो तुम्हाला शोधत आला..." शार्दूलनं चिंता व्यक्त केली.

"खून करणारा तो नाही." एसपीनं आपला ठाम तर्क बोलून दाखवला.

"कशावरून सर?" शार्दूलचा स्वाभाविक प्रश्न.

"त्याखेरीज त्यानं पहिल्यांदाच जोनाथनला बोलावून घेतलं नसतं. जे काही काम होतं, ते त्यानं स्वतः मार्गी लावलं असतं." एसपी राजननं स्पष्ट केलं,

"तो कदाचित इंटरमिडीएट म्हणून काम पहात असणार." राजनचा पक्का तर्क.

"राईट सर." शार्दूलला एसपी राजनचं म्हणणं पटलं होतं.

"त्याच्या गाडीला जिल्हाभर ट्रॅक करा. त्याचं लोकेशन मिळालं पाहिजे. तो सापडला, की खूनीही सापडेल." एसपीचा हुकूम.

"काम झालंय सर. त्याचं लास्ट लोकेशन मिळालं आहे. त्यानंतर त्याची गाडी हलली नाही." शार्दूलनं आगाऊ केलेल्या कामाची माहिती जोडली.

"त्याचं मोबाईल लोकेशन?" एसपी राजनला कोणताच धागा सोडायचा नव्हता, कारण आपण पकडले जाऊ नये म्हणून गाडी लास्ट लोकेशनला सोडून रिकार्डो व त्याच्या सोबतचा खूनी कुठेही जाऊ शकत होते.

"मोबाईल लोकेशनही तिथलंच आहे." शार्दूलनं जास्तीची माहिती पुरवली.

"म्हणजे चान्स घ्यायला हरकत नाही. तिथं जाऊन बघू. एक तुकडी सोबत घेऊन लागलीच निघतो." एसपी राजन तडख उठला. आपली हॅट काखेत दाबत त्यानं काठी उचलली.

"मी पण येतो सर." शार्दूल अधीरतेनं बोलला.

"नाही. इथं थांब. इथं पण कोणी जबाबदार असलं पाहिजे." एसपीने स्वच्छ नकार दिला.

"पण सर... इतर ऑफिसर्स आहेत ना. ते सांभाळतील. प्लिज मी येतो सोबत." शार्दूल काकुळला.

तात्विक दृष्ट्या भिन्न मतं असून हा शार्दूल आपल्यावर किती प्रेम करतो हे पाहून एसपी राजन निर्मळ हसला.

"मी तुझी काळजी समजतो. आपल्या होनहार ऑफिसर्सची टीम सोबत असताना मला काय होणाराय?" तो शार्दूलला आश्वासन देत म्हणाला.

"सर..." शार्दूल त्याला मनवण्याच्या प्रयत्नात होता,

"आपले बरेच काबिल ऑफिसर्स आहेतच इथं. मी येतो ना सोबत..."

परंतु एसपी राजन काही ऐकून घेणार नव्हता. हा जो कोणी खूनी आहे, त्यानं राजनला ललकारलं होतं. या आलेल्या आवाहनाला तो दस्तुर खुद्द तोंड देणार होता. दुसऱ्या कुणाला दावणीला लावणं त्याच्या खुद्दारीत बसत नव्हतं. यासाठीच तर तो इब्लिसला दिकून हा उतारा चढवणार नव्हता.

"ते आहेतच रे, पण इब्लिस बाबत त्यांना काही माहीत नाही. काही प्रॉब्लेम होऊ नये म्हणून तू इथं असलेला बरा." एसपी त्याला समजावत होता.

एसपीच्या थातूर मातूर कारणांनी शार्दूल अजूनही कन्व्हीन्स होत नव्हता. अजून वादात वेळ दवडू नये म्हणून शार्दूलला काही बोलण्याची संधी न देता एसपी राजननं शार्दूलला तिथंच सोडून आपली केबिन त्यागली. शार्दूलची कमलकांती चिंतेच्या छायेखाली झाकोळून सुकू लागली. तो हतबुद्ध जडवत उभा होता.

●●●

त्या खून्याला स्वहस्ते ठार करण्याच्या हेतूनं एसपी जात होता. नाही म्हणायला, म्हणजे सगळं प्रोसिजर प्रमाणं झालं असं दाखवायला तो तुकडी घेऊन जात होता खरा, पण त्या तुकडीतले कुणी एसपी राजनचा शब्द मोडणारे, त्याला नियम, कायदे, कानून, तत्त्व वगैरे सांगून टोकणारे, आडमूठे नव्हते. असेच लोक निवडून त्यानं सोबत घेतले होते. शार्दूल नेमका उलटा होता. सिद्धांताचा पुतळा. त्याला त्यामुळंच एसपी मागं टाकून गेला होता.

●●●

आपल्या वरिष्ठांचा जीव धोक्यात आहे हे माहीत असून तो काही करू शकत नव्हता. काही नाही, तर किमान त्यांची साथ द्यावी; तर तेही त्याला करणं शक्य नव्हतं. त्याचं कारण त्याच वरिष्ठांचा इथं थांबण्याचा त्याला आदेश!

एसपी निघून गेला तरी तो  कित्येक वेळ चरफडत त्या केबिनमध्ये उभा होता!

◆◆◆

काही गाड्या रात्रौच्या त्या अंधारात येऊन थांबल्या होत्या. तिथं कुठलाच प्रकाश स्रोत नाही. त्या गाड्यांच्याच हेडलाईट्सचेच काय ते प्रकाशबिंब. प्रोटेक्शन सुट्स घातलेले ते पोलीस अधिकारी त्या प्रकाशात शस्त्रसज्ज उभे होते. त्यांचा

म्होरक्या एसपी राजन त्यांना लीड करायला पुढे. आपापल्या ग्लॉक्सना अटॅच्ड् टॅक्टिकल बॅटरीज ऑन ठेवून ते समोरच्या पडीक, निर्जीव इमारतीत घुसण्यास सज्ज होते.

टीम रेडी असल्याचा राजनचा आपल्या टीमला इशाऱ्याने प्रश्न. त्यांच्याकडून पुष्टी येताच राजन ठाम झाला. हरकतीत आला. राजनचा एकच पाय पुढं आणि कुठून तरी एक गोळी येऊन त्याच्या मागून कूच करणाऱ्या एका ऑफिसरच्या गंडस्थळात घुसली. त्या मिणमिणत्या व हलणाऱ्या प्रकाशात रक्ताचे काही लाल थेंब चमकून हवेतच विरले गेले. इतर ऑफिसर्स क्षणात आपल्या शरीरावरचा ताबा सुटून तो जमीनदोस्त होत असताना बाकीचे फक्त आश्चर्य व भीती मुखावर घेऊन हतबल त्याला पडताना पाहत होते.

आणि मग काही वेळच्या शांततेनंतर... त्या ऑफिसर्सना सावरण्याचीही उसंत न देता पावसाच्या अगणित बिंदूंप्रमाणं त्याचवेगानं असंख्य गोळया त्यांच्या दिशेनं समोरील इमारतीतून बरसायला लागल्या. अगदी सगळेजण निर्जीव शुष्क पानगळीस्तव आदळू आगले. हेडलाईट्सच्या व बंदुकीच्या टॅक्टिकल फ्लॅशलाईटच्या प्रकाशात ते धातूगोळे खरंच पाण्याच्या थेंबांप्रमाणं भासत होते. जिथून गोळया सुटत होत्या तिथून वीजा तळपल्यासारखी बंदुकीतून आग ओकली जात होती. धातूच्या तुकड्याचा तो पाऊसच जणू. आणि त्या पावसात हे शिपाई आपल्या धारोष्ण रक्तानं भिजत चाललं होते...

त्या मृत्यूच्या तांडवात एकच योद्धा उभा होता. लढत होता. ज्या ज्या दिशांना गोळया येतील त्या त्या दिशांनी तो अंदाधुंद उलट्या गोळया बरसवत होता. एक मॅगझीन संपली, की लगेच दुसरी ग्लॉकमध्ये सारून ती लोड करून पुन्हा

दिशा बदलून गोळ्या झाडत होता. विस्मयाची ही गोष्ट होती, ती त्या गोळ्यांच्या पावसातून एकही गोळी त्याच्या दिशेनं येत नव्हती. तो मात्र वेड्यासारखा आपल्या ऑफिसरर्सना वाचवण्याच्या प्रयत्नात विरुद्ध दिशांना बुलेट्स झाडत होता. तो यात कितपत यशस्वी होत होता हे सांगणे अतीव मुश्किल.

अखेर त्याच्या गोळ्यांनी अंत पाहिला. मॅग्झिन्सही संपल्या होत्या. तो मागं आपल्या मेलेल्या सहकाऱ्यांच्या गन्सकडे वळला. तो जाईल तिथल्या गोळ्यांचा वर्षाव बंद व्हायचा. सहकार्याची बंदूक उचलून तो पुन्हा गोळ्या येणाऱ्या दिशांनी गोळ्या झोडत राहायचा. ही धावपळ करत शेवटी तो थकून गेला. हतबल, त्रासलेला आणि त्याहून आपल्या एकेक सहकाऱ्याला मरताना पाहत तो अखेर हतप्रभ उभा राहिला.

थोडे बहुत जे उरले होते, त्यांचे प्राणही वर्णी लागल्यावर मगच गोळ्यांची धातूवर्षा बंद झाली. ही गोष्ट देखील एसपी राजनच्या ध्यानात आली नाही. असंख्य बंदुकींतून सुटलेल्या गोळ्यांचा आवाज, पोलीस शिपायांच्या सजीव-निर्जीव देहांत घुसणाऱ्या, जमिनीवर रुतणाऱ्या गोळ्यांचे आवाजही एकसंगे बंद झाले होते.

मनानं कठोर असणारा एसपी आणि खुद्द इब्लिसला देखील न जुमाणणारा एसपी डोळ्यांतून आसवं गाळत तिथं शून्यात हरवून उभारला होता. एखादं भक्कम, मजबूत झाड मुळासकट क्षणात सडून जावं व तरी ते तसंच उभं राहिलेलं असावं तसा तो होता. तशातही त्याची ग्लॉक त्याच्या हातून निसटली नव्हती. हे त्याच्या चिवटपणाचं व दृढतेचं खास लक्षण होतं.

त्या शांततेत मग बुटांचा आवाज घुमत राहिला; लयबद्ध संथ... पण समोरून कोण येतंय हे पाण्यासाठी एसपीची मान वर झाली नाही. त्याच्या सर्व चेतना हरपल्या होत्या. हा नरसंहार पाहून त्यानं हार मानली होती का...?

ती व्यक्ती आहिस्ते आहिस्ते एसपी राजनकडं येत होती... एसपी राजन खाली मान घालूनच उभा होता.

व्यक्ती अगदीच नजीक येऊन स्थिरावली. राजनचे प्राणहीन डोळे, डोळे म्हणण्यापेक्षा फक्त बुबुळंच वर फिरली.

प्रथमच 'समक्ष' पाहिलेला चेहरा त्याच्या डोळयांत भरला. विभत्स हसणारा. तिथल्या मिणत्या प्रकाशात तो खुनशी व विकृत वाटून गेला त्याला. गालाच्या याकडे पासून  त्या कडेपर्यंत तो पिवळे दात विचकत विकृत हसत होता. वेडेपणाची स्पष्ट झाक त्याच्या काळया डोळयांत होती. सदर विकृत चेहरा त्यानं केवळ सीसीटीव्ही फुटेजमध्ये पाहिला होता. आता तेच अभद्र तोंड अगदी काही इंचाच्या अंतरावर पाहत असून, तरी भयाची एक लकेरही राजनच्या चेहऱ्यावर उमटली नव्हती. कोणताही भाव डोळयांत न आणता राजन त्याला तीव्र नजरेनं पाहत होता. आपल्या प्रामाणिक ऑफिसर्सचं हे मृत्यूकांड घडवणारा साक्षात समोर आल्याने एसपी प्रतिशोधाच्या भावनेने भयंकर चिडला होता.

एकमेकांना डोळयांत साठवत दोघे दोन चार क्षण तसेच थांबले. आणि...

एसपी राजनचं शरीर हरकतीत आलं. वायुवेगानं त्याचा हात उंचावला गेला. 'ग्लॉक सेव्हन्टीन'मधून गोळी सुटली. सामने उभा असलेला माणूस क्षणात दिसेनासा झाला.

नाही...! त्याला गोळी लागली नव्हती. तो गोळीच्या मार्गातून बाजूला झाला होता व क्षणात तो एसपी अत्यंत समीप जाहीर झाला होता. राजनचा हात धरून त्यानं त्याला डिसआर्म केलं. राजनलाही समजलं नाही की काय झालं. समोर फक्त कसली काळी आकृती इकडं तिकडं हलली व ती पुन्हा स्थिर झालीसं त्याला वाटलं.

पुन्हा तेच त्याचं दात विचकणं! राजन अजूनही ढळला नव्हता. घाबरला नव्हता. त्यानं त्याची वज्रमूठ त्या माणसाच्या तोंडावर फेकली. ती हवेतच तळहाताने अडवली गेली. एकच हेल देऊन मनगटातूनच राजनचा हात तोडला गेला. एक तीव्र वेदनेची कळ राजनच्या मस्तकात दवडत गेली. अशातही त्यानं ऊ की चू केलं नाही. एसपी राजन चिवट होता, काटक होता. तो बधला नाही. दुसरी वज्रमुष्ठी त्यानं त्या माणसाच्या दिशेनं भिरकावली. त्याचा हात वाटेतच अडवून झटकला गेला. सांध्यातून तो निखळला, लुळा होऊन खाली पडला. क्षणाक्षणाला वेगाने वाढत जाणारी वेदना मेंदूत भिणत चालल्याने राजन आताही ओरडला नाही. तो ग्लानीत मात्र ढकलला जात होता.

त्या व्यक्तीनं राजनचं तोंड एका हातात धरलं. त्याचा हात इतका अजस्त्र होता, की राजनचं आख्खं मुखमंडल त्या हातामागं झाकोळलं गेलं. त्यानं राजनला मागं भिरकावलं. गाडीच्या बॉनेटवर त्याचं डोकं मागील बाजूने जोरात आपटलं. त्या शांततेत तो आवाज खूप मोठ्यानं झाला. बॉनेट वरून घसरून तो खाली जमिनीवर कोसळला. आधार घेण्यासाठी त्याला हातांचा वापर देखील करता आला नाही, दोन्ही हात पूर्वीच निकामी जे झाले होते.

राजन आपलं भान हरपत गेला. जमिनीवर पडलेला तो. डोळे उघडे ठेवणं त्याच्यासाठी आता अवघड होऊन बसलं होतं. त्याच्या डोळयांची संथ उघडझाक होत होती. त्या व्यक्तीची तिरकी आकृती त्याच्या दिशेनं येताना तो अंधुक पाहत होता. ती जवळ येईल तशी त्याला त्याचे चालत येणारे पाय फक्त दिसत होते.

आणि अचानकच; तो दुष्ट चेहरा त्याच्या डोळयांत भरला. ती व्यक्ती राजनच्या डोळयांसमोर खाली बसली होती. त्यानं राजनचे केस आपल्या भल्यामोठ्या मुठीत भरले. एकवार त्याचं तोंड उंचावलं. आग ओकणारी आपली नजर त्या क्रूर माणसानं एसपीच्या डोळयांत भरली आणि दाण्णकन् त्यानं राजनचं तोंड रस्त्यावर आपटलं. राजनचं तोंड, नाक चेंदले गेले. नाका-तोंडातून रक्त भळाभळा वाहू लागले. राजनला जराही उसंत न देता मग तो त्याचं तोंड रस्त्यावर परत परत आदळू लागला. प्रत्येक वेळी त्यानं आपला वेग वाढवत नेला...

राजनचे दातही तुटून रस्त्यावर विखरू लागले. आपलं उरलं-सुरलं भान देखील त्यानं हरवलं. अजूनही या व्यक्तीचा आत्मा शांत झाला नव्हता. एसपीची निमगौर त्वचा काळी निळी पडत चालली होती. त्याभोवती लाल चट्टे पसरत चालले होते. तोंडातून, नाक-कानांतून रक्ताच्या धारा वाहत आपल्या वाटा चोखंदळत होत्या. शेवटचं त्यानं राजनचं मुख कडक रस्त्यावर आदळलं आणि आपल्या बलदंड पंजाची एकच भीममूठ करून त्यानं राजनच्या तोंडावर आदळली. जे काही प्राण राजनच्या देहात उरले होते ते या अजस्त्र मुष्टिप्रहारानं एकहाती उडून गेले.

हे सगळं मागं राहून कॅमेऱ्यात रेकॉर्ड करत असलेला रिकार्डो आता पुढं आला. राजनला मारूनही त्या क्रूरकर्मा गोलाएथचा राग निवळला नव्हता. तो उठून

राजनला लाथेनं तुडवत राहिला. तोपर्यंत तुडवत राहिला, जोपर्यंत त्याच्या शरीरातून हाडे मोडल्याचा आवाज येणं बंद झालं नाही. त्यानं कुठलंच हाड शाबूत ठेवलं नव्हतं. आतल्या आत त्यानं आपल्या लथप्रहाराने राजनच्या हाडांचे अस्थीपिष्ट बनवलं होतं. असं असूनही गोलाएथ थांबण्याचं लक्षण काही दिसत नव्हतं. रिकार्डोच मग रेकॉर्डिंग बंद करून आगे होऊन त्याला अडवता झाला. त्यानं त्यास मागे खेचलं. त्या झटक्यानं तुफानातून बाहेर फेकलं जावं तसा गोलाएथ भानावर येत थांबला.

"ही बॉडी हेडकॉर्टर्सला पाठवून दे!" गोलाएथनं गुरकावत आदेश फर्मावला.

तो मागं वळला. त्या बिल्डिंगमधून आठ दहा लोक आपल्या बंदुकांसकट मुंगांच्या दोन रांगेंप्रमाणं बाहेर पडत गोलाएथ समोर येऊन थांबले. इथं राजन सोबत आलेल्या कोल्हापूर पोलीस फोर्सवर गोळीबारी करून गोलाएथला या कारणी मदत करणारे हेच ते लोक.

गोलाएथने यांमदतनीसांचाही मुलाहिजा न राखता आपली पिस्टल मागून घेचून एकाची कवटी छेदली. कारण, गोलाएथनं यांना मदत मागितलीचं नव्हती, तरी त्यांनी मधे पडून गोलाएथला सहाय्य केलं होतं. स्वाभिमान दुखावलेला गोलाएथ म्हणून यांच्यावर चिडला होता.

बाकीचे सावध झाले. त्यांच्या 'एम.पी. फाईव्ह' सब-मशीन गन्स हरकीतीत येऊन गोलाएथवर रोखल्या गेल्या. त्यांतून फायर होण्याआधीच गोलाएथ विद्युतवेगे भरधाव त्यांच्यात शिरून एकेकाला अधू करत सुटला. ज्यांच्यावर बारी यायची असायची ते गोळी मारण्याचा यत्न करायचे, परंतु ते आपल्याच मर्सिनरी

साथीदाराला जखमी करून सोडायचे. तिथून गोलाएथ कधीचा हलून पुढील शिकार गाठायचा. त्या धिप्पाड भक्कम शरीराला असं विजेच्या चपळाईनं हलताना पाहणं ही प्राणांतिक भयंकर गोष्ट होती. रिकार्डो गोलाएथचा माणूस असून गोलाएथचं हे रौद्र तांडव पाहून तोही गर्भगळीत होऊन गेला होता.

क्षाररयुक्त समुद्रात एक मासा जसा सऱ्हाईतपणे ते जड पाणी कापत पोहत असतो, तसा गोलाएथ त्या खूनी शिकाऱ्यांमधून आपला योजनाबद्ध मार्ग काढत तो त्या शिकऱ्यांचीच शिकार करत चालला होता. गोलाएथ स्वतः शिकाऱ्यांचा शिकारी आहे ही गोष्ट त्यांना माहीत नसावी म्हणूनच त्यांच्या मशीन गन्स त्याच्यावर सरसावल्या जात होत्या.

जीव घेण्यासाठी कधीही तत्पर हे लोक आता खुद्द मृत्यूचे ग्रास होत चालले होते आणि तेही काय होतंय हे त्यांना समजण्याच्या आत!

अंतिम बंदूकधारीला धाराशाही केल्यावर त्याच्याकडून प्राप्त केलेल्या एमपी फाईव्हच्या गोळ्या एकएक करून मग त्या मर्सिनरीजच्या डोक्यांत गोलाएथनं पेरल्या. आधीच अदमरे झालेल्या कोणालाच वेदनेचा 'अक्' देखील काढता आला नव्हता.

आपला मृत्यू तांडव थांबवून गोलाएथनं खिशातून मोबाईल काढला. कोणाचा तरी नंबर डायल करून त्यानं फोन कानाला लावला. पलिकडून फोन उचलला जाताच त्यानं आग ओकण्यास सुरवात केली,

"माझ्या कामात पुन्हा टांग आडवी टाकलीस, तर ती टांग पण राहणार नाही आणि तूही!" गोलाएथ वाघासारखा गुरगुरत धमकावत होता.

इकडे, अखिलीस त्याच्या मास्टर बेडवर बसून तो कॉल व त्यातून मिळणारी धमकी ऐकत होता. स्वतःशीच हसत होता.

"तुझी मदत म्हणून थोडी माणसं पाठवली होती." तो बळेच बोलला.

"मला तुझ्या मदतीची गरज नाही!" गोलाएथ फोनमधून ठणकावत होता...

स्वतःवर चिखल उडू न देता वाटेतले काटे काढायचे होते अखिलीसला. गोलाएथच्या हातून त्याला हे साधायचं होतं, म्हणूनच तो गोलाएथचा उद्दामपणा सहन करत होता. गोलाएथ बोलत असताना त्याची एक खिल्ली उडवणारं हसू अखिलीसच्या मुद्रेवर झळकत होतं. गोलाएथला अधिकाधिक खिजवण्यासाठी व त्याचा राग वाढवत नेण्यासाठीच अखिलीसचे हे सारे खेळ चालू होते, ज्याने तो लवकरात लवकर अखिलीसच्या वाटेतील सर्व काटे उखडून त्याचा मार्ग प्रशस्त करेल. आणि महत्त्वाचं म्हणजे 'इब्लिस'ला निकालात काढेल!

गोलाएथचा निर्णय त्याच्यासाठी सोईचाच होता. गोलाएथ त्याचा मार्ग स्वच्छ करत होता आणि तेही त्याला कसलीही झळ न पोहोचता. हे त्याच्यासाठी श्रेयस्करच होतं.

"याद राख पुन्हा मधे पडलास तर! तुझं यांच्याशी काय असेल, ते असेल. पण आता ही सगळी माझी शिकार आहेत! लक्षात ठेव! आणि पुन्हा जर तू आडवा आलास, तर त्यांच्या आधी तुझा मुडदा पडेल! घोटून याद राख!" एवढं बोलून गोलाएथनं फोन कट केला.

इकडं, गोलाएथची थंड नजर मग रिकार्डोवर फिरली. रिकार्डो जाग्यावरच गोठला. गोलाएथनं त्याला जवळ येण्याची खूण केली. रिकार्डो इतका थिजला

होता, की त्याला हलताही आलं नाही. तो जागीच खुंटला होता. गोलाएथ आपणहून त्याच्याकडं गेला. त्यानं रिकार्डोच्या खांद्यावर हात टाकला.

"या अखिलीसला इथला प्लॅन कसा कळाला?" त्यानं अत्यंत शांतपणे रिकार्डोला पृच्छा केली. जणू मघाशी साक्षात मृत्यूच्याही छाताडावर नाचणारा काळ आता हा नव्हताच.

"मी... ते... बॅक-अप असावा म्हणून... अखिलीसनं विचारलं म्हणून... त्याला सांगितलं..." रिकार्डो भीत तोंडातल्या तोंडात बडबडला.

"पुन्हा जर असं काही केलंस; तर या अखिलीसच्या पण आधी तू नरकाचं दार वाजवयला जाशील. मग बघणार नाही; तू मला, जोनाला सांभाळलं आहेस म्हणून! हं? कळतंय मी काय म्हणोतय?" खाली नजर लावून बोलणाऱ्या गोलाएथनं रिकार्डोवर तीक्ष्ण राक्षसी नजर फिरवली.

रिकार्डो गळलाच. तोंडातून शब्द सोडाच, होकारार्थी मान हलवण्याची शक्तीही त्याची निमाली होती. डोळयांतील पाण्यानंच गोलाएथचा सल्ला(?) समजल्याचं त्यानं स्पष्ट केलं.

"हे रेकॉर्डिंग व ही पोलिसांची मडी हेडकॉर्टर्सला पाठवून दे!" गोलाएथनं हुकूम सोडला आणि त्यानं आधीच निर्जन असलेली व आता त्यानंच नव्यानं निर्माण केलेली ती स्मशानभूमी त्यागली.

रिकार्डो जेव्हा भानावर आला, तेव्हा त्याला तिथं मृतांचे खचच्या खच दिसले. जिथवर नजर जाईल तिथवर फक्त रक्ताचे पाट आणि मेलेली मडी. त्या मृत पोलीस अधिकारी, अखिलीस करवी मदतीला आलेले मारेकरी यांच्या सोबत तिथं पडला होता, तो राजनच्या मांसाचा लगदा... गाड्यांच्या, बंदुकीच्या अस्ताव्यस्त

पडलेल्या टॉर्चेसच्या लाईट्समध्ये ते दृश्य... मेलेल्यांची ती वेडीवाकडी झालेली ओंगळवाणी तोंडं अजूनच विभत्स, भयानक दिसत होती. तो क्षणभरही तिथं थांबला नाही. गोलाएथनं सोपवलेलं काम त्याला मार्गी लावायचं होतं.

●●●

एक-दीड तासात रिकार्डो त्याच्या विश्वासातील लोकांसोबत तिथं परत आला. मोठमोठी लाकडी खोकी सोबत आणलेल्या मोठ्या कंटेनर मधून खाली काढण्यात आली. मेलेल्या पोलिसांची शवं त्या सहा-आठ खोक्यांमध्ये कोंबण्यात आली.

राजनसाठीचं खोकं मात्र खास त्याच्या एकट्यासाठी होतं. त्याची ती घडी करता येण्याजोगी कात उचलून त्या खोक्यात सोडण्यात आली. त्या रबर सदृश्य शरीरानं आपसूक त्या खोक्याचा आकार घेतला. मग ते बॉक्सेस प्लायवूडनं बंद करून त्यांना खिळे ठोकण्यात आले. ती खोकी कंटेनरमध्ये चढवली गेली. आणि कंटेनर तिथून हलला. रिकार्डोला अजून सुटका नव्हती. त्याला पुढील काम अजून करायचं होतं. त्या कंटेनरच्या केबिनमध्ये चढून तो ड्रायव्हरच्या शेजारी बसला.

सोबत आलेले लोक कंटेनरमध्येच आपली जागा धरून होते... गाडी जागची निघाली. मागं निव्वळ अखिलीसची मेमेली भाडोत्री माणसं मरणाच्या मांडीवर विसावून निपचित पडून होती...

◆◆◆

रिकार्डो कडून पाठवली गेलेली ती रेकॉर्डेड व्हिडीओ क्लीप शार्दूलच्या केबिनमध्ये त्याच्या सोबत इब्लिस पाहत होता. चेहऱ्यावर मुखवटा होता त्यामुळं त्याचे भाव स्पष्ट होत नव्हते. पण आतून तो नक्कीच स्वस्थ नव्हता.

गोलाएथ राजनचा चेंदा करताना त्या व्हिडीओत स्पष्ट दिसत होतं. आणि स्पष्ट दिसत होतं ते गोलाएथचं तोंड. हातांनी, लाथेनं राजनला ठार करणारा तो राक्षस इब्लिस पाहत होता. धुमसत होता, तरी शांत होता.

"हे मेमरी कार्ड आणि बॉडीज इथं कशा आल्या?" त्यानं शार्दूलला विचारलं.

क्षुब्ध शार्दूल डोळयांत आलेली आसवं डोळयांच्या कडांनाच तटवून ते भयावह चित्र पाहत होता. इब्लिसच्या घोर आवाजानं तो भानावर आला. त्यानं इब्लिसकडं पाहिलं.

"एक कुरियर बॉय देऊन गेला. त्याला आणि कुरियर कंपनीचा मॅनेजर यांना डिटेन केलंय." शार्दूलनं माहिती दिली.

"ओके." इब्लिस विचारात बोलला.

"पण... राजन सरांना असं ठरवून मारण्यामागचं मोटिव्ह काय? ते समजत नाहीये..." शार्दूलनं त्याला सतावत असणारा प्रश्न उद्धृत केला.

"राजन आणि मी आम्हा दोघांच्याही मागे आहेत हे. नाहीतर राजनला मारलेलं रेकॉर्ड करून इथे पाठवण्याचं काय कारण? पोलीस माझ्याशी संलग्न आहेत हे या लोकांना माहीत आहे. या क्लीपच्या माध्यमातून त्यांना मला सुद्धा चेतावणी द्यायची होती. ही धमकी आहे; माझ्यासाठी! यामागं कारण तर नक्की आहे. ते काय, ते शोधावं लागेल." इब्लिसनं तर्क बोलून सिद्ध केला.

शार्दूलला देखील ते पटलं होतं. आपसूक त्याची मान डोलली होती.

"म्हणजे तुमची इन्वॉल्हमेंट सुरवातीपासूनच आहे तर..." तो बोलला.

"फर्दर् इन्फॉर्मेशन?" इब्लिसनं त्याची टिप्पणी दुर्लक्षित करून पुढं विचारलं.

"एकजण ही कुरियर्स कुरियर ऑफिसला देऊन गेला असं मॅनेजर चौकशीत म्हणाला. त्याच्या ऑफिसचं सीसीटीव्ही फुटेज चेक केलं. तो रिकार्डो होता." शार्दूलनं अधिकची माहिती दिली.

आणि त्यानं एक नवीन क्लीप चालू केली.

मॉनिटरवर पळणाऱ्या त्या व्हिडिओ क्लीपमध्ये त्यांना दिसत होतं, की रिकार्डोची माणसं मृतदेह ठेवलेले ते बॉक्सेस कंटेनर मधून उतरवत होते. तिथंच बाहेरच उभ्या कुरियर कंपनीच्या मॅनेजरला रिकार्डो मेमरी कार्ड असलेलं पॅकेज देताना देखील त्यात दिसत होतं. पत्ता देऊन ते सर्व कंटेनर मधूनच परतले.ही क्लिप कुरियर कंपनीच्या सीसीटीव्हीची होती.

ही क्लीप पाहून इब्लिसला चमकल्यासारखं झालं.

"हा रिकार्डो अखिलीससाठी किंवा त्याच्या सोबत तर काम करत नसेल...?" त्यानं आपली खात्री बोलून दाखवली.

"दाट शक्यता आहे." शार्दूल विचारात पुटपुटला.

"ते बॉक्सेस उतरवताना कुरियरच्या लोकांना मांसाचा वास वगैरे आला नाही? विचारलं नाही त्यांनी की हे काय आहे आणि पोलीस स्टेशनला का पाठवायचं आहे?" इब्लिसनं डोक्यात आलेली शंका विचारली.

"ते म्हणतात, त्यात काय आहे हे विचारलं त्यांनी. पण ते इकडं का पाठवलं जातंय हे विचारण्याचं त्यांचं काम नाही. म्हणून त्यांनी त्याचा मागोवा घेतला नाही." शार्दूलनं सांगितलं.

"मग काय आहे सांगितलं होतं त्यांना?" इब्लिसनं विचारलं.

"लेदरच्या फर्निचर वस्तू आहेत म्हणून सांगितलं होतं असं मॅनेजर म्हणाला. पोलीस स्टेशनमध्ये रिनोवेशनचं काम चालू आहे आणि इथं तातडीनं पोहोचवायचं आहे हे रिकार्डोनं त्याला स्वतःहून सांगितलं. म्हणून मग त्यांनी ज्यादा चौकशी केली नाही. इथं ते बॉक्सेस उतरवल्यावर उघडून पाहिलं, तर हा धक्का. मग तिथंच त्या कुरियर बॉयला आणि त्यांच्या कंटेनर ड्रायव्हरला आत घेतलं आणि त्यांच्या मॅनेजरला बोलवलं." शार्दूलनं व्यक्त झाला.

"तरी... त्यांच्याकडं स्वतःचा कंटेनर असताना त्यांना कुरियर कंपनीला इनवॉल्व्ह करण्याची काय गरज पडली हा प्रश्न नाही पडला कुरियरवाल्यांना?" इब्लिस बोलला.

"त्याचं उत्तरही रिकार्डो तयार करून आलेला. डिझेल संपत आलंय. आणि माल वेळेत पोहोचवायचाय म्हणून कुरियर करतोय असं कारण त्यानं सांगितलं होतं." शार्दूल बोलला.

"ही बरीच पोहोचलेली दिसतायत. स्वतः इथं आली असती, तर हाती लागली असती, म्हणून हा खेळ!" इब्लिस दात खात मशीनी आवाजात बोलला. मग...

"रिकार्डोनं कुरियर कंपनीत आणलेल्या कंटेनर ट्रकची चौकशी केली?" इब्लिसनं डोक्यात चमकलेला प्रश्न विचारला.

"हं. तोही चोरलेलाच होता एका ऑटोमोबाईल शोरूममधून. तिथल्या सीसीटीव्हीत देखील ते आलं आहे. त्यांनी संबंधित पोलीस डिव्हीजनला चोरीची एफआयआर सुद्धा रजिस्टर केली आहे. त्याची कॉपी आली आहे आपल्याकडं." शार्दूलनं उत्तर दिलं.

"फुल प्रूफ प्लॅन होता तर." इल्बिस विचार करत उद्गारला.

"आणि त्या व्हिडिओतला माणूस कोण होता काही समजलं?" काळावकाशानं इब्लिसचा प्रश्न.

"नाही. अजून शोध चालू आहे." शार्दूलचं माफक उत्तर.

"हा रिकार्डो सापडतोय का बघा. त्याच्या थ्रू त्या खुन्याला शोधता येईल." इब्लिसची सूचना.

"आणखी एक गोष्ट..." शार्दूल संकोचत बोलला.

"हं?" इब्लिस कसलाही भाव प्रकट न करणारं हुंकारला.

शार्दूल अधिक गंभीर झाला,

"तुला ज्या खूनासाठी जबाबदार धरलं जात होतं, तो खून राजन सरांना मारणाऱ्यानंच केला असण्याची शक्यता आहे. पॅटर्न सेम आहे. तुला आरोपी ठरवलं, त्याबद्दल सॉरी...!" शार्दूल अपराधी बोलला.

इब्लिसशी नजर चोरत होता तो.

"हेच आधी लक्षात घेतलं असतं, तर तुमचा एसपी आज जिवंत असता. पण तुम्ही वेळ आणि शक्ती खर्च करत राहिलात माझ्यामागं." इब्लिसनं खोचक शब्दबाण मारले.

"म्हणूनच तुम्हाला बोलवलं आहे. टू रिडीम एव्हरीथिंग. आणि तुम्हीच हे करू शकता असा एसपी सरांना पण विश्वास होता." शार्दूल बेमनानं बोलला.

"आणि सगळं मार्गी लागल्यावर तो माझाही एन्काऊंटर करणार होता!" इब्लिस जोरदार तीक्ष्ण बोलला.

शार्दूलनं चमकून त्याच्याकडं पाहिलं.

"आश्चर्य वाटलं, मला हे कसं ठाऊक याचं? हं! माणसाला एक नजर पाहून तो काय लायकीचा आहे ते मी क्षणात समजून जातो. एसपी राजनशी तर अनेकदा डील केलंय. त्याला आतून बाहेरून ओळखत होतो मी. त्याचं काम झालं, की तो माझा काटा काढणार हे मला आधीच समजलं होतं." इब्लिस कुत्सित हसला.

"म्हणजे तुम्ही मदत करणार नाही तर..." शार्दूलनं चिंता बोलून दाखवली.

"करेन!" इब्लिस ठाम कडाडला व म्हणाला,

"कारण राजन माझ्याविरोधात असला, तरी तो न्यायाच्या बाजूनं होता. म्हणूनच माझ्या विरुद्ध होता. आणि यासाठी मी त्याचा आदर करतो." इब्लिस राग न ठेवता निर्मळ बोलला,

"पण माझा मार्ग तर तुझ्या नजरेत असंवैधानिक आहे. मग माझी मदत का हवीय तुला?" त्यानं शार्दूलला प्रश्न केला.

"कारण हे प्रकरण एकट्या पुलीस फोर्सला झेपणं कठीण आहे. एसपी राजन यांचं म्हणणं देखील तेच होतं. त्यांचीच इच्छा होती, तुमची मदत घेण्याची. मी फक्त त्यांच्या मताचा आदर करतोय. आणि मलाही राजन सरांच्या खून्याला लवकरात लवकर शिक्षा झालेली बघायचं आहे." शार्दूलनं स्पष्टीकरण दिलं.

शार्दूल अचानक इब्लिसला आदरार्थी संबोधायला लागला होता. इब्लिस राजनसाठी त्याला मदत करायला तयार झाला होता म्हणून शार्दूलमध्ये इब्लिसबद्दल थोडं तरी मत सुधारलं होतं. त्याचीच ही परिणीती होती.

"हा... पण काम झाल्यावर तू माझा एन्काऊंटर करायला निघू नको म्हणजे झालं." इब्लिसनं त्यातूनही कोपरखळी मारली.

"तुम्ही पण ध्यानात ठेवा. कायदा हाती घेऊन तुम्ही काही करणार नाही." शार्दूलनंही ठणकावलं.

"बघू!" शार्दूलचं ठणकावणं जवळजवळ उडवून लावत इब्लिस उद्गारला.

प्रोटेस्टसाठी शार्दूल काही बोलायला उत्सुक असता शार्दूलची यावर प्रतिक्रिया ऐकायला इब्लिस तिथं थांबला नाही. त्याचे फक्त ओठच हलले.

"हेलीची सिक्युरिटी वाढव!" जाताना इब्लिसनं शार्दूलला सल्ला वजा हुकूमच दिला!

# १४. गौप्यस्फोट...

इतरांसमोर शांत असल्याचं भासवणारा इब्लिस आता भूत डोक्यावर स्वार झाल्याप्रमाणं त्याची गाडी पळवत होता. कुठं पोहोचायचं होतं त्याला...?

त्याचा मेंदू हातापायांना जसा आदेश देत होता त्याप्रमाणं ते गाडी पळवत होते. इब्लिसला ती जलद होणारी प्रक्रिया नोंद सुद्धा होत नसावी... कसलीतरी धून सवार झाल्यागत तो ती गाडी दवडत होता...

अंततः त्याच्या गाडीला विराम मिळाला. सूर्योदय बाहेर ती लागली होती. आपला मास्क काढून इब्लिसनं गाडीतच मागं भिरकावला. गाडीतून उतरून त्यानं ती नीट लॉक केली. येण्यापूर्वी रवीनं सुचवल्याप्रमाणं संतू बाहेरच येऊन थांबला होता. रवी घाईनं त्याच्याकडं गेला.

"सर कुठं आहेत?" त्यानं गडबडीतच विचारलं.

"आहेत. बाहेर जायचं म्हणत होते. मी नाही जाऊ दिलं." संतू गांभीर्यानं बोलला.

"गुड. संतू, मी सांगतोय त्यानं खचू नको. आणि पॅनिक पण होऊ नको." महत्त्वाची गोष्ट सांगण्यापूर्वी पार्श्वभूमी तयार करत रवी म्हणाला व पुढे बोलला,

"सरांचा जीव खरंच संकटात आहे." तो पटकन बोलला.

संतूसाठी रवीचं हे वाक्य म्हणजे एक स्फोटच ठरला. त्याचं तोंड उघडं पडलं.

"सावर स्वतःला. एक काम कर, सरांच्या जीवाला धोका आहे सांगून पोलीस प्रोटेक्शनसाठी मागणी कर." रवीनं त्याला सांगितलं.

इब्लिस म्हणून तो स्वतः हे करू शकत नव्हता. रवी म्हणून तो समोर गेला, तर पोलिसांची व त्याहून शार्दूलची चाणाक्ष नजर त्याला इब्लिस म्हणून ओळखू शकली असती. यास्तव तो संतूला हे काम करण्यास सांगत होता. जतीन यांची या प्रकरणी इन्वॉल्व्हमेंट आहे हेच त्याला पोलिसांना कळू द्यायचं नव्हतं. संतूला हे काम सांगण्यामागचं हेच कारण होतं.

"पण बाबांनी मागणी केली, तरच पोलीस प्रोटेक्शन मिळेल. मी कसं... शिवाय कारण पण हवं ना..." संतू रास्त बोलला.

"तेही आहेच." रवी विचार करू लागला.

"पण दादा, हे सगळं असं अचानक... का?..." घाबऱ्या संतूनं स्वाभाविक प्रश्न विचारला.

"ते नाही सांगू शकत." रवीनं स्पष्टच केलं.

संतू समजून होता, की रवी काही चुकीचं करणार नाही. त्यामुळं त्यानं पुढं काही पाल्हाळ लावलं नाही. त्याला एवढं खात्रीशीर होतं, की त्याच्या वडील जागी असणाऱ्या जतीन यांचा जीव धोक्यात आहे आणि भावाच्या जागी असणारा रवी त्यांना काही होऊ देणार नाही. याकरणे तो लागेल ती मदत रवीला निमूट करायला सिद्ध होता. तेच तो करणार होता!

"मला सरांशी बोलायचं होतंच. मीच समजावून बघतो त्यांना." रवी पुढं बोलला.

संतूची मान डोलली तसा रवी आश्रमात शिरला.

जतीन कुठं सापडतील हे रवीला पक्कं ठाऊक होतं. त्यांच्या नेहमीच्या जागी. त्या माणसाला निवांतपणा, नीज या गोष्टी माहितीच नव्हत्या. यावेळी देखील ते आपल्या कार्यालयात बसून काही काथ्याकूट करत असणार हे ताडलेला रवी बेधडक त्यांच्या ऑफिसात घुसला.

"मॅनर्स पण विसरलास का आता?" जतीन यांनी वाचत असलेल्या बॅलन्सशीट मधून मान वर काढून त्याला झापलं.

"माफ करा. महत्त्वाचं आहे." धीर नसलेला तो त्यांच्यासमोर येऊन बसला.

जतीन यांच्या टेबल पूर्तीच काय ती लाईट होती. बाकी त्यांचं कार्यालय हे अंधारमयच होतं. अंधारातून येऊन पुढं बसलेला रवी उद्विग्न असल्यानं त्या अंधुक प्रकाशात त्याचा चेहरा अजूनच विवंचनेत जतीन यांना दिसत होता.

"का रे? काय झालं?" त्यांनी त्याची अवस्था पाहून आपला हेटळणीचा अविर्भाव सोडून गंभीर होत विचारलं.

"हिटलरच्या बायोवेपन बद्दल तुम्हाला काय माहित आहे?" रवीनं थेट प्रश्न केला.

जतीन आता अधिकच गंभीर झाले. ते थोडे अंतर्मुख झाल्यासारखे झाले. कधीतरी हे होणारच होतं याची त्यांना खात्री असल्यागत ते हसले.

"फार नाही." ते बोलले.

"म्हणजे थोडं माहीत आहे..." रवी अतीच हट्टी बोलला.

जतीन परत हसले.

"तुला दिलेलं लॉकेट. तेच आहे ते बायोवेपन!" जतीननी स्फोट केला.

"काय?" धक्क्यात ओरडून त्याचा हात आपणहून त्या कुपीला गेला.

आता त्यानं ते व्यवस्थित पाहिलं. ते लॉकेट म्हणजे एक छोटी लंबगोल अशी ती काचेची कुपी होती. त्यात कसलंसं घट्टसं पारदर्शक द्रव भरलं होतं व ती तांब्याच्या निम-जाडसर तारेच्या साखळीत ओवली होती.

"त्यातले जिवाणू मानवी शरीर तापमानावरच जिवंत राहतात. म्हणूनच इतकी वर्षे मी ते गळयात अडकवून होतो." जतीननी स्पष्ट केलं.

"पण तुम्ही हे भयंकर अस्त्र असं जिवंतच का ठेवलंय?" रवीचा असंमजस प्रश्न.

"कारण या आश्रमाच्या जमिनीबरोबर माझ्या वडिलांची जी एक शेवटची धरोहर आहे, ती म्हणजे हे जिवाणू! माझ्या मरणापर्यंत तरी या पुंजी शाबूत राहाव्यात ही वेडी आशा आहे म्हणून. इथं ती पुंजी आज तागायत मी जिवंत ठेवली आहे वडिलांची आठवण म्हणून!" त्यांची तर्जनी काही तरी सूचित करत असल्यासारखी टेबलवर आदळत होती. ते पुढं म्हणाले,

"मी गेल्यावर तुला हवं तर तू हे जिवाणू नष्ट करण्यास स्वतंत्र आहेस. हे आश्रम मात्र सांभाळ. इथल्या पोरांना माया दे. तू हे करशील याची खात्री आहे." जतीन यांनी त्याची ठाम निर्धारी भूमिका सांगितली.

"आत्ता तो विषय नाही! तुम्हाला माहित आहे, जर्मन सरकार या वेपनच्या शोधात आहे? त्यांना ठाऊक आहे की ते इथं, तुमच्याकडं आहे. ते हस्तगत करायला ते काहीही करू शकतात. तुम्हाला मारायला हे लोक कमी करणार नाहीत." रवी भयंकर कळकळीच्या काळजीनं बोलला.

"माहीत आहे. म्हणूनच मी हे तुझ्याकडं सुपूर्द केलंय." जतीन निर्धास्त बोलले.

"अजून काही?" रवीची पृच्छा.

"नाही. माझे वडील इथं आल्यानंतरचा माझा जन्म आहे. त्यामुळं मला अधिक काही माहीत नाही. त्यांनी जेवढं कळू दिलं तेवढंच. ते मी तुला सांगितलंय." जतीन बेफिकीर बोलले.

"माझा सल्ला ऐकाल? तुम्ही पोलीस संरक्षण मागा." रवी तळमळीनं बोलला.

जतीन निर्भीड व निर्मळ हसले.

"त्यानं काय होईल? आणि शिवाय त्यासाठी मला खरं कारण सांगावं लागेल. हे बायोवेपेन त्यांच्याकडं सोपवावं लागेल. कुणाची मती फिरली, तर काय होऊ शकतं याची कल्पना आहे ना?" ते बोलले.

"म्हणजे स्वतःला वाचवायला तुम्ही काहीच प्रयत्न करणार नाही आहात काय? निदान आमच्यासाठी तरी!" रवी आपला ताबा सुटून ओरडला.

"तुला माझी इतकी काळजी का वाटते?" जतीन यांनी त्याला निर्मळ हसत विचारलं.

"कारण तुम्ही माझे बाप आहात!" टेबलवर दोन्ही हात जोराने आपटून उठत तो ओरडला!

आणि त्यानं ती अंधारी खोली त्यागली! आता जतीन यांना वाचवायला जे काय करायचंय ते आपल्यालाच करावं लागणार हे त्याला समजून चुकलं होतं...

रवीनं हात आपटल्यानं झालेल्या टेबलच्या त्या मोठ्या आवाजानं संतू केबिनसमोर धावला होता. त्याच्याशी काही संवाद न करता रवी तडकाफडकी निघाला. संतू जाणाऱ्या त्याच्याकडं पाहून त्यानं आत जतीन यांच्यावर नजर फिरवली. ते त्याच्याकडंच शांत भाव मुखावर लेवून निःशब्द पाहत होते...

◆◆◆

एसपी राजन जाधवच्या मृत्यूची बातमी एव्हाना वाऱ्यासारखी पसरली होती. त्याचं कुटुंब विलाप करत होतं. त्याच्या सोबत गेलेल्या ऑफिसर्सच्या फॅमिलीजची देखी वेगळी परिस्थिती नव्हती. त्यांचे शवविच्छेदन चालू होते. विच्छेद करण्यासारखं उरलं काहीच नव्हतं त्या शवांमध्ये. प्रोसिजर होती, करावी लागणार होती. खुनी कोण हे पुराव्यानिशी मुळात सिद्ध होतं. पण पुन्हा त्या फुटेजची विश्वासार्हता तपासावी लागणार होती. पुन्हा प्रोसिजरचा भाग म्हणूनच... पुरावे अधिक भक्कम होण्यासाठीचा हा खटाटोप. हा भाग पोलीस डिपार्टमेंटचा होता. इब्लिसला यात लक्ष घालण्याचं काम नव्हतं.

●●●

तो हेलीच्या वॉर्डात पोहोचला. हेली आता ग्लानीतून बाहेर आली होती.

"ठीक आहेस?" इब्लिसनं तिला विचारलं.

"हं." ती एवढंच बोलली.

"एक काम आहे. करू शकशील?" इब्लिसचा निर्विकार प्रश्न.

"हुकूम!" अशक्त असणारी ती निरागस हसली.

"उठ!" त्यानं खरंच तिला हुकूम दिला.

सलाईन वगैरे काही नव्हतं. असतं तरी तिनं ते काढून फेकलं असतं. इब्लिसचं बोलावणं ती टाळू थोडीच शकणार होती... दोघं बाहेर पडत असताना तिच्या सुरक्षेसाठी तिथं असलेले ऑफिसर्स पुढं झाले. त्यांच्या गन्स इब्लिसवर सरसावल्या होत्या.

"तू पेशंटला भेटायला आला असशील म्हणून तुला आत एन्ट्री दिली. तेही शार्दूल सरांनी तसं सांगितलंय म्हणून. पण तू यांना घेऊन कुठेही जाऊ शकत नाहीस!" तिथल्या एका कार्यतत्पर ऑफिसरनं इब्लिसला ठणकावलं.

इब्लिसची एकच भेदक नजर आणि त्या सगळ्याच ऑफिसर्सचं आवसानच गळलं. तरी ते डटून इब्लिसला आडवेच राहिले. आपल्या जिवापेक्षा त्यांना त्यांचं हेलीचा जीव वाचवण्याचं कर्तव्य अधिक महत्त्वाचं होतं.

इब्लिसनं शार्दूलला फोन लावला.

"शार्दूल, हेलीला मी नेतोय. तुझ्या माणसांना सांग, मला जाऊ द्यायला. आणि माझा पाठलाग होऊ नये ते पण बघ!" तो मोबाईलमध्ये बोलला.

त्यानं मोबाईल त्याला धाडसानं बोलणाऱ्या ऑफिसरकडं धरला. त्यानं गन इब्लिसवर पॉईंट ठेवूनच तो कॉल घेतला.

"येस सर?" तो मोबाईलमध्ये बोलला.

"जाऊ द्या त्याला. त्याच्यासोबत ती जास्त सेफ राहील. आणि त्याच्या मागं कोणीही जाऊ नका." तिकडून शार्दूल बोलला.

"हो सर." ऑफिसर बेमन कबूल झाला.

मोबाईल इब्लिसला परत केला गेला. शार्दूल अजून काही बोलतोय न बोलतोय हे पाहता इब्लिसनं तो बंद करून खिशात सारला. सामोरे झालेले ऑफिसर्स मागं झाले. इब्लिस हेलीला धरून बाहेर चालू लागला. इब्लिसची अडवणूक केलेला ऑफिसर त्यांच्या मागून चालू लागला. पुन्हा कोणी त्याला अडवू नये म्हणून त्यानं घेतलेली ही दक्षता होती. बाहेर पर्यंत तैनात कोणी ऑफिसर समोर होईल तसं त्याला थांबण्यास तो इशाऱ्याने सांगत होता.

इब्लिस हेलीला घेऊन कार मधून गेल्यावर ते सगळेच एकसाथ ढिलावले, निवांत झाले. आता इथं थांबण्याचं कारण नव्हतं. तेही मग लगेच आपल्या हेडकॉर्टर्सला आपापल्या वाहनांतून रवाना झाले.

◆◆◆

औट घटकेत दोघं त्यांच्या गुप्त ठिकाणी उपस्थित होते.

"बोला. काय काम काढलंत." हेलीनं त्याला विचारलं. ती अजूनही थोडी अशक्त होती.

हेली आता खूपच वेगळी भासत होती इब्लिसला. कुठे खोचकपणा नाही. कुठे आडकाठी नाही. स्वतःचं म्हणणं खरं करणं नाही. कुठं अधिकारवाणी नाही. ठणकावणं नाही. ही हेली त्याच्यासाठी नवीन होती.

एक मोठा ताण कायमचा मिटला होता. तिचं असं वागणं हे त्याचंच प्रकटीकरण होतं.

आपल्या गळ्यातील ते लॉकेट काढून त्यानं हेली समोर धरलं.

"यात लिव्हिंग ऑर्गेनिजम आहे. एक एथनिक बायोवेपन! जे ठराविक जीनवर अटॅक करून संपूर्ण लिनीएज, संपूर्ण रेस संपवण्याची ताकत ठेवतं. मला याची सगळी सविस्तर आणि विस्तृत माहिती पाहिजे! किती वेळ लागेल?" त्यानं मुद्याला हात घातला.

"जमेल तितक्या लवकर बघते." म्हणत तिनं ती तांब्याच्या साखळीत असलेली काचेची कुपी इब्लिसकडून घेतली.

"पण लक्षात ठेव. ह्युमन बॉडी टेम्प्रेचरवरच ते जिवंत राहतं. त्यामुळं ते टेम्प्रेचर मेंटेन ठेव." त्यानं सूचना केली.

तिची होकारात मान हलली. तिनं ती जिवाणू बंद काचेची व्हाईल आपल्या मुठीत घट्ट झाकून घेतली. आणि ती आपल्या कामाला निघू लागली...

"आणि एक;" तो सुचल्यागत उद्गारला.

ती थांबली. मागे त्याच्याकडं वळली.

"हं?" तिनं विचारलं.

"अखिलीसचा नंबर मिळतो का बघ. मिळाला, तर अनट्रेसेबल प्रायव्हेट किंवा अन्नोन नंबरनं त्याला कॉल कर. आणि तो मला जोडून दे. आधी हेच काम कर." इब्लिसनं तिला सूचित केले.

"हो." ती इतकीच म्हणाली.

का? कशासाठी? असे प्रश्न तिच्यासाठी आता गौण होते. ती सोपवलेली कामं मार्गी लावायला चालती झाली.

तो इंतजार करत बसून राहिला... निवांत नव्हता तो... जतीन यांची चिंता त्याला आतून खात होती. त्याहून मोठी काळजी ही होती, की हे बायोवेपन चुकीच्या हाती लागलं, तर...

इब्लिस त्याच्या कामाला लागला. त्यानं श्रीशाला फोन केला...

श्रीशा तिच्या कामात व्यस्त होती. एका श्रीमंत घबाडाला ती आपल्या नाजूक कोमल हातांनी मद्यपान करवत होती. कान किर्रर्र् करणारं कर्कश अभद्र संगीत त्या अंधुक, धूसर बारमध्ये मोठ्यानं कुंधलं होतं. तिचा मोबाईल वाजत होता, परंतु त्या आवाजात मोबाइलचा आवाज दबला जाऊन तो नुसताच ब्लिंक होत व्हायब्रेट होत होता.

कॉल आलेला जाणवताच तिनं तो पाहिला. तिला तो बंदच करायचा होता म्हणूनच तिनं खरेतर तो पाहिला होता. परंतु कॉल इब्लिसचा आहे हे पाहून ती चकित झाली. प्रायव्हेट नंबर वरून तिला कॉल करणारा इब्लिस एकटाच होता. त्यामुळेच तो अनोळखी नंबर तिला इब्लिसचा असलेचं स्पष्ट झालं होतं. त्याचा कॉल बंद करण्याचं काही केल्या तिचं धाडस नव्हतं. त्यात त्यानं फोन केला म्हंटल्यावर काही महत्त्वाचं हमखास असणार. 'नंतर बोलू' सांगावं याच विचारानं ती जवळच्या त्या माणसापासून काही क्षण उधार घेऊन दूर झाली. तिनं कॉल रिसिव्ह केला. आणि...

"या वेळी कॉल करण्याचं कारण?" ती इब्लिसवर खेकसली.

"काम होतं!" तो मवाळ बोलला.

"कामातच आहे मी नंतर बोल!" तिनं दरडावलं.

"सॉरी! तू अजून पण उखडूनच राहणार आहेस का?" त्यानं माफीच्या स्वरात विचारलं.

हेलीवर बिकट परिस्थिती गुदरून गेल्यावर तो श्रीशाशीही मवाळ झाला होता.

"पोटापाण्याचं पण बघायला लागतं! तेच करतीये!" ती परत खेकसली.

"माझं ऐकलं नाहीस, तर ना पोट राहील, ना पोटातलं पाणी!" तोही थोडं चिडला.

ती वरमली. प्रकरण गंभीर आहे हे तिनं ताडलं. नाहीतर स्त्रियांचा मान राखणारा इब्लिस असं सहसा तिच्यावर चिडला नसता हे तिनं उमजलं.

"बोल!" फोनमध्ये बोलली.

"आताच्या आता बेसवर ये. आणि हो! कोणी पाठलाग करणार नाही याची दक्षता घे!" त्यानं ताकीद दिली व फोन ठेवून दिला.

इब्लिसचा अविर्भाव अगदीच वेगळा होता. ते तिच्यापासून लपलं नाही. जरूर काही गंभीर आहे हे ताडून ती तिच्या क्लाईंटची माफी मागून तिथून निघाली.

आताचं तिचं हे वागणं तिच्या व्यवसायासाठी आता बराच वेळ नुकसानीचं साबीत होणार होतं. तरी इब्लिसची घाई समजावून घेऊन तिनं ती कुर्बानी दिली होती.

इब्लिस उठला. तो त्याच्या हायली सिक्योर्ड सेफकडं गेला. त्यानं त्यातील काही पैसे एका ब्रिफकेसमध्ये काढले. आणि ती ब्रिफकेस घेऊन तो आपल्या पूर्व जागी बसून राहिला.

हेली त्याच्याकडं आली. तिच्या हाती एक मोबाईल होता. इब्लिसनं आधी करायला सांगितलेलं काम चोख वाजवून ती आली होती. तिनं तो इब्लिस समोर धरला. त्याच्यावर कॉल चालू होता. रिंग ऐकू येत होती. इब्लिसनं तातडीनं तो फोन घेतला.

"कोण?" पलिकडून अखिलीसचा भारदस्त आवाज ध्वनीत झाला.

"इब्लिस बोलतोय! तुला हवं असलेलं बायोवेपन माझ्याकडं आहे. आता त्या अनाथाश्रमच्या मालकाच्या मागं लागणं बंद कर!" त्यानं आदेश दिला.

अखिलीसच्या ओठांवर स्मित पसरलं.

"मला माहित आहे, त्याहून खात्री आहे, तुम्ही खोटं बोलत नसणार. तुमची इच्छा आहे, तर आता जतीन सारस्वत यांना कसलाच त्रास होणार नाही. ते मला द्या. तुम्हाला हवी ती रक्कम मी पोहोचती करेन!" अखिलीस डील करण्याच्या हिशेबानं बोलला.

इब्लिस उघडला.

"कोणत्याही चुकीचा भ्रम पाळू नको! ते तुला मिळणार नाही हेच सांगायला तुला फोन केलाय! आता त्या अनाथाश्रमापासून दूर रहा. नाही तर तुझं कुटुंब अनाथ होईल!" त्यानं अखिलीसला धमकावलं.

"तुम्ही उगाच गोष्टी कॉम्प्लीकेटेड करत आहात मिस्टर हेडीस!" अखिलीस शांत हसत बोलला. त्याच्या बोलण्यातही धमकी झळकत होती,

"अशात मी तुमचा सल्ला ऐकून जतीन साहेबांना एकटं नाही सोडू शकणार. कुणी सांगावं? त्यांच्याकडं काही फॉर्म्युला वगैरे असला तर? जर तुम्ही तो जिवाणू दिला नाही, तर मला तर ते पहावं लागेलच ना?" अखिलीस इब्लिसला कॉर्नर करण्याच्या हेतूनं बोलला.

हा अखिलीस टेढी खीर आहे हे इब्लिसच्या मनात ठसलं. तो काही काळ शांत झाला. आणि एक सुचून बोलला,

"ठीक! तुला मी ते बायोवेपन देईन! पण कुणालाच त्याचा काही धोका असणार नाही याची मला खात्री हवी आहे! आणि त्या अनाथाश्रमाच्या वाट्यालाही तू अगर कोणी इतर जाणार नाही याची हमी द्यावी लागेल!" तो तह करण्याच्या हेतूनं बोलला.

"अनाथाश्रमाबद्दल मी खात्री देऊ शकतो. त्या बायोवेपनचा माझ्याकडून काही गैरवापर होणार नाही याचीही खात्री बाळगा. बाकी जर्मनी त्याचं काय करते ही माझी समस्या नाही. आणि ते माझ्या हातातही नाही. त्याची हमी मी नाही देऊ शकत." तो आपला शांत अविर्भाव तसाच ठेवून बोलला.

एक कुटील हास्य त्याचा चेहरा उजळत होतं.

"अशा परिस्थितीत..." इब्लिस बोलला. तो क्लोज होणारी डील कट करण्याच्या विचारात होता.

तोच!

"काही निर्णय सांगण्याआधी लक्षात घ्या, की त्या अनाथाश्रमातल्या बिचाऱ्या मुलांना काही झालं, त्या बुजूर्ग जतीन साहेबांना काही झालं, तर त्याची जबाबदारी तुमच्यावर असेल!" अखिलीस इब्लिसला घेरत बोलला,

"मला नाही वाटत, की त्यांना काही झालं, तर त्याचं पाप तुम्ही तुमच्या शिरावर घेऊ इच्छिता! तुमच्यामुळे त्या अनाथाश्रमातली मुलं अनाथ व्हावीत असं हमखास वाटत नसेल तुम्हाला! तसे... तुम्ही खूप हळवे आणि सुहृद आहात हे मी जाणतो." त्यानं एवढं बोलून आपलं कुटील स्मित अजून रूंदावलं.

इब्लिस आता विचारात पडला. ते 'जीवास्त्र' आपल्याकडं आहे समजल्यावर अखिलीस जतीन यांचा विचार सोडून देईल असा त्याचा तर्क होता. पण हा अखिलीस त्याच्या विचाराहून चिवट निघाला होता. तो इब्लिसला त्याच्याच प्लॅनमध्ये गुरफटवू पाहत होता.

"फाईन!" इब्लिस अनिच्छेने अखिलीसचा प्रस्ताव मजूर करता झाला.

अखिलीस समोर त्यानं आपले हात टेकले होते असं नाही. काही तरी मार्ग तो अलबत काढणार होता. सध्या त्यानं जतीन पासून दूर रहावं म्हणून अखिलीसला गाफील ठेवण्यास हे कबुलीचं नाट्य केलं होतं.

"पण मला काही दिवस हवे आहेत." इब्लिस त्याला अजून म्हणाला.

"दिले. पण जास्त वेळ लावू नका!" अखिलीस हसला.

"आणि आधी त्या अनाथाश्रमाच्या आजूबाजूला जर तुझी कोणी माणसं असतील, तर ती आधी रिट्रीव्ह कर!" त्यानं हच्चा चढवण्यासाठी हुकूम सोडला.

"गुड! तुम्ही निश्चित रहा. माझा कोणी माणूस तिथं नाही. त्या बाबतीत निश्चिंत रहा. बाकी, माणलं पाहिजे तुम्हाला मिस्टर हेडीस! माझ्या इतक्या लोकांना मिळून जे जमलं नाही, ते तुम्ही एकट्याने करून दाखवलंत आणि तेही इतक्या कमी वेळात! इम्प्रेसिव्ह! बाय द वे, मला वाटलंच होतं, तुम्ही योग्यच निर्णय घ्याल! मला कुठं भेटायचं तुम्हाला माहित आहेच!" आणि अखिलीसनं अभिमानी हसून फोन ठेवला.

इब्लिसवर फोन हंग-अप करणं ही एक मोठी गुस्ताखी होती. त्यानं तरी ही कृती केली, कारण त्याला इब्लिसला हे नोंदवायचं होतं, की तो इब्लिसला अजिबातच जुमानत नाही!

वस्तुतः इब्लिस चिडायला हवा होता. वास्तविक तसं काहीच झालं नव्हतं. इब्लिसनं एरवी अखिलीसला हिंगललं नसतं. परंतु प्रश्न जतीन यांच्या आयुष्याचा होता. इब्लिसच्या डोक्यात नक्की काय शिजत होतं...???

# १५. आगमाग...

"इब्लिसच्या साथीदारणीचं नांव काय होतं रे?" गोलाएथनं रिकार्डोला विचारलं.

दोघांनी रिकार्डोच्याच एक विश्वासू माणसाच्या झोपडपट्टीत आसरा घेतला होता. ज्याची मदत घेतली, तो या झोपडपट्टी एरियाचा मुखियाच. त्यामुळं अख्खी झोपडपट्टी त्यांच्या मदतीस कधीही धावून येणाऱ्यातली होती.

जोनाथन आणि गोलाएथची जबाबदारी पडल्यावर धाडस करून रिकार्डो क्रिमिनल्सचा मॅनेजर म्हणून काम करू लागला. परंतु कोणाच्या दावणीला नाही. ज्याला जो माणूस, जी मदत हवी, ती उपलब्ध करून देणं आणि त्याचा मोबदला घेणं. खिशात चांगला पैसा खेळतो, शिवाय गुन्ह्यात प्रत्यक्ष गुंतवणूक नसल्यानं जीवाला अधिकचा धोका नाही. त्या याच कार्यानं त्याच्या सिगांत ओळखी पसरल्या होत्या.

गोलाएथचं विचारणं कानी शिरताच रिकार्डोचा दारूचा घोट घशातच अडकला. तो ठसकला. वेड्यागत खोकत सुटला. बऱ्याच काळानं त्याच्या नशिबी देशी आली होती. जोनाथन सुपाऱ्या वाजवू लागल्यापासून रिकार्डोला चांगला हिस्सा मिळत होता. रिकार्डोनं तेव्हापासून फक्त इंग्लिश ब्रँड चालू केला होता. त्याचा खून झाला आणि ही गोष्ट गोलाएथला कळल्यापासून त्याच्या सोबत नुसती धावपळ चालू होती. नीट निवांत पिणं त्याच्या दैवी आलं नव्हतं.

आणि जे काल-तांडव गोलाएथकरवी त्यानं पाहिलं होतं व त्यानंतर त्या रक्ता-मांसांच्या लगद्यांना पोलीस स्टेशनला पोहोचवावं लागलं होतं त्यानंतर ही

चपटीच 'मच निडेड' होती. यासाठी इंग्लिश काही उपेगाची नव्हती! देशीनेच या घृणेचा व गलिच्छतेचा निचरा होणार होता. तो उग्र, घाणेरडा वास देशीच्या उग्रतेनंच दूर सारला जाणार होता. म्हणून त्यानं कशीबशी ती मिळवली होती. आणि ती घेत असतानाच गोलाएथचा हा अकस्मात प्रश्न.

हा... म्हणजे हेलीचा जीव तो घेऊ इच्छित असल्यानं ते इतकं अनपेक्षित नव्हतं. पण आत्ताच एवढं मोठं कांड करून वर पोलीस मागावर यमासारखे असतील असं असताना गोलाएथ हे धाडस करू पाहत होता. आणि त्यात पुन्हा आपल्यालाच साथीला घेऊन... ही कल्पना त्याचा श्वास रोखणारी होती. ठसका लागण्याचं हेच कारण!

"ह... हेली..." तो ठसकतच बोलला.

त्यानं तोंडातील दारू आणि लाळ ओकून दिली.

"शोधून काढ!" गोलाएथ थंड अंतःकरण व चपट चेहरा ठेवून बोलला.

काही तरी सल्ला द्यायला रिकार्डोचं तोंड उघडणारच होतं, पण तत्पूर्वीच...

"काही बोलू नको! सांगितलेलं काम कर!" मन मनकवडा होऊन ओळखत गोलाएथ त्याला म्हणाला.

ऐकणं भाग होतं. न ऐकून सांगणार कोणाला होता... एका श्वासात आख्खीच्या आख्खी चपटी पोटात रिती करून तो जुन्या कोंदट बस्तीतल्या झोपडीतून सरळ निघाला. सरळच; कारण आता गोलाएथच्या पुढच्या करणीची कल्पना चित्र डोक्यात घोळत असल्यानं देशी त्याला चढणार नव्हती!

◆◆◆

शार्दूल टेंशनमध्ये होता. त्याला राजनच्या खुर्चीवर तातडीनं बसवण्यात आलं होतं. अचानकच एक निर्णयपत्र आलं आणि शार्दूल सिनियर इन्स्पेक्टरचा डीएसपी झाला होता.

असं करून राजकारणी जवाबदेहीचं ओझं त्याच्यावर टाकून मोकळं झाले होते.

राजन व त्याच्या टीमच्या मृत्यूचं कारण व त्यामागील गुन्हेगार शोधण्याची महत्त्वाची कामगिरी देखील त्याच्यावरच सोपवण्यात आली होती. तात्त्विक मतभेद असूनही इतके दिवस ज्याला आपला आदर्श मानून, ज्याला समोर ठेवून शार्दूल कार्य करत आला, त्याच्याच खूनाची चौकशी करण्याचं दुर्भाग्य शार्दूलच्या भाळी आलं होतं. हा! मतभेद होते. पण ते वैचारिक, सैद्धांतिक. राजन जाधवच्या हेतूबद्दल त्याला कधीच शंका नव्हती. त्यामुळं शार्दूल राजन बद्दल अपार आदर बाळगून होता. त्याचा खून झाला आता, त्याला वाचवण्यासाठी आपण काही करू शकलो नाही आणि आता त्याच्याच खुर्चीवर आपण बसलो आहोत ही अपराधी भावना त्याला खात होती. तो यामुळं जास्तच उद्विग्न होऊन गेला होता.

पर्याय तर काही दिसत नव्हते. एका भल्याशा भिंतीसमोर येऊन थांबल्यागत त्याला झालं होतं. त्या भिंतीला धडका दिल्या, तरी त्याला तडा जाणार नव्हता. एकदम 'डेड एन्ड!'

संशयाच्या बळावर त्यानं अखिलीसला अटक केली असती, पण पुढं काय?

या सगळ्यांतून त्याला अलगद बाहेर काढण्यात आलं असतंच, किंबहुना ही केस फाईलच बंद झाली असती. कोणत्या तरी अतिरेकी संघटनेवर हे प्रकरण शिकवून सगळं शांत करण्यात आलं असतं. पुराव्या अभावी तो सुटला असताच शिवाय त्यानं आपला इन्फ्लुइन्स वापरून शार्दूलचं जीणं सुद्धा हराम करून टाकलं असतं. शार्दूलला हे नक्कीच नको होतं. तो काही करू शकत नव्हता, म्हणूनच त्यानं इब्लिसला पाचारण केलं होतं. आता जेव्हा तो राजनच्या स्लीव्ह्जमध्ये शिरला होता, त्याला राजनची इब्लिस बरोबर संबंध ठेवून असण्याची भूमिका कळू लागली होती.

या मागं कोण आहे याची कल्पना असून तो काही करू शकत नव्हता. कारण पुरावे नव्हते. ते गोळा करता येतील अशी परिस्थिती नव्हती. तशी ती ठेवण्यातच आली नव्हती. कोण तिथपर्यंत पोहोचवू शकेल असं हाताशी नव्हतं. इब्लिसला त्यानं यात सामील केलं होतं खरं, पण तोही असा अघोरी! मद्य प्यायलेला माकडाच्या हाती आपण कोलीत तर दिलं नाही ना? ही विवंचना डोक्यात एकीकडे. तर इब्लिसच मोठी समस्या होणार नाही ना ही एक वेगळी डोकेदुखी! मुठीनं माथा आपटत तो त्या 'काटेरी' भासणाऱ्या अधिकारी खुर्चीवर बसला होता.

प्रिंट, टेलिव्हिजन, सोशल, डिजिटल सर्व प्रकारचा मीडिया मसाल्यासाठी मागावर होताच. सरकारला देखील उत्तर देणं त्याच्यावर येऊन पडलं होतं. सरकारनंच त्याला भरीस घातलं होतं. एवढं कमी की काय म्हणून राजन व मृत साथी ऑफिसर्सच्या कुटूबियांना सांभाळणं, सावरणं ही मोठी जबाबदारी पण त्याच्यावर येऊन पडली होती. त्यांच्या प्रश्नांना उत्तरं देणं ही जटिल जिम्मेदारी

त्याची होऊ  बसली होती. जे झालं, त्यात त्याची काही चूक नाही हे ध्यानात न घेता मृत अधिकाऱ्यांचे काही कुटुंबीय त्याला दोषी ठरवत होते. परंतु त्यांचा हा दोषारोप हा त्यांच्या पहाडाएवढ्या दुःखाची उपज आहे हे समजून तो त्या मृत ऑफिसर्सच्या घरातील लोकांना आपल्याच कुटूंबाचा भाग समजून तो त्यांची विषारी दूषणं विषधरासारखी पचवत होता.

काही करता न हेण्यासारखं असल्यानं तो बसून होता. त्याची ती केबिन भयाण शांत होती. त्या शांततेत त्याचा सरकारी लँडलाईन घणाणला. त्याची तंद्री भंगली. हडबडीतच त्यानं फोन उचलला. फोन 'स्टेट होम मिनिस्ट्री'तून होता. तेही होम मिनिस्टरचे पर्सनल असिस्टंट बोलत होते. विद्यमान गृहमंत्री बोलणार आहेत अशी त्यांच्याकडून सूचना वजा वर्दी देऊन त्याला होल्डवर ठेवण्यात आलं.

काही क्षणात स्वयं राज्याचे गृहमंत्री फोनवर आले.

"नमस्कार सुप्रीटेंडेंट साहेब." ते पलिकडून बोलले.

"जय हिंद सर!" तो खुर्चीतून उठून उभारला. आवाजात कसलाच उत्साह नव्हता.

"काही प्रोग्रेस?" तिकडून विचारलं आलं.

"काम चालू आहे सर." त्याचं गुळमुळीत उत्तर.

"तुमचा भार आता हलका होणार आहे." गृहमंत्री त्याला म्हणाले.

"माफ करा. मी समजलो नाही सर..." तो गोंधळून बोलला.

"केंद्रीय गृहखात्यानं चौकशी सीबीआयकडे सोपवण्याचं ठरवलं आहे." गृहमंत्री सहज बोलून गेले.

"नाही सर! माझ्याकडं काही लीड्स आहेत. लवकरात लवकर मी गुन्हेगारांना जेरबंद करीन!" तो अधीरतेनं बोलून गेला.

"पण... केंद्रातून हुकूम आलाय म्हंटल्यावर..." गृहमंत्री अगतिकता दर्शवत असतानाच...

"सर, राज्याच्या इच्छेविरुद्ध सीबीआय थेट येऊन तपास नाही करू शकत आता. तुम्ही थोडा वेळ काढलात, तर..." शार्दूल सुचवत होता.

गृहमंत्री हसले.

"अहो, दोन्हीकडे वेगळी सत्ता असली, की हजार कारणं काढता येतात. इथं तसं नाही. काय सांगून केंद्राला अडवू?" ते म्हणाले.

"एक... पंधरा दिवस द्या अशी मी विनंती करेन सर. या दरम्यान माझ्याकडून काही झालं नाही, तर केंद्राचा निर्णय मला मान्य असेल. प्लिज सर..." शार्दूल विनंती करत होता,

"दिवंगत सुप्रीटेंडेंट सर हे मला गुरुस्थानी होते. त्यांना न्याय मिळवून देऊ शकलो नाही, तर तो माझ्यासाठी मोठा कलंक ठरेल..." तो कळकळत बोलला.

"भावनेने राजकारण चालत नाही प्रशासनही चालू नये हा मी सल्ला देईन तुम्हाला." गृहमंत्री सहज बोलले.

"सर, जर आपण याचा छडा लावू शकलो, तर संपूर्ण श्रेय आपलं असेल. कदाचित आपलं पक्षातील प्रस्थ वाढू शकतं. केंद्रात चांगलं स्थान मिळू शकेल... कृपया याचा विचार करावा." शार्दूल गृहमंत्रीला मनवण्याच्या प्रयत्नात प्रस्ताव मांडल्यासारखं मुरब्बी बोलला.

गृहमंत्रीला हसूच आलं.

"हे काम तुमचं नाही फौजदार साहेब. राजकारण आम्ही करायचं. नसतं डोकं चालवून आगाऊ बोलू नका." गृहमंत्रींनी एक मोठा नि:श्वास सोडला,

"असो! तुम्ही याचनाच करताय म्हणून विनंती करून बघतो वर. पण दोन आठवडे नको. आठवड्यात काय ते आवरा." गृहमंत्री मान्य करत म्हणाले.

त्यांना शार्दूलचा प्रस्ताव पटला होता, पण ते मान्य केलं, तर ते राजकारणी कसले...?!

शार्दूलला जीव भांड्यात पडल्यासारखा झाला. त्यानं भरभरून धन्यवाद दिले. तिकडूनच प्रकरण लवकरात लवकर मार्गी लावण्याची आणखी एकदा ताकीद देऊन फोन कट करण्यात आला.

शार्दूलनं रिसिव्हर खाली ठेवलाच नाही. तसाच त्यानं इब्लिसला फोन घुमवला.

इब्लिस हेलीच्या रिपोर्टची आणि श्रीशाची वाट पाहत बसला होता. जतीन यांच्या जीवाचा प्रश्न त्यानं त्याच्या नजरेत तात्पुरता तरी सोडवला होता. डोकं थोडं

शांत झाल्यागत वाटत होतं. त्याचा मोबाईल वाजला. एसपी ऑफिसहून फोन. काही क्षण त्याला राजनचीच आठवण झाली. आता तो फोन करणार  नव्हता. हे ध्यानी यायला त्याला काही काळ गेला. शार्दूल असेल हे लक्षात येऊन त्यानं फोन घेतला.

"हा." एवढंच तो उद्गारला.

"गडबड करावी लागेल. काही लीड?" शार्दूलनं विचारलं.

"का? काय झालं?" इब्लिसचा प्रतिप्रश्न.

"सीबीआय येण्याची शक्यता आहे. ती आली, तर ही केस माझ्या हातून जाईल. आणि तुही वाचू शकणार नाहीस!" शार्दूलनं खुलासा केला.

"कधी?" इब्लिसचा मोजका शब्द.

"तूर्त आठवडा मी मिळवला आहे. त्यात सगळं मार्गी लावावं लागेल." शार्दूल गंभीर बोलला.

"खूप आहेत." इब्लिस तितकाच शांत बोलला.

"तुम्ही इतकं थंडपणे बोलताय, काही प्लॅन आहे का?" शार्दूलनं कपाळावर आठ्या उमटवत विचारलं.

"सॉर्ट ऑफ!" इब्लिस बोलला.

"आणि तुम्ही ते सांगणार नाही आहात. असंच ना." शार्दूल कठोरपणे खात्रीनं बोलला.

इब्लिस हसला.

"कायद्याच्या बाहेर जाऊन काही करू नका एवढं करा!" शार्दूल धीरगंभीर बोलला.

"तुमचं काय चालू आहे?" इब्लिसनं विचारलं.

"सध्या भिंतीवर डोके आदळतोय." शार्दूल खिन्न बोलला.

"तुम्ही राजन यांच्या लास्ट लोकेशनला जाऊन बघितलं?" इब्लिसनं विचारलं.

"हं. बरेच मर्सिनरीज तिथं मेलेले भेटले. त्यांच्या एमपी फाईव्ह मधूनच निघालेल्या गोळ्यांनी आमचे ऑफिसर्स मारले गेलेत." शार्दूलनं बातमी दिली.

इब्लिसला काही लख्ख चमकल्यासारखं झालं.

"मर्सिनरीज?" तो उद्गारला.

"हो. का?" शार्दूल जरा सावध झाला.

"जर ते मर्सिनरीज असतील, तर राजनला मारण्याची कोणीतरी त्यांना असाईन्मेंट दिली असणार. त्यांची बँक डिटेल्स किंवा तत्सम काही चेक केलं? क्रिप्टो वगैरे? शेअर्स, बॉण्ड्स, लिक्विड मनी कशानं तरी पेमेंट झालंच असेल! ज्या ज्या माध्यमातून पेमेंट होऊ शकते त्या सर्व शक्यता शोधून बघा. जर त्यांना कोणाकडून पेमेंट झालंय हे समजलं, तर आपल्याला जी व्यक्ती हवी, ती त्यात सापडू शकते. नाही?!" आणि तो हसला; मनमोकळा.

"अरे हा..." शार्दूलला पण एक प्रकाशबिंदू सापडला. त्यामार्गे आता तो पुढे जाऊ शकत होता.

"थँक्स! वी आर वर्किंग ऑन थिस. आपण सुचलेले पॉईंट्स पण ध्यानात घेतो." शार्दूल कृतज्ञता व्यक्त करत म्हणाला.

इब्लिसनं अजूनही काही गोष्टी सुचवल्या, त्याला वाटणारी चिंताही बोलून दाखवली, तो म्हणाला,

"ते इथं आले कसे, का इथलेच होते. हे कळालं, तर त्यांना कुणी हायर केलं हेही कळेल. त्यांचे आयडीज, क्रिमिनल रेकॉर्ड्स वगैरे चेक करा. सर्व्हीलीयन्समध्ये कुठं कॅप्चर झालेत का बघा. इतके आलेत होते, म्हंटल्यावर त्यांतील कोणी कुठे ना कुठे स्पॉट झालेले असू शकतात. शिवाय तिथंच संख्येने जास्त होते, तर आणखी असण्याची पण शक्यता आहे. तेही बघायला हवं. कारण युद्धजन्य परिस्थिती उद्भवली, तर शहरासाठी खूप मोठी समस्या उभा राहू शकते." त्यातही त्यानं काळजी व्यक्त केली.

"याह राईट!" शार्दूल चिंतेनं एक्साईट होत उद्गारला.

त्यानं फोन ठेवला. आता त्याच्या शरीरहालचालींना वेगळीच गती प्राप्त झाली होती. त्यानं आपले विश्वासू ताबडतोब केबिनमध्ये बोलावले...

◆◆◆

श्रीशा तिचा पाठलाग होऊ नये याची दक्षता ठेवून इब्लिसकडं आली होती.

"या मॅडम!" इब्लिस तिला म्हणाला.

"काय काढलंस आता?" ती अजून पण तडकूनच होती.

इब्लिसनं पैशाची बॅग तिच्याकडं सरकवली. एक 'डेझर्ट ईगल' व बुलेटप्रूफ व्हेस्ट टेबलच्या मोठ्या खणातून काढून तिच्यासमोर बॅगवरच टाकलं.

"गिअर अप! आपल्याला एक मोठं युद्ध लढायचं आहे!" तो तिला शांत म्हणाला.

ती पाहतच राहिली, एकदा त्यानं पुढं टाकलेल्या वस्तूंकडं व एकदा इब्लिसकडं...

"काय चाललंय कळेल का?" ती टेन्शनमध्ये येऊन बोलली.

"मी सांगते!" हेलीचा आवाज आला.

श्रीशानं व इब्लिसनंही तिच्याकडं पाहिलं. हेली पर्सनल प्रोटेक्टीव्ह इक्विपमेंट् सूट घालूनच बाहेर आली होती.

"ही...?" श्रीशा विचारत होती.

"माझी नवीन असिस्टंट, हेली." इब्लिस बोलला.

"ओह्..." श्रीशाचा उद्गार.

"बोल." इब्लिस हेलीला म्हणाला.

उकडत असल्यानं हेलीनं ते प्रोटेक्शन किट आधी उतरवलं.

"अजून बरंच काम बाकी आहे. पण इतकं कळलं, की हे एथनिक बायोवेपन एक्चुअली रिव्हर्स काम करतं." हेली म्हणाली.

"म्हणजे? आपल्याला मिळालेली माहिती चुकीची आहे?" इब्लिसनं गोंधळात पडून विचारलं.

"चुकीची म्हणता येणार नाही. पण समजण्यात गल्लत नक्कीच झाली आहे. मेबी ज्यानं सांगितलं आहे त्याची, किंवा तुझी. किंवा कोणाला खरं काय ते माहीत देखील नसेल." हेली बोलली.

"हिटलरच्या सिक्रेट डॉक्युमेंट्समध्ये याची नोंद आहे. ती चूकीची कशी असेल?" इब्लिसनं प्रश्न उपस्थित केला.

"त्यात फक्त एथनिक बायोवेपनचा उल्लेख असणार. ते नक्की कसं वर्क करतं याच्याबद्दल सविस्तर माहिती लिहिली गेली नसणार." हेली म्हणाली.

"ओके. त्यात नक्की सापडलंय काय?" त्यानं विचारलं.

"हे बायोवेपन एक ठराविक जिनोमवर अटॅक करत नाही. तर एक ठराविक जिनोम सोडून सर्व जिमोम्सवर अटॅक करतं!" हेलीनं शब्दस्फोट केला.

हे ऐकून श्रीशा चांगलीच धास्तावली.

"याचा अर्थ... ठराविक जीनची या बायोवेपनला ओळख करून दिली, तर तो वंश सोडून इतर सर्व वंश नष्ट होऊ शकतात?" धोका लक्षात येऊन ती भीतीनं विचारत होती.

"हो." हेली एक शब्दात म्हणाली.

"हे... हे होरीबल आहे. इब्लिस! तुला हे कोठून मिळालं? काय चाललंय? काही समजेल का?" श्रीशा चांगलीच उद्विग्न झाली होती. दडपण तिचं सूंदर मुखमंडल व्यापून गेलं होतं.

"कुठून, कसं हे नाही सांगणार. पण हेच कुणाच्या हाती पडू नये म्हणून कदाचित आपल्याला एक मोठं युद्ध लढायचं आहे. असं समज, की आपल्याला

जितक्या ह्युमन रेसेस आहेत त्या नष्ट होण्यापासून वाचवायच्या आहेत. तू मागे हटणार नाहीस ही खात्री बाळगूनच तुला बोलवलंय!" इब्लिस खात्रीशीर बोलला.

"तुझ्यासाठी काहीही. तुला माहीत आहे!" श्रीशा शांत होत म्हणाली,

"आणि आता तर प्रश्न मानवजातीचा आहे!" ती शून्यात पाहत गंभीर बोलली.

अचानक या भीषण माहितीचा स्फोट झाल्यानं श्रीशा थोडीशी भयभीत झाली होती. आता मूळ शूर स्वभावाची ती स्थावर होऊ लागली,

"तू मघाशी हिटलरचा उल्लेख केलास. या एथनिक बायोवेपनचा आणि हिटलरचा काही संबंध आहे का?" श्रीशानं प्रश्न केला.

"आहे. त्याच्यासाठी काम करणाऱ्या मायक्रो बायोलोजिस्टनी हिटलरच्या मागणीवरून हा जिवाणू बनवला होता म्हणे. हिटलरचा स्व-वंशाभिमान आणि पर-वंशद्वेष किती पराकोटीचा होता हे सगळेच जाणून आहोत." इब्लिस म्हणाला.

"हा... तो जर्मन लोकांना शुद्ध रक्ताचा आणि बाकीच्यांना अशुद्ध रक्ताचा म्हणायचा. मग काय तो आपले लोक सोडून बाकीच्या लोकांना नष्टच करणार होता की काय?" श्रीशा आश्चर्यानं बोलली.

हे ऐकून इब्लिस वेड्यासारखा हसू लागला. मास्कच्या मशीनमध्ये तो आवाज घुमल्यानं तो जास्तच विकट घुमू लागला.

श्रीशाला समजेचना, की याला अचानक झालं तरी काय? हेलीला त्याच्या हसण्याचा अर्थ उमगला होता. त्यामुळं तिच्या चेहरा निर्विकार होता. श्रीशानं भिवया उडवून 'याला काय झालं?' असं इशाऱ्यानंच तिला विचारलं. तोच स्वतःला सावरत मग इब्लिसच बोलला,

"असली उठाठेव करणाऱ्या हिटलरला हे माहीत नसेल, की तो ज्या रक्ताला शुद्ध म्हणायचा ते त्याचं स्वतःचं तसं नव्हतं!" आणि तो फिस्कारत हसला.

श्रीशा अजूनचं गोंधळात पडली. पेचात पडलेल्या तिला समजावण्याची जिम्मेदारी मग हेलीनं उचलली,

"हिटलर स्वतःला आर्यन समजायचा. म्हणूनच त्यानं त्याच्या मायक्रो-बायोलोजिस्ट आणि जिनीटिसिस्ट्सकडून हा जिवाणू तयार करून घेतला असणार! पण तो पूर्णपणे आर्य वंशाचा नव्हता." हेलीनं संक्षेपात समजावलं.

"थोडक्यात या बायोवेपनचा त्या काळी वापर झाला असता, तर स्वतःला उच्च वर्णाचे आणि शुद्ध रक्ताचे समजणारेच त्यात मेले असते. कारण हिटलर पूर्णपणे त्यांच्या वंशातून येतच नव्हता. असंच ना." श्रीशानं खात्री म्हणून विचारलं.

"होय." इब्लिस खुदकतच बोलला.

"काही वर्षांपूर्वी हिटलरच्या वंशजांची डीएनए टेस्ट केली गेली होती. त्यात स्पष्ट झालं होतं, की त्यांच्या आणि पर्यायानं हिटलरच्या पूर्वजांचा उत्तर आफ्रिकेशी आणि महत्त्वाचं म्हणजे ज्यूईश कम्युनिटीशी संबंध होता. त्यांच्या डीएनएत 'हेप्लोग्रुप इ वन बी वन बी' हा एक वाय-क्रोमोसोमचा प्रकार समोर आला, जो आनुवंशिक दृष्ट्या ज्यू आणि उत्तर आफ्रिकन गटांमध्ये सामान्य आहे. जर्मनी आणि उर्वरित पश्चिम युरोपच्या स्थानिक मूळ निवासी लोकांमध्ये 'हेप्लोग्रुप इ वन बी वन बी' सापडणं मात्र दुर्मिळ आहे. साधारण सव्वीस हजार वर्षांपूर्वी हे लोक आफ्रिकेतून युरोपमध्ये स्थलांतरित झाले होते." हेलीनं अधिक स्पष्टीकरण केलं.

"थोडक्यात तो ज्यांचा सगळयात जास्त द्वेष करत होता, बहुदा तो त्यांच्यातलाच एक होता. अशुद्ध रक्ताचा! अनार्य!" इब्लिस आपलं अंडरवर्ल्डनं दिलेलं नांव सार्थ करत असुरी हसला.

"हे त्याला कळालं असेल, का? म्हणजे म्हणूनच त्यानं हे बायोवेपन कधी वापरलं नाही..." श्रीशानं आपली शंका बोलून दाखवली.

"असू शकेल. आपण नक्की काही सांगू शकत नाही." इब्लिस म्हणाला.

"एक्चुअली त्याला कल्पना होती, पण त्याला ते मान्य नव्हतं!" हेलीनं इब्लिसला टोकलं व तिनं तिच्या मताचा खुलासा केला,

"त्याचे आजोबा हे ज्युईश असल्याची शक्यता त्याचा वकील असणाऱ्या हॅन्स फ्रॅंक याने लिहून ठेवली आहे, हिटलरनेच त्याच्या या वकिलाला त्याच्या पूर्वजांची माहिती काढण्यास सांगितले होते व सदर शक्यता त्याने हिटलरला कळवली देखील होती, बट हिटलर बिईंग हिटलर, ही डिनाईड इट. तो आपल्याच समजांवर ठाम होता! म्हणून मूर्खपणा करत त्यानं आपला आणि जीवास्त्राचा डीएनए कोड एकसारखा ठेवला. एकप्रकारे त्याचा डीएनए हा या जिवाणूला एक्टीव्हेट करण्यासाठीचा ट्रिगर आहे. तो स्वतःला आर्य, म्हणजे त्याच्या नजरेत शुद्ध रक्ताचा समजत होता. त्यामुळं त्या फाजील आत्मविश्वासानं त्यानं हा मूर्खपणा केला होता. त्याकाळी डीएनए टेस्ट करायची सोय आणि तशी टेक्नॉलॉजी असती, तर याबाबद्दल शंकाच राहिली नसती त्याला. त्याला त्याच्या डीएनए मागची व त्याच्या उत्पत्ती प्रवासाची माहिती सज्जड पुराव्यानं सिद्ध होऊन कसली शंका राहिली नसती." हेलीनं तर्कशुद्ध सांगितलं.

"आणि कदाचित त्याने हा मूर्खपणा केला नसता." इब्लिस आरामशीर बोलला,

"पण कदाचित आपण ज्यांचा अशुद्ध म्हणून द्वेष करतो, त्यांच्यातलेच एक आहोत या गोष्टीने तर तो अजून चवताळला असता, ज्यूजचा तो इतका तिरस्कार करत होता, की त्यांना मारण्यासाठी त्याने इतर काही पर्याय वापरलेच असते. आणि तसे ते वापरलेत ना त्याने, गॅस चेंबर वगैरे उदाहरणं आहेतच की!" आणि हे बोलून इब्लिस थांबला.

"आणि तरीही त्याने सगळे पुरावे धुडकावून लावून हा जिवाणू एक्टीव्हेट केलाच असता, तर त्यानं ज्यांच्यासाठी आपण लढा उभारला आहे असं आभासी चित्र उभा केलं होतं, त्यांनाच आजनतेपणे मारून तो मोकळा झाला असता?" श्रीशानं शंका उपस्थित केली.

"राईट!" हेली उसासा टाकत बोलली.

आता ती थकली होती. आधीच अशक्त त्यात उभारून इतकावेळ काम केलेलं. ती एका चेअरवर विसावली.

"म्हणूनच त्यानं कधी हा वापरला नसेल. हो ना? कारण या बायोवेपननं त्यानं जर्मनीच्या स्वतःला आर्यन म्हणवणाऱ्या लोकांनाच हेकेखोरपणानं मारलं असतं, तर त्यानं कुणावर राज्य करण्याचं स्वप्न बघितलं असतं? कुणाला अज्ञानात ठेवून उच्च वंशवर्ण आणि शुद्ध रक्ताचा हवाला देऊन आपले अंधभक्त बनवलं असतं आणि मूर्ख बनवून ठेवलं असतं...?" श्रीशाची अजून एक हिटलरची खिल्ली उडवणारी उत्सुकता.

"मी मघाशी म्हंटल्याप्रमाणं त्याला आपण आर्यवंशीय नाही हेच मान्य नव्हतं. त्यामुळे त्यानं कदाचित हे बायोवेपेन वापरलंच असतं. इतिहासात असं काही नक्कीच घडलं आहे, की त्याला या बायोवेपेनचा वापर करण्याची संधीच मिळाली नसावी. कारण तसं असतं, तर आज जर्मनीचाच काय पण कदाचित संपूर्ण जगाचा इतिहास पूर्णतः वेगळा असता!" हेलीनं विचार बोलून दाखवला.

"बेसिकली, हिटलरनं या बायोवेपनचा वापर केला असताच, तर जर्मन् आर्यन्स तर मेले असते, परंतु स्वतः हिटलर आणि तो तिरस्कार करत असलेले मूळचे त्याच्याच डीएनए ओरिजिनचे ज्यू व आफ्रिकन लोकं वाचली असती. हिटलरला हे समजलंच असतं, की तो ज्यांचा द्वेष करतो, तो त्यांच्यातीलच एक आहे. यामुळं त्यानं अशातही स्वतःला गोळीच घालून घेतली असती. नाही तर मग याच लोकांनी हिटलरला ठेचून मारलं असतं. इन शॉर्ट, हिटलरचा दुर्दैवी अंत कोणत्याही प्रकारे अटळच होता!" इब्लिसनं विषयाची सांगता केली.

"पण इतक्या कमी वेळात तू या जिवाणू विषयी एवढी माहिती काढलीस! इम्प्रेसिव्ह. तरीच इब्लिसनं मी गेल्यावर तुला त्याचा सगळा कारभार हाताळू दिला. हं?" श्रीशा हेलीचं कौतुक करत म्हणाली व पुढे बोलली,

"पण ही जादू केलीस कशी? ही एवढीशी माहिती शोधून काढायला आणि तेही फक्त या जिवाणू वरून... कित्येक महिने, नाहीतर वर्षं सुद्धा लागली असती."

"हा जिवाणू एक बायोवेपन आहे व तो ठराविक जीन्सवर अटॅक करतो आणि एक संपूर्ण वंश नष्ट करू शकतो हे मला इब्लिसनं सांगितलं होतं. त्यामुळं तो कोणत्या लिनीएज ग्रुपला घातक आहे हे समजलं, तर या मागं कोण आहे हे पाहता येईल आणि शक्यतर या जिवाणूंचा विस्फोट झालाच, तर तो प्रिव्हेन्ट करता

येईल हा विचार मनात आल्यानं मला आधी त्या जिवाणूचा डीएनए कोणता आहे बघून त्याला जगभरातल्या डीएनए रेकॉर्ड्सशी पडताळून बघायचं होतं. म्हणून हे कमी वेळेत झालं.

"मिळाली तेवढी तरी माहिती तात्पुरती इब्लिसला द्यावी म्हणून बाहेर आले, तर चर्चेत हिटलरचं नांव आलं. बाकीच्याही गोष्टी मग आपसूकच इंटरकनेक्टेड् होत क्लिअर होत गेल्या. त्यानं आपला डीएनए आणि त्या बॅक्टेरियाचा डीएनए कोड एक ठेवला, कारण त्याला वाटलं, आपले लोक सोडले, तर इतर वंशातील लोक या बॅक्टेरियानं मरून जातील. यामार्फत त्याला जर्मन लोकांसमोर त्यांची रेशीयल हायरार्की सिद्ध करता आली असती. शुद्ध रक्ताचे आर्यच फक्त त्या जिवाणूंच्या विस्फोटात जगतील आणि मरेपर्यंत त्याला त्यांच्यावर आणि जगावर राज्य करत बसता आलं असतं असा काहीसा प्लॅन असावा त्याचा...

"पण त्यानं वास्तवात याचा युज केला असता, तर परिणाम उलटा झाला असता. जगभरातील 'हेप्लोग्रुप इ वन बी वन बी' हे जेनेटिक मटेरियल असलेले लोक सोडून सगळेच मेले असते.

"स्वतःला सवर्ण व शुद्ध समजणारे जर्मन्सही त्याच्या या एका अविचारी पावलानं नामशेष झाले असते." ती थोडं थांबली, जणू तिला काही अचानकच सुचलं असावं. मग डोक्यात आलेला विचार तिने बोलून दाखवला,

"नाहीतर असंही असेल, की आपला ज्यूईश लोकांशी काही संबंध नाही हे सिद्ध करण्यासाठी त्याने हा बायोवेपेन हट्टाने तयार केलेला असू शकतो. ज्यूईश लोक जर या वेपेनने मारले गेले आणि तो जिवंत राहिला, तर ते आपसूक सिद्ध

होणार होते, आणि जर्मन्स जरी मारले गेले असते, तरी त्याचे थोडीच काही बिडघडणार होते? शेवटी अशा आत्ममुग्ध लोकांना कधीच कोणाची काही पडलेली नसते, त्यांना फक्त आपला हेका साध्य करायचा असतो!" हेली आपली कार्यपद्धती विदित करून पुढे बोलत असताना तिची तिरकी नजर इब्लिसवर रोखली होती, जणू ती बोलत जरी हिटलरबद्दल असली, तरी ती इब्लिसलाच उद्देशून बोलत होती. इब्लिसला देखील तिचा खोचकपणा व तिने केलेली त्याची चेष्टा उमगली.

"ब्रिलीयंट आहे की नाही!" इब्लिस हेलीकडं मान उडवून खिजवत श्रीशाला विचारलं.

"तुझ्या सगळ्याच असिस्टंट ब्रिलीयंट असतात!" श्रीशा त्याला टोमणा मारत म्हणाली व तिने इब्लिसची मस्करी करत स्वतःच स्वतःची स्तुती केली.

"मग आता ही हुशारी साबित करा. दोघी मिळून या बॅक्टेरियाचा ड्युप तयार करा! सर्व कॅरेक्टरीस्टिक्स सेम असू देत." त्यानं दोघींना मिळून आदेश फर्मावला.

दोघीही जीवशास्त्रात उच्च पदवीधर होत्या. प्रयत्न केल्यास त्यांना ते जमलंही असतं. या विचारानं इब्लिसनं काहीतरी योजलं होतं नक्की. पण हे इतकं सोपं नव्हतं.

"कित्येक दिवस... कदाचित महिने... जातील..." श्रीशा सत्यस्थिती अवगत करत म्हणाली.

इब्लिस जे काम सांगतो, ते का, कशासाठी हे विचारण्याची सोय केव्हाच नसायची. म्हणून दोघींनी ते विचारलं नाही. पण येणारी समस्या इब्लिसला अवगत करून देणं तर क्रमप्राप्त होतं... म्हणून ती बोलली होती.

"मला अंदाज आहे. तरीही कामाला लागा!" त्यानं सुनावलं.

त्याचा डोक्यातील खुराफात दोघींनाही अचब्यांत टाकणारी होती. त्याची योजना दोघींच्या मिळूनही ध्यानात नाही आली. त्या त्याच्याकडं फक्त पाहत राहिल्या. हे करण्यामागं त्याचा हेतू काय? काय करणार होता तो याचं? ते असो... आहे तो एक जिवाणूंचा सेट नष्ट करायचं सोडून याला आणखी एक सेट हवाय...? दोघीही कोड्यात! वेडा झालाय का हा...???

# १६. कोळीष्टक...

"काय खबर?" गोलाएथचा दमून आलेल्या रिकार्डोला सवाल.

रिकार्डो आधी विसावला.

"माझ्या काही माणसांना दवाखान्यात पाठवलं होतं. ती पोरगी तिथं नाही! इब्लिस तिला घेऊन गेलाय म्हणं." रिकार्डोनं सांगितलं.

निजलेला गोलाएथ उठून बसला.

"कामं सोपी करायला जायची तर अशा अडचणी येतात." तो निवांत बोलला.

"तिला शोधण्याचं काम चालू आहे." रिकार्डो उसासा टाकत बोलला.

"ती घावायला पाहिजे!" गोलाएथनं रिकार्डोच्या डोळयांत तीक्ष्ण डोळे घालत ठासून सांगितलं.

रिकार्डोनं त्याच्याकडं पाहिलं. काळीज जळल्यासारखं त्याला वाटलं. त्याचं ते रूप पाहून त्याला धडकी भरली.

दरम्यान गोलाएथला एक युक्ती सूचली. त्याचे डोळे मोठे होत गेले. ते मोठाले डोळे पाहून रिकार्डो जास्तीच टरकला.

"या इब्लिसला बघितलाय असा कुणी आहे? चेहऱ्यावर तो कसला मास्क बिस्क घालतोय म्हणं?" त्यानं रिकार्डोला विचारलं.

"त्याला बघणारा जिवंत राहत नाही असं म्हणतात." रिकार्डोनं खुलासा केला.

"गुन्हेगार सोडून कोणी तरी त्याला बघितलं असेलच की." गोलाएथनं सुचवलं.

"माझ्या माणसांना विचारून बघतो. बघू, काही समजतंय का." रिकार्डो निरुत्साही बोलला,

"तुझ्या डोक्यात शिजतंय काय?" त्यानं धसकत विचारलं.

"हेलीला बिळातून बाहेर काढायचंय!" गोलाएथ कारस्थानी हसला.

त्याचं असं हसं बघून रिकार्डोचं अंतःकरण जास्तच खोल, जड होत गेलं...

◆◆◆

दोन दिवस निघून गेले. सात दिवसांतील दोन दिवस वाळूसारखे निसटून गेले होते. डोक्याचा भुगा होत होता शार्दूलच्या. न खाता-पिता, झोपेची उसंत न घेता तो कामात बुडून गेला होता.

आताही शार्दूल त्याच्या केबिनमध्येच बसून जमा झालेले पुरावे खंगाळत होता. अशातच त्याच्या केबिनमधील लाईनलँडवर एक कॉल आला. त्याला बोलण्याची संधी नव्हती. बोलणाऱ्यानं त्याला एका ठराविक जागी बोलावण्यासाठी म्हणून कॉल केला होता.

"तुमचा बॉस मेला त्या ठिकाणी या! तुम्हाला तुमचा गुन्हेगार मिळून जाईल!" पलिकडचा गडद आवाज बोलला.

"कोण आहेस तू?" शार्दूलनं उत्तेजित होऊन जोशात विचारलं.

"तोच! ज्याला तुम्ही शोधताय! एकटा येऊ नको! इब्लिस मला तिथं पाहिजे. दुसरं कोणी नाही आलं, तर उत्तम!" आणि काही प्रतिक्रिया न ऐकता फोन कट झाला.

शार्दूल सावध झाला. त्यानं सर्वप्रथम नियंत्रण कक्षाशी संपर्क साधून आलेला नंबर ट्रेस करण्याची कामगिरी दिली. काही मिनिटांतच त्याला रिपोर्ट करण्यात आलं.

एग्जॅक्ट तेच लोकेशन!

शार्दूलनं तुरंत इब्लिसला फोन फिरवला. त्याला घटना विदित करून त्या ठिकाणी पोहोचण्यास सांगितलं. इब्लिसला काही बोलू देता त्यानं फोन बंदही केला. इब्लिस येणार हे त्याला ग्राह्यच होतं म्हणूनच तो त्याच्या संमतीची व प्रतिक्रियेची वाट पाहत बसला नाही.

इब्लिसला लोकेशन सेंड करून तो तातडीनं बाहेर पडला. खुर्चीला असलेला ओव्हरकोट त्यानं खसकन इतक्या जोरात ओढला होता, की त्याची खुर्ची जागीच गोल फिरू लागली होती. पळत असताना आपलं केबिन लॉक करायचंही त्यांच्या लक्षात आलं नव्हतं.

इब्लिस त्याच्या ठिकाणाच्या जागी बसून होता. त्याचे डोळे सूर्योदयच्या सीसीटीव्हीतून प्रसारित होणाऱ्या सजीव चलत्चित्रांवर लागून होते. तिथलं एक कनेक्शन जतीन यांच्या नकळत त्यानं आपल्याकडं घेतलं होतं. जतीन यांना कळू न देता हे केलं असल्यानं ही कृती चुकीची होती खरी, पण ते त्यांच्याच सुरक्षेसाठी होतं. या विचारानंच त्यानं हा आगाऊपणा केला होता.

हेली, श्रीशा यांना समजू नये ही काळजी घेत तिथल्या स्क्रिन्स ऐवजी तो त्याच्या पर्सनल टॅबवर ती हलती चित्रं बघत बसला होता. दोन दिवस तो हे लक्ष ठेवून होता इतक्यांत तिथं कसलीच अस्वाभिकता नव्हती. इब्लिस त्यामुळं जरा निवांत होता. परंतु गाफील नक्कीच नव्हता तो!

शार्दूलच्या कॉलवर तो विचार करत होता. इब्लिसचा मोबाईल वाजला. लोकेशन आलं होतं. तिकडं तिरकी नजर टाकून त्यानं आपली नजर हटवली व पुन्हा सूर्योदयच्या लाईव्ह सीसीटीव्ही फुटेजवर स्थिरावली.

राजन व इतर साथीदारांच्या मृत्यूनं शार्दूल इतका उतावळा झाला होता, की त्याच्या कृती त्यानुसार होत होत्या. त्याचा अविचार होत नसला, तरी सारासार विचार देखील त्याच्याकडून होत नव्हता हे इब्लिसला समजलं होतं. इब्लिसला अशी घाई करणं रास्त वाटत नव्हतं. शार्दूलनं ऐकून कुठं घेतलं होतं पण...? तो तर आता निघालाही असेल तिकडं. तो तिथं संकटात सापडला, तर...? त्याला वाचवण्यासाठी इब्लिसला तिकडं जाणं भाग झालं होतं.

तो मोबाईल घेऊन उठला. हेली आणि श्रीशाला त्यांचं काम पूर्ण करण्याची आणि काही झालं, तरी इथून बाहेर न पडण्याची ताकीद करून तो आपल्या गाडीत बसला...

◆◆◆

"नो! नो! मिस्टर लिओनहार्ड. आय एम वर्किंग ऑन ईट. आय टोटली रियालाईज इट्स टेकिंग टू मच टाईम. बट ट्राय टू अंडस्टँड. आय वॉन्टेंड टू सेटल

थिस सायलेंट्ली, बट थिंग्स सॅड्ली गॉट आउट ऑफ हँडस. अँड द वर्स्ट पार्ट इज, आय गॉट द इन्फॉर्मेशन दॅट, द सेंट्रल गव्हर्नमेंट ऑफ इंडिया इज गेटिंग इन्वॉल्व्ह्ड् इन थिस मॅटर्. जस्ट बिअर् विथ मी अँड गिव्ह मी फ्यू डेज. द थिंग् यु वोन्टेड इज निअर्ली इन माय हँड्स. जस्ट... जस्ट वेट फॉर् द राईट टाईम." मोठ्या कसोशीने अखिलीस पलिकडच्या जर्मन फेडरल चान्सलरला समजावण्याची चेष्टा करत होता.

व्हिडीओ कॉलवर असणारा तो फेडरल चान्सलर अगदीच रागात दिसत होता. अखिलीस त्याचा मित्र होता हे खरं, पण त्याच्याही काही महत्वाकांक्षा होत्या. हे कार्य साध्य नाही झालं, तर सगळंच विखुरणार होतं. म्हणूनच अखिलीसला झापण्यासाठी त्याचा हा कॉल होता.

हवी असलेली वस्तू जवळजवळ हाती आली आहे हे ऐकून तो जरा निवळला. आक्रसलेल्या भुवया नीट करत तो जर्मन एक्सेंटमध्ये इंग्लिश बोलता झाला, बोलला कसला सौम्य शब्दात धमकीच ती. तो म्हणाला,

"ओकेय. आई'ल गिव्ह यु सम टाईम कॉज यु आर माय फ्रेंड डिअर. बट रिमेम्बर वन थिंग्. इफ यु गॉट फेल्ड् ऑर् पुट मी इन ए शेम; आय स्वेर् यु, आय वोन्ट स्पेअर् यु, निदर् माय गव्हर्नमेंट!" आणि त्यानं रागानं कॉल कट केला.

अखिलीसच्या डोक्यातच तिडीक गेली. तो बिचारा तरी काय करणार? त्याची फेडरल चान्सलर कडून चांगलीच पाठ शेकली गेली होती. आपला महागडा आयपॅड त्यानं भिंतीवर मारून दिला!

तो धुसफूसत होता. रागानं त्याच्या श्वासांची गती वाढली होती. डोळे लाल झाले होते. या धमकवणाऱ्या माणसाला आपण उभ्या उभ्या खरेदी करू शकतो

इतकी ताकद आपली, आणि हा आपल्याला धमकी देऊन जातो ही कल्पनाच त्याला सहन झाली नव्हती.

'सध्या काय ताकद आहे लिओनहार्डची? जर्मन गव्हर्नमेंटचं बॅकिंग? ते सोडलं तर लायकी काय त्याची? आणि हा मला धमकवतो? याची गुपितं, याचा मनसुबा याच्या गव्हर्नमेंटला समजली, तर? याची धडगत राहील का? आणि आपण ते सहजच करू शकतो! पण आपलेही काही स्वार्थ आहेत म्हणून याचं खपवून घ्यावं लागतंय...'

अखिलीस क्रुद्ध होऊन ओरडला.

अखिलीसच्या मते त्याला त्या शुल्लक व्यक्तीची बोलणी खावी लागत होती, ज्याची पात्रताही नव्हती अखिलीस समोर उभं राहण्याही. 'अडला हरी गाढवाचे पाय धरी!' या उक्तीप्रमाणं त्याला आतापुरतं तरी त्याचं ऐकावं लागणार होतं.

भविष्यातला मोठा फायदा त्याला दिसत होता म्हणूनच तो निमूट ऐकून घेत होता. असं असून लिओनहार्ड जर जास्तच डोईजड होऊ लागला, तर त्याचीही मोठी क्लिष्ट नाडी अखिलीसच्या हाती होतीच.

एरव्ही अखिलीसनं बघता बघता उभ्या उभ्या या फेडरल चान्सलरला उचलला असता आणि कुणाला कळलं देखील नसतं. जर्मन सत्ताधाऱ्यांना काही तुकडे टाकले असते, तर त्यांनीही सगळी चौकशी बंद करून टाकली असती. भ्रष्ट लोकं ही सगळ्या देशांत सारखीच. त्यात राजकारणी असतील, तर अधिकच सोपा मामला. एकूण सर्व देशांची परिस्थिती इथून तिथून सारखीच! हे अखिलीसला माहीत नसण्याचं काही कारण नव्हतं.

कोणीही सोम्या गोम्या आपल्याला बोलतो आणि याचं कारण फक्त इब्लिस आहे असं त्याच्या डोक्यात वाजून गेलं. आणि इब्लिसचा मास्कधारी चेहरा समोर येऊन तो अजूनच चिडला. त्याचे जबडे कसले गेले. डोळे मोठे झाले, खोबणीतून बाहेर पडतील इतके.

इब्लिस नसता तर हे काम कधीच पुरं करून आपण आपलं इप्सित कधीच पदरात पाडून घेतलं असतं या विचारानं एरव्ही शांत असलेला अखिलीस आपलं कुल टेम्पर हरवत चालला होता.

अखिलीस बिचाऱ्याला काय माहित, की इब्लिस 'इब्लिस' नसता, तरी त्याचा या प्रकरणाशी संबंध आला असता आणि तोही थेट! कशाही परिस्थितीत इब्लिस अगर रवी कोणीतरी त्याच्या राशीला हे लागलंच असतं!

इब्लिस लागला! आणि तोही खूप वाईट. नुकसान वर नुकसान. माणसाचं, पैशांचं, व्यवसायांचं...

विचार करील तसा त्याचा पारा चढतच चालला होता. फेकायला मात्र हाती आता काही नव्हतं. मानसिक स्थिती ढळून त्यानं समोरचा टी-पॉयच उधळून दिला. काचा... काचा झाल्या सर्वत्र. एवढ्यानंही त्याचा राग शांत झाला नव्हताच...

◆◆◆

शार्दूल गाडीतून उतरून आपली ग्लॉक सेव्हेंटिन सज्ज ठेवून सावध त्या बिल्डिंगकडं सरकू लागला. चहुबाजूंना त्याचं कडक लक्ष होतं. पोलीस कॉशन लाईन असल्यानं त्याला गाडी थोडी दूरच उभारावी लागली होती.

इथं तैनातीत असलेले पोलिसही त्यानं हटवले होते. त्याला काही करून हाती येऊ घातलेला त्याच्या राजन सरांचा खूनी जाऊ द्यायचा नव्हता. म्हणूनच त्यानं त्या खुन्याचं ऐकून हा प्रपंच केला होता. इब्लिस आहे म्हंटल्यावर तो सुटणं कठीणच. म्हणून पण त्यानं हे धाडस केलं होतं. शिवाय यात अनएथिकल काहीच नव्हतं.

चालत चालत तो त्या वाळलेल्या रक्ताच्या सड्यात येऊन थबकला. एकदम एक वीज डोक्यात तडकली.  आपल्या सोबत्यांचं सुकून गडद झालेलं रक्त बघून त्याला कसंसंच झालं. त्याची नम बुबुळं तिथं लागून असतानाच मोठ्या प्रकाशझोतानं त्याचे लक्ष वेधून घेतलं. त्यानं त्याकडं पाहिलं, तर त्याचे डोळे दिपले. इतका वेळ अंधारात असल्यानं अंधाराची त्याच्या डोळयांना सवय झाली होती. आता अचानक प्रकाशबिंब सामोरे आल्यानं डोळयांत असंख्य सुया घुसाव्यात तशा त्याच्या डोळयांना वेदना झाल्या व त्या अगदी मेंदूपर्यंत झिणझिण्या आणून गेल्या. तरी त्यानं नजर हटवली नाही.

आपली पिस्टल पुढं रोखून तो पाहत राहिला. प्रकाशाची सवय झाल्याशिवाय त्या गाडीतून कोण उतरतं हे त्याला समजणार नव्हतं. डोळयांना ताण देत तो बघत होता. एक पाय बाहेर आला. एक डोकं वर झालं. तो मुखवटा! अभद्र! विकट हास्य असणारा तो विभत्स मुखवटा. पाहताक्षणी कोणालाही धडकी बसावी असा. किंतु शार्दूलला तो सैतानी मुखवटा दिलासा देऊन गेला.

इब्लिसला पाहताच त्याची बंदूक खाली झाली. इब्लिस त्याच्या गाडीच्या प्रकाशात शार्दूलकडं चालत आला.

"लाईट्स बंद करा." शार्दूल दक्षता म्हणून त्याला म्हणाला.

"तू म्हणतोस तसं त्यानंच आपल्याला बोलवलं आहे. म्हणजे आपली उपस्थिती त्याला अपेक्षितच आहे." इब्लिस निवांत बोलला.

तो त्या रक्ताच्या डागांवर उभा होता. जणू त्याला काही फरकच पडत नव्हता त्या घटनेचा.

फरक पडला असावा... असेलच. पण ते त्याला दाखवून द्यायचं नव्हतं. आपली कोणतीही नाजूक रग, आपली वल्नरेबिलिटी त्याला त्या खुन्याच्या हाती लागू द्यायची नव्हती. यासाठीच काही फरक पडत नसल्याच्या आवेशात त्या रक्ताच्या डागांना तुडवत तो उभा होता.

शार्दूललाही इब्लिसच्या या अमानुषतेची चीड येऊन गेली. पण आता इब्लिसची गरज असताना तो त्याला काही बोलून दुखावू इच्छित नव्हता. आपला राग गिळून तो धिम्या आवाजात बोलला,

"तो आला नसेल का?" शार्दूलचा विचारी प्रश्न.

"त्यानं आपल्याला बोलावलं आहे, तो आपल्या आधी इथं हजर असला पाहिजे होता. पण कसलीच चाहूल नाही. इट इज स्ट्रेंज. लेट्स चेक!" इब्लिस त्याला म्हणाला व त्यानं त्या इमारतीचा रोख धरला.

शार्दूलही मग सावध नजर चौफेर फेरीत त्याच्या मागं गेला. इब्लिसनं त्याची कमांडर हाती घेतली नव्हती. बागेत चालावा तद्वत तो बेफिकीर, निष्काळजी चालत होता. जी काही काळजी घ्यायची ती शार्दूलच घेत चालला होता.

"काही माहिती?" इब्लिसनं वेळ जाऊ द्यायचा नाही म्हणून विचारलं.

"मर्सिनरीजना इथं बोलवलं ते रिकार्डोनं. मोबदलाही त्याच्या मार्फतच बॉण्डच्या स्वरूपात त्यांना दिले गेलेत." शार्दूलनं माहिती दिली.

"म्हणजे इथंही अखिलीस क्लीनच राहिलाय तर!" इब्लिस दात खात म्हणाला.

"होय." शार्दूलनं नाराज दुजोरा दिला.

"रिकार्डोची काही माहिती?" इब्लिसनं पुढं विचारलं.

"तो मूळचा गोव्याचा आहे. तिथल्या पोलिसांची मदत घेऊन त्याचा आणखी मागोवा काढायचा चालू आहे. तो इथं आहे हे तर उघडच आहे. सो, इथंही त्याचा शोध सुरू आहेच." शार्दूलनं पोलिसांच्या कामकाजाचं थोडक्यात विवरण दिलं.

"आणि त्या व्हिडीओतला दुसरा माणूस?" इब्लिसनं विचारलं.

"त्याची माहिती काढायची चालू आहे. येईल लवकर हाती." शार्दूल बोलला.

त्यावर इब्लिस काही खुश दिसला नाही.

"पोलिसांच्या कार्यतत्परतेनुसार रिकार्डो तरी किमान अजून सापडायला हवा होता!" अशी तीक्ष्ण टिप्पणी त्यानं शार्दूलला ऐकवली.

बोलतच ते त्या अवैध चालू असलेलं बांधकाम बंद पडून कित्येक वर्षांपूर्वी त्यागलेल्या इमारतीत शिरले. शोध घेत काही अंतर आतवर चालत जाताना, तोच अचानक मोठ्यानं तिथली सर्व दारे झाकल्याचा एका मागून एक आवाज त्या किर्रर्र् शांततेत घुमू लागला.

एकवर एक बाहेर पडण्याचे सारे दरवाजे कोंडले गेले. आवाजांवरून ते प्रतितच होत होतं. शार्दूल अधिकच सावध झाला. दोघांना तिथं कोंडलं गेलं होतं. चंद्राचा जागा काढून आत डोकावणारा मंद प्रकाश देखील गडप झाला होता. घुप्प अंधार! त्या अंधारात हे दोघे! एकटे...!

◆◆◆

इब्लिसच्या सिक्रेट बेसवर अजूनही हेलीचं व श्रीशाचं त्या जिवाणूच्या ड्युप्लिकेशनचं काम चालू होतं.

हेलीच्या मोबाईलची रिंग वाजली. हेलीनं आधी लक्षच दिलं नाही. एकावर एक मेसेज धडाधड येऊन पडू लागले आणि आवाजाचा त्रास व्हायला लागून डिस्ट्रबन्स आल्यानं तिनं मोबाईल पाहिलाच.

काही व्हिडीओज आले होते. ते पाहून हेलीच्या मुखड्यावरची रयाच गेली. तिचं मस्तक तप्त व धमण्या आरक्त होऊ लागल्या. कानशिलं गरम झाली.

श्रीशा तिला बघत होती. व्हिडिओचा आवाज ती ऐकत होतीच. तिला त्यावरून काय तो अंदाज आलाच होता. त्यानं तिचंही रक्त सळसळत होतं. तरी ती पुढं झाली आणि तिनं तो व्हिडीओ हेलीच्या हातातच रिप्ले केला व पुन्हा बघू लागली. विश्वास न बसलेली हेली देखील तो पुनः पाहत होती...

व्हिडिओत -

एका गडद अंधाऱ्या खोलीत एक व्यक्ती बसली होती. तिचे डोळे लाल भडक असे चमकत होते. डोक्यावर लाल शिंगं तशीच. बाकी चेहरा काळोखातच. खुर्चीवर तिला बांधलं गेलंय हे तिच्या आंधळ्या धडपडीवरून समजत होतं.

त्याच अंधारात मागून 'तो' चालत आला. उंच, धिप्पाड देह. चेहरा दिसत नव्हता. त्यानं आपल्या भारदस्त आवाजात एकच धमकी दिली. ती अशी...

"ओळखलंच असेल? तुझा इब्लिस! काही वेळातच आता नरकाचं दार वाजवणार आहे. तुझी लय आठवण काढतोय. जायच्या आधी तुला भेटायचंय याला. तीस किलोमीटरवर उत्तरेला बंद पडलेल्या सिमेंट फॅक्ट्रीत ये. अखेरचा सलाम दे तुझ्या बॉसला."

आणि तो कॅमेऱ्याच्या अगदी जवळ आला. गोलाएथचा तो थंड, क्रूर चेहरा त्यात दिसला आणि व्हिडीओ बंद झाला. बाकीचे आलेले व्हिडीओज पाहण्यात अर्थ नव्हता. जे समजायचं ते यात होतंच. तरी श्रीशानं हेलीकडून मोबाईल घेऊन तेही व्हिडिओज पाहून घेतले. खुर्चीतील त्या इब्लिसला अमानुष छळलं जात होतं. प्रत्येक व्हिडिओत छळण्याचा एक वेगळा प्रकार.

श्रीशाच्याही तळपायाची आग मस्तकात गेली. तिनं हेली होती त्या दिशेने पाहिलं, तर ती केव्हाची बाहेर पडली होती.

श्रीशाही तिच्या मागं धावली. पाहते, तर हेली आपलं प्रोटेक्शन किट काढून गन वगैरे घेऊन तयार होत होती.

"मीही येते!" श्रीशानं आपला निर्णय सुनावला.

तीही आवरायला पुढं झाली, तोच हेलीनं तिला हटकलं,

"नाही. तू इथं थांबून काम सुरू ठेव. इब्लिस परत आल्यावर फाडून खाईल आपल्याला." ती ठणकावत होती.

"पण तू एकटी...?" श्रीशा काळजीने बोलली,

"माझी मदत होईल. येते मी." तिनं इच्छा जाहिर केली.

इब्लिस संकटात असताना जशी हेली गप्प बसू शकत नव्हती, तशीच श्रीशाही शांत राहू शकत नव्हती. हे समजून हेलीनं तिला आश्वासन दिलं,

"तू काळजी करू नको. मी आणेनच त्याला. मला बोलवलंय मलाच गेलं पाहिजे!" ती गडबडीत बोलली.

आणि ती तिथल्या एका गाडीत बसून सुसाट निघून गेली. श्रीशा चिंतेतच उभी होती...

●●●

भान हरपून हेली कार चालवत होती. आपल्या बहिणीला तिनं गमावलं होतं. आता तिला इब्लिसला गमवायचं नव्हतं. छोट्या बहिणीनंतर आता तोच तर एकटा तिचा तिला उरला होता. त्यालाही काही बरं वाईट झालं, तर... ही भावनाच तिला सहन होण्यापलिकडची होती.

तिनं अनेकदा इब्लिसला फोन मिळवण्याचा यत्न केला. प्रत्येकवेळी फोन नॉट रीचेबल येत होता. अखेर तिनं मोबाईल फेकून दिला. कारची स्पीड वाढवून ती कार वाऱ्याच्या वेगानं पळवू लागली. डोळ्यांत उभारलेलं पाणी वाऱ्याच्या माऱ्यानं क्षणात सुकून चाललं होतं. तरी पाणी येणं चालूच होतं. ते पुन्हा सुकत

होतं. तिच्या पापण्यांच्या कडांवर व गालांवर त्या पाण्याचे क्षार जमा होऊन पांढरे डाग पडत चालले होते...

●●●

अर्ध्यातासाचा रस्ता हेलीनं पंधरा मिनिटांत पार केला होता. त्या निर्जन पडलेल्या भयाण वास्तू समोर ती एकटी उभी होती.

दार तिच्यासाठीच उघडं होतं. त्या सिमेंट फॅक्टरीची रया गेली होती. छप्पर कुठून कुठून उडालं होतं. अगदी रस्त्यापासून काही अंतरावर असलेली ती फॅक्टरी रात्रीच्या अंधारात भीतीदायक बनली होती. रात्रीची रहदारी नसल्यानं तिथं चिटपाखरू आसपास नव्हतं.

ती आत आत घुसत त्या गलितगात्र इब्लिस समोर येऊन उभारली. निव्वळ अं ंधकारात इब्लिस निपचित पडलेला तिला दिसला. पण अचानकच त्या भयाण मुखवट्याचे डोळे लालसर प्रकाशित झाले. शिंगं रक्तीम चमकू लागली.

तो भेसूर मुखवटा हलकेच वर झाला, सैतानानं खुनशी बघावं तसा. लटकलेली मान हळूहळू सरळ झाली. लाल डोळे चमकतच होते. हेली काय ते समजली. ती जागीच स्थिरावली. तिचा हात एका झटक्यात तिच्याकडील कोल्ट कॉम्बॅट कमांडरला गेला. तोच;...

चपळाईनं 'तो' इब्लिस सरसावला. पिस्टल उंचावलेला हात पकडून दुसऱ्या हातानं त्यानं हेलीचं नाक फोडलं. नाकापासून डोक्यात झिणझिण्या सणकत गेल्या. अवयवांची जाणीव लोप पावली क्षणात. तिच्या डोळयांतून टचकन पाणी

हेंदकळलं. काही काळ मेंदू व शरीराचं कनेक्शन तुटलं गेलं. त्याचा फायदा घेऊन त्यानं हेलीची गन हिसकावली. तिला हात मुरगळून तिला जमीन दाखवली त्या इब्लिसनं.

तोंडावरचा मास्क त्यानं चिडून फेकून दिला. आपल्या टाचेखाली तुडवला. एका फटक्यात तो मास्क फुटला. चुर चुर झाला. आणि त्या मास्कमागील गोलाएथ दृष्टिगोचर झाला.

गोलाएथ हेलीपाशी वाकला. तो बुक्क्यांचा वर्षाव तिच्या स्निग्ध चर्येवर पुनः पुन्हा करत राहिला. तो मारत राहिला, जोपर्यंत ती आपली शुद्ध हरपत नाही, तोपर्यंत तो मारत राहिला. त्याचा एक जोराचा फटका हेलीचा गळ्यावर पडला. आतापर्यंत तडफडणाऱ्या तिनं जागीच प्राण सोडला!

हेली मृत्यूला प्रिय झाली होती!

अखिलीसच्या ठिकाणी झालेल्या आधीच्या जबर झुंजीत ती कमजोर झाली नसती, तर तिनं तिखट, कडवी झुंज इथंही दिली असती. तिनं गोलाएथला आसमानच नव्हे, तर स्वर्गच दाखवलं असतं.

परंतु चाल करून तिला फसवून अडकवण्यात आलं होते. इब्लिस म्हणून उभारलेला माणूस हा इब्लिसपेक्षा काही इंच उंचच होता. त्याच्यापेक्षा काही मांस अंगावर जास्त असलेला होता. व्हिडीओत पाहिला तोही कोण वेगळाच होता आणि तोही खरा इब्लिस नव्हता. मास्कही कसला वेगळाच. अंधारात तो बसला असल्यानं व मास्कचे डोळे, शिंगं चमकत असल्यानं तिला तो इब्लिस असल्याचा धोका झाला होता. त्याला त्याच्यावर केले जाणारे अत्याचार हा सगळंच बनाव. हे डोक्यात प्रोसेस व्हायला तिला वेळ लागला होता. तेवढ्यात हे प्रकरण घडलं

होतं. तिला भ्याडपणे फसवून मारण्यात आलं होतं, अन्यथा समोरासमोर लढत झाली असती, तर तीच या गोलाएथचा कर्दनकाळ बनली असती हे निश्चित!

इथं डांबलेल्या इब्लिसचे डोळे, त्याच्या मास्कची शिंगे देखील खऱ्या इब्लिस सारखी प्रकाशत होती. इतकं डिटेलिंग असल्यानं आपला इब्लिस कोणाच्या हाती सापडणारा नाही हे तिनं ध्यानातच घेतलं नव्हतं.

इब्लिस संकटात आहे हे पाहून तिनं बाकीचा कसला विचार केला नव्हताच. इब्लिस असा कोणाच्या हाती घावणं त्यातूनही तिच्या मनाला पटत नव्हतं. त्यासाठी कन्फर्मेशन असावं म्हणून तिनं फोन केले होते. ते उचलले गेले नसल्यानं तर ती आणखीच बिथरली होती. इब्लिस संकटात आहे अशी खात्री पटून सारासार विकेकच ती हरवून बसली. गोलाएथनं तिच्याशी खेळलेला हा मानसिक खेळ होता. त्यात ती हरली होती; तो विजयी झाला होता. या मोठ्या धक्क्यातून तिला सावरण्याची उसंतही न मिळता तिच्यावर हल्ला झाला होता.

इब्लिसची हेली काय चीज आहे ते गोलाएथनंही पाहिलं असतं. पण सगळं धोक्यानं फसवून झालं होतं. हेलीला सावरण्याचा मौकाही दिला गेला नव्हता. एवढी जंगजू ती, हलकेच या शिकाऱ्याच्या हाती अलगत अडकली होती व आपला प्राणपक्षी हरवून बसली होती.

ही घटनाही रिकार्डो शूट करत होता. मागील दोन दिवस गोलाएथनं या प्लॅनिंगमध्ये आणि रिकार्डोनं हेलीचा नंबर मिळवण्यात घालवले होते. त्याचं चीज झालं होतं.

हेलीला पाठवलेला व्हिडीओ रेकॉर्ड करताना रिकार्डो हा उमदा गडी इब्लिस होऊन बसला होता. भेसूर काळोख ठेवून निव्वळ मुखवट्याचे डोळे, शिंगे

प्रकाशित होणाऱ्या मास्कचं अंधारात चलचित्रण केल्यानं अंगकाठी लपून गेली होती.

हेलीला समोरून स्वतःच्या हातानं संपवण्यासाठी हेली येण्याच्या वेळी गोलाएथ खुद्द इब्लिस होऊन त्या काळोखातील खुर्चीवर बसला होता.

गोलाएथला हवं होतं, की तो तिला मारत असताना तिनं त्याचा तिला मारतानाचा विखारी तृप्त दानवी चेहरा पहावा! म्हणून त्यानं परिधान केलेला इब्लिस मुखवटा काढून टाकला होता. तो पायाखाली चिरडून त्याने इब्लिस बद्दलचा आपला राग सुद्धा व्यक्त केला होता.

तिच्या डोळयांत उभारलेली दहशत त्याला पहायची होती. ती भीती तो काही हेलीच्या नजरेत पाहू शकला नाही. त्यानं तो खिजला गेला. ती त्याला भ्यायली की नाही याची पर्वा नव्हती त्याला आता. तिला आपण मारू शकलो हे समाधान तो त्यातही अधिक मानून होता.

गोलाएथची कल्परचना फळाला आली होती. त्याला यात मोलाची साथ करणारा रिकार्डो कॅमेरा बंद करून गोलाएथकडं आला.

"केवढी सुंदर आहे. बिचारीला तोंडावर मारून तिचा चेहरा खराब करण्याची गरज नव्हती. एका गोळीची सोपी मौत दिला आसतास..." रिकार्डो हळहळत गोलाएथला बोलला.

"मेल्यावर शरीराची चिंता का रिकार्डो? आणि हातानी मारण्यात जी मजा आहे, ती एका गोळीत संपावण्यात नाही." तो आपली कसलेली, हेलीच्या रक्तानं माखलेली मूठ पाहत सेइडिस्टिक (विक्षिप्त) बोलला.

ते रक्त पाहत असताना त्यांच्या डोळ्यात विशिष्ट समाधानी चमक होती.

"तुला तर माहीत आहे माझी पद्धत! हं? रिक?!" त्यानं तीच वेडसर नजर रिकार्डोकडं वळवली.

हाती असलेली हेलीची कॉम्बॅट कमांडर् त्यानं रिकार्डोकडं टॉस केली. त्यानं ती झेलली.

ओसाड फॅक्टरीच्या बाहेर श्रीशानं येऊन गाडी रोखली. तिनं एकवार लोकेशनवर नजर टाकली. हेलीचं इथलंच स्थान दर्शवत होतं.

हेलीला युद्ध मैदानात श्रीशानं एकटं पाठवलंय हे इब्लिसला समजलं, तर इब्लिसनं आकांडतांडव केला असता. हे श्रीशाला माहीत होते. शिवाय तिला असं एकटीला मरणाच्या दारात लोटणं तिच्या मनास पटलं नव्हतं. म्हणून ती हेलीच्या मोबाईलला स्ट्रेस करत इथंवर पोहोचली होती. इब्लिसनं दिलेलं अंगस्त्राण चढवायला व त्यानं देऊ केलेली व पूर्वी ती वापरत असलेली तिची आवडती 'डेझर्ट ईगल' व त्या अत्यंत शक्तिमान पिस्टलच्या '.50 एक्शन एक्स्प्रेस' या अत्यंत शक्तिशाली कार्टेजेस घेण्यात तिचा काहीवेळ खर्ची पडला होता.

होताहोईल तितक्या जलदगतीनं तरी ती हेलीचा माग काढत इथं पोहोचली होती. आपल्या सोबत्यांना सुरक्षित ठेवण्यासाठी इब्लिसनं सगळ्यांना जीपीएसच्या माध्यमातून एकत्र जोडलं होतं. त्याचीच श्रीशाला इथं मदत झाली होती.

तिथं असणारी हेलीची गाडी हेली तिथं असल्याची साक्ष व लोकेशन योग्य असल्याचा दुजोरा देत होती.

कन्फर्मेशनसाठी श्रीशाचं लक्ष मोबाईलला लागलेलं असतानाच अचानक तिच्या गाडीची काच फुटली!

"कुरियर कर." आतमध्ये गोलाएथ रिकार्डोला बोलला.

रिकार्डो व गोलाएथचं बोलणं चालू असतानाच बाहेर काही मोठी हालचाल झाली होती. गोळीचा आवाज! रिकार्डो कोण असेल ते पाहण्यास सरकला. मात्र गोलाएथनं त्याला जाऊ दिलं नाही. आताच कुणाच्या तोंडी येणं त्याला संयुक्तिक नव्हतं. अजूनही दोन शिकार बाकी होत्या. दोघे तिथल्या मागच्या बाजूने बाहेर पडले.

श्रीशानं तिची सीट मागं करून ती मागील दरवाजा उघडून बाहेर पडली होती. तत्पूर्वी तिच्या डेझर्ट ईगलनं तिच्या हाताचा ताबा घेतला होता.

गोळी आलेल्या दिशेनं तिनं पॉव्हरफुल '.50 एई' दागली. मिणत्या उजेडातही तिचा नेम अचूक लागला होता. मधली काही वर्षं या कामात नसून अजूनही तिचा हात पक्का कसलेला होता.

हेलीच्या गाडीशी जाऊन श्रीशानं ती जवळून पाहून खात्री केली. हेली इथंच होती. आणि आता ही आपल्यावर झाडलेली गोळी. तिला काळंबेरं असल्याची खूण पटली. चौफेर चौकस सावध नजर फेकत धिम्या हरकीतीत ती आहिस्ते सिमेंट फॅक्टरीकडं सरकू लागली. नेमकं तेव्हाच एक गोळी येऊन तिला धडकली.

ती जे खाली कोसळली, ती निष्क्रियच!

गोळी झाडणारा रस्त्याच्या पलिकडून चालत आला. त्याच्या जवळीकीची चाहूल लागताच श्रीशा पाठीच्या आधारे गोल फिरली व शरीराला उछाल देऊन पायांवर आली. आधारासाठी एक गुडघा एक हात जमिनीवर टेकला. दुसऱ्या हातानं तिनं गोळी झाडली होती. ती थेट त्या माणसाची छाती फाडून गेली होती. एवढी पॉव्हरफुल पिस्टल एका हाताने दागण्याइतपत तिचे मनगट मजबूत होते. तिचे हात फक्त दिसलाच कोमल होते, प्रचंड शक्ती सामावलेली होती त्यांमध्ये.

तिने भेद घेतलेला हा तोच, ज्यानं श्रीशावर मघाशी ती गाडीत असताना गोळी चालवली होती. श्रीशानं त्याच्या दिशेनं बंदूक चालवल्यावर ती प्रतिकार करण्याच्या तयारीतच आलीये व इथून पळून जाणार नाहीये हे लक्षात घेऊन व तिनं त्याच्यावर गोळी चालवून त्याचा स्वाभिमान दुखवल्यानं त्यानं गप्प राहून तिला नीट टप्प्यात येण्यास प्रवृत्त केलं होतं. हल्लेखोर मेला असं समजून ती चाललीही होती व त्यात त्यानं नवीन हल्ला चढवला होता. त्याचा हा प्लॅन श्रीशानं त्यास ठार करून हाणून पाडला होता.

मग कुठंकुठं दडून बसलेले पंधरा - वीस कोयतेधारी श्रीशाकडं सरसावले. हायवेच्या दिशेनं जाणाऱ्या कोणास इथली गडबड समजली, तरी कोणी इथं ढवळाढवळ करू नये, अगर हेलीला वाचवायला कोणी आलंच, तर त्याला थोपवून ठेवता येईल या प्रयोजनानं रिकार्डो व गोलाएथ सध्या रहात असलेल्या बस्तीतील लोक गोलाएथच्या सुचनेनं व रिकार्डोच्या सांगण्यानं इथं लपून पहारा देत होते.

एव्ही काही प्लॅनिंगनुसार घडले नाही व इब्लिस अगर डिएसपी शार्दूल इथं आलाच, तर त्यांना फक्त अटकाव करून वेळ काढण्याचं त्यांना काम देण्यात आलं

होतं. एकटा इब्लिस भल्याभल्यांना आवरणार नाही माहीत असल्यानं ही इतकी फौज.

इब्लिसची शिकार करायची होती गोलाएथलाच! परंतु ती वेळ आत्ता नव्हती. म्हणून त्यांना फक्त पहाऱ्याचं कार्य दिलं होतं. म्हणून बंदूकही एकच दिली गेली होती, तीही रिकार्डोच्या  अत्यंत विश्वासार्ह्य माणसाकडंच. बाकीचे आपले घरचेच कोयते, चाकू, छुरे, बरछी, कट्यारी, तलवारी घेऊन आले होते.

आपल्यातील एकजण असा मेल्यानं ते चांगलेच चवताळले होते. रिकार्डोनं इथं येणाऱ्यास थोपवण्याचं दिलेलं काम देखील त्यांना मार्गी लावायचं होतं.

इब्लिस सोडून कोणी आलं, तर त्यास मारण्याची एकदम मुभा होती यांना रिकार्डो व गोलाएथकडून. ह्या पोरीकडून आपल्या माणसाचा मृत्यू पाहून यांच्या डोक्यात रक्त उतरलं. श्रीशाचा मुडदा  पाडायला सारे एकसाथ सरसावले. त्यांनी एकत्रच श्रीशावर हमला केला.

हे लोक मुळातच गुन्हेगारी बस्तीतले होते. इब्लिसला घाबरूनच त्यांनी आपले धंदे बंद करून ठेवले होते. आज ती खुमखुमी बाहेर काढण्याची त्यांस चांगली संधी मिळाली होती. ते या सुवर्णसंधीचा पुरेपूर वापर करून श्रीशाचा जीव घेण्याच्या पुष्कळ प्रयत्नात होते.

ते क्रूर श्रीशाच्या अंगावर धावून येत होते, तरी हे सर्व पूर्वी श्रीशाला इतकं सवयीचं होतं, की ती हत्यारं श्रीशाला इतकी धोकादायक वाटत नव्हती. या लोकांना जीवे न मारता निव्वळ इजा करायची, ज्यानं त्यांना परत लढण्यास उठताही येऊ नये व आत जाण्यास आपल्याला रस्ताही सुलभ व्हावा म्हणून तिनं

आपली डेझर्ट ईगल होलस्टरला खोवली व ती हाता-पायांच्या जोरदार मारांनीच त्या लोकांचे हात, पाय, बरगड्या कडाकडा मोडत, त्या गुंडांशी हस्तयुद्ध करतच त्यांना निःशस्त्र करत सिमेंट फॅक्टरीच्या दाराकडं सरकू लागली...

श्रीशा नांवाची रणरागिणी शौर्याची परिसीमा करत होती.

श्रीशाचा एक फटका खाल्ला, की दुसरा फटका खाण्याचा कोणाला अवसर मिळत नसे. काही न काही मोडून ते जे धरणी जवळ करत, उठून श्रीशाला मारण्याचेही कोणास मनात विचार येत नव्हता. आला तरी शरीर साथ देत नसे.

कोणाचं डोकं फोडत, कोणाचं कानफाड रक्तानं लाल करत, कोणाच्या बरगड्या मोडून फुफ्फुसात रुतवत तिनं अखेरीस आपला मार्ग स्वच्छ, प्रशस्थ केला. तिच्यावर धावून आलेले आपला कुठला ना कुठला अवयव धरून विव्हळत पडत होते...

अखेर प्रचंड अडथळा दूर करून श्रीशा  काळया खोलीत पोहोचली. हेली मरून पडलेली तिला दिसली. तिचा मुखडा ओळखण्य पलिकडं चेंदला गेला होता. नाकातोंडातून, कानातून रक्त वाहत गेलं होतं, अजूनही ते रिसतच होतं.

हेली मरून अधिक वेळ गेला नाही हे श्रीशाने ओळखलं. पण तरी वेळ निघून गेली होती. ते रक्त नाकात अडकून गुदमरल्यानंच हेलीचा जीव गेला होता. गोलाएथनं हेलीचा श्वसननलिका सुद्धा फोडली होती.

हेलीशीच तो इब्लिसचा फुटलेला मास्क पडला होता. एका तुकड्याला लागून असलेला डोळा अजूनही लाल चमकत होता. दुसरा खोबणीतून बाहेर पडून विस्कटला होता. वायरिंग बाहेर आली होती, जणू त्या डोळयांच्या तंतू होत्या.

तो ट्रायपॉडवरचा कॅमेरा श्रीशाच्या जनरेत भरला. तिनं तो पाहिला. त्यात तिला सगळयाच प्रश्नांची उत्तरं मिळाली.

त्या व्हिडीओतील गोलाएथला ओळखलं तिनं. यालाच हेलीच्या फोनवर आपण व्हिडिओत इब्लिसला बांधून ठेवलेलं बघितलंय. हे तिला आठवलं.

म्हणजे हेलीला इथं आणण्याची ही कुटील चाल होती तर...

तिनं तो कॅमेरा हस्तगत केला. हेलीला उचलून ती चालती झाली...

# १७. रणसंग्राम...

"काय करायचंय आपण?" शार्दूल त्रागा व्यक्त करत ओरडला.

तिथं बंद राहून आणि सुटण्याची हरेक कोशीश करून त्याचा श्वास फुलला होता,

"मोबाईल सिग्नल पण नाही इथे!" तो चवताळून बोलला.

इब्लिस शांतच उभा होता. शार्दूलनं एक अनोळखी कॉलवर विश्वास ठेवून जो मूर्खपणा केला होता, त्याचा परिणाम तो भोगत होता आणि सोबत इब्लिसला देखील सोसावा लागत होता. इब्लिस शार्दूलची मनोमन कीव करत होता. त्याला हा आततायीपणा करण्यापासून रोखायचं, तर शार्दूलनं इब्लिस काही बोलयच्या आतच फोन ठेवून दिला होता. त्याला काही होऊ नये म्हणून मग इब्लिसलाही इथं येणं भाग पडलं होतं. शार्दूलमुळं तोही आता इथं अडकून पडला होता.

इथं कोणी आलं, अगदी आपल्याला मारायच्या हेतूने, तरच आपण काही करू शकतो हे तो निर्धारून होता, अन्यथा ही अभेद्य खोली उध्वस्त करून सोडणं शक्य नाही हे तो समजला होता. आणि तसं कोणी येण्याची तो शांतपणे वाट पाहत होता. कोणी न कोणी येणार हे तो पुरता ओळखून होता, म्हणूनच तो आपली शक्ती खर्चत नव्हता. बाकी जतीन यांना काही होणार नाही याचं आश्वासन अखिलीसकडून होतं. राजन आधीच मेलेला, हेली त्याच्या दृष्टीने बेसवर असल्याने सुरक्षित होती, आणि आपल्यावर हल्ला झालाच तर त्याला परतवण्यासाठी आपण सक्षम आहोतच हा आत्मविश्वास असल्याने, त्यामुळे त्याला चिंता करण्यासारखं काही नव्हतं.

"शांत हो. इतका वेळ हल्ला वगैरे काही नाही. याचा अर्थ आपल्याला धोका नाही." इब्लिस शांत बोलला.

"पण हे का? आपल्याला असं का अडकवलं आहे? नक्की प्लॅन काय आहे त्याचा?" शार्दूल त्वेषानं ओरडला.

शार्दूल मूर्ख नक्कीच नव्हता. कर्तव्याचरणाची विवेकबुद्धी त्याला एकसरळमार्गी ठेवत होती. त्यातून थोडा भोळेपणा त्याच्यात आला होता. राजनच्या खूनानं तो पुरता बिथरला होता. त्याची ही अविचारी पावलं त्यामुळंच पडली होती. यानंच इब्लिसला घेऊन तोही इथं अडकून पडला होता.

"त्याचाच विचार करतोय." इब्लिस अजूनही शांतच.

"इथून बाहेर पडायचं बघूया आपण?" शार्दूल खिजला होता.

बाहेरून खट्टचा आवाज घुमला. शांतता होती, त्यानं तो आवाज मोठा घुमला. या दोघांच्या कानी आला. मोबाईल्सचे मेसेज सुद्धा दणादण वाजण्यास चालू झाले. तिकडं लक्ष न देता इथून आधी बाहेर पडणं त्यांच्यासाठी प्राधान्यक्रम होता. घाई केली, तर दरवाजे उघडणारी माणूसं सुद्धा सापडण्याची शक्यता होती. मोबाईल टॉर्चेस लावून ते अंधारात आलेल्या वाटेनं इग्झिटकडं धावले.

बाहेर दर्शनी कोणीच नव्हतं. इब्लिसला काही अनैसर्गिक नक्कीच भासलं होतं. असंख्य नजरा आपल्याकडं लागून आहेत हे त्याला जाणवत होतं. तो लक्षपूर्वक सारा परिसर शांतपणे अवलोकीत होता.

"काय झालं?" त्याचा चौकसपणा ध्यानी येऊन शार्दूलनं विचारलं.

"वी आर अंडर् सर्व्हीलीयन्स!" सगळीकडं नजर फिरवतच इब्लिस हलके बोलला.

त्याचा हात मागच्या होलस्टरला असलेल्या कमांडरला गेला.

"डोन्ट किल!" शार्दूलनं त्याला आठवण करून दिली.

इब्लिसचा हात पूर्ववत झाला. तो चौफेर फिरून कोण दिसतं का पाहत होता.

इतक्यात... एक हात शिवशिवणारा गरम रक्ताचा तरुण त्याला अडवणाऱ्या दोन-चार हातांना न जुमानता आगे सरसावला.

इब्लिस! याच्या भीतीनं आपल्या बस्तीला खूप सहन करावं लागलं आहे. याच्यामुळं आपले पिढीजात धंदे बंद करून सभ्य धंदे आरंभायला लागले. पण सभ्य वागूनही समाजाची आपल्याकडं बघण्याची हीन दृष्टी काही बदलली नाही. या इब्लिसमुळं आपली स्थिती अजूनच खच्ची झाली. हा आत्ता पावेतो समोर सापडला आहे. आता याला सोडायचा नाही. असा वेडा विचार करून तो इब्लिसवर धावला होता.

इब्लिसनं त्याला कमांडरचा स्वाद चखवला नव्हता, पण त्याला नाकी डोळी नीटस देखील ठेवला नव्हता. त्या तरुणाच्या हातचं कोयतं गायब करून इब्लिसनं त्याला ढगाळ आभाळ असताना रातीचं चांदणं दाखवलं होतं.

आपल्या सद्य हलाखीच्या स्थितीला, समाजातून मिळणाऱ्या अवहेलनेला स्वतःला व आपल्या पूर्वजांच्या दूष्कर्मांना दोष न देता इब्लिसलाच दोषी ठरवून तो तरुण मोकळा झाला होता. बरं हे कोणी लक्षात आणून दिलं असतं, तर इतकी वर्षं या त्याच्या समाजातील लोकांवर उच्च वर्गाकडून जे अत्याचार होत आले

होते, त्यात त्यांना उपजीविकेसाठी कोणता मार्ग शेष होता? असा प्रतिप्रश्नाचा युक्तिवाद त्यानं केला असता, जो पूर्णतः रास्त होता. समाजावर त्याचा असलेला तो राग या इब्लिसमुळं काढता येत नव्हता त्याला. या रागातून इब्लिसवर केलेल्या वाराला इब्लिसकडून उत्तर मिळालं होतं. तो तरुण अंगातलं काहीतरी मोडून घेऊन विव्हळत पडला होता.

मग काय? तिथं दडून फक्त पाहऱ्यासाठी आलेले सारेच खवळले. इब्लिसला घाबरून काही वर्षं गप्प राहिलेल्या व मारामारी करण्यास शिवशिवणाऱ्या त्यांच्या देहांना इतक्या दिवसांचा उकटा साक्षात इब्लिसवरच काढायची संधी मिळाली होती. रिकार्डोच्या माध्यमातून गोलाएथनं त्यांना ही संधी उपलब्ध करून दिली होती.

रिकार्डोच्या सल्ल्यानुरूप गोलाएथ जाणून होता, की हे लोक शेकड्यानं इब्लिसवर एकाचवेळी धाडले तरी ते इब्लिसची कोणतीही बरोबरी करू शकत नाहीत. त्याला यांच्या हातून मारण्याचा हेतू नव्हताच. फक्त त्याच्यावर लक्ष ठेवायला आणि वेळप्रसंगी त्याचा अटकाव करायला त्यांना इथं धाडलं होतं.

इब्लिस आणि शार्दूलला बंद केल्यानंतर त्यांनी बाहेर पडण्याचा काही मार्ग शोधलाच, तर ते त्यांचा इथं अटकाव करायला त्यांच्यावर हल्ला करणार होते.

रिकार्डोच्या चेतावणीनुसार इब्लिस नामचीन तोफ असेलच, तर इब्लिस हाती ते प्राण गमावून बसले, तरी गोलाएथला त्यांची फिकीर नव्हती. हेलीला ठार मारताना तिथं कोण आलेलं मात्र त्याला नको होतं. म्हणून तिथंही त्यानं बस्तीतल्या लोकांची सोय केली होती. आपला प्राण खर्ची घालून ते गोलाएथसाठी वेळ खरेदी करणार होते. गोलाएथच्या योजनेनुसार इतकीच काय ती त्यांची उपयोजिता.

रिकार्डोला या लोकांचा असा वापर मान्य नव्हता. गोलाएथ, जोनाथन प्रमाणं त्याच्या जव्हाळयाची ही पण माणसं होती. पण गोलाएथच्या असुरी हट्टापुढं त्याचं काही चालणारं नव्हतं. त्यानं निमूट गोलाएथच्या प्लॅनमधील त्याचा पार्ट वर्कआऊट केला होता. या लोकांना गोलाएथसाठी काम करायला लावण्याचा. आतून तो खिन्न नक्की झाला होता.

इब्लिसला न मारण्याची रिकार्डोकरवी गोलाएथनं यांना ताकीद केली होती. इब्लिस फक्त त्याची शिकार होता! यांना त्याचा फक्त अडसर बनायचं होतं. पण त्या तरुणांचं रक्त इब्लिसला पाहून मात्र सळसळलं होतं. आणि तो खुद्द इब्लिसवर चालून गेला होता, आपल्या लोकांच्या अडवणुकीला न जुमानता आणि आपल्या आततायीपणाचा परिणाम सुद्धा त्याने भोगला होता, इब्लिसकडून मृत्यू प्राप्त करून.

इब्लिस इथं आला तेव्हा, तो तरुण त्याच्या माणसांकडून अडवला गेला होता कसा तरी, पण पुन्हा इब्लिस दृगोचर झाल्यावर त्याला राहवलं नव्हतं. त्यानं इब्लिसवर हल्ला चढवला होता. त्याची परिणीती झाली ती अशी...

तो तरुण त्या लोकांसाठी अक्षरशः क्रांतिसूर्य ठरला. इब्लिसवर चालून जाण्यापूर्वी तो जे काही बोलला होता, आत्ताच्या त्यांच्या दयनियन अवस्थेची तो आठवण करून देऊन गेला होता, ते या लोकांच्या मनात घर करून गेलं होतं. जाता जाता तो यांच्यात क्रांतीचं स्फुल्लिंग चेतवून गेला होता.

एकत्र मिळून हल्ला केला, तर कोण इब्लिस? या विचारानं सर्वांनी स्वतःला धीर दिला. स्वतःत उसणं धाडस संचारून घेतलं. ते एकी करून एकदमच त्याच्या अंगावर धावून गेले. आपल्यातला माणूस असा वेदनेत पाहून गोलाएथ व

रिकार्डोची सज्जड ताकीद ते साफ विसरून गेले होते. गोलाएथला जुमानन्यात त्यांना आता काही स्वारस्य उरलं नव्हतं. इब्लिस बद्दलची भीती त्यांनी गाडून टाकली होती...

महाकाय झुंड आपल्या दिशेनं चाल करून येते पाहून शार्दूलनं आपलं सर्व्हिस पिस्टल बाहेर काढलं. त्या जनलोटाला चेतावणी देण्याकरता त्यानं हवेत गोळीबार केला. त्या गोळीबाराला कुणीच किंमत दिली नाही. तो लोंढा शार्दूलला उलटून इब्लिसवर उसळला.

इब्लिस त्यांच्याशी मुष्टियुद्ध करून एका एका प्रहरात चालून येणाऱ्या उपद्रवींना आसामान दाखवू लागला. कोणी मरू नये याची काळजी इब्लिस पुरेपूर घेत होता. निव्वळ कुणी हल्ला करण्यास योग्य राहू नये इतकं तो बघत होता. तो त्यांना अपंग करत चालला होता.

इब्लिस आपलं नांव सार्थ करताना शार्दूल थिजून स्थब्ध पाहत होता. असलं काही पाहण्याची ही त्याची पहिलीच वेळ. काहीजण इब्लिससोबत असणाऱ्या त्याला मारण्यासही सरसावले. तेव्हा...

"डोन्ट जस्ट स्टँड देअर्!" इब्लिस शार्दूलला भानावर आणण्यासाठी ओरडला,

"आत्मरक्षेचा अधिकार आहे मला. तुलाही आहे. आता जर तू हाती शस्त्र घेतलंस, तर कायद्याचं कुठलंच उल्लंघन करत नाहीस तू! तुला कोणी दोषी ठरवणार नाही! लढ शार्दूल!" इब्लिस त्याला उद्युक्त करत होता.

आपण पूर्वी राजनशी व आत्ता शार्दूलशी वचनबद्ध असल्यानं यांना ठार मारू शकत नाही, पण शार्दूलनं ठरवलं, तर तो ते करू शकतो या विचारानं इब्लिसनं त्याला ठणकावलं होतं.

अगणित भूतं एकाचवेळी त्यांच्यावर चालून येत होती. शार्दूलवर एकानं तलवारीनं हल्ला चढवला. इब्लिसनं त्याला अडवून कोपरातून हल्लेखोराचा हात मोडला.

"फ्रॉम आयपीसी सेक्शन नाईन्टी सिक्स टू वन हंड्रेड सिक्स. वी हॅव ऑल राईट्स टू प्रोटेक्ट पर्सनल बॉडीज अँड प्रॉपर्टीज अँड इव्हन टू प्रोटेक्ट अदर्स! यु इव्हन हॅव अ राईट टू किल अंडर सेक्शन हंड्रेड तो प्रोटेक्ट सेल्फ. जस्ट फाईट!" इब्लिसचा मशीनचा शार्दूलला आवाज दरडावत घुमला.

शार्दूलला कायदा तोंड पाठ होता. इब्लिसनं त्याला त्याची आठवण करून देण्याचीही गरज नव्हती. तो लढायला घाबरत होता असंही नाही. नाहीतर तो पूर्वी हेलीचा पाठलाग होत असताना तिला वाचवण्यास धावलाच नसता. त्याचा जातीचा स्वभाव थोडा मृदू होता इतकंच. हिंसा शार्दूलला पटत नव्हती इतकंच. दुसरीकडं इब्लिसचंही त्याला पटलं. आपल्यावर जीवघेणा हल्ला होतोय. स्वरक्षण हा काही गुन्हा नाही.

तोही मग युद्धाच्या पवित्र्यात आला. अंगावर आलेल्यांना शिंगावर घेत तोही स्फूर्तीनं लढू लागला. त्याच्यातील सामर्थ्य इब्लिसही पाहत होता.

वेळोवेळी कायद्याच्या बाता मारणारा शार्दूल इतका लढाऊ असेल असं कोणाला वाटलं नव्हतं. कायद्यामागं शार्दूल आपली दुर्बलता लपवतोय असाच समज प्रचलित होता त्याला ओळखणाऱ्यांत. शार्दूल या माणसाला जोखण्यात

प्रथमतः सगळ्यांचीच चूक झाली होती. इब्लिसनं मात्र त्याला पक्कं ओखळलं होतं. कायद्याचं पालन करत सत्याच्या वाटेवर चालत असल्यानं शार्दूल बहुतांना कमजोर वाटत असला, तरी तो तसा नाही हे इब्लिसनं पुरतं जाणलं होतं.

लढत असताना अहिंसक स्वभावी शार्दूल कुणाला जीवे मारत नव्हता. त्यानं इब्लिसचाच पवित्रा स्वीकारला होता. हल्लेखोर पुन्हा हल्ल्याच्या लायकीचे राहणार नाहीत एवढंच तो त्यांना प्रतिकार करून बघत होता.

अखेर... ती रणधुमाळी संपली... मारण्यास सरसावलेले सर्व जखमी झालेली अवयवं पकडून लोळागोळा होऊन धर्तीवर अच्छादले होते.

बराच वेळ मग तिथं काही हालचाल झाली नाही... आता कोणी उरलं नाही याची खात्री झाल्यावर इब्लिसनं मघाशी आलेल्या मेसेजेसमध्ये काही महत्त्वाचं साडपतं का पाहण्यासाठी म्हणून त्याचा मोबाईल काढला. हेलीचे काही मिस्डकॉल्स येऊन पडले होते. श्रीशाचेही मिस्डकॉल्स होते व फोन न उचलला गेल्यानं एक व्हॉईस मेसेज तिनं सोडला होता. तो व्हॉईस मेसेज ऐकताच त्याचा हा थंड कोरडेपणा क्षणात निमाला, संपला.

हेलीच्या मृत्यूची ती हेलावणारी बातमी त्याला श्रीशाकडून दिली गेली होती.

त्याच्या रागाला पारावार उरला नाही. त्याची कामशिलं गरमावली. समद्या शरीरावरच्या असंख्य शिरा तट्ट फुगल्या. त्याची सुप्रसिद्ध कमांडर् क्षणात त्याच्या शरीराचा एक अवयव बनली. शार्दूल क्षणभर बिथरलाच. इब्लिस आपल्यालाच काय करतो की काय, क्षणभर त्याला वाटून गेलं.

इब्लिस इतरवेळी या पोरकट ट्रिकमध्ये अडकलाच असता. शार्दूलचा अविचारी आक्रस्ताळेपणा यालाही नडला होता. आपण हातोहात मूर्ख बनवले गेलो आहोत याची त्याला चीड तर आलीच, पण लाज मोठी वाटली. त्यानं काही राऊंड्स खाली जमिनीवर फायर करून आपला राग काढला.

त्या गन फायर्सनी घाबरलेला एक इसम दडलेल्या जागेवरून पळत सुटला. मघापासून आतापर्यंत त्याने इब्लिसचे तांडव पाहिले होतेच, त्यात इब्लिस अचानक असा पिसा झाला होता. ते बघून तर त्या माणसाची घाबरगुंडी उडाली. वेडा लपूनच राहिला असता, तर बिचारा वाचला असता. समोरचा रणसंग्राम पाहून मुळातच गलितगात्र झालेला तो आणखीन बिथरून पळल्यानं तो इब्लिसच्या सहजच टप्प्यात आला.

तो तर काय करणार बिचारा... इब्लिसची दहशत इतकी होती, त्यात त्यानं इब्लिसला कोंडण्याचा प्रमाद केला होता. इब्लिसला डोळ्यांदेखत लढताना, आपल्या माणसांना जिवंत ठेवून पण जगण्याच्या लायकीचं सोडलं नव्हतं इब्लिसनं, तेही त्यानं साक्षात पाहिलं होतं. त्याची भीतीनं गाळण उडणं स्वाभाविक होतं. त्या स्वाभाविकतेनंच त्याचा जीव घेतला...

इब्लिसनं कोल्ट कमांडरची एक गोळी त्याच्या दिशेनं प्रसारित केली. ती पाठीवर झेलून तो निपचित पडला. ओरडण्याची मुभा देखील चिडलेल्या इब्लिसनं त्याला दिली नव्हती. एव्हाना इथल्या हल्लेखोरांना जीवदान दिलेला तो हेलीच्या मरणाच्या वार्तेन आपला ताबा हरवून बसला होता आणि त्यानं हा खून पाडला होता...!

पडल्यावर त्या माणसाच्या हातून कसलंसं मशीन सुटून घसटत गेलं.

शार्दूल त्याच्याकडं धावला. इब्लिसही आपले भारदस्त पाय टाकत हत्तीच्या चालीनं चालत त्याच्याकडं गेला. शार्दूलनं त्या माणसाला पाहिलं. मग त्यानं ते मशीन बघितलं. ते सिग्नल जॅमर असल्याचं त्याच्या ध्यानात आलं. आपल्याला जाणून बुजून असं अडकवलं गेलं होतं हे आतापर्यंतच्या घटनांनी त्याला समजलं. पण का? असं काय करायचं होतं त्या लोकांना? हा प्रश्न त्याच्या डोक्यात कुंधला. त्याला उत्तराची जास्त वाट पहावी लागली नाही. त्याच्याजवळ आलेला इब्लिस त्याला म्हणाला,

"हेली गेली!" त्याच्या आवाजात दुःख होतं. वेदना होती. त्याचा कंठ दाटला होता, तरी तो स्वतःचा निर्विकार अविर्भाव सांभाळण्याचा प्रयत्न करत होता.

"म्हणजे?" विश्वास न बसलेला शार्दूल ओरडला.

"खून झाला तिचा!" इब्लिस अश्रू आवरत व आपला आवाज स्थिर ठेवण्याचा प्रयास करत कठोर बोलला.

शार्दूलच्या पायांतलं त्राणच निघून गेलं. जागीच दगड झाला त्याचा. त्याच्या सावरण्याची वाट न पाहता इब्लिस त्याच्याकडं पाहून होपलेस्ली मान डोलावली व आपल्या गाडीकडं गेला. शार्दूल पण भानावर येऊन त्याच्या मागं पळला. सिग्नल जॅमर सोबत घेण्यास तो विसरला नव्हता. इब्लिस आत बसायच्या आधीच ड्रायव्हिंग सीटच्या शेजारच्या पेसेंजर सीटवर शार्दूल स्थिरावला.

"उतर! इथून पुढं आपले मार्ग वेगळे आहेत!" इब्लिस कठोरपणे त्याला स्पष्ट बोलला.

"हेली माझी पण मैत्रीण होती!" शार्दूलनं तितक्याच स्पष्टपणे इब्लिसला बजावलं.

इब्लिसला पर्याय उरला नाही. तो निमूट गाडीत बसला...

●●●

शार्दूल इब्लिसच्या बाजूला बसून होता. हेलीचा मृत्यूने हडबडलेल्या त्याचं  फोनवर घाईने काही कामकाज चालू होतं...

"जिथं राजन सर मारले गेले, तिथं पोहोचा. एक डेड बॉडी आहे. ती कलेक्ट करा. बरीच माणसं जखमी आहेत तिथं. त्यांना अटक करून हॉस्पिटलमध्ये पोहोचवा. जागता पहारा ठेवा त्यांच्यावर. मला त्या माणसांची पूर्ण माहिती हवी आहे. दरम्यान डेडबॉडीची अटॉप्सी उरकून घ्या! माझी कार पण आहे तिथंच. तीही परत घ्या." आणि त्यानं फोन ठेवला. मग ऑफिसमध्येच दुसरा कॉल केला,

"नवीन काही अपडेट्स?" त्यानं पलिकडील ऑफिसरला विचारलं.

यानंतर शार्दूल बराच वेळ होल्डवर राहून फक्त ऐकतच होता. मग आभार मानून त्यानं फोन ठेवला.

"राजन सरांना मारलेल्या माणसाचा तपास लागला. रिकार्डोची माहिती काढायला गेल्यावर गोव्यात याचाही पूर्वेतिहास कळाला. 'गोलाएथ' म्हणून तो कुख्यात आहे. रिकार्डोनंच त्याला वाढवलंय असं कळतं. त्याचं किशोरावस्थेतलं एक क्रिमिनल रेकॉर्ड पण आहे. एकाचा डोक्यात बाटली घालून खून केलेला त्यानं. एक महत्त्वाची बातमी म्हणजे हा माणूस ज्याला गोलाएथ म्हणतात, तो आणि

आधी तुझ्या हातून मेलेला जोनाथन हे सख्खे भाऊ होते." शार्दूल थोडक्यात मुद्देसूद बोलला.

"म्हणजे हा त्याचा बदला घेतोय तर." इब्लिसला लख्खं खुलासा झाला.

"हेली गेली हे वाईट झालं... पण... तुम्ही तिथल्या त्या माणसाला जीवे मारायला नको होतं. कायदा हातात घेतलात तुम्ही. आपली डील..." तो वाक्य पूर्ण करण्याआधीच...

"खड्ड्यात गेली! तुझ्या वचनामुळंच ही परिस्थिती गुदरली. नाही तर हेली जिवंत असती. राजननंही माझ्याकडून काही वचनं घेतली, ती पाळली मी याचा नतीजा? या फालतू वचनांनीच राजन पण मारला गेला." इब्लिस खेकसला.

"काही असो! तुम्ही कायदा हाती नाही घेऊ शकत! चालवायचीच होती, तर पायावर गोळी मारायची. इब्लिसला ते जमणार नाही असं शक्यच नाही. तरी तुम्ही जाणीवपूर्वक त्याचा जीव घेतलात. गोळी पाठीत घुसून हृदय भेदून छातीतून बाहेर पडली आहे. माझ्या डोळ्यादेखत हे घडलं. याचे परिणाम..."

इब्लिसनं पुन्हा त्याला मधे तोडलं,

"पोलिसांची साक्ष ग्राह धरली जात नाही हे विसरता आहात तुम्ही डीएसपी साहेब! पाय, पोटरी बघायला वेळ नाही मला आता! आता परिणामांची चिंता त्या लोकांनी करायची. मला अटक करायची असेल, तर तूर्तास ते विसरून जा! आणि; तू मला नाही पकडू शकत. मग अगदी माझ्या बाजूला बसला असलास तरी!" आणि इब्लिसनं गिअर चेंज करून एक्सलेटरवर पायाचा दाब वाढवला...

◆◆◆

ती रात्र गोलाएथनं वाया जाऊ द्यायचं नाही असं ठरवलं होतं. त्यानं रुख केला तो सूर्योदय अनाथालयाचा! ही शिकार आत्ताच मारावी लागणार होती. अन्यथा इब्लिस हेलीच्या मृत्यूनं बिथरला जाऊन इथं आडवा येण्याची दाट शक्यता होती.

सूर्योदय हे ठिकाण असं होतं, की इथं कोणाला आत येण्यास आडकाठी कधीच नव्हती. गोलाएथ व रिकार्डोला सहजच प्रवेश मिळाला. इथं कोणतेच छक्के-पंजे करण्याची त्यांना आवश्यकता भासली नाही. हे इतकं सोपं काम घडेल याची त्यांना स्वप्नातही कल्पना नव्हती. अनाथाश्रमाची सहज व्यवस्था पाहून जास्त ताणतणाव करायचा नाही व कोणाला संशय येईल ऐसे वागायचे नाही अशी गोलाएथनं रिकार्डोस पूर्व ताकीद दिली होती. तो काय करतोय, म्हणतोय त्यात हो ला हो बोलायची मुभा फक्त त्याला होती.

तिथंच गोलाएथच्या मस्तिष्कात ताज्या ताज्या शिजलेल्या युक्तीनुसार दोघं त्यांच्या बस्तीतल्या काही अनाथ मुलांची इथं व्यवस्था होते का पाहण्याचं कारण काढून जतीन यांना भेटले. जतीनना भेटायला आलेल्याला आडवायचं नाही हा जतीन यांनीच घालून दिलेला नियम. कोणाला कसली मदत लागेल हे सांगता येत नाही व त्यामुळं याचनकर्त्याला आपल्या दारातून रिकाम्या हाती जावं लगावं हे जतीन यांना मान्य नसल्यानं या नियमात बदल होत नसे.

ही दोन माणसं संतूला जरा विचित्रच वाटली. हे बोलतात त्याहून काही वेगळा मनसुबा घेऊन आलेत हे त्याला भासून गेलं. त्यानं ताबडतोब रवीला फोन लावला.

इब्लिस गाडी पळवत होता. स्पीड लिमिट त्यानं केव्हाची क्रॉस केली होती. त्याला काही बोलण्याची सोय नव्हती आता शार्दूलकडं. गप्प बसून होता तो.

इब्लिसला इथं तो विरोध करू शकला असता, पण प्रकरणाचा अंत त्यालाही हवाच होता. इब्लिसला आत घेतला, तर त्याची जी कोणी नवी मदतनीस आहे, ती आपल्याला कितपत को-ऑपरेट करेल ही शंकाच होती त्याला. इब्लिसच्या साथीदाराला काही हाती लागलंय का हे त्याला गप्प राहूनच पाहता येणार होतं...

इब्लिसचा फोन वाजला. यावेळी त्यानं आपला मास्कचा खालचा भाग हटवला नाही. शार्दूल बाजूला असताना असं करणं धोक्याचं होतं. मास्कच्याच मशीनी आवाजात तो मोबाईलवर बोलला. गाडी चालवत असताना फोन घेऊन इब्लिसनं आणखी एक नियम मोडला होता. शार्दूल बाजूला असल्यानं स्पीकर करायची सोय नव्हती. परंतु पर्याय नव्हता,

"बोल!" इब्लिस बोलला.

"तुमचा आवाज असा का येतोय?" संतूनं घाबरून विचारलं.

"काही नाही. सिग्नल प्रॉब्लेम असेल. तू बोल." इब्लिसरुपी रवी त्याला म्हणाला.

"इथं दोन माणसं आलेत. मला ते काही बरोबर वाटत नाहीत." संतू चिंतीत स्वरात म्हणाला.

"लक्ष ठेव. आलो." इब्लिसनं फोन कट केला.

इब्लिसला आता कसलीच रिस्क घ्यायची नव्हती. त्यानं करकचून गाडीचा ब्रेक मारला. शार्दूलला कळायचं बंद झालं.

"उतर खाली." तो शार्दूलला म्हणाला.

शार्दूल अगदीच कोषात.

"का? काय झालं?" शार्दूलनं गोंधळून विचारलं.

"उतर!" इब्लिस मोठ्यानं ओरडला. त्याचा मशीन सारखा आवाज छाती धडकवणारा होता.

शार्दूल काही न बोलता उतरला. त्यानं आपला मोबाईल इब्लिसच्या न कळत त्या गाडीतच सोडला होता.

शार्दूल बाहेर पाऊल टाकताच इब्लिसनं आपली गाडी दामटवली...

◆◆◆

जतीन यांच्यासमोर बसताच गोलाएथनं एकच पण थेट प्रश्न केला,

"इब्लिस तुला कोण लागतो?" त्याचा आवाज खूप खोल आणि घोगरा होता. कोणाच्याही जीवाचं कापरं उडावं असा.

जतीन पर्यंत पोहोचण्यासाठी जी खोट्याची झुल पांघरली होती, तिचं काम झालं होतं. ती पांघरूण राहण्यात अर्थ गोलाएथला वाटला नाही. ती खोटी आवरणं त्यानं फेकून दिली होती.

जतीन ऐवजी कोणी असतं तिथं, तर त्याचा थरकाप उडाला असता. पण नाही! ते गोड लाघस हसले. आपला अंत समोर आहे याची त्यांना जाणीव झाली.

मृत्यूला हसत ते सामोरं जाणार होते. जीवनाची तृप्ती त्याच्या सुवदनावर पसरली होती. खोटं बोलण्याची त्यांची रीत नव्हती. त्यांच्या संस्कारात ते बसत नव्हतं.

"माझा मुलगा आहे!" ते कमालीच्या निर्वाण चर्येनं बोलले. शांत भाव होता त्यांच्या कमलवदनावर.

गोलाएथच्या डोळयांना एक तीव्र धार आली. त्यानं उग्र नजर वर करून जतीन यांच्याकडं पाहिलं. जतीन संतवतच सौम्य स्मित करत त्यांच्याकडं पाहत होते.

त्यांच्या त्या निरागस स्मित करण्याची त्याला अजूनच चीड आली. त्याचा वज्रहस्त वेगानं फिरला. जतीन यांचा जबडा चटकवत तो पुनः मागे आला.

त्यांच्या चष्म्याच्या काचा हवेतच चुर होऊन विखरून सर्वत्र पेरल्या गेल्या. अगदी त्यांच्या कोमल डोळयांत देखील!

त्या एका हातानंच जतीन शुद्ध हरपून पडले. त्यांना ओरडण्याचा वेळही मिळाला नव्हता. काचा डोळयांत गेल्याने ते आंधळे होऊन त्यांतून रक्ताच्या धारा लागल्या होत्या. त्यांनी आपला मृत्यू स्वीकार केला होता. त्यांनी केव्हाचा प्राण सोडला होता. चेहऱ्यावर बेफिकीर, निर्मळ हास्य तसंच वागवून होते तरी ते.

ही नितळ स्मितरेषा गोलएथच्या डोक्यात ओरखड्याप्रमाणं भासली. तो अजूनच तकडला व वारंवार लथ्थाप्रहार जतीन यांच्या छातीवर तो करत राहला. त्यांचं प्राणहीन शरीर ते प्रहार झेलत रबराच्या पुतळ्यासारखं संकुचत-प्रसरत होतं. तरी मुखावरचं हसू हलायला, गर मालवायला अजूनही तयार नव्हतं. गोलाएथला ते हसू खूप त्रासदायक खिजवणारं वाटत होतं. आपली सगळी शक्ती एकवटून तो जतीनच्या मृतदेहाला पायांखाली ठेचत, चिरडत होता. असं असून प्राण नसलेलं

ते शरीरच त्या दोहोंतील संघर्षात जिंकत चाललं होतं. मृत जतीन सामर्थ्यशाली गोलाएथवर मात करत होते. त्यांचा हा विजय गोलाएथला इब्लिसचा विजय वाटत होता. त्याचा रोष त्यामुळंच वाढत चालला होता. तो अधिकाधिक जोरानं जतीन यांचा प्राणहीन देह तुडवत चालला होता...

त्या चेहऱ्यावरचं तेजल हसू काही लोपत नव्हतं. अखेर तो दमला. तो तरी थांबायचं काही नांव घेत नव्हता. रिकार्डो घाबरला. इथं जास्तवेळ थांबणं मुनासीब नव्हतं. शेवटी त्यानं गोलाएथला मागं खेचलं.

गोलाएथच्या डोळयांत रक्त उतरलेलं त्यानं पाहिलं. तो घाबरून गेला. हा आता थांबायचा नाही हे तो समजून गेला.

आता आपला नंबर! तो क्षणात ओळखून चुकला.

विषानं भरलेला साप पाहिल्यागत रिकार्डो मागं सरकत गेला. गोलाएथच्या हाताच्या टप्प्यातून तो बाहेर गेला नव्हता. गोलाएथनं हात लांब करून त्याच्या खांद्यावर टाकला. मोठा घण हातोडा खांद्यावर पडावा तसा रिकार्डो जाग्यावरच रुतला. दरदरून त्याला घाम फुटत चालला.

"रिकार्डोचा अर्थ माहीत आहे ना तुला? हं? रिकार्डो?" तो कुत्सित हसत विचारत होता. त्यानं प्राणांपलिकडे भ्यायलेला रिकार्डोकडं आपली भेदक नजर केली. वेडसर झाक त्याच्या डोळयांत चमकत होती,

"आम्ही लहान असताना तू म्हणायचास, रिकार्डो म्हणजे प्रबळ शासक! मी राजा माणूस आहे असं म्हणायचास तू. आजपर्यंत तू जगलास पण तसाच. मग भितोस कशाला? राजा, घाबरत नसतो!" गोलाएथ थंड बोलला.

"तुझ्यासारख्या सैतानाला कोणीही घाबरेल!" रिकार्डो गंभीर भीतीयुक्त बोलला. इतकी वर्षे मनात दाबून ठेवलेले शब्द तो आता धिटाईने उद्धृत करत होता. काळ आपल्याला आता चुकणार नाही याची त्यास निश्चिती झाली होती व त्यातूनच गोलाएथ समोर असं काही बोलण्याची ही धिटाई त्याच्यात आली होती.

"या सैतानाला आसरा तूच दिलास!" तो राक्षसी विकट हसला.

"आणि आता त्याचं फळ भोगणार आहे!" रिकार्डोनं आपलं प्राक्तन स्वीकारलं होतं. तो धीरगंभीर बोलला.

"अहं! त्याचं नाही! तुझी चूक दुसरी आहे! इब्लिस इथं आहे तुला माहीत होतं. तरी तू इथल्या कामासाठी जोनाथनला बोलवलंस. तो आला नसता, तर... जिवंत असताना तो!" गोलाएथ गोठवणारं बोलला.

"माझी गरज संपली तर!" रिकार्डो आपली गोलाएथसाठी असलेली उपयोगिता संपल्याचं जाणून अजून खोल गेला.

रिकार्डोनं आपला मृत्यू मान्य करून डोळे मिटले. गोलाएथचा त्याच्या खांद्यावरील हात त्याच्या गळयावर गेला. मनगटाला एकच हेल आणि एका आवाजासह रिकार्डोची मान मोडली गेली. मानेजवळील मणक्याचे सांधे मोकळे झाले, दुरावले आणि रिकार्डोची मान लुळी पडली. गोलाएथनं आपली पकड ढिली केली. रिकार्डो गुडघ्यांवर आला. देहानं प्राण कधीच सोडला होता. तो कोसळला व तिथंच पसरला.

रिकार्डोचे अनंत उपकार होते गोलाएथ व त्याचा जिवलग भाऊ जोनाथनवर... त्याची जान राखूनच गोलाएथनं रिकार्डोला आसान मौत दिली होती!

गोलाएथ या दानवाच्या डोळ्यांत अश्रू उभारले होते. पापण्यांच्या कडांमधून वाट धुंडाळत ते त्याच्या गालांवरून खाली तरंगले. ते पडले ते रिकार्डोच्या मुखावर. ही त्याची त्याला आदरांजली होती...

काही क्षण भरल्या डोळ्यांनी त्याला पाहत तो उभारला. त्याच्या आयुष्यातील त्याची अशी अखेरची व्यक्ती मेली होती. काय हा उपहास...? आपल्याच हातानं तिचा खून करावा लागला होता. आपल्याच भावासाठी...

सगळं आपलंच होतं... आता त्यातील काही राहिलं नाही. पाय लावून त्यानं रिकार्डोचा अपमान केला नव्हता. पण त्याचा निष्प्राण मृतदेह तिथंच टाकून तो जतीन यांचा मृतदेह फरफटवत तिथून बाहेर पडला.

इथली लोकं इब्लिसला प्रिय होती. त्यांना तो जिवंत ठेवू इच्छित नव्हता. इब्लिसला दिलासा मिळेल असं काही गोलाएथला मागं शिल्लक ठेवायचं नव्हतं! त्याचं आयुष्य इब्लिसमुळं उजाड झालं होतं. आपला भाऊ त्यानं मारला होता, तर त्याच्यामुळं बापाच्या जागी असणाऱ्या रिकार्डोला स्वतःच्या हातांनी संपवावं लागलं होतं. इब्लिसनं केलेल्या या गुन्ह्यांना गोलाएथकडून माफी नव्हती! इब्लिसला मारण्यापूर्वी त्याला इब्लिसचं आयुष्य उजाड करायचं होतं.

बाहेर जाण्याच्या वाटेत जो कोणी आडवा येईल त्यालाच काय, पण त्या वास्तुतल्या सगळ्या निष्पाप जीवांना यमसदनी पाठवून त्यानं सूर्योदय त्यागलं!

◆◆◆

इब्लिसच्या तीक्ष्ण नजरेतून शार्दूलचा कारभार सुटला नव्हता. त्यानं काही अंतर कापल्यावर त्याचा मोबाईल बाहेर फेकून दिला. तो हवेवर गिरक्या घेत लांब झाडीत जाऊन पडला.

●●●

अखेर त्याची वेगवान गाडी सूर्योदयला लागली. जिथं जीवनाचं सजीव रूप त्यानं पाहिलं होतं; तिथं आज तो मृत्यूचा जिवंतपणा बघत होता.

कित्येक आप्तस्वकीयांचे मृतदेह तिथं असेच पडले होते. त्यात एक देह संतूचा पण होता. इब्लिस सर्वप्रथम त्याच्याकडं धावला. संतूनंही गोलाएथला आडवं जाऊन त्याला अडवण्याचा किलबिला, लटका प्रयत्न करून पाहिला होता. अयशस्वीच होणार होता तो, पण प्रयत्नच केला नाही असं होऊ नये म्हणून तो जीवावर उदार झाला होता.

त्याच्यात थोडे प्राण शिल्लक होते. इब्लिसनं आपला मुखवटा काढला. रवी शार्दूलला दिसू लागला. इब्लिसला भ्यायलेला संतूचा रक्ताळलेला चेहरा त्या भयावह मुखवट्यामागील रवीचा तोंडवळा पाहून आशेच्या किरणांनी भरून गेला. असंख्य वेदनांच्या जागी दिलासेच्या स्मितानं घेतली. आणि... आणि त्यानं प्राण सोडला!

इब्लिसला सगळं संपल्यासारखं झालं... त्याच्या हातातील प्राण जाऊन संतूचा घट्ट आवळून धरलेला देह त्याच्या हातून सुटून खाली आदळला. दोन-चार क्षण रवी तसाच सुन्न, विषण्ण बसून होता. वेडावला होता. डोळे अश्रूंनी पार भरून

गेले होते. त्याला काहीच स्पष्ट दिसणं बंद झालं. आपलं शरीर त्याला जाणवेनासं झालं. डोळ्यांचं पाणी नाकात भरल्यानं त्याचा जीव गुदमरला. कंठ भरला. नाकात, डोक्यात झिणझिण्या भरल्या. पण... पण काही क्षणच तो या निश्चल अवस्थेत राहिला.

आणि काही अवकाशाने अचानक कसलीशी आठवण त्याच्या मनात चमकली होती. कसल्याशा जाणिवेनं व संवेदनेने त्याचे बाहू शक्तीनं भरले गेले. पायांत पुन्हा सामर्थ्य संचारलं. एक पराकोटीचा ठाम निर्णय त्यानं एका पळात घेऊन टाकला होता. रवी आपला इब्लिस मास्क धारण करून उठला. रवी आता कायमचा मेला होता का...??? आणि त्याची जागा इब्लिसनं कायमस्वरूपी घेतली होती का...???

इब्लिस भरकस जड पावलं टाकत त्याच्या स्वकीयांच्या मृतदेहांचा खच पार करत तो जड अंतःकरणाने आत आत चालला होता. अविश्वासानं त्याची मान सर्वत्र फिरत होती. त्या जागेचा जिवंतपणा हरवल्याची जाणीव त्याला झाली. ही वास्तू या लोकांमुळंच तर जिवंत होती. आता... भकास... उजाड... पडली होती.

जड पावलांनी त्यानं जतीनचं ऑफिस गाठलं. तिथं रिकार्डो मरून पडलेला त्याला आढळला. त्याची तमा त्यानं केली नाही. ते मढं उचलून त्यानं भिंतीवर आदळून दिलं. तक्षणी राग काढण्यासाठी त्याला कोणी हवं होतंच, रिकार्डोचं ते धड तिथं उपस्थित होतं. इब्लिसनं ते भिरकावून दिल्यावर भिंतीवर आपटून त्यातील काही हाडं मोडली होती.

जतीन मात्र त्याला कुठं दिसले नाहीत. त्यानं मॉनिटर चेक केला. ऑफीसचा सीसीटीव्ही त्याला सगळं सांगून गेला. त्याच्या पित्याला ज्या पद्धतीने मारलं गेलंय ते भयाण कौर्य बघून तो जास्तच संतापला. जतीन यांना कसं अपमानित मारलं गेलं हे त्यानं पाहिलचं, पण त्यांचा पवित्र देह फरफटत नेलेलंही त्याला पहावं लागलं होतं...

हे अभद्र दृश्य पाहणारे त्याचे डोळे त्याला पापी वाटून गेले.

जतीन यांना घेऊन जाताना बाहेरच्या सीसीटीव्हीत बघून तो क्रूरकर्मा इब्लिसला चिडवणारं विचकट हसला होता. त्याचा बदला अजून पूर्ण झाला नाही हे तो त्याच्या मग्रूर हसण्यातून सांगत होता.

जतीन यांच्या बसण्याची खुर्ची लवंडलेली होती. तिथून रक्ताचे फरफटलेले डाग बाहेर जात होते. भावूक तो खाली वाकला. मघाशी आत येताना त्याच्या डोक्यात फक्त जतीन यांचाच विचार असल्याने त्याला हे डाग नोंद झाले नव्हते, ते आता त्याला स्पष्ट दृष्टीत भरत होते. त्याचे थरथरते हात आपणहून त्या रक्ताकडे खेचले गेले. त्यानं त्या रक्ताला स्पर्श केला. आपल्या बापाचं रक्त... सुखलेलं ते पापुद्रा झालेलं रक्त इब्लिसचे हात घामेजलेले असल्यानं त्याच्या हाती चिकटलं. तसाच हात माथी घेऊन लहान मुलासारखा तो बिलखून रडू लागला...

काहीकाळ आपल्या उद्विग्नतेचा व अपार झालेल्या दुःखाचा निचरा करून त्यानं त्या पवित्र रक्ताला आदर व कृतज्ञतापूर्वक अभिवादन केलं.

इब्लिसनं टेबलावरची तिथली सगळी कागदं विस्कटून पाहिली. तो ज्या गोष्टीच्या शोधत होता, त्या उर्जितचं त्यात त्याला कार्ड सापडलं. तो ते घेऊन तिथनं बाहेर पडला...

◆◆◆

स्पेअर मोबाईलनं शार्दूल आपलाच मोबाईल ट्रॅक करत मध्य हायवेवर येऊन थांबला. इथून पुढं लोकेशन दाखवत नव्हतं. मोबाईलमध्ये एक हिरवा पॉईंट त्याच स्थानावर टिवटीवत होता. तिथंच मग शोध घेतल्यावर ऊसाच्या फडात त्याला त्याचा मोबाईल मिळाला. इब्लिसला आपण हरवून बसलो याचा त्याला मनस्वी राग आला. त्या अर्धवट बांधकाम सुटलेल्या कित्येक वर्षांच्या उध्वस्त हौसिंग सोसायटीकडं रवाना होणारा पोलीस ताफा त्यानं जदलीनं बोलवून घेतला होता. त्यांतीलच एक गाडी घेऊन तो इथवर आला होता. इतकं करूनही तो आता करू काहीच शकत नव्हता. इब्लिस बेछूट सुटला होता इब्लिसचं मृत्यूतांडव बघण्याचंच फक्त शार्दूलच्या हाती उरलं होतं का...?

◆◆◆

इब्लिस उर्जित अग्रवालच्या घरी पोहोचला होता. त्यानं त्याला भिंतीवर दाबून धरलं होतं. त्याला पाहूनच भीतीच्या भावनेखाली उर्जित दडपला गेला. हा सैतान आपल्याकडं येण्याचं कारण त्याला उमगत नव्हतं. एवढं मोठं तर आपण कधीच काही केलं नाही, की इब्लिसनं आपली दखल घ्यावी. मग हा इथे का? डोक्यात हा विचार कुंधला होता त्याच्या. तो जिभेकरवी बाहेर मात्र पडत नव्हता.

"सूर्योदयची जमीन तुला का हवी आहे?" इब्लिस गरजला,

"कुणी तुला त्या प्रॉपर्टीच्या मागं लागायला सांगितलं?" उर्जितला बोलण्याचा वेळ न देता इब्लिसनं आणखी एक प्रश्नतोफ दागली.

तो प्राणांतिक घाबरला होता. त्याची बायको, पोराचं कुटुंब एका कोपऱ्यात शिरलं होतं. भिंतीत सामावून जाऊ तर बरे होईल असे त्यांचे मत झाले असावे. घामावाटे भीती सर्वांगावर उमटली होती. उर्जितची अवस्था काही और नव्हती. मूर्तीच झाला होता तो. तरी त्याला इब्लिसला उत्तर देणं क्रमप्राप्त होतं. बोललो नाही, तर जीव हमखास गमावू याची त्याला जाणीव होती. बोललो, तर कदाचित जिवंत राहीन ही लटकी आशा वाटत होती त्याला. याच जाणिवेनं त्याला संवेदना दिली, त्या बळाच्या जोरावरच तो कसंबसं बोलला,

"तिथं काम करणाऱ्या एकानं मला तिथं खजिना असल्याचं सांगितलं... ती जागा म्हणूनच मला पाहिजे होती."

"कोण नोकर?" इब्लिसनं दरडावून विचारलं.

"अविनाश. आधी काम करायचा तिथं. तिथली नोकरी सोडल्यावर माझ्याकडं कामाला लागला शिपाई म्हणून. कधीतरी जतीन त्याला त्याबद्दल बोलले होते असं तो म्हणाला. त्याला पैशांची गरज होती. मी द्यायला नकार दिला. तर त्यानं माझ्याशी डील केलं, की त्यानं या खजिन्याबद्दल सांगितलं, तसा तो खजिना तिथं सापडला, तर त्यातील काही हिस्सा मी त्याला द्यावा..." उर्जित घाबरून पुटपुटला.

"कसला खजिना आहे तिथं?" इब्लिसनं घोगरं विचारलं. पुसटसा अंदाज तरी त्याला होता.

"म... माहीत नाही... त्याला पण माहीत नाही. पण जतीन खोटं बोलणार नाहीत. एकांतात तर नाहीच याची त्याला खात्री होती. अनाथाश्रम खरेदी केल्यावर खजिना सापडायला सोपं व्हावं म्हणून त्याचा नकाशा त्यानं बनवून दिला होता मला. त्यानं मोठा एडव्हान्स पण उचलला आहे माझ्याकडून. खजिना मिळाला नाही तर माझं मोठं... मोठं नुकसान आहे म्हणून मी त्या जमिनीच्या मागं होतो... तो नकाशा त्या... त्या... तिजोरीत आहे. बघू शकता..." तो काकुळतीला आला होता.

इब्लिसचा मोर्चा आपल्याकडं येऊ नये म्हणून काही सांगण्या-विचारण्याआधीच उर्जितच्या मालकीनीनं कमरेची किल्ली इब्लिसकडं टाकली. इब्लिसनं न पाहताच ती झेलली.

"गोलाएथ नांवाच्या कुणाला ओळखतोस?" अखिलीसनं भारदस्त दरडावत विचारलं.

"शपथेवर सांगतो, नाही!" उर्जित काकुळतीला आला होता.

"अखिलीसशी तुझा काहीच संबंध नाही?" इब्लिस खरं बोलण्याची आणखी एक संधी देण्याच्या हेतूने प्रश्न करता झाला.

"नाही... अजिबात नाही!" उर्जित पॅन्ट ओली करायचाच बाकी होता.

"म्हणजे त्यानं तुला ती प्रॉपर्टी विकत घ्यायला नक्की सांगितली नाही? ती तुलाच हवी होती हे कन्फर्म?" इब्लिसचा खात्रीसाठी प्रश्न.

"ह... होय." उर्जित रडला.

"तू तीन खरेदीदारांचा प्रस्ताव जतीन यांच्याकडं घेऊन गेला होतास ना?" इब्लिसनं अखेरचा प्रश्न.

"अनाथाश्रम मी दुसऱ्याच्या नांवावर खरेदी करणार होतो. ते विकत घेणारा मात्र मीच असणार होतो." तो जिवाच्या आकांतानं बोलला.

इब्लिसनं त्यास सोडलं व धमकावत बोलला,

"सूर्योदयकडं वाकडी नजर करून बघायची नाही! ती आता माझी प्रॉपर्टी आहे!" इब्लिसनं ठणकावलं.

"अजिबात नाही... अजिबात नाही..." उर्जित रडत खाली पडला.

हात जोडून त्यानं जीवाची भीक मागण्यास लोटांगण घातलं. काहीच प्रतिक्रिया नाही पाहून त्यानं डोकं वर काढलं, तर तिजोरीही उघडी होती. तिथं कोणीच उभं नव्हतं!

# १८. निमित्तुच्चाटन...

इब्लिसला शोधण्याची एक हुकमी जागा शार्दूलला माहीत होती. तीच त्यानं ताडून पाहिली. इब्लिसच्या हेडकॉर्टर्सवर तो पोहोचला, तर श्रीशा त्याच्यावर 'डेझर्ट ईगल' ताणूनच उभारलेली त्याला आढळली. इब्लिसच्या सिक्योरिटी सर्व्हीलीयन्सनं शार्दूलच्या येण्याची तिला वर्दी दिली होती.

"मी डिप्युटी सुप्रीटेंडेंट आहे!" शार्दूल बचावासाठी बोलला.

"माहीत आहे. इथं येण्याचं कारण?" श्रीशा नजर बारीक करून संशयानं विचारत होती.

तो धिटाईनं समोर चालला. त्याची एकटक नजर हेलीच्या प्राणहीन देहावर होती. तो जाईल तसं श्रीशा आपला नेम त्याच्यावर धरून वळत होती. तिला कोणताच चान्स घ्यायचा नव्हता. तो काय करतोय हे पण तिला पहायचंच होतं. म्हणून तिनं अजून गोळी चालवली नव्हती.

"इथं कसा पोहोचलास?" तिनं कठोर विचारलं.

"आधी येऊन गेलोय." तो हेलीला बघतच बोलला.

त्याचे दोन्ही चक्षू पाण्यानं भरले होते.

"इथं येण्याचं कारण?" रागानं श्रीशानं विचारलं.

"मला हेलीच्या मृत्यूबद्दल सगळी माहिती हवी आहे!" तो दडलेल्या कंठाने सौम्य बोलला.

"कारण?" तिनं जाब विचारावा तसं विचारलं.

"कारण हेली माझी मैत्रीण होती. आम्ही पूर्वी सोबत काम करायचो." त्यानं प्रेमळ हात हेलीच्या डोक्यांवर ठेवला. तोच हात आपुलकीनं तिच्या केसांवर फिरला.

श्रीशाला शार्दूलच्या डोळयातलं पाणी त्याचा खरेपणा पटवून गेलं. तिची पिस्टल आपसूक खाली झाली.

"इब्लिसच्या मरणाचा बनाव करून त्या लोकांनी तिला बोलावून घेतलं." ती आढेवेढे न घेता बोलली.

"आणि हेलीला मदत मिळायला नको म्हणून त्याला आणि मला कोंडलं होतं. हा प्लॅन होता तर त्यांचा?! आणि मी मूर्खासारखा अडकलो त्यात. हेलीचं मरण माझ्यावर आहे यासाठी मी स्वतःला कधीच माफ नाही करू शकणार..." शार्दूल अजूनही हेलीच्या शांत चर्येकडं बघत मायेनं तिच्या केसांत हात फिरवत होता. पण अपराध भावनेनं जड झालेलं त्याचं हृदय पिळवटून निघत होतं.

आपण ती चूक केली नसती, तर हेली जिवंत असती, हेच राहून राहून त्याच्या अंतःकरणात धडकत होतं आणि त्याचा आत्मा घुसळून हेलावून टाकत होतं.

"इब्लिस?" श्रीशानं शंका विचारली.

"हेलीच्या मृत्यूची बातमी मिळाली आणि मला एकट्याला सोडून तो कुठं निघून गेला. मला वाटलं इथं आला असेल." त्यानं स्पष्टीकरण दिलं.

"नाही आला." ती परत कठोर झाली.

हा त्याला अटक करायला आलाय का? असा विचार तिच्या मनात डोकावला असावा.

"हेलीला त्यांनी संपर्क कसा केला?" त्यानं विचारलं.

"तिच्या फोनवर व्हिडीओज आणि मेसेजेस आले होते. त्यात इब्लिसवर अनन्वित अत्याचार केल्याचं दिसत होतं." श्रीशानं सांगितलं.

"मी ते व्हिडिओज बघू शकतो?" शार्दूल विचारता झाला.

"तिच्या मोबाईलमध्ये आहेत. तिचा मोबाईल इथं नाही." श्रीशा बोलली.

"मग?" शार्दूल किंकर्तव्यविमूढ़ उद्गारला.

"तिला मारण्यात आलेल्या ठिकाणी तिनं नेलेल्या गाडीत आहे. तिला आणण्याच्या विचारात मी लक्ष दिलं नाही." श्रीशानं स्पष्टीकरण केलं.

"तिच्या खुन्यानं नेला नसेल?" शार्दूलला धसका.

"नाही. कारण अगदी तिला मारतानाचंच त्यांनी रेकॉर्डिंग केलंय तो कॅमेरा तिथंच सोडून ते पळून गेलेत." श्रीशाचा तर्क.

"बरोबर. तो व्हिडीओ इब्लिसनं पहावा हाच मूळ हेतू आहे त्या मागचा. मग ते हेलीचा मोबाईल पळवणार नाहीत!" तो स्वतःशीच पुटपुटला,

"हेलीला कुठं मारण्यात आलं?" त्यानं मान श्रीशाकडं केली.

"कोल्हापूर पासून उत्तरेला अठ्ठावीस किलोमीटरवर एक सिमेंट फॅक्टरी आहे. बंदच असते ती." श्रीशानं सांगून टाकलं.

हा जो काही इन्फॉर्मेशन मिळवेल ती कामीच येणार होती. हा मित्र आहे की शत्रू ते नंतर बघता आलं असतं हा तिचा विचार.

त्यानं लगेच मोबाईल काढला. आपल्या टीमला तो घुमवला. तिकडं जाऊन हेलीच्या मोबाईलची आणि इतरही एव्हीडेन्सची शोधाशोध करण्याचे त्यानं तातडीचे हुकूम सोडले. तिचा मोबाईल मिळाला, तर त्यांनी तिच्याशी कसा संपर्क

साधला हेही समजण्यास मदत झाली असती. कदाचित त्याद्वारे त्यांच्यापर्यंत पोहोचताही आलं असतं...

◆◆◆

इब्लिसच्या अंगात वारं शिरलं होतं. पिशाच्च हवं तिथं प्रकट व्हावं तसा तो काही काही वेळच्या अंतरावरच त्याला हव्या त्या जागी प्रकट होत चालला होता.

आपल्या बेसवर तो उभा होता. शार्दूलला तिथं बघून तो चिडला. पण त्याला दुर्लक्षित करत तो लॅबला गेला. श्रीशा तडतडत त्याच्या मागून गेली, पण त्यानं तिला प्रत्युत्तर केलं नाही.

तोंडाला मास्क लावून तो लॅबमध्ये घुसला. ग्लव्ह्ज् सरकवून त्यानं टेम्प्रेजर मेंटेन केलेल्या काचेच्या यंत्रातून बॅक्टेरियाची शिशी घेतली. ती परत त्यानं तांब्याच्या चेनमध्ये अडकवली व त्यानं फायर इस्टिंग्विशरनं प्रयोगासाठीचे े काढलेले सगळे बॅक्टेरिया सॅम्पल्स नष्ट केले.

श्रीशा त्याला अडवायला, त्याच्या हातून फायर इस्टिंग्विशर हिसकवण्यास ती सरसावली. त्यानं तिला खांद्यानंच हुसकवलं आणि अखेर श्रीशा व हेलीचा जिथवर प्रयोग झाला होता, त्याचाही त्यानं नाश केला. सगळ्या प्रयोगावर कार्बन डायऑक्साईड फेरलं.

अंगात चढवलेलं सगळं काढून टाकून तो आपल्या गाडीकडं चालला असताना श्रीशा त्याला अडवती झाली,

"का हेलीची आणि माझी मेहनत वाया घालवलीस? तुलाच आणखी एक तसाच बॅक्टेरिया हवा होता ना?" ती ओरडली.

"त्या सगळ्याला आता वेळ नाही!" तो आपल्या गळ्यातील ती शिशी मुठीत आवळून ठाम बोलला.

"हेलीला बघणार नाहीस?" श्रीशानं त्याला भावूक विचारलं.

"राखून ठेव तिला." तो नजर वर करून ठाम बोलला.

"मला तिला न्यावं लागेल पोस्ट मार्टमसाठी... तू ही थांबावंस आता! काय आहे ते सांग. मी मदत करेन." शार्दूल बऱ्याच वेळाच्या त्याच्या शांततेनंतर बोलला.

आतावर तो हेलीपाशी थांबून  होता.

"तू थांब! यात पडू नको! नाही तर तुझाही मुलाहिजा राखणार नाही!" इब्लिसनं त्याला ठणकावत ताकीद दिली.

कर्तव्यदक्ष शार्दूल या धमकीनं भिणारा नव्हता. तो त्याला सामोरा गेला. त्याची ग्लॉक बाहेर आली. इब्लिसला त्यानं जीवे मारलं नसतं हे जरी खरं, तरी त्याचा पाय नक्कीच अधू केला असता जर इब्लिसनं एक पाऊल जरी पुढं टाकलं असतं, तर.

इब्लिसनं त्याला जुमानलं नाही. तो मारुतवेगानं त्याच्या दिशेनं धावला. त्यानं काहीतरी शार्दूलच्या पोटात खुपसलं. श्रीशा दचकलीच. अचानक झालेल्या हल्ल्यानं शार्दूलही धक्क्यात होता. तो गुडघ्यांवर कोसळला. इब्लिस बाजूला झाला व त्यानं आपल्या गाडीकडं रुख केला.

शार्दूलनं सपशेल धरणी धरली. त्याची शुद्ध हरपत चालली होती. श्रीशा त्याला बघत होती. ती अजूनही धक्यातच होती. परंतु घाबरण्याचं कारण नव्हतं. इब्लिसनं याहीवेळी 'सेडटिव्ह'चा वापर करून त्याला झोपवला होता. त्याची बेशुद्ध करणारी डाट शार्दूलच्या पोटाला अडकून लटकत होती...

◆◆◆

इब्लिस उभा होता तो अखिलीसच्या दारात. तिथं तैनात सिक्योरिटीजना तो एवढंच म्हणाला,

"तुमच्या बापाला जे पाहिजे ते माझ्याकडं आहे! इब्लिस आलाय म्हणून सांगा त्याला!" आणि त्यानं ती तांब्याची चेन उंचावली.

त्या साक्षात सैतानाला पाहून सगळेच गांगरले, गोठले होते. त्यातूनही एकजण पायांत प्राण आणून आत पळाला.

थोडा वेळ गेल्यावर इब्लिसच्या स्वागताला दस्तुरखुद्द अखिलीसच आला, आजानू बाहूं पसरून सुस्मित असा.

इब्लिसला त्याचं काही नव्हतं. त्याच्या चेहऱ्यावरची रेष हलली नाही.

अखिलीसनं त्याला आत घेतलं. एका निवांत खोलीत त्यानं इब्लिसला राऊंड् टेबलशी बसवलं. तो त्याच्या सामने बसला.

"हेच हवं होतं ना तुला? हेच ते बायोवेपन." भावनारहित इब्लिस बोलला.

इब्लिस हेली व नंतर जतीन यांच्या मृत्यूने स्वतःही जिंदा मुर्दा झाला होता. त्याच्या आवाजात अस्वाभाविक खर्जातील खोलपणा आला होता. त्या मुखवट्यातील मशीनमुळं तर तो आवाज अजूनच भेसूर व भयावह ऐकू येत होता.

अखिलीसला नव्यानं बनवलेला जिवाणू हस्तांतरित करून मूळ जिवाणू जतीन यांची धरोहर म्हणून स्वतःकडं ठेवायचा इब्लिसचा विचार होता. अखिलीसला सुपूर्द केलेला जिवाणू तापमान मेंटेन न केल्यानं मेलाच असता, कारण इब्लिस ही अधिकची माहिती त्याला देणार नव्हता व डेड बॅक्टेरिया हाती सोपवल्यानं जर्मन्सनीच मग अखिलीसचा निकाल लावून टाकला असता. जतीन यांच्यावरचा धोका सुद्धा यापद्धतीनं टळला असता.

यादरम्यान इब्लिस हे बायोवेपन मिळवू इच्छिणाऱ्या संबंधित जर्मन्सची ते बायोवेपन हस्तगत करण्यामागील मनीषा जाणून घेणार होता. ते संबंधित मानवजातीसाठी घातक असल्याचं दिसून आलं, तर तो त्या संबंधित जर्मन्सना ठार करून संपवणार होता. ज्यायोगे डेड बॅक्टेरियाचे रिमेन्ड् रेसिड्यूज वापरून तसाच डेडली बॅक्टेरिया ते जर्मन्स नव्यानं इन्व्हेंट करू नयेत. यानंतर ते रेसिड्यूज देखील नष्ट केले जाणार होते इब्लिसकडून. अशी इब्लिसची ही प्रमाणबद्ध योजना होती.

तो ओरिजिनल जिवाणू वापरून सुद्धा हे करू शकला असता, परंतु जतीन यांनी इतकी वर्षे जतन करून सांभाळेला जिवाणू जतीन यांची अमानत असल्यानं त्याला तो जिवाणू या सगळ्यांत नष्ट होऊ द्यायचा नव्हता. म्हणून त्याला त्याचा ड्युप्लिकेट पेअर हवा होता. रिप्रोडक्शन हे बॅक्टेरिया गुणधर्माप्रमाणं असल्यानं या कार्यास हेली व श्रीशाला खूप वेळ लागणार नाही असा त्याचा अंदाज होता. पण दरम्यान हे असं नको ते होऊन बसलं होतं. सारी योजना बाजूला सारून मग इब्लिस

जतीन यांची जिवाणूबंद कुपी लटकत असलेली तांब्याची चेन हाती धरून अखिलीस देखत येऊन बसला होता.

अखिलीसचा आशाळभूत हात चेनकडं झाला. एक हावरट झाक त्याच्या डोळ्यांत जमकत होती. इब्लिसला ती नजर अधिकच चीड आणून गेली. इब्लिसनं आपला हात मागं ओढला.

"राजन आणि हेलीला मारणारा कोण आहे?" इब्लिसचा भेदक सवाल.

अखिलीस हसून निवांत मागे रेलला.

"ज्याला तू मारलंस, जोनाथन; त्याचा हा सख्खा मोठा भाऊ!" अखिलीस बोलला.

"तू त्याला अपॉईंट केलंयस?" इब्लिस डेड सिरीयस होता.

"माझा त्याचा काही संबंध नाही. त्याचा त्याचा तो बदला घेतोय." अखिलीस हसून बोलला.

"मग माझी माणसं का? थेट मी का नाही?" इब्लिसनं घोगरं विचारलं.

"तुमचीही वेळ त्यानं ठरवली असेल मिस्टर हेडीस." अखिलीस हसला.

इब्लिसला जहन्नुमचा देव असं संबोधून त्यालाच कोणीतरी जहन्नुमला पोहोचवण्याच्या तयारीत आहे असा उपहास अखिलीस करत होता.

"कुणास ठाऊक तुमच्या नातेवाईकांना मारून तो तुम्हाला आधी तोच मानसिक त्रास देऊ इच्छित असेल, जो तुम्ही त्याला दिलात त्याचा भाऊ मारून?" अखिलीस किळसवाणं हसला.

"तर मग त्यानं तुझी तिथी पण निश्चित केली असेल?!" इब्लिस त्याला थेट म्हणाला.

अखिलीस क्षणभर चिडला. पण लगेच आपले भाव बदलत त्यानं पुन्हा ते हसरे केले.

"तुम्हाला त्याची चिंता नको." तो म्हणाला,

"आता तुम्हाला आपत्ती नसेल, तर ज्यासाठी प्रपंच मांडला ते मी घेईन म्हणतो." तो लोभी भाव दर्शवत होता.

इब्लिसनं काही विचार केला. त्याचा हात पुढं झाला. अखिलीसनं ती चेन हाती घेतली. त्याला लटकणारी सूक्ष्म व्हाईल तो डोळयांत लोभ आणून अधाशीपणे नजरेत भरून घेत होता.

तक्षणी इब्लिसनं त्याच्या कमांडर मधून नाईन एमएम गोळी फेकली. ती व्हाईल छेदत अखिलीसच्या कानापासून मागं गेली.

अखिलीसनं तडकून इब्लिसकडं पाहिलं. इब्लिसची दुसरी गोळी सुटली. अखिलीसची कवटी भेदून बाहेर पडली.

त्याचा एकाचवेळी संतापलेला, दचकलेला भाव त्याच्या मुखावर तसाच राहिला होता. कवटीची मात्र शकलं झाली होती.

अखिलीसचे प्रामाणिक बॉडीगार्ड्स म्हणजे त्यानं अपॉईंट केलेले मर्सिनरीज आत धावले.

इब्लिसला अटकाव करण्याची त्यांनी हिंमत नव्हती. कोणाच्यातही ती छाती नव्हती. इब्लिसच्या हाती त्याची कमांडर् आणि बाजूला निष्प्राण पडलेला अखिलीस या दृश्यानं ते जडावले गेले. इब्लिस एका एकाचा समाचार घेत त्यांना प्रत्येकी एक गोळीनं संपवू लागला. ज्या कुणाची उझी (सब-मशिनगन) त्याच्यावर रोखेल त्याला तो आधी संपवत होता. आठ-दहा मिळून असतील. पण ते मिळूनही

कोणीच इब्लिसला तोड नव्हते. त्यांची रिएक्शन टाईम इब्लिसपेक्षा धीमे होते मृतदेहांचा खच पाडून तो 'इब्लिस' तिथून निघाला.

बाहेरही त्याला काही आडवे आले. त्यांना श्वेत संगमरवरी लादीशी समतल करतच तो निघाला...

'कमांडर'ला 'इब्लिस' देखील का म्हंटलं जातं याची प्रचिती ते मर्सिनरीज चाखत होते...

रुद्र तांडव करत होता असं ते दृश्य होतं. आणि या तांडवाचा अंत हा विनाशकारीच असतो.

बुडणारा जसा वाचण्याच्या प्रयत्नांत हातपाय मारतोच, तत्सम इब्लिसपासून वाचण्याचा त्यांचा हा लटका प्रयत्न होता. कसंही करून इब्लिस हाथो आपण मरणारच याची नेनीव असून, तरी जगण्यासाठी ते लंगडी धडपड करत ते प्रयत्नरत होते... त्यात ते सपशेल अयशस्वी ठरत इब्लिस हाती आपले प्राण मुक्त करवत चालले होते.

रक्ताचा कारंजा उडत होता सर्वत्र... अखिलीसचं पांढरंशुभ्र घर लाल रक्तानं मलिन करत इब्लिस चालला होता. ते साफ करण्यासाठी आता कोणी तिथं जिवंत राहणार नव्हतं...

◆◆◆

गोलाएथ अखिलीसच्या अभद्र झालेल्या घरात उभा होता. रक्त सांडून ती जागा अस्वच्छ झाली होती. अखिलीसला असं मलीन घर अजिबात आवडत नव्हतं. पण ऑब्जेक्शन घ्यायला तो आता सजीव नव्हता.

गोलाएथची पुढची शिकार कोणीतरी मारली होती. हे कुणाचं कृत्य असेल याचा त्याला मागमूस होता. इब्लिसला आठवून त्याचा संताप... संताप झाला.

रक्ता-मांसाचा चिखल तुडवत त्या मृतदेहांना बुटांखाली चिरडत तो तिथून बाहेर पडला.

अखिलीस हे सावज त्याच्यासाठी खूप महत्त्वाचं होतं. त्यानं रिकार्डोला त्याच्या कामासाठी माणसं अरेंज करायला सांगितलं नसतं, तर रिकार्डोनं जोनाथनला इथं बोलावून घेतलंच नसतं. ना तो इब्लिसच्या हातून मारला गेला असता. म्हणून इब्लिसच्याही आधी त्याचा सर्वांत मोठा गुन्हेगार हा अखिलीसच होता. भले भौतिकदृष्ट्या वास्तवात इब्लिसच्या हातून जोनाथन मेला असला तरी. त्याचं अखिलीस नांवाचं हे सावज हेरून इब्लिसनं गोलाएथला आणखीनच खिजवलं होतं.

हा अखिलीस इब्लिसचाही मोठा दुष्मनच तर ठरला होता. त्याच्या वडिलांच्या जागी असणाऱ्या विभूतीचा जीव याच्या स्वार्थामुळं गेला होता. इब्लिसनं त्याला आपलीच शिकार म्हणून मारला होता. गोलाएथला डिवचण्यात इब्लिसला स्वारस्य नव्हतं. त्याला रस होता, गोलाएथचा जीव घेण्यात!

गोलाएथला सुद्धा आता अंतिम ध्येय उरलं होतं. इब्लिसचा खात्मा! इब्लिसची मौत!!

अखिलीसला मारून तो इब्लिसचा रोख करणार होता. इब्लिसला त्याला फुरसतीत मारायचा होता.

अखिलीसलाही त्यानं सेकेंड लास्ट ठेवला होता, कारण सगळ्याचं मूळ जरी तो असला, तरी तो कुठं सापडेल हे त्यास पक्के ठाऊक होते. कधीही त्यास धरून मारता येणे सहज होते. त्याहून अधिक म्हणजे अखिलीसला त्याला फुरसतीत मारायचा होता...

इतरांना शोधण्यासाठी त्याला रिकार्डो हवा होता. त्याचं अखेरपर्यंत जिवंत राहणं या कारणेच घडलं होतं. त्याची ऊपयुक्तता संपल्यावर त्याच्या आयुष्याची उपायोजिताही गोलाएथनं संपवली होती. त्याची पुढची शिकार तर इब्लिसनंच हाणली होती. आता त्याला एकच उद्दिष्ट उरलं होतं. त्यासाठीच तो आता चालला होता...

आत्तापर्यंत शोधाशोध करणे, माहिती काढणे या खेळात रिकार्डोची मोलाची मदत झाली हाती. आता तो नव्हता. इब्लिसला पाचारण करण्यासाठी त्याच्याकडं कोणता मार्ग शेष होता?

त्याच्याकडं काही युक्ती हमखास होती. तो आडदांड होता, पण म्हणून काही बिनडोक वा रेम्या डोक्याचा अलबत नव्हता.

जतीन यांचा मृतदेह त्यानं यासाठीच ताब्यात घेतला होता. त्या पवित्र मृतदेहाचा उपयोग आता तो 'इब्लिस'ला 'समन' करण्यासाठी करणार होता!!!

# १९. परिणीती...

राजनला गाठायला पोलीस हेडकॉर्टर्स होतं. जतीन यांना हेरायला सूर्योदय होतं. हेलीला साधायला रिकार्डोनं तिचा मोबाईल नंबर शोधून काढला होत, त्याच्या ओळखीच्या एका नेट कॅफेवाल्याकडून. त्याच्याकडं शहरातील सर्वांचे मोबाईल नंबर्स स्टोअर होते. बल्क मेसेजेस, जाहिराती वगैरे करण्यासाठी त्याला हा डेटा उपयोगी पडत होता. तो रिकार्डोच्या ओळखीत असल्यानं हेलीचा कॉन्टॅक्ट तिथून मिळवणं रिकार्डोला शक्य झालं होतं.

ती सोय इब्लिससाठी उपयुक्त नव्हती. इब्लिसचा ठावठिकाणा कोणाला माहीत नाही. तो दिसतो कसा याचा पत्ता नाही. त्यामुळं ना त्याचं संपर्क ठिकाण ना त्याचा संपर्क क्रमांक.

त्याला गाठायचा कसा. यासाठी गोलाएथनं युक्ती ठरवून ठेवली होती.

रिकार्डोच्या माहितीनं गोलाएथ ज्या बस्तीत राहिला होता, ती बस्तीच त्यानं आपल्या हुकुमाखाली घेतली होती.

जतीनचं निष्प्राण शरीर घेऊन तो एकटाच बस्तीत परतला तेव्हा मुखियानं रिकार्डोची आणि मुखत्वे त्याच्या बस्तीवासीयांची खबर पुसली होती.

आढेवेढे घेण्याची, खोटं बोलण्याची फितरत गोलाएथची नव्हती. त्याची ताकद भीमकाय होती व त्या ताकदीवर त्याचा आत्मविश्वास इतका होता, की त्याला खोट्याची मदत घेण्याची आवश्यकता नव्हती. रिकार्डोला आपणच जीवे मारल्याचं त्यानं सांगून टाकलं होतं. बस्तीवासीही मेल्याचं मुखियापासून लपलं नाही.

अर्थात; मुखिया तापला. गोलाएथनं त्याचा जिवलग मित्र मारला होता. याच्यामुळंच आपली कित्येक माणसं मेली. त्याचा प्रतिशोध तर घेणं प्राप्त होतं, मग भलेही हा गोलाएथ रिकार्डोला मुलाच्या जागी होता. मुलाचं कोणतं कर्तव्य त्यानं रिकार्डोसाठी पार पाडलं होतं? उलट त्यानंच त्याला मारून टाकलं. बदला तर घ्यावाच लागणार होता!

मुखियानं बंड पुकारलं. ते दोन क्षण सुद्धा टिकलं नव्हतं. गोलाएथनं बस्तीसमोर मुखियाचा अंत केला होता त्याच्या नेहमीच्या पद्धतीनं.

ते दृश्य बघून बस्ती भेदरून गेली होती. तलवारी, कोयते गळून पडले होते.

संघटित शक्ती ही कोण एक बलवानाच्या बाहुबळापेक्षा नेहमीच मोठी असते हे लोक अक्सर विसरतात. ते एकत्र असले, तरी त्यांना भीती ही वैयक्तिक अहिताची असते. ही भीतीच जिंकून जाते. स्वतःला संघटित म्हणवणारे वास्तविक कधी संघटित नसतातच. हेच कारण आहे, की प्रत्येकवेळी दांडगाई करणारे अतिरेकीच विजयी होतात.

इथंही तेच झालं होतं. गोलाएथच्या भीष्म अवेशासमोर बस्तीची संघटित शक्ती उत्तर देऊन गेली होती. त्यांनी त्याची शरणागती पत्करली होती.

या बस्तीच्या कमानद्वारावरच मग त्यानं जतीन सारस्वत यांचं निष्प्राण शव टांगलं होतं.

जतीन यांच्या पॅन्टच्या खिशात गोलाएथला मोबाईल आढळला होता. इब्लिसचा ठराविक नंबर माहीत नसल्यानं त्यानं जतीन यांच्या लटकलेल्या मड्याचा व्हिडीओ करून मोबाईल मधील  सर्व सेव्ह्ड् नंबर्सवर तो व्हिडीओ फिरवला होता. हे पाहून कोणी हिंमत करो न करो इब्लिस इथं येण्याची हिंमत

करणार हे गोलाएथला खात्रीशीर होतं. व्हिडीओत आपलं पाशवी, खुनशी, सनकी, क्रूर सुहास्य वदन दिसेल याची काळजीही त्यानं घेतली होती.

●●●

तो व्हिडीओ पाहूनच या बस्तीच्या प्रवेशावर कोपलेला 'इब्लिस' उभा होता. त्याची ओलावलेली दृष्टी हवेत झुलणाऱ्या जतीन यांच्या शवावर होती.

इब्लिस जडावला होता. हातपाय संतापानं धरधरत होते. डोळ्यांतून अश्रूधारा थांबायचं नांव घेत नव्हत्या. तो स्तब्ध होता. त्याचे पाय धूळ भरल्या जमिनीत रुतले होते जणू...

त्याच्या समोरच खुर्ची टाकून सिंहासनावर बसला असावा अशा अविर्भावात गोलाएथ बसला होता. तोंडावर मग्रूर हसू आणि डोक्यात तीव्र चीड घेऊन तो इब्लिसकडं पाहत होता. त्यानं हातात दाबलेल्या होत्या त्या दोन जाड साखळया. त्यांच्या शेवटाला हिंस्र पिसाळलेली कुत्री होती. सिहांनाही लाजवतील अशा त्या अजस्त्र कुत्र्यांच्या तोंडातून फेसाळ लाळ गरळत होती. ती आपलं सावज मारण्यासाठी पळण्याच्या प्रयत्नांत सुटण्याचा कयास करत होती. मात्र गोलाएथच्या जाड, ताकदी मुठीतून ती सुटत नव्हती. त्यांच्या आक्रस्ताळेपणानं त्या साखळयांचाच आवाज मोठा होत होता. चित्रविचित्र आवाज काढून ती कुत्री लाळ उडवत भुंकत होती.

इब्लिसला याचं काही नव्हतं. त्याच्या संवेदना हरवल्या होत्या. या जगाचा तो राहिलाच नव्हता. वेदना, दुःख यांच्या कुठल्या औरच आयामांत तो तरंगत होता. लटकला होता तो सत्यासत्याच्या दुनिये दरम्यान...

ज्याला तो बाप मानत होता त्याची ही अशी विटंबना...? का? काय गुन्हा होता त्यांचा? आपल्या सारख्या मुलाला त्यांनी बापाचं प्रेम दिलं, वाढवलं हे...? त्याची त्यांना ही अमानवी शिक्षा...?

इब्लिस दुःखात जळताना बघून त्यातून गोलाएथ असुरी आनंद घेत होता. तो आनंद त्याला अगणित वाढवायचा होता. गोलाएथनं देसी कट्ट्यातून छर्रा प्रवाहित केला.

छर्रा हवा कापत गेला व त्यानं जतीन यांच्या गळ्याभोवती गुंडाळलेली दोरी कापली. तो निस्तेज देह धरणीवर आदळला. शरीरातील रक्त केव्हाचं वाळून गेलं होतं. बॉडी रिगर् मॉर्टीस झाली होती. कडक असल्यानं लाकडाच्या ओंडका खाली पडल्या सदृश्य ते प्राणहीन शरीर मातीत पडलं होतं.

इब्लिस गोठलाच होता. जतीन यांचा आणखी एक अपमान आणि आता तर त्याच्या डोळ्यांदेखत. सगळं इतकं पटकन घडलं होतं, की जतीन यांचं शरीर झेलण्यासाठी जागचं हलायची सूदही त्याला झाली नव्हती.

ही विटंबना इथंच थांबणार नव्हती. इतका वेळ अडवून धरलेली हिंस्र कुत्री गोलाएथनं सोडून दिली. धावत जाऊन ती जतीन यांच्या प्रेतावर तुटून पडली. त्यांना फाडून खाऊ लागली. तोडलेला एक एक लचका इब्लिसच्या काळजाला घायाळ करत होता. जतीन यांच्या शरीरातून रुधिराचा टिपूस पडत नसला, तरी इब्लिसचं हृदय असंख्य चिरलं जाऊन लहुलुहान होत होतं... तो ते भयानक,

विभत्स दृश्य पाहून त्राण जाऊन तो गुडघ्यांवर आला. त्याची असहाय्यतेनं मान खाली गेली...

परंतु, हे सगळं काही क्षणच...

जतीन मारले गेले तेव्हा आपण तिथं नव्हतो. पण इथं जर हजर असून आता आपण काही करू शकलो नाही, तर याच्यासारखी दुसरी लाज नाही! असं त्याच्या डोक्यातला 'इब्लिस' त्याला सांगत काहीतरी करण्यास उचकावत होता. त्या प्रेरणेनंच त्याच्यात धीर आला. बळ संचारलं. लुळं पडलेलं शरीर चेतनेनं सळसळत गेलं. वीज संचारली त्याच्यात!

त्याचा हात त्याचं एक अवयवच असलेल्या कोल्ट कमांडरला गेला. कमांडरनं दोन गोळ्या ओकल्या. त्या जाऊन दोन्ही कुत्र्यांच्या मस्तकी भिडल्या. भूंकणारी, अधाशीपणे जतीन यांचं प्रेत ओरबाडत जाणारी ती भुकेली हिंस्र पिसाट कुत्री जाग्यावर शांत झाली. विव्हळणंही त्यांच्या नशिबी आलं नव्हतं.

इब्लिसची कमांडर् तशीच गोलाएथच्या दिशेनं फिरली. गोळी सुटली, पण ती गोलाएथला भेदण्यात असमर्थ ठरली.

या आयुष्यात आज तागायत असं प्रथमच झालं होतं... इब्लिसच्या गोळीला पहिल्यांदा कुणाकडून तरी चुकवलं केलं होतं. एरव्ही त्याची एकही बुलेट आपलं काम करण्यास कधी चुकली नव्हती... पण... पण कधीतरी कोणत्यातरी गोष्टीचा प्रथम असतोच.

गोलाएथ वारा प्यायल्यागत इब्लिसची गोळी चुकवून त्याच्या समोर प्रकट झाल्यागत दत्त म्हणून येऊन उभारला. त्यानं त्याचा देसी कट्टा इब्लिसच्या माथी टेकवला. तो ट्रिगर खेचणार; इतक्यात इब्लिसचा मुखवटा वर झाला. त्याचे

लालेलाल डोळे गोलाएथच्या डोळ्यांना भिडले. गोलाएथ पाशवी भाव उद्धृत करत खुनशी अशा चमकणाऱ्या डोळ्यांनी कुत्सित हसत होता. इब्लिस या दंतकथेला आपल्या गुडघ्यांवर आणल्याची ती चमक होती. आपला बदला पुरा होणार याचा तो आनंद होता...

त्याला हे गावी नव्हतं, की कार्यपूर्ती संपन्न झाल्याखेरीज उत्सव साजरा करू नये. तीच चूक तर गोलाएथ करत नसावा...? की... की त्याला खात्री होती, त्याच्या विजयाची? त्याच्या कार्यसिद्धीची...?!

इब्लिसनं कट्टा आपल्या हाती फिरवला. त्याचा डावा तळपाय वर आला. गोलाएथच्या जबड्यावर खालून जोरात बसला. गोलाएथ मागं भेलकांडला. त्यानं स्वतःला सावरलं. इब्लिसला मौका होता. त्याला तो हातून जाऊ द्यायचा नव्हता. गोलाएथ काय माणूस आहे ते त्याच्या आतावरच्या कारस्थानांवरून आणि त्यानं केलेल्या खुनांवरून याची प्रचिती इब्लिस घेऊन चुकला होता. त्यानं अधिक तंडत बसून वेळ घालवायचा नाही असं ठरवलं.

त्याची योजना गोलाएथ मात्र पद्धतशीर पार पाडून देईल याची शाश्वती नव्हती. तो कडवी झुंज देणार होता. त्याला इब्लिसचा समूळ नाश जो करायचा होता...

ही लढाई कदाचित इब्लिसची अखेरची लढाई साबीत होणार होती. गोलाएथचं नियोजन तर हेच होतं...

मागं जाताना स्वतःला सावरून गोलाएथ तिथूनच हवेत झेपावला. इब्लिसनं कट्ट्यातून आणि त्याच्या कमांडर मधूनही एक एक गोळी दागली होती. गोलाएथनं कलाबाजी करून त्या बुलेट्स डॉज केल्या. भूमीवर पाय टेकवून त्यानं

शरीराला अजून एकदा हवेत उंचावलं व इब्लिसच्या दाडवानावर एक जोराचा मुष्टि आघात करून तो स्थिर झाला. इब्लिसचा मास्क चटकला जाऊन मस्तकापर्यंत तो चिरत गेला. डोळ्यांतील लाल दिवे विझले. गोलाएथनं उजव्या कोपराचा इब्लिसच्या तोंडावर मोठा आघात केला. मास्क अजूनच तडकला. त्याचे काही तुकडे जखमेची खपली निघावी तसे निघून खाली पडले.

त्याच्या इतक्या आघातांमध्येच दुसऱ्या एखाद्यानं यमाला जवळ केलं असतं. इब्लिस काही अलगच मिट्टीचा बनला होता. आजवर त्यानं अनेकांना अंगावर घेतलं होतं. इतक्याशा मारानं त्याला काय होणार होतं...?

अशी झुंज त्याला आजवर एकानंच दिली होती. जोनाथन नांव त्यांचं. गोलाएथला लढताना पाहून त्याचंच नांव आणि विचार इब्लिसच्या डोक्यात आला. जोनाथनचा जोरही त्यानं पाहिला होता. त्यानंतर हा दुसरा. हा त्याचाच मोठा भाऊ. जतीन यांना मारण्याचा राग नसता, तर त्यानं गोलाएथची मनभरून प्रशंसा केली असती.

इब्लिसकडून स्तुती ऐकण्याचं नशीब गोलाएथचं नव्हतं. त्याच्या नशिबी इब्लिसकडून मौतच लिहिली होती. इब्लिस तरी हेच समजत होता... कारण त्यानं गोलाएथचं नांव कधीच त्याच्या मृत्युवहीत लिहिलं होतं व ते अधोरेखित देखील केलं होतं.

इब्लिसनं स्थिर होण्याचा प्रयास निश्चित करून कमांडर् उंचावली. आपला उरला सुरला मास्क त्यानं काढून जमीनदोस्त केला.

"हा... तर फेमस इब्लिस असा दिसतो तर..." गोलाएथनं चिडवणारी टिप्पणी केली.

'इब्लिस' आता 'रवी'चा चेहरा घेऊन होता... रवी मेलाच होता जतीन यांच्या मृत्यूसोबत. आता जो उभा होता त्याचा चेहरा रवीचा असला, तरी तो 'इब्लिस'च होता. इब्लिसचा मुखवटा नसलेला 'खरा', 'इब्लिस!'

इब्लिसच्या कमांडर् मधून पुनः गोळी सुटली. यावेळी एका मागून एक अनेक. मॅग्झिनमध्ये उरलेल्या जेवढ्या गोळया होत्या, एका मागून गोलाएथकडं प्रवास करू लागल्या. गोलाएथ त्या चुकवतच होता.

एका जाग्यावरून अदृश्य होऊन दुसऱ्या ठिकाणी प्रगट होत असल्यासारखा त्याचा गोळया चुकवण्याचा चपळ वेग होता. एखादं पिशाच्च मानगूट पकडाच्या ताकमध्ये होतं. संधी मिळाली, की गोलाएथ नांवाचं हे पिशाच्च इब्लिसच्या नरडीचा खोट घेण्यास टपलं होतं.

हे एवढं जाड धुड घेऊन तो इतका लवचिक कसा याचं न राहून इब्लिसला आश्चर्य वाटलंच. इब्लिस हार मानणार नव्हता. तो इथं आला होता, तर गोलाएथचं जीवितकार्य तो संपवूनच जाणार होता. गोलाएथचा कट्टा त्याच्याकडं होताच. त्यातील छर्रे इब्लिसनं गोलाएथवर बरसवले.

गोलाएथनं गरुडगतीनं तेही मोठ्या शिताफीनं टाळले. इब्लिसकडे शस्त्रे असल्याने त्याच्याकडे जे अधिकचे हातचे होते, ते गोलाएथनं निरस्त केले होते. आता तोही निहथ्था होता, गोलाएथसारखा. अंतिम छर्रा टाळण्यासाठी कुदलेला गोलाएथ पाय जमिनीला लागताच आपली दिशा बदलत इब्लिसवर झेपावला.

आपला उजवा गुडघा त्यानं इब्लिसच्या नाकावर मारला. इब्लिसचं ओठही दातांवर जोरात आदळले. दात, ओठ, नाक सगळीकडून भळाभळ रक्त वाहू लागलं. तो आघात इतका मोठा होता, की इब्लिसचे समोरचे दात हलू लागले

होते. कळ सनकत डोक्यात गेली होती. डोळ्यांसमक्ष काही पळ अंधारी साचली त्याच्या. मागे गेलेल्या त्याला गोलाएथनं पुन्हा आपल्याकडं खेचलं. गोलाएथ त्याच्यावर मोठा आघात करायच्या बेतात होता. परंतु इब्लिसनं मात्र या असंधीला संधीत बदलायचा निश्चय केला.

ही संधी इब्लिस जाऊ देणार नव्हता. वेगानं तो गोलाएथच्या दिशेनं जात होताच, त्यानं आपला कोपर घुमवून गोलाएथच्या टाळूवर हाणला. गोलाएथला चांदण्या दिसल्या. तो अस्थिर झालाय हे ध्यानात घेऊन इब्लिसनं उजवा कोपर तसाच मागे खेचून गोळी सुटावी इतक्या जोरात कानशिलावर आदळला. इब्लिसच्या हाताची पकड सुटून गोलाएथ कडेला धडपडला.

हीच वेळ साधून इब्लिसनं कमांडरची स्पेअर मॅग्झिन रिप्लेस केली. आणि... त्यानं नऊच्या नऊ राऊंड्स गोलाएथच्या वायटल पॉईंट्सवर दागण्यास सुरवात केली. गोलाएथला नरक यातना देण्यासाठी त्यानं मॅगझिनच्या फुल कपॅसिटीचा वापर केला होता. गोलाएथचा एक एक अवयव जवाब देत चालला होता. तशातही उठण्याची, इब्लिसला मारण्याची धडपड गोलाएथची चालूच होती. इतक्यात एक अखेरची नाईन एमएम गोलाएथच्या डोक्यात घुसली. रक्त-मांस यांचे तुकडे-शिंतोडे घेऊन ती दुसऱ्या बाजूनं बाहेर पडली. ती भूमीत जिथं घुसली, तिथंच गोलाएथचं डोकं आदळलं. ती गोळी जमिनीत जास्तच धसली. डोळे मोठे करून गोलाएथची ती विकृत आकृती पडली. त्याचा जीव कधीच शरीर सोडून उडाला होता. गोलाएथ या अजस्र दानवाच्या इवलीशी प्राणज्योत अखेर मालवली...

'इब्लिस'ने गोलाएथला 'जहन्नुम'चा रस्ता दाखवला होता!

इतक्यानं इब्लिसच्च्या जीवास शांती मिळाली नव्हती. त्यानं अजून एक मॅग्झिन बदलली. नऊ एम्युनेशन्सची ती फुल्ली लोडेड मॅग्झिन. त्यांतील गोळ्या अंदाधुंद त्यानं गोलाएथच्या हृदयात झोकल्या. हा राक्षस जगण्याची इवलीशी आशाही त्याला सोडायची नव्हती.

लढायला काय तो कितीही वेळ लढत बसला असता. पण ही खेळण्याची वेळ नव्हती. बापाला मारलेल्याला ज्यादा वेळ जिवंत न ठेवण्याचाच त्यानं निर्धार केला होता. वडीलच नव्हे, तर सूर्योदय मधील त्याची अनेक भावंडं या गोलाएथचं भक्ष्य बनले होते. त्याचा राग, त्याची खदखदही इब्लिसला मस्तकसुळ उठवत होतीच.

इब्लिसनं गोलाएथसाठी अजीर्ण बनण्याचं निश्चित केलं होतं. त्याला होताहोईल तितकं जलद ठार करण्याच्या हेतुस्तव त्यानं म्हणूनच लवकरात लवकर संधी निर्माण करून गोलाएथला अंतिम क्षण दाखवला होता.

अखिलीसनं, रिकार्डोनं इब्लिसबद्दल बजावून गोलाएथनं इब्लिसला हलक्यात घेतलं होतं, तेच त्याला नडलं होतं. आणि आता तो आपल्या भावाच्याच वाटे अखेरच्या प्रवासाला लागला होता!

इब्लिसला अटकाव करायला बस्तीचं कोणी सरसावलं नाही. एकतर इब्लिसशी वाकडं घेऊन त्याच्या तोंडी कोण जा? शिवाय इब्लिसनं गोलाएथला मारून त्यांच्यावरची संक्रांत आपसूक टाळली होती यास्तव ते त्याच्याप्रती कृतकृत्यच होते...

इब्लिस मग धावला ते आपल्या प्रेमळ पित्याच्या त्या पवित्र निर्जीव देहाकडं.

तिथली कुत्र्यांची प्रेतं त्यानं उचलून फेकून दिली. आपल्या मेलेल्या बापाला त्यानं कवेत घेतलं. मांडीवर घेऊन कवटाळून तो आक्रोश करत रडू लागला. इब्लिसला रवी म्हणून जिवंत ठेवणारा एकमेव दुआ तुटला होता. इब्लिस याला स्वतःला जबाबदार धरून राहणार होता आयुष्यभर...!!!

त्याचा पिता त्याच्या कानात काही कुजबुतोय असं त्याला भासू लागलं... त्याचा पालनकर्ता त्याला सांगत होता...

"बाळ... ही माझी कुर्बानी आहे... मी जिवंतपणी अनेकदा प्रयत्न करून तुझ्यातला सैतान संपवू शकलो नाही... मी मेल्यानंतर तरी तुला अहिंसेचं महत्त्व पटेल. हिंसा कोणाचंच भलं करत नाही. हिंसा ही एक मानव मारत नाही, तर त्याच्यासोबत संपूर्ण मानवतेचा विनाश करत असते. हे तुला उमगावं म्हणून हे माझं बलिदान... किमान आता तरी तू हिंसेचा मार्ग सोडशील माझ्या मुला...

"आजवर मी तुला जे काही समजावत आलो ते आठव... आणि आता इथून पुढं लक्षात ठेव...त्याप्रमाणं तशी वाटचाल कर..."

इब्लिस पित्यानं दिलेला एक एक संदेश मनाच्या पटलावर आठवणीच्या स्वरूपात घोटवत होता. त्याच्या जोरावर तो आपल्या वडिलांना जिवंत करण्याचा यत्न करत होता... त्याला वडिलांचा आवाज ऐकू येत होता. कधीकधी सांगितलेलं गुह्यज्ञान आज त्याला आठवत होतं. आताही ते त्याच्या कानाशी तसंच बोलत आहेतसं त्याला वाटत होतं. कधीतरी ते त्याला म्हणाले होते...

"इथे जगण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे... हो, अगदी गुन्हेगारांना सुद्धा. त्याचा तो अधिकार आपण हिरावून घेऊ शकत नाही. त्यांच्या दुष्कृत्यांसंबंधी त्यांना योग्य शिक्षा देणं हे काम न्याय व्यवस्थेचं आहे, की कोणाला दोषी ठरवायचं

आणि कोणाला शिक्षा करायची हे ठरवायला लोकशाहीत न्यायालयं आहेत. हा, पण जर ही  न्याय व्यवस्थाच दूषित झाली असेल, तर नागरिक म्हणून ती सुधारण्याचं आपलं कर्तव्य हमखास आहे. परंतु हिंसेची प्रतिन्याय व्यवस्था तयार करून नाही, तर दूषित झालेली न्याय व्यवस्था बरखास्त करून ती नव्याने मानवतेच्या, समतेच्या मूल्यांवर पुनर्निर्मित केली गेली पाहिजे."

इब्लिस जेव्हा कधी त्यांना म्हणायचा, की सत्याच्या संरक्षणासाठी त्यानं शस्त्र उचललं आहे, त्याचे वडील त्याला म्हणत,

"सत्याची लढाई कधी अस्तित्वाची होते आणि अस्तित्वाची लढाई कधी स्वार्थाची बनते हे कळत नाही. जेलमध्ये राहून तू एलएलबी केलंस, तरी हाती शस्त्र धारण केलंस? कायद्याच्या मार्गानेही सत्याला प्रकाशमान करत राहू शकतोस. पण तू तो मार्ग नाही निवडलास कधी... परत फिरण्यासाठी नेहमीच वेळ असतो मुला. फिर मागे!..."

त्यानं नेहमीच त्यांचा हा मायेचा सल्ला प्रेमानं व आदरानं धुडकावून लावला होता... त्याची परिणीती...? त्याच्या पित्याचा मृत्यू. आणि त्यांचं निश्चल, निष्प्राण शव छातीशी घट्ट कवटाळून आज इब्लिस रडत बसला होता...

अभिषेक घालत होता आपल्या चर्मचक्षुजलामृताने त्या पवित्र मृतदेहाला... न जाणो किती वेळ... न जाणो किती वेळ...

आता दुःखाक्रोश करून काय उपयोग होता पण; जे होऊ नये ते होऊन बसलं होतं... त्या अपराधबोधाच्या, आपल्या बापाकडं प्रायश्चित्ताची याचना करणाऱ्या त्या टिपूसांना काहीच किंमत नव्हती...

# २०. शाश्वत...

इब्लिस जतीन यांच्या चितेला डोळयांत साठवत होता. त्याच्या अश्रूंनी ही धगधगणारी चिंता विझणारी नव्हती.

जतीन यांची भडकत पेटत जाणारी चिता पाहून काही प्रसंग धुंदल्या त्याच्या डोळयांत रतळत गेले...

रवीचा इब्लिस म्हणून वावरण्याचा हा सुरवातीचा काळ...

एक गुन्हेगार त्यानं कमांडरच्या गोळीनं मारला. हे घडलं होतं ते जतीन यांच्या समोरच.

त्यांनी इब्लिसला त्यांच्या ऑफिसला बोलवलं आणि त्यांनी त्याची शाळा घेतली होती...

इब्लिस त्याच्या मित्रानं उभारलेल्या गुन्हेगारीच्या साम्राज्याला सुरुंग लावत होता. परंतु हे कृत्य संवैधानिक व कायद्याच्या दृष्टीनं गुन्हाच होतं. एक गुन्हा संपवण्यासाठी आपण गुन्हा करावा हा विचारच बालिश आहे हे जतीन त्याला कसोशीनं समजावण्याचा प्रयास करत होते. यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा दाखला देऊन इब्लिस आपल्या कर्माचं जस्टीफिकेशन देऊ पाहत असता, जतीन यांनी त्यातही त्याची कानउघडणी केली होती... ते समजावत होते आणि रवीरुपी इब्लिस ते शांतचित्ते ऐकत होता,

'रवी, छत्रपती शिवाजी महाराज महान का होते माहिती आहे? कारण त्यांनी शक्तीचा मद कधी मस्तकात शिरू दिला नाही, ना त्यांच्या मावळयांनी. महाराजांचंच अनुकरण त्यांच्या सोबत्यांनी केलं ते असं. ना की न्यायाच्या

नांवाखाली ते बेभान सुटले. आपण ही तेच करावं. काळ ध्यानात घ्यावा. त्यानुसार लढा असावा. काळानुसार न्याय बदलतो आणि न्यायानुसार नियम बदलतात हे आपण ज्ञानात घेतलं पाहिजे. धर्म; इथं मी धर्म न्याय या अर्थानं घेतोय. सांप्रदायिक अर्थानं नाही. तर धर्म आणि सत्य हे काळानुरूप बदलत असतात. आधुनिक धर्माला आपण ऐतिहासिक धर्माचे नियम नाही लावू करू शकत. पुराणमतवादी नियम आधुनिक भारताला कसे लावता येतील रवी?

'पूर्वी जेव्हा न्याय कोणत्याही संवैधानिक चौकटीत बंदिस्त नव्हता, तेव्हा सत्यासाठी शस्त्र उचलणं संयुक्तिक असेल. आजच्या काळी तसे ते नाही! आजचे स्वतंत्र भारताचे म्हणून काही नियम, कायदे कानून आहेत. आजच्या काळाला अनुसरून जर सत्याची पाठराखण करायची असेल, तर त्याला मार्ग आहे तो म्हणजे सत्य बोलणे. ना की शस्त्र चालवणे. संरक्षणासाठी शस्त्र हाती घेण्याचेही काही नियम आहेत. मार्ग आहेत. ते सर्व तुही जाणतोस. ते मार्ग सोडून तू कायदा हाती घेतोस हे बरं नाही!

'सत्य न्याय व जी भ्रष्ट नसेल, जी मत्सराच्या, वैमनस्याच्या, द्वेषाच्या, हिंसेच्या स्तंभांवर उभारलेली अशी न्यायव्यवस्था तर नसावीच, परंतु अशा विचाराने कार्य करणारी प्रति-न्यायव्यवस्था, न्यायप्रणाली देखील नसावी. अराजकता माजेल अशाने. आणि हा देश नष्ट व्हावयास वेळ लागावयाचा नाही तेव्हा! वेळीच थांब आणि तुझीही प्रति-न्यायाधीश बनण्याचं खुळ डोक्यांतून काढून टाक. आणि संविधानावर आधारित त्या नियमानुसार निर्माण झालेल्या आपल्या या पोलीस यंत्रणा, तपास यंत्रणा या न्यायव्यवस्थेवर विश्वास ठेव! सर्वच भ्रष्ट नसतात अरे. मोजके असतील, परंतु कोणीतरी या व्यवस्थेत चांगले असेल

आणि आवर्जून असतातच, आहेतच! त्यांच्यावर आपल्याला विश्वास ठेवायला हवा. अखेर हेच लोक मानवतेची खरी आशा आहेत!

'बाळ, भारतात अनेक संप्रदाय जन्माला आले. तरी त्या सर्वांच्या नीतिमूल्याचा मुख्य पाया हा अहिंसेचाच आहे. दया, क्षमा, शांती, करुणा, समता, सौदार्य आशा जीवनमूल्यांवर तर अनेक पंथ निर्माण झालेली ही आपली संपूर्ण एकत्रित भारतीय संस्कृती खंबीर उभी आहे.

'प्रेम आणि करुणा यांचा संदेश देणारा हा आपला भारत देश! आपणच असं असंयमी वागून कसं चालेल? हे जग किंचित तरी आपल्याला गांभीर्याने घेईल का? हत्यारांची भाषा आपली नाही! हत्यारे असावीत, परंतु ती स्वरक्षणासाठी; दुसऱ्यांवर आणि आपल्याच बांधवांवर उगारण्यासाठी, अविवेकी, अविचारी चालवण्यासाठी नाही!

'आपली संस्कृती धीरोदात्त, सर्वांना सामावून घेणारी आहे रवी! द्वेष आणि हिंसेचा पुरस्कार करून आपण आपल्याच संस्कृतीचा, भारतीय असल्याचा अपमान करतोय.'

चितेच्या ज्वाळांतून उठून जतीन इब्लिसला आत्ताही उपदेश करत आहेत असं इब्लिसला भासत होतं. त्याला जतीन यांचा मूक संदेश ऐकू येत होता... ते त्याला म्हणत होते,

'समकालीन इतर सर्व संस्कृती नाश पावल्या, तरी आपली भारतीय संस्कृती इतकी वर्षे का टिकून आहे याचा कधी विचार केला आहेस कधी? ती टिकून आहे, कारण आपण आपल्यात येणाऱ्यांना सामाहित करून घेतो. इतरांप्रती आपण सहिष्णू आहोत, त्यांना आपल्यात सामावून घेतोय आणि यामुळंच

आपल्या संस्कृतीत नवनवीन भर पडत गेली. म्हणूनच आपली संस्कृती प्रगत होत गेलीये. जी गोष्ट सतत अद्ययावत होते, ती काळाच्या ओघातही नष्ट नाही होत. आपली संस्कृती अशाच विविध लोकांमुळं अद्यतन होत गेली आहे. हे नेहमी ध्यानात ठेव. संघर्ष असावा, पण वाईटाप्रती. अन्याया विरुद्ध संघर्ष जरूर करावा. परंतु आपल्यावर खरंच अन्याय होतोय का हे समजण्याची देखील बुद्धी हवी. सारासार विचार व्हावा. बाहेरून येणारं जर चांगलं असेल, तर त्याला नक्की बाहुत घ्यावं. उन्नतीच होईल!'

'रवी, तू भेदाभेद करत नाहीस हे मला ठाऊक आहे, पण तू जी हिंसा चालवली आहेस ती तू थांबवावंस असं मनोमन वाटत आलं आहे. तुला मी हे अनेकदा सांगून झालं आहे. तू ऐकत नाहीस. मी गेल्यावर तरी तू माझा, माझ्या शब्दांचा विचार करशील, मान राखशील अशी खात्री आहे. म्हणून मला माझं बलिदान देणं आवश्यक वाटलं. मी असं जाऊन तुझ्या प्रेमापोटी अनाथालयाप्रती माझं असलेलं कर्तव्य त्यागलं असं वाटून घेऊ नकोस. माझ्या पश्चात तू सर्व मुलांची वडिलांच्या मायेनं काळजी घेशील ही खात्री आहे म्हणून मी हे पाऊल उचलण्याचं धाडस केलंय.'

अखेर जाताना जतीन यांनी इब्लिसला निर्वाणीचा संदेश दिला होता,

'रवी, सर्व तर आपलेच आहेत. आपल्याला काही हक्क नाही कोणत्याच कारणासाठी इतर वर्ण-वंशाच्या लोकांचा नाश करण्याचा, किंबहुना तसा विचारही करण्याचा. आपण तसं केलं, तर मग जर त्याला प्रतिउत्तर म्हणून त्यांनी आपल्या नाशाची कामना केली, तद्वत कृती केली, तर त्यावेळी त्यांच्यावर बोट ठेवता येणार

नाही! त्यांना दोषी ठरवता येणार नाही. अराजकता माजेल अशानं. मानव समाज नष्ट होईल...

'कोणत्याही कारणे कायदा हाती घेण्याचा अधिकार आपल्याला नाही. न्याय मिळवून देण्यासाठी न्यायव्यवस्था व न्यायपालिका आहेत.'

'तू हिंसा बंद करावीस म्हणून वेळोवेळी तुला इतकं सांगून तू थांबत नाहीयेस, रवी... माझ्या वडिलांनी मला दिलेलेला एक महत्वाचा बोध, जो आजवर मी पाळतो आहे, तो बाप म्हणून आज मी तुला सांगतो, ऐक; 'या अथांग आकाशाखाली, या विस्तीर्ण भूमीवर आपण सर्व वेगळे दिसत असलो, तरी एकच आहोत!

'रिमेंबर् माय चाईल्ड्, अंडर दि अनफॅदोमेबल स्काय, ओव्हर दि कमोडियस अर्थ, वी आर ऑल, बट दि वन!'

'रवी; एट दि एन्ड; देअर इज ओन्ली रेस इन ह्यूमन् स्पिसीज्, अँड दॅट इज...

'ह्यूमन्!'

जतीन यांनी न उद्धृत केलेले शब्द परंतु, आपल्या कृतीतून दिलेला संदेश इब्लिसच्या मनात दडे देत होता...

'रवीनं इब्लिसचा मार्ग चोखंदळला नसता, तर जतीन यांनीही आत्मबलिदान केलं नसतं.' हा स्वतःला दोष देणारा स्वतःचाच आवाज त्याच्या कानी सतत घुमत होता.

त्या जळणाऱ्या चितेसोबत रवी मधला इब्लिसही जळत होता. मागे उरत होता... तो रवी...! शुद्ध रवी...!!

अखेर विस्तव निवला.

रवी निष्पाप, विशुद्ध मन घेऊन आपल्या गाडीतून निघाला. जतीन वेळोवेळी आपल्याला काय सांगू पाहत होते, त्याची उमज आज त्याला होत होती. त्यांच्या बोलण्यात सुचकपणे त्या जिवाणूबद्दलची दक्षता वेळोवेळी उद्धृत होत होती. जी त्या प्रासंगिकतेत इब्लिसच्या/रवीच्या ध्यानात येत नव्हती.

आज त्याला कळत होतं, जतीन हे अशी अहिंसेची शिकवण त्यास देत असतानाच त्याला एकरूपतेबद्दलचा धडा देखील देत असत. त्या एथनिक बायोवेपननं होऊ शकणारा नाश आणि ते बनवण्यामागील उच्च-नीच्चतेची भावना, वर्णद्वेषाची भावना या विरुद्ध ते पदोपदी बोलत असत. पुढे असं काही घडू घातलं, तर कोणासही त्याचे अरिष्ट उत्पन्न होऊ नये ही प्रामाणिक भावना त्यांची असायची. त्यांनी म्हणूनच ते बायोवेपन सर्वांपासून लपवून ठेवलं होतं...

प्रसंगा-प्रसंगाला आपल्या वडिलांनी आपल्याला सर्वसमावेशकता, सहिष्णुता, अहिंसा यांची शिकवण दिली आहे याची त्याला त्यांना गमावल्यावर जाणीव झाली होती.

डोळ्यांतून ओघळलेले उष्णाश्रु त्यानं दंडाने पुसले. हात खाली झाला तेव्हा त्याचा चेहरा ठाम निश्चयानं उजळला होता...

जतीन यांचे स्वतःहून क्रियाकर्म आटोपून 'रवी' (आता इथून पुढे रवीच!) इब्लिसच्या सिक्रेट बेसवर परतला. त्याला पाहून न ओळखल्यानं श्रीशा लढाईच्या पवित्र्यात आली.

"रिलॅक्स श्री!" रवी धीरोदात्त तिला म्हणाला. त्याचा आवाज मलूल होता.

त्याचा मुखवटा नसल्यानं मशीनचा आवाज नव्हता. तरी त्याच्या मूळच्या आवाजाचा पोत आणि त्याहून आपुलकी श्रीशाला ध्यानात आला.

"इ... इब्लिस...?" ती आश्चर्य संमिश्र भीतीनं बोलली.

तिच्या हातातले प्राण गेले. तिची बंदूक खाली झाली.

"इब्लिस मेला श्री. त्याच्या बापासोबत त्याचीही चिंता जाळून आलोय मी. आता उरलाय तो माझ्या बापाला हवा होता तसा, रवी!" तो हरवून बोलला.

"काय झालंय?" ती रडल्यागत ओरडली.

"शार्दूलला सोडून दे!" त्यानं तिच्या प्रश्नाला उत्तर न देता आदेश दिला.

शार्दूलला बेशुद्ध केल्यानंतर तो इब्लिसच्या कामात आडकाठी करू नये म्हणून त्याला बेसवरच डांबण्यात आलं होतं.

तिनं हुकुमाची तामिल केली. शार्दूल बाहेर आला. रवीनं त्याच्याशी आपली अपराधी नजर मिळवली. शार्दूलला ती अपराधबोधानं ओतप्रोत दिसली.

"इब्लिस?" त्याच्या तोंडून आपसूक बाहेर पडलं.

"नाही! रवी!" रवी ठसवत बोलला.

"हेलीला..." शार्दूल उच्चारला.

"पोस्ट मार्टम करायचा असेल, तर प्रोसिजर प्रमाणं करावा. पण आता त्याचा काही उपयोग नाही. तिचे गुन्हेगार इब्लिसनं संपवलेत!" रवी उदास म्हणाला,

"पण तुमची प्रोसिजर झाली, की तिला अग्नी देण्याचा अधिकार द्यावा ही विनंती आहे!" रवी मिन्नत करत बोलला.

"तुम्हाला सोबत यावं लागेल ठाऊक आहे ना?" शार्दूल आस्तेवाईक बोलला. रवीसाठी त्याला कितीही वाईट वाटत असलं, तरी त्याला आपलं कर्तव्य तर पूर्ण करावंच लागणार होतं.

रवीची मान आपसूक हलली. टिपूस गळले. उष्ण अश्रूधारा गालांवरून मार्ग काढत धरतीला जवळ झाल्या.

"आणखी एक विनंती आहे." रवी बोलला.

"बोला." शार्दूल त्याला समजून घेत म्हणाला.

"मला थोडा वेळ हवाय." त्यानं याचना केली.

"मला वचन द्या. तुम्ही कायदा हाती घेणार नाही!" शार्दूल त्याला वचनात बांधण्या हेतुस्तव बोलला.

"कायदा हाती घेण्यासारखं आता काही राहीलं नाही." तो खिन्न बोलला.

"मग ठीक आहे. मला माहित आहे तुम्ही वचन मोडत नाही. तुम्हाला दिला वेळ. माझ्या जबाबदारीवर!" शार्दूल गंभीर बोलला.

उपकार करत असल्याचा कोणताच अविर्भाव त्याच्या बोलण्यात नव्हता.

"थॅंक्यु." उपकृत होत रवीनं शार्दूलचं अभिवाद केलं व लगेच त्याचा सूर माफीचा झाला,

"माफ करा. मी तुमच्यावर हल्ला केला..." तो अपराधी बोलला.

"अहं. तो इब्लिस होता!" शार्दूल रवीला दिलासा देत व समजून घेत म्हणाला.

रवीनं निपचित पडलेल्या हेलीवर नजर टाकली. त्याचे डोळे अजूनच भरून डबडबले.

◆◆◆

पुनःश्च रवी जतीन सारस्वत यांच्या सूर्योदय कार्यालयाच्या खोलीत उभा होता. साफ स्वच्छ करून घेतलं होतं त्यानं आश्रमाचं ते कार्यस्थल. याच दरम्यान रिकार्डोचं मढं पोलिसांच्या स्वाधीन त्यानं केलं होतं. बाकीच्या आप्तांचे रीतसर अंत्यसंस्कार केले होते.

त्याच्या सोबत तिथं उभा होता, उर्जितचा तो नोकर, अविनाश. पण यानं अनाथाश्रम का सोडलं होतं? आणि... त्याला पैशांची असली कसली गरज पडली, की त्यानं आपल्या ज़मीरचाच सौदा करावा...?

असो; ही उत्तरं रवीला आता मिळणारच होती...

"तू उर्जितशी या जागेचं डील केलं होतंस असं कळलं. कारण काय?" रवीनं भावना विरहित विचारलं.

"बायको... आजारी आहे. आठवड्यातून तीनतीनदा डायलॅसीस करायला लागतो. औषधांचा खर्च आहे. किडनी बदलायची म्हंटलं, तरी लाखांत पैसे हवेत. त्यानंतर औषधांचा खर्च आयुष्याभराचा. उपचाराला पैसा लागतो. इथल्या कामानं

दवाखान्याच्या गरजा पूर्ण होईनात. म्हणून उर्जित साहेबांकडं नोकरी धरली. ते चांगल्या जमिनीचा व्यवहार पटकन करतात हे समजलं. वाटलं ही जमीन त्यांनी खरेदी केली, इथला खजिना ताब्यात घेतला, तर काही वाटा मिळेल... म्हणून मी..." त्याचा गळा दाटला. आवंढा गिळून अविनाश पुढं बोलला,

"दादा, आयुष्यभर अनाथ म्हणून जगलो. आता कुठं आयुष्यात आपलं कुणी आलंय. तिला गमवायचं नव्हतं. पुन्हा एकटं व्हायचं नव्हतं... ती गेली असती, तर मुलं आई विना वाढली असती, त्यांच्या माथी माझ्यासारखं अनाथपण नको होतं मला... शपथेवर सांगतो, बाबांना कसली इजा करू नका असं मी सांगितलं होतं. आणि त्यांनीही ते पाळलं होतं..." तो आत्मकुठेने अपराधी रडत होता.

रवीनं त्याच्याकडं पाहिलं. त्याची सत्यता रवीला स्पर्शून गेली. तो तिजोरीकडं गेला. त्यानं ती खोलली. जतीन यांनी तिला कधीच लॉक केलं नव्हतं. त्यात जे होतं, ते त्यांच्या काही कामाचं नव्हतं.

पैशांच्या बंडलांची रास! धुळीनं माखलेली, कोळीष्ट्कानी भरलेली नोटांची बंडलं... रवीनं एक पिशवी घेऊन सारे पैसे त्यानं तीत ओढून सारले. ती पिशवी त्यानं त्याच्या त्या भावंडासमोर धरली. अविनाश गोंधळून रवीकडं पाहत राहिला.

"घे. आणि पुन्हा आपल्या या घराचा सौदा करू नको!" रवी त्याला ओल्या मनानं बोलला.

चूक लक्षात आलेल्या त्यानं ती पिशवी घेतलीच नसती, परंतु... गरजूस लाज कैसी...? त्याची निकडच एवढी गंभीर होती, की त्यानं ती धरली व रवीच्या नजरेला नजर न मिळवताच अपराध भावनेनं तो निघून गेला.

रवीनं उर्जितकडचा तो नकाशा उघडला. ज्या खजिन्याचा उल्लेख अविनाश करत होता, तो नक्की काय असावा हे उर्जितला आणि त्याला माहिती देणाऱ्या अविनाशलाही माहीत नसले, तरी रवीला त्या खजिन्याचा अंदाज होता.

एथनिक बायोवेपन बद्दलचीच अविनाशची ती माहिती होती. त्याबद्दल जतीन स्पष्ट असं बोलू शकत नव्हते, पण निचरा तर करायचा असावा म्हणून ते बोलताना त्याला खजिना म्हणाले असावेत. आणि त्याचा या अविनाश कडून गैर अर्थ काढला गेला असावा हे रवी समजला.

एथनिक बायोवेपन हा एकार्थी खजिनाच तर होता. म्हणजे जतीन तसे खोटेही बोलले नव्हते. त्यात जतीन कोणासमोर सहसा मोकळे होत नसत. ते ज्याअर्थी या अविनाशकडं मोकळे झाले त्याअर्थी तो जतीन यांना जवळचा असावा.

हे एक दुसरं दुःख रवीसाठी. त्याच्यापेक्षाही जतीन यांना कोणी दुसरं जवळचं झालं होतं मधल्या काळात. आपण नव्हतो त्यांच्याजवळ त्यांना आधार द्यायला. त्यांना सोबत करायला... त्यांचं मन बोलून दाखवायला... ही एक वेदना त्याच्या काळजात खिळ्यासारखी रुतली.

ते दुःख मनात धरूनच रवीनं नकाशा बघितला. हा हस्त-नकाशा आणखीही काही सांगत होता.

कार्यालयाच्या खोलीवर ठिपका ठेवून तो ठळक केला होता. स्पेसिफिकच बघायचं तर, जतीन यांची बसण्याची जागा खूण करून ठेवली होती. हे रवी समजला.

जतीन तिथं बसत असल्यानं त्यांनाच संबोधित करण्यासाठी हा ठिपका आहे असं बाहेरील कोणासही वाटावं, परंतु रवीला नाही. जतीन हे काही निर्जीव वस्तू नव्हते, एकाच जागी बसून रहायला. मग या ठिकाणीच चिन्हांकित का केलं असावं? इथंच काहीतरी असणार हे उघड होतं. लहानपणी रवी इथं राहण्यास होता, तेव्हा इथली स्वच्छता करण्याचं काम त्याच्याकडं कधी कधी असायचं. कार्यालय साफ करताना तिथला गालिचा उचलला, की खाली काही पोकळी असल्याचा त्याला भास होत असे. त्यानं त्याकडं लक्ष मात्र कधी दिल नव्हतं.

बायोवेपन बद्दल सांगत असताना जतीन यांची तर्जनी टेबलवर नाचत असल्याचं रवीला आठवलं. ते टेबल खाली... नाही! जमिनीखाली काही असल्याची सूचना करत होते का...?

रवीनं या गोष्टी आठवून टेबल सरकवला. त्या खालील नक्षीदार मरून कालीन त्यानं बाजूला फेकलं. खाली एक चौकोन त्याला दिसला. त्या चौकोनी आकाराची लाकडी पट्टी त्यानं दूर केली. खाली त्याला कोबाच लागला. इथं नक्की काही तरी असणार. त्याशिवाय हा चौकोन का असावा?

●●●

मोठा हथोडा आणून त्यानं घाव घालून घालून तो कोबा फोडला. चार पाच फुटांवर त्याला एक लॉक केलेलं स्टीलचं दार लागलं. गंजू नये म्हणून स्टील! म्हणजे काही तितकंच महत्त्वाचं असणार! रवीनं पाय आपटून बघितला. पोकळ स्टीलच्या दारावर पाय मारावा तसा आवाज... आत खोल आवाज घुमला. टाईम कॅप्सूल?!

कोणाचं?

त्यानं कुलूप फोडलं. एक माणूस उभा जाईल इतकी ती जागा नक्कीच होती. उतण्याची सोय म्हणून स्टीलची शिडी होती. तिच्या सहाय्यानं तो खाली उतरला.

खाली - एक दहा-बाय दहाची खोली. कसलंसं मापक यंत्र तिथं होतं. रवीनं जवळ जाऊन पाहिलं, तर त्यावर परफेक्ट '37°C' दाखवत होतं. मानवी शरीराचं तापमान खोलीत स्थिर रहावं याची काळजी घेणारं नियोजनबद्ध मॅकेनिजम तिथं उभारण्यात आलं होतं.

ती खोली म्हणजे एक टेम्प्रेचर कन्ट्रोलर वॉल्ट होता. तिथंच एक टेबलवर एक स्टीलची पेटी होती. ती त्यानं उघडून बघितली.

पेटीत वेलवेटची गादी, त्यावर 'पिस्टोले पॅराबेलम!' ('लुगर पी झिरो एट' पिस्तोल.)

पेटीतच रवीच्या वाम बाजूस सोन्याचा मुलामा असलेली एक डायरी होती. त्याला कुलूप पण सोन्याचंच होते. याची किल्ली...?

डायरी नंतर चाळता आली असती. कुलूपही फोडता आलं असतं. सोन्याचं रवीला काय अप्रूप?!

त्याचं ध्यान कोणत्या औरच गोष्टींनं खेचलं होतं.

डायरी सोबत, पिस्टलच्या खाली आडवी होती एक इंच सडपातळ कुपी. त्यात रक्ताचं सॅम्पल... हे रक्त कोणाचं असावं याची त्याला भनक होती.

'हिटलर!'

हा शब्द त्याच्या मेंदूत जोरकस थडकला.

आणि... त्यात त्या कुपी खालोखाल आडवी होती एक आठ-दहा इंच उंच व एक-दोन इंच रुंद एक मोठी व्हाईल! त्या व्हाईल मधला पदार्थ ओळखायला त्याला क्षणही लागला नाही.

हा तोच बॅक्टेरिया! मोठ्या कॉन्टिटीमध्ये! याच्यातीलच एक छोटा हिस्सा जतीन यांनी सूक्ष्म व्हाईलमध्ये भरून आपल्या गळयात अडकवला होता, आपल्या वडिलांची आठवण म्हणून... तीच धरोहर त्यांनी या आश्रमाच्या व त्याखालील या पुंजीच्या सोबत रवीकडं सुपुर्दली होती.

ही मोठी व्हाईल, हाच मोठा खजिना होता... तो सैतानी जिवाणू बाहेर पडू नये याची पूर्ण दक्षता घेतली गेली होती.

त्यानं ती व्हाईल तिथंच सरकवली. तापमान स्थिर ठेवणारं मशीन त्यानं लुगरच्याच एका गोळीनं फोडलं आणि हिलटरचं रक्त असलेली कुपी व डायरी घेऊन तो रूममधून बाहेर पडला. ते गर्भघर त्यानं कायमचं बंद केलं!

●●●

रवीनं मुठीत धरून एका हिसक्यानं ते कुलूप तोडलं. सूर्योदयच्या जतीन यांच्या कार्यालय कक्षातच उभारून तो ती ठराविक महत्त्वाचे जीवन प्रसंग टिपलेली रोजनिशी चाळू लागला...

शंभराहून अधिक वर्षांपूर्वीची पिवळी होऊन जीर्णावलेली पानं तो उलटत होता. त्या पानांच्या रूपाने तो इतिहास पलटत होता... पहिल्या पानावरच जतीन यांच्या वडिलांचे नांव...

"नंदमोहन सारस्वत"

जसजसे रवी पाने पलटू लागला, समस्त जगासाठी आजपावेतो लपून राहिलेला भूतकाळ त्याला पानागणिक उलगडू लागला...

२४ सप्टेंबर, १९२०

'हिटलरची विचारसरणी पटली. 'अखंड भारता'च्या स्वातंत्र्य हिताकारणे जर्मनीत पोहोचलो. तोही स्वतःस 'आर्य' म्हणवत असलेने एकवंशी भारतीयांच्या स्वातंत्र्य समरात ब्रिटिशांविरुद्ध लढण्यात भारताला मदत करेल ऐसे खास वाटते.'

'हिटलरने वर्षाभरापूर्वीच 'जर्मन वर्कर्स पार्टी'ची सुत्रे हाती घेऊन तिचे 'नॅशनल सोशलिस्ट जर्मन वर्कर्स पार्टी' ऐसे नामकरण केले. तेथे एक सन्मित्र हिटलरच्या नाझी पार्टीचे स्वयंसेवकास ओळखणारे होतेच. त्यांकरवी हिटलरशी भेट घेतली.

'मी सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ असलेचे हिटलरास मोठे अप्रुफ वाटले.

'त्याचे आदेशाने त्याचे महान कार्यात सामील झालो. कृतकृत्य झाल्याचे भाव मनी दाटले. नमोभावें त्याच्या सेवेसी लागलो.'

१९ जुलै, १९२५

'गेल्या पाच वर्षांत टिपण करावे ऐसें महत्त्वाचे काही मजसोबत घडले नाही. परंतु, कालरोजी हिटलराचे आत्मचरित्र प्रकाशित झाले. 'माईन काम्फ' (मराठी: माझा लढा) ऐसें त्या आत्मचरित्राचे नांव. दरम्यान जर्मन शिकून घेतलेने ते

लागलीच वाचता आले. परंतु वाचून मोठा निरास झाला. ब्रिटिशांच्या विरोधात असलेने भारतास स्वतंत्र होण्यास हिटलर मदत करेल अशी आशा होती. त्याचे वंश शुद्धतेचे विचार भारतीय वर्णव्यवस्थेशी अनुरूप वाटले होते. यास्तव त्यास मदत करत आलो आजवर, परंतु... परंतु हिटलर त्याचे शत्रू असलेल्या ब्रिटिशांना उच्चवर्णीय मानतो, पण भारतातील उच्चवर्णीय व कनिष्ठ जातीचे लोक सर्वांनाच निच्चवर्णीयच समजतो. हे कळताच आजवर गेली हजारो वर्षे भारतातील मागास वर्गाला कोणत्या भयाण मानसिक आणि शारीरिक यातना भोगाव्या लागल्या असतील याची प्रकर्षाने तीक्ष्ण जाणीव झाली. आजन्म स्वतःला तथाकथित उच्चवर्णीय समजून आपल्याच बांधवांचा केलेला तिरस्कार आणि त्यांचा कळत नकळत आपल्याकडून झालेला अपमान आठवून स्वतःचीच अपरिमित लाज वाटली...

'हिटलर ब्रिटिशांची कितीही तो घृणा करत असला, तरी त्याहीपेक्षा तो भारतीयांचा किळस करतो. भारतीय आर्य हे इथल्या मूलनिवासी लोकांशी मिळालेने ते आता दूषित झाले असलेची त्याची भावना दाट आहे. ब्रिटिश कसेही असोत, परंतु ब्रिटिश वर्णाने उच्च असलेने कोणत्याही राष्ट्रापेक्षा त्यांच्या वर्चस्वाखाली भारतीयांना पाहणे तो अधिक पसंत करतो ऐसे त्याचे म्हणणे आहे...

'उच्चवर्णीय भारतीय, तसेच एकूणात सर्वच भारतीय स्वतःस कितीही पवित्र व सुसंस्कृत समजोत (ज्यात मीही एक आहे, व या कारणेच इतर धर्मांचा, इतर जातींचा आजवर तिरस्कार करत आलो) जर्मन्सच्या व हिटलरच्या नजरेत एकूण सर्वच भारतीय हे अशुद्ध वर्णाचे आहेत व त्यांच्यावर कोणीतरी राज्य करणे हे केव्हाही उत्तम असे त्याचे मत आहे...

'हिटलरची मदत घेण्याचा मनसुबा सपशेल फोल ठरला... इथं अडकल्याची भावना मनी दाटत आहे...आता सुखरूप परतीचा मार्ग शोधावा लागेल...'

३० जानेवारी, १९३३

'आठ वर्षांत इथून पळण्याचा कोणताच मौका मिळाला नाही. हिटलरची ताकद देखील दिवसेंदिवस वाढत जात आहे. आज रोजी तो जर्मनीचा चान्सलर बनला. सोशलिस्ट जर्मन वर्कर्स पार्टीची निवडणूक जिंकून तो आता जर्मनीचा एकहाती सत्ताधीश बनला आहे.

'त्याच्या द्वेषास पात्र ठरलेल्या मानवजातीचा हा काळा दिवस ठरावा...

'त्यांच्या भयावह भविष्याची ही सुरवात आहे... ज्यू लोकांना वर्णद्वेषातून कैद करणे, जीवे मारणे चालू झाले आहे.'

२४ मार्च, १९३३

'आज रोजी हिटलरने 'सक्षम कायदा' पारित केल्यानंतर, या कायद्याने हिटलरला हुकूमशाहीचे पूर्ण अधिकार दिले.

'सरकारने आता वर्णद्वेषाचे भावनेतून ज्यू लोकांना नागरी समाजापासून वेगळे करणेस सुरू केले आहे. मृत्यूसत्र चालू आहेच.'

१९ ऑगस्ट, १९३४

'आज रोजी हिटलरने राष्ट्राध्यक्ष पद रद्द केले आणि स्वतःला 'फ्युहरर' म्हणजे जर्मन भाषेत 'नेता अगर 'मार्गदर्शक' म्हणून घोषित केले, अशा प्रकारे तो आजमितीला जर्मनीचा निरंकुश हुकूमशहा बनला आहे.'

१२ फेब्रुवारी, १९३६

'आनुवंशिक जीवास्त्राच्या निर्मितीची योजना हिटलरने मांडली. हिटलरच्या अनुवंशातील कोणाला धोका ठरणार नाही अशा पद्धतीने ते जीवास्त्र बनवले जावे असा त्याचा हुकूम. हिटलर स्वतःस आर्य मानतो. शुद्ध रक्ताचा मानतो. याच वर्णाचे लोक पृथ्वीवर जगण्यास लायक आहेत असे त्याचे म्हणणे असलेने तो व उच्चवर्णीय जर्मन्स फक्त या पृथ्वीवर जगण्याच्या योग्यतेचे आहेत असे त्याचे मत आहे. त्या विचारांतूनच त्याचा हा आदेश!

'याकामी सूक्ष्मजीवशास्त्रज्ञांचा एक गट तयार करणेत आला. मी सुक्ष्मजीवशास्त्रज्ञ असलेने माझीही या प्रयोगात खास नियुक्ती करणेत आली. माझी अनिच्छा होती, परंतु मी करू काही शकत नव्हतो...

'हिटलरला मानणाऱ्या जर्मन शास्त्रज्ञांकडून मोठ्या उत्साहाने या प्रयोगाची सुरवात झाली. माझी परतण्याची आशा आता संपल्यात जमा झाली आहे ऐसे दिसते आहे...'

१ सप्टेंबर, १९३९

'मला येथे येऊन अदमासे एकोणाविस वर्षे झाली. मायभूची आठवण दिसरात्र सतावते. परतणे संभवेल ऐसे दिसत नाही. देह स्वतःच्या मातृभूमीवर पडावा ऐसा मानस. परंतु सफल होईल ऐसे शक्य वाटत नाही.

'आजचे दिनी, हिटलरने पोलंडवर हल्ला चढवला. याकारणे दुसऱ्या महायुद्धास प्रारंभ! आमचा प्रयोग होताहोईतो जलद हिटलराचे हाती सुपूर्द करणेचे खुद्द त्याचे कडूनच आदेश.

'हे जीवास्त्र अजूनही प्रायोगिक चरणांवरच आहे, तरी ते त्याचे हाती लागणे हे संपूर्ण मानवजातीस धोकादायक ठरू शकते.

मला धाडसाने काही पावले उचलावी लागतील.'

२४ फेब्रुवारी, १९४१

'जीवजननशस्त्राची निर्मिती पूर्ण. सर्व चाचण्या यशस्वी. आजवर थांबलो, ते हे शस्त्र पूर्ण होणे हेतू. पळून जनतेचा विचार मध्यंतरी त्यागला होता, कारण मी गेलेने इथले जीवस्त्राचे काम थोडीच थांबणार होते?

'आता पुनः व तेही महायुद्ध घडत असताना इतका वेळ खर्ची घालणे त्यांस शक्य नाही. हीच वेळ आहे त्या जीवशस्त्राला घेऊन भूमिगत होण्याची. मला शोधणेस त्यांचा वेळ खर्च होईल व असंख्य निष्पाप जीवांचे प्राण यामाध्यमातून वाचतील. यास्तव हे जीवास्त्र घेऊन मजला इथून पळावे लागणार आहे हे जाणून प्रयोगात सामील सर्व शास्त्रज्ञांना जीवानिशी मारणेचे धाडस करून व जीवास्त्र निर्मिती बाबतचे सर्व दस्तऐवज नष्ट करून मी तो प्रयोग व हिटलराचे रक्ताचे नमुने सोबती घेऊन हिटलरचा गुप्त तळ सोडला.

'तो जिवाणू आणि हिटलरच्या रक्ताचे नमुने हस्तगत करणेसाठी तिथल्या सोबती शास्त्रनांना घोर कर्म असूनही जीवे मारणे क्रमप्राप्त होते. तिथून बाहेर पडत असताना हिटलराचे पहारेकरी देखील जीवे मारणे भागच होते. यात कोल्हापूरात शिकलेली लाठीकाठी, मल्लयुद्ध मर्दानी खेळ आणि अगदी बंदूक चालवणे कामी आले. मला पसंती नव्हती, परंतु आई व वडिलांनी जबदस्तीने हे शिकण्यास पाठवले होते. ते म्हणत, 'देशासाठी लढायचं म्हणतोस, तर प्रत्येक प्रकारची युद्धकला आली पाहिजे!' त्या देवतुल्य उभयतांचे त्यावेळी ऐकले म्हणून आज हे साधू शकलो. त्यासाठी माता-पित्यांचे असंख्य आभार...!!!'

२६ फेब्रुवारी, १९४१

'हिटलराचे सैनिक श्वापदाप्रमाणे मागे लागले आहेत. मी जीव मुठीत धरून लपून आहे. ते मानववंशजीवास्त्र मानवी शरीर तापमानावरच जीवंत राहू शकतं. हिटलराचे हाती हा जिवाणू सापडलाच, तर त्याचा त्याला उपयोग करता येऊ नये म्हणून केलेली ही माझी तरतूद होती. असे असलेने मला ते माझ्या शरीरात लपवणे भाग झाले आहे. त्यामुळे हिटलराचे रक्त असलेली कुपी आणि तो जिवाणू असलेली कुपी मला गिळणे भाग पडले आहे.

'तरी भिणेचे कारण नाही, हिटलरची जनुके या जीवास्त्राची कळ असलेने व दोन्ही वेगवेगळ्या मजबूत कुपींत सुरक्षितपणे बंदिस्त असलेने कुपीतते जिवाणू सक्रिय होणेची सध्या मला भीती नाही. हिटलराचे रक्ताचे नमुन्याची शिशीही तिथंच लपवली आहे. आता एकच प्रार्थना आहे, की पोटात या ट्यूब्स फुटून विस्फोट होऊ नये. लपवण्यासाठी दुसरी जागाही नाही. नाहीतर ते हिटलराचे हाती

लागेल... स्वतःचे जीवाची चिंता नाही, परंतु हे जीवास्त्र त्या सैतानाचे हाती लागता कामा नये. म्हणूनच ही प्राणांतिक जोखीम पत्करली आहे...

"दिलासा इतकाच आहे, की तेच मित्र आजही कामी येत आहेत, ज्यांनी हिटलराशी गाठ घालून दिली होती.'

२८ जानेवारी, १९४१

'तब्येत खालावत चालली होती, बहुदा त्या कुपी शरीरबंद केलेने असे झाले असावे. ही बाब मला आसरा देणाऱ्यांनाही मी कळू दिली नव्हती. माझी तब्येत बिघडत चाललेने त्यांनी काळजीपोटी एक विश्वासू डॉक्टर बोलविला. ज्वर वाढत चाललेने मला त्यांना अडवताही आले नाही. मी सत्य त्यांना कळू दिले नव्हते. साधा ज्वर आहे असे समजून त्यांनी मला तशी औषधे पुरवली. त्या औषधांनी नाही म्हणायला आपलं काम केलं.

'माझे उपचार करून मग जर्मन मित्र मंडळींनी मला पोलंडास पळून जाण्यास मदत केली. आत्ता आताच प्रवासाचे सुरवातीसच जर आमची ताटातूट झाली, तर माझे संरक्षणास काही असावे या विचाराने मजकडे 'लुगर' पिस्टल सोपवली होती त्यांनी. सैनिकी तळांवरून त्यांनी आपला जीव धोक्यात घालून मला बाहेर काढले व आपल्या पोलंड मधील भावाचे  घरास पोहोचवले. वाटेत मज काही होऊ नये म्हणून सोबत ते डॉक्टर देखील आले होते.'

२ मार्च,१९४१

'आज रोजी जर्मन मित्राचे भावाकडे पोहोचलो. मूळचे जर्मन असून हे कुटुंब मानवतावादी नसले, कट्टर

वर्णद्वेष करणारे असले, तरी माझ्याविषयीची प्रीती त्यांचे मनी त्याहून अधिक असलेने त्यांची ही मदत. तरी या प्रेमापोटी इथे जुळवून घेणे सहज झाले आहे. मी अत्यंत उपकृत आहे उभय भावंडांचा आणि त्यांचे कुटूंबियांचा. तरी मला इथे लपवूनच ठेवले आहे. भुयारी मार्गाने भूमी अंतर्गत बंकरमध्ये काळोख्या अंधारात मला लपवले गेले आहे.

'घरी पाय ठेवले प्रसंगी मी ग्लानी येऊन कोसळलो होतो. माझी तपासणी केल्यावर डॉक्टरना काही विचित्र जाणवले. मला त्यांना एकांती सत्य सांगावे लागले. मी मरणास घाबरतो म्हणून नाही, तर मला हा जिवाणू हिटलराचे हाती लागू द्यायचा नव्हता. मी मेलेस ते सहज झाले असते. आणखी प्रमुख कारण म्हणजे मला जीवंतपणी मायदेशी परतायचे होते, तिथे मग माझे काहीही होवो!

'जरा घाबरतच मी डॉक्टरास शरीरातील त्या परकीय वस्तूंबद्दल माहिती दिली होती. परंतु त्यांचा उपयोग काय हे त्यास मी कळू दिले नाही. त्यानेही परिस्थितीची गंभीरता ध्यानी घेऊन मला कसलेच प्रश्न विचारण्याचा तगादा केला नाही.

'कोणतीही अनैसर्गिक वस्तू दोन-तीन दिवसांहून अधिक शरीरात लपवून ठेवता येत नाही. आणि आता तर काही दिवस उलटून गेले होते. त्यामुळे शरीर साथ देत नव्हते. सोबत आलेले ते जर्मन डॉक्टर सर्जन नसले, तरी त्यांनी धारिष्ट करून तिथेच बंकरात माझी शस्त्रक्रिया करून त्या कुपी बाहेर काढल्या. साधने कमी असलेने व त्याचे हे नित्याचे काम नसलेने ती शस्त्रक्रिया करणे त्या जर्मन

डॉक्टरास खूप जटिल गेले. खुद्द हिटलर माझ्या मागे लागला आहे हे बहुदा तोपर्यंत त्या डॉक्टरास ठाऊक नसावे. परंतु सत्य समजलेने देखील तो सज्जन माझी मदत करणेस कचरला नाही. जर्मन मित्राने अगदी योग्य व्यक्तीस माझे समवेत पाठवले होते. अखेर त्यांनी त्या कुपी सुखरूप बाहेर काढून माझे सुपूर्द केल्या. शस्त्रक्रिया सुरू असताना देखील मी अर्धग्लानीतही त्या कुपी कवटाळून होतो. भूल उपलब्ध नसलेले तसेच माझ्यावर शस्त्रक्रिया चालू होती. लागणारी साधने मात्र मित्राच्या भावाने कुठून तरी उपलब्ध करून दिली होती. भूली शिवाय शस्त्रक्रिया होत असलेने अत्यंत वेदना होत होत्या. त्या सहन करणे भाग होते. पर्याय नव्हता...

'वेदनेत असलेने किती काळ उलटला माहीत नाही, लक्षातही आले नाही... अखेर; शस्त्रक्रिया यशस्वी करून ते काही औषधे देऊन, ती कशी घ्यायची हे सांगून डॉक्टर निघून गेले. ठाऊक नाही त्या पुण्यात्माचे पुढे काय झाले... ते परत आपले देशी गेले, की इथेच कुठे आपल्या जीवितासाठी राहिले... परंतु त्यांचे उपकार अनन्वित असून न विसरणारे आहेत. त्यांचेनेच मला हे अधिकचे वाढीव जीवन दान म्हणून मिळाले असे म्हणता येईल. ते पुण्यात्मा सुखरूप राहिले असावेत ही दृढ आशा आहे!

'ते जिवाणू काचेच्या नळीत बंदिस्त असलेनेही धोका नाही. तरी  नेटके टाके घालणे शक्य न झालेने जखम आता वाढत जाऊन रक्त जास्ती जात आहे. जिवाणू जिवंत ठेवणेसाठी आता शरीराचे तापमान वाढणार अगर कमी होणार नाही याची काळजी घेणे क्रमप्राप्त आहे.'

दिनांक - ठाऊक नाही...

'इथे निव्वळ एक विजेचा दिवा छताला लटकत आहे. मी बसतो, कलंडतो तिथला तीन हाताचा व्यास मंद प्रकाशमान असतो. बाकी दूरवर निर्वात पोकळी असलेचा भास होतो. स्वतःचे मनात जरी बोलले तरी आवाज घुमेल अशी खोल लांबलचक ती बंकर पहिलेच दिवशी खायला उठली असे वाटले होते. आता तर किती काळ इथं लोटला आहे हे कळणेसही मार्ग नाही...

'कोणता दिवस आहे, दिवस आहे, की रात्र आहे हे कळण्यासही या बंकरमध्ये सोय नाही. इथे तारीख नमूद करणे त्याकारणे शक्य झाले नाही.

'अजब गरम होते इथे. तापमान स्थिर रहावे म्हणून उघडाच राहतो. या अंधाराची आता सवय झाली आहे. त्याकारणे डोळयांना या तिमिरातही लख्ख दिसते. म्हणून हा लिहिण्याचा प्रपंच. एवढाच काय तो विरंगुळा शिल्लक आहे. असो, सुदैवाने जखम वाळली आहे. एक ओरखडा फक्त दिसतो. शरीर वाळत चालली आहे. सदर कुटुंब माझी काळजी घेते, नाही ऐसे नाही. वेळच्यावेळी खाना येतो. परंतु अन्नावर आता वासना उरली नाही. दाढी करणेचे सामानही पुरवले असून ती करणेची इच्छा मनी नाही. छातीपर्यंत दाढी आता वाढली आहे. हातापायांची नखे एखाद्या राक्षसासम लांबसडक, धारदार तीक्ष्ण झाली आहेत. लिहिताना कागदही फाटतो, तर कधी ही नखेच तुटून पडतात.'

दिनांक - 'ठाऊक नाही...

'बंकरचे अगदी वरच गोळीबारी, दारूगोळ्यांचे आवाज ऐकू येत आहेत. या पुण्यात्मा कुटुंबाला तर काही... दुर्दैव हे, की शहानिशा करणेसाठी मी वर जाऊ शकत नाही...'

दिनांक - ठाऊक नाही...

'किती वेळ गेला माहीत नाही त्या आवाजांनंतर, परंतु ते आवाज बंद होऊन जमाना उलटला असावा ऐसे वाटते...'

२३ मार्च, १९४१

'मला आसरा दिलेले सद्गृहस्थ माझेकडे आले. वर नमूद तारीख त्यांस विचारूनच लिहिली आहे. ते व त्यांचे कुटुंब सुखरूप आहेत हे पाहून आनंद झाला. आपलेमुळे यांचेवर बालंट तर आले नाही ना या शंकेचे ओझे मनावरून उतरले व आत्मा शांत झाला. परंतु सद्गृहस्थ खूप घाबरलेले दिसत होते. ते म्हणाले काल सोव्हिएत युनियनवर जर्मनीच्या अक्षीय हल्ल्यानंतर, संपूर्ण पोलंड जर्मनीच्या ताब्यात गेला आहे, १९३९ ला पोलंडवर सुरू झालेली ही चढाई, आजमितीला अदमासे दोन वर्षांनंतर पोलंड पूर्णतः जर्मनीचे अमलाखाली आला.

'याने पोलंडमध्ये जातीय आणि नरसंहाराची धोरणे पुढे नेली जात आहेत. स्टॅलिन व हिटलर या दोहोंच्या संघर्षात, पोलिश नागरिकांचे प्रचंड मानवी आणि भौतिक नुकसान होत आहे.

'मीही इथे थांबणे त्यांस आता रास्त वाट नाही असे त्यांनी मला घाबरेच सांगितले. हिटलराचे सैनिक मला विचारत असलेचे त्यांनी आठवणीने सांगितले. ते घरीही येऊन माझी चौकशी करून गेले होते म्हणाले.

'मला इथून बाहेर काढणेची त्यांनी योजना आखली होती. त्यानुसार करणेचे ठरले.'

२७ मार्च, १९४१

'१७ सप्टेंबर, १९३९ हिटलरने पश्चिमेकडून पोलंडवर आक्रमण करणेचे सोळा दिवसानंतर सोव्हिएत युनियनच्या स्टॅलिनने पूर्वेकडून पोलंडवर हल्ला चढवला होता.

पोलंडचा पूर्व अर्धा भाग सोव्हिएत युनियनने जोडला होता. सध्या यूएसएसआरने आनुवंशिक दृष्ट्या परकीयांना तसेच काही पोलिश ज्यूंना मोठ्या प्रमाणावर हद्दपार करण्याचा कार्यक्रम सुरू केला आहे. लक्षावधी पोलिश नागरिकांना क्षणार्धात त्यांची घरे सोडण्यास भाग पाडले जात आहे. यांच्यातूनच कधी जनावरे वाहून नेणाऱ्या गाड्या, तर कधी मालवाहू आगगाड्या यांचे माध्यमातून सायबेरीया (सोव्हिएत) व तेथून तेहरान (इराण) इथंपर्यंत मजल मारली. यास्तव आजवर मज सांभाळलेल्या व त्या रणभूमीतून निघण्यास मदत करणाऱ्या त्या पोलंड मधील जर्मन गृहस्थाचे आभार मी मानेन तितके थोडेच आहेत.

'तिकडे मागे जर्मनी व पोलंडातच नव्हे, तर पूर्ण युरोपात हिटलरने वर्षद्वेषातून लक्षावधी ज्यू (यहुदी) यांना विषारी वायूने व गोळ्या घालून मारल्याचे ऐकिवात आले. जर्मनीत तर हे जानेवारी १९३३ पासून सुरू आहेच. त्यात प्रचंड भर पडलेचे समजते. केवळ ज्यू व पोलंडवासीच नव्हे, परंतु सोव्हिएत कैदी, आफ्रिकन जर्मन्स, रोमानी लोक, अपंग, गुप्त कारागीर, स्लोव्हेन, जेहुव्हा कैदी, एवढेच काय परंतु समलिंगी देखील हिटलराचे द्वेषातून सुटले नाहीत. काही लक्षांवर हा आकडा आजपावेतो गेल्याचे समजते. अजून यात भर पडतच आहे. माझे

सौभाग्य, की या हत्याकांडात मी बळी चढलो नाही. या नरसंहारात आपला हात नाही याचाही एक दिलासा आहे...'

'एडॉल्फ हिटलर हा तो केवळ सैतान आहे!

'तरी ही घटना ऐकून डोळ्यांत टच्चकन पाणी उभारले. आपणही मनात कुठेतरी हाच वर्णद्वेष घेऊन जगत आलेची लाज वाटली. कुठेतरी समाधान आहे या घोरकर्मात आपला हात नाही. तो जीवास्त्र घेऊन पळालो हे आयुष्यात एक तरी चांगले कर्म हातून घडलेसे मनी पाझरले व त्यातूनही कृतकृत्य वाटले.'

'आणि स्टॅलिन; तोही हिटलराचेपेक्षा काही कमी अगर वेगळा नक्कीच नाही!!'

'हुकूमशहा, हुकूमशाही आणि एकाधिकारशाही ही केव्हाही मानवजातीसाठी धोकाच!'

२ मे, १९४१

'बॉम्बेच्या पोलंड कौन्सिलच्या मदतीने इराण मधील पोलंडच्या निर्वासितांना भारतात नेण्याचे प्रयत्न सुरू असलेचे समजले. भारतभूचे नांव ऐकून डोळ्यांत अगदी आर्त भावनेने पाणी उभे राहीले. भारतमाता प्रेमाने साद घालत असलेचे, मायेने पुकारत असलेचे भासत आहे. मायदेशी पोहोचणेची आता कुठेतरी एक आशा दिसत आहे...'

३० जून, १९४१

'बॉम्बेतील पोलंड कौन्सिल 'युजेनिअस बनासिंस्की' यांचे प्रयत्नाने इंग्रज सरकारच्या अनुमतीने दहा हजार निर्वासितांना भारतात आसरा देणेची परवानगी दिली गेलेने अनेक प्रयत्नांनी  नवानगर संस्थानचे बालाचडी येथे पोहोचलो. यावेळी कुपी जाणव्यास बांधून कटदोऱ्यास खोवून ठेवली होती. त्यामुळे त्यास अखंड देह-तापमान मिळत होते.

'नवानगरचे राजा 'जाम साहेब' यांनी निर्वासितांची मोठी बडदास्त ठेवली. अखेर त्यांना भेटणेचा योग आला. त्यांना मी इथलाच कोल्हापूरचा आहे सांगितलेवर त्यांनी माझी कोल्हापूरला येण्याची सर्व व्यवस्था केली. नवानगरचे महाराजा जाम साहेब यांचे त्यासाठी प्राणांतिक आभार!'

७ ऑगस्ट, १९४१

'आजमितीला मी कोल्हापूरचे धरतीवर आहे. मोकळा श्वास घेतलेचा कित्येक वर्षांनंतर अनुभव आला.  मधल्या धकाधकीत शरीर अगदीच वाळलं. यातही जिवाणू जिवंत रहावा यास्तव आजारी पडणार नाही याची काळजी पुरेपूर घेतली. शहराच्या वेशीवर आलेवर अनावर अश्रू डोळयांतून झरू लागले. अंग नकळत खाली वाकले. ज्या मायमातीत लहानपण माखले, ती माथी कपाळी लावली. तिथेच नवजात शिशुप्रमाणे धरणीला बिलखून रडू लागलो. आईच्या कुशीत शिरल्याची ऊब जाणवली मला...'

८ ऑगस्ट, १९४१

'स्वातंत्र समरात शांततेच्या मार्गाने सामील झालो... ज्यायोगे इतके कष्ट सोसले ते कार्य विसरून कैसे चालेल?! झोकून दिलेय स्वतःला. हे कार्य भारत स्वतंत्र होईस्तो अविरत करणेचा निर्धार आहे!'

४ जून, १९४२

२९ मे रोजी सुभाषचंद्र बोस हिटलरास भेटलेचे ऐकिवात आले. बोस बाबू त्या नराधमास अवश्य भारत देश स्वतंत्र करणेचे हेतूने भेटले यात शंका नाही, परंतु तो राक्षस मदत करणार नाही हे मज तरी उघडच होते. झालेही तसेच, त्याने मदत न करता बोस बाबूंना जपानची मदत घेणेचा सल्ला दिला अशी बातमी आहे. मला दिलासा हा आहे, की त्याने बोस बाबूंना काही दगा फटका केला नाही... ईश्वराचे असंख्य आभार, की त्या महामानवाला काही अपाय झाला नाही त्या दानवकडून...'

१० जून, १९४३

'पोलंडच्या निर्वासितांचा पाच हजारांचा दस्ता कोल्हापूरात आश्रयासाठी येणार असलेचे समजले. या बातमीने मागील सर्व वेदना सर्र्कन अंग-मनावर जाग्या झाल्या, उमटल्या. हे लोक माझे वेदना भावंडं आहेत. आपल्या धरतीवर येत असताना आपलेकडून त्यांची सेवा न झाली, तर हे करंटेपणाचे व कृतघ्नपणाचे ठरेल. यास्तव 'छत्रपती श्री शिवाजी (सातवे) महाराज साहेब बहादूर' यांचे राज्यशासनाचे अधिकाऱ्यांस जाऊन भेटलो (महाराज साहेब लहान असलेले त्यांचा कारभार त्यांचे कारभारी व अधिकारी पहातात). मीही हे सर्व भोगून आलेचे

त्यांचे कानी घातले व त्यांची सेवा करणेचा मानस बोलून दाखविला. इथं आलेल्या पोलंडवासीयांची सेवा करण्याची छत्रपतींचे अधिकारी यांनी मोठ्या मनाने परवानगी दिली यास्तव त्यांचे शतशः आभार!

'सदर पोलंडवासीयांची 'वळीवडे' येथे छत्रपतींच्या कारभाऱ्यांकरवी उत्तम सोय केली गेली आहे.'

२ मे, १९४५

काल १ मे चे दिनी, जर्मन रेडिओने ३० एप्रिल १९४५ रोजी हिटलरने स्वतःला डोक्यात गोळी घालून आत्महत्या केलचे जाहीर करण्यात आले. तत्पूर्वी त्यानं सायनाईडची गोळीही खाल्ली होती. सोव्हिएत युनियन बर्लिनमध्ये पोहोचलेने त्याने हे कृत्य केले. याचसोबत दुसऱ्या महायुद्धाची समाप्ती झाली. बर्लिनचे युद्ध जर्मनी हरेल अशी हिटलरास भीती असलेने त्याने हे स्वयंघाताचे पाऊल उचलले. सैतानही भीतीग्रस्त असू शकतो हे सिद्ध जाहले. ज्या क्रूरकर्म्याने महायुद्धास सुरवात केली, त्याचे मृत्यूनेच हे महायुद्ध अंतास गेले यासारखी सुदैवी घटना कोणती ती नाही. इतिहासातील हा सुवर्णदिन... नव्हे नव्हे सुवर्णपानच ठरेल यात शंका नाही. आता आपला भारत स्वतंत्र होऊन मानवैतिहासात आणखीन एक सोन्याचे पान जडावे ही म्हणजे गोमटे होईल...

'इथल्या पोलंडवासीयांसाठी आजचे दिवशी गोड जेवण करून त्यांचे सोबत उत्सव साजरा केला म्हणून ही नोंद. जल्लोष, आनंद आनंद झाला...

'तरी अजून हे लोक थोडे निराशेत आहेत. मायदेशी कधी जाता येईल याची हुरहूर तशीच आहे... काहींनी तसं बोलून दाखवलं अन मन खट्टू झाले... यांचे दुःख

मी अंतर्बाह्य जाणतो. स्वदेशापासून मीही बराच काळ दूर राहिलेने त्यांच्या वेदना मला जवळच्या आहेत.'

१५ ऑगस्ट, १९४७

'अखेर भारत स्वतंत्र जाहला. पण त्याची किंमत फाळणीने चुकवावी लागली हे प्रचंड मोठे दुर्दैव! आपलेच लोकांत द्वेषाची उभी फळी कायमची उभी राहिली.

'भीती ही आहे, की मागे राहिलेल्यांना द्वेष भावनेतून कोणता त्रास तर होणार नाही. ही शक्यता तरी कमीच...

'भारत स्वतंत्र तर झाला; परंतु वर्णद्वेष, धर्म-जातीं दरम्यान असलेली घृणा, परस्पर परकीय भाव यांचे काय? ते काय अनंत कायम राहतील?...

'नच राहो ही गाढ इच्छा! सर्व भारतीय नागरिक यांचेत एकात्मतेची बीजे दाट खोलवर रुजावेत ही दृढ मनिषा आहे, ज्याने भारताचे पुनः खंड नाही होणार... 'वसुधैव कुटुंबकम्' ऐसें म्हणणारे आपण? आपल्याला आपलेच देशात राहणाऱ्या आपल्याच भावडांचा इतका राग व द्वेष का? फक्त त्यांचे धर्म अगर जाती वेगळ्या आहेत म्हणून? या वर्गवारी, या विभागणी तर मानवानेच आपापले करून घेतले आहेत? केवळ मान्यता आहेत या हे प्रकर्षाने ध्यानी आले आहे. मग पुढचा माणूस माझ्याहून वेगळा असण्याचे ते परिमाण कसे असू शकतात? हे आपण ध्यानात घेतले पाहिजे.

'फाळणी झाली आणि एक लक्षात आले, की स्वातंत्र्य मिळलेने कार्य संपलेले नाही. इथून पुढे देशातील सर्व घटकांना बांधून कसे ठेवता येईल यावर काम करणेचा निर्धार पक्का झाला आहे!'

९ डिसेंबर, १९४७

'भारत स्वतंत्र झालेने, इहित कार्य सफल जाहले. एकात्मतेचे कार्य हे जीवनभराचे आहे व ते होत राहिलंच. तरी स्वातंत्र्यासाठी लढत असताना मनी स्वार्थी विचार नको म्हणून आजवर लग्न टाळले होते. या प्रवासादरम्यान संघर्षातच एक समविचारी मुलगी भेटली होती. श्यामला नांव तिचे. तिनंही स्वतःला देशासाठी वाहून घेतले होते. आता तिचा मार्गही मोकळा आहे. तीस मनीचे बोलून दाखवले. तिचीही संमती मिळाली. आम्ही लग्न करायचे ठरवले आहे. माझे पुढील कार्यात देखील ती सोबत करणेस मनापासून उत्सुक आहे. आजचा हा सुखाचा दिन...'

२० डिसेंबर, १९४७

'आम्ही लग्न केले. आजन्म समाजसेवेत व्यतीत करणेचा आम्ही निश्चिय केला आहे. आजमितीला संघर्षचारिणी ही सहचारिणी झाली. अपार आनंद जाहला.'

१० फेब्रुवारी, १९४८

'छत्रपती श्री शहाजी राजे (दुसरे) यांचे भेटीस गेलो (मधल्या काळात छत्रपती श्री 'शिवाजी महाराज (सातवे) महाराज साहेब बहादूर' संस्थानाचे दुर्दैवाने अवघ्या चौथ्या वर्षी स्वर्गारोही झाले होते), मोठ्या मनाने त्यांनी आमची भेट घेणेचे स्वीकारले. पोलंडवासीयांचे काही निवडक प्रतिनिधी सोबत होते. आजवर कोल्हापूर छत्रपती यांनी लेकरासमान जो त्यांचा सांभाळ केला, त्याबद्दल यांना मायदेशी जाणेपूर्वी छत्रपती घरण्याप्रत कृतज्ञता व्यक्त करावयाची होती. म्हणून त्यांचे आग्रहास्तव श्रीमंत छत्रपतीं यांचेसह ही अगत्य भेट होती. समस्त पोलंड नागरिकांचे वतीने या प्रतिनिधींनी आजवर श्रीमंत छत्रपती घराण्याने केलेल्या अमोल सहकार्यासाठी त्यांचे आभार मानले.

'इतकी वर्षे कोल्हापूर छत्रपतींनी या बेवारस पक्षांना आपल्या छत्रछायेखाली धरले याबाबत जाणेपूर्वी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हे अचानक भेटीचे अगत्य होते. शिवाय बरोबरी आता इथे कायमस्वरूपी स्थायिक होणेचा निर्धार केलेले, परंतु मूळचे पोलंडचे रहिवासी देखील होते. दयाशील अशा कोल्हापूर छत्रपतींनी जी काही या पडत्या काळात मदत केली, त्यासाठी पोलंडचे हे रहिवासी अत्यंत ऋणी व नतमस्तक होते. या भेटी दरम्यान देखील छत्रपती श्री शहाजी राजे (दुसरे) पोलंडवासींयांची योग्य ती बडदास्त राखिली. अखेर कृतकृत्य जाहले.'

१७ फेब्रुवारी, १९४८

'पोलंडचे निर्वासित अखेरीस आपले देशी निघत आहेत. त्यांचे सुमुखांवरचा अवर्णीत आनंद पाहून मन सुखावत आहेत. मला त्या दिनाची आठवण जाहली, जेव्हा मी माझे येदेशी प्रथम पाऊल ठेवले होते.

'यातही काही जणांनी आता कायमचे इथेच राहणेचे पसंत केले आहे. त्यांचेसाठी आता हाच त्यांचा देश आहे. त्यांचे निर्णयाने मनी खूप आनंद दाटतो आहे...

'यांना परकेपणा न देता आपल्यात सामावून घेणे हे आता आपले कर्तव्य आहे. त्यांनी जो पराकोटीचा द्वेष व हालअपेष्टा सोसल्या, ते सर्व आता इथे तरी त्यांचे नशिबी येऊ नये ही आशा व त्यांस सदिच्छा...'

३ ऑक्टोबर, १९४८

'आम्हास एक निरागस, गोंडस मुलगा जाहला. मुलगा अगर मुलगी कोणतेही आपत्य झाले तरी त्यास मानवतेचं व सर्वसमावेशक, समानतेचं शिक्षण देणेचे आमचे आधीच ठरले होते. त्याप्रमाणे याचे शिक्षण याचे कळतेपणातच सुरू होईल.'

१५ ऑक्टोबर, १९४८

'आज मुलाचे बारसे केले. श्यामलाचे इच्छेनुसार त्याचे नांव जतीन ऐसे ठेवण्यात आले. जतीन हे भगवान शिवाचे एक नांव. विरक्त, तपस्वी, अनुशासित असा याचा अर्थ होतो. सुंदर नांव सुचले श्यामलला. मुलगा नांवाला समर्पक जगेल याची खात्री आहे.'

२१ डिसेंबर, १९५७

'जर्मनीतील मित्राचे पत्र आले, 'फ्रिट्ज श्नाइडर' ऐसें त्यांचे नांव. आजवर त्यांचे नांव सदर जीवणीत नमूद केले नाही कारण, ही लेखन वही कुणाचे हाती पडली, तर बिचारे माझे हे मित्र हिटलरचे हाती पडू नयेत अशी भीती होती. परंतु जेव्हा आता हिटलर जिवंतच नाही व शिवाय मी माझे मायदेशी असलेले प्रथमच त्यांचे नांव येथे नमूद करत आहे. इतक्या कठीण काळातून जाऊन देखील ते व त्यांचे सर्व कुटुंब सुखरूप आहेत हे वाचून आनंद जाहला. किंबहुना मला मायदेशी परतण्यास मदत करणारे सर्वच जण जसे, की फ्रिट्ज यांचे सोबत, ते डॉक्टर 'पॉल मेयर' व  तसेच फ्रिट्स यांचे बंधू 'फेलिक्स' व त्या सर्वांचे कुटूंबीय एकूण सुखरूप आहेत हे वाचून गगन ठेंगणे पडले आहे. परोपकाराचे फळ त्यांस मिळाले. आता जेव्हा ते सर्व सुखरूप आहेत असे समजले आहे, इथून पुढे त्यांच्याशी नियमित संपर्क ठेवण्याचा प्रयत्न करेन. उपकारकर्त्यांना विसरून कसे चालेल...?! कधीतरी भेटून देखील येवू असा मानस मनी उत्पन्न जाहला आहे.

'असो, शिवाय त्या पत्रासोबतच एक पुस्तक देखील त्यांनी पाठविले आहे. 'हॅन्स फ्रॅंक' याची ती प्रकाशित जर्नल आहे.

'हा 'हॅन्स फ्रॅंक' पूर्वी हिटलरचा वकील होता. दुसऱ्या महायुद्ध समयी जर्मन नाझींनी पोलंडच्या जिंकलेल्या प्रांताचा तो गव्हर्नर जनरल देखील झाला होता असे स्मरते.

'हॅन्स फ्रॅंक हा जर्मन संहार धोरणांना कृतीत आणण्यात मुख्य होता.  थर्ड रीच, ज्याचा अर्थ "तिसरे साम्राज्य", नाझींचे म्हणणे होते, की 'नाझी जर्मनी' हे पूर्वीच्या पवित्र रोमन साम्राज्य (८००-१८०६) आणि जर्मन साम्राज्य (१८७१-

१९१८) या राज्यांचे उत्तराधिकारी होते. त्यामुळे ते त्यांचे हुकूमशाही राजवटीस 'Third Reich' म्हणजे 'तिसरे साम्राज्य' असे संबोधत असत. तर त्यांचे या 'थर्ड रीच'मध्ये सामील नसलेल्या पोलिश (पोलंडचे) भूमीत सामूहिक गुन्हे, आर्थिक शोषण, चोरी आणि अगणित कलाकृती नष्ट करणेसाठी तो हॅन्स फ्रँक जबाबदार होता. आणि त्याच्या अक्षम्य अशा त्या दुष्कृत्य गुन्ह्यांसाठी १९४६ ला त्यास फाशी देखील देण्यात आली होती. परंतु याचे हे जर्नल मला पाठवण्यामागील मित्राचे काय प्रयोजन?...'

२७ मार्च, १९५८

'हॅन्स फ्रँक'ची मूळ पोलिश भाषेतील अकरा हजारहून अधिक पानांची दैनंदिनी वाचून पूर्ण. या पुस्तकास त्याचे जीवनचरित्र देखील म्हणता येईल. काही पानांतच हे पुस्तक मला का पाठवले गेले आहे याची प्रचिती आली. तितकेच येथे नमूद करत आहे...

'त्याच्या आठवणींमध्ये, फ्रँकने धक्कादायक व सनसनाटी दावा केला, की हिटलरचा पुतण्या, विल्यम पॅट्रिक याचे कडून हिटलरास एक पत्र प्राप्त झाले होते, ज्यात त्याने हिटलराचे काकाचे वंशाविषयी लाजिरवाणी तथ्ये उघड करण्याची धमकी दिली होती.

'यानंतर हिटलरने १९३० मध्ये स्वतःचे कुटुंबाची चौकशी करण्यासाठी फ्रँकला त्या कार्ये नियुक्त केले होते. फ्रँक म्हणाला, की हिटलरची आजी मारिया शिकलग्रुबर हिने हिटलरचे वडील एलोइस यांना लग्नाआधी जन्म देण्यापूर्वी ती

लिओपोल्ड फ्रँकेनबर्गर नांवाच्या एका ज्यू माणसाचे घरात स्वयंपाकी म्हणून काम करत होती व त्याचा पुरावा त्याच्या तपासात उघड झाला.

'फ्रँकने दावा केला, की त्याने हिटलराचे नातेवाईकांकडून मारिया शिकलग्रुबर आणि फ्रँकेनबर्गर कुटुंबातील सदस्य यांच्यातील पत्रांचा संग्रह मिळवला होता व ज्यात तिने कुटुंबातील नोकरी सोडल्यानंतरही तिच्यासाठी वेतनाची तरतूद केल्याची चर्चा केली होती.

'परंतु हिटलरने फ्रँकला सांगितले, की या पत्रांनी फ्रँकेनबर्गरचा मुलगा हा त्याचा म्हणजे हिटलरचा पिता असल्याचे सिद्ध होत नाही, तर त्याच्या आजीने केवळ तिच्या बेकायदेशीर मुलाच्या पितृत्वाचा दावा करण्याची धमकी देऊन फ्रँकेनबर्गरकडून पैसे उकळले आहेत एवढेच समोर येते.

'हॅन्स फ्रॅंक'ने हिटलरचे ते मत स्वीकार केले, परंतु त्यानंतरही हिटलरचा 'ज्यू' वंशाशी संबंध होता हे अद्यापही शक्य असल्याचे त्याने त्याचे दैनंदिनीत लिहून ठेवले आहे.'

'आता हे समजलेनंतर मला प्रश्न असा पडतो, की हॅन्स फ्रॅंकचा सदर दावा सत्य असेल किंवा नसेल, परंतु तरी हिटलराने ते घातक जैविक अस्त्र बनवण्याची मनिषा का बाळगली असावी? कारण तो खरेच ज्यू-वंशातील असेल, तर त्याने ज्या जर्मन्ससाठी म्हणून जे तथाकथित राज्य उभारले होते, त्याच जर्मन्सचा तो खात्मा करून बसला असता... किंवा असे की त्यास तो ज्यू-वंशीय असलेचे मान्यच नसलेने त्याने हा विचार केला नसेल, व जैविक अस्त्र बनवण्याचा घाट घातला असेल.

'परंतु तरी; त्याला ते मान्यच नव्हते असे गृहीत धरले, तरी आपले जीवास देखील धोका आहे असे त्याचे मनास जराही शिवले नसावे काय? ते कसे, तर त्याचे या मानववंशजीवास्त्रने सर्व जर्मन लोक मारले गेले असते व हिटलर मात्र ज्यू-वंशीय असलेने जिवंत राहिला असता व मग उरलेल्या ज्यूंनी एकट्या राहिलेल्या त्याला जीवे मारले असते. हजारो-लाखो ज्यूंचा प्रतिकार तर तो एकटा करू शकला नसता, ज्यू लोकांचे हातून हमखास तो मारला गेला असता. आणि त्यांनी त्याची केलेली ही 'हत्या' त्याच्या मुर्खपणामुळे 'आत्महत्या'च ठरली असती! हे स्वतःला सर्वश्रेष्ठ समजणारे हुकूमशहा लोक कसलाही पुढचा मागचा विचार न करता आपला मूर्खपणा ठासून सिद्ध करत असतात यात शंका ती कोणती नाही!

'त्याचा अखेर तर काय झाला? शेवटी त्याने डोक्यात गोळी घालून 'आत्महत्या'च तर केली... फ्रॅंकचे म्हणणे खरेच खरे असेल, व हिटलरने दुर्दैवाने हे जैविक अस्त्र वापरलेच असते, तरी ती कदाचित ती त्याची राजनैतिक व भौतिकही आत्महत्याच ठरली असती, मागे उरलेल्या ज्यूंनीच सूड भावनेने त्याला संपवले असते कदाचित. तो त्यावेळीही गेलाच असता, परंतु त्यावेळी सोबत तो अनेक जर्मन्सना घेऊन गेला असता...

'तो ज्यू असेल, नसेल, परंतु हे मानववंशजीवास्त्र वापरूप त्याने असंख्य लोक, मग ते ज्यू असोत अगर जर्मन्स, परंतु जीवे मारण्याचा धोका तरी टळला. सदर धोकादायक जैविक अस्त्र मी सोबत घेऊन आलेने अनेक लोक, मग ते ज्यू असोत किंवा जर्मनच का असेनात वाचवलेचे नक्कीच समाधान आहे...

'अखेर प्रत्येक मानव जात स्वतःला इतर माणवांपेक्षा कितीही वेगळी अगर उच्चवर्णीय समजोत, परंतु अंततः मानव तो मानव! सर्व मानवजात एकच! मग त्याचा वंश कोणताही असो, रंग कोणताही असो, धर्म-जात-पंथ कोणतेही असोत, वर्ण कोणताही असो...!!!'

'या शुद्ध-अशुद्ध, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्पृश्य-अस्पृश्य या अशा सर्व फक्त आणि फक्त भ्रामक कल्पना आहेत हेच सत्य! मानवजातीचा इतक्या वर्षांचा इतिहास, तिथे वर्णसंकर झाला असणे अगदीच साहजिक आहे, शिवाय किमान आपण मानव नाकीडोळी एकसारखे दिसतो, त्यावरून तरी आपण सर्व एकच आहोत हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ व स्पष्ट आहे. आणि हे इतकेसे सत्य स्वीकारले, तर परस्पर द्वेष नष्ट होईल व मानव जीवन सुकर होईल यात किंबहुना शंका नाही!'

१२ ऑक्टोबर, १९५८

'सुदैवे याच वर्षी पुनः जर्मनीत येणे झाले. आमूलाग्र बदललेल्या व मोकळ्या जर्मनीत येऊन मन प्रफुल्लित झाले. बरे वाटले, की काही वर्षांपूर्वी जी जर्मनी द्वेषाने व हिंसेने बरबटलेली होती, ती आज आपली पूर्व घृणीत कात टाकून सर्वसमावेश अशी आधुनिकतेची कास धरून प्रगत होत चालली आहे. पूर्वी केलेल्या पापकर्मांची जाणीव ठेवून ते आज वैचारिक व भौतिक दृष्ट्याही सुधारत आहेत आणि पूर्वी जे घडले, ते आपणाकडून पुन्हा घडू नये यासाठी सर्वजण 'एक नागरिक' बनून प्रयत्न करत आहेत असे वाटते. जर्मनी कधी अशी पहायला मिळेल असे वाटले देखील नव्हते. मात्र जर्मनी कधी आपला इतिहास विरून पुनः पूर्व मार्गावर चालू नये अशी सदिच्छा... त्याचसोबत ज्यू लोक देखील आपला इतिहास

विसरून जाऊ नयेत व आपल्यावे झालेले अन्याय ते स्वतः कधी कुणावर अन्याय करू नयेत ही आशा...

'आणखी एक मोठी आशा आहे, की भारतातील लोक देखील 'एकसंघ' असे 'देशाचे नागरिक' बनतील व देशातील द्वेषाची विषवल्ली समूळ उखडून फेकून देतील... आशा आहे...

'असो, माझ्या इथल्या सर्व आप्त्यांशी भेटून आनंदाला पारावार उरला नाही. जर्मनीत येताना एकटाच आलो, बायको अगर मुलगा यांस इथल्या मजसमवेत घटित पूर्व गोष्टी तूर्त समजू नयेत हा अट्टहास... पुढे कधी उघड करावे लागतीलच खास... परंतु ती वेळ आत्ता नाही...'

१५ मे, १९६५

'चोवीस वर्षे लपवून ठेवलेलं गुपित आता वयोपरत्वे त्रास देत आहे. जतीन माझा मुलगा. आज त्यास जवळ बोलवला. इतकी वर्षे या नाशवंत देहाशी बिलगून ठेवलेले ते 'विखारी' 'गुप्तधन' त्याचे स्वाधीन केले. ते कोणाच्या हाती लागू नये याची त्यास निक्षून ताकीद दिली. जमले, तर ते नष्ट करण्याची सूचना केली. माझी संपत्ती म्हणून हे जतन करण्याचा निर्णय त्याने माझे समक्षच घेतला. मी त्याचा निर्णय म्हणून गप्प बसलो. ही माझी अखेरची टिपण्णी असेल. यानंतर नोंद करणे जमेलसे वाटत नाही...'

भरलेल्या डोळ्यांनी रवीने ती हस्तलिखिताची निशी बंद केली. तो सुन्न होता. कालावकाशाने अखेर भानावर येऊन त्यानं ते हस्तलिखिताचं बाड जाळलं. जळत राहणारी ती नोंदवही रवीनं तिथंच राहू दिली.

ही डायरी जाळताना त्याच्या मनी अपरिमित आदरभाव दाटला होता. परंतु त्याला हे करणं भागच होतं, कारण... यातील त्या अनुवांशिक जीवास्त्राचा उल्लेख!

धगधगत्या त्या इवल्या अग्नीज्वाळांना रवीने मनोभावे आदरपूर्वक नमस्कार केला. एक निर्धाराची चमक त्याच्या मुखमंडली तेजोमान झाली. आणि त्याच जाज्वल्य अशा ठाम विचाराने त्या पेटत्या आगीत इब्लिसने हिटलरचं ते दोषयुक्त रक्त ओतून दिलं. 'हिटलरचं' होतं, म्हणून ते सदोषच! ते नष्ट करण्याचा हाच एक मार्ग!

●●●

'सूर्योदय अनाथाश्रमा'चं ऑफिस बंद करून तो वळला. भिंती आडून एक मुलगा, एक मुलगी कोण आहे हे पाहत उभे होते. रवी दिसताच ते पळत आले. डोळे पाणावलेले ते आपलं कोणीतरी अजून आहे हे पाहून त्याला कडाडून बिलगले. रवीला उमाळा फुटला. त्या जीवांना पाहून त्याला दिलासाने गलबलून आलं होतं. सूर्योदयची किमान ही दोन फुलं जिवंत होती.

"तुम्ही...?" त्यानं चरकत विचारलं.

सूर्योदयच्या या किमान दोन दिव्यांना उजळताना पाहून तो गदगद झाला. पापण्या ओळवल्या.  कंठ दाटला.

"तो माणूस सगळ्यांना मारताना लपलो होतो." छोटीशी मुलगी रडत बोलली.

"गप. शांत हो." तो त्याच्याच मस्तकी हात ठेवून तिला आणि पोरालाही दिलासा देत होता.

"चला." तो त्यांना घेऊन गेला.

◆◆◆

हिंसेची काय परिणीती होते हे आपल्या मुलास उमजावं यास्तव जतीन यांनी केलेलं हे प्राणार्पण होतं. आपल्यासोबत आपली बाकीची मुलं यात होरपळी जातील याचा कयास त्यांनी कदाचित केला नव्हता. ओलं-सुकं सारं जळालं होतं... विध्वंसा

काही काळापूर्वी चैतन्यानं ओतप्रोत असलेलं व आता गोलाएथच्या विध्वंसानं मरूभूमी बनलेल्या या सूर्योदय अनाथालयरुपी बगीच्यातील मागे उरलेल्या दोन चिमुकल्या फुलांना घेऊन रवीनं सूर्योदय कायमचं सोडलं...

तरी त्या मुलांना घेऊन तो जाणार कुठं होता?

◆◆◆

तो पोलीस हेडकॉर्टर्सला पोहोचला. शार्दूलनं त्याला आपल्या केबिनमध्ये बोलवून घेतलं. श्रीशा आधीच तिथं येऊन बसली होती. रवीनं पोरांना तिच्या सुपूर्द केलं. ती काय ते समजली. त्यांना घेऊन ती बाहेर गेली.

रवी या मुलीवर विश्वास ठेवतोय हे पाहून ती मुलं सुद्धा श्रीशावर विश्वासली. तिच्याविषयी मनात काही कलुषित न आणता तिच्यासोबत बाहेर जाऊन थांबली. ती जाताच शार्दूल बोलू लागला,

"श्रीशाकडून समजलं मला सगळं. त्यानुसार शोध घेतला. अखिलीसच्च्या पजेशन्सची तपासणी केल्यावर समजलं, की त्याची कोणतीच शिपमेंन्ट जर्मनीत

अडकली नाहीये. ती त्यानं लाच चारून कधीची सोडवून घेतली होती. स्वतः त्याची सिटीझनशीपही जर्मनीची आहे. दहा वर्षांपूर्वी त्याने भारतीय नागरिकत्व त्यागून जर्मनीचे नागरिकत्व घेतले होते. त्याच्याकडच्या डेटावरनं बरेच खुलासे झाले.

"गुस्ताव लिओनहार्ड म्हणून जर्मन फेडरल चान्सलर आहे. त्याला म्हणे जर्मनीतील सत्ता पलटवून कायमस्वरूपी स्वतःची सत्ता तिथं स्थापन करायची आहे.

"पब्लिक डोमेनमध्ये गेलेल्या कागदपत्रांवरून बायोवेपनची माहिती समोर येताच जर्मन सरकारनं ती कागदपत्रं दाबून टाकली. तेथील गव्हर्नमेंटला ब्लॅकमेल करण्यासाठी त्याला ते बायोजेनेटिक वेपन हवं होतं.

"हिटलरचा डीएनए जर्मन लोकांच्या पेक्षा वेगळा असल्यानं त्या बायोवेपनचा जर्मन लोकांनाच मोठा धोका आहे आणि ती भीती घालूनच त्याला स्वतःची हुकूमशाही सत्ता तिथं आणायची होती.

"जर्मन गव्हर्नमेंट त्या जिवाणूंच्या शोधात लागणार असतानाच गुस्तावनं गव्हर्नमेंटला पटवून दिलं, की हा शोध गुप्तपणेच करावा लागेल. कोणतीही स्पाय एक्टीव्हीटी भारतात केली, आणि भारताला या बायोवेपनची माहिती मिळाली, तर भारत ते ताब्यात घेऊ शकतो आणि मग सगळंच क्षणात संपून जाईल. त्याचे भारतात पर्सनल कनेक्शन्स आहेत व त्याद्वारे तो हे बायोवेपन कोणाच्याही नकळत मिळवेल असं काही सांगून त्यानं बायोवेपन शोधण्याची जबाबदारी स्वतःवर घेतली. गुस्ताव फेडरल चान्सलर असल्यानं जर्मन गव्हर्मेंट पण त्याच्यावर विसंबून

या बाबतीत निष्क्रिय झालं. आता फक्त ते बायोवेपन मिळवून गुस्तावला आपला प्लॅन यशस्वी करायचा होता.

"अखिलीस हा मूळ भारतीय आहे व तो कोल्हापूरबद्दल बरंच जाणून होता. इथं त्याचे काही व्यवसायही होतेच. गुस्तावचा हा खास मित्र होता. या प्रकरणात त्याची मदत घ्यायचं गुस्तावनं ठरवलं.

"एथनिक बायोवेपन बद्दल अखिलीसला संपूर्ण माहिती गुस्तावकडून कळताच ते बायोवेपन इथं सापडेल हे अखिलीसच्या लक्षात आलं. गुस्तावचा हे बायोवेपन मिळवण्यामागचा खरा हेतू जाणून गुस्ताव सोबत अखिलीसनं डील केलं होतं, की त्यानं हा बायोवेपन गुस्तावला मिळवून दिला, तर गुस्ताव सत्तेवर येताच तिथले सगळे व्यवसाय हे तो अखिलीसच्या ताब्यात देईल." शार्दूल माहिती देत असता श्वास घेण्यास थांबला.

अखिलीसनं इब्लिसला ठराविक अर्धसत्य सांगून बाकी बरंच सारं खोटं चेपलं होतं. आपला मनसुबा उघड पडू नये आणि यातून बायोवेपन मिळवण्यात इब्लिसची मदत झाली, तर उत्तमच असा त्याचा प्लॅन होता हे रवीला शार्दूलकडील माहितीनं ध्यानात येऊ लागलं. या माहितीनं आता काही फरक पडणार नव्हता. म्हणून शार्दूल पुढं सांगण्याच्या तयारीत असतानाच...

तोच... या साऱ्याला वैतागलेला हताश रवी त्याला थांबवता झाला,

"जाऊ दे. आता त्या गोष्टींना काही अर्थ नाही. सगळं संपलं आहे. शिवाय मी तो जिवाणूही नष्ट केलाय." रवी खिन्न बोलला. आणि पुढं म्हणाला,

"फक्त एक काम करा. हे पुरावे जर्मन गव्हर्नमेंटला पाठवून द्या, म्हणजे गुस्तावचा पण निकाल होईल. नाहीतर हिटलरच्या मूर्खपणामुळं होरपळून

निघालेलं आणि त्यातून शहाणं झालेली जर्मनी पुन्हा एका मूर्खाच्या हाती जाईल. मला तिथल्या राजकारण्यांच्या बद्दल काडीची कणव नाही. पण तिथली जनता त्रासायला नको." रवीनं शार्दूलला सल्ला दिला.

"माझाही तोच विचार आहे." शार्दूल म्हणाला,

"परंतु हे भारत सरकारच्या माध्यमातून करावं लागेल. त्यासाठी माझे प्रयत्न चालू आहेत." त्यानं त्याची कार्यपद्धती सांगितली.

"करायचं असेल, तर स्वतः करा. इथल्या राजकारण्यांची डोकी मधेच फिरली, तर पेच निर्माण होईल." रवीनं भेदक नजर शार्दूलकडं फेकली,

"ते शक्य नसेल, तर मीच निनावी हे करतो." त्यानं सुचवलं.

"बघू कसं होतंय. हे करावं तर लागेलच. असो..." तो काही बोलणार तोच त्याच्या ध्यानी काही आलं,

"बरं, हेलीचा अंत्यविधी...?" शार्दूल बोलत असताना रवीनं त्यास अडवलं.

"करून टाका." रवी बोलला. हेलीचा आणखीदा असं पाहणं त्याला सहन होणारं नव्हतं.

मग शार्दूलनं विषय बदलला,

"ती सोबत आलेली मुलं?" त्यानं रवीला विचारलं.

"माझी जबाबदारी आहेत." रवी म्हणाला,

"पण आता त्यांची काळजी वाटते. माझ्या माघारी त्यांना कोण सांभाळेल?" तो कळकळीच्या विवंचनेनं हळहळला.

"मी त्यावरच येत होतो." शार्दूल गंभीर बोलला,

"माझं ध्येय होतं, इथलं गुन्हेगारी जग संपवणं. शेवटचा गुन्हेगारही संपला." इब्लिस विषयी तो बोलत होता हे रवी समजला,

"आता जे अस्तित्वातच नाही, त्याला शिक्षा कशी होईल." शार्दूल निर्णय सूनवत म्हणाला.

डिप्युटी सुप्रीटेंडेंट शार्दूलनं रवीला जाऊ द्यायचं ठरवलं होतं.

रवीला हे मान्य झालं नाही. रवी इब्लिस म्हणून काम करतानाही शार्दूलच्या कर्तव्यनिष्ठेचा कायल होता. म्हणून तर त्यानं वेळोवेळी त्याला जीवे न मारता सोडून दिलं होतं.

आता त्यानं आपल्या कर्तव्यबुद्धीला मुरड घालावी हे त्यास मान्य होणार नव्हतं. तो म्हणाला,

"रवी आणि इब्लिस दोन्ही एकच आहेत डीएसपी साहेब. ते तोपर्यंत विलग होणार नाहीत जोपर्यंत इब्लिसला त्याच्या कर्माची शिक्षा मिळणार नाही! तुमच्या सारख्या प्रामाणिक माणसानं असं दूषित होऊ नये. मानवतेचा अखेरचा आधार पण गळून पडेल." रवी म्हणाला.

"मग ती मुलं?" शार्दूलनं फिकीरीने पुसलं.

"श्रीशा सांभाळेल." रवी ठाम बोलला.

"श्रीशा? ती तुमचीच सहकारी. तुमच्याहून वेगळी कशी असेल? तिनंही स्वतःला सरंडर केलंय केव्हाच. आणि तसंही इब्लिसला अटक करायची असेल, तर त्याचे साथीदार कसे सोडता येतील?" शार्दूल तात्विक बोलला.

रवी कोषात गेला. ब्रह्मांडभर त्याचे विचार काही क्षणात फिरले; आता मुलांचे काय, कसे...???

"तुम्ही काळजी करू नका." शार्दूलनंच त्याची चिंता मिटवली,

"मी उत्तम सोय करेन त्यांची. जातीनं त्यांची काळजी घेईन." तो रवीला दिलासा देत बोलला.

रवीला भरल्यागत झालं. त्याचे पाणावलेले कृतज्ञ डोळे शार्दूलचे आभार मानत होते. तो इतका उपकाराच्या भावनेनं भरून गेला, की त्याच्या तोंडून काहीच शब्द फुटले नाहीत. शार्दूलनंच मग सुहास्य वदनानं मान डोलावून त्याला आश्वस्त केलं.

"फक्त एक विनंती आहे, मुलांसमोर मला जेलमध्ये टाकू नका." रवी भावूक दाटलेल्या कंठानं बोलला.

उष्ण अश्रूबिंदू त्याच्या करुण चक्षूंतून ओघळले. त्याचा श्वासही गरम झाला होता...

●●●

अंततः जिथून रवीची सुरवात झाली होती, तिथेच तो फिरून पोहोचला होता...

जेल!

# समारोप :-

आशा आहे सुजाण वाचकांना 'इब्लिस' आवडली असेल. सदर कथा ही गेली दोन वर्षांहून अधिक काळ लिहायला चालू करून अर्धवट पडली होती. कारण विषय माझा मलाच विवादास्पद वाटत होता. म्हणून लिहिलेली अर्धवट फाईल तशीच पडून होती. परंतु अखेर धाडस एकवटून ही कथा पूर्ण केलीच. कारण बोलणं गरजेचं आहे असं वाटत होतं!

कथेतील पात्रे काल्पनिक असली, तरी ऐतिहासिक घटना या अस्सल आहेत यात शंका नाही. आणखी एक गोष्ट स्पष्ट करावी वाटते, की कथेत जी खलनायकांची नांवे आली आहेत, ती इंग्लिश असल्याने मी ठराविक अशा विशिष्ट कम्युनिटीला टार्गेट करतोय असा कृपया कोणी गैरसमज करून घेऊ नये. ही नांवे कथेत आली आहेत ते फक्त मला ती नांवे आवडतात म्हणून. त्यांचा अर्थ व त्यांच्याशी संबंधित त्या त्या देशांतील पुराण कथा, त्यांच्या संस्कृती विषयी काही शिकवून जातात म्हणून.

कसे की, 'अखिलीस' हा ग्रीक मायथॉलॉजी मधील 'इलियड' या महाकाव्याचा एक नायक आहे. तो तरुण वयातच मृत होईल अशी भविष्यवाणी असते. त्याचे मरण चुकवण्यासाठी त्याची आई 'थेटिस' तो बाल्यावस्थेत असताना त्याला 'स्टाईक्स' नदीत बुडवते, ज्याने तो अभेद्य होईल. परंतु हे करत असताना तिने त्याला टाचेकडून धरलेले असते, म्हणून त्याच्या टाचा नदीत बुडवल्या जात नाहीत व त्यामुळे त्याच्या टाचा या सामान्यच राहतात. त्यामुळे त्याच्या टाचा या त्याच्या कमजोरी बनतात. पुढे याचे अनेक वेगवेगळे व्हर्जन्स आहेत, त्यांतील

एकात ट्रॉयच्या युद्धात अपोलो या देवाने अखिलीसच्या कमजोर टाचेवर आघात करण्याचे सुचवल्यावर ट्रॉयचा राजकुमार पॅरिस हा अखिलीसच्या टाचेत बाण मारतो व अखिलीसचा वध करतो. मला ही कथा महाभारतातील गांधारी व दुर्योधनाच्या प्रसंगाची आठवण करून देते. जेव्हा कौरव महाभारत युद्ध जवळपास हरलेले असतात, दुर्योधनच काय तो एकटा राहिलेला असतो. किमान तो तरी जगावा म्हणून गांधारी त्याचं शरीर आपल्या तपसाधनेने वज्राचं करायचं ठरवते व त्याला संपूर्ण नग्नावस्थेत आपल्याकडे येण्याचे सुचवते, परंतु श्री कृष्ण दुर्योधनला आडवे जाऊन त्यास दोष देतो, की 'मातेसमोर असं विवस्त्र जाण्यास तुला लाज वाट नाही काय?' म्हणून मग दुर्योधन आपला कमरेखालील भाग झाकून गांधारी मसक्ष उभा राहतो. जेव्हा गांधारी प्रथमतः डोळ्यांवरील पट्टी बाजूला करते, तेव्हा तिची नजर दुर्योधनच्या ज्या शरीर अवयवांवर पडते, ते वज्राचे होतात, पण कमरेखालचा भाग झाकला असल्याने तो सामान्यच राहतो. आणि जेव्हा दुर्योधन व भीम निर्णायक गदायुद्ध लढतात, तेव्हा त्याच जागी श्री कृष्णाच्या सांगण्यावरून पुढे भीम आघात करून दुर्योधनचा वध करतो. म्हणून म्हणतो आपण मानव वेगळे नाही आहोत. संस्कृती एक नसल्या तरी संस्कृती संस्कृतींमध्ये बरेच साम्य हे आढळतेच, जे अगदीच ठसठशीत आहे. फक्त डोळे उघडून व डोके खुले ठेवून पाहिले, तर कोणी वेगळा नाही हे आपसूक लक्षात येते, जास्त कष्ट घेण्याचीही गरज नाही त्यासाठी.

'गोलाएथ' बद्दल बोलायचं, तर गोलाएथ आणि डेव्हिडची बायबल मधील कथा सुप्रसिद्ध आहे. गोलाएथ सारख्या अजस्त्र अशा शक्तिशाली राक्षसाला डेव्हिड सारखा लहान मुलगा आपल्या आत्मविश्वास व धाडसाच्या जोरावर कसा

हरवतो हे या कथेत आहे. यातून अन्याय व पिळवणूक करणाऱ्या शक्तिशाली व्यवस्थेविरुद्ध तसेच आत्मविश्वास व धाडसाने लढण्याची शिकवण मिळते.

हिब्रू बायबल मधील आणखी एक आणि मला सर्वांत जास्त आवडणारी गोष्ट म्हणजे, मोजेस म्हणजे 'मुसा'ची. मुसा हा ज्युडेईजम, इस्लाम, ख्रिश्चन आणि इतर इब्राहिमिकल रिलीजन्समध्ये प्रोफेट (ईश्वरचा प्रेषित) आहे. इजिप्तच्या फेरोहने इज्राईली ज्यू (बेने इज्राईली) लोकांविरुद्ध केलेल्या डिस्क्रिमीनेशनवर भाष्य करते व मुसा कसे आपल्या ज्यू बांधवांना सन्मान मिळवून देतो, त्यांना धीर व धाडस देतो, त्यांना स्वातंत्र्य मिळवून देतो याबाबद्दल ही बोलते कथा बोलते. आणि हे खरंच आत्मसात करण्यासारखे आहे. आता देव, चमत्कार अशा गोष्टी यातून जरी वेगळया, तरी या शिकवणी खरंच आत्मसात करण्यासारख्या आहेत असं वाटतं.

' जोनाथन' हाही हिब्रू बायबलमध्ये येतोच. हा राजा साऊलचा मोठा मुलगा असून राजा डेव्हिडचा हा निष्ठावान मित्र आहे. बायबल मधील महत्त्वाच्या व्यक्तींपैकी जोनाथन हा एक आहे. जोनाथनचा अर्थ 'गिफ्ट ऑफ गॉड' असा आहे. 'यहोनातन' या हिब्रू देवाच्या नांवाचे हे संक्षिप्त रूप आहे.

आणि 'रिकार्डो'चा अर्थ तर कथेतच दिला आहेच. रिकार्डो हे नांव मात्र मी असंच रँडमली घेतली आहेत, त्या नांवाचा अर्थ आवडला असल्याने.

आणखी पुढे संस्कृतींमधील साधर्म्य पहायचेच, तर बायबल मधील नोआची कथा आपल्याकडील विष्णूच्या मत्स्यावताराशी निगडित राजा मनु याच्या कथेशी तंतोतंत जुळणारी आहे. विशेष म्हणजे अगदी हीच कथा वेगवेळया देशांत, वेगवेगळया संस्कृतींत वेगवेगळया नायकांच्या नांवे सांगितल्या, ऐकल्या जातात. फक्त ती व्हर्जन्स नोआ व मनु इतकी प्रसिद्ध नाहीत.

एवढंच काय पण कृष्ण आणि येशूच्या जन्माच्या कथांमध्ये देखील आपल्याला नजिकचं साधर्म्य दिसून येईल.

विविध संस्कृतींच्या साधर्म्याविषयी अजून उदाहरणे बघितली, तर ऋग्वेदात वृत्रासूर व इंद्र यांच्या युद्धाचं जे वर्णन येतं, तसं युद्ध आपल्याला ग्रीक पुरांकथेत देखील बघायला मिळतं, तिथं 'झ्यूअस'चं 'टायफन' या ड्रॅगन सोबत युद्ध झाल्याची कथा आहे. ऋग्वेदातील या कथेचं बीज घेऊनच मी मागे 'वृत्र - द लास्ट असाईनमेंट' लिहिली होती. वाचकांनी वाचली नसेल, तर तीही आवर्जून वाचावी. यासोबतच भगवद्गीता मधील अध्याय तीन कर्मयोग वर आधारित कथा 'अ प्योर् वन - दि एप्रिल चेज' देखील आपल्याला ईसाहित्यवर वाचण्यास मिळेल. असो...

अलबत मी कुठलाच ईश्वर मानत नाही, पण जसं भारतीय पुराणकथांमधून काही न काही शिकण्यासारखं असतं, तसं ते इतर धर्मीय पुराण कथांमध्येही आहे. बाकी बरेच ग्रंथ हे अन्याय करण्यासाठीही, उच्च-नीच्चता निर्माण व स्थापन करण्यासाठीही निर्मिले आहेत आणि तेही सर्वच धर्मात हेही तितकेच खरे. परंतु त्यांतील मानवजातीच्या उत्कर्ष व कल्याणासाठी जे योग्य ठरेल ते केवळ घ्यावे, त्याज्य ते टाकावे असे वाटते. असो, तिकडे नको जाऊयात...

ही वर नमूद अगदी तुटपुंजी उदाहरणं आहेत. बघायला गेलं, तर अशा असंख्य साधर्म्य असणाऱ्या कथा विविध संस्कृतींतून काढता येतील. सांगण्याचा उद्देश हाच, की इथून तिथून सगळे थोड्या फार फरकाने सारखेच! संस्कृती देखील साधर्म्य राखूनच असलेल्या. विविध खंडांतील देवाणघेवाण ही काही आत्ताची नाही. ती पूर्वापार चालत आलेली आहे. ही मिसळ होणं शक्यच होतं व तशीच ती झाली आहे. त्यामुळे हा आपला - तो परका, हे आपलं - ते परकं असं काहीच

उरलं नाही. जे आहे ते आपलंच आहे. अगदी आजचं उदाहरण घ्यायचं झालं, तर वैज्ञानिक साधनांचा शोध दुसऱ्या देशात लागला म्हणून आपण ते वापरायचं टाळतो का? उत्तर ठळक नाही असेच आहे. मग आपण आपल्याला जे आप्त वाटत नाहीत, मग ते देशाबाहेरील असोत व देशातील, त्यांचा द्वेष आणि तिरस्कार करण्यासाठी कारणं का शोधत असतो? मानव मानून आपण एकच आहोत हे का लक्षात घेतलं जात नाही? का आपला जाती स्वभावच तो आहे... तसे असले, तरी स्वभाव बदलता येतातच!

अगदी 'डार्विनचा उत्क्रांतीचा सिद्धांत' देखील हेच सांगतो, की - 'प्रजाती कालांतराने बदलू शकतात, नवीन प्रजाती आधीपासून अस्तित्वात असलेल्या प्रजातींमधूनच येतात आणि सर्व प्रजातींचा एक समान असा पूर्वज आहे.'

म्हणजे आपण सर्व एकच आहोत हे वैज्ञानिक सिद्धांताने देखील सिद्ध आहे. मग आपण स्वतःचं वेगळं अस्तित्व आहे आणि समोरच माझ्यापेक्षा कोणी वेगळा व कमी, हीन दर्जाचा आहे हा विचार का?

असो, मला फक्त इतकंच सांगायचं आहे, ही कथाच मुळी मी मानवजातीच्या परस्पर प्रेमाविषयी, वैश्विक बंधुतेविषयी लिहिली असता, मीच कोणाबद्दल आकस व राग येथे व्यक्त करेन असं होणार नाही, त्यामुळे कोणी कसलाच गैरसमज करून घेऊ नये. यातील सर्वच नांवे फक्त मला आवडतात म्हणून तशी ती आली आहेत, बाकी त्यात इतर दुसरा उद्देश असा काही नाही हेच सांगण्याचा उद्देश होता. माझ्या सर्वच कथांमध्ये जी नांवे येतात, त्यांना विशिष्ट असा अर्थ असतो व ती माझी आवडती नांवे असतात, मग ती नायकांची असोत

वा खलनायकांची वा इतर सहाय्यक व्यक्तिरेखांची असोत. आजवरच्या व इथून पुढे येणाऱ्या कथांमध्ये देखील हेच.

बाकी ज्या जैविक शस्त्राविषयी सदर कथेत लिहिले आहे, ते देखील पूर्णतः काल्पनिक आहे, परंतु आपण एकमेकांचा तिरस्कार न करता सर्व एकच आहोत हे समजून बंधुभावनेने रहायला हवे हे, द्वेषाचा सर्वांत मोठा पुरस्कर्ता व मूर्तिमंत उदाहरण असणाऱ्या हिटलरची पार्श्वभूमी घेऊन त्या माध्यमातून सांगण्यासाठी ते रचिले गेले आहे.

सदर कथेसाठी मी 'जीन-पॉल मल्डर्स' या बेल्जियन पत्रकाराने २०१० च्या आसपास केलेल्या शोध व तपासाचा आधार घेतला आहे. त्यांनी 'मार्क वर्मीनेर' या इतिहासकार यांना सोबत घेऊन सदर संशोधन केले होते. मार्क वर्मीनेर यांनी हिटलर व त्याचे पूर्वज यांच्यावरच मुख्यतः लिखाण केले आहे.

यांनी हिटलरच्या सुमारे ३९ नातेवाईकांच्या सलाईव्हा सॅम्पल्स कलेक्ट करून त्यांचे डीएनए परीक्षण करवले त्यांत हिटलरचे न्यूयॉर्क स्थित पुतणे 'इलेक्झांडर स्टुअर्ड-ह्युस्टन' व ऑस्ट्रिया स्थित हिटलरचे चुलत भाऊ 'नॉबर्ट एच.' यांचे डीएनए सॅम्पल्स देखील सामील होते. या डीएनए सॅम्पल्सच्या परिक्षणाअंती त्यांत 'ज्यूईश' व 'उत्तर आफ्रिकन' डीएनएचे अवशेष आढळून आले. या टेस्ट्स दरम्यान त्या डीएनए सॅम्पल्समध्ये 'Y-Chromosome' चा एक फॉर्म आढळून आला, जो जर्मनी व पश्चिम युरोपात दुर्मिळ आहे. परंतु 'ज्यू' व 'उत्तर आफ्रिकन' डीएनए गटांमध्ये सामान्यतः आढळून येणारा आहे.

सदर डीएनए सॅम्पल्समध्ये 'Haplogroup E1B1B' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जेनेटिक मटेरियलचे स्वरूप होते व हे सामान्यतः 'ज्यू' लोकांमध्ये आढळते.

परंतु काही तज्ञांच्या मते, असे जरी असले, तरी हिटलर 'ज्यूईश' किंवा 'आफ्रिकन' किंवा या दोन्हीच्या कॉम्बिनेशनने मिळून असा 'मिश्र-वंशीय' होता असे म्हणता येत नाही, कारण 'E1B1B Haplogroup' हा इतर एथनिक ग्रुप्स मध्ये देखील आढळून येतो.

मात्र, 'जर्नल ऑफ युरोपियन स्टडीज्'च्या 'मे 2019' च्या अंकात प्रकाशित 'Aus den Gemeinden von Burgenland : Revisiting the question of Adolf Hitler's Parental Grandfather' या सायकॉलॉजिस्ट व फिजिशियन असणारे 'लियोनार्ड सॅन्क्स' यांच्या या प्रबंधात हिटलरचे आजोबा ज्यूईश असल्याचेच म्हंटले आहे. त्यात त्यांनी त्यांच्या दृष्टीने असलेल्या इतर पुराव्यांसोबतच हिटलरचा वकील 'हॅन्स फ्रॅंक' याचा देखील दाखला दिला आहे. नंतर हा 'हॅन्स फ्रॅंक' दुसऱ्या महायुद्धात नाझींनी पोलंडचा जो भाग काबीज केला, त्या भागाचा 'गव्हर्नर जनरल' होता.

'हॅन्स फ्रॅंक'ला 1946 ला फाशी दिल्यानंतर सात वर्षांनी त्याची एक डायरी प्रकाशित झाली होती. त्यात त्याने नमूद केले आहे, की हिटलरचा एक पुतण्या 'विल्यम पॅट्रिक' याने हिटलरला धमकीचे पत्र लिहिले होते, की हिटलरचे आजोबा ज्यूईश असल्याचे तो उघड करेल. तेव्हा हिटलरने 'हॅन्स फ्रॅंक'ला या दाव्या बाबत शोध घेण्यास सांगितले असता फ्रॅंकच्या तपासाअंती त्यालाही असेच आढळून आले होते, की हिटलरचे आजोबा हे 'ज्यूईश' होते व ते 'ऑस्ट्रिया' मधील 'ग्राझ'

येथील रहिवासी होते, तेथेच ते राहत होते. हिटलरला मात्र ही गोष्ट अमान्य होती. 'हॅन्स फ्रॅंक'ने हिटलरचे ते मत मान्य केले, परंतु त्यानंतरही हिटलरचा 'ज्यू' वंशाशी संबंध होता हे अद्यापही शक्य असल्याचे त्याने त्याच्या डायरीत लिहून ठेवले होते.

तसेच ही फक्त एक अफवा आहे असाही एक प्रवाद आहे. सत्य काही असो, परंतु ही एक कथा असल्याने मी कल्पना स्वातंत्र्य, निर्मिती स्वातंत्र्य घेऊन प्रस्तुत प्रमाणे कथा लिहूच शकतो. आणि त्याप्रमाणे मी ती लिहिली आहे. अखेर कथेतील आशय महत्त्वाचा! जे सांगू पाहतोय, तो संदेश महत्त्वाचा!

सुजाण वाचकांनी त्याची सत्यता पडताळून पहावी. आता हिटलरचा विषय घेऊन हे लिखाण का? किंवा ही कथा का? तर ही कथा वाचून आपण वर्तमान परिपेक्ष पहावा, तेव्हा आपल्याला या प्रश्नाचे उत्तर मिळेल. मला जे सांगायचं आहे, ते कथेत सांगून झालं आहे. ते इतकंच आहे का? तर नाही... जे बोलायचं असतं ते वेळोवेळी पूर्व कथांमधून आलं आहे व पुढेही येत राहील... असो...

अंततः एवढंच प्रयोजन आहे, की 'आम्ही भारताचे लोक' हे 'एक' आहोत आणि तेच मन व मस्तिष्क यांच्यात पक्के ठसवून, आपलेच बंधू-भगिनी हे फक्त वेगळया जात, धर्म, पंथ, वर्णाचे आहेत, त्यांचे खाण-पान आपल्याहून अलग आहे म्हणून त्यांचा तिरस्कार न करता, ते आपलाच एक अविभाज्य भाग आहेत हे आपण नेहमी लक्षात ठेवावे. मग ते कोणीही असोत.

एका कुटुंबातील प्रत्येक सदस्यांच्या स्वभावात फरक असतोच, तसेच देशातील नागरिकांमधील हे मान्यतांचे फरक आहेत इतकंच!

आपण 'विविध' असलो, तरी अखेर 'एक कुटुंब' आहोत, फक्त 'कश्मीर ते कन्याकुमारी' पसरलेल्या या विशाल कुटुंबात अनेक स्वभावाची लोकं आहेत असं धरून चालावं, जे सत्यच आहे. किंबहुना हे फक्त देशापुरतं सीमित नाही, तर अखिल विश्वाला त्या दृष्टीने आपण बघत आलो आहे, फक्त ते आपण विसरत चाललो आहे. पुन्हा ती दृष्टी प्राप्त करावी.

आपली विविधता टिकवून, आपला हा भारत देश नेहमी एकसंध ठेवू!

आणि हेच हिटलरची पार्श्वभूमी घेऊन त्या माध्यमातून या कथेतून सांगितले आहे...

●●●

महत्त्वपूर्ण सूचना :-

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

© All kind of copyright solely remains to the writer Suraj Kashinath Gatade.

# सूरज काशिनाथ गाताडे यांची यापूर्वीची प्रकाशित पुस्तके

१) द डेथ ऑफ लिंकन्स् मदर (सायंटिफिक क्राईम थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/death_of_lincolns_mother_suraj_gatade.pdf

२) डेथ विल (मिस्टर वाघची पहिली कथा - सायंटिफिक सायकॉलॉजिकल क्राइम थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/death_will_suraj_gatade.pdf

३) दे किस्ड् बाय मिस्टेक (रोमँटिक कॉमेडी/ट्रॅजेडी)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kiss_surajgatade.pdf

४) द पॅरासाइट (सायन्स फिक्शन)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/parasite_suraj_gatade.pdf

५) फ्लेम (म्युसिकल - फॅन्टसी/सायकॉलॉजिकल/ट्रॅजेडी/लव स्टोरी या चार विविध कथा प्रकारांचा कथा संग्रह)


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/flame_suraj_gatade.pdf


६) अ हेवी प्राईझ् - (सायंटिफिक/मिस्ट्री/एक्शन/सायकॉलॉजिकल/थ्रिलर)


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ahp_suraj_gatade.pdf


७) डेडली मिटिंग्स् - (सायंटिफिक/मिस्ट्री/एक्शन/सायकॉलॉजिकल/थ्रिलर)


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/deadly_meeting_wagh_suraj_gatade.pdf
८) एजंट - X - (सायंटिफिक/मिस्ट्री/एक्शन/सायकॉलॉजिकल/थ्रिलर)
http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/agent_x_suraj_gatade.pdf
९) तूमाझासांगाती - (सायन्सफिक्शन)
http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/tu_majha_saangaati_suraj_gatade.pdf
१०) वृत्र (सायकॉलॉजिकल/एक्शन/मिस्ट्री/थ्रिलर)
http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/vrutra_suraj_gatade.pdf
११) अ प्योर वन
http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/the_pure_one_suraj_gatade.pdf
१२ ) अंतःपूर
http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/antahpur_suraj_gatade.pdf
१३) LCB केस फ़ाईल ००
https://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/case_file_00_suraj_gatade.pdf



सूरज गाताडे
एल. सी. बी.
केस फाईल - 00



सूरज गातोडे


अ हेवी प्राईज़



सूरज गातोडे
द पॅरासाईट



सूरज गातोडे
दे
किस्ड
बाय मिस्टेक


सूरज गाताडे
डेथ विल


सूरज गाताडे



सूरज गाताडे
अंतःपूर


सूरज गाताडे


सूरज गाताडे


सूरज गाताडे


सूरज गाताडे
X


सूरज गाताडे
'अ प्योर् वन-दि एप्रिल चेज्!'